CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

5.5

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परमप्रिय प्रेमलतास

विमलेशीच.

'आगू १९८३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दादांच्या शब्दांत दादा : २

★

दादा धर्माधिकारी

★

१९७३

परंधाम प्रकाशन, पवनार, (वर्धा)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशकीय

आचार्य दादा धर्माधिकारी यांनी विमलाताई ठकारांना १९४९ ते १९६२ या दरम्यान लिहिलेल्या पत्रांतील निवडक भाग कालानुक्रमाने पण विभागवारीने या पुस्तकात दिलेला आहे. दादांच्या पत्रसाहित्यासंबंधीं निदान मराठी वाचकांना तरी स्वतंत्रपणें सांगण्याची गरज नाहीच. सर्वोदयाचे भाष्यकार म्हणून ते भारतभर प्रसिद्ध असले तरी आमच्यासाठी ते केवळ भाष्यकार नसून तरुणांचीं सुखदु:खें ऐकून त्यांना त्यांच्याच भाषेत वाचा फोडणारे ते 'पत्रलेखक दादा' पण आहेत.

दादांच्या पत्रांतून नेहमीच स्नेह, जिव्हाळा ओसंडत असतो. या पत्रांतून दादांनी आपलें अंत:करण पिंजून पिंजून मोकळें केलें आहे. एक तर विमलाताई आणि दादांचें नातें आणि त्यात दोघांचें सार्वजनिक कार्य माहीत असलेल्यांना या पत्रांतून अंत:करणाच्या ओलाव्याबरोबर मार्गदर्शन लाभणार आहे.

या पुस्तकाचा पहिला भाग तीन वर्षांपूर्वी दादांच्या एकाहत्तराव्या वाढदिवशीं प्रकाशित झाला होता. त्यानंतर तब्बल तीन वर्षांनी हा दुसरा भाग बाहेर पडत आहे! या दरम्यान अनेकांनी दुसरा भाग लवकर वाचावयास मिळावा म्हणून आमच्यामागे लकडा लावला; परंतु नाइलाज झाल्याने हा असा काळ गेला. या विलंबाबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

— प्रकाशक

प्रथमावृत्ति : १ जुलै १९७३
प्रकाशक : रणजित् देसाई, परंधाम प्रकाशन, ग्रा. से. मं., पवनार, (वर्धा)
मुद्रक : रणजित् देसाई, परंधाम मुद्रणालय, पवनार.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कौटुंबिक जीवन	:	1
दादांची मनू	:	37
वत्सलता	:	79
स्नेहयोग	:	111
स्नेहायत्त परिवार	:	139
रसिक प्रवासी	:	163
चिर-विद्यार्थी	:	311

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण पहिलें

कौटुंबिक जीवन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: १ :

संयुक्त कुटुंब हें स्नेहभावनेवर उभारलेलें नसून अधिकारशाहीवर व वृद्धसत्तेवर उभारलेलें आहे. त्यामुळे त्यात सर्वांच्या व्यक्तित्वाचा नीट विकास होत नाही. धाकटया व कमी अधिकाराच्या व्यक्तींचीं जीवनें वळून आणि खुरटून जातात. म्हणून वृद्धसत्ताधिष्ठित अधिकारशाही संयुक्त कुटुंबांपेक्षा स्नेहभावनेवर आधारलेलीं विभक्त कुटुंबें पुरविलीं ! संयुक्त राहण्यात भूषण आहे. पण एकाने दुसऱ्याला दडपण्यापेक्षा विभक्त जीवन पुष्कळ बरें !

धनतोली, नागपुर.
२३. १०. '४९.

आमची विमल (सर्वात धाकटी बहीण) देखील पत्रांच्या बाबतीत मोठी चोखंदळ. मी तिला पत्र क्वचितच लिहितो. पण त्यात गंमत, विनोद किंवा लहानसा चिमटा नसला म्हणजे ती म्हणते, हे काही पूर्वीचे दादा नव्हत ! दादा काय अपरिवर्तनीय खडक आहे ? खडकहि झिजतो पण विमलला ते मान्य नाही.

मध्ये वल्लाभाऊंपेक्षा धाकटा बंधु छोटू याची धाकटी मुलगी वनमाला आपल्या आईबरोबर माझ्याजवळ होती. त्या चिमुकल्या मुलीने – दोन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वर्षांच्या – माझें जीवन सुरभित करून सोडलें होतें. मी कोठेहि गेलो तरी आपली माझ्याबरोबर सुपारीच्या पिशवीसारखी असायची. मलाहि तिच्या-वांचून करमेना. मी थोरांमोठ्यांच्या घरीं जाऊन त्यांच्या मुलाखती घेत असलो तरी गुपचुप माझ्या मांडीवर टकमकां पाहत बसलेली असायची. रडायची म्हणून नाहीच. घाणहि करायची नाही, हट्टहि करायची नाही. तिने माझ्या जीवनाला मोठीच चव आणली होती. नंतर आपल्या आई-बरोबर परत गेली.

नवी दिल्ली.
१४.१०.'४९.

काय असेल तें असो, या पाळीला नागपुराहून निघतांना घर सोडणें जड वाटलें. लल्ला, बाळू, चंदू, मालकीण या सर्वांचीच आठवण येत होती. तुमची वेडी आईहि इतकी ऐश्वर्यशालिनी स्त्री आहे की ती मला माझी सोबतीण अजूनहि वाटते. बेटा, माझ्या स्नेहवृत्तीची गंगोत्री माझें कुटुंबच आहे. म्हणून कुटुंब-वत्सलता व समाजप्रेम यांत माझ्या मनात विरोध कधीच उत्पन्न होऊ शकला नाही. आणि त्याचमुळे माझे सहयोगी माझे कुटुंबीय बनले.

कठोर. जिल्हा सूरत
२.३.'५१.

निघतांना तुमच्या मातोश्रींनी विचारलें, 'चाललात कोठे ? 'पुण्याला'. 'याल केव्हा?' 'पंधरा दिवसांनी !' 'तोंपर्यंत माझी व्यवस्था करून जा. या आळीत मला भयंकर त्रास होतो. तुमची मिनिस्ट्रि झाल्यापासून एकहि कायदेशीर गोष्ट होत असेल तर शपथ ! व्याख्यानें कसलीं देता वायफळ !' इतक्यात नाटकातील पात्राप्रमाणे कप्तान परांजपे आले आणि त्यांनी तिची री ओढली ! 'Dada you ought to take it in earnest. She is not jesting!' मी म्हणालो, 'आवारी, तुम्ही, बाळू सावजी, सारेच Democratic front मध्ये जाणार, तेव्हा तिलाच कां वगळता ?'

नागपुर
१९.५.'५१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुमच्या मातोश्रींनी आज शेवया वाढल्या. मी म्हटलें, 'शेवया जांवई-बोवाकरिता असतात. ती म्हणाली, 'तुम्ही माझ्या आईचें जांवईच आहात. शेवया तिने पाठविल्या आहेत.' नंतर आमच्यावर टीकास्त्र सोडलें, '१९४७ सालीं तुमची राजवट सुरू झाल्यापासून कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही! या कॉंग्रेसच्या राज्यात माणूस माणसाला खातें! तुम्हाला त्याची खंत नाही!' आता रात्रीं ९ ला विचारते, 'जेवायचें आहे ना?' उठलो. जेवलो. तिने माझ्यावरोबर फराळ केला. आज तिला शुक्रवार आहे. काल तिचा गुरुवार होता! उद्या शनिवार! 'अगं म्हटलें आज मंगळवार आहे मालकीण!' पण तिला खरें वाटेल तेव्हा! दुसऱ्याच्या प्रत्ययासमोर मान वाकविणें तुझ्या दादाचें ब्रीदच आहे! हार मानलीन् काय?

धनतोली, नागपुर

५.६.'५१.

तुमची आई दोन्ही वेळा जवळ बसून जेवूं घालते. काल तिचा शुक्रवार झाला. म्हणाली, 'तुम्ही मला वेडी ठरविलीच आहे. तेव्हा वाटेल त्या दिवशीं वाटेल तो वार करत्ये. इतक्या शहाण्यात एक वेडी खुळी खपत नाही, मग तुमच्या वुद्धिमत्तेची काय मातवरी?

अलीकडे चंदूच्या मुंजीचा ध्यास घेतला आहे.

धनतोली, नागपुर.

७.६.'५१

तुमच्या मातोश्रींची खास मेहरनजर आहे. दोन्ही वेळा जेवण्याविषयीं विचारतात, आपण बरोबर जेवतात. परवा सावनेरहून यायला रात्रींचा १ वाजला. पाऊस होता आणि त्यात 'बस' चा प्रवास! पण मी घरीं आल्यावरोवर, जेवता का, म्हणून विचारलेंच. आज सकाळीं लवकर उठून चहा तयार केला. आपण घेतला माझ्यावरोबर. नंतर मी स्टेशनवर आलो.

वर्धा.

१३.६.'५१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चंदूराजांची आजपासून परीक्षा आहे. तिच्या नांवाने त्यांच्या कपाळाला आंठ्या आणि डोक्याला ठणका आहे. बवनराव गोरे गोमटे, गरगरीत वकील शोभतात. बाळू तेजीमंदीच्या चक्रांत गरगरा फिरत आहे. बेबी सूतिकागृहाकडे डोळे लावून बसली आहे. लल्लू तिला छळत आहे.

धनतोली, नागपुर.
२०. ३. '५२.

पहाटे ५.३० च्या बसने निघून ता० ३१ ला मोर्शीला पोचलो. ती० स्व० नानासाहेव हताश मनःस्थितीत होते. मी मुंजीच्या विरुद्ध असल्यामुळे येणार नाही अशी त्यांची खात्री. त्या मला आलेला पाहून ते आनंदाने रडू लागले. काकी आंधळ्या झालेल्या. म्हणाल्या, "डोळे भरून तुझ्याकडे बघूहि शकत नाही मी." मी म्हटलें तेवढ्यापुरती भाग्यवान आहेस. अप्रेक्षणीय दृश्य पाहण्याची आपत्ति ओढवली नाही. सगळ्या जणीं हसल्या. म्हणाल्या, याची ही थट्टेची सवय म्हातारपणींहि कमी होणार नाही. नानासाहेव म्हणजे आता हयात असलेल्या कुटुंबीयात सगळ्यात वडील पुरुष माणूस. त्यांच्याकडे दहा-बारा वर्षांत गेलो नव्हतो. म्हणून गेलो.

'आता दादा आशीर्वाद देतील,' एका चिमुरड्या भावजयीने आपल्या अधिकारात जाहीर करून टाकलें. आशीर्वादात्मक भाषण केलें. संस्कृति-वादी व हिंदुत्ववादी यांच्या बुद्धीचा तिळपापड झाला ! 'अखिल हिंदूंकरिता एकच वेदविहित संस्कार हवा. व्रत बंधाच्या विधीने नवीन संस्कृतीचे नवीन संस्कार रुजविले पाहिजेत. एरवी हें सांस्कृतिक विधि न राहता चोचल्यांचे सोहाळे ठरतील इत्यादि इत्यादि.' मी अंमळ फटकळपणाने सांगितलें. त्यांना अगदी अब्रह्मण्यम् वाटलें.

हायस्कुलात पंधरा मिनिटें बोललो. मोजकें पण अंतःकरणाला जाऊन भिडणारें. नानासाहेव म्हणाले, माझा काही आता भरवसा नाही. तिकिट काढलें गेलें आहे. एकदा तुझें भाषण ऐकावेंसें वाटतें. तिकडे कांताजवळ संध्याकाळीं परतण्याचें कबूल करून आलो होतो. जो आपला शब्द पाळीत नाही त्याच्या शब्दावर कोणाचाच विश्वास बसत नाही. शब्दामध्ये श्रुतीचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सामर्थ्य आहे ही माझी निष्ठा. म्हणून शेवटीं कांताला उशिरा पोचतो म्हणून तार केली. भाषण केलें. मंडळी गार झाली.

सगळ्या बहिणी, आत्या, माम्या, भावजया, पुतण्या सभोवार जमल्या. म्हणाल्या, आम्ही वडोदे, अहमदाबाद, धुळे, बेळगांव, दक्षिण आफ्रिका, काश्मीर यांसारख्या लांबलांबच्या ठिकाणांहून आलो. आमच्यामध्ये एक दिवसदेखील तुम्ही राहू नये. आमचें काहीच नातें का नाही? काहीच हक्क का नाही? त्यांनी अगदी घोळका केला, गलका केला आणि मला गराडा घातला! विठाई माउलीचें वात्सल्यच जणू आपल्या संपूर्ण ऐश्वर्यानिशीं माझ्या भोवतालीं नाचू लागलें!

पण स्वत:च्या शब्दाचें मोल राखायचें असल्यामुळे हें अमोलिक प्रेम हृदयात मावेल तेवढें सांठवून निघालो. वरुडच्या मामी म्हणाल्या, 'मी अमरावतीपर्यंत मोटारीत बरोबर येते. तुमच्या सान्निध्याची माझी आकांक्षा तृप्त झाली नाही.' त्यांना काल रात्री अमरावतीपर्यंत बरोबर आणल्या! हा मौल्यवान् निधि मी आपल्या मातीच्या रांजणातच ठेवतो. दुसरें काय?

वर्धा
१.४.'५२.

•

कालपासून तुमच्या आईंचो मेहेरनजर आहे. सरबत, चहा आग्रहाने पाजणें, बरोबर जेवायला बसणें इत्यादि सुरू आहे. जेवढें काम करते तेवढें आजहि इतरांपेक्षा जास्त नीटनेटकें व काटकसरीने करते. तपशिला-कडे मोठें बारीक लक्ष देते. परवा चंदू 'पेडगांवचें शहाणें' बघायला घेऊन गेला होता. इस्पितळातून पळालेल्या वेड्याने एका आधुनिक संसाराची घडी नीटनेटकी जमवून दिली आणि सगळ्यांचें प्रेम संपादन केलें. त्याची आठवण आली मला.

धनतोली, नागपुर.
२४.४.'५२.

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मांधानला परवा वाळूचें पत्र आलें होतें. ता० २७ लाच दुपारीं हरद्याला पोचायचें आहे असें त्याने बजावलें होतें. पण चि० लल्लूच्या भेटीला महिना होत आला होता. म्हणून बडनेऱ्याहून हरद्याला न जाता नागपुरला आलो. शिवाय तुला रकमहि पाठवायची होती. नागपुरला सगळी मंडळी वाटच बघत होती. पण त्यातल्या त्यात तुमच्या मातोश्री विशेष खुश झाल्या. दिवसभर माझ्यांजवळ बसल्या. मोठें प्रेम केलें. जेवतांना जवळ बसून समाचार घेतला. लल्लूने आपल्या वयानुरूप अनासक्त प्रेम दाखविलें. खेळला माझ्याशी. चंदुराजे रायपुरला आहेत. ते फक्त तिसऱ्या वर्गात पास झाल्यामुळे घरच्या मंडळींचीं मनें खट्टू झालीं आहेत. चंदुराजे आणि तिसरा वर्ग ! वाळू काल मुंबईला जाणार होता. पण त्याच्या नोकराने बँकेतून तीनशें रुपये घेऊन पोबारा केला. बँकेतून पैसे आणायला त्याला पाठविला होता. त्याने पैसे काढले. सायकल घरीं आणून ठेवली आणि नंतर तो अंतर्धान पावला. त्याचा पत्ता लागला नव्हता ! कालचा योग दुर्घटनेचा योगच होता म्हणायचा ! पण एवढ्यापुरता. बाकीचे योग मोठे चांगले होते.

इटारसी.
२८.५.'५२.

ललुआ आणि तुमच्या मातोश्री यांच्याशी अलीकडे माझें बरेंच मेतकूट जमतें. याचा अर्थ मालकीण माझ्यावर पुष्पवृष्टि करण्यात काही कसूर करते असा मुळीच नाही. तिच्या पुष्पांजलीत कण्हेरीचीं, धोतऱ्याचीं आणि घाणेरीचींहि फुलें चिकार असतात. हीं फुलें ती माझ्यावर विशेष सढळ हातानें उधळते. पण ललुआ आणि ती यांच्याशी माझ्या बुद्धीचें साधर्म्य उत्तरोत्तर वाढत चाललें असावें असें मला वाटतें. जे लोक सार्थक व शहाणपणाचें बोलतात त्यांच्याशी बोलतांना मलाहि बुद्धि वापरावी लागते. पण लल्लू आणि मालकीण यांच्याशी चोवीस तास बोलत राहिलें तरी बुद्धीला काडीचाहि शीण येण्याचें कारण नाही. एखाद्या नटव्या, नखरेल बाईला दिवसभर आरसा पाहण्यात जी मौज वाटत असेल ती मला यांच्याशी संभाषण करण्यात वाटते. तू मला माझा मेंदू तपासवून घेण्याचा सल्ला मात्र देऊ नकोस हें वाचून !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चंद्रराजे वैतूलला गेले. ववनराव आज कॉर्पोरेशनच्या निवडणुकीत दंग आहेत. हा त्यांचा शर्यतीचा घोडा आहे. आजच धनतोलीचें मतदान आहे. मतदान करण्याचें नाकारण्याचा नागरिक हक्क वजावण्याचें मी ठरविलें आहे.

धनतोली, नागपुर.
१५.६.'५२.

●

तुमच्या मातोश्री अलीकडे स्मृतिचित्रें रेखाटण्यात मोठ्या रंगतात. काल रैहानावेनच्या भजनाचें वर्णन करू लागल्या. म्हणाल्या, 'त्यांच्या आवाजात कंठमाधुर्यावरोवर वाद्याच्या ध्वनीचीहि लकेर आहे. त्यामुळे त्यात एक वैशिष्टय आहे.' स्थूल शरीरयष्टि तुझ्या डोळ्यात भरलेलीच असेल. 'त्यां स्थूलंशरीराने त्या कमालीचें कोमल भावपूर्ण नृत्य करतात! कोण तरतरी ! कोण चपलता ! कोण तरलता !' मालकिणीने केलेलें वर्णन आहे हें.

काही व्यक्तींवर प्रखर टीकास्त्रहि सोडते ती ! तिची प्रतिभा आता अवखळ झालेली आहे. श्रोत्यांना आपल्या पहाडी आवाजाने व काव्याने हलवून सोडणाऱ्या एका हिंदी भाषी वोकेसंन्याशाचें वर्णन मोठें मार्मिक करते. त्या संन्याशाचें त्याच्या परिचयाच्या एका हिंदी भाषी स्त्री नेत्रीने केलेलें कौतुकहि तिच्याच शब्दांत सांगते. 'वे मेरे पैर छूते हैं। मुझे माताजी कहते हैं।' इत्यादि त्या वाईंच्या तोंडचे शब्द मोठ्या ठसक्याने उच्चारून दाखविते. 'उनके मनमे मेरे लिए आदरपूर्ण स्नेह है। मुझमें उनकी श्रद्धा है।' त्या नेत्रीच्या वाक्यांची नक्कल करते. आणि सरतेशेवटी, तुमच्या मातोश्रीचा स्वतःचा शेरा, 'ढोंगी, दांभिक, सोदे मेले !'

तिची बुद्धि मोठी चिकित्सक खरी ! पण अलीकडे तिच्यात वेडाचा किती भाग असेल याचा नेम नाही. म्हणून तिने केलेलें गुणवर्णन तेवढें मी जमेस धरतो. त्यात धोका कमी !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ललुआचा गोटा अगदी नारळा सारखा दिसतो. मुन्नीलाहि आता दृष्टि येऊ लागली आहे.

धनतोली, नागपुर.
१६.६.'५२.

•

काल आल्याबरोबर तुमच्या मातोश्रींनी प्रश्न केला, "किती मुक्काम आहे? दोन दिवस घरीं राहिलात तर पुढारीपणाला वट्टा नाही का लागणार?" जेवतांना माझ्याजवळ बसल्या. मध्येच म्हणाल्या, "माझ्या तोंडाला पाणी सुटतें, आता ववनच्या येण्याची वाट नाही वघत!" पुन्हा म्हणाल्या, "आपल्या घरीं 'वीरधवल' आणि 'भयंकर दिव्य' हीं पुस्तकें पाहिजेत, ना. सी. फडक्यांची 'प्रतिज्ञा' भिकार आहे." थोडचा वेळानें पुन्हा, "एका विक्षिप्त व नादिष्ट नवऱ्याची गोष्ट वाचली. तुमची आठवण झाली!"
नागपुर, १९५२.

•

आपलें घर म्हणजे धर्मशाळा आणि वसतिगृह यांचा समेट! धर्मशाळेतील अनासक्ति आहे, वसतिगृहातील सुखसोयी आहेत. घरात राहणाऱ्यांची एकमेकांवर असीम माया आहे. पण दरेकाची कक्षा निरनिराळी आहे. त्यामुळे कोण कोणाकडे आले याची चवकशी केल्यानंतर आणि त्याच्या प्राथमिक गरजांची विचारपूस केल्यानंतर मग त्याच्या अस्तित्वाची कोणी फारशी दखल घेत नाही! ही पद्धत तुमच्या आईलाहि मानवते आणि मला विशेष परवडते. सगळ्यांचीं डोकीं जागच्या जागीं राहू शकतात!

नाही तर, तुमच्या मातोश्रींची विदारक टीका लागू व्हायची! ती म्हणाली. 'पागलखान्यात जर चांगलीं माणसें पागल होऊ लागलीं तर मग घरें कशाला हवींत? चांगलीं माणसें पागल वनविण्यास संसार आहे आणि पागल माणसांचीं डोकीं दुरुस्त करण्यास वेडचांचें इस्पितळ आहे,' असें तिचें म्हणणें, घरें आणि शाळा असल्यानंतर धडक्या माणसांना वेड लावायला इतर संस्थांची गरज नाही. तिने एक अनुभव सांगितला. ' लहानपणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मास्तरीण म्हणाली, 'तुला सोप्या प्रश्नांचीं उत्तरें येत नाहीत.' हिने उत्तर दिलें, 'तुम्ही पुस्तक हातात घेऊन शिकविता आणि मला उत्तरें पुस्तकावांचून द्यायला सांगता ! शाळेतहि सगळ्यांच्या कवट्या उलट्या बसलेल्या होत्या !'

तिचें डोकें बिघडलें आहे हें माहीत नसतें तर लोकांनी तिची संत म्हणून पूजा केली असती ! या देशात असें फार घडतें ! तिच्या वेडातहि चमक आहे !

ग्रॅन्डट्रन्क एक्सप्रेस.
१८.६.'५२.

●

दुर्गहून सकाळीं ९ ला निघून १२ ला येथे आलो. अगदी नव्या करकरीत लॉरीने तीन तास घेतले. मिजासखोर श्रीमंतिणीप्रमाणे ती कण्हत, कुंथत आणि थवकत-ठुमकतच आली ! गंगाधरराव वाट बघून बघून कचेरीत गेले. बवाताई सगळा स्वयंपाक करून प्रतीक्षा करीत होत्या. मनू, आपल्या बवाताईच्या घरीं आलो. भावडी सालस बवाताई ! तिच्यामुळे मला पितृत्वाची पदवी मिळाली. स्त्रीच्या पोटीं पुरुषाला जन्म देण्यात आणि पुरुषाच्या पोटीं स्त्रीला जन्म देण्यात, त्यांनी एकमेकांना फक्त पतिपत्नी न मानता माता व पिता मानावें असा उदात्त संकेत तर ईश्वराचा नसेल ना ? निदान आपण तसें मानावें हेंच श्रेयस्कर नाही का मने ? तसें मानलें तरच माणूस संस्कृत म्हणवून घेण्यास पात्र होईल.

बेमेतरा.
१३.१०.'५२.

●

काल बेमेतऱ्याहून तुला एक पत्र पाठविलेंच आहे. काल सबंध दिवस व रात्रभर बवाताईकडे होतो. पण ती पाहुण्यांचें आदरातिथ्य व पाहुणचाराची तयारी करण्यात गढून गेली होती. माझ्याबरोबर चौघेजण होते. तिसरे प्रहरीं भय्या साहेबांबरोबर तिघें चौघें आलीं. सगळा स्वयंपाक एकटीने केला. दुपारीं चिरोटे केले. तिला जवळ घ्यायला किंवा कुरवाळायला संधिच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मिळाली नाही. दुपारपासून मलाहि सभा होत्या. आधी कार्यकर्त्यांची सभा झाली. नंतर जाहीर सभा. खेड्यांतील लोकांची बरीच गर्दी होती. बबाताई घरकामात गुंतलेली होती. रात्रीं दमून कशी बशी ११ नंतर झोपली. बापाचें काळीज कसें पिळवटतें हें कसें सांगू ?

रायपुर.
१४. १०.'५२.

•

काल जरा जड पावलांनी घर सोडलें. चि. चंदु आजारी होता, बाळू विवंचनेत होता, तुमची आई किंचित् जास्त बेताल झाली होती. लल्लुहि चिकटला होता. त्यामुळे झोप लागली नाही. शेगांवपासून तू भेटलीस. सगळा शीण गेला. मनाची सगळी तळमळ नाहीशी झाली ! स्नेहाची शक्ति अजब आहे पोरी ! आज रात्रीं घरीं फोन करून चंदूची चवकशी करीन.

काल डॉ० मांडवीकरांनी बाळूला भरीला घालून आरोमायसीनच्या तीन बाटल्या घ्यायला लावल्या. 'विटॅमिन बी' ची एक बाटली. ८५ रु० चे औषध झालें. मीहि गांगरून कबूल केलें. शरीरापेक्षा जास्त किंमतीचीं हीं औषधें आजपासून घेऊ लागलो. माझें शरीर मला अत्यंत प्रिय आहे. पण इतक्या मोलाचें खरोखरच नाही वाटत. पण आता विकत आणलेलीं औषधें आठवडाभर घ्यावींच लागणार !

बऱ्हाणपुर
१५.११.'५२.

•

तुमच्या मातोश्रींना आज किती तरी वर्षांनी माझ्याबरोबर जोडप्याने देवदर्शनाला जाण्याची लहर आली. मला म्हणाली, "आपण जोडप्याने देवदर्शनाला जाऊ या. दृष्ट तर नाही ना लागणार ?" मी म्हटलें, "देवाची का कुठे दृष्ट लागते ? देवाची दृष्ट म्हणजेच कृपादृष्टि. ती आपल्याकडे वळली तर मग आणखी काय हवें ?" तिच्याबरोबर गोरक्षणाच्या आवारातील मुरलीधराच्या देवळात जाऊन आलो.

नागपुर.
११.१२.'५२.

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवा दाढी करायला बसलो असता सहज तुमच्या मातोश्रींकडे पाहिलें. म्हणाल्या, "बघा, नीट बघा. मी आरसा आहे!" तिच्यासारखा ध्यास मनाला लागला आणि क्रांतीचें वेड लागलें तर धन्य होईन.
नागपुर एक्स्प्रेस.
१५.१२.'५२.

●

रात्रीं तुमच्या मातोश्री भराभर ज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणून मला अर्थ विचारीत होत्या आणि बोध करीत होत्या — आत्मज्ञानाचा, प्रेमाच्या तत्त्वाचा. ललुआ म्हणत होता, "मी ललुआ, चपुआ, वितुआ आहे! सोनं, मनं, बेतं आहे!" मुनिया हंसून दुजोरा देत होती. ललुआ मुनियाच्या स्वरात माझ्या मनूच्या स्वराची गुप्त सरस्वती माझ्या प्रत्ययाला येत होती!
नागपुर
२९.१२.'५२.

●

सौ० ववाताईकडे जायला निघालो आहे. ती बाळंतपणाकरिता नागपुरला येणार होती. पण गेली नाही. या पाळीला तिला त्रासहि बराच झाला. तिला आता 'माहेर' म्हणून उरलें नाही. माझ्याजवळ वात्सल्य आहे. पण प्रत्यक्ष सेवा-शुश्रूषा व सुखसोयी यांची गरज कोरड्या वात्सल्याने कशी भागणार? त्यात पुन्हा तें माझें वात्सल्य खडकापेक्षा खडबडीत आणि रेतीपेक्षा रखरखीत!

निवडीचें स्वातंत्र्य असतें तर माझी निवड पितर म्हणून, भावंड म्हणून, अपत्य म्हणून किंवा मित्र म्हणून कोणीहि केली नसती! मी तरी खास केली नसती, इतकी माझी बुद्धि ताळ्यावर खात्रीने आहे. तुमच्या अभिरुचीला, अधिकाराला व कल्पनांना अनुरूप असें दिव्य व भव्य प्रेम आणि वात्सल्य तुम्हाला लाभलें तर माझ्या धन्यतेला सीमा राहणार नाही. माझें अकृत्रिम प्रेम व वात्सल्य जसें आहे तसें, तुम्हाला उपलब्ध आहेच.
दुर्ग,
२.३.'५३.

●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चि० चंदू व बेबी यांची परीक्षा आज संपली. पास होण्याची भीति कमी आहे! बबाताईंचे पुत्र व लल्ला-मुन्नी उनाडक्यात दंग आहेत. काँग्रेस व प्रजासमाजवादी यांचा कित्ता इमानेंइतबारें गिरवून निकराचीं भांडणें पदोपदीं करतात. 'फुग्गाजोग' भेटून गेला. तोहि परीक्षेला बसला आहे. आज परीक्षा संपली. मी विचारलें, "किती मार्कांनी नापास होशील ?" म्हणाला, "तें रिझल्ट लागल्यावरच कळेल!" मला म्हणाला, "दोन प्रतिष्ठित गृहस्थांचे दाखले हवे होते. त्यांपैकी एक तुमच्या नांवाचा दिला आहे." मी सांगितलें, "आतापर्यंत मी प्रतिष्ठित समजला जात असे. पण आता तू माझ्या नांवाचा दाखला दिल्यावर माझी प्रतिष्ठा कशी शिल्लक राहील!"

तुमच्या मातोश्री – "चंदूची मुंज लवकर करून टाका. बाळूचें लग्नहि उरकून घ्या. पागलखान्यात राहिल्यामुळे माझ्यावर मेलीवर पागलपणाचा शिक्का लागला. त्यामुळे माझें शहाणपणाचें बोलणेंहि तुम्ही कानांवर घेत नाही. काँग्रेस मंत्रिमंडळाचें ब्रीद तुम्ही स्वीकारलें आहे!"

धनतोली, नागपुर.
२३.४.'५३.

●

काल संध्याकाळीं ललुआ अगदी चूडीदार तुमान घालून ऐटीत 'आम्ही लग्नाला जातो' म्हणून सांगून गेला. पण रात्रीं ऐन माझ्या निघायच्या वेळीं स्वारी आली. स्टेशनावर पोचवायला आला. "आम्ही दादाबरोबर जातो ना!" बाळू-चंदूनी स्टेशनावरून मोठ्या कष्टाने परत नेलें. बेबी म्हणाली, "महिनाभर तरी रहाल असें वाटलें होतें." बबन म्हणाला, 'अब आपका हम लोगों में interest कम हो रहा है!" बाळू-म्हणाला, "नहीं, नहीं! बढ रहा है! तुम्ही जर विचारपूर्वक १९५४ पर्यंत अविश्रांत कामच करीत राहण्याचें ठरविलें असेल तर आम्ही सहकार्य करू. तुमचें कामच तुम्हाला जगवील व टिकवील आणि संभाळील!" मला केवढें बळ आलें म्हणून सांगू.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुमच्या मातोश्री म्हणाल्या, "लोकांनी तुम्हाला निवडून दिलें. मोठे सत्य-अहिंसेचे भाष्यकार म्हणवता. गांधी विचाराची मीमांसा करता. आणि घरीं मात्र राहण्याचें टाळता. वारे बहाद्दर!"

भूदान-यज्ञ शिविर,

अचलपुर,

२४.४.'५३.

●

आज सकाळीं ६.३० ला मी पोचलो आणि ६ ला बबाताई आली. तुमच्या मातोश्रींच्या मातोश्री जिजीबाई ता० २३ लाच आलेल्या आहेत. तीन पिढ्यांचे परस्पर-संवाद या घरात सुरू झाले म्हणजे भारतीय लोकसभेची रंगीत तालीम येथे होऊ लागेल. त्यात हाल बिचाऱ्या बबाताईचे तेवढे होतील.

धनतोली, नागपुर.

२७.४.'५३.

●

काल एक पत्र तुला पाठविलेंच आहे. माझ्या प्रपंच-मुक्त जीवनावरोबर कुटुंब-वत्सलतेचा खरा आरंभ होत आहे. माझ्या या अनासक्त वात्सल्याचा आधार कुटुंबातील माणसांना विशेष वाटतो. चि० बबाताईच्या मुलाची प्रकृति बरी आहे. भाऊराव माडखोलकर खुशाल आहेत. त्यांनी तुला काल एक पत्र लिहिलें. त्यापूर्वी एक पाटण्याच्या पत्त्यावर लिहिलें होतें.

धनतोली, नागपुर.

८.९.'५४.

●

काल सकाळीं सौ० बबाताईचें ऑपरेशन आटपलें. संध्याकाळीं तिची भेट घेऊन निघालो. तिच्या मुलाला काल एकाएकी टेंपरेचर आलें. आठ दिवस, नव्हे दहा दिवस, काही नव्हतें. काल टांके काढले. थोडा पूं निघाला. काळजी वाटते. नागपुरातून पाय निघेना. जसजशी प्रापंचिक वृत्ति कमी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते, कुटुंबवत्सलता वाढत जाते. सौ० बबाताईंचे यजमान व आपली बेबी (यशोदा) यांनी मोठ्या जिव्हाळ्याने खस्ता खाल्ल्या. बेबीचें कौतुक वाटतें. चि. बाळूचा ताप मात्र गेला होता.

इटारसी स्टेशन.
१६.९.'५४.

●

सौ० बबाताई आज घरीं आल्या. तुमच्या मातोश्री मोठ्या आस्थेने व ममतेने त्यांची परिचर्या करतात. तारा-चंदूंनी दुसरीकडे बिऱ्हाड केलें. सौ० बेबी मात्र खरोखर यश देत आहे. या घराची ती यजमानीण व 'यशोदा'हि ठरत आहे.

घनतोली, नागपुर.
२९.९.'५४.

●

बैतूलपर्यंत × × आला होता. या पांच वर्षांत पहिल्यांदाच. विकट प्रसंगातून नवीन शक्ति संपादन करण्याची हातोटी जीवन-कलेचें पहिलें कलम आहे. माणसाचा स्वाभिमान जितका उत्कट तितकाच त्याचा विनय वास्तविक व सहज असतो. जो नमतो, तोच सन्मान्य. जो मान राखतो, तोच मानी. × × हें पटू लागलें आहे. कळलें म्हणजे हळू-हळू वळूहि लागते.

या वेळीं लल्लूने डांव-पेच बदललें, "तू तरी नागपुरला रहा, नाही तर मला तरी ने", असा सवाल त्याने टाकला. कसावसा आलो.

छत्रपुर विंध्य प्र.
१.१०.'५४.

●

अरे होय ! सौ० बबाताईंच्या लल्लूहून लहान मुलाचें ऑपरेशन 'हाइड्रोसील' व 'हार्निया' चें झालें. दहा दिवसानंतर सेप्टिक झालें होतें. त्यामुळे जरा काळजी उत्पन्न झाली होती. पण तो लवकरच बरा झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आता खेळतो. वागडतो. ववाताईंचें गर्भाशयाचें ऑपरेशन झालें. 'मेजर' होतें. तीहि अगदी वरी झाली.

नॅशनल हॉल, पाटणा. ३.
४.१०.'५४.

•

जगात व्यक्तीचें मूल्य निरपेक्ष आहे. आपण ज्या कुळात जन्मलो त्या कुळातील माणसें फक्त आपल्या नात्यातील आहेत म्हणून त्यांचें महत्त्व कमी होत नाही. वास्तविक आता आपल्या मनात कौटुंबिक आणि सार्वजनिक हा भेद काही काही बाबतीत राहूच नये. नातेवाईकांच्या बाबतीत पक्षपात व आसक्ति यांचा संभव असल्यामुळे अधिक काळजी घ्यावी लागते व जागरूक रहावें लागतें हें अगदी खरें. पण जेथे निरपेक्ष स्नेहच असेल तेथे कुटुंबातील माणसाला समाधान देण्यासाठी श्रम व द्रव्य वेंचणें सर्वथा योग्य आहे.

पाटणा.
८.१०.'५४.

•

बेबी लिहिते, "सौ० तारा परवाच (२८ ला.) प्रसूत झाली. छोटीशी चुनिया झाली आहे. मुन्नीने तिचें नांव चुनिया ठेवलें आहे. आईसाहेबांना आजच दवाखान्यात घेऊन गेल्यें होत्यें. त्यांनी म्हटलें 'अरुणा' नांव ठेवावें. लल्ला म्हणतो, 'आई, दादा मला सर्वात जास्त आवडतात; पण ते येथे कां ग येत नाहीत?"

हरदोई शिविर.
२.१०.'५५.

•

इटारसीहून रात्रीं १.१५ ला निघालो. ता० ३ला पहाटे ४ला बेतूलला पोचलो. तीर्थरूप आई तेथेच होती. दुपारपूर्वी ११च्या बसने निघालो. १२.३० ला मूळतापी. परमपूज्य भाऊसाहेबांची भेट झाली. 'पारमार्थिक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मूल्यांची द्वाही जगभर मिरवा,' त्यांनी तळमळून सांगितलें. एका परमार्थवादी मित्राने काकुळतीने विनविलें, "सगळ्यांना रामनामाची संजीवनी वटी घ्यायला भाषणाच्या शेवटीं सांगत चला."

रात्रीं १ ला मूळतापीहून निघालो. पहाटे ५ ला आज येथे पोचलो. ती० स्व० गं० भा० जिजीबाई मीरापुरकर ९ दिवसांपूर्वी येथे घरींच वारल्या. बाळू मीरापुरहून टॅक्सीने तिला येथे घेऊन आला. ५ दिवस येथे आजारी होत्या. तुमच्या मातोश्रींनी व बाळूने त्यांचें सारें काही यथासांग केलें. ऐन प्रसंगीं तुमच्या मातोश्रींचें प्रसंगावधान असें अद्‌भुत होतें. माणूस हें जगातलें सर्वांत मोठें व गहन कोडें आहे.

नागपुर.
५.१२.'५५.

येथे आल्यावर पाहतो तों चंदूराजे टाइफॉइडने अंथरुणाला खिळलेले. डॉक्टरांची भेट फाटकावरच झाली. आज ताप औषधाने ९९° आणला आहे. पण, अजून प्रकृति आहे तशीच आहे. एक महिना तरी लागेल. त्याच्या आईची स्थिति ती तशी, बेबी बाळंतीण. येऊन जाऊन बाळूवर सारी भिस्त. असा थाट आहे. पण ईश्वरी लीलेत माणसाच्या प्रयत्नाला व भावनांना जेवढा रास्त भाग असेल तेवढा उचलण्याला सादर असलें म्हणजे झालें. मी परत येईपर्यंत त्याची प्रकृति सुधारण्याच्या मार्गाला लागली असेल अशी आशा आहे.

नागपुर.
२७.२.'५६.

चि० चंदूच्या आजाराविषयीं पूर्वी कल्पना नसल्यामुळे येथे आल्याबरोबर माझें मन बरेंच अस्वस्थ झालें होतें हें खरें आहे. फक्त तापमान उतरलें असलें तरी इतर लक्षणें त्या दिवशीं चांगलीं नव्हतीं. उपचाराचा व शुश्रूषेचा प्रश्नच नव्हता. 'वैयक्तिक स्पर्श' अशा वेळीं महत्त्वाचा वाटतो. मी नागपुरात आहे. एवढा स्पर्शहि पुरेसा ठरण्यासारखा होता. पण,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हैदराबादचें काम अधिक महत्त्वाचें होतें. चंदू म्हणाला, "तुम्ही गेला नाहीत तर मला वाईट वाटेल." त्यानंतर मी जेथे होतो तेथे बातमी कळण्याचे काहीच साधन नव्हतें, म्हणून अंमळ त्वरेने परत आलो.

नागपुर.
३.३.'५६.

•

बेतूलस्टेशनवर चि० चारु शिदोरी घेऊन आला होता. बल्लाकाका रविवारीं येथे येऊन परत बेतूलला जाऊन मूळतापीला गेलेले होते. तीर्थरूप आई सौ० विनाआत्याकडे आहे. तिच्या वेदना वघवत नाहीत. वेदना कमी व्हाव्यात म्हणून होमिओपॅथिक औषध चालू आहे. मला तिच्याजवळ बसणें जमत नाही. काय तिच्या प्राक्तनात असेल तें खरें !

चि० ललुआ, बेबी व बाळू हें त्रिकूट स्टेशनवर मला घ्यायला आलें होतें. बेबीला अर्थातच पहिली आठवण तुझी आली. लल्लू म्हणाला, तुम्ही लिहिलेत की शाळेला खो देत जा म्हणून तर मी तसेंच करणार आहे. आल्याबरोबर भोंवरा घेण्याकरिता ८= कर वसूल केला.

नागपुर.
२९. १.'५७.

•

उद्या होळी आणि परवा धुळवड. म्हणून आजच घाईघाईनें पत्र लिहीत आहे. चि० गंगाधरराव आज किंवा उद्या यावेत. सौ० बबाताईला त्यांच्या-वांचून चैन पडत नाही. प्रवासालादेखील त्यांच्यावांचून कोठेंहि जाण्याची तयारी नाही. म्हणत्ये, "एकटयाने प्रवास करण्यात मौज नाही." त्यांच्या-विषयीं फार प्रेम व आस्था वाटते तिला. त्यांच्याखेरीज कशातच गोडी वाटत नाही. तुमच्या आईची नथ मात्र तिला हवीच आहे. अगदी लहान मुलाप्रमाणे हट्ट धरला आहे म्हटला तरी चालेल. पहावें तिचा हट्ट मला कितपत पुरविता येतो तें.

बेमेतरा.
४.३.'५८.

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चंदूकडे तारा अंथरुणावर आहे. बरीच रोडावली आहे. क्षीण झालेली व करपलेली चर्या दिसते. गर्भाशयात जखम आहे. शस्त्र क्रियेची गरज आहे. चुनिया डांग्या खोकल्याने जेरीस आली आहे. तरी पण खेळणें व वटवट चालू आहे. ताईच्या भरवशावर ठाकुरकी आहे. भूषण मात्र मस्त आहे. त्याला 'व्यक्तित्व' फुटू लागलें. गुलजार गवरू आहे.

शाळा-कॉलेजें सुरू झाल्यामुळे धर्माधिकारी मुली व मुलगे यांचें जत्थे प्रवेश मिळविण्याच्या मोहिमेवर नागपुरात बघायला मिळतात.

काल संध्याकाळीं १७.०० ला पॅसेंजरने निघालो. चंदू-बाळूंनी आग्रहपूर्वक दुसऱ्या वर्गात बसविलें. तिसऱ्या वर्गातहि जागा भरपूर होती. दुसऱ्या वर्गात तर आराम होता.

आगगाडी.
१४.७.'५८.

आज दुपारच्या एक्सप्रेस बसने बेबी जबलपुरला गेली. मामाहि आज संध्याकाळीं किंवा उद्या सकाळीं जातील. 'माताच पिताच' यांचा कालिदासाने 'पितरौ' असा एकशेष द्वंद्व समास केला. पण आपल्या मामांच्या बाबतीत 'माय-बाप' मिळून 'मा + मा' असा समास झाला! लवणमूने एक मुलगा+एक सून अशी सेवा केली! तारा, बेबी, यांच्यातहि असाच समास आहे. 'डोणगांवकर – मुंडले' हें डॉक्टर युगल मोठ्या हळुवारपणें व दक्षतेने ड्रेसिंग करतें. मोठें चुणचुणीत तमंचे आहेत. डॉ० बाबूराव काळे व माझा आतेभाऊ डॉ० पिंपळकर हे दोन 'सीनियर्स'हि पाहून जातात. Slough हळू-हळू बाहेर पडत आहे. Magsulf आणि glycerine चा त्या कामीं फार उपयोग होतो. मूळ फोडाला जेथून सुरवात झाली, तेथील Slough संपूर्ण निघाल्यावर जखम भरून येईल. सुमारे ८–१० दिवस लागतील. नंतर healing!

धनतोली, नागपुर.
२२-२-'५९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चंदू वकिली, पुढारीपणा आणि यजमान अशीं तीन तंत्रें सांभाळण्याच्या तोऱ्यात आहे; तारा ऑफिस, चुन्नी व संसार यांचें 'तारतम्य' साधण्यात गर्क आहे आणि ताई चुन्नी व प्रपंच यांचें 'सामंजस्य' स्थापण्यात गुंतली आहे. 'दादा' सगळ्यांची नवीन जबाबदारी आहे—सामाजिक व वैयक्तिक!

नागपुर,
२-३-'५९.

●

गाडी अगदी वेळेवर, किंचित् अगोदरच पोचली. बेबी-बबन यांनी नुकतेंच नवीन घर घेतलें. परवाच सामान आणलें. बंगला, आवार, प्रशस्त आणि नवीन आहे. पंधरा-सोळा खोल्या आहेत. मोकळें आणि स्वतंत्र आहे. आता माणसें कमी पडतात. दोघांचीहि एकच मागणी, 'आता विमलताईंनी यावें. त्यांच्या अभिरुचीला अनुरूप असें घर आहे. त्यांनी आता अवश्य यावें.' योगायोग असा की कालच मी तुझ्याकडून आणलेले पेढेहि दिले. तो योगायोग सर्वांना गमतीचा व शुभच वाटला. पानें आणि कॅलेंडर बबनला आवडलीं. लल्ला-कंपनी नवीन घर डोक्यावर घेऊन मिरवीत आहेत. नवीन फर्नीचरहि येत आहे. तुला भूषण वाटेल.

जबलपुर.
५-१२-'५९.

●

जबलपुर—नागपुरच्या पत्रांची प्रतीक्षा नेहमीच करावी लागते. त्याबाबतीत मी 'No news is good news' हा संकेत खरा मानून चालतो. पण, या पाळीला प० पू० भाऊसाहेबांच्या ऑपरेशनची व्यवस्था करायची असल्यामुळे मी जरा उत्कंठेने वाट बघत होतो. शेवटीं आज जबलपुरहून चि. बेबीचें पत्र आलें. त्यात चि. बबनच्या जिवावरील भयंकर अरिष्ट टळल्याची बातमी आहे. ता. २९ रोजीं तो कचेरीतून परत घरीं जात असतांना त्याच्या गाडीवर एक बस आदळली. अपघात भयंकर स्वरूपाचा झाला. पण त्याला दुखापत मुळीच झाली नाही. मला आज बेबीच्या पत्रावरून हकीकत समजली. रोमरोमांतून परमेश्वराच्या कृपे-विषयीं धन्योद्गार उमटले. तुमच्या मातोश्रींची तशी स्थिति झाल्यापासून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांच्या मातृत्वाने माझ्या अंतःकरणात प्रवेश करून माझ्या वात्सल्यात माधुर्य आणलें. त्यामुळे तुम्हा मुलाविषयीं मला अलोट प्रेम वाटतें. तुमच्या-करिता जिवाची कुरवंडी करावीशी वाटते. अशा वेळीं मृत्यूचीदेखील कृपा झाली असेंच वाटतें. पण, ती कृपा त्याच्या अनुपस्थितीची आहे.

नागपुरला ऑपरेशन झालें तर निष्णात डॉक्टरांची मदत मिळू शकेल. जबलपुरला घरीं राहण्याची सोय आहे. पण, डॉक्टरांचा लौकिक त्या मानाने कमी. तेनालीच्या सूर्यनारायणरावांचा लौकिक कुशल डॉक्टर व सुस्वभावी सद्गृहस्थ अशा दोन्ही नात्यांनी आहे. पण, तेथे भाऊसाहेब, चि. छोटू व गं. भा. गंगूताई अशा तिघांकरिता स्वतंत्र बिऱ्हाड करावें लागेल. आणि महिनाभर मला स्वतःला रहावें लागेल. म्हणून अजून निर्णय करू शकलो नाही. ता. १६ नंतर तुला कळवितो !

काशी.
१०.२.'६०.

कुठल्याहि आजारी माणसाच्या सोबतीला मी मुळीच राहू नये हें तुझें मत निदान मला तरी अगदी मनापासून १२५% पटतें. पण दुर्दैव असें की प० पू० भाऊसाहेबांना माझ्यावांचून एक दिवसहि कोठे रहावेंसें वाटत नाही. त्यांची सगळी भिस्त व भरवसा माझ्यावर आहे. मी जाण्याची गोष्ट बोललो की त्यांचें धैर्य खचतें ! ७६ वर्षांचें वयोमान त्यात पुन्हा या भानगडी ! नुसताच 'मोतीबिंदु' नाही. मधुमेह आहे, ब्लडप्रेशर आहे ! चि० बेबी-बबनांच्या घरीं सगळी सोय असल्यामुळे व प्रिय बापूरावहि येथे असल्यामुळे त्यातल्या त्यात श्रम व दगदग कमी आहे. पण, तपशीलाच्या बाबतीतदेखील निर्णय मलाच करावा लागतो. आणि अनिर्णय हें तर माझें ब्रीद आहे ! एकंदरीत मोठी गंमत आहे.

परवा भाऊसाहेबांमुळे गवारीघाटला नर्मदास्नान मला व बापूरावांना अनायासेंच घडलें. त्या दिवशीं चि० छोटू काका व प० पू० भाऊसाहेब आणि गं० भा० गंगूताई यांनी नर्मदास्नान करण्याची इच्छा व्यक्त केली. कारण एकादशी ! झालें, गाड्याबरोबर नळ्यालाहि नर्मदास्नान घडलें !

जबलपुर.
२४.२.'६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवा पौर्णिमेला रात्रीं चांदण्यात भेडाघाटची शोभा बघायला किती तरी हौशी मंडळी गेली होती. चंदू, बेबी-बबन, श्रद्धा-चारू, इंडस्ट्रियल कोर्टाचे चेअरमन बक्षी, त्यांचें कुटुंब, ही मंडळी रात्रीं १.३० ला जाऊन पहाटे ४ ला परत आली. बक्षी दांपत्यासह चंदू येथे पोचलाच मुळीं रात्रीं ११ ला.

वल्लाकाका व त्यांची सून सौ० श्रद्धा हीं दोघें परवा सकाळीं आलीं. अर्थातच चारुभैयाहि हॉस्टेलमधून घरीं मुक्कामाला आले. वल्लाकाका काल रात्रीं गेले. त्यांच्या सहवासाचा सौरभ अजून वातावरणात दरवळतो. इतकें सहज ऋजुत्व, स्वाभाविक सौजन्य, निःसीम अगत्य क्वचितच आढळून येतें. त्यांचासारखा सालस माणूस विरळा. वल्लाकाकांचा भाऊ होण्याचें भाग्य मला लाभलें हें केवढें भूषण आहे. चि० छोटूकाका व श्रद्धा आज रात्रीं जातील. प० पू० भाऊसाहेबांच्या डोळ्यावरील पट्टी परवा काढण्यात येईल; ता० २० ला रात्रीं येथून निघून ता० २१ ला सकाळीं त्यांना बेतूलला पोंचविण्याची जबाबदारी माझी आहे. त्यानंतर मला रजा मिळेल.

जबलपुर
१४·३.'६०.

•

चि० चंदूराजा परवा दुपारीं जाणार होता, तो काल रात्रीं १२ ला 'Luxury Bus' ने गेला. नागपुर – अलाहाबाद अशी एक 'Luxury Bus' कुंभमेळ्याकरिता सुरू झाली, ती अजून चालू आहे. काल संध्याकाळच्या DeLuxe Bus चें तिकिट घेऊन परत केलें. बबनरावांना चंदूराजांचें जाणें बरें वाटेना, चंदूलाहि बेबी-बबनांचा सहवास सोडावासा वाटेना. संध्याकाळीं सगळीं जणें १६ मैलावरील पर्यटक तलावावर गेलों. सगळीकडून टेकड्यांनी व जंगलाने वेढलेला हा तलाव सुंदर आहे. 'रेस्ट हाऊस' हि टुमदार आहे. बेबी-चंदू, बबन-चंदू यांचा एकमेकांबद्दलचा जिव्हाळा पाहून मोठें समाधान वाटलें. चि० छोटूबाबूहि काल रात्रीं मूळतापीला गेले. बापुराव परवा प्रयागला आपल्या मातोश्रीचें अस्थि त्रिवेणीत विसर्जन करायला जातील. १९ ला परत येतील.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनायासे एक महिना येथे राहण्याचा योग आल्यामुळे वेबीच्या वैद्याचें औषध सुरू केलें. कालच त्यांनी एक आठवडयाचें औषध दिलें. आतापर्यंत तरी जबलपुरचें हवामान कोल्हापुर-पन्हाळयासारखेंच आहे. पाणीहि चांगलें आहे. खोलीतदेखील रात्रीं गरम पांघरूण लागतें. ता. १० ला वैद्यबुवांचे औषध सुरू केलें. जातांना आणखी एक आठवडयाचें बरोबर घेऊन जाईन. होमियोपॅथी, बायोकेमिस्ट्री, ॲलोपॅथी झाली, आता आपल्या प्राचीन संस्कृतीबद्दल व परंपरेबद्दल योग्य आदर आणि अभिमान व्यक्त करण्याकरिता आयुर्वेदाकडे वळलो आहे.

जबलपुर.
१५.३.'६०.

●

विकार किंवा स्वार्थ ज्या कर्माच्या मुळाशी असेल तें कर्म माणसाला बांधतें व बाधतें ही गोष्ट तर सर्वमान्यच आहे. पण कर्तव्य व सेवा म्हणून आपण जें कर्म करतो त्यातहि माणसाची वृत्ति उमलत नाही, चित्त मोकळें राहत नाही. त्यामुळे त्या शुभ कर्मानेंहि जीवन खुरटतें व वठून जातें. म्हणून माझ्या जीवन चर्येत सेवा, कर्तव्य, सदाचार यांस फारच बेताचें स्थान आहे. प०पू० भाऊसाहेबांबद्दल मला जिव्हाळा आहे आणि कळकळ व पूज्यबुद्धिहि आहे. पण, त्यांच्याभोवती जमलेल्या व्याधींच्या वरातीचा मला कंटाळा आहे. त्यात त्यांना तर कष्ट आहेतच, या वयात त्यांना झालेले कष्टहि मनाला त्रास देतात. तेव्हा त्यांच्या सेवेत जर खरोखरीच पुण्य असेल तर त्याचें फळ भाऊसाहेबांचे सगळे व्याधि त्वरित शमन पावून त्यांना शीघ्र आरोग्य लाभ आणि मला अतिशीघ्र मनूचा सहवास प्राप्त होण्यात झालें पाहिजे. हीच त्याची कसोटी. मी सगळीं व्यवधानें बाजूला सारून आस्थापूर्वक व श्रद्धेने ठाण मांडून बसलो आहे. त्यांच्या चरणीं अर्पण करायला माझ्याजवळ संपत्ति किंवा इतर साधनें नाहीत. वेळ तेवढा आहे. तो फारसा मोलाचा नसेल. पण त्यामागे जी भावना आहे ती मात्र अनमोलच ठरेल.

जबलपुर.
२७.२'.६०.

●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी परवा रात्रीं प० पू० भाऊसाहेबांना बरोबर घेऊन येथून रवाना होईन. चि० बेबी—बबनांच्या घरीं ता० २० फेब्रु० ला आलो आणि २० मार्चला त्यांचा तात्पुरता निरोप घेणार. सबंध एक महिना त्यांच्या सहवासाचा आनंद लाभला. त्यांनी अत्यंत अगत्यपूर्वक प०पू० भाऊसाहेबांच्या ऑपरेशनचा व वास्तव्याचा सगळा भार व जबाबदारी पत्करली याबद्दल मला विशेष समाधान वाटलें. माझ्या आई-वडिलांची सेवा त्यांनी केली असती तर जितकें समाधान वाटलें असतें त्यापेक्षा किती तरी पटींनी अधिक समाधान वाटतें. भाऊसाहेबांची जीवनविषयक मतें व नीति मला पटत नाही. पण, त्यांच्या सारखा तत्त्वनिष्ठ, शास्त्रप्रवण, प्रखर सदाचारी व्यक्तीची सेवा करण्यात मला स्वतःचा आत्मविकास वाटतो. विशिष्ट विचार, जीवनपद्धति किंवा संप्रदाय यांच्या कुंपणातून बाहेर पडण्याचा हा आचारात्मक मार्ग आहे. मानव्य, विचारांच्याहि कोंडवाड्यात कोंडले जाता कामा नये.

कौटुंबिकतेच्या गोंडस नांवाखाली माणूस असेच कोंडवाडे निर्माण करून त्यांना 'घर' अशी भारदस्त संज्ञा देतो. जो 'घरंदाज' नसेल तो 'उडाणटप्पु', 'भटक्या', 'आवारा' 'खानाबदोश'! त्याच्यावर विश्वास ठेवता येत नाही. त्याला कुल नाही, शील नाही, घरदार नाही, ठाव ठिकाण नाही. तो सडक छाप 'ओढाळ गुरु'च जणू ! असा परंपरागत संकेत सभ्य समाजात अतिशय खोल रुजलेला असल्यामुळे कौटुंबिकतेच्या वातावरणात व संस्कारात वाढलेल्या माझ्यासारख्या माणसाच्या मनात जीवनात स्थैर्याची व शाश्वतीची आकांक्षा असणें अगदी स्वाभाविकच होतें. 'परिव्राजक' किंवा 'परांगदा' यांपैकी कुठल्याहि वृत्तीचा संभव नव्हता. यदृच्छेने प्राप्त क्षेत्राला व स्थानालाच 'आपलें घर' मानण्याची व अस्थिरतेचाच जीवनाचें ऐश्वर्य म्हणून स्वीकारण्याची सवय मनाला ईश्वरकृपेनेच लागली. जन्म आणि संगोपन मधाच्या कोंड्यात, पोळ्यात झालें. मधाचें कोन्हें किंवा मोहोळ म्हणजे गोंगाटाचें खास निवासस्थान. 'आतिथ्य' हें जीवनाचें फार महत्त्वाचें मूल्य मानलेलें. असें असताहि अस्थिरतेचा अंगीकार जीवनाची नीति म्हणून करता आला हा ईश्वराचा प्रसादच आहे.

जबलपुर,
१८.३.'६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल संध्याकाळीं चि० गंगाधरराव तामसकर येथे आले. आज ते रात्रींच्या गाडीने भोपाळला जातील. गंगाधररावांना ववन-चंदूंबद्दल जी आत्मीयता वाटते आणि ववन-चंदूंना त्यांच्याबद्दल जी आपुलकी वाटते ती पाहिली म्हणजे गंगाधरराव वस्तुतः माझे ज्येष्ठपुत्र आहेत याची साक्ष मनाला पटते.

प्रिय वापूराव आज सकाळीं प्रयागहून परत आले. उद्या सकाळीं नागपुरला जाण्याची त्यांची योजना होती. पण, आता त्यात वदल होण्याचा संभव आहे. चि० साधनाला परवापासून ताप आहे. गांवात कांजण्याची सांथ आहे. अजून साधनाच्या अंगावर कांजणीचा किंवा गोंवराचा पुरळ उमटलेला नाही. आम्ही मात्र ठरल्याप्रमाणे उद्या रात्रीं निघू.

मी ता० २८ मार्चनंतर मोकळा होतो. एखादा दिवस जास्त लागेल. नागपुरहून सामान घ्यावें लागेल. ता०३१ मार्च नंतर तुझा कोठे मुकाम राहील तेवढें कळलें म्हणजे त्या ठिकाणीं मी येतो. चि० ववन आज म्हणाला, "विमलताई जवलपुरला कां येत नाहीत ? आम्ही त्यांची सगळी व्यवस्था करू." मी म्हटलें "तुम्ही उभयता तिला वोलवा म्हणजे ती येईलहि कदाचित्." तसें ववनराव उद्गारले, "आमच्या घरीं यायला त्यांना वोलावण्याची गरज वाटू नये. वाटत असेल असें आम्ही कधीच मानलें नाही. हें त्यांचें हक्काचें ठिकाण आहे."

जवलपुर.
१९.३.'६०.

•

आज दुपारीं निघून वेमेतऱ्याला जाण्याचा बेत ठरविला होता. त्याप्रमाणे तेथे फोनहि केला. पण, संध्याकाळीं सौ. ववाताईंचीं मुलें, दोन मुलगे, व तीन मुली आणि भय्यासाहेवांची धाकटी मुलगी, ही वाल-गोपालांची तुकडी घरीं आली. तेव्हा वेमेतऱ्याचा वेत रद्द केला, नव्हे तहकूव केला. आज सकाळीं सर्व किरकोळ मंडळींवरोवर महाराजवागेत जाऊन आलो. इतर ठिकाणीं ती मंडळी स्वतःच जाणार आहेत. सौ० ताराच्या घरीं देवईकरांचा मुलगा—मुलगी, राम, लल्लू, तामसकर मुलगे—

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुली अशी मंडळी जमल्यामुळे गोकुळ थाटलें आहे ! औरच गंमत आहे. उद्या चि० चंदू, ती० स्व० मामा व ही सगळी सवंगडी टोळी मिळून रामटेकची 'सहल' निघणार आहे. चंदूने दोन मोटारी मिळविल्या आहेत. तेव्हा आता वेमेतऱ्याला परवा जाईन. व ता० १० ला येथे परत येईन. त्यानंतर मूळतापी, वेतूल, इंदूरचा कार्यक्रम आहे. मे महिन्यात कुठलाहि कार्यक्रम ठेवू नये म्हणून वेळ मोकळा ठेवला. ता० ८ मे चा गोंदियाचा कार्यक्रमहि रद्द करवून घेतला. मोकळा वेळ असल्यामुळे वेमेतरा, मूळतापी, वेतूल इत्यादि कौटुंबिक क्षेत्रांची यात्रा करणें प्राप्त झालें. दादाचा प्रपंच संपुष्टात आला पण नातीं मात्र जास्त घट्ट झालीं !

नागपुर.
५.५.'६१.

●

ती०स्व० मामा, चंदूराजा, राम, लल्लू, चुन्नी, सुहास व राजीव, देवईकर, विकास व विक्रम तामसकर, रूपा कुलकर्णी, वाई, वेवी, अनु, वावी तामसकर, आणि मी अशी पंधरा जणांची गरगरीत आनंदी तुकडी आहे. सकाळीं ५.३० वाजता दोन मोटारींनी निघून आम्ही एका तासात येथे आलो. अंवाडच्यांवर मोटारी थांबवून तडक गढावर चढलो, अगदी चुन्नीदेखील ! पाऊण तासात गांवात परत आलो. हल्ली डॉ० मुंडले रामटेकलाच आहे. त्याच्याकडे फराळ झाला. नंतर रामसागरावर येऊन मनसोक्त स्नान केलें. असा एकंदरीत सगळ्या गोष्टींचा 'गोपाळ-काला' आहे. त्याला मोठी चव आहे ! चंदूचा सोवती मधु किंमतकर, चिंतामणराव तिडके, शंकरराव कटकमवार, सगळे जुने स्नेही भेटले.

डाक वंगल्यात सवंध दिवस एकमेकांची सोवत व तलावाचें दृश्य पुरेसा सांस्कृतिक कार्यक्रम आहे. पुरवणीदाखल चि० चुन्नीच्या इंग्रजी कविता आहेत : 'Jack and Jill', 'Pussy Cat', 'Chubby Cheek', 'Dimpled Cheek', 'My lips' इ०इ०. तरीदेखील पत्त्यांचा डाव व रेडिओ आणावाच लागला. कितीहि माणसें एकमेकांबरोबर असलीं तरी 'कंपनीना' काहीतरी निराळे आलंबन किंवा साधन लागतेंच ! हें अंमळ विचित्रच नाही कां ? माणसाच्या मनालाहि रमवावें आणि भुलवावें लागतें ; एरव्ही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तें उबगतें आणि कंटाळतें ! पण, बाह्य उपचार किती वेळ त्याची करमणूक करणार ? शेवटीं एकमेकांबरोबर भांडणाचा Elemental Cultural program सुरू होतो. मुद्याची गोष्ट :—परस्परांचा सहवास हाच संपूर्ण व पर्याप्त सांस्कृतिक कार्यक्रम वाटायला हवा ! नाही ?

चि० रूपा (ताराची भाची) हिने गीतरामायणातील काही गीतें गोड-स्वरात म्हणून दाखविलीं. अखेरचा कार्यक्रम नावेत विहाराचा झाला.

रामटेक.
६.५.'६१.

रात्रीं ८.१५ वाजता दुर्गला पोचलो. भय्यासाहेबांची तब्येत बरी नव्हती. आता बरी आहे. अशक्तपणा मात्र आहे. रात्रभर त्यांच्याकडे राहिलो. चि० गंगाधररावहि तेथेच होते. हे दोघेहि बंधु म्हणजे अमूल्य रत्नें आहेत. भय्यासाहेब विलक्षण दिलदार, प्राजंळ व बहाद्दर गडी ! गंगाधरराव मितभाषी, समजंस आणि मायाळू ! त्यांचा संबंध झाला हें मी माझें थोर भाग्य समजतो. रात्रीं झोपलो चि० रामगोवर्धन (सौ. सुनीति) कडे. दाणा माणूस !

आज सकाळीं भिलाईला जाऊन सौ० पुष्पा (बल्लाकाकांची) व तिचे यजमान यांस भेटलो. भय्यासाहेबांच्या नवीन मोटारीतून रायपुर मार्गे येथे आलो. रायपुरला सौ. कमल रावसाहेब यांच्या बंगल्यात डोकावून पाहिलें. सगळी मंडळी आपल्या खेड्यावर गेलेली आहेत. भेट झाली नाही.

सुमारे १० वाजता येथे पोचलो. गंगाधररावांचें driving देखील एक pleasure च आहे ! त्या माणसाच्या हातात कला आहे. सुभाष, जवाहरलाल यांचीं चित्रें रेशमाने काय सुंदर काढलीं आहेत ! सौ० बबीच्या थोरल्या मुलाने निसर्गाची व माणसांचीं छान चित्रें काढलीं आहेत.

सौ० बबाताईंचें पार्लमेण्ट – असेंब्लीचें वेड गेलें. आता बदरी-केदार यात्रेचा ध्यास लागला आहे. तो तगादा चालू आहे ! घर मात्र अगदी नीटनेटकें व स्वच्छ ठेवतात. बैठक, चादरी, खुर्च्या, मेजें, बाग-बगीचा सगळें टीपबंद व सदभिरुचिपूर्ण !

बेमेतेरा. ८.५.'६१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मे महिना कौटुंबिक क्षेत्र यात्रेचाच मानला आहे. अकोल्यापासून आरंभ झाला. अकोला तर सर्वच दृष्टींनी तीर्थस्वरूपांचें क्षेत्र आहे. त्यानंतर नागपुर. मी मूळतापीला जन्मलो असलो तरी नागपुरचाच म्हणून ओळखला गेलो. मध्ये एक दिवस रामटेकला गेलो. पण तेंदेखील कौटुंबिक आनंदयात्रेचा भाग म्हणून. नंतर दुर्ग, बेमेतरा, भिलाई, रायपुर, मूळतापी, बेतूल, हीं सगळीं कौटुंबिक क्षेत्रेंच! आज सकाळीं चि० गंगाधररावांबरोबर निघालो. रायपुरला पुन्हा सौ० कमलच्या घरीं डोकावून पाहिलें. ती मंडळी खेड्यावरून परत आलेली नव्हती. भिलाईला सौ० पुष्पाला व दुर्गला भय्यासाहेबांना व नरसिंहप्रसाद अग्रवालला भेटलो. ११.३० ला मेलने रवाना झालो. गंगाधररावांनी एअर कण्डिशन्ड डब्याचे तिकिट काढायला सांगितलें. मी मनाई केली. एअर कण्डिशन्ड डब्यात बसायचें तर मनूबरोबरच असें ठरलें आहे ना?

सौ० बबी कष्टाचीं कामें जातीने करत्ये. शेतखाना स्वच्छ करण्यापासून सगळीं कामें करण्याची तिची तयारी असते. इंग्रजीचा अभ्यास परिश्रमपूर्वक वाढविला आहे. मला बेमेतऱ्यालाच राहून मुलें संभाळण्याचा मनस्वी आग्रह केला. मौज अशी की 'आता तुमचें दुसरें बाळपण असल्यामुळे तुम्हीदेखील माझ्या मुलांपैकीच नाही कां?' असा वर मला प्रश्न केला.

या कौटुंबिक यात्रेत देवाच्या कुटुंब-वत्सलतेचा खूप अनुभव आला. त्याने आभाळाला मेघांचा चांदवाच घातला. मधून मधून वादळें व तुफानेंहि होतात. ता० ७ ला नागपुरला मोठें तुफान झालें. पण, उष्णतामान मात्र १०४° वर आलें! दुर्ग-बेमेतऱ्याला तर रात्रीं आकाशाखेरीज दुसरेंहि पांघरूण घ्यावें लागे!

मेलगाडी.
१०.५.'६१.

●●

मूळतापी खरोखरच क्षेत्र आहे. काशीत नवीन विचारांच्या वाऱ्यांची झुळूक मधून-मधून अंगाला चाटून जाते. येथे मात्र कालचक्र व धर्मचक्र दोन्ही फिरत नाहीत. शिकस्त वाडे, खिंडारें, बरबळ, जिकडे तिकडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बघायला मिळतात. इतर खेड्यांमध्येहि जिवंतपणा वाटतो. येथे मात्र जीवनच गोठून गेलेलें आढळतें ! एकादें प्राचीनकालीन पवित्र व भव्य मंदिर उभें असावें तसें प० पू० भाऊसाहेब आहेत. आणि पांचवर्षांची छोटूबावूंची चुणचुणीत बोलकी चिमखडी ममता आहे म्हणून जीवनाचीं लक्षणें दिसतात. बाकी, औदासीन्य, हताशबुद्धि, निरुत्साह, निष्क्रियता ! हीं सारीं तीर्थक्षेत्राचीं लक्षणें ! नाही म्हणायला आजहि या पडत्या काळात दोन्ही वाड्यांत मिळून २०।२५ माणसें तरी आहेतच. ममता मला खोंचकपणें म्हणाली, "टिफिनचा डबा कुणी असा रिकामा आणते कां ? लाडू-पेढें नाहीत ? "

मूळतापी.
१४.५.'६१.

●

माझ्यावरोबर सोबत म्हणून बल्लाकाकांचा धाकटा मुलगा, चि० देवदत्त, आला आहे. चि० बेबी-बबनांचें काश्मीर अखेरीस बारगळलें. अगदी रिझर्वेशन झालें, प्रिय बापुराव मुद्दाम राहिले. पण, माशी शिंकायची ती शिंकलीच ! बबनला या वेळीं विश्रांतीची अतिशय गरज आहे यात शंकाच नाही. परंतु, धंदा खूप चालू लागला म्हणजे कमाई वाढते आणि विश्रांति कमी कमी होत जाते. चि० चंदूहि कोठें जाऊ शकला नाही. चि० ताराचें सूतिकागृह अजून अनिश्चित अंतरावर आहे. चि० बबाताई मात्र अगदी लहान मुलाप्रमाणे बदरीनारायणला जाण्याचा हट्ट धरून बसल्या होत्या. त्या चि० गंगाधररावांना घेऊन तिकडे गेल्या. आता राहिलें गोपू-काकांचे मानस सरोवर व कैलास ! त्यांनीहि अगदी ध्यास घेतला आहे. बेबी-बबन यांचें हें चवथें घर खूप प्रशस्त आणि छानदार आहे. खोल्या सगळ्या हॉलवजा आहेत. स्वयंपाक, जेवण, अंघोळ इत्यादींकरिता चार लहान खोल्या स्वतंत्र आहेत. मागल्या बाजूला फरशीचें आंगण असून त्याला भिंत आहे. दोन्ही बाजूंना छान व्हरांडे आहेत. समोर मोठी बाग असून बागेत अनेक मोठीं झाडें, फळझाडें, फुलझाडें व लहानसें शिवालय आहे. एक बकुळीचेंहि झाड आहे. अगदी रस्त्यावर घर असून मोठ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवारामुळे रस्त्यापासून लांव असल्यासारखें वाटतें. लल्लू हैदरावादला गेला आहे. मुन्नी, साधना, शुभदा, खेळण्या-वागडण्यात दंग आहेत.

चि० वेवीला तुझी फार आठवण येते. या तीन महामाया व लल्ला यांची मिजास विमल आत्यांजवळ फार चालते असें वेवीचें म्हणणें. तिचा तुला नमस्कार. प्रिय वापुरावांचा तुला आशीर्वाद.

जवलपुर,
२७.५.'६१.

●

काल संध्याकाळीं ४ वाजता साधना, मुन्नी, लल्लू व घनश्याम यांच्या-वरोवर निघून रात्रीं १०.३० वाजता येथे पोचलो. घनश्यामने गाडी चांगली आणली, आणि गाडीनेहि विशेष आढेवेढे घेतले नाहीत. नागपुरला थंडी जवलपुराच्या मानाने कमी असली तरी एकंदरीत वरीच आहे. सौ० तारा व चंदू यांच्या घरीं गोकुळाचा थाट आहे या वेळीं. चुनिया दंग आहे मुन्नी-साधनांमध्ये आणि रंजूभय्यांची गट्टी आहे लल्लूदादाशी! सगळी मंडळी जाऊन चि० वंडूपत्तरकिनेच्या विक्रमला पाहून आलो. नंतर वाळूकाकाच्या-दोन वाव्यांकडे व वंदनाकडे मिरवणूक गेली. 'वालदिन' मोठ्या थाटाने साजरा झाला. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे अनायासें ती० स्व० मामाहि येथे आहेत. शक्य झाल्यास त्यांनाहि जवलपुरला परवा वरोवर घेऊन जाईन. ता० २२ नंतर चंदूहि तेथे येईल.

नागपुर.
१६.१२. १.

●

परवा सकाळीं सुमारे ११.३० वाजता ती०स्व०मामा, प्रिय मालकीण, चि० लल्ला, मुन्नी, साधना यांच्यावरोवर निघून संध्याकाळीं ६.१५ च्या सुमारास येथे पोचलो. निघण्यापूर्वी ताईच्या आग्रहास्तव मालकीण जेवल्या. गाडीत वसतांना थोड्याशा थवकल्या. वाळू म्हणाला, 'तुला माझ्या घरीं सोडून देतील.' तेव्हा चटकन् वसल्या. गाडी पुढे चालू झाल्यावर म्हणाल्या, "मला जवलपुरला जायचें आहे? मला वाळूकडे सोडून द्या."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी म्हटलें, 'चला ना, काय हरकत आहे?' लल्लू म्हणाला, 'चल, मोठी आई!' नंतर शांतपणें गाडीत वसून राहिल्या. सर्वप्रकारें सहकार्यहि करू लागल्या. मी व मामा असल्यामुळे मधून मधून वडवड केली. पण, त्रास मुळीच दिला नाही. येथे आल्यापासूनहि काही गडवड केली नाही. नागपुरला एकदाच दोन-तीन वाजता जेवीत होत्या. पंधरा दिवसात अंग धुतलें नव्हतें. येथे आल्यावर दोन्ही वेळा जेवतात. जेवणाची उत्कृष्ट म्हणून वाखाणणी करतात, सगळचांबरोवर चहा घेतात व जेवतात. काल येथे डोकें धुतलें, अंग धुतलें. मला व मामांना ऐकविण्याकरिता वडवड चालू असते. आम्ही आहोत तोंपर्यंत ती चालू राहील.

जवलपुर.
२०.१२.'६१.

काल रात्रीं चि० ववन व बेवी यांच्या सडचा स्वाऱ्या येथे आल्या. श्री. भाऊसाहेव राजकारणें यांना भेटणें हाच मुख्य उद्देश्य. सौ० विमा आत्याला वरें वाटलें. आज दोघेंहि रात्रीं जवलपुरला परत जातील.

इतकें पत्र लिहून होतें तो विमल आत्याचा फोन आला. माधवरावांना श्वासोच्छ्वासात कष्ट पडू लागले. त्यामुळे तडक वैद्यराजांकडे गेलो. सुमारे ४.३० ते ७ संध्याकाळीं माधवरावांची स्थिति अत्यंत नाजूक होती. शेवटची घटका आली असेंहि वाटलें. पण वैद्यराजांच्या पुडचांनी पुन्हा नाडी आली. सौ. कुसुम काकू, वापुराव पत्तरकिने व मी रात्रभर तेथेच होतो. स्थिति वाईट आहे. कालचा कठिण प्रसंग टळला. पण फायदा काय?

मृत्यु जीवनातील एक अपरिहार्य सत्य घटना आहे हें ओळखून वागावें यावद्दल वाद नाही. पण, व्याधिदेखील अपरिहार्य घटना मानता येईल कां? अपमृत्यु, अकालीक मृत्यु यादेखील अपरिहार्य घटना मानता येतील कां? जीवन निरामय व निरापद असावें, मृत्युहि तितकाच सुखद व वेदनारहित असावा. हीच खरोखर स्वाभाविक स्थिति मानावी लागेल. मृत्यु हा यथासमय व स्वाभाविक रीतीने आला असता तर कदाचित् प्राकृतिक जनांनाहि त्याची फारशी धास्ती वाटली नसती. तो आकस्मिक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

‘ मालकीण ’

कै० दमयंतीबाई धर्माधिकारी

जन्म	मृत्यु
१९०४	२६ मे १९७३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रीतीने येतो, अनपेक्षितपणें येतो, व्याधि व वेदनांच्या लवाजम्यासह येतो, म्हणून त्याच्याबद्दल तिटकारा व भीति वाटते. मृत्यु एरव्ही रहस्यमय व चिंतेचा विषय वाटला नसता.

नागपुर.
२८.४.'६२.

•

अखेरीस काल रात्रीं १०.१५ चें सुमारास भयंकर यातना सोसल्यानंतर श्री. माधवराव राजकारणे यांस देवाज्ञा झाली. कालच उत्तर रात्रीं त्यांच्या शवाचा दहनविधिहि उरकून घेण्यात आला. वेदनांचा अंत झाला आणि माणसाचाहि अंत झाला. एक मोकळ्या वृत्तीचा, आप्तजनवत्सल, सालस शेजारी व कुटुंबाचा पोशिंदा. मरण तर निश्चितच होतें. मनाने मरणाचा आपण स्वीकारहि करतो. दुर्धर व्याधीच्या व वेदनाच्या वेळीं मरणाचें एका मनाने स्वागतहि करीत असतो. पण, माणसाचा वियोग दु:सह होतो. मेलेल्या व्यक्तीशी आपला जो व्यावहारिक व भावनात्मक संबंध असतो, त्याची स्मृति व त्याच्या परिणामांची जाणीव वियोगाच्या वेदना वाढविते. त्या माणसाचें सगळें आयुष्य आणि आपला व त्याचा संबंध अशा वेळीं तीव्रतेने आठवतो. त्यामुळे शोक होतो. मरण अपरिहार्य आहे हें कळत असूनहि प्रेमाच्या माणसाशी झालेली ताटातूट असत्य वाटू लागते.

चि० विमा आत्या विधवा झाली. 'विधवा' या तीन अक्षरांत, वरच्या जातीतील व वरच्या वर्गातील स्त्रीकरिता दु:खाचें ब्रह्मांड सांठवलेलें आहे. भावनात्मक व व्यावहारिक दृष्टीने तिच्या परावलंबित्वाची प्रचीति अशा प्रसंगीं येते.

नागपुर.
१ मे, १९६२.

•

ता० १७ लाच संध्याकाळीं तारा-चंद्र, बापुराव व बंडूची बायको, तान्हामुलगा, मुन्नी, साधु, शुभू यांच्याबरोबर सर्कस बघायला गेलो. या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्कशीत सिंह, वाघ व 'लायगर' (सिंह व वाघीण यांची प्रजा) एकाच वेळीं वीस वीस रिंगमध्ये येऊन निरनिराळे खेळ करतात. अगदी दोरीवर चालण्यापर्यंतचें. ज्या वेळीं लायगर सायकल चालवितो किंवा एक एक दोन दोनच वाघ किंवा सिंह असतात त्या वेळीं कठडादेखील नसतो. शारीरिक चापल्याचीं व इतर कामेंहि अद्‌भुत आहेत. एका अगदी गोल कठड्यात मोटार सायकल चालविण्याचा चमत्कारहि दाखविला जातो. कठडा अगदी चेंडूप्रमाणे गोल असतो लोकांना थक्क करून सोडणारीं कामें जेव्हा मुली व बायका आणि पुरुष करून दाखवीत तेव्हा ताराचा अगदी श्वास बंद होत असे ! वाघ, सिंह व लायगर रिंगमध्ये आले म्हणजे ताराबाईंची तारंबळ. काही विचारू नये ! शुभूपासून मुन्नीपर्यंत मुली मात्र अगदी खूष खूष ! तारी मात्र तक्रार करायची, "कशाला बाई पुन्हा पुन्हा हे वाघ-सिंह रिंगणात आणतात कुणाला ठाऊक !" लहान मुली व मोठीं माणसें करामात दाखवू लागलीं म्हणजे म्हणायची, "पोटासाठी बिचाऱ्या एवढ्या एवढ्याशा मुलींचा जीव क्षणोक्षणीं धोक्यात कशाला घालत असतील बाई, चच् चच् सूसू ! !"

ता० १८ ला बाळा हुद्दारांच्या मुलीच्या लग्नाला वर्ध्याला गेलो. सकाळीं ७.३० ला पोचलो. संध्याकाळीं ५.३० ला परत निघालो. एवढ्या अवधीत लग्न मंडपाखेरीज जवळ-जवळ पंधरा ठिकाणीं भेटीला जाऊन आलो. गेल्याबरोबर गोपुरीत उतरलो—अनूकडे. तेथेच अंघोळ केली. चंदू बरोबर होताच. नंदा व दिलीप यांची भेट झाली. नंदाची प्रकृति डॉ० बेनर्जींच्या औषधाने पुष्कळच सुधारली आहे. पाठीतील दुखणेंहि कमी आहे. चेहऱ्यावर टवटवी आहे. थोडी फुगली मात्र आहे. दिलीप मजेत आहे. सगळीकडे आमच्याबरोबर होता. ब्रह्मविद्येत फक्त पद्मा, भागीरथी अक्का व उषा आहेत. भाऊसाहेब टेंभेकरहि भेटले. मनोहरजी भावनगरला गेलेले होते. मुद्रणालयात बाबाजी मोघे भेटले महिलाश्रमात फक्त मीरा व तिचीं मुलें आहेत. मृदुला फारच रोडावली व खंगली आहे. अगदी चिपाड झालें आहे शरीराचें ! बजाजवाडीत नारायण व यमू जाजू यांची भेट झाली. मगनवाडीत कमूताई लेले भेटल्या. मित्रांपैकी अण्णा, भाई, आबासाहेब,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काका थत्ते, तेथे नव्हतेच. मैत्रिणींपैकी अक्का, मालतीताईंहि नव्हत्या. फक्त कमूताई होत्या. पद्मा, नंदा, मीरा, मृदुला, कमूताई, यमु, नारायण, अनू, दिलीप, यांच्याखेरीज भाऊ देशपांडे, शरद, मीरापुरकर, यांनीहि तुझी चौकशी केली. सत्यनारायण बाबूची भेट होऊ शकली नाही. बाळा हुद्दाराकडील लग्न असल्यामुळे जुन्या कम्युनिस्टांपैकी लक्ष्मणराव मराठे, शंकरलाल अग्रवाल भेटले. ...म्हणजे नुसत्याच अर्ध्या ब्लेडने, वस्तऱ्यावांचून; दाढी करणारे बहाद्दर!

चि० बेबी-बबनांची जोडगोळी अखेरीस ता० १८ रोजीं काश्मीरकरिता रवाना झाली. त्यांना रवाना करून परवा रात्रीं निघून बंडू व घनश्याम मोटार घेऊन नागपुरला काल पहाटे पोचले. काल संध्याकाळीं बापुराव, बेबी-बबन कन्यकांसह वर्ध्याला बेबीच्या आत्याकडे गेले. अनू आमच्याबरोबर नागपुरला आली होती, तीहि त्यांच्याबरोबर परत वर्ध्याला गेली. सुजाताहि पोपटपंची करायला आली होती. ता० २९ ला बापुराव व मुली जबलपुरला जातील. तोंपर्यंत मालकीण व पंडित आहेत. गुलाबलाहि बेबी सांगून गेली आहे.

मूळतापी.
२०.५.'६२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण दुसरें

दादांची मनू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: २ :

१९४० पर्यंत मी साक्षेपाने स्नेहसंग्रह केला. त्यानंतर कांसवाप्रमाणे पसारा आवरायला सुरवात केली. गंगातीरावरील वाऱ्याच्या पवित्र लहरी-प्रमाणे तू अभावितपणें आलीस आणि थेट पोटच्या पोरीसारखी जीवनाच्या गाभाऱ्यात शिरलीस. तू लहान आहेस, निरागस आहेस, संसाराच्या अनुभवाने तुझी वृत्ति गढूळ झालेली नाही, गंगोत्रीच्या गंगाजलाचें मनोहारित्व व पावित्र्य तुझ्या वृत्तीत राहो अशीच प्रार्थना माझ्या हृदयातून अखंड निघत राहील.

नवी दिल्ली
२४.८.'४९.

•

बेटा, मी तुला सांगितलें होतें ना की कुठल्याहि प्रकारची द्वैत भावना मला खपण्यासारखी नाही आणि तुलाहि खपू नये. मला त्रास होईल किंवा माझें ओझें वाढेल ह्याचा विचार करण्याची पंचाईत तुला कुणी सांगितली ? तू काही माझी निसर्गदत्त कन्या नाहीस. तेव्हा तू नशीबाने प्राप्त झालीस असें म्हणता येणार नाही. मुलाने हौसेने खेळण्याकरिता म्हणून बापाजवळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: २ :

१९४० पर्यंत मी साक्षेपाने स्नेहसंग्रह केला. त्यानंतर कांसवाप्रमाणे पसारा आवरायला सुरवात केली. गंगातीरावरील वाऱ्याच्या पवित्र लहरीप्रमाणे तू अभावितपणें आलीस आणि थेट पोटच्या पोरीसारखी जीवनाच्या गाभाऱ्यात शिरलीस. तू लहान आहेस, निरागस आहेस, संसाराच्या अनुभवाने तुझी वृत्ति गढूळ झालेली नाही, गंगोत्रीच्या गंगाजलाचें मनोहारित्व व पावित्र्य तुझ्या वृत्तीत राहो अशीच प्रार्थना माझ्या हृदयातून अखंड निघत राहील.

नवी दिल्ली

२४.८.'४९.

वेटा, मी तुला सांगितलें होतें ना की कुठल्याहि प्रकारची द्वैत भावना मला खपण्यासारखी नाही आणि तुलाहि खपू नये. मला त्रास होईल किंवा माझें ओझें वाढेल ह्याचा विचार करण्याची पंचाईत तुला कुणी सांगितली ? तू काही माझी निसर्गदत्त कन्या नाहीस. तेव्हा तू नशीबाने प्राप्त झालीस असें म्हणता येणार नाही. मुलाने हौसेने खेळण्याकरिता म्हणून बापाजवळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हट्ट करून चेंडू मिळविला असला तर त्याचें त्याला ओझें का होतें ? चेंडू केवढाहि मोठा असो, त्याला तो जड वाटत नाही, कितीहि टणक असो त्याला तो लागत नाही. उलट त्याचा स्पर्श सुखकरच वाटतो. तू माझी हौसेने मिळवलेली कन्यका आहेस. तेव्हा तुझें मला ओझें होईल, तुझा त्रास मला जाणवेल, अशी शंका तुझ्या मनाला शिवते तरी कशी ? यात सूक्ष्म अहंकार नाही का ? मुली, तुला पुन: एकवार सांगतो, तू समर्पणाची कला अवगत करून घे.

माझीं कामें आणि माझे कार्यक्रम नित्य असोत, नैमित्तिक असोत कीं विशेष स्वरूपाचे असोत, नेहमीचेच आहेत. तुझ्या आजारात तुझ्याजवळ राहण्याचा कार्यक्रम काही कमी महत्त्वाचा नाही. अग, जीव आधी कीं काम आधी ? कामाकरिता जीव द्यावा पण तें काम इतर जीवांचें रक्षण करणारें असेल तरच. एरवी जीवहि जातो आणि कार्यहि साधत नाही. म्हणून तुझ्या आजारात तू ठरविशील तेथे आणि ठरवशील तर तुझ्यापाशी येऊन रहावें असें मनाने घेतलें आहे. त्यासाठी इतर सर्व कार्यक्रम रद्द करण्याची तयारी आहे, नव्हे, इच्छा आहे. त्या दिवशीं अकोले सोडतांना चित्ताची काय होरपळ झाली म्हणून सांगू ?

सर्वोदय कार्यालय, वर्धा
६.२.'५०.

●

बेटा,

काल गर्दीत घाईतच तुला कसेंबसें पत्र लिहून ठेवलें. माझ्या जिवाची अक्षरश: कुतरओढ झाली. पण येणें प्राप्तच होतें. दुसरा इलाज नव्हता. शेवटल्या क्षणापर्यंत गांठीभेटी घेतल्या. बबाताई माझ्याजवळ बसायला, बोलायला तळमळत होती. पण संधिच मिळेना. अखेरीस रात्रीं विमाताई, पी० वाय० व त्यांचा धाकटा नची यांच्याबरोबर निघालो. मुक्कामीं पोचलो. मोटारीतून वाटेत कोठेतरी आमच्या दोन्ही वळकटया सुटून पडल्या. पुन्हा २५ मैल मोटार परत पाठवून शोध केला. सांपडल्या नाहीत. माझे सारे कपडे गेले. अंघोळ केल्यानंतर नेसायला धोतर व घालायला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सदराहि नाही. देव ज्याच्यावर अनुग्रह करतो त्याला अपरिग्रहाचा धडा शिकवितो म्हणतात. चांगलीच गंम्मत झाली !

तू उद्या सकाळीं येशील. शक्य तितक्या लवकर परत येतो. मला चैन पडणार आहे थोडेंच ! बेटा, प्रेम न करणें हातचें असतें पण एकदा करू लागलें म्हणजे मग आवरणें हातचें नसतें. त्या वेळीं तू म्हणालीस, "माझ्या हृदयाची प्रेरणा अशुभ असणारच नाही." मी तुझा प्रत्यय माझ्या प्रत्ययापेक्षाहि प्रमाण मानला. प्रत्यय शुभ होताच. आता तू म्हणतेस की तुझ्या प्रत्ययात स्वार्थाचा अंश होता. तेंहि प्रेरणा प्रमाणच मानू का ? मुली, तू ज्याला स्वार्थ म्हणतेस तो स्वार्थ नसून उत्कृष्ट व वास्तविक परमार्थ आहे. तुझ्या चित्तात उगीचच विकल्प उठतात. ही प्रेरणा अंतरात्म्याची नव्हे हें निश्चित.

कारण, दोन्ही प्रत्यय तुझेच. दोन परस्पर विरोधी प्रत्यय प्रमाणभूत कसे ठरू शकतील ? तेव्हा ज्या प्रत्ययाला दुसऱ्याच्याहि प्रत्ययाचें अनुमोदन असेल तो च प्रमाणभूत मानावा लागेल. माझीहि अंत:प्रेरणा वावगी असणार नाही अशी तुझी खात्री आहे ना ? मग माझ्या प्रेरणेशी सुसंगत अशीच जी तुझी प्रेरणा तीच खरी नव्हे का ? तर्काला भावनेचें-आलंबन पाहिजे, एरव्ही तो शुष्क व अप्रतिष्ठित असतो. पण भावना देखील विवेकाने परिष्कृत करावी लागते. जेथें दोघांची भावना समान असेल तेथे तिला विवेकाचे पाठबळ असण्याचा संभव अधिक. म्हणून माझी व तुझी जी समान प्रेरणा होती तीच शुद्ध व परिनिष्ठित मानणें प्राप्त आहे.

पण, मी हें सारें युक्तिवाद म्हणून लिहीत नाही बरें ! युक्तिवाद कशाला करायचा ? तुझें मन वळवून का तुझा स्नेह मला संपादन करायचा आहे ? युक्तिवादाने स्नेह मिळत नसतो. तुझ्या मनाविरुद्ध तुला काहीहि करायला लावणें हें माझ्या अधिकाराबाहेरचें आहे. मी तुझें हृदय अधिक पवित्र व संस्कारवान् मानलें आहे. तेव्हा नम्रतेने तुझी प्रेरणा प्रमाण मानून स्नेह करीत राहणें हाच माझा स्वधर्म ठरतो. तेवढा मी पाळणार.

तुझ्या शरीराच्या बाबतीत माझें मन हताश झालेलें नाही. तुझ्या जीविताच्या होडीने कितीहि हेलकावे व 'धक्के चपेटे' खाल्ले तरी ती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शारीरिक किंवा मानसिक अस्वास्थ्याच्या खडकावर आदळून फुटणें शक्य नाही असें मला एरव्ही वाटलें नसतें. 'न मे भक्तः प्रणश्यति,' भगवंताची 'आण' आहे. माझें दारिद्र्य — सवंच प्रकारचें, फक्त आर्थिकच नव्हे, तर आधि-भौतिक, आध्यात्मिक सारेंच — अगदी अठरा विश्वें आहे. त्यामुळे माझा अधिकार अगदीच अल्प आहे. पण तू काहीहि केलेंस तरी पिता या नात्याने तुझा संभाळ करण्याची जबाबदारी मी अखेरपर्यंत पार पाडण्याचा प्रयत्न आपल्या अल्प मगदुराप्रमाणे करीत राहीन. यात विनय नाही, अहंता नाही, तो स्नेहजीवी दादांचा स्वभाव आहे. त्याचें 'येळकोट' आहे.

पुढे तू म्हणशील तसें करू. तुझ्या चित्तावर यत्किंचितहि ताण किंवा दडपण नको. तुझें समाधान हाच माझा आनंद. सार्वत्रिक अनवस्थेच्या व असंतोषाच्या या परिस्थितीत समाजधारणेचा उपाय कुठला हें मला सुचतें, पण तें तुला रुचलें व पचलें तरच. एरव्ही नुसत्या निरपेक्ष स्नेहाने तुझी पाठ राखण्याचा प्रयत्न करणें हीच भगवत् सेवा मानीन.

आता सुमारे ८ ला निघून १२ पर्यंत पचमढी गाठू. दर प्रवासात काहीतरी हरवायचें हा नियम आहे. दोन महिन्यापूर्वी खापरखेडला पिशवी सामानासकट राहिली. अजून ती मिळाली नाही. या पाळीला सगळेंच सामान गेलें. पुन्हा 'नवी विटी नवें राज !'

सोनु, तू नित्य प्रसन्न व स्वस्थ रहावेंस आणि तुझ्या हातून उदंड लोकसेवा घडावी हीच तुझ्या या स्नेहायत्त पित्याची अखंड प्रार्थना आहे, 'शेषम् स्नेहेन पूरयेत्'

कळावे हा आशीर्वाद. तुझा दादा

धनतोली. नागपुर,
४.३.'५०

माझें मुली,

तुझें अनपेक्षित पत्र पोचलें. वाचून मनस्वी वाईट वाटलें, पण नवल मात्र वाटलें नाही. पाकिटावरील अक्षर बघताच आतील मजकुराची कल्पना आली. मी स्वतः या अवस्थेतून गेलो आहे. त्या अनुभवाच्या आधारावरच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुला ते दिवशीं ईशारा दिला होता. पण ते दिवशीं तुला झोप येत होती आणि चित्तहि व्यग्र होतें. म्हणून माझ्या बोलण्याकडे नेहमीप्रमाणे पूर्ण लक्ष नसावें.

मी हें पत्र तुला मौन मोडायला लावायला लिहीत नाही. तुझ्या चिंतनाकरिता लिहीत आहे. कोणाच्याहि शुभ संकल्पात अडथळा करणें अगर कोणत्याहि सद्व्रतात व्यत्यय आणणें असुरांचें शील आहे. ती भूमिका मी काय म्हणून पतकरीन, बरें ? मी तुझ्यावर जो अधिकार गाजवितो तो या भूमिकेवरून नव्हे. सामान्यत: मी कोणाच्याहि वैयक्तिक साधनेच्या आड येत नाही. पण जेथें आपुलकी असते तेथें अनुभवाच्या आधारावर थोडी सत्ता गाजवितो. अर्थात् तीहि दुसऱ्या पक्षाला मानवली व आवडली तरच. एरव्ही सारेंच कृष्णार्पण करून मोकळा होतो.

तुझ्या पत्रातील एक वाक्य मला लागलें. 'व्यक्तीचा मोह असणें हें साधनाच्युत होण्याचें लक्षण आहे,' हें तें वाक्य. ही वृत्ति तुझ्या ठिकाणीं जागृत होईल अशी शंका मला स्वानुभवावरून होती म्हणूनच ते दिवशीं मी तुला सावध केलें होतें. संकल्प मोडण्यात आपण कमकुवतपणा दाखविला, मोहाला वळी पडलो असें तुला वाटेल असेंहि तुला वजायलें होतें, पण नेमकें तेंच झालें. तुमच्या 'मोहाखातर' मी 'मौन तोडलें' असें तू म्हणतेस. 'तुमच्या खातर मौन तोडण्याचा मोह मला होऊ शकेल', असा इशारा मला देतेस. माझ्या व तुझ्या स्नेहाला 'मोह' हें भयंकर नांव तीनदा देतेस. त्यामुळे तुझें पत्र वाचून मी अगदी खिन्न व अंतर्मुख झालो.

मोह माणसाला वरून खाली ओढतो, स्नेह खालून वर नेतो. मोहाला वश होण्यात 'च्युति' आहे, स्नेहाची कदर करण्यात उन्नत्ति आहे. मोहात विकाराचा भाग असतो. मोहात वासनेचा अंश असतो. साधक मेनका व उर्वशी यांच्या पाशात सांपडला म्हणजे मोहाधीन होतो, पण देवाच्या प्रेमाचें वेड लागलें तर त्याला काय आपण योगभ्रष्ट म्हणू ? साधनेतूनहि एक सूक्ष्म अहंकार उत्पन्न होतो. इतका सूक्ष्म की तो कळतहि नाही आणि भासतहि नाही. त्याची कल्पना देण्याकरिताच ते दिवशीं मी तुला रविठाकुरांची कविता म्हणून दाखविली होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धरणीके कांपिये चले,
विषय चंचलता ।
सकल कथार मध्ये से चाय,
कई ते आपन कथा ।
से जे आमार आमि, प्रभु,
लज्जा ताहार नाई जे कभु ।।

[त्याचा इतका तोरा आहे की तो पृथ्वीला नमवीत चालतो, कुठल्याहि गोष्टीत तो मध्येच आपली गोष्ट बोलू इच्छितो. तो जो माझा मीपणा आहे, प्रभो, त्याला केव्हाहि लाज नाही.]

बेटा, साधनेतहि विवेक लागतो. तारतम्य लागते. संकल्पाचा बाऊ करणें नेहमीच उन्नतिकारक नसतें. एक अतिरेकी उदाहरण घेतो. भक्ताने मौन घेतलें. देवच येऊन बोलू लागला. भक्ताला वाचा फुटली. मौनव्रताचा भंग का झाला हा ? मी प्रार्थनेत बसलो. इतक्यात सत्पुरुष आला. वेदांत बोलू लागला. मला भाग घ्यायला लावलें. प्रार्थना भंग झाला ? साधनेचें प्रयोजन व हेतु मुख्य आहे. आजारी आहेस. मौन स्वीकारलें. डॉक्टरांशी बोललीस. झाला व्रतभंग ?

माझ्याशी बोलणें हा मी तुझ्या उपचाराचा एक भाग मानला होता. त्याने ताण न पडता तुला हलकें वाटतें असा मला अनुभव आला. म्हणून मी तुला बोलायला लावलें. ज्याने तुझ्या प्रकृतीला त्रास होईल तें मी तुला करायला लावू लागलो तर मग मी तुझा छळ करणारा ठरेन. म्हणून माझ्यापुरतें मौन मोडणें हें मौन मोडणें नव्हे असें मी मानून घेतलें. कारण तुझी माझ्या बद्दलची आप्तत्वबुद्धि म्हणजे 'मोह' नव्हे हें मी मानीत आलो आणि मानीत राहीन. त्यामुळेच मी तुला म्हणालो होतो की कन्यादेखील दैवतच आहे.

पण शेवटीं हा तुझ्या प्रत्ययाचा प्रश्न आहे. माझ्या प्रत्ययाचें प्रतिबिंब तुझ्या अंतःकरणात उमटतें असा अनुभव आहे. म्हणूनच मी तुला तुझ्यापेक्षाहि जास्त ओळखतो असा दावा मी करीत असतो. तो दावा कायम आहे. पण तुझ्या बाबतीत माझें चित्त इतकें हळवें आहे की तुला अल्पहि क्लेश देण्याची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हिंमत होत नाही. माझ्या व तुझ्या संबंधात मोहाला मुळीच थारा नाही असा माझा प्रत्यय आहे. पण तो प्रत्यय तुझ्या ठिकाणीं असूनहि तुला त्याची जाणीव नसली तर तुझ्या प्रेरणेप्रमाणे तू वागावेंस हाच प्रशस्त पक्ष आहे. जोंपर्यंत मोहाची 'भावना' आहे तोंपर्यंत कदाचित माझें सान्निध्यहि कल्याणकारक ठरणार नाही. पण मला मोहभावनेची बाधा झालेली नसल्यामुळे या बाबतीतहि तुझ्या प्रत्ययाप्रमाणेच वागण्याचें मी ठरविलें आहे. माझें तुझ्यामधील interest इतकें निःसीम आहे.

पू० विनोबाहि मौन घेतात. पण ठराविक माणसांशी बोलतात. त्याने शरीराला विसांवा मिळून मनालाहि 'आराम' लाभतो. त्यांचेंहि उदाहरण माझ्यासमोर होतें. पण पुन्हा हा ज्याच्या त्याच्या प्रत्ययाचा प्रश्न आहे. तुझा व माझा स्नेहसंबंध इतका शुद्ध व पवित्र आहे की त्याला 'आप्तत्व' म्हणण्यास हरकत नाही हा माझा प्रत्यय. तोच तुझाहि प्रत्यय. पण त्याची तुला जाणीव असेल तर.

मी तुला परावृत्त करू इच्छित नाही. माझ्या संसर्गापासून तुला शक्ति न लाभली तरी तुझी शक्ति कमी करण्याचा प्रमाद मी घडू देणार नाही. मला साधनेचा विशेष अनुभव नाही. तरी पण इतकी मर्यादा मला संभाळता येईल. मला चित्तशुद्धि वेताचीच लाभली आहे. तरी इतकें साधेल.

आज मुख्य काळजी तुझ्या प्रकृतीची आहे, भगवंताच्या असीम कृपाप्रसादाने तू लाभलीस. तुला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य ज्यायोगें लाभेल तें सारें मी करीन, मग तें मला कितीहि जड वाटो. केलेला संकल्प तडीस नेण्यातच तुला चित्त-स्वास्थ्य लाभणार असेल तर माझा आशीर्वादच नव्हे तर माझी प्रार्थनाहि मी तुझ्या दिमतीला उभी करीन.

हें पत्र मी तुझ्या चिंतनाकरिता लिहिलें आहे. त्यातील विश्लेषणाचें तू मनन कर. तुझी मनोदेवता जसा कौल देईल तसें कर. माझी बुद्धि अधिक समर्थ असली तरी तुझें चित्त माझ्यापेक्षा पुष्कळ शुद्ध आहे अशी माझी प्रतीति आहे. म्हणून माझ्या बुद्धिवादापेक्षा तू स्वतःच्या अंतःप्रेरणेवर अधिक विसंबून रहा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुझ्या हृदयातून अमंगळ प्रेरणा कदापि उठणार नाही याची मला खात्री आहे. म्हणून माझ्या हृदयातून तुझ्याकरिता अखंड आशीर्वादच निघेल. आपली प्रकृति संभाळ. आपलें चित्त शांत व प्रसन्न ठेव. तुझी इच्छा असेल तसेंच करू. मग तर झालें ?

कळावें, हें आशीर्वाद.

तुझा – दादा,

•

ता. क. – मी फक्त तुला बघून गेलो तरी तुला चालेल, – पण मला साधलें व चाललें पाहिजे ना ? तुझ्याशी न बोलता – म्हणजे तू माझ्याशी बोलल्यावांचून – निघून येणें काही लहान दिव्य नव्हे. तेव्हडी ताकद तुझ्यात असेल. पण मी कोठून आणू ? मी पडलो अपत्यवत्सल, 'विरहकातर' स्नेहजीवी प्राणी. मग तू म्हणशील बघायलाहि न आलात तरी हरकत नाही. तुला नाही. पण मला ? . . . पण आता माझा हा 'मी' आडवा येता कामा नये म्हणून तू म्हणशील तसें करू. माझा 'मी' विरघळला पाहिजे ना ? एरव्ही अहंकार दुखावला गेला म्हणजे तो घायाळ चित्त्यापेक्षाहि जास्त चवताळतो हें मी कसा विसरेन ?

– दादा

धनतोली, नागपुर.
४.३.'५०

•

प्रभा व वेणू तुझ्या अभिन्न सोबतिणी आहेत. रामाने लक्ष्मणाला आपलें 'बहिश्चरप्राण' म्हटलें. तुला या दोघी त्याचप्रमाणे आहेत. त्यांच्या-पैकी एक कोणीहि तुझ्याजवळ असली म्हणजे मला फार बरें वाटतें. मुली, तू प्रेमसंग्रह खूप केलेला आहेस. ब्रह्मचर्यापासूनच ज्या व्यक्तीला 'परिव्राजक' व्हायचे असेल तिने विश्वकुटुंबाच्या वृत्तीचाच विकास करावा लागतो. त्या दृष्टीने या प्रेमसंग्रहाचें महत्त्व अपरिमित आहे.

धनतोली, नागपुर.
११.४.'५०.

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुझें परवांचें पत्र आज पुन्हा एकदा निवांतपणें आणि लीनपणाने वाचलें. त्याची माझ्या मनावर जी प्रतिक्रिया झाली ती येथे नमूद करीत आहे.

१. तें पत्र वाचून तुझ्याविषयींचा माझा स्नेह व कौतुक वाढलें. तुझ्या प्रांजळपणाचा व निर्मळपणाचा ठसा अधिक स्पष्ट उमटला. स्त्री-पुरुषांच्या कामनिरपेक्ष सहजीवनाचा आदर्श स्थापन करण्याच्या बाबतीत माझी आत्मजा या नात्याने मी तुला अत्यंत नम्रपणें माझा सह-साधक मानलें. माझ्या चारित्र्यविकासाला तुझें साहाय्य व्हावें ही माझी अपेक्षा उत्तरोत्तर अधिक फलद्रुप होत आहे.

२. प्रत्येक चमत्कारिक गोष्ट तुला बावगी किंवा अप्रशस्तच वाटली पाहिजे असें नाही. तुला ज्या गोष्टीविषयीं अरुचिदेखील वाटते, तिच्यात काहीतरी दोष, निदानपक्षी गौणत्व, असलेंच पाहिजे असा माझ्या मनोदेवतेचा कौल आहे. मला तो दोष किंवा गौणत्व उमगलें नाही तर माझ्या आत्मनिरीक्षणात काहीतरी प्रमाद अगर उणीव असली पाहिजे. माणसाचा अहंकार अनंत सूक्ष्म रूपें घेत असतो. मीच त्याला अपवाद कसा असेन ?

३. जिला कामवासनेचा गंध नाही व कामवृत्तीचा स्पर्श नाही अशी मला भेटलेली तू पहिलीच मुलगी आहेस. म्हणून ब्रह्मचर्याच्या बाबतीत मी तुझी प्रेरणा प्रमाणभूत मानण्याचें ठरविलें आहे. हा प्रश्न वयाचा, वडीलधाकटयाचा, नात्याचा अगर दर्ज्याचा नाही. हा प्रश्न अधिकाराचा आहे. या बाबतीत तुझा अधिकार जन्मसिद्ध आहे. मला नम्रपणें व आदराने तो मान्य केला पाहिजे.

४. तुझ्या स्वाभाविक ब्रह्मचर्यवृत्तीमुळे कुठल्याहि बाह्यशक्तीचा परिणाम होत नाही हें मी जाणतो. त्यामुळे माझ्या संसर्गाने तुझ्या ब्रह्मचर्य वृत्तीत अंतर येणार नाही हेंहि खरें. पण यात मला समाधान कसें वाटावें ? याचा अर्थ असा होईल की तुझ्या ब्रह्मचर्य-वृत्तीला माझ्या संसर्गजन्य परिणामाशी नित्य संघर्ष करावा लागतो. ही अधम भूमिका स्वीकारण्याची माझी मुळीच इच्छा नाही. माझ्या संपर्काने तुझी अटळ व पक्की ब्रह्मचर्य वृत्ति बळावली तरच मला संतोष वाटेल. एरव्ही नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५. ईश्वरोपासनेच्या बाबतीतहि माझी वृत्ति अशीच आहे. मी तुझ्या आड येऊ शकत नाही. हा तुझ्या ईश्वरनिष्ठेच्या दृढतेचा परिणाम असेल. पण त्या वृत्तीचें संगोपन करण्यात माझी मदत होत असेल तर माझ्या स्नेहसंबंधाचा उपयोग. तसें नसेल तर माझ्या स्नेहाचा संग्रह तू काय म्हणून करावास ?

६. ब्रह्मचर्य व ईश्वरनिष्ठा या दोन बाबतीत तुला माझी मदत झाली, तरी तुझ्या संपर्काने माझ्या ठिकाणीं त्यांचा विकास झाला पाहिजे. म्हणून या बाबतीत तुझी प्रेरणा शुभकारक व हितकारक मानणार आहे. तू ज्या मर्यादा ठरविशील व आचरशील त्यांचेंच पालन करण्याचा माझा प्रयत्न राहील. दरेक प्रतिकूलतेत अनुग्रहाचा अंश (सेव्हिंग ग्रेस) असतोच. माझा संपर्क तुझ्या दृष्टीने प्रतिकूल ठरला तरी माझ्या दृष्टीने हितकर ठरला म्हणजे त्यात हा अनुग्रहाचा अंश दाखल होईल.

७. बेटा, 'अमानित्वा' पासून अहिंसा वृत्तीचा आरंभ होतो. केनोपनिषदातील आख्यायिकेत खुद्द देवराज इंद्राला नम्र होऊन एका तेजस्वी स्त्रीला शरण जावें लागलें. वयाने व मानाने धाकट्या पण गुणाश्रित अधिकाराने श्रेष्ठ अशा व्यक्तीपासून शिकण्याच्या वृत्तीचेंच नांव विनय. तो माझ्या अंगीं बाणावा हा माझा प्रयत्न.

मला वाटतें मी पुरेसें स्पष्ट लिहिलें आहे. तुझी 'आवड' व आमचा 'विवेक' यांत फरक नाही. म्हणून तुझ्या अंतःकरणाची प्रेरणा हेंच आमचें शास्त्र. धर्मस्य तत्त्वम् निहितं गुहायाम् — तू आपल्या मनावर कुठलेंहि दडपण किंवा ताण पडू देऊ नकोस. आपल्या सहज प्रेरणेला अनुसरून वाग. जुळवून घेण्याची जबाबदारी माझी आहे.

कालपासून याच विषयाचें प्रार्थनापूर्वक चिंतन करीत आहे.

दामजीपुरा.
२५.५.'५०

●

तीन दिवस सतत मनन व विनीत भावाने विचार केला. मनोदेवतेचा निर्णय अधिक पक्का व घट्ट झाला. ज्या गोष्टींविषयीं तुला अरुचि वाटेल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

किंवा कांक्षा वाटेल ती करूच नये. यातच तुझा संतोष व माझें हित. माझा स्नेह व आदर, होय आदर, उत्तरोत्तर वाढतच जाईल. माझ्या अल्पशक्तीचा उपयोग तुला होतच राहील. माझा संसर्ग तुला यत्किंचित्‌देखील भावू नये. माझें व्यक्तित्व भाररूप होऊ नये किंवा ती एक व्याद ठरू नये याची काळजी मी घेईन. तू अगदी मोकळी रहा.

वेतूल.
२७.५.'५०.

●

आजची तुझी चिठी वाचून जबर हादरा बसला. तुझ्या कलाविरुद्ध वागायचें नाही, तुला जें अरुचिकर वाटेल तेंदेखील टाळायचें असें मी तुला लिहून दिलें. तसा वागूहि लागलो होतो. जो फरक केला तोहि तुझ्याच प्रेरणेने केला. असें असूनहि तुला परत तोच मुद्दा उपस्थित करावासा वाटला. मला अपराध्यागत वाटू लागलें आहे.

तुझ्या पत्रात याहिपेक्षा भयंकर एक ध्वनि आहे. विनोबांच्या वाक्याचा संबंध तू आपल्या रायपुरच्या पत्राशी लावला आणि 'ईश्वर निष्ठेत कमतरता असावी किंवा ब्रह्मचर्यात त्रुटि असावी' असा निष्कर्ष काढून त्याच संदर्भात परत पचमढीचे मागणें मागत्येस. याचा सरळ अर्थ असा की गेल्या वर्ष-दीड वर्षात आलेला माझा संबंध तुझ्या ईश्वरनिष्ठेला व ब्रह्मचर्यवृत्तीला पोषक होण्याऐवजी बाधक झाला. तुझ्या पत्रातील हा ध्वनि किती भयंकर व गंभीर आहे याचा तूच विचार कर. ईश्वरनिष्ठेत व ब्रह्मचर्यात व्यत्यय आणणाराची भूमिका किती हिणकस व अधम आहे, हें मी तुला सांगायला हवें का ? मी तुझा बाप व हितेच्छु आहे. न कळतांहि माझ्या हातून हा अक्षम्य प्रमाद घडत असला तर माझा व तुझा संबंध इतःपर राहणें सर्वस्वी अनिष्ट नाही का ठरणार ? तेव्हा आता यात माझ्या 'हरकतीचा अगर परवानगीचा' प्रश्नच कोठे उद्‌भवतो ? माझी हरकत असली व परवानगी नसली, तरी, किंवा हरकत आहे आणि परवानगी नाही, म्हणूनच दोघांच्याहि कल्याणाकरिता तू माझा अव्हेर व त्याग करायला हवा.

मी मामूली संसारी प्राणी आहे. माझे संस्कार व माझा प्रत्यय कदाचित् शुद्ध नसेलहि. माझा पिंडच मुळीं 'मलिन सत्त्व' असेल. त्यामुळे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला निर्दोष व शुद्ध वाटणारें वर्तनहि कदाचित् वस्तुत: सदोष व अशुद्ध असू शकेल. त्याबाबतीत तुझ्या 'अंतरात्म्या'चा संकेत माझ्या मलिनसत्त्व 'अंतरात्म्या'च्या ध्वनीपेक्षा अधिक प्रमाण मानला पाहिजे. म्हणून मी नम्रपणें तुझ्या अंतरात्म्याचा संकेत स्वीकारतो.

माझ्या विचाराक्रांत डोक्यात विचारांचा थयथयाट सुरू झाला आहे. पू० विनोबा, बाबू काका यांच्यासारखे शुद्ध चित्ताचे नैष्ठिक ब्रह्मचारीदेखील आजारी पडतात. त्यांनाहि विनोबांचें वाक्य लागू नाही का ? ईश्वरनिष्ठेत व ब्रह्मचर्यात अंतर येऊ नये म्हणून जर त्यांनी एकमेकांजवळ याच प्रकारचें मागणें मागितलें तर त्यांना एकमेकांचें सान्निध्य अपथ्यकर वाटतें असाच त्याचा अर्थ नाही का होणार ? एकमेकांच्या अतिसान्निध्याने ईश्वराचा अनादर झाला असाच ध्वनि त्यातून नाही का निघणार ? मग सज्जनाचा सहवास ईश्वरभक्तीचा भाग कसा मानता येईल ?

ईश्वराचा अनादरच घडला असेल तर तो परस्परांच्या उन्नतिकर सहवासाहून अन्यत्र शोधावा लागेल, नाही का ? एकमेकांच्या सान्निध्याचा उपमर्द म्हणजेच भगवंताचा अनादर असा उलट निष्कर्ष काढणेंच अधिक सयुक्तिक नाही का होणार ?

प. पू. भाऊसाहेब रोज हंबरडा फोडून रडतात. म्हणतात, 'तुझा मी केव्हा नि कसा अव्हेर केला रे देवा ? माझें शरीर व्याधिग्रस्त कां व्हावें ? पण म्हणून जर ते म्हणू लागले की दादा, तुझ्यासारख्या धर्मभ्रष्ट सुधारकाच्या संबंधाचें हें प्रायश्चित्त मला भोगावें लागत आहे,' तर मला काय बरें वाटेल ? मी भक्तिभावाने त्यांची सेवा करतो आणि ती सेवाच त्यांच्याकरिता प्रत्यवायरूप ठरावी यापरतें माझें दुर्दैव तें कुठलें ? त्यांना आपल्या सांवलीचाहि स्पर्श होऊ न देणें हीच त्यांची उत्कृष्ट सेवा नाही का ठरणार ? ती सेवाहि मी नम्रपणें करीन. ती मी 'वियोगभक्ति मानून घेईन. पण मग हें स्वत:चें अमंगळपण कसें घालवू ? माझ्या स्पर्शदोषाने सज्जनांना ईश्वर पारखा व्हावा, कीं त्यांच्या स्पर्शाने मला तो जवळ यावा ? पामराला संताचा सहवास पावनकर होण्याऐवजी पामरांचा सहवासच सज्जनाला अपथ्यकर व्हावा काय ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प० पू० भाऊसाहेबांसारख्या सूक्ष्मदर्शी तत्त्वज्ञाला तसा प्रत्यय येत नाही. त्यांनी मला पोटाशी धरलें, म्हणाले, 'मतभेदांना भेदून हृदयात प्रवेश करणाऱ्या तुझ्या निरपेक्ष स्नेहात व स्पर्शात मला ईश्वराच्या कृपेचें दर्शन घडतें.' मुली, तुझ्या सहवासात व स्पर्शात मला पवित्रतेचा प्रत्यय आला. मग तुला जर विपरीत प्रत्यय येत असेल, तर माझें अशुद्ध चित्त आत्म-प्रतारणा करीत आहे असें मानण्यावांचून काय गत्यंतर आहे ? माझ्या बाबतीत जी साधना तीच तुझ्या बाबतीत अवनतीचा मार्ग ठरला, तर दुर्दैव माझें, दुसरें काय ? तुझा बाप या नात्याने वियोगवेदना पतकरूनहि तुझ्या अवनतीला कारणीभूत होण्याची भूमिका निग्रहपूर्वक सोडावी लागेल. धर्मा-चरणाच्या आड येण्यापेक्षा मरण पतकरलें !

तू बाबूला म्हणालीस, 'मी गडी फूं केली, तरी दादा बरे करतील ?' तें मात्र खरें आहे. माझा संबंध अपावन म्हणून तुम्ही सर्वांनी मला झिडकारणें स्वाभाविक व सयुक्तिकहि होईल. पण मला तुमचा संबंध हितकर व पावन असल्यामुळे मी बरा तुमचा त्याग करीन ? लोखंड परीसाला झिडकाडते का कधी ? तुला वाटेल तेव्हा माझ्या कुशीत खुशाल ये, पण आता तुला वाटेल तरच आणि तेव्हाच. एरव्ही मी वियोगाची शिक्षा सहन करीन.

स्टेशनावर तुला भेटायला येईन म्हणतो. तुला घरींहि घेऊन येईन म्हणतो. पण तुला रुचेल व मानवेल तरच. प० पू० भाऊसाहेबांना तुझीं भजनें ऐकायला मिळावीं असेंहि फार वाटतें. पण तेंहि तुला आवडलें तरच.

हें सारें मी अनुतापाच्या किंवा आत्मग्लानीच्या भरात लिहीत नाही. अत्यंत प्रांजळ बुद्धीने आणि ऋजुवृत्तीने लिहीत आहे. माझें हृदय अश्रूंनी थबथबलें आहे. माझ्या पोटच्या गोळ्या, कुठल्याहि पित्याने आपल्या मुलीच्या आयुष्यात समस्येच्या रूपाने नडत रहावें ही मी अधमपणाची सीमा समजतो. तू माझें अनमोल कन्यारत्नच नाहीस तर माझी स्नेहसिद्ध मातोश्रीहि आहेस. तुझ्या जीवनात समस्या या नात्याने सलत रहाण्यापेक्षा आत्मविलोपन पुरवलें.

बेटा, तुझ्या बाबतीत मी मोठ्या धैर्याने आणि मोठ्या उदात्त हेतूने एक अतिशय कठिण, पण महान् प्रयोग आरंभिला आहे. वडिलांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुण्यप्रभावाने व संतांच्या कृपाप्रसादाने मी क्षणभरहि कचरलो नाही किंवा साशंक झालो नाही. प० पू० भाऊ साहेबांसारख्या पुराण मताभिमान्याने गं० भा० गंगूताईंच्या बाबतीत सुमारे बत्तीस वर्षांपूर्वी जो प्रयोग हिंमतीने केला, त्याने मला बळ मिळालें. माझ्या बुद्धीला तर्ककर्कश चिकित्सेचें व निष्ठुर आत्मविश्लेषणाचें वळण लागलें. तू ता. २० ला गेलीस ता० २१ ला गजाभाऊने तुझें पत्र आणून दिलें. ता०२२ पासून जेवण वर्ज्य करून उपोषण पूर्वक व प्रार्थनापूर्वक अंतर्मुख होऊन प्रखर आत्मपरीक्षण केलें. अपावनतेचा सूक्ष्मदेखील गंध कोठे आढळला नाही. पण, ज्या अर्थी तुझ्या स्फटिकासारख्या निष्कलंक मनात पुन:पुन्हा विकल्प येतो त्या अर्थी माझा प्रत्यय हा मिथ्या तर नसेल ना, अशी शंका मनात येऊ लागली आहे. तुझ्या कोमल व स्वच्छ अंतःकरणाला विकल्पाच्या यातना वारंवार सोसाव्या लागल्या हें मला लांछनास्पद आहे. म्हणून माझा प्रत्यय कितीहि दृढ व नि:संशय असला, तरी त्याची झळ तुला कां लागू द्यावी ? अर्थात् मी अतिशय विनीत भावनेने तुझा प्रत्यय प्रमाण मानण्याचें ठरविलें आहे. हाच माझा पितृधर्म आहे. तुला मनोव्यथा देऊन तुझा छळ करायला का मी तुझा बाप झालो ? तुझा स्नेहभाजन राहिलो म्हणजे मिळविली.

मी तुझ्या बाबतीत उदासीन मात्र राहू शकणार नाही. तू मला झुगारून दिलेस तर दूर राहीन. पण दुरून अधिक उत्कट प्रेम करीन. तुझें निरंतर कल्याण करण्याची प्रार्थना त्या दीनवत्सलाला सतत करीत राहीन.

तुझा सख्खा भाऊ, बबन, म्हणतो, 'विमलताई के हृदय की पहली प्रतिक्रिया अकसर अचूक होती है।' तू माझ्याकडे आलीस तेव्हा तुझी पहिलीच प्रतिक्रिया, त्यानंतर मधून मधून विकल्पाचे ढग आल्यानंतर पुन्हा चित्त निरभ्र झाल्यानंतरची प्रतिक्रिया एकच होती, 'दादा तुमच्या सान्निध्याने, स्पर्शानें व सहवासाने माझें कल्याणच होईल. तुमच्यावांचून मला नाही करमायचें.' तीच प्रतिक्रिया मी यथार्थ व प्रमाणभूत मानतो. माझा अखंड प्रयत्न मला दगा देणार नाही. मधून ढग येतील, विकल्प, निक्षेप, उत्पन्न होतील. पण प्रत्येक वेळीं माझी ही अखंड प्रतीति अधिक परिमार्जित व उज्ज्वल स्वरूपात प्रकट होईल.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाळ, पुष्कळच लिहिलें ग ! पण हें माझ्या काळजाचें रक्त आहे. उगीचच नाही लिहिलें. दरेक वाक्य मननपूर्वक वाच. चमकून किंवा वुजून जाऊ नकोस. मग तुझी मनोदेवता सांगेल तसें कर. मी माझी भूमिका फलपुष्परहित सामान्य झाडासारखी मानली आहे. क्षणभर वाटेल त्याने यावें, विसांवा घ्यावा, वाटल्यास पानें व फांद्याहि तोडाव्या आणि नंतर विनदिक्कत निघून जावें. वृक्षाला मन नाही, संवेदना नाही, भावना नाही ! पण याहि भूमिकेत एक प्रकारचें कारुण्ययुक्त भाग्य नाही का ?

२५.६.'५० – आतापर्यंत जें लिहिलें तें विनययुक्त वात्सल्याच्या हळुवारपणाने व जिव्हाळ्याने लिहिलें. आता अनुभववृद्ध पित्याच्या जवाबदारीने व अधिकाराने लिहीत आहे. ईश्वरनिष्ठेत अंतर माणूस जर लौकिकाच्या किंवा लौकिकतेच्या आहारीं गेलें तरच येऊ शकतें. माझ्यामुळे तुझ्या ठिकाणीं लौकिकाचा हपाप व लौकिकाची वृत्ति वाढली असेल तर माझा स्नेह तुला अहितकारक ठरेल. पण तू आतापर्यंत वारंवार सांगितल्याप्रमाणे माझ्याशी संवंध आल्यापासून जर तुझी मानवपरायणता वाढली असेल तर माझा स्नेह वैयक्तिक असूनहि तो ईश्वरनिष्ठेला पोषकच ठरला पाहिजे. कारण माणसाचा अव्हेर म्हणजेच भगवंताचा उपमर्द. शेवटीं सारीं उदात्त तत्त्वें कुठल्या तरी माणसाच्या स्वरूपानेच मूर्तिमान् होत असतात. तत्त्वनिष्ठ व भावनानिष्ठ माणसाचीं शरीरें त्या त्या तत्त्वाचीं अगर भावनांचीं प्रतीकें वनतात. विनोवादेखील गुरुजींच्या देहावसानाने शोकमग्न झाले ते तरी याचमुळे ना ? अशा माणसांच्या शरीराविषयीं आस्था म्हणजे आसक्ति किंवा शारीरिकता नव्हे.

सोनु, स्नेह काही सौदा नव्हे. यात एकाचा नफा म्हणजे दुसऱ्याचा तोटा नव्हे. एकाचें उत्थान म्हणजे दुसऱ्याचें पतन नव्हे. हा स्नेह दोघांचेंहि कल्याण करतो. दोघांनाहि धन्य करतो. त्या स्नेहाची कांस मी धरलेली आहे. म्हणून मला भीति किंवा संशय यांची वाधा होत नाही. त्यामुळे कितीहि विघ्नें व अंतराय आले तरी शेवटीं तुला दादाच्या कुशीतच समाधान लाभेल यावद्दल माझी त्रिवार खात्री आहे. तू माझ्याशी पोटभर वोलून घे.

कळावें हा आशीर्वाद,

तुझा स्नेहजीवी पिता, दादा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुन्हा : — माझा हृदयस्थ देव — माझ्या जीवनातील सत्त्व — साक्ष देतो की माझ्या संबंधामुळे तुझ्या ईश्वरनिष्ठेत भावरूप मानव-परायणतेची भर पडल्यामुळे ती ईश्वरनिष्ठा समृद्ध व मधुर झाली आहे. ही अहंतेची दर्पोक्ति नव्हे, माझ्यातील सत्त्वांशाचें स्फुरण आहे. म्हणून आता माझ्या मनाला शंका किंवा भीति शिवत नाही.

२४. ६. '५०.
धनतोली नागपूर.

०

पोटच्या पोरी,

तू माझी अगदी एकशेंएक टक्के **'लाडकी लेक'** आहेस. त्यामुळे जरा कुठे खुट्ट झालें की मी चमकतो. मी विचारात गढून जातो. अर्थात् माझे इतर सारे व्यापार व उद्योग चालू असतांनाच. तुझ्या कालपासूनच्या वागणुकीमुळे व चर्येमुळे मी पुन्हा अंतर्मुख होऊन विचारमग्न झालो आहे. माझ्या मनात आता **संशय** किंवा **भ्रम नाही.** पण मधून मधून हे असे झटके बसले म्हणजे निष्ठा वळकट होते. तू माझी पोटची पोर. तुझ्या हिसडचांनी घायाळ होण्याइतका मी कच्चा नाही. हळुवार मात्र आहे. त्यामुळे थोडे बोचकुरे मात्र हृदयावर उमटतात.

या दीडवर्षात तुझ्या अंतरंगात एक प्रकारचा तीव्र अंतःकलह चाललेला आहे. या मंथनामुळे जो चित्तक्षोभ होतो तो तुलादेखील अनेकदा असह्य होतो. **या नवजन्माच्या वेदना आहेत.** त्यांनी व्यथित होणें अगदी स्वाभाविक आहे. तुझें जुनें 'स्वत्व' व नवे 'स्वत्व' यांतील संघर्षाची ही खळवळ आहे. तुझ्या **'व्यक्तित्वा'**ची उत्क्रांति **'व्यक्तिमत्तेत'** किंवा **'व्यक्तिमत्वात'** होत आहे. त्या संक्रमणाच्या या वेदना आहेत. त्यामुळे माझ्या हृदयाला पीळ पडत असला तरी मी गांगरून जात नाही. माझा हिरमोड होत नाही. ऑपरेशनच्या दिवशीं तुझ्या जिवाची तगमग पाहून माझा जीव कासावीस झाला. मी अगदी कळवळलो. पण खचलो नाही. तुझ्या जीवनातील स्थित्यंतरामुळे होणारा हा मानसिक विप्लव पाहून माझा जीव कळवळतो. पण मी नामोहरम होत नाही. माझा प्रत्यय व माझी निष्ठा आणि माझा तुझ्यावरील विश्वास हे तीन माझे **'प्राण-स्कंध'** आहेत. त्यांच्यामुळे मी सारें सहन करून जगतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जीवन्मुक्तीच्या साधनेचीं द्योतक तीन महावाक्यें आहेत; १ – अहं ब्रह्मास्मि, २ – तत्त्वमसि, ३ – सर्वं खलु इदं ब्रह्म. यांपैकी एकहि अंगीं बाणले' तरी माणूस ब्रह्मरूप होतो. 'मी ब्रह्म आहे,' या अनुभूतीतून 'तू ब्रह्म आहेस', ही प्रतीति येते आणि त्यांतून, 'हें सारेंच ब्रह्म आहे,' असा प्रबोध उत्पन्न होतो.

नागपुर,
११.७.'५०.

मामांची चिमुकली बाबी म्हणते, 'मुलीची मुंज होत नसते काही ! मुलीचे लग्न होत असतें ! दादा, तुम्हाला इतकेंहि समजत नाही ?'

माझे पोरी, तुझ्या या वेडप्या बापाला खरोखरच काही समजतें हें तुझ्याखेरीज कोण बरें सिद्ध करील ? तू 'चिरंजीव' विमल आहेस ! 'सौभाग्य-कांक्षिणी नाहीस,' 'श्रीमती नाहीस !' नुसतीच निर्मळ, निखळ 'चिरंजीव विमल !' बबीला स्वतंत्र संसार आहे. बबनला आहे, बाळू, चंदू त्या तयारीत आहेत. मग माझा संभाळ करण्याचा पतकर तू घेतला आहेस ना ? म्हणून तूच माझी चिरंजीव विमल !

लोहारें-सावंगें,
१६.५.'५१.

तुझ्या स्नेहात जशी तुझी प्रार्थना अंतर्भूत आहे त्याचप्रमाणे माझ्या स्नेहात माझा आशीर्वाद अंतर्भूत आहे. तुझे सगळे शुभ संकल्प पार पाडण्याचें सामर्थ्य देवाने तुला द्यावें ही माझी प्रार्थना. तुझा निर्णय जर चुकीचा असला तर तो चुकीचा असल्याचेंहि तुझ्या लक्षात त्वरित यावें हा माझ्या प्रार्थनेचा उत्तरार्ध. तरीपण शुद्ध हेतूने केलेला प्रामाणिक निर्णय जोंपर्यंत चुकीचा असल्याचें तुला वाटत किंवा पटत नाही, तोंपर्यंत त्याला चिकटून राहण्याची शक्तिहि देव तुला देवो; ही पुस्ती मी माझ्या प्रार्थनेला आता जोडतो.

माझी भूमिका स्पष्ट आहे. एकदा पुन्हा मांडतो :– सान्निध्य, सहवास व स्पर्शभावना यांच्याविषयींच्या आकांक्षेला मी दोन कसोटचा लावतो. एक,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्या माणसाविषयीं मला आकर्षण वाटतें तें माणूस कसें आहे ? त्याची भावना, शुद्ध व उन्नतिकारक आहे किंवा नाही ? दोन, माझ्या आकर्षणाचा हेतु व आलंबन शुद्ध आणि उदात्त आहे किंवा नाही ?

उभयपक्षीं हेतु व आलंबन शुद्ध आणि उदात्त असल्यास तें आकर्षण आसक्तीत मोडत नाही. तें वावगें ठरत नाही. लोखंडाचें चुंबकाच्या विषयींचें जें आकर्षण तसें तें नसून लोखंडाचें तें परिसाविषयींचें आकर्षण आहे.

ज्या माणसाचा संसर्ग व संबंध माझ्या भूमिकेला व विकासाला प्रतिकूल असेल त्याच्या संपर्काच्या व सान्निध्याच्या बाबतीत मी उत्तरोत्तर अधिक संयम करीन. कारण त्या आकांक्षेचें आलंबन अशुद्ध व अशुभ असलें पाहिजे. तो मोह आहे. ती आसक्ति आहे.

सम्यक् निर्णयांना घट्टपणें चिकटून राहण्यास जसें सामर्थ्य लागतें तसेंच चुकीचे निर्णय बदलण्यासहि लागतें. निष्ठेचें आणि अनाग्रहाचें हें द्विविध सामर्थ्य प्रभुकृपेने तुला लाभो हाच माझा आशीर्वाद.

आगगाडी.

२. ६.'५१.

•

माझ्या कन्याकुमारीची मूर्ति तीन घटक द्रव्यांची घडलेली आहे.

१. अखंड ईश्वरनिष्ठा :– तुझ्या बाबतीत ही साधना नव्हे. जन्मसिद्धच स्थिति आहे. तिच्यात अंतर पडू देऊ नकोस, ईश्वर निष्ठेचीं लक्षणें दोन – एक, सैतानाला स्वतंत्र सत्ता नाही. कारण ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. दोन, आपलें शरीर जसें ईश्वरप्राप्तीचें साधन आहे, तसें दुसऱ्याचेंहि आहे. त्यामुळे सर्व शरीरें ईश्वर-भक्तीचीं आयतनें आहेत. हेंच आस्तिक्य. प्राण्यांचीं शरीरेंहि पवित्रच.

२. ब्रह्मचर्य :– ही तुझी जन्मतः प्राप्त सहजावस्था आहे ती संभाळ. ब्रह्मचर्याचीं लक्षणें दोन. एक पुरुषाच्या शरीरसंबंधाची आकांक्षा न वाटणें. दोन, पुरुषाची भीति न वाटणें, त्याच्या किंवा त्याच्यापासून रक्षणाची गरज न उरणे. पुरुषमात्रांबद्दल वासनानिरपेक्ष निर्व्याज प्रेम वाटणें.

३. बालवृत्ति :– हिचीहि तुला जोपासना करायला हवी. तुझ्या बाबतीत ती सहजसिद्ध आहे. बालवृत्तीचीं लक्षणें दोन :– एक, संयमावांचून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जीं मोकळी वागणूक घडेल तिच्यात वासना व मतलव नसणें. दोन, निष्पापता व निरागसता स्वभावसिद्ध असल्यामुळे भीति, संकोच औपचारिकता यांची गरज न भासणें. ही वृत्ति जतन करून ठेव.

तुझ्या व्यक्तित्वाचें सत्त्व या तीन तत्त्वांत सांठविलेलें आहे.

धनतोली, नागपूर.
११. १२. '५१.

•

तुझ्या गुरुपौर्णिमेच्या पत्राने माझें चित्त परिष्कृत झालें. तुझ्या व्यक्तित्वातील गंगोत्री अजून निर्मळ आहे. म्हणूनच 'आई' म्हणून साद घालण्याची स्फूर्ति तुला झाली. मी तुला 'माझ्या पोटचा गोळा.' 'माझें औरस लेकरूं,' 'माझी आत्मजा,' म्हणून साद घालतो. हें नातें मर्यादातीत आणि लौकिक संकेतांमध्ये लोकोत्तर आशय भरणारें असतें. आपण ज्ञानदेवाला 'माउली' म्हणतो तेव्हा त्याच्या ब्रह्मचर्याचा उपहास थोडाच करतो ? विवाहावांचून 'माउलीपण' येत नाही अशी अमंगळ तर्कटाची कल्पना तरी आपल्याला शिवते का ? आपण 'विठाई माउली' म्हणतो आणि त्याच क्षणीं 'विठोवा माउली' हि म्हणतो. त्या वेळीं आपल्याला 'यशोदा' किंवा 'रुखमाई' यांची आठवण तरी येते का ? 'विठोवामाउली' देवकीचा पुत्र नव्हे; रुक्मिणीचा कांत नव्हे. आमचा 'माय-वाप' आहे. 'त्वमेव माता च पिता त्वमेव !' हें लौकिक मातृत्व नव्हे; दिव्य मातृत्व आहे.

गुरुपौर्णिमेच्या पवित्र मुहूर्तावर तू मला पुन्हा 'माउली' म्हणून गौरविलेंस. माझ्या भाग्यावर कळस चढविलास. माझ्या साधनेला गति दिलीस आणि माझ्या विनयाला भक्कम अधिष्ठान दिलेंस. विठोवाच्या पितृत्वाचा पुरुषत्वाशी काडीचाहि संवंध नाही. त्याच्या मातृत्वाचा स्त्रीत्वाशी संवंध नाही. तो पिता कोणाचाहि पति नव्हे, ती माता कोणाचीहि पत्नी नव्हे. माता व पिता एकमेकांत मिसळून जातात. माझें तसें झालें. 'धन्यकाळ हा दिवस !'

त्याचप्रमाणे मी तुला 'मन्या', 'राजा' म्हणतो. 'मनू', 'राजावाई' हि म्हणतो. अगदी १९४९ पासूनच मी तुला 'सोन्या', 'सोनू', 'मन्या', 'मनू'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणत आलो. तूहि तुझ्या सहज निरागसतेने 'तो तुमचा लाडोवा,' 'तुमचा प्राण मन्या,' म्हणत आलीस. यात भावनेचें वैभव आणि बुद्धीचा स्वभावसिद्ध विवेक होता. 'माझें अपत्य', 'माझें लेकरूं', 'माझ्या पोटचा गोळा, 'माझी आत्मजा' हे शब्द व्याकरणांत नपुंसकलिंगी, पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी आहेत. पण भावनेत आणि वस्तुस्थितीत लिंगनिरपेक्ष आहेत. संस्कृतात 'दार:', 'कलत्रम्' आणि 'भार्या' हे तिन्ही शब्द पत्नीवाचक आहेत. व्याकरणाप्रमाणे 'दार' हा पुल्लिंगी, 'कलत्र' हा नपंसकलिंगी आणि 'भार्या' हा स्त्रीलिंगी शब्द आहे. पण वस्तु तीच आहे. हें व्याकरण झालें. पण 'मन्या', 'सोन्या', 'पोरी', 'माझें सोनें', 'मने', या शब्दांत निरुक्त आहे. त्यांत भावना आणि वास्तविकता यांचा योग आहे. म्हणूनच त्याला 'स्नेह-दर्शन' किंवा 'कौटुंबिक योग' म्हणायचें. 'माझी बुद्धि तू आईच्या दुधासारखी पी,' मी अहंकाररहित आत्मप्रत्ययाने तुला म्हणालो. ज्ञानी भक्त श्रुतिमुखाने म्हणतो –

त्वं स्त्री, त्वं पुमानसि, त्वं कुमार उत वा कुमारी ।
त्वं जीर्णो दण्डेन वञ्चसि, त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ।।

[तू स्त्री, तू पुरुष, तू कुमार आणि कुमारीहि आहेस. जर्जर होऊन काठीने अडखळणारा तूच आणि उत्पन्न झाल्यावरोवर अनंत मुखांचा विराट तूच.]

हें झालें तत्त्वज्ञान व विज्ञान. आता थोडेसें रूढ परंपरेकडे पाहू. मुलीच्या नांवाचा संक्षेप मुलाच्या नांवासारखा करण्याची प्रथा सर्वत्र आहे. 'चंद्रिके' चें 'चंदू' 'रजनी' 'रज्जू', 'मालती' चें' मालू' 'निर्मला'चें 'निर्मल', 'विमला'चें 'विमल', 'अंबिका' चें 'अंबू', 'गंगा' चें 'गंगू' इ० इ० मुलीला 'बेटा', 'बाळ', 'मूल' म्हणून हाक मांरतात किंवा उल्लेख करतात. याचें अंशत: कारण कुटुंबात मुलाचें मूल्य मुलीपेक्षा अधिक आहे, हें तर आहेच. पण फक्त तेवढें नाही कारण, मुलालाहि मुलीप्रमाणे संबोधनें लावण्याचा प्रघातहि सर्वत्र आहे. मुलालाहि 'अरे माझी बेटी,' 'माझी इवलीशी सोनुली' म्हणतात. मुलां-मुलींना 'माझें बेटू' 'माझें सोनुलें', 'माझें छकुलें' म्हणतात. तेव्हा यांत प्रेमातील अभेद दर्शनाचाच भाग अधिक आहे यात शंका नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी तऱ्हेवाईक आणि मुलखावेगळा असलो, तरी मी जें करतो त्यात मुद्दा व विचार असतो, एवढें तुझ्या ध्यानात यावें म्हणून हें लांब लचक चऱ्हाट वळलें. ज्या माणसांनी तुझी तुलना विनोबांशी केली तेहि प्रमाणिक होते. दोघांमधील सत्त्व समान आहे हें त्यांनी ओळखलें. ईश्वरनिष्ठा व ब्रह्मचर्य हीं दोन्हीं सत्त्वें स्त्री-पुरुषत्वातीत आहेत.

१९५२,

•

माझी मनू माझ्या पोटची पोर आहे ही वस्तु स्वयंसिद्ध व अबाधित आहे, हे मला कळत कां नाही, मुली? पण मधून माझ्या मनूच्या पवित्र, सुंदर देव्हाऱ्यात त्या 'विमलाताई' येऊन ठाण देऊन वसतात. त्यांचा दिमाख काही विचारू नकोस. त्यांना दादाचाहि संकोच वाटतो! त्या दादाला तसदी द्यायला कचरतात! त्यांचा खाक्या काही औरच! त्यांची बाधा माझ्या गरिबाच्या मुलीला होऊ नये म्हणून एकाद्या पंचाक्षऱ्याच्या भाविकतेने मी 'मनू माझ्या पोटची पोर आहे' हा मंत्र उच्चारून वातावरण भारून टाकतो.

धनतोली. नागपुर
६-१-'५२

•

लल्लू काल रिक्षेतून स्टेशनपर्यंत आलाच. तो अगदी अट्टाहासाने आपली गोड सोबत मला देत असतो. लल्लू जें करतो, तेंच मनूनें करावें ही माझी अपेक्षा. म्हणून मनूने मोठी होऊ नये असें मी म्हणत असतो. कृष्ण राजदूत झाला, पुढे राजाहि झाला. पण, कृष्ण मोठा झाला असा भास आपल्याला होत नाही. बाळकृष्णाचें तें दिव्य 'बालपण' तुला लाभलें आहे.

तू अमळनेरला वेड लावून आल्याची हकीकत मी मिटक्या मारीत भय्याजी काकड्यांना सांगितली. त्यांची तेथे सासुरवाडी आहे. म्हणाले, "आमची ताई आमच्या सासुरवाडीला कशी गेली नाही? तुम्ही तिला कां सांगितलें नाही?" मग तुझी स्तुति गाऊ लागले. म्हणाले, 'हे जे दोनशे बत्तीस लोक आता असेंब्लीत जात आहेत, त्यांत एक ही मुलगीहि असती,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तर एकीकडे दोनशे एकतीस आणि एकीकडे आमची ताई शोभली असती !' कोणाचें हृदय फुललें असेल, सांग पाहू ?

वर्धा.
७.१.'५२.

●

माझीं पत्रें तुझ्याकरिता असतात. इतरांना त्यांचा संदर्भ व पृष्ठभूमि माहीत नसते. त्या पत्रातील भावना, विचार व मूल्यें तुझ्या व्यक्तित्वात मिसळलीं म्हणजे तीं अधिक शुचिसुंदर स्वरूपात प्रकट होतील. ज्यांचा तुझ्याशी परिचय नाही त्यांना निसर्गतः पूर्णपणें वैगुण्यरहित स्त्री सर्वस्वी कामवासनारहित राहू शकते हेंच पटत नाही. पटलें तर विश्वास वसत नाही. चिरपरिचित पुरुषांपैकी कित्येक तुझ्याशी लग्न करण्याची आकांक्षाहि धरतात. त्यांना तुझ्या स्थितीचें आकलन होत नाही. म्हणून मी तुझ्यापुरतें आणि तुझ्याकरिताच जें लिहितो त्याचा वास्तविक बोध इतरांना होणें कठिण आहे. त्यामुळे अगदी वैयक्तिक भाग इतका पवित्र आहे की तो प्रकाशित करणें गौण वाटतें.

वर्धा.
२८. ३.'५२

●

सोने, तूच सांग, तुझा 'विरक्तीचा सूर' मला कां खुपू नये. तुझी स्नेहवृत्ति भक्तीने विशुद्ध झालेली आहे. तुझा पिंडच भक्तीचा आहे. अर्थात् मी तुझें हृदय माझ्या हृदयापेक्षा अधिक शाबूत व भक्कम मानलें आहे. कर्मयोगी व ज्ञानयोगी ब्रह्मनिष्ठ होऊ शकेल, पण त्याचें हृदय भक्ति-सुधारसाने ओथंबलेलें नसलें तर त्याला देवाचें वेड नाही लागणार. तुझी भूमिका भक्ताची आहे. ज्ञानातहि भक्तीचें माधुर्य राहील. तुझ्या व्यक्तित्वाचें मी जें निदान केलें तें हें असें आहे. अकोल्याला जो हादरा बसला त्याचा परिणाम होऊ नये अशी भलती अपेक्षा मी केली नाही. पण हादरा बसणें हें संपन्न हृदयाचें लक्षण आहे. ज्याचें हृदय कोमल नसेल तो बत्थड होईल.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संपन्न हृदयाचें मुख्य सत्त्व स्नेह आहे. तें सत्त्व तू केव्हाहि गमावणार नाहीस ही माझी खात्री आहे. माझें भाकीत आहे हें.

रांची.
३०.७.'५२.

●

इवलीशी वनमाला भेटली. ती दीड दोन वर्षांची असतांना सतत माझ्यावरोबर राहत असे. त्यानंतर तू आलीस. मी तुझ्या वालवृत्तीनें भारला गेलो. तुझ्या रूपयौवनाची अगर प्रतिभेची छाप नाही माझ्यावर पडली. तुझें अनुपम व निरागस वृत्तिवैभव आणि सहज ब्रह्मचर्य यांच्यामुळे मी पहिल्याच भेटीला तुझा वाप झालो. तीं मूल्यें कायम रहावींत हीच माझी धडपड आहे. पोरटे, प्रौढपणाच्या आहारीं जाऊ नकोस. संभाळ.

धनतोली, नागपुर
७.८.'५२.

●

माझ्या सहवासात तुझी सारी खळवळ व चिंता नाहीशी होते याचा मला प्रत्यय आहे म्हणूनच मलाहि तुझ्या भेटीची तळमळ लागते. सोनू, ही आसक्ति नाही ग ! अध्यात्म मला कळत नाही. पण माझें प्रेम पार्थिव किंवा भौतिक नाही इतकें मला कळतें. त्यामुळेच मला त्यात संकोच कधीच वाटला नाही. वेटा, पंढरपुरला येऊन गेल्यामुळे माझें भांडेहि अमृताने भरलें गेलें. तू न वोलताच सारे काही वोललीस. त्या चिमुकल्या शवरीला तू म्हणालीस ना की तिचे डोळे वोलके आहेत म्हणून ! माझ्या मुलीचे कमी का वोलके आहेत ?

कारंजे (लाड)
३.१०.'५२.

●

वेटा,

पहाटे व्राह्ममुहूर्तावर प्रार्थनेनंतर हें लिहायला वसलो आहे. ईश्वर स्मरणपूर्वकच तुला लिहीत असतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुझ्या ठिकाणीं जी जन्मसिद्ध ईश्वरनिष्ठा आहे, तिचीं बीजें या देशाच्या कणाकणांत पेरण्याचें हें अनुष्ठान विनोबांनी सुरू केलें आहे. माझे मनू, या वेळीं सगळा जीव एकवटून त्याचा धावा कर, एकांतात कर, लोकांतात कर, भजनांनी कर, भाषणांनी कर. या देशातील माणसाच्या अंत:करणातील देवाला साद घालून जागा कर. तुझी ईश्वरप्रार्थना आणि लोकांच्या हृदयात देवाचें आवाहन या दोन भिन्न साधना नाहीत. अगदी एकरूपच आहेत. अहं ब्रह्मास्मि. सर्वं खल्विदं ब्रह्म. प्रार्थना करशीलच. भजन सोडू नकोस. भाषणहि भजनाप्रमाणेच कर.

तुझें ब्रह्मचर्यहि स्वभावसिद्धच आहे. आपल्या सामाजिक जीवनात त्याचीहि व्यवस्थित पेरणी तू कर. तरुण मुलगी जर जन्मत:च ब्रह्मचर्यनिष्ठ असली तर तिचा अधिकार व योग्यता तरुण पुरुषापेक्षा किती तरी पटीने थोर असतो. आर्थिक जीवनात अस्तेय व अपरिग्रह या पारमार्थिक मूल्यांचा आविष्कार करण्याकरिता विनोबांनी कंकण वांधलें. सामाजिक जीवनात ब्रह्मचर्याचें दैवीमूल्य रुजविण्यास तुझ्या प्रांजळ, निर्भय व निर्मल जीवनाचा उपयोग होवो.

धनतोली, नागपुर.
११.१२.'५२.

यापूर्वी मी मोठ्या दिमाखाने तुझा 'बाप' म्हणवून घेत असें. 'आई' होण्याची माझी तयारी झाली नव्हती. या पाळीला मात्र अगदी अंत:प्रेरणेने, "या मुलीची आईहि मीच आणि बापहि मीच," असे उद्गार सहजगत्या माझ्या तोंडून बाहेर पडले. शिवलीलामृतात वाक्य आहे, "प्रत्यय सदृश बोलावें वचन। नातरी अंगास येते मूर्खपण"।। माझ्या तोंडून निघालेलें वाक्य प्रत्यय-जन्यच होतें.

नागपुर.
१२.१२.'५२.

तू म्हणत्येस की तुला स्त्री-पुरुषभेद भावनेची बाधा कधी झालेलीच नाही. पुरुषांपैकी वडील माणसें बाप वाटलीं, बरोबरीची भाऊ वाटलीं आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

थाकटीं धाकटे भाऊ किंवा मुलांप्रमाणे वाटलीं. त्यांत प्रयत्नाचा मुळीच भाग नव्हता. मनू, स्वाभाविक ब्रह्मचर्य तें हेंच. याच ब्रह्मचर्याला मी तुझ्या व्यक्तित्वाचें सत्त्व म्हणतो. इतर कुठल्याहि मुलीच्या ठिकाणीं मी तें पाहिलेलें नाही. म्हणूनच तू माझ्या साधनेचें आलंबन बनू शकलीस. माझी स्वायत्त कन्या व माताहि झालीस. जोंपर्यंत हा दिव्य गुण तुझ्या पदरीं आहे तोंपर्यंत तुला कशाचीहि तमा बाळगण्याचें कारण नाही. अगदी सुनीतिमंतांनी निंदा केली तरी चालेल. त्यांना प्रणाम करावा, पण आपलें सत्त्व राखावें. हें सत्त्व अखंड असतें आणि एकरस असतें. त्यांत जीवन प्रार्थना व कर्मयोग एकरूप होऊन जातात. Man thinks, invents, loves, suffers, admires and prays with the brain and all his organs. जीवन प्रार्थनामय बनतें. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्ममय आणि ब्रह्मार्पण जीवनच ना ?
खरसोली.
१९.१२.'५२.

●

पू. विनोबांची मुलाखत सर्व सेवा संघाने किंवा मी ठरविली नाही. विहारच्या संयोजकांनीच ठरविली. त्यांना ती आवश्यक वाटली. मला कळलें तेव्हा मी संमति दिली. कारण उघड आहे. गयेला 'परीक्षा पर्वा'चा आरंभ झाला. तुला कार्यसंगठन व कार्यसंचालन कळतें. विनोबा, जयप्रकाश-बाबू व तू या तीन व्यक्ति एकाच सदरात मोडतात. जमीन मिळविणें, कार्याची स्फूर्ति जागृत करणें व हृदयपरिवर्तनाचें वातावरण निर्माण करणें या तीन गोष्टी फक्त तुम्ही तीन माणसेंच करता, विनोबांच्या कसोटीच्या वेळीं तुझी व त्यांची गांठ पडून त्यांनी प्रत्यक्ष सूचना तुला कराव्या असें मला वाटतें. त्यांच्या प्रतिज्ञापूर्तीच्या दृष्टीने तुला जें वाटतें तें मोकळेपणाने सांगण्याची वेळ आता आली आहे. म्हणून विहारच्या मंडळींना हें सुचलें. यात मी कालाचा संकेत पाहतो. भूदान कार्याला माझी ज्या वेळीं उपयुक्तता होती, तें पर्व आता संपलें. त्याचमुळे माझें शरीरहि जाव देऊ लागलें. विनोबांची व तुझी भेट होण्याची चळवळीच्या दृष्टीने हीच वेळ आहे.
धनतोली, नागपुर.
१५.२.'५४.

●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवाच्या पत्रात तू 'दादांची मनू' अशी सही करून मला गौरविलेंस. त्या आनंदाची मस्ती अद्याप कायम आहे. त्या मस्तीतच हें पत्र सुरू केलें आहे.

उद्या तुझा वाढदिवस. उद्याच श्रीरामाचीहि जयंती. योगायोग खरा. पण त्यात आशय नाही असें कोण म्हणेल ? रामाच्या अवताराला कारण होतें. मनूच्या जीवनातहि प्रयोजन आहे. रामाला रामराज्य स्थापायचें होतें, सगळें चराचर 'राममय' वनवायचें होतें. पृथ्वी सारी रामाच्या सत्तेने भारून टाकायची होती. राम हाच 'आत्माराम' आहे. राम हाच 'लोकाभिराम' आहे. राजारामच 'पतितपावन'हि आहे. राम हाच 'आत्मा' आणि राम हाच 'लोकात्मा' ही भावना फक्त रामावद्दलच आहे. भारताच्या मातीच्या रज:कणांत व वातावरणाच्या अणुरेणूंत रामाची सत्ता सर्वत्र व्यापून उरलेली आहे. रामाचें व रामनामाचें वैशिष्टय अनन्य आहे. लोकाभिरामाचा साक्षात्कार करून घेण्याचें अनुष्ठान हल्ली मनूने आरंभिलेलें आहे, त्यात ती तल्लीन झालेली आहे. त्या उत्कट भावनेमुळे वातावरण भारलें जातें. म्हणून या योगायोगाचा न कळत लाभ मिळाला असें मी म्हणतो. रामजन्माच्या दिवशीं मनूहि आली.

मनू, त्या रामराज्याचें निरूपण आणि संकीर्तन तू आपल्या संपूर्ण जीवनाने या वेळीं करीत आहेस. 'रामनामाची जादू' तुझ्या निष्ठासंपन्न व्यक्तित्वातून लोकांच्या प्रत्ययाला येत आहे. धीरेनभाई म्हणाले, 'आमच्या मुलांमध्ये विमल अद्वितीय आहे. ती स्फूर्ति देते. ती तरुण माणसें मिळविते. ती 'होनहार' आहे. तिच्यात आहे तें आमच्यात नाही. आमच्या सर्वोदय समाजाची प्राणज्योति तिची बुद्धि व तिचें हृदय धारण करील. ती आमची 'आशारेखा' आहे. वल्लभस्वामी म्हणाले, "विनोबा म्हणाले की सर्वोदयाच्या विचाराची ज्योत कोण धारण करील ? तेव्हा मीं विमलताईंचें नांव घेतलें. त्यांना तें पटलें."

सियालदा एक्स्प्रेस.
१४.४.'५४.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

क्रांतीला फक्त बुद्धीची खात्री पटवून देणें पुरेसें नाही. हृदय पेटलें पाहिजे. बुद्धीचें समाधान करून हृदयें पेटविण्याची जादू तुझ्या वक्तृत्वात आहे. क्रांतीला विचार जसा हवा तशी अंतःकरणाची तळमळ हवी. ते दोन्ही गुण तुझ्यात आहेत. व्यक्तित्वाचें उपादान जितकें शुद्ध व तेजस्वी, तितकी शब्दात जादू. दररोज रामनामाचा लक्ष जप करणारांपेक्षा वाल्याच्या व्यक्तित्वाचें द्रव्यच श्रेष्ठ. उलटें नांव घेऊन तो आद्यकवि झाला. आधी काव्य, नंतर रामलीला. तुमची जातच काही निराळी.

तू राजकोटला पावणेदोन तास बोललीस. तो 'अविवेक' किंवा 'ताळ सोडणें' नव्हे. तें तादात्म्य आहे. ते 'टाळी लागणें' आहे. ज्ञानदेव निरूपण करू लागले म्हणजे स्वतःला विसरतात. बऱ्याच वेळाने श्रोत्यांची क्षमा मागतात श्रोते म्हणतात, वेळ जात होता, हें आम्हाला कोठे माहीत होतें ? अशा वेळीं काळाला स्वतःचा विसर पडतो. वेळ हरवून जातो. असें हृदय विरघळलें म्हणजे इतरांचें हृदयपरिवर्तन होतें. तेव्हा, त्याच्या वाटेला जाऊ नकोस, बेटा.

आगगाडी.
१.७.'५४.

विनोबांची उत्तराधिकारी तू नाहीस तर आणखी कोण ? 'ब्रह्मचर्येणर्षिभ्यः।' ऋषींचा उत्तराधिकार ब्रह्मचाऱ्यांनाच प्राप्त होतो. 'सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग् ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम्'। दुसरे उत्तराधिकारी जे. पी. 'वेदांत-विज्ञान सुनिश्चितार्थाः संन्यास योगाद् यतयः शुद्धसत्त्वाः' असा त्यांचा अधिकार. तिसरे धीरेनदा. 'यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेववीर्यवत्तरं भवति' ही त्यांची कोटि.

पाटणा.
२०. ८. '५४.

नित्याप्रमाणे 'स्वान्तःसुखाय' तुला पत्र लिहायला बसलो आहे. तू लांब आहेस. तुला पत्र लिहिण्यात विरंगुळाहि आहे आणि संजीवनहि आहे. ज्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

क्रियेत विरंगुळा व संजीवन यांचा समन्वय होतो ती बहुतेक नैतिक होऊन जाते. तेथे पावित्र्य आणि आनंद यांचा संगम होतो.

आज सकाळीं गणपतिशंकरांचा फोन आला. म्हणाले, "१९४२ नंतर एवढी सभा झालीच नाही. विमलाताईंनी मुंबईला वेड लावलें. मुंबईकर त्यांना सोडायला तयार नाहीत. त्यांच्यामुळे मला नवीन हुरूप व उमेद वाटू लागली. आम्ही धन्य झालो." बेटा, तुझ्याबाबतीत माझा प्रत्यय किती तंतोतंत खरा ठरला, पहा बरें. फुलाला स्वत:च्या परिमलाचें भान नसतें म्हणूनच त्याला दर्प राहत नाही. तू म्हणत्येस की तुझ्याजवळ "फक्त शुद्ध हृदय आणि असीम ईश्वरनिष्ठा आहे, त्यातून मानव निष्ठेचा हळूहळू विकास होत आहे नि मानवप्रेमाचा सौरभ दरवळू लागला आहे." हें 'फक्त' च झालें काय ? एक इसम दुसऱ्याला म्हणाला, "तुमच्याजवळ उंचीं वस्त्रें आहेत, उटणीं व चंदन आहे. तुमचें वैभव अपार आहे. माझ्याजवळ फक्त प्राण आहे आणि आत्मा आहे. तुमचें स्मशान माझ्या घरट्यापेक्षा पुष्कळच विशाल नि मातबर आहे." त्याला काय म्हणावें ? तू बाजारपेठेत सोन्या-ऐवजी परीस नेऊन मांडलास; माझ्या मनूराजा !

ईश्वरनिष्ठा आणि ब्रह्मचर्य यांच्या पोटींच मानवनिष्ठा निपजत असते. स्त्रीच्या ठिकाणीं ब्रह्मचर्याचा परिपाक मातृत्वात होत असतो. असें तू मला अनेकवार सांगत आली आहेस. या बाबतीत तुझा व माझा मतभेद असल्याचाहि तुझा गैरसमज आहे. स्त्रीच्या ब्रह्मचर्यातहि तिचें वैशिष्ट्य व्यक्त होईल. हें मला मान्यच आहे. पण ब्रह्मचर्याचा वास्तविक अर्थ स्त्री-पुरुषातीत मानव्य असा आहे. पुरुषाच्या ठिकाणीं मातृत्व अभिव्यक्त होऊ लागेल आणि स्त्रीचें मातृत्व पितृत्वाच्या लक्षणांनी संपन्न होऊ लागेल. तुझ्या ईश्वर निष्ठेतून निष्पन्न झालेल्या मानव-निष्ठेने तुझें मानवप्रेम क्षितिजा-एवढें होईल. ती अस्मानाच्या अनंत पोकळीत मात्र तरंगत राहणार नाही. तिला जमिनीवर आधार लागेल. त्या दृष्टीने तुझ्या पदयात्रेत फार गहन आशय असू शकेल. पण व्यापक मानवप्रेम म्हणजे शून्याचा बाजार नव्हे. सगुण-रूपाचेंच ध्यान निर्गुण, निराकाराच्या निरुपाधिक समाधीत परिणत होतें. पण तो निर्गुण, निराकारदेखील भावरूप आहे. ब्रह्मरूप आहे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विश्वरूप आहे. विशिष्टाचा निषेध म्हणजे व्यापकाची आराधना नव्हे. जें तुझें मानवप्रेम दरवळू लागलें आहे त्याचा सुगंध कुटुंबात व व्यक्तींच्या हृदयातहि दरवळला पाहिजे.

पाटणा.
५.१०.'५४.

आता रात्रीं ध्वजाचाचा आले. त्यांना तुझ्या कार्यक्रमांचीं 'रसभरित वर्णनें' सांगू लागलो. म्हणाले, "मलाहि तिचें मुंबईहून पत्र आलें. मोठी ऐटीत वर्णनें आहेत. विमलने तर दिग्विजय केला !" स्त्रीने वैचारिक दिग्विजय केल्याचें हें इतिहासातील पहिलेंच नसलें तरी अनुपम उदाहरण नाही का ? ब्लेवेटस्की, बेझंट यांचीं नांवें डोळ्यापुढे येतात. पण येथे पंथ नाही, ग्रंथ नाही, संप्रदाय नाही, मानवमात्राकरिता निरुपाधिक विश्वकुटुंबदीक्षेचा दिव्य मंत्र आहे. हा 'दिग्विजय' सर्वांना विजयी करणारा आहे. सर्व दिशांना व्यापणारा आणि सर्वांचा विजय म्हणूनच सर्वोदयी विश्वविजय ! तेथे पराजय कोणाचाच नाही.

पाटणा.
१०. १०.'५४.

माझ्या सान्निध्यात तुझा 'संयम कापरावाणी उडून जातो व साक्षित्व लपंडाव खेळतें' असा माझा प्रत्यय असता तर मी केव्हाच तुझ्या मार्गात उभा राहिलो नसतो, एवढा विश्वास तुलाहि वाटेल. पण या बाबतीत माझें निदान अगदी उलट आहे. माझ्याजवळ तुझा अभिमान आपल्या नैसर्गिक अवस्थेत असतो. त्याला संयमाची जाणीव व गरज नसते. साक्षित्वा-विषयीं जागृत रहावें लागत नाही. माझ्याजवळ उफाळतो तो अहंकार नव्हे. अहंकार असता तर विनयाची अपेक्षा राहिली असती. फक्त समाधि स्थितीत अगर तुरीयावस्था खेरीज करून जागृति, सुषुप्ति व स्वप्न या तिन्ही अवस्थांत जो शरीरावरील सामान्य अवस्थेत असतो, तो इतरांपुढे विनयानें अलंकृत व आवृत होतो. माझ्याजवळ तो प्रकट होतो. देवाजवळ आपलें सारें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मूळ स्वरूप प्रकट होतें ना ? त्याच्यावर रागावण्याचा आपण आपला हक्क मानतो. मी माझी तुलना देवाशी करीत नाही. जेथें आपुलकी असते तेथें सहजता प्रकट होते इतकेंच मी म्हणतो. ताईजवळ तुला विनय व संयम आठवतो का ? लहान मुलाला त्याची गरज वाटेल का ? रुसवा, हुज्जत, सलगी, बालवृत्तीला स्वाभाविक आहेत. लल्ला-मुन्नी मला 'कारे दादा ! तू' म्हणतात. तो अहंकार नव्हे. विश्रब्धतेमुळे सावधपणा नसतो. तो साक्षित्वाचा अभाव नव्हे. उलट ती देवळातल्या मनोवृत्तीसारखी मनोवृत्ति आहे. आसामात शिवरात्रीला मी तुला म्हणालो होतो, "माझ्या कुशीत शिवालय समजून ये." माझे मनू, तो माझा अहंकार नव्हता. भावनेतील पावित्र्य बोलत होतें. विनयाचें भान हरपल्यावरच खऱ्या नम्रतेला सुरवात होते. माझ्याजवळ तुझी जी सपशेल निरागसता असते तिच्या पोटींच अवखळपणा उत्पन्न होतो.

तो अहंकार आहे असा तुझा प्रत्यय असला तर ज्या परिस्थितीत तो उफाळत असेल तेथेंच त्याचा निरास करावा लागेल. परिस्थितीपासून लांब राहिल्याने त्याला प्रकट होण्यास संधि मिळणार नाही. पण तेवढ्याने संयम अगर साक्षित्व साधत नाही. हें तुझ्या प्रत्ययाच्या आधारें लिहीत आहे. माझा प्रत्यय व निदान वर आलेंच आहे. तू विचार कर.

या खोल्यांना तुझ्यावांचून आबादी नाही, शोभा नाही. रुक्ष व निर्जीव वाटतात. अवकळाच दिसते. तुझ्या खोल्या या कल्पनेने मला त्यात रहावेंसें वाटतें. बरें वाटतें. एरव्ही आता 'हेडक्वार्टर्स' मनूबरोबर. धड कोठेहि असले तरी चित्त तेथें. × × माझ्याजवळ राहील किंवा राहणारहि नाही मी रुकार दिला. पण मनातून तटस्थ आहे. बेबी, तारा, दर्यापुरच्या कमलाकाकू (कोल्हापूरला होत्या त्या) सगळ्यांनीच आमंत्रणें लावून ठेवलीं आहेत. मी नको म्हटलें नाही. पण मला उत्साह नाही. मला माझा मन्या हवा. स्नेह व्यापक होतो. पण 'व्यापक' म्हणजे वाऱ्यात विलीन होणें नव्हे. कुणावर तरी स्नेह असतो म्हणून त्याची गोडी सर्वत्र पसरू शकते. 'सर्वांवर सारखें' याचा अर्थ कुणावरच खरें नाही, असा होऊन बसतो. 'सर्वधर्म समभावा' प्रमाणे. म्हणून मला मनूमुळेच जग प्रिय होतें. "अहं ब्रह्मास्मि,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तत्त्वमसि, सर्वं खल्विदं ब्रह्म" माझ्या मनूवर माझें स्वतःपेक्षाहि जास्त प्रेम असल्यामुळे आणि म्हणूनच तें निरपेक्ष होऊ शकल्यामुळे, त्याने मला आपले दोष व विकार धुऊन काढता आले. मी माझ्या कार्यात व साधनेत कितीहि मग्न असलो तरी मनूकडे लक्ष राहील. कारण स्नेह व साधना यांचा अभेदच आहे.

पाटणा.
१२.१०.'५४.

●

आजचा दिवस खरोखरच सोन्याचा ठरला, नव्हे 'मन्याचा' ठरला! पाटण्याहून निघण्यापूर्वी माझ्या मनूचें ११-१० चें पत्र पावलें. आता खादीग्रामला नव्या स्फूर्तीने जाईन. मनू, अलम् दुनिया म्हणते की या देशात मनूसारखी मुलगी नाही, स्त्री नाही! मनू अद्वितीय आहे, अप्रतिम आहे. महादेवीताई म्हणतात, तिने स्त्रीजातीचा माथा उजळ केला. मी म्हणतो मानव्य समृद्ध केलें! बेटा, तू खरोखर माझा बहिश्चर प्राण आहेस! पण, तो माझा एकलव्य नव्हे! अर्जुन उद्धवहि नव्हे. माझ्या पोटचा गोळा आहे. तो माझ्या कुशीतच आहे. मी त्याला झांकू शकत नाही. येथे पात्रापात्राचा विचारच संपतो, 'जवळ राहून उपयोगी पडण्याला' माझा राजा का सामान्य अपत्य आहे? माझी ती आकांक्षा नाही. मनू आता शुकाचार्य झाली, पण मी बादरायण नाहीच बनणार! मनू त्रिभुवन व्यापील तरी माझ्या पोटात मावेल! मनूच्या कार्यात व माझ्या कार्यात भेद कोठे आहे? ती माझी आत्मजा आहे. स्वायत्त आई-बापाच्या स्नेहाचें सामर्थ्य ज्याने अनुभविलें आहे त्याला माझा हा प्रत्यय नम्रतापूर्ण व वास्तविक वाटेल. मनू, तू माझी सारी काळजी सोडून दे. 'रसोह्येवायं लब्ध्वा'च्या मस्तीत रहा! माझा आशीर्वाद आहे.

सौ० अक्का व ती० स्व० बापूंचे ते बोल म्हणजे उपनिषद् आहे. 'एषावेदोपनिषत्,' 'एतदनुशासनम्' 'नातःपरमस्ति'!

पाटणा.
१४.१०.'५४.

●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मनू, आता तुझी जी प्रभा फांकली आहे ती निर्भेळ व निरपवाद आहे. त्यात कांचनाची कांति नाही; सत्तेचा लखलखाट नाही. पार्लमेंटमध्ये गेली असतीस, मंत्री, राजदूत झाली असतीस तर ती प्रभा थोडीफार उसनी वाटली असती. आता निरपेक्ष कांति आहे, प्रतिप्रकाश नाही. मनू माझी !

पाटणा.
१९.१०.'५४.

•

तुझ्या यात्रेची अव्यवस्था पाहून राहून राहून असें वाटतें की मी निघून आलो नाही हा गुन्हा केला. आलोच असतो तर मनूचें मन प्रसन्न झालेंच असतें. माझ्या मनूकरिता दादाचें सान्निध्य या बाबतीत तरी 'राम बाण' आहे. देवावर रागावणें म्हणजेच आपल्या माणसावर रागावणें. देव अनंत देह धारण करून येतो. "यो यो यां यां तनूं भक्तः" असा त्याचा बाणा आहे. माझ्यावर राग खुशाल काढत जा. एरवी तो निघणारच नाही. देव आकाशात राहतो. पण, पोकळीत नाही राहत. भुताला जसें 'झाड' लागते, तसा देवालाहि विग्रहाचा आधार लागतो. "मनू दादाचा बहिश्चर प्राण आहे," हें ध्रुव सत्य आहे. माझ्या साधनेचें तें फळ आहे. माझ्या वात्सल्याचा तो परिपाक आहे. तसें आहे म्हणूनच मी विचार-मीमांसा निर्भीडपणें करतो. इतर ठिकाणीं स्तब्ध राहतो. माझे विचार म्हणजे माझें दूध. त्यातील तुरटपणा माझ्या स्वभावातील आहे. तो माझ्या पोटच्या गोळ्याला कसा बाधेल ?

पाटणा.
५. ११.'५४.

•

स्नेह व्यक्तित्वात मुरला म्हणजे त्याला निराळ्या अभिव्यक्तीची गरजच उरत नाही. त्याचें अस्तित्व आणि त्याची अभिव्यक्ति एकच होऊन जातात. प्रेम हें अमृत आहे हें तुझें म्हणणें त्रिवार सत्य आहे. पण दादाचें प्रेम अमृत आहे, दादाचें प्रेम गुळासारखें गोड आहे आणि मनू मात्र कावळ्यासारखी किंवा गाढवासारखी आहे हें म्हणणें साफ चुकीचे आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मनूहि दादाच नाही का ? दादाच्या स्नेहाचा झरा त्याच्या हृदयाचा शाश्वत उमाळा, मनूच नाही का ? दादाच्या स्नेहाने मनू वाया गेली असें मनूला वाटलें तरी वस्तुस्थिति तशी नाही. कारण, स्नेहात तसा काहीच दोष नसतो. स्नेहाला 'दादाचा' हें विशेषण लागल्यामुळे दादाच्या व्यक्तित्वाचा संसर्ग त्याला जडतो. तरी पण त्याची भावना निर्भेळ. म्हणून स्नेह दूषित होत नाही.

माझ्यासाठी मनूच्या बाजूने अभिव्यक्तीची गरज उरली नाही. कारण, मनूच्या सान्निध्यात तिच्या स्नेहाच्या स्निग्धतेचा प्रत्यय मला सतत येतो. 'मागणें लई नाहीं ?'

माझ्याजवळ राहणाऱ्या माणसाचा विकास होणार नाही हें मी अनुभवाच्या आधाराने म्हणतो. माझ्या मदतीकरिता जो माणूस माझ्याजवळ राहील त्यात माझ्या व त्याच्या संबंधाचा आधार स्नेह नसून 'वैयक्तिक सेवा' हा राहील. त्यामुळे सेवेने त्याची जी उन्नति व्हायची ती कदाचित् होईल. पण मूळ हेतु सहवासाचा किंवा स्नेहाचा नसल्यामुळे व्यक्तित्वाचा खरा उत्कर्ष साधणार नाही. माझी मनू माझ्या पोटचा गोळा आहे. ती काही माझी मदतनीस किंवा सहकारी नव्हे. तिने माझें काडी इतकेंहि काम केलें नाही तरी ती माझ्या कुशीत आहेच.

मुंबई.
६.२.'५७.

'मला एकटें एकटें वाटतें, कोणाशी समरसता वाटत नाही,' तू या पाळीला पुन्हा म्हणाली होतीस. तुझें असमाधान बावगें कसें नाही याचें स्पष्टीकरण मी भीमताललला जिव्हाळ्याने केलें. मी सारखा त्या गोष्टीचा विचारच करीत होतो. जैनेंद्रांनी तुला माझें 'अपत्य' न म्हणता 'बेटा', 'पुत्र' म्हटलें. मागे जाहीर सभेत अबूला गोकुळभाईंनीहि असेंच उद्गार काढलें होतें. 'पुत्र' आणि 'कन्या' ही जाणीवच तुझ्या बाबतीत मला शिवत नाही. तुझ्या बालवृत्तीचा हा महिमा आहे. बालवृत्ति, जन्म-सिद्ध ब्रह्मचर्य व अंतः-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रेरणेवर अबाधित आणि अढळ निष्ठा, हीं तुझ्या व्यक्तित्वातील वैशिष्टचें आहेत. यांनाच मी तुझें 'सत्त्व' म्हणतो. त्यात यत्किंचितहि न्यूनता आली नाही असा निर्वाळा मी तुला काशीला दिला! म्हणून तुझ्या चित्ताला वाटत असलेलें असमाधान प्रगतीच्याच मार्गावरील एक टप्पा आहे असें तू बिनदिक्कत समज. ही धाप लागत असली तरी नाडी साफ आहे, हृदयक्रिया निकोप आहे. माझ्या कुशीतून झालेल्या अपत्याची प्रकृति मला इतपत कळते.

आगगाडी
१४.७.'५८.

मुली, तुला भलतीच भ्रांत आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा प्रत्यय यावा लागत नाही. त्याचें सहज व नित्य स्फुरण अखंड असतें. तुझ्या जिव्हाळ्याचें व कळकळीचें मला तसेंच सतत, स्वाभाविक व प्रत्यक्ष स्फुरण असतें. बेटा, तुमचें प्रेम, विश्वास व कळकळ हीं सगळीं मजविषयींच्या तुमच्या अनन्य आपुलकीत मिसळून गेलीं आहेत. तें रसायन मला पुष्टि देतें तुष्टि देतें आणि शांतिहि देतें! आहेस कोठे पोरी!

धनतोली, नागपुर
९.४.'५९.

बेटा, तुझें जीवन उत्तरोत्तर अधिकाधिक स्वायत्त व्हावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. 'मी तुझी आई व बाप दोन्ही आहे,' हा फक्त शब्दालंकार नव्हे तो माझा खराखुरा प्रत्यय आहे. तुझ्या सुखदुःखाचें, मानापमानाचें यशापयशाचें पडसाद माझ्या चित्तावर अगदी स्वाभाविकपणें उमटतात. 'आत्मा ह्याच पुत्र' हा प्रत्यय तुझ्याबाबतीत सारखा वाढत आहे. माझ्या 'तनुजांच्या' बाबतीत तसा प्रत्यय नव्हता आणि नाहीहि. 'रक्ताची ओढ' त्यांच्या बाबतीत आहे. ती नैसर्गिक आहे आणि जाणूनबुजूनहि आहे. पण तुझ्या बाबतीत वात्सल्य हें 'तादात्म्यात' परिणत झालें आहे. त्यामुळे तुझें व्यक्तित्व विशिष्ट व स्वतंत्र असावें अशी माझी इच्छा व भावना असली तरी तुझ्या जीवनात घडणाऱ्या घटनांची माझ्या मनावर जी प्रतिक्रिया होते, ती मात्र तादात्म्यमूलकच असते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी तुझा आई-बाप आहे. पण तुझा प्रतिपालक, कैवारी किंवा आधार होण्याची दुष्ट वासना मनाला कधीहि शिवली नाही. माझ्या वात्सल्यात उत्कट आत्मीयता आहे. पण 'व्यक्तिप्रामाण्य' किंवा प्रभुत्व यांचा लेशहि नाही. 'आज्ञाधारकपणा' किंवा 'पितृप्रामाण्य' या भावना मला दोषपूर्ण वाटल्या. म्हणून मी माता-पिता-मित्र अशीच भूमिका अंगीकारिली. माझा आधार तुला वाटता कामा नये. मी तुझें घरटें आहे, निवारा आहे, विसाव्याचें ठिकाण आहे; पण 'आश्रय' नव्हे. "दादाची आपल्या व्यावहारिक जीवनात काडी इतकीहि गरज नाही. तो असला काय आणि नसला काय सारखेच" असें तुला ज्या क्षणीं वाटू लागेल तो क्षण भाग्याचा ! त्या क्षणीं माझ्या कुशीत तुझें घरटें राहील. पण तें स्वायत्त जीवनाच्या अधिकारी समर्थ मनूचें ! बेटा, माझी काय बिशाद आहे 'आश्रय स्थान' बनण्याची ! त्यात माझ्या अपत्यांच्या सामर्थ्याचा उपमर्द आहे. दादाला अपेक्षा व आकांक्षा केवळ प्रेमाची आहे! तुझें जीवन ज्या मानाने स्वायत्त होत जाईल त्या मानाने दादाची व्यावहारिक गरज तुला कमी कमी वाटू लागेल. तसें होणें सर्वथा इष्ट आहे. पण त्याबरोबरच दादाची पात्रता वाढेल. तुझें 'घरकुल' आणि तुझें 'घरटें' दोन्ही त्याच्या कुशीत राहतील. तेथे आराम आणि खेळ दोन्हींची सोय राहील; पण परावलंबन आणि अभिभावकत्व यांचा मागमूसहि राहणार नाही.

तुझी सहजप्रेरणा आणि इतरांचा विवेकजन्य निर्णय यांच्यात अंतर राहू नये ही माझी आकांक्षा. तुझ्या हृदयाची सहजस्फूर्त ऊर्मि आणि तुझ्या बुद्धीचा विवेकयुक्त कौल, यांच्यात अभेद स्थापन होईल तो दिवस धन्य ठरेल! सहजस्फूर्ति आणि विवेक हीं दोन्हीं एकरूप होतील. मी तुझ्याशी जें बोलतो तें याच दृष्टीने. मला तुझें व्यक्तित्व अनेक बाबतीत माझ्यापेक्षा सरस वाटतें, मी विरुद्ध बाजूची वकिली नाही करीत. सहज प्रेरणेला विवेकाचें अनुपान जोडू इच्छितो. विवेक म्हणजेच दुसऱ्या बाजूचा विचार. त्याने सहजस्फूर्तीचा आशय उदात्त होतो, तिचें तेज फांकतें. भावनेचा गाभारा बुद्धीच्या नीरांजनाने प्रकाशित होतो.

याच भावनेने मी तुझ्या जीवनाकडे पाहतो. अवलोकन, निरीक्षण, अध्ययन, माझ्याऐवजी तू केलेंस तर तुझ्या व्यक्तित्वातील अंगभूत गुणवत्ते-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुळे त्यांची उपयुक्तता, लोकहित-साधकता वाढेल. म्हणून मनूने युगोस्लावियाला जावें, स्कँडिनेवियाला जावें, असें मला वाटतें. म्हणूनच अवांतर गोष्टी गौण वाटू लागतात. आणखी काही नाही.

उरुळी-कांचन
१५.४.'५९.

बेटा, तुझें यश व पराक्रम पाहून माझें चित्त हर्ष निर्भर व्हावें हें अगदी स्वाभाविक आहे. पण ही सगळी तुझी स्वतंत्र 'कमाई' आहे. तुझ्या 'कमाई' वर मी जगावें यात माझ्या आयुष्याचें श्रेष्ठ समाधान आहे. तू मला अनुलक्षून 'कृतज्ञता' वगैरे सारखे भाव अंत:करणात उठू दिलेस तर त्यात मला कमीपणा आहे. माझ्या वागणुकीत कोठे तरी उणीव राहिली असा त्याचा अर्थ आहे. तुझी 'कमाई' सर्वस्वी तुझीच आहे, बेटा ! फक्त तू माझी आहेस. 'मनुमहिमा' मनूचाच आहे. पण दादा त्यामुळे 'महामहिमान्वित' होतो, कारण मनू दादाची आहे ; अगदी दादाची आहे. दादाचें सख्खें अपत्य आहे. देवाने मला धन्य केलें, "आता फार बोलो काई ?"

तुझें व्यक्तित्व कुणाच्याहि छायेत किंवा आश्रयाखाली फोफावणारें आणि उमलणारें नाही. त्याला मोकळें आकाश व ऐस पैस क्षेत्र हवें. म्हणून संस्था, संप्रदाय, समूह, पक्ष, यात तुझ्या सत्त्वाचा विकास होण्यासारखा नाही. तुझ्या ठिकाणीं 'सामाजिकता' आहे, 'स्नेहार्द्रता' आहे, पण 'सदस्यत्व', संस्थेचें 'घटकत्व', 'सैनिकत्व' नाही. हे सगळे संबंध वैधानिक, औपचारिक, त्या मानाने कृत्रिम असतात. तुझें 'व्यक्तिमत्व' स्वच्छ व मुक्त वातावरणात आपल्या संपूर्ण ऐश्वर्याने विकसित होतें आणि खुलून उठतें.

अध्ययन, श्रवण, अवलोकन यांची तुला गरज आहे, पण फक्त प्रतिपादनाच्या सोयीकरिता. सहजस्फूर्ति, स्वयंप्रेरणा, आत्मप्रत्यय हीं तुझ्या व्यक्तित्वाचीं अनन्य वैशिष्टचें आहेत. तुझें वैशिष्टच बहुश्रुतत्वात नसून स्वतंत्र प्रतिभेत आहे. म्हणून अभ्यास-जड ग्रंथवाहक पोथीपंडितांपेक्षा किंवा अनुभवजन्य व्यवहार ज्ञानाने समृद्ध झालेल्या मुरब्बी पुढाऱ्यांपेक्षा तुझ्या व्यक्तित्वाची सहज कांति लोकांचीं मनें उजळू शकते. यात तुलना नाही. जे. पी. देखील एक 'संकेतच' आहेत. एक 'नमुना' आहेत. त्यामुळे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांचा उल्लेख येतो. त्यांच्यात आणि तुझ्यात किंवा तुझ्यात आणि इतर कुणात तुलना करणें अप्रस्तुत व अप्रयोजकपणाचें आहे. मनू 'मनू'च आहे. 'या सम हा' ! दरेक माणूस 'अपवाद' आहे. मनू 'असाधारण अपवाद' आहे माझा ! आशीर्वाद ! आशीर्वाद !

जवलपुर.
१९.८.'५९.

●

दादाच्या जीवनात तू मांगल्य, ओप व हुरूप आणलास. तू दादाला काय काय दिलेंस, अगदी न कळत दिलेंस, अगदी बेमालूमपणें व सहजपणें दिलेंस तें जगाला माहीत नसलें तरी दादाला कळतें. मला त्याची पूर्ण जाणीव आहे. तू माझ्यावर कधीहि कुठल्याहि प्रकारची जबाबदारी टाकली नाहीस. स्वतःच्या जीवनाचा यत्किंचित्हि ताप अगर भार माझ्यावर पडू दिला नाहीस. मी अगदी मोकळा व मजेत जगलो. आज तर तू मला सर्वतोपरी 'मुक्त' केलें आहेस. तुझें जीवन पूर्णपणें स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण आहे.

काशी एक्स्प्रेस.
१३.१.'६०.

●

"दादा, प्रार्थना करावी लागते कां हो ? ती होतच असते ना ? भजन मुद्दाम कसें म्हणायचें ? तें म्हटलें जातें. ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा म्हणजे काय, हो ?" हे तुझे १९४७ सालीं विचारलेले प्रश्न आजहि माझ्या कानात घुमत राहतात. या बालवृत्तीचा आणि उपजत पावित्र्याचा ठसा भालवांच्या चित्तावर उमटला. माझ्या मनूचें व्यक्तित्व कलदारासारखें खणखणीत आहे आणि तंतुवाद्यासारखें कोमल व मंजुळ आहे ! देवाघरची 'अनामिका' ना ?

काशी.
२२.१.'६०.

●

शंभुदादा, कमलताई यांची तुझ्यावरील प्रीति व श्रद्धा पाहून फार फार समाधान वाटतें. माननीय बाबा आणि चि० इंदु यांचीं पत्रें वाचलीं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाबांची तुझ्यावरील कोमल ममता खरोखरच दिव्य वस्तु आहे. थोर मनाच्या व दर्या एवढ्या अफाट दिलाच्या माणसाला अनुरूप अशीच ती आहे. तो अमृताचा झरा आतापर्यंत सरस्वतीप्रमाणे गुप्त होता. तो प्रकट झालेला पाहून धन्यता वाटते. इंदूची प्रीति तर भक्तीच्या कोटीतील आहे. तुझ्या व्यक्तित्वाला साजेसें हें 'अलौकिक कुटुंब' विकसित होत आहे. दादांच्या मनीचे पांग फिटले. आता त्याच्या जीवाचें निर्माल्य झालें तरी सार्थक झालें असें तो मानील. मनूचें ऐश्वर्य हेंच दादांचें कैवल्य !

काशी
२७.१.'६०.

बेटाई, तू माझ्या पोटीं आलीस हें माझें भाग्यहि आहे आणि सुखहि आहे. देवाने वर मागायला सांगितलें असतें तर इतकें गुणी, सुंदर व पराक्रमी अपत्य मागण्याचें धैर्य व बुद्धि मला झाली नसती. माझा पिंडच मुळीं हिणकस. त्याला अनुरूप माझी आकांक्षा व मगदूर. म्हणून एवढें थोर भाग्य मागण्याची अक्कल मला सुचली नसती. देवाने अकारण कृपा करून आपल्या पसंतीचें अपत्य मला दिलें म्हणून हें अनुपम भाग्य लाभलें. तू माझ्या करंट्याच्या आकांक्षेचें अपत्य नाहीस; भगवंताच्या वात्सल्याचें अपत्य आहेस. म्हणून तुला प्रार्थनात्मक आशीर्वाद देत आहे.

आस्तिकतेची सर्वात मोठी खूण इतरांच्या ठिकाणीं सद्भाव व आत्मीयता जागृत करणें ही आहे. पूर्वीचे तपस्वी तर वाघ आणि व्याल यांचेंहि हृदय पालटून टाकीत असत. माणसें जिंकणें त्याहूनहि अवघड आहे. तें तुला साधतें. जेथे जातेस तेथे मातीला ओप आणत्येस आणि फत्तराला पाझर फोडत्येस. दरभंगा जिल्ह्यातील प्रजासमाजवादी पुढारी, संथाल परगण्यातील पुरोगामी कार्यकर्ते यांच्यापासून तो थेट जे. पी. पर्यंत अनेकांचीं मनें तू निर्विकारी आस्तिक्याने काबीज केलींस. आज धीरेनदा म्हणाले "विमलको जनवरीमें या उसके बाद मेरे यहां आना ही चाहिए। विमल के बिना नहीं चलेगा। लोग कहते हैं कि पूर्वजनमके कुछ संकेत होते हैं। उस लडकीके बारेमें ऐसा ही कुछ हुआ है। मैंने जब पहली बार उसे चांडिलमें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देखा तो देखते ही हृदयमें यह विश्वास पैदा हुआ कि इसके भरोसे हम अपनेको संन्यास के अधिकारी मान सकेंगे। पूछने पर मालूम हुआ कि दादा की बेटी है। तब तो यह धारणा दृढ हो गयी कि यह लडकी हम लोगोंको मुक्त करेगी। तबसे आजतक वह स्नेह, वात्सल्य और विश्वास बढता ही गया है। आप उसे अवश्य लाइये। अब उससे कहने की बातें मेरे पास हैं।"

१४-११-'६०.

●

तुझ्या व्यक्तित्वातील सगळे खडीसाखरेचे खडे व रवेदेखील – फारसे नाहीतच म्हणा – विरघळू लागले असल्याचे मला स्पष्ट दिसत आहे. बालवृत्ति हें तुझें सत्त्व आहे. तेंच तुझें 'स्व-रूप' आहे. गंगोत्रीच्या पवित्र, व निर्मळ गंगेसारखी तू माझ्या कुशीतून बाहेर पडलीस, आणि त्याच निरागस व पवित्र भावनेने आज कुशीत विसावा घेतेस. मी सगळें भरून पावलो ! या पाळीला मुंबईला येऊ शकलो नाही याची टोंचणी मनाला आहे.

धनतोली, नागपुर.
१३. ३.'६१.

●

आजचा दिवस माझ्याकरिता दिवाळी-दसरा आणि जन्माष्टमी व राम-नवमी म्हणजे उत्सवाचा दिवस आणि पवित्र दिवस ! तुझ्या पत्रात आनंदाची बातमी सविस्तर दिली आहे. कृष्णजींचा व तुझा अगदी संक्षिप्त पण माझ्या दृष्टीने अतिशय अर्थगंभीर असा संवाद वाचला. कृष्णजींच्या हृदयात तुला स्थान मिळालें वैकुंठीचें सिंहासनच ! माझी भाषा भाविकाची नाही. मला तेवढें उत्कट-भावनासंपन्न हृदयच कोठे लाभलें आहे ? पण, माझें सगळें काळीज उचंबळून नाचू लागलें. मनूच्या शरीरातील व्यंग नाहीसें झालें. माझ्या आत्मजेच्या रूपाने नटलेल्या मातृदेवतेची मूर्ति पुन्हा अभंग झाली ! बेटा, तुला माझ्या कमरेला विळखा घालून उगीच हाक मारावीशी वाटते, त्याचप्रमाणे तुला कुशीत घेऊन कुरवाळावेंसें मलाहि वाटतें ! माझा तो अधिकार आहे – अर्थित्व आणि पात्रता ! कृष्णजींच्या प्रवचनाचा तू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाठविलेला गोषवारा मला पुरेसा आहे. आपलें प्रेम हेंच रसायन, मैत्री हीच किमया, स्नेह हेंच सत्त्व ! ते कृष्णजींनी उधळलें !

नागपुर.
१४. ३.'६१.

तुझ्या एका वैशिष्ट्याचा उल्लेख मी इकडे येण्यापूर्वी तुझ्याजवळ बोलतांना केला होता. जबलपुरच्या पत्रात त्याच्याविषयीं ओझरता इशारा होता. तरुण अविवाहित अगर विधवा स्त्रीला आधाराची व आश्वासनाची गरज असते. पुरुषावर विश्वास टाकण्याची हिंमत सहसा होत नाही. बाणेदार चारित्र्यवान्, खंबीर व स्वावलंबी स्त्रीच्या उदाहरणाने तिला स्फूर्ति व आशा यांचा लाभ होतो. अशा करारी व स्नेहाळु स्त्रीच्या सहवासात स्त्रीत्वाच्या मर्यादेचें रक्षण होतें, स्वाभिमानाचें, म्हणजे स्त्रीत्वाच्या अभिमानाचें, पोषण होतें आणि स्वायत्त जीवनाची उमेद वाटू लागते. तुझ्या जीवनात सगळे न कळत व ओघानेंच घडतें. म्हणून तू कुठल्याहि तरुण स्त्रीला स्वत:जवळ राहण्यास मनाई करू नकोस असें मी सुचविलें.

मुंबई
१२.६.'६२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण तिसरें

वत्सलता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: ३ :

तू म्हणतेस, तू मला त्रास दिलास, दुरुत्तरें बोललीस, अपमान केलास— — मला यांपैकी काहीच कसें कळलें नाही ? मांजराचे दांत जसे पिलाला बोंचत नाहीत, पिलाचीं नखेंहि त्याचप्रमाणे मांजराला रुतत नाहीत. तू काय मला ओरवाडलेंस ? माझ्या अंगावर कोठे बोंचकारे उमटलेले दिसत नाहीत !

पोरी, तू समर्पणाची कला शीक. समर्पणात अद्भूत शक्ति व विलक्षण आनंद आहे. समर्पणात सारी अहंता पाण्यात मिठाच्या खड्याप्रमाणे विरघळून जाते. बापू ज्याला 'समर्पणाचें विज्ञान', the Science of Surrender म्हणत असत, तें जीवनाचें अनुपम दर्शन आहे. तू सारें माझ्यावर सोपवून मोकळी हो.

नवी दिल्ली.
३. १२. '४९

राहवत नाही म्हणून पुन्हा सांगतो. निराशा व वैताग यांना थारा देऊ नकोस. आदर्श सेवावीर हनुमान जानकीला शोधशोधून निराश

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होण्याच्या बेतात आला तेव्हा त्याने केलेला आत्मबोध लक्षात ठेव :—

अनिर्वेदः श्रियोमूलम्
अनिर्वेदः परं सुखम् ।
अनिर्वेदोहि सततम्
सर्वार्थेषु प्रवर्तकम् ।।

अनिर्वेद= आशा, अविषाद.

नवी दिल्ली
३.१२.'४९

पण काही झालें तरी माझ्या मुलीने आजारापुढे हात टेकता कामा नये. मरायला तयार होणें निराळें आणि मरणाच्या स्वाधीन होणें निराळें. मरणाला शरण जाण्यात आत्म्याचा पराभव आहे. हिरमोड कधीहि होऊ देऊ नये. सेवकाचा शिरोमणि मारुतिराया याचा दाखला मागील पत्रात दिलाच आहे. जेव्हा अगदी टेंकीला आला तेव्हा त्या वीरपुरुषाच्या अंतःकरणात 'अनिर्वेदः श्रियोमूलम्' हा मंत्र स्फुरला. 'अनिर्वेद' हा पराक्रमी हनुमंताचा बीजमंत्र आहे. तो तुझ्या वृत्तीत विंबून जीवनात बाणला पाहिजे.

नवी दिल्ली
१२.१२'.४९

ता. ३ ला संध्याकाळीं विनोबांच्या प्रार्थनेला जाऊन आलो. पूर्वी विनोबांच्या अभंग म्हणण्यात अद्भुत गोडी होती. आता त्यांनी निराळीच शैली उचलली आहे. आता कीर्तनाचाच फड उभा करितात. पण त्यातहि रंगून 'मस्त' होतात. त्या दिवशींचा अभंग होता – 'पक्षिण उडून अंतराळांत गेली पण चित्त मात्र बाळाजवळ ठेवून गेली!' विनोबा तो अभंग म्हणू लागले व म्हणवू लागले. माझें चित्त त्या वेळीं कोठे घिरटचा घालीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असेल सांग पाहू ? तें भाग्य देवाने फक्त एकटचा पक्षिणीलाच वहाल केलेलें नाही.

सर्वोदय कार्यालय, वर्धा
६.२.'५०

•

हें पहा पोरी, मी तुझें काही एक भलतें सलतें ऐकणार नाही. माझी मुलगी होणें तुझ्या हातचें होतें, पण आता 'राजीनामा' देणें तुझ्याहि हातचें नाही, माझ्याहि हातचें नाही आणि आपल्या देवाच्याहि हातचें नाही. तुझ्या मन:स्थितीची जाणीव किंवा प्रतीति मला नाही असें तुला म्हणायचें आहे काय ? वेटा, तुझ्या भावनांशी समरस होण्याची विलक्षण शक्ति ईश्वराने मला दिली आहे. पण अनुभव आणि परिपक्वता यांमुळे तुझ्यापेक्षा विवेक थोडा अधिक संपादन केला आहे. तेव्हा, आसराविसरा रद्द कर पाहू.

उद्या सकाळीं वाबूजींना तार करतो. ते मेलने तेथें पोंचतील. त्यांच्या वरोवर नागपुरला निघून जा. बबन तुला घ्यायला म्हणून येणार होता. पण तो पडतो लहान. म्हणून वावूजींना पाठवितो. वाट वघ.

इतकेंहि करून धीर निघत नसेल तर उद्या मला तार कर. परवा मी येतो. माझा जीव तुझ्यात किती आहे हें तू जाणतेस.

कळावें हा आशीर्वाद.

तुझा दादा.

बऱ्हाणपुर.
१२.२.'५०

•

वेरूळची लेणीं, दौलतावादचा किल्ला, औरंगझेवाचें थडगें, मकवरा इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा उत्साह राहिला नाही. तू नाहीस, वेवी नाही, मुलांपैकीहि कोणी नाही. मग गोडी कशी वरें वाटावी ? तू आपली आजाराशीच गट्टी केली आहेस.

औरंगावाद.
१६.२.'५०

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुलींच्या बावतीत पितृत्वाच्या भूमिकेची साधना आज पंधरा वर्षे करीत आहे. आता मनाला तें वळण लागलें. तीच प्रकृति झाली. तुझ्या चिठीत जो कृतज्ञतेचा ध्वनि आहे तो मला वोचला. तू माझ्या 'पोटचा गोळा' आहेस ना ? मी तुझ्याकरिता काहीच केलेलें नाही. स्वतःच्या मनाची तळमळ शमविण्याकरिता धडपडलो. पितृस्नेहामुळे सहजगत्या, प्रकृतीच्या आवेगामुळे जी तुझी परिचर्या घडली ती घडली. माझी भावना शुद्ध आहे, हेतु पवित्र आहे. यशाला विलम्ब लागत आहे, इतकेंच. शुद्धसंकल्प अमोघ असतो.

बाष्प-बिंदु हे पृथ्वीचे आनंदाश्रु आहेत कीं दुःखाश्रु ? तो सृष्टि नियंताच जाणें. माझ्याहि अश्रूंचें तसेंच आहे. कधी कधी त्यांचें हास्याच्या तुषारांत व विनोदांच्या कारंज्यातहि पर्यवसान होतें. दोन्ही भगवंताच्या चरणीं अर्पण करतो.

बेटा, तू माझ्यापेक्षा अधिक ईश्वरनिष्ठ आहेस. तुझी आस्तिकता भावरूप व उज्वल भक्तीत परिणत झालेली आहे. माझी क्षीण, मंद पण कळकळीची प्रार्थना आणि तुझी उत्कट व खोल निष्ठा फुकट कां जातील ?

देवाने मला 'कृपाळूपणें' अगदी न मागता, दिव्य कन्यारत्न दिलें, मी तें जतन करून स्नेहाच्या कपाटात ठेवलें. तें आता देवच हिरावून कां घेईल ? तो निष्ठुर का आहे असा ? तो तर कारणरहित कृपाळु आहे ना ?

सकाळपासून गर्दी आहे. त्याच गर्दीत लिहीत आहे. कारण अपत्य-वात्सल्याचा हक्क पहिला आहे. सवड होताच येईन, भेटेन, बोलेन.

अनेक उत्तम आशीर्वाद.

तुझा दादा.

धनतोली, नागपुर.

८.४.'५०

रायपुरला गेली नाहीस तर ता० २७ ला रात्रीं भेटायला येईन. त्या भेटीने मला संजीवन मिळेल ! तुला विरक्तीची बाधा झाली असेल. मला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मात्र निर्विकारी स्नेहातून जीवनरस मिळतो. त्यामुळे येथून सुटका झाल्या-बरोबर रानातून परतणाऱ्या गाउलीच्या गतीने मी तुला भेटायला येणार !

हैद्राबाद.
२३. ४.'५०.

•

बाळ,

तुझें पत्र पोचलें. मी वाटच बघत होतो. तू म्हणशील, "दादा, आता मात्र शर्थ झाली. याहि पत्राची वाट बघत होतात तुम्ही ?" बेटा प्रेमाची गति ही अशीच आहे. तू गेलीस तेव्हा उत्कंठित होतीस, मीहि अगदी रानांतून येणाऱ्या गायीप्रमाणे पचमढीहून कां वरें आलो असेन ? तुझ्या हृदयात जें शिजतें तें माझ्या हृदयात खदखदू लागतें. म्हणूनच या पत्राचीहि वाट बघत होतो मी.

कळावें, अखंड आशीर्वाद.
तुझा – दादा.

धनतोली, नागपुर.
९.५.'५०

•

बाळ,

तू म्हणत्येस मंगळवार हा तुझा शुभवार आहे. ज्याची प्रेरणा शुभ आहे त्याला सारे वार आणि सारे मुहूर्त शुभच आहेत. मंगळवार हा भगवती त्रिपुरसुंदरी जगदंबिका मंगला हिचा दिवस आहे. ती सर्व ठिकाणीं, सर्व काळीं आणि सर्व परिस्थितीत तुझी पाठ राखो.

मी तुझा जनक नसलो तरी 'बाप' आहे. अगदी बिनदिक्कत आणि वाटेल तेव्हा जो तुझा 'बाप' मी काढत असतो, तो मीच. बापाचें हृदय कसें असतें हें मी तुला कसा सांगू ?

माझा स्नेह वैयक्तिक असला तरी तो व्यावहारिक नाही, लौकिकहि नाही. व्यावहारिक स्नेह व कर्तव्य यांचा केव्हा केव्हा विरोध होतो. पण निरपेक्ष स्नेह कर्तव्याला बाधक होण्याऐवजी पोषक होतो. म्हणून त्या स्नेहाची कसोशीने जोपासना करणें हेंहि कर्तव्यच असतें. त्या स्नेहाचा त्याग कर्तव्याकरिता करण्याची पाळी कधीहि येत नसते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खूप काम कर, धडाडीने कर, उत्कटतेने कर पण दक्षता सोडू नकोस. भावनेच्या आवेगात उतावीळपणा व आततायीपणा करू नकोस. भावना शुद्ध असली म्हणजे बुद्धि परिष्कृत होते. पण बुद्धीवांचून भावनेला निश्चितता व स्थैर्य येत नाही. म्हणून विवेक व जागरुकता यांची कांस कधीहि सोडू नकोस. ईश्वर हा नुसता नित्य शुद्धच नाही, तो नित्य बुद्धहि आहे, म्हणूनच नित्य मुक्त आहे. शुद्धता हृदयाचा गुण आहे, बुद्धता बुद्धीचें लक्षण आहे, आणि मुक्तता ही त्यांची परिणत स्थिति आहे. मुक्ताला विधि नाही, निषेध नाही, शास्त्र नाहीं, शासन नाहीं. पण नित्यबुद्धतेखेरीज ती निष्ठा निष्पन्न होत नाही.

'स्वाध्यायप्रवचनाभ्याम् न प्रमदितव्यम्.' स्वाध्यायावांचून प्रवचनात जीव नाही. स्वाध्याय अवश्य कर. त्यात अभ्यास व परिप्रश्न यांचा मुख्यत: समावेश होतो. तो स्वाध्याय करण्याच्या कामीं जी मदत लागेल ती तत्परतेने व हौसेने करीन.

औषध नेमाने घे आणि तब्येत संभाळ. ती काळजी माझ्या मनाला अखंड राहील. माझ्या वात्सल्ययुक्त चिंतेनेंहि तुझें रक्षण होणारच नाही असें मी कां मानावें ? ईश्वरहि वात्सल्याची मूर्ति आहे ना ?

रात्रभर तुझ्या वियोगाचाच विचार मनात घोळला. चित्त शुचिर्भूत झालें. तुझ्या प्रेरणेच्या आड येण्याचें कारण नाही असें मनाशी ठरलें. म्हणून मन:पूर्वक तुला आशीर्वाद देत आहे. अखिल मांगल्याची विधात्री जगद्धात्री शिवा तुला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य देवो, उदंड व कार्यक्षम आयुष्य देवो आणि सुयश व सुख देवो !

चित्तात विकल्प आला, तें अस्वस्थ झालें किंवा शंकाकुल झालें तर माझ्याशी बोलून घेत जा. उगीचच, सहजच, विनाकारण भेटणें मी सगळ्यात महत्त्वाचें मानतो. वाटेल तेव्हा, जमेल तेव्हा येत जा. अष्टौ प्रहर आणि रोज आलीस तरी मला हवीच आहेस.

अनेक उत्तम आशीर्वाद.

तुझा – दादा.

नागपुर.

२०. ६.'५०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बेटा,

पत्र पोचलें. मी वाट बघतच होतो. तुला याचें आश्चर्य वाटू नये. मला बोलणें अधिक जमतें. तुझें आत्मनिवेदन लेखणीच्याद्वारें होत असतें. तुझें पत्र वाचून त्यातील तळमळीचे पडसाद माझ्या हृदयात उमटले. पण विशेष काही लिहिण्याची प्रवृत्ति होत नाही.

तुला 'दादा वाक्यं प्रमाणम्' वर भाष्य करण्याची गरज वाटावी हें मोठेंच दुर्दैव आहे. मी तशी मागणी किंवा अपेक्षा कधीच केली नव्हती. आजहि करीत नाही. तू तें वाक्य विसरून जा. आपल्या इच्छेप्रमाणे वाग. सार्वजनिक व वैयक्तिक असे कप्पे माझ्या जीवनात नाहीत. जीवनात सार्वजनिक व खासगी असा फरक असणें अपरिहार्य आहे पण कप्पे मात्र नसावेत. मला प्रतिस्नेहाची आकांक्षा नाही. तू आपल्या मनावर कसलाहि भार वाळगू नकोस.

मुलगी या नात्याने तू फार निकट आलीस. तुझ्या आजच्या पत्रातील तुझें रूप मी पुष्कळदा पाहिलें आहे. आता तें पाहून मी व्यथित होतो. पण संतापत मात्र नाही. तें तुझें 'स्वरूप' नव्हे एवढें मात्र सांगणें माझें कर्तव्य आहे. मी तुला तुझ्यापेक्षाहि जास्त ओळखतो.

'इच्छेविरुद्धहि तुमचें, ऐकेन' असें त्रिवार आश्वासन तू दिल्यावरहि मी मात्र तुला तुझ्या इच्छेप्रमाणे वागू देण्याचेंच ठरविलें व तसें तुला सांगितलें. तेव्हा 'लादण्या'ची भाषाच मला लागू होत नाही. उपमर्दानि क्रोपाविष्ट किंवा खट्टू न होण्याइतकी शक्ति माझ्या वात्सल्यात आहे. तू माझी 'कन्यका' आहेस. तुझ्या बाबतीत मला मानापमान नाही, काही नाही. स्नेहात अहंता विरघळून जाते. आत्मीयता तेवढी उरते.

आज तुझ्या हृदयातील स्नेहाची व बुद्धीतील विवेकाची द्वारें अवरुद्ध आहेत. तू माझ्यापासून दूर जाशील; पण मी करा जाईन? पाठलाग करीन, पण अडथळा करणार नाही. माझ्या स्नेहाचें लोढणें तुझ्या गळचात व माझ्या वात्सल्याचा खोडा तुझ्या पायात अडकविणार नाही.

तू निर्धास्त रहा. प्रसन्न रहा. माझ्या स्नेहात व आशीर्वादात सामर्थ्य नसलें तरी प्रार्थनेत तर आहेच ना? प्रभु तुझें कल्याण करील.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वस्तु मागविल्यास फार धन्यता वाटली! उद्या किंवा परवापर्यंत पाठवून देतो. तू आपल्या मर्यादेतच, पण खूप मोकळी व खुश रहा. माझा विचार सोडून दे. मला पाषाण मानून घे. माझ्या स्नेहात अंतर पडणार नाही.

धनतोली, नागपुर.
११.७.'५०

●

चि० पोरीला अनेक उत्तम आशीर्वाद, मोझरीहून तू लिहिलेलें पत्र वाचून हृदय प्रेमाने नाचू लागलें. कृतार्थता वाटली! आठ दिवस तुला इकडे यायला संवड होणार नाही हें मी थोडाच ऐकून घेणार आहे? काय साधेल, कितपत साधेल, कसें साधेल, तें मी पाहीन. तू माझी 'लाडकी लेक' आहेस. मन:पूत आणि मनमुराद वागडत जा. बाकी सारें माझ्यावर सोपवून दे. 'भारती,' शेंदुर्णीकर, श्रीपाद, गुरुदेवसेवक, सुषमा यांच्यासाठी कोण लिहील? तुझा बाप? 'भारती'चा लेख बहुतेक लिहून काढला आहे त्याने – तुझ्या बापाने! वाचनीय आहे. उद्या दाखवीन.

चंदू बरा, बाळू खुश, बबन यथास्थित, अंबरीष स्वस्थ!

धनतोली, नागपुर.
१८.७.'५०

●

चि० गजाननने पत्र आणून दिलें. वाचून कृतकृत्य झालो. जितकें स्वाभाविक, निर्व्याज, तितकेंच उदात्त, भद्र भावनांनी ओथंबलेलें. वाचल्यावर मंगलस्नान करून शुचिर्भूत झाल्याप्रमाणे वाटलें. माझें पितृत्व सफल झालें, कृतार्थ झालें, परिपूर्ण झालें!

तुझा राग अगदी योग्य आहे. त्या रागाला कन्येच्या ममतेची भावना दिलेली असल्यामुळे तो माझें भेषज आहे. तुझ्या रोषाला स्नेहाचें अनुपान आहे. त्यामुळे तें पथ्यहि आहे. मला तुझा रोषहि आवडतो. आजचा तुझा राग अगदी योग्य आहे. आवश्यकहि आहे. माझ्यात फरक नाही. तुझा 'बाप' तोच आहे!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आबासाहेब येऊन बसले. सूत कताईला जातो. तू ११ ला जरूर जरूर ये. त्याशिवाय मला चैन पडणार नाही. मी वाट बघत राहीन. ये, ये, येच!
धनतोली, नागपुर.
४. ८.'५०

बेटा,

चिठ्ठी पोचली. हृदय करपलें. कुठल्याहि प्रतिकूल व विषम परिस्थितीत आशानिष्ठा ढळू न देण्याचें वळण प्रभुकृपेने मला लागलेलें आहे. मला पराभव अधिक मानवतो व पचतो हे मी तुझ्याजवळ बोललो आहे; तें खरें आहे. भगवान् कठोर आहे; पण तो कृपाकठोर आहे. त्याच्या कठोरतेच्या मुळाशी असीम कृपा असते. त्या कृपेवरच माझी भिस्त असते. म्हणून विपत्तीचे व प्रतिकूलतेचे काळेकुट्ट पर्वताकार ढगहि वितळून जातील ही माझी श्रद्धा यत्किंचितहि डळमळत नाही. तुझ्या प्रकृतीच्या बाबतीत माझी हीच वृत्ति आहे.

प्रवासाने, सहलीने, फेरफटक्याने पुष्कळदा शरीराला व मनाला टवटवी येते. मधून मधून त्या प्रयोगाने लाभहि होतो. या बाबतीत एकटोंकी वृत्ति राखण्यात अर्थ नाही. मी तुझ्याशी जें बोलतो त्यात विनोदहि असतो, थोडीशी गंमतहि असते. एव्हांना माझा स्वभाव तुझ्या लक्षात आलाच आहे. मी बरेंचसें तुझ्या कलाने घेतो व घेईन. माझा अहंकार ताठर आहे, पण फारसा उर्मट नाही. मी पुष्कळसें तुझ्या मर्जीवर सोपवीन. पण थोडेसें स्वतःचेंहि चालवीन. तेवढें तुला पतकरावें लागेल.

मी तुझ्याकरिता काहीच केलें नाही, करीतहि नाही. मला राहवत नाही म्हणून सारें माझ्या हातून घडतें. तें सगळें तू गोड करून घेत्येस व सहन करून घेत्येस यात माझ्या स्नेहाचें चोज आहे. मी माझ्या अल्पशक्ति-प्रमाणे देत असतो. माझ्यापाशी असेल तेवढें सगळें देतो. माझें 'सगळे' सुद्धा अत्यल्प आहे याची जाणीव मला आहे. पण हें अल्पच माझें 'पूर्ण' आहे. मला इतरांकडून जें मिळतें तें विपुल असतें. तेंहि 'पूर्ण'च. पण त्या पूर्णतेत श्री असते, प्रचुरता असते. त्याच्या योगाने माझ्या अल्पतेतहि समृद्धि येते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेव्हा, तू माझ्या वृत्तीचा भार मुळीच वाहू नकोस. तुला आवडेल व प्रशस्त वाटेल तशी वाग. रुचेल व योग्य वाटेल तितकेंच माझें ऐक. पण तुला मी बळेंच खोटी आशा दाखवीन असें मात्र मुळीच मानू नकोस! माझा प्रत्यय चुकीचा असू शकेल, पण प्रामाणिक असतो. 'गोळचा घेण्याची' गोष्ट माझ्या जवळ बोलण्यात काय अर्थ आहे ? मी शरीर परायण जीव आहे. शरीराचा त्याग घडणारच आहे एवढी जाणीव काय ती मी बाळगतो आणि त्या कल्पनेने भयभीत होत नाही. बाकी सारें कृष्णार्पण करून खुशाल बेधडक जगतो. आयुष्याच्या उपयुक्ततेची चिंता माझ्या मनाला शिणवीत नाहीं. म्हणून या बाबतीत तुझी भाषा मला फारशी कळत नाही. ती माझ्या 'डोक्यावरून' जाते! माझ्या सर्वसामान्य पातळीवरहि काही काळ जगत जा.

मी केव्हा तरी येईनच. काम किती, कोठे व केव्हा करायचें तें मी तुझ्यावांचून ठरवणार नाही. तू संतापलीस, त्रासलीस तर त्याची मला क़ाळजी नाही. तो तुझा हक्क आहे आणि तो माझा बहुमान आहे. मी अल्पमति व अल्पशक्ति असलो तरी माझ्या स्नेहात भरपूर कस व रग आहे. तो स्नेहाचा अंगभूत गुण आहे. माझा नव्हे. विशेष समक्ष. बेटा स्वस्थ व शांत रहा.

धनतोली, नागपुर.
३१.८.'५०

बेबी व लल्ला यांस ताप आला. बेबीचा गेला. लल्लाला मात्र कांजण्यासारखा पुरळ निघाला आहे. बबाताई आपल्या यजमानांसह परवा रात्रीं परत गेली. बबी जाऊ लागली म्हणजे अजूनहि माझ्या डोळचांत आंसवें कां बरें यावींत ? परवा बाबूनेहि पांच मिनिटें माझ्या मांडीवर निजून घेतलें. ही स्पर्शपरायणता मंगलकारकच नाही का ?

धंतोली, नागपुर.
८.२.'५१

तुझ्या चित्ताची तळमळ तो करुणाघन शांत करील. ज्याच्याकरिता तू साऱ्या जगाचा त्याग केलास तो तुला कदापि अंतर देणार नाही. बेटा;

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चित्त अगदी मोकळें ठेवून त्याच्या चरणीं लीन हो ! माझ्या आशीर्वादांत उत्कटता असेल तर तुझें कल्याणच होईल.

धनतोली, नागपुर.
५.३.'५१

विसंवादी व बेसूर आवाजाने स्नेहाची 'एकतानता' नाहीशी करणाऱ्या व्यक्तींचा 'प्रतिकार'हि आपण निर्भेळ व निरपेक्ष स्नेहानेच करायचा आहे ना ? मग ही साधना जीवनाची प्रधान प्रवृत्ति म्हणून तू स्वीकारायला नको कां ? विश्वव्यापी सद्‌भावनेच्या ओलाव्याने तुझें व्यक्तित्व उमलू लागलें म्हणजे मी धन्य होईन. आदर्श म्हणून उराशी वाळगलेली निरागस, ईश्वरनिष्ठ, कर्तबगार व प्रगल्भ बालिका प्रत्यक्ष पाहण्याची तुझ्या या पामर पित्याची आकांक्षा होती. त्या आकांक्षेच्या पोटीं तू जन्माला आलीस ! त्या भूमिकेचा विकास होण्याची वेळ आता आलेली आहे. तुझा पराक्रम व यश जसजसें वाढेल तसतसा लोकांत माझा दर्जा व लौकिक वाढेल ! माझी कन्या माझा 'तिहीं लोकीं झेंडा' फडकवील ! अशा आत्मजेचा बाप म्हणून खपण्यात कोणाला अभिमान वाटणार नाही बरें ? आज देशाला प्रखर तेजस्विते इतकीच जागरुक निष्ठेची व प्रशांत पराक्रमाचीहि गरज आहे. माझी विमल फक्त टाळमृदंग आणि वीणा हीं उपकरणें घेऊन भगवंताला साद घालूनच थांबणार नाही, ती आपल्या विचारांच्या भेदक प्रकाशाने मानवातील देवहि जागवील. मी हें लिहीत असतांना लल्ला आपल्या शब्दहीन भाषेने रुकार देत आहे. सोनु, तू लल्ला-प्रमाणेच माझें अगदी 'तान्हें बाळ' आहेस आणि रहावीस हीच इच्छा आहे. त्याकरिता तुझा पिता कुठलेंहि दिव्य करायला कचरणार नाही. अशा निष्पाप अर्भकांच्या वृत्तीवरच देवाचें राज्य उभारलेलें आहे.

तुझें चित्त लोककार्यांत अगदी रंगलेलें पाहून तुझीं पत्रें वाचतांना मीहि अगदी दंग झालो ! मोठ्या अनुपम समरसतेचा आस्वाद मला घेता आला. तुझ्या ठिकाणीं ज्या सुप्त व व्यक्त शक्ति आहेत त्यांचें आविष्करण आता व्हायला हवें आहे. त्या गुणांची सर माझ्या मोजक्या व तुटपुंज्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गुणवत्तेला येणें दुरापास्त आहे. माझ्याजवळ जी काही अल्प संपदा आहे ती वापरून तिच्यात भर घालणें तुलाच शक्य आहे. माझ्या वृत्तीत कार्पण्य नाही पण माझी पात्रता परिमित आहे. देण्याची आकांक्षा अपरिमित आहे पण सामर्थ्याची उणीव आहे. म्हणून तुझ्या बावतीत स्नेह व साधना यांचा समुच्चय माझ्या दृष्टीने झालेला आहे. म्हणूनच तू माझी आत्मजा असूनहि माझी माता आहेस. तुझ्या आनंदात, यशात व सामर्थ्यात अखंड भर पडत राहो हीच माझी प्रार्थना आहे.

बाळ अलीकडे माझी वृत्ति उपसंहारात्मक, एकाग्र व अंतर्मुख होऊ लागली होती व होत आहे. तू माझ्या जीवनात प्रवेश केल्यामुळे त्या वृत्तीला बळकटी आली. त्या बावतीत तुझी मदत झाली. एकाग्रतेत विक्षेप होण्याऐवजी ती वाढली. म्हणून तुला मी 'आत्मजा' म्हणतो.

लिहिण्याला सुमार नाही. अखेरहि नाही. म्हणून आता हात आंखडतो. मी तुझा पिता आहे. पित्याची प्रार्थना सहसा मोघ ठरत नसते !

धनतोली, नागपुर.
८. ४.'५१

खादी घेत नाही. पिशवी घेऊन ठेवतो. मी जिवंत आहे तोंपर्यंत तू आपली आवड मला सांगत राहणार आहेस ना ? तेवढें भाग्य मला अखंड लाभो. तुझ्या आवडी त्या काय असणार म्हणा ! पण त्या पूर्ण करण्याचें सामर्थ्य तुझ्या वात्सल्याने तुझ्या या अकिंचन पित्यात येवो ! माझ्याजवळ माणिकमोती नाही. आणि दगड-मातीहि स्वतःच्या मालकीची नाही. जमीन किंवा अस्मान यांपैकी कोठेहि वैभव म्हणून नाही. तरी माझी लेक मला सार्वभौम सम्राटाच्या राजकन्ये पेक्षाहि लाडकी नाही का ? म्हणून देवाजवळ मागणें एकच की तो तुझ्या प्रवृत्तीप्रमाणे तुला वागू देण्याची व शक्य तें साहाय्य करण्याची सन्मति मला देवो !

धनतोली, नागपुर.
५.६.'५१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्या दिवशीं तू माझ्याशी समंजसपणाने व संभाळून वागू लागशील त्या दिवशीं तुझ्या मानसिक अवनतीला आरंभ झाला म्हणून खुशाल समज ! पोरी, एका गोष्टीची खूणगांठ बांधून ठेव. जेथे सारे धरबंध, शिष्टाचार आणि संकोच बाजूला सारून भरमसाट, बेछूटपणें वागता येईल, तेथेच माणसाचे दोष प्रकट होतात आणि तो संबंध, वासना आणि मतलब यांनी कलुषित नसल्यास तेथेच दोषांचा निरासहि होतो. म्हणून आपल्या बाळवृत्तीला पारखी होऊ नकोस ! तू होऊ लागलीस तरी मी होऊ देणार नाही.

माझ्याशी युक्तिवाद करण्यात हंशील नाही. तू ज्या अर्थी चिंतनच आरंभिलें आहेस, त्या अर्थी तुझ्या चिंतनाकरिता दोन सूत्रें सुचविते :–

१. सोंवळेपणा ही अस्पृश्यतेचीच उलट बाजू आहे. स्पर्शभावनेला मर्यादा हवी. कोठे तरी तिला संपूर्ण वाव दिल्याखेरीज 'भीति' व 'जुगुप्सा' या भावनांचा निरास होणें शक्य नाही.

हा माझा संस्कार नव्हे, हा माझ्या शुद्ध हृदयाचा प्रत्यय आहे. मी माझे संस्कार व हृदयाची संवेदना बाजूला सारून शुद्ध बुद्धीने विचार केल्यावर हा निष्कर्ष काढला आहे.

अगदी सोंवळीं माणसेंहि कारणपरत्वें व प्रसंगपरत्वें स्पर्श करतात. अंग चेपून देतात, मालिश करून देतात. पण कोणाचें अंग दुखत नसलें, आंवलें नसलें, मळलें नसलें, म्हणजे त्याच्या स्पर्शाचा प्रसंग किंवा प्रयोजन उरणार नाही. याचा अर्थ असा की स्पर्श फक्त नाइलाज म्हणून सहन करावा. ही सूक्ष्म अस्पृश्यतेची भावना आहे.

२. कारण परत्वें स्नेह म्हणजेच मतलब, आणि कारणपरत्वें स्पर्श म्हणजेच विकार. स्नेह व स्पर्श निरपेक्ष असावा.

धनतोली, नागपुर.

७. ६. '५१

माझ्या सान्निध्यात तुझी प्रार्थना अधिक उत्कटतेने होते आणि देवाच्या निकटतेची प्रतीति येते, असें तू लिहित्येस ! बेटा, या शब्दात केवढा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाढ स्नेह आणि निष्ठा आहे. हनुमंताच्या श्रद्धेने दगडहि पाण्यावर तरंगले ! तू दगडांतहि दिव्यत्व आणशील, पोरी ! तुझी ईश्वरनिष्ठा व पवित्रता आणि निर्मळता अशीच निरंतर वाढत जावो ! म्हणजे मी कृतार्थ होईन.

हें लिहिणें संपणार थोडेंच आहे ?

वर्धा.
१३.६.'५१

परवा दिवशींच, म्हणजे वर्ष प्रतिपदेलाच, ... ची अगदी अचानक तार आली. तार लखनऊहून आली, Meet Delhi Immediately Cause Most urgent. मी जाऊ शकलो नाही. पण त्या मुलीने मला हक्काने बोलावलें हा माझा फार मोठा गौरव आहे. तसा तिचा व माझा संबंध विशेष आला नाही. पण माझ्या निरपेक्ष आस्थेचा व स्नेहयुक्त सहानुभूतीचा ठसा तिच्या मनावर उमटला आणि तिच्या पित्याप्रमाणेच मीहि तिच्या सत्तेचें एक माणूस वाटलो यात माझा बहुमान आहे. माझ्या जीवनाच्या विशिष्ट मर्यादांमुळे दिल्लीला तावडतोब धावून जाणें मला शक्य झालें नाही. तिला याबद्दल माझा राग आला तर तोहि मी माझा गौरवच मानेन. मी तिच्या स्नेहाचा अधिकारी असेन तर तिच्या रागाचा कसा नसेन ?

मनू, यातच माझ्या नात्याचें वैशिष्टच नाही का ? वडील माणसाशी आपण ज्या मर्यादेत वागतो त्या मर्यादेत आप्ताशी कधी वागत नसतो. देवाविषयीं तर अमर्याद निष्ठा व आदर बाळगूनहि त्याच्यापाशी कसलीच मर्यादा बाळगीत नाही; वडीलधाऱ्या आप्तांच्या बाबतीतहि असेंच आहे. बबाताई, बाळू, बबन, चंदू, बेबी, यांना माझ्याबद्दल श्रद्धा व स्नेह आहे. पण माझी भीति किंवा वचक नाही वाटत. त्यामुळे लोक म्हणतात, 'तुमचीं मुलें तुमच्या्शी बरोबरीच्या मित्राप्रमाणे वागतात'. स्नेहरूप साधनेचें हें लक्षण आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पोरी, 'हजार कामें टाकून भेटीला या' असें जर तू म्हणालीस तर त्याचा अर्थ असा होईल की स्नेहानें अहंतेचा बांध फोडला आणि तो स्नेह तुझ्या व्यक्तित्वात सर्वत्र व्यापून राहिला. तुझ्या भेटीला यायचें म्हणजे मी मुद्दाम येतो, कामें संभाळून येतो, कामें रद्द करूनहि येतो. कारण, माझ्या अपत्यांची व कुटुंबीयांची भेट हा आता माझ्या आसक्तीचा अगर मोहाचा भाग राहिलेला नाही. वैयक्तिक, कौटुंबिक, आणि सामाजिक असे वेगवेगळे कप्पे जीवनात शिल्लक राहिले आणि त्यांच्यात विरोध किंवा विसंगति राहिली तर विसंवादी व्यक्तित्व कायम राहतें.

वर्धा.
२८.३.'५२

●

परवा निघून आलो खरा पण अंतरींची वेदना माझी मला माहीत किंवा तुला माहीत ! कुमुद आणि चंदुराजा यांचा जन्म रायपुरला माझ्या वडिलांच्या घरीं एकाच दिवशीं झाला. ती विधवा झाली. माझ्या कुशीत तोंड खुपसून विचारू लागली, 'दादा, आम्ही देवाचा अगर माणसाचा कोणाचा हो अपराध केला ! ही कुऱ्हाड आमच्यावर कां कोसळली ! डॉ. दाजीसाहेब पटवर्धनहि आले होते.

इटारशी
५.७.'५२

●

परवा सकाळीं येथे मिळालेल्या पाऊण तासात तुझें स्वतःच्या हातचें पत्र वाचलें. ललुआची भेट झाली. तो मला पोचवायला बसवर आला. तुमच्या आईची भेट मात्र झाली नव्हती. तुझें पत्र वाचून कृतकृत्यता वाटली. पोरी, तू खाटल्याला लाथ मारून उठलीस या गोष्टीला माझ्या दृष्टीने किती महत्त्व आहे हें तुझ्याच लक्षात येऊ शकेल. तू माझी पोर आहेस, माझी आशा आहेस, माझी आकांक्षा आहेस ! तू आता खुशाल आपल्या दैवावरोबर खेळ ! ईश्वराची सृष्टिदेखील त्याची 'लीलाच' नाही का ? आपलें जीवन ही आपली लीला झाली म्हणजे त्यात ईश्वरनिष्ठा,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सहजता, पावित्र्य आणि मांगल्य सारें काही आलें. तू एकदा आनंदाने नाचू – वागडू लागलीस की मला सगळें मिळालें असें मी समजेन. सोनुलें, तुझ्या व्यक्तित्वाला पैलू आहेत, उन्मेष आहेत. म्हणून तर मी पंढरपुरला म्हणालो, "मनू, तू माझ्यापेक्षा पुष्कळ मोठी हो!" तू म्हणालीस "मोठी खात्रीने होईन!" पंढरीराय माझें पांग फेडील ना? माझ्या पोटची पोर माझ्या आशेचा तंतु आहे.

नागपुर.
१२.१०.'५२.

भजनाच्या बावतीत माझी वागणूक तुला निष्ठुरपणाची वाटली. मनू, मी निष्ठुर नाही ग! तुझ्यासाठी तर फाजील हळुवार आहे पण तुझी भूमिका व तुझें सत्त्व मी ओळखतो. म्हणून कणखरपणें त्यांचें अनुसरण व्हावें असा प्रयत्न करतो. संगीताचें शास्त्र व कोकिळेचा कंठ हा कलेचा शृंगार असेल. कलेचा आत्मा भावनेच्या उदात्ततेत आणि निष्टेच्या शुद्धतेत आहे. कलावंताचें संगीत रसिकांना डोलवील पण निष्ठावंताचें भजन थिजलेल्या धमन्यांत ऊनऊन नवजीवनाचा संचार करतें. तू सत्यनिष्ठ आहेस तशी प्रामाणिकहि आहेस. आपलें व्यक्तित्व व भूमिका यांच्याशी प्रामाणिक रहा. पुन्हा सांगतो, "भजन सोडू नकोस. एकांतात ध्यान, जप व नामस्मरण कर. लोकात बसून भजन कर. भजन व भाषण यांच्यात फरक मानू नकोस. विषाद सोड. अंतःकरणपूर्वक धाय मोकलून भजन कर.

विशिष्ट हेतूने स्वीकारलेलें ब्रह्मचर्य निरपेक्ष व निर्भेळ नसतें हें कोण नाकबूल करील? तें सोपाधिक व मर्यादित असते. निरपेक्ष ब्रह्मचर्याला देश-काल किंवा विशिष्ट हेतूची मर्यादा नसते. तें ब्रह्माकरिताच असतें. या बावतीत माझें म्हणणें निराळें कधीच नव्हतें. ज्या ब्रह्माकरिता व्रत पाळायचें त्या ब्रह्माच्या निष्ठा द्विविध आहेत, एक 'अहं ब्रह्मास्मि' आणि दुसरी 'सर्वं खल्विदं ब्रह्म'. विनोबांच्या ब्रह्मचर्यात या दोन्ही निष्ठा एकवटलेल्या आहेत. तसें तुझेंहि होत आहे. "भूदान-यज्ञ मला ईश्वराच्या भजनाइतकाच पवित्र व उदात्त वाटतो," असें तूच नाही का म्हणालीस?

धनतोली, नागपूर.
१३.१२.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तू अगदी मोकळेपणाने भजनें व भाषणें कर. संगीत शास्त्राच्या अध्ययनानंतरच कला साधते असें थोडेंच आहे ? आधी शास्त्र झालें कीं आधी कला ? कला स्वाभाविक आहे, शास्त्र नंतर बनतें. तुझ्या भजनातील संगीताची गोडी आणि त्याचा महिमा शास्त्रीय संगीतापेक्षा विशेष आहे.

Moral beauty is an exceptional and very striking phenomenon. He who has contemplated it but once, never forgets its aspect. This form of beauty is far more impressive than the beauty of Nature and **of Science.** It gives to those who possess it divine gifts, a strange, an inexplicable power. It increases the strength of intellect. It establishes peace among men. Much more than Science, art and religious rites, moral beauty is the basis of civilization. **Song easily becomes transformed with prayer.**

वैज्ञानिकांचें कलेविषयीं काय म्हणणें आहे तें तुझ्या ध्यानात येईल. सौंदर्य सुंदर वृत्तीत व सुंदर निर्मितीत आहे. मनाचें व हृदयाचें सौंदर्य कंठात उतरलें आहे ना ?

Beauty is an inexhaustible source of happiness for those who discover its abode. it is hidden every where. it springs from the hands which model or decorate home-made earthenware, which carve wood, which weave silk, which chisel marble, which open and repair human flesh. कराग्रे वसते लक्ष्मी ! शास्त्रीय संगीतात कलेचा आनंद व प्रसाद क्वचितच आढळतो. स्वाभाविक ईश्वरनिष्ठा, आणि जन्मसिद्ध ब्रह्मचर्य हीं आध्यात्मिक व नैतिक मूल्यें तुझ्या कलेत आहेत. आता आणखी काय हवें ?

It requires an elevation of the mind toward a being who is the source of all things, toward a power, a centre of forces whom the mystic calls God...... The beauty thus pursued is still richer and more indefinable than the ideal of the artist. It has no form. It cannot be expressed in any language. It hides within the things of the visible world. मत्स्थानि सर्वं भूतानि न चाहं तेष्ववस्थितः ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून म्हणतो, मायबाई, आपलें स्वत्व संभाळ, आपलें सत्त्व राख. तुझें स्वत्व ईश्वर-निष्ठेत आणि ब्रह्मचर्यात आहे. या जन्मसिद्ध गुणांचा सामाजिक विनियोग करणें हें तुझें सत्त्व आहे. स्वत्व आणि सत्त्व दोन्हींचा उत्कर्ष एकमेकांच्या द्वारें झाला की integration पूर्ण झालें.

येनवा (काटोल)
१६. १२. '५२

●

उत्कटता व सहवासाची गोडी नित्य वाढत जावी हें वासना-विकार-रहित प्रेमाचें वैशिष्ट्यच आहे. वासनेचा वेग आणि विकाराचा जोम ओसरला म्हणजे विकारी प्रेमाची गोडवी व तीव्रताहि कमी कमी होत जाते. येथे तसें होण्याचें कारण नाही. ताईला म्हणावें, 'तुझ्या आत्म-समर्पणाची सर दादाला कधीच येणार नाही. तुझें प्रेम अनुपम आहे. पण दादाच्या प्रेमात एक अनन्य वैशिष्टच आहे. पितृत्व हें मातृत्वाने समृद्ध व धन्य झालें आहे. त्यामुळे त्या प्रेमात पितृत्वाच्या सगळ्या कला मातृत्वाच्या षोडश कलांमध्ये मिसळून गेल्या आहेत. तें अमृत दुप्पट जीवनदायी बनलें आहे !

पोरी, तू गेलीस त्या वेळीं सगळा प्राण डोळ्यांत गोळा होऊन तुझ्याकडे धाव घेत होता. तू माझी आत्मजा आहेस. काळजाचा तुकडा राहू शकेल. प्राण पांच राहू शकतील. पण आत्म्याचीं शकलें होऊ शकत नाहीत. "पूर्णमदः पूर्णमिदम् ।" म्हणून "आत्मा वै पुत्र नाम आसीत्". पुत्र=अपत्य !

धनतोली. नागपुर.
२३.४.'५३

●

तू पर्वतीय प्रदेशातून आता खाली येणार आहेस आणि मी शहरां-कडून डोंगराच्या पायथ्याशी चाललो आहे. डोंगर, दऱ्या-खोरीं, नद्या-निर्झर यांचें सौंदर्य जसें मला आकर्षक वाटतें तसेंच शहरें, बागा, रस्ते, तलाव यांचें मानवकृत सौंदर्यहि मोठें मनोज्ञ वाटतें. नीटनेटकीं गांवें, ठाकठिकीचीं शहरें पाहिलीं, निरनिराळ्या प्रकारच्या सुरेख इमारती, हवेल्या, वाडे, महाल, मशिदी, देवळें, गिरिजाघरें, गुरुद्वारें पाहिलें म्हणजे दृष्टीला सुख

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होतें. किती तरी प्रकारच्या मेहरपी, कमानी, मनोरे, कळस, घुमट पहायला मिळतात. माझी नजर सारखी खेळत असते. मानवी निष्ठेच्या व भावनेच्या कलाकृतीत निसर्गापेक्षा कमी रम्यता नाही. तू म्हणशील तुम्ही अगदीच वहिर्मुखवृत्तीचे आणि पार्थिव आहात ! मी कुठल्या तोंडाने नाकारू ?

हस्तकौशल्य व कारागिरी पाहूनहि मानवावद्दलचा आदर व आत्मीयता वाढते. अमरोहचें लांकडी रंगकाम, नगीन्याचें लांकडी नक्षीकाम आणि मुरादावादच्या भांड्यावरील नक्षीकाम पाहून कोणाचें हृदय नाचणार नाही ? विश्वाच्या कलाकाराला वाहिलेला हा नैवेद्य आहे.

नीटनेटकीं माणसें, सुंदर झाडें, देखणीं जनावरें, गोजिरवाणी मुलें पाहून कोणाच्या डोळ्यांचें पारणें फिटणार नाही वरें ? माझी 'साजरी-सुजरी' पोर देवाची एक छानदार कलाकृति नाही का ? मला ती अधिकच प्रिय आहे. हे वघ, डोंगर दिसू लागले. एकापेक्षा एक उंच शिखरें ! माझ्या मनूच्या व्यक्तित्वाच्या विकासाचें सोपान. ती पहा ! डोंगरी नदी ! गोला नदी तिचें नांव ! 'स्वभाव स्वेच्छानाम्' अशा तोय-तरंगांनी वागडणारी. माझ्या मनूच्या शीलाची आठवण करून देणारी ! – "माझ्या मनूला मी जितका ओळखतों तितका कुणीच ओळखीत नाही !" कोणी काहीहि म्हणो – माझी पोर देखील काहीहि म्हणो – ही वस्तुस्थिति आहे.

वरेली.
१९.९.५३

जे. पीं. च्या वरोवर त्यांची इच्छा असेल तोंवर तू रहावेंस असें माझें म्हणणें आहे. तू वाटल्यास 'आज्ञा' म्हण. माझी 'आज्ञा' काही तुला कुठल्याहि वेतनाच्या सुवर्ण-रज्जूनी वांधत नाही. ती माझ्या आंतड्यांनी वांधते. तू वेड्या व दांवे तोडशील. आंतडी तोडण्याची तुझी विशाद नाही. माझ्याजवळ वेडी नाही, दांवे नाही, दोरखंड नाही. गजेंद्रमोक्ष वाचत होतीस ना ? गजेंद्राजवळ कुठलें दोर होतें. मग देव कशाला धावून आला ? 'वाध्य' नाहीस 'वध्य'हि नाहीस, हें अगदी खरें. अगदी 'मुक्त' आहेस; पण वेदरकार नाहीस. कोण म्हणतें ? – मी !

'चांदण्यातहि स्वाद असू शकतो हे ज्ञानेश्वरी वरून लक्षात येतें' असें तू म्हणालीस ना ? तुझ्या व्यक्तित्वाच्या प्रभेतहि लज्जत व सुवास आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याचें माधुर्य व पावित्र्य उत्तरोत्तर विकसित होईल. माझ्या निर्व्याज वात्सल्यातून उद्भवलेला हा आशीर्वाद आहे.

पाटणा.
२०.३.'५४

बेटा, सांप विषारी असला तरी मण्याला त्याचें विष बाधत नाही. मी पवित्रभावनेने साधना केली. माय – बापत्वाच्या भूमिकेत तिचा परिपाक झाला. त्या नितांत पवित्र अधिकाराने तुला आशीर्वाद देतो की माझ्यात जें जें म्हणून अमंगल शिल्लक राहिलें असेल तें तुला कधीच बाधणार नाही.

तुला लाभलेली 'देवदत्त देणगी' माझ्या आशीर्वादाने तुला जपून ठेवता येवो अशी इच्छा तू व्यक्त केली आहेस. तू मला त्रैलोक्याचें पावित्र्याचें ऐश्वर्य देऊन गौरविलेंस! त्या पावित्र्याला स्मरूनच, माझे पोटचे पोरी, तुला आशीर्वाद देतो की अशा देणग्यांनी तुझें व्यक्तित्व समृद्ध व सर्वांग सुंदर होवो! एकीकडे हें दिव्य वैभव आणि दुसरीकडे शल्याची मन:पीडा अशी स्थिति टिकणें शक्य नाही. तुझा मन:प्रसाद तुला परत मिळावा अशी मी त्या दयाघनाची करुणा भाकीत असतो.

If one weeps sincerely for Him, He surely manifests Himself.

रामकृष्ण परमहंस देवांनी आपल्या प्राणाहून प्रिय अशा नरेंद्राला दिलेला हा निर्वाळा आहे. तो अन्यथा कसा ठरेल? माझें प्रेम शाबूत आहे. माझी प्रार्थना तळमळीची आहे. माझा आशीर्वाद अंत:करणाच्या गाभाऱ्या-तून निघालेला आहे. तो कदापि फोल ठरणार नाही.

पाटणा.
२२.३.'५४

माझी बुद्धि म्हणजे मातेचा प्रेम-पान्हा आहे ना? मग तिची प्रेरणा तुझ्या विकासाला पोषकच नाही का राहणार? शिवाय, तुझें जीवन साधनामय आहे. साधनामय जीवनाची किमया अशी असते की अंतराय व विघ्नेंदेखील साधनेच्या उपकरणात परिणत होतात. या प्रकरणीं तर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आप्ता-आप्तांचा शुभ-संयोग होता. त्यांतून दुप्पट शुभ निष्पन्न झाल्यावांचून कसें राहील? माझे मनू, तुझ्या मातेचें दूध काळत्रयीं नासायचें नाही. तुझ्या पुरतें तें अमृतच राहील. मनमुराद व विनदिक्कत पीत जा! निर्विकल्प निष्ठेतून निरंतर विकासच पदरीं पडेल.

आगगाडी.
१.४.'५४

●

माझे मनू,

आज गुढीपाडवा! आज तू येणार. ध्यानीं मनीं नसतांना येणार. या योगायोगात काय काहीच अर्थ नसेल? अरविंद म्हणतात, या विश्वाचा विधाता सर्वज्ञ आहे. त्याच्या योजनेत आकस्मिक काहीच घडत नाही. मनू तू माझें अनन्य अपत्य आहेस. शारीरिक मातृत्व कितीहि थोर असलें तरी शेवटीं मर्यादित असतें. शारीरिक पितृत्व कितीहि उदात्त असलें तरी तें परिमित असतें. पण, या पलीकडे जें मातृत्व-पितृत्व असतें त्यात मातृत्व पितृत्वात व पितृत्व मातृत्वात मिसळून जातें. अमृतापेक्षाहि दिव्य असें जीवनदायी तत्त्व त्यांतून निष्पन्न होतें. तें तुझ्या आविर्भावाने मला लाभलें. वर्षप्रतिपदेला तू चालून आलीस. देवाचें वात्सल्य अनंत प्रकारें व्यक्त होतें. त्याचें छत्र तुझ्या शिरावर निरंतर राहो.

अनेक उत्तम आशीर्वाद,
तुझा दादा.

चैत्र शुध्द प्रतिपदा, पाटणा.
४.४.'५४.

●

माझें सारें लक्ष तुझ्याकडे आहे. पावसाळ्याचे दिवस. बिहारचें अव्यवस्था–चातुर्य! माझ्या मनूचे जे हाल होत असतील त्याची कल्पना मला आहे. ज्यांना 'पूर्ण कामीं रामीं' उपरति आली त्यांना आवश्यकता कशाचीच उरत नाही. एका लंगोटाची देखील व्याद वाटते. भिक्षान्नहि अनावश्यक वाटतें. त्यांच्या कोशात 'आवश्यकता', 'गरज' हें शब्दच शिल्लक राहत नाहीत. म्हणून हा 'आवश्यकता योग' बेतात ठेवावा. त्यात तारतम्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असू द्यावें. तुझ्या बाबतीत तें मला कळतें. त्यातील मर्यादाहि मला तुझ्या पुरत्या कळतात. माझा निरुपाधिक स्नेह मला विनचूक मार्ग दाखवितो.

धनतोली, नागपुर.
१४.७.'५४

माझे मनू,

आज तुझें पत्र आलें. आजचा दिवस श्रावणीचा. आज वेदोपाकर्म (वेद + उपाकर्म) करायचें असतें. देव, ऋषि आणि आचार्य यांचें पुण्यस्मरण करून ज्ञानाला उजाळा द्यायचा असतो. व्रतबंधाचें स्मरण म्हणून जानवेंहि नवें घालतात. आजच्या दिवशीं तुझें पत्र आलें. पोरी, माझ्यापोटीं तू साक्षात गायत्री आलीस. 'गायन्तं त्रायसे यस्मात् गायत्री त्वम् ततः स्मृता'. यज्ञाने देवांचें ऋण फेडायचें असतें, ब्रह्मचर्याने ऋषींचें आणि प्रजेने पितरांचें. तुझ्या जन्मामुळे माझीं तिन्ही ऋणें युगपत् फेडलीं गेलीं. पुत्रांकडून किंवा शिष्यांकडून 'पराजय' होतो असें म्हणणारा अरसिक असला पाहिजे. हा तर जयाचा कळस आहे. माझी मनू माझी शिष्या नाही. माझें लेकरूं आहे. माझ्यापेक्षा सव्वापट नाही शतपट निघाली नाही तर ती अल्पसत्त्व ठरेल! तें पत्र वाचून किती तरी वेळा गळा दाटला. डोळे भरून आले. त्या सुखाला उपमा नाही. नाहीच उपमा. आज तू माझें खरें उपाकर्म केलेंस. 'यत्त्वगस्थिगतं' सारें काही या तुझ्या प्रेम रसायनाने 'दहत्वग्निरिवेन्धनम्'. पोरी, आज श्रावणी साजरी झाली. नारळी पौर्णिमाहि साजरी झाली. डोळ्यांतून पवित्र अश्रु निघाले. महोदधीचें स्नान घडलें. ज्या पावसाने वरुण तुला मंगलाभिषेक करीत होता, त्याचेंहि स्मरण झालें.

पाटणा.
१४.८.'५४

आज विहारमधील लोकांचा जियतीचा सण आहे. आया आपल्या पुत्राला उदंड आयुष्य लाभावें म्हणून आज उपवास करतात. 'जीवित-पुत्रिके'चा हा सण आहे. मुलाच्या जिवावरील एकादें अरिष्ट टळलें म्हणजे त्याच्या आईने आस्थापूर्वक जियतीचें व्रत केलें असावें, असें लोक म्हणतात. जीमूतवाहनाने नागपुत्राऐवजी करुणेने स्वतःचा बळी गरुडाला दिल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि जगाला आदर्श करुणेचा कित्ता घालून दिला अशी एक कथा आहे. स्वतःचे प्राण दिल्यामुळे जीमूतवाहन अमर झाला. म्हणून आया मोठ्या भक्तिभावाने त्याचा दिन पाळतात. माझ्या मनूचें पत्र, तार, फोन काहीच नाही. तिच्या प्रकृतीविषयीं, बनारसी बाबू व रामेश्वरजी अग्रवाल यांस चिंता वाटते. अनंत तपस्व्यांच्या तपस्यांचा साक्षी आणि मानवीय आकांक्षांच्या उदात्ततेचें प्रतीक गौरीशंकर शिखर माझ्यासमोर आहे. चि० मनूराजा चिरंजीव होवो अशी या जियतीच्या शुभ मुहूर्तावर मी देवाजवळ प्रार्थना करतो.

पूर्णियां.
१९.९.'५४

या नवीन बिऱ्हाडीं माणसांची उणीव नाही. पण माझी मनू नाही. त्यामुळे गोडवा नाही. मनूने नवीन मच्छरदाणी आधी मला लावून दिली, मग आपण लावली. मानवप्रेमाला दिव्यत्व प्राप्त झाल्याचें हें लक्षण आहे. मनूची जुनी मच्छरदाणी लावून मी झोपतो. माझ्या अपत्याच्या प्रेमाची ती पाखर आहे. मनूबरोबर केव्हा रहायला मिळेल असें मला झालें आहे.

पाटणा.
५.१०.'५४

ता. २० च्या पत्रावर 'दादांचा मनू राजा' अशी सही आहे. दिवाळीला त्रिभुवनाचें वैभव मिळाल्याचा मला आनंद झाला. सोनू, त्या शब्दांत किमया आहे.

तुझ्या प्रकृतीची काळजी मला वाटणें तुझ्या हातचें नाही. तुझा त्या बाबतीत इलाज नाही. पण, त्यामुळे तुझ्या कार्यक्रमात व्यत्यय येत नाही ना? फक्त मी मधून मधून तार करतो, फोन करतो, एकादे वेळीं स्वतः येईनहि; एवढेंच. तेवढें सहन कर. बाकी मला काळजी वाटते तर खुशाल वाटू दे. तो एक माझा स्वभाव दोष आहे. बेटा, तू आपल्या मनावर मुळीच भार ठेवू नकोस.

पाटणा.
२५.१०.'५४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आज त्रिपुरी पौर्णिमा. त्रिपुराला, त्रिभुवनाला आलोकित करणारी पौर्णिमा. एरवीच तुला लिहू लागलो म्हणजे सारा जीव माझ्या लेखणीत उतरतो. अलीकडे तर जे लिहितो तें अगदी ध्यानावस्थित होऊन लिहितो. बुद्धिवादाच्या पलीकडे माझी मीमांसावृत्ति गेली आहे. मनूराजाला लिहू लागलो म्हणजे तर युक्तिवादाचा मागमूसहि शिल्लक राहत नाही. माझी पोर जशी शुद्ध व निर्मळ आहे, तशीच माझी वृत्तिहि होते.

१०.११.'५४

बेटा, आपल्या अपत्यांचें शरीर अधिक डौलदार व रंगदार व्हावें आणि त्यांचें मन पीळदार व बाणेदार असावें असें कुठल्या आईबापांना वाटत नाही ? माझ्या शरीराचा कमकुवतपणा व वृत्तीचा दुबळेपणा किंवा भिकारपणा तुमच्या व्यक्तित्वात उतरू नये याची मी निरंतर काळजी घेत असतो. व्यापक स्नेहाच्या अधिष्ठानावर समाजाची उभारणी व्हावी हीच माझी आकांक्षा आहे. स्नेहाचें तें तत्त्व जितकें व्यापक तितकेंच उत्कट असतें. वैयक्तिक जीवनात तें जिव्हाळ्याच्या व अगत्याच्या रूपाने व्यक्त होतें. सत्य, अहिंसा, अपरिग्रह हीं तत्त्वें ज्याप्रमाणे वैयक्तिक आचरणात प्रकट होतात त्याचप्रमाणे स्नेहाचें भावरूप व विधायक तत्त्वहि प्रकट होतें. स्नेहाने वृत्ति विशद व प्रांजळ होत जाते. संकोच व प्रतारणेला तेथे वावच उरत नाही. ईश्वराची भक्ति जशी श्रीरामाच्या विशेष भक्तीत प्रकट होते तशीच मानवावरील प्रीतिहि विशिष्ट व्यक्तींच्या ठिकाणीं विशेष अभिव्यक्त होते. त्यात विरोध नाही. भक्ति व प्रेम त्याच पद्धतीने व्यक्त व विकसित होतात.

जोधपुर.
१.१.'५५

बेटा, तू काल सकाळीं गेलीस आणि माझें सारें अंत:करण तुझ्या बरोबर गेलें. लोक म्हणतात गेल्या पन्नास-साठ वर्षांत अशी भयंकर थंडी पडल्याचें आठवत नाही. मोठी डसणारी थंडी आहे. माझी मनू प्रवासात राहणार. तिचें हाल होतील. चित्त मोठें बेचैन होतें. साऱ्या जिवाची पाखर करून मनूवर घालावी असें वाटतें. या वेळीं तुला निरोप देणें फार जड

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गेलें. कार्यक्रम रद्द करावा असेंच राहून राहून वाटे. तुझा विरस होईल या एकाच विचाराने रद्द करविला नाही. देव आणि दुनिया दोघांचेंहि कार्य तू करीत आहेस. दोघांनी मिळून तुझा संभाळ करावा. माझा सारा जीव हळुवारपणें डोळयांत तेल घालून राखणदारी करीत राहील.

पाटणा.
८.१.'५५

माझ्या वृत्तीतील व व्यक्तित्वातील सारीं तुरट, कडु तत्त्वें स्नेह-रसायनात विरघळून तुझ्यापुरतीं अमृतमय बनून जातात. 'अमृतातें पैजा जिंके', असा प्रत्यय मनात उठतो. तुझ्या व्यक्तित्वातील उदात्त माधुर्य उत्तरोत्तर वृद्धिगत होऊन आसमंतात व्याप्त होवो हीच आज प्रार्थना करतो.

पाटणा.
१३.१.'५५

आज रामनवमी आहे. आज 'मनुनवमी' हि आहे. दादाला कोणाच्या वाढदिवसाची आठवण नसते. बबाताई, बाळू, बबन, चंदू यांच्यापैकी कोणाचेहि वाढदिवस त्याला महत्त्वाचे वाटले नाहीत. इतर व्यक्तींचे वाढदिवस किंवा पुण्यतिथ्या त्याने स्वतःच्या इच्छेने साजऱ्या केल्या नाहीत. पण, मनूचा वाढदिवस आला म्हणजे दादा गंभीर चिंतन व प्रार्थनाहि करतो. दत्तक मुलाचे दोन वाढदिवस असतात – एक जन्मदिन आणि दुसरा दत्त-विधानाचा दिवस. पण, मनूराजे दत्तक नाहीत. औरस आहेत. त्यांचा जन्म रामनवमीलाच झाला. त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासाकरिता दादाच्या अंतःकरणात प्रार्थनेच्या तारा थरथरत असतात.

राम मला फार आवडतो. त्याची आठवण झाली म्हणजे जीवनात 'राम'हि वाटतो आणि 'आराम'हि वाटतो. लहानपणीं विश्वामित्राच्या सुपुर्द झाला. चवदा वर्षें वनवासात गेलीं. सृष्टीचें वैभव उदंड होतें. पण त्याच्या जीवनात 'सीताविरहा'चा वणवा पेटलेला. आई, बाप, भाऊ, गुरुजन, मित्र, शत्रु, नागरिक, संत सगळयांशी वागतांना शीलाच्या व स्नेहाच्या मर्यादा पालन करण्याचा सतत प्रयत्न केला. शक्ति उणी पडली. तोल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राखण्याचा प्रयत्न मात्र कसोसीने केला. काही प्रसंगीं तोलहि गेला. पण, त्याच्या प्रमादशीलतेतहि त्याच्यावद्दल सहानुभूति वाटते. राम अचाट नाही, अफाट नाही, आवांक्या बाहेरचा नाही. त्याच्या व्यक्तित्वात समेट आहे, तडजोड आहे, पण तो समेट समन्वयाच्या प्रयत्नांतून निपजला आणि ती तडजोड सार्वत्रिक मर्यादेच्या संरक्षणाच्या धडपडीतून जन्माला आली. रामचरित्र क्वचित् सदोष अशी उदात्त व मनोज्ञ कलाकृति आहे. म्हणूनच त्याचें विभूतिमत्त्व मानवी वाटतें.

आज मानवी विभूतिमत्त्वाची आकांक्षा परिस्थितीत आहे. चमत्कार कुशल अतिमानवाच्या सामर्थ्याने मानवप्राण्याचें रक्षण होईल. पण, मानवी मूल्यांचें, मनुष्याच्या व्यक्तित्वाचें रक्षण होणार नाही. सामान्य मानवाच्या व्यक्तित्वात त्रिकालावाधित मूल्यांची प्राण प्रतिष्ठा व्हायला हवी. साधारण माणूस विभूतिमत्त्वाच्या सोपानावर चढू लागला पाहिजे. यंत्रवादाच्या मगरमिठीतून त्याची सुटका व्हावी अशी उत्कंठा आसमंतात पसरली आहे. जडाच्या सत्तेऐवजी चैतन्याची सत्ता त्याच्या पुरुषार्थाने स्थापन झाली पाहिजे. जडाची सत्ता म्हणजे वासनांचें व विकाराचें साम्राज्य. चेतनाची सत्ता म्हणजे बुद्धीचें व सद्‌भावनेचें स्वराज्य. विज्ञानामुळे चेतनाच्या सत्तेची आवश्यकता व आकांक्षाहि उत्पन्न होऊ पाहत आहे. पण, विचारात सामर्थ्य असलें, शब्दात स्वत:सिद्ध वोधकत्व असलें तरी शब्दाला प्रामाण्य मात्र विभूतिमत्त्वानेच येतें. म्हणून आजचें युग हें विचारयुगाच्या पूर्वीचें 'विभूतियुग' आहे. त्यामुळे विनोबांनंतरच माझी दृष्टि सहजच जे० पी० व मनू यांच्याकडे वळते. विभूतींच्या सत्तेचें यथार्थ प्रतिविंव तुमच्या अंत:करणात व व्यक्तित्वात उमटतें. किंवहुना तें प्रतिविंवच नव्हे, दोन ज्योतींचा प्रकाश एकमेकांमध्ये मिसळून एकरूप होतो. श्री अरविंद, माताजी, कृष्णमूर्ति, विनोबा यांच्या विभूतिमत्त्वाशी सहज साधर्म्य तुमच्या व्यक्तित्वात सांठविलेलें आहे. धीरेन्दा, बावला, वुलूवावू यांच्या सारख्या कर्मयोग्यांच्या तपांतून वैज्ञानिक आविष्कारांहून भिन्न अशी मानवी योगशक्ति निर्माण होईल. म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विभूतिमत्त्वाची सुप्त शक्ति आहे. त्यामुळे मी थोडीशी वस्तुमीमांसा मधून मधून करीत असतो. वस्तुस्थिति मोठी उदासीन असते. गोंजारलें तर ती अनुकूल होत नाही, शरण गेलें तर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ती गय करीत नाही. पाठमोरें झालें तरी ती पाठ पुरविल्यावांचून राहत नाही. आणि इनकार केल्याने ती नाहीशी होत नाही. तेव्हा नम्रपणें तिला तोंड देणेंच प्राप्त आहे. माझ्या शाबूत बुद्धीला वस्तुस्थिति स्वरूप प्रकृति-देवतेचें जें ध्यान ज्या वेळीं दिसतें तें त्या वेळीं मांडतो.

बेटा, माझा पिंड अगदीच टाकाऊ आहे. पण, बुद्धि मात्र खोटी नाही. म्हणून ती माझी नव्हेच. तिसऱ्या वर्गाच्या मुशाफरखान्यात एक सावकार अगदी खरीं रत्नें विसरून गेला. एका अगदी मळकट चिरगुटात तीं बांधलीं होतीं. तसें माझ्या बाबतीत घडलें आहे. चिरगुट भिकार व घाणेरडे आहे. विचार मात्र खरे आहेत. म्हणूनच मी म्हणत असतो ते माझे नाहीत. या चिरगुटांतून लवकर काढून ते ज्यांना शोभतील त्यांचे विग्रह अलंकृत करोत.

आज तुझा वाढदिवस. त्या निमित्ताने हा नैवेद्य देवाकरिता वाढून आणला. तेंच ताट मनूपुढे ठेवलें. व्यक्तिनिरपेक्ष, स्पर्शनिरपेक्ष व सान्निध्य-निरपेक्ष विश्वव्यापी प्रेमतत्त्वाची अनुभूति तुला येऊ लागली आहे असें तुझें म्हणणें. आता जर कोठे एकाद्या कोपऱ्यात क्रोध व अहंकार दडून बसलेले असले तर मौन व उपवास यांच्या मदतीने ते जायचे नाहीत. त्या व्यापक प्रेमतत्त्वाच्या अनुष्ठानानेच त्यांचें तोंड काळें होईल. माझ्या बुद्धीला हें स्पष्ट दिसतें.

दादा स्वतःला विसरून बोलू लागला म्हणजे त्याच्या तोंडून 'राम' बोलतो. आज रामनवमीने पावन झालेल्या मनुनवमीला त्याच्या निर्विकार बुद्धीला जें दिसलें, तें त्याने व्यक्त केलें.

पाटणा.
१९.४.'५६ रामनवमी.

•

माझ्या चिरंजीव मनूराजा,

हो, चिरंजीव ! माझ्या मनूला चिरंजीव होण्याचा अधिकार नसेल, तर अश्वत्थामा, बलि, व्यास प्रभृतींनाहि नाही. माझा चिरंजीव 'शुद्धसत्त्व' आहे ! तल्लख असला म्हणून काय झालें ? तल्लख या सहाजणांपैकी कोण नव्हतें ? परशुराम तर तल्लखपणाचा पुतळाच होता. देवप्रयागला अलकनंदा व भागीरथी यांच्या प्रवाहात केवढा वेग होता ! माझ्या चिरंजीवाला नांवें ठेवायला जागा नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बेटा, परवापासून आजपर्यंत तुझ्या वाढदिवसाचा परम मंगल सोहळा आहे. अक्का–बापूंचे आशीर्वाद आले. दादाच्या जीवाची पांखर तुझ्या भोवती आहे. परदेश झाला म्हणून काय झालें ? पंचमहाभूतें आणि त्यांचा अधिष्ठाता सर्वत्र एकच आहे. माझ्या पाडसाचें तो रक्षण करील, त्याच्या-वर सतत पहारा ठेवील. मनू, जो विश्वंभर आहे तोच तुझा राखणदार आहे. 'सर्वतः पातु राघवः ।'

तुझीं १६ व १७ चीं पत्रें रंगाने दिलीं. अंतःकरण उचंबळलें. वाटलें, आत्ताच्या आत्ता उडून जाऊन मनूला पोटाशी धरावें. 'परकी पोर' ? कोण ? माझ्या पोटच्या गोळ्याला पुन्हा नकोस असें म्हणू. तोकडे कोण ठरलें ? मनू ? छे ! तिच्या भव्यतेला सीमा नाही. मनूने दादाच्या ठिकाणीं विश्वकुटुंबवृत्तीचा 'ओनामा' केला. माझे मुली, स्त्री-पुरुष भेदभावाची वैतरणी मी तुझ्या पुण्यप्रसादाने तरू शकलो. माझीं अपत्यें भगवंताच्या विभूति आहेत. माझ्या अंतःकरणात भावनांचें काहूर माजलें आहे. शब्द थबकतात. वाणी कुंठित होते ! सर्वांगातून प्रेमयुक्त आशीर्वादाचे पाझर बाहेर पडतात. मनूचें सर्वत्र कल्याण होवो !

उरुळी-कांचन
१७.४.'५९

परवा तू मुंबईला पोचशील. जेथे मनू तेथे दादा ! दादाचें कलेवर दिल्लीला असेल, पण दादा मात्र मुंबईच्या विमानतळावर ता० ६ रोजीं 'दुपारीं' मनूला घ्यायला जिवाभावाने हजर राहील. विमानांतून उतरलेली मनू दादाच्या कुशीतच पाऊल ठेवील ! त्याचे पंचप्राण मनूला ओंवाळतील. त्याच्या वात्सल्याचा टिळा मनूच्या कपाळावर लावला जाईल. अण्णा बेट्राबेट, मुंबईची पुत्रमित्रमंडळी आणि इतर सुहृद, दादा ठकार यांनी केलेल्या स्वागतात दादा दिल्लीवरूनच सामील राहील. राजा, तुला मार्कंडेयाचें आयुष्य व पुण्यश्लोक विभूतींचें यश लाभो. "शेषं मौनेन पूरयेत्"

कानपुर.
४.९.'५९

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुझ्याकरिता मात्र खरोखर पुणें हें 'पुण्यपत्तन' झालें आहे.

"महाराष्ट्रीं बाळ
द्विजकुलजवर गंगाधरसुत
वसे पुण्यक्षेत्रीं
तिलक उपनामें श्रुतिरत"

असें स्वतःचें वर्णन आत्मपरिचय देतांना टिळकांनी गीतारहस्याच्या अर्पण पत्रिकेत केलें आहे. जें पुणें महाराष्ट्राच्या लोककारणाचें 'राज्यक्षेत्र' होतें, तें तुलास्नेहक्षेत्र व पुण्यक्षेत्र झालें आहे. विनोबांचें म्हणणें की संस्थांकडून माणसांकडे वळण्यात खरा 'नया मोड' आहे. पुण्याला दरेक बोळांत एक तरी संस्था आहे, पण तुझा प्रवेश पुण्याच्या अगत्याच्या आणि आतिथ्याच्या थेट गाभाऱ्यात झालेला आहे. पुरुषांची मैत्री उंबरठ्याच्या आत शिरली तर ओसरीपर्यंत, कचेरीपर्यंत, बैठकीपर्यंत जाते. तुझा प्रवेश ताराबाई, कमलताई, नलू, माणिकताई, सुनंदाताई, मुक्ताबाई, गुलबेन, निर्मलाताई यांच्या मार्फत थेट देवघरापर्यंत व स्वयंपाकघरापर्यंत झाला आहे. संघटनेवांचून व संस्थावांचून स्त्रीशक्तीची वैजयंती सहजगत्या गुंफिली जात आहे. ज्याला स्वतःचें घर नाही तो परागंदा किंवा बैरागीच झाला पाहिजे असें नाही. ज्याला स्वतःचें घर नाही तें माणूस 'विश्व-कुटुंबी' बनतें. संतांच्या स्पर्शानें ज्याप्रमाणे तीर्थक्षेत्रांना पावित्र्य येतें त्याचप्रमाणे विश्वकुटुंबी माणसाच्या वास्तव्याने कुटुंबाला पावित्र्य व प्रतिष्ठा लाभते. परागंदा माणूस किंवा गोसावी कुटुंबाची प्रतिष्ठा वाढवू शकत नाहीत. तेव्हा तुला इतरांच्या उपकारांचा कितीहि भार वाटो. तुझ्या पुण्यातील वास्तव्याचा एकंदरीत उभयपक्षीं शुभपरिणामच झाला आहे. सौहार्द व सौमनस्य वाढलें. भाऊ-महाजन, बाबासाठे, रावसाहेब, पमासाहेब, विठ्ठलराव दीक्षित, डॉ. आपटे सगळ्यांच्या बाबतीत 'सुमांगल्यम् सौमनस्यम् चास्तु' सार्थक झालें आहे.

बंगलोर.
११.मे.' ६०

७

तू दोनच दिवस राहून गेलीस ! पण मला किती तरी बरें वाटलें. आजारानेदेखील अगदी डोकावूनसुद्धा पाहिलें नाही. सगळ्या वातावरणात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

टवटवी आणि सुवास होता. माझें हृदय कसें प्रफुल्लित झालें होतें. या पाळीला तुझ्यासोबत आसामात येण्याची फार इच्छा होती आणि मुंबईला येण्याची तर त्याहून जास्त होती ! पंचप्राणाची पांखर करून तुझ्यावर तिची झूल घालावी असें वाटतें. तुझें स्नेहैश्वर्य वाढत असलेलें पाहून माझें अपत्यवत्सल हृदय हर्षनिर्भर होतें. इंदु म्हणाली 'डब्यात गर्दी होती'. मला वाटतें ती निरोप द्यायला आलेल्या लोकांची व अनधिकृतपणें डब्यात चढणारांची असावी. पुढे ती गर्दी टिकणार नाही अशी आशा वाटते. बबन, बेबी, चंदू, तारा यांच्यात तुझें स्थान पंचायतनातील प्रमुख देवतेचें. चि० बाळू, बबाताई हीं माझीं अपत्यें खरी. पण तुमचे पंचायतन म्हणजे सख्ख्या भावंडांचे ! तुझ्या अंवतीं-भंवतीं तुझीं नवीन नवीन भावंडें गोळा झालीं आणि तीं सगळीं आनंदात नांदू लागलीं तर नंदनवनापेक्षाहि अधिक सुभगतेचें व सुमंगलतेचें वातावरण निर्माण होईल.

वाराणसी
४.३.'६१

तिसऱ्या वर्गाच्या प्रवासात मानवीय स्पर्शापेक्षा जनसंमर्दाचा उपसर्गंच अधिक होतो. गलवला-गोंगाट, गडवड-धडपड, अस्वच्छता, बेदरकारी, गैरशिस्त, गबाळपणा, यांच्या गोंधळात मानवीय भावनांचा कोंडमारा होतो आणि विचारीला वर डोकावण्याचीसुद्धा संधि मिळत नाही. तुझें सगळें व्यक्तित्व सूक्ष्म व उत्कट संवेदनानी संपन्न असें दिव्य तंतुवाद्य आहे. तू अशा mass-society मध्ये प्रवास करण्याचें दु:साहस करू नये. मला सारखी काळजी वाटत होती, धूर आणि धूळ आपल्या देशात फक्त यज्ञ व शिमगा यांच्याच जोडीला येत नाहीत. ते आपल्या जीवनाचेच सहचारी भाव आहेत.

काशी.
७.३.'६१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण चवथें

स्नेहयोग

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: ४ :

काही दिवस बरोबर राहण्याचा योग आला म्हणजे एकमेकांपासून फायदा होतोच. 'मार्गदर्शन करणें' आणि 'मार्गदर्शन घडणें' यांत फार फरक आहे. 'सूर्य प्रकाशतो' हा आरोप आहे. तो फक्त असतो. त्याचें 'असणें' म्हणजेच 'प्रकाशणें' आणि 'प्रकाशणें' म्हणजेच 'प्रकाश देणें'. नदी 'असते' म्हणजेच 'जल देते'. तसेंच माणसाचें आहे. माणसांना एकमेकांच्या स्नेहयुक्त संगतीपासून मार्गदर्शन लाभतें. त्या मार्गदर्शनात जबाबदारीची जाणीव नसते आणि ओझेंहि वाटत नाही. गंमत म्हणून एकत्र राहणें आणि सत्संग करणें यातली तफावत कमी कमी झाली पाहिजे ! 'स्नेह' हें शिक्षणाचें सर्वात गुणकारी अनुमान आहे.

नवी दिल्ली.

१९४९.

●

आज आपण अनिष्ठेच्या व सार्वत्रिक संशयवादाच्या वातावरणात वावरत आहोत. सगळीकडे विचाराची गल्लत आहे, भावनांचा घोटाळा आहे, आकांक्षांचा गोंधळ आहे. इतक्या प्रचंड व अकल्पित प्रमाणांत लोकांचीं जीवनें उन्मळून पडलेलीं आहेत की मानवी जीविताच्या शाश्वत अधिष्ठानांचें भानच कमी कमी होत आहे. आपण विचारांच्या शून्यात, अनिष्ठेच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनंत पोकळीत वाऱ्याच्या लहरीबरोवर गवताच्या काडीप्रमाणे इकडून तिकडे तरंगत आहोत असा भास होतो.

कुटुंवनिष्ठेचें अधिष्ठान ढांसळलें आहे. कुटुंवातील प्रेम, विश्वास व परस्परावलंवन यांचा ह्रास होत आहे. कुटुंवावाहेरील स्त्री-पुरुष संवंधाला काही अधिष्ठानच उरलेलें नाही: कुटुंवातीत स्त्री-पुरुष संवंधातील शुचितेचें व सुभगतेचें रक्षण कसें करता येईल, हा प्रश्न आहे. याला एकच उपाय आहे. आई-मुलगा, वाप-मुलगी, भाऊ-वहीण या कौटुंविक नात्यातील पवित्र व गोड भावनांचा विकास कुटुंवाच्या मर्यादेच्या वाहेर झाला पाहिजे.

माझ्या स्नेहभावाला शास्त्रशुद्ध समाज-विज्ञानाचें आणि बौद्धिक निष्ठेचें भक्कम अधिष्ठान आहे.

वेटा, मी सेवेचा भुकेलेला नाही. मला सेविका, शिष्या किंवा अनुयायिनी नको आहेत. त्यांचा मला उपयोग नाही. ही अडगळ मी कोठे ठेवू ? तुझ्या सारख्या मुलींचीं घरें किंवा निवासस्थानें माझ्याकरिता निवाऱ्याचीं ठिकाणें आहेत, विसाव्याचीं घरटीं आहेत. थंडी वाऱ्यापासून, उन्हा-पावसापासून, तुफाना-वादळापासून माझें मुलीच्या स्नेहाने तुम्ही रक्षण कराल. माझें जीवनाच्या संकटांपासून हळुवारपणें रक्षण करणारा माझ्या मातेचा पदर क्षितिजाएवढा व्यापक व विशाल झाल्याची प्रतीति मला तुमच्या कृपेमुळेच येते. तुमचें कन्यात्व अशा रीतीने मातृत्वात परिणत होतें.

मानवी जीवनाच्या मूलभूत प्रतिष्ठाच ज्या वेळीं हादरत आहेत, अशा या काळीं आपला तोल संभाळणें; संतप्त, हताश व अपराधी मानवावद्दल आपली सहानुभूति जतन करून कायम ठेवणें हा दरेकाचा धर्म आहे. ही मूलभूत सहानुभूति कायम राहिली तर सेवेचे मार्ग आपोआप सुचतील सेवेच्या वृत्तीची व तत्परतेची जोपासना आयासाने केली म्हणजे पुरे !

नवी दिल्ली.
२४.८.'४९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'माझीये जातीचे मज भेटो कोणी' अशी तळमळ सर्वसंग परित्यागी संत शिरोमणि तुकोबांनाहि लागलेली होती. या उत्कंठेत सत्संगाचें बीज आहे. दृष्टि, वृत्ति व भावना समान असल्या म्हणजे विचारसरणीतहि साम्य उत्पन्न होतें आणि मग समरसता निर्माण होते.

नवी दिल्ली.
४.९.'४९.

रात्रीं विश्रांति करिता तुला पत्र लिहितो. त्यामुळे झोपण्यापूर्वी मन जरा शुद्ध होतें. ज्या माणसाच्या स्मरणाने मनात भद्रभावना उद्भूत होतात व अमंगळ भावना नाहीशा होतात, त्याचें प्रेम शुद्ध समजावें. मुलगा विडी ओढू लागला, आईची आठवण झाली. आईला दुःख होईल. विडी फेकून दिली. भीतीमुळे नव्हे, प्रेमामुळे. तुझीं भजनें आठवतात. तीं काही सिनेमातील गाणीं नव्हत. ताईची आठवण झाली की भजनें आठवतात. सद्भावना जागृत होते. मनाला विश्राम मिळतो. केवळ सान्निध्याने सेवा घडते ती अशी. मनात असद्भावना किंवा असद्विचार येताच ज्या माणसा-विषयीं विकाररहित स्नेह असेल त्याची आठवण करावी, म्हणजे संयमाची गरजच राहत नाही. प्रेमानेच विकाराचा नाश होतो. मोठी अद्भुत शक्ति आहे निर्दोष विकाररहित प्रेमात. हें पहा ताई, तुला काही मीं माझें अवजार किंवा उपकरण बनवू इच्छीत नाही. त्यात तुझा उपमर्द व माझी क्षुद्र महत्त्वाकांक्षा आणि पराजय आहे. तुला कोणाचेंहि अवजार किंवा आयुध बनू द्यायचें नाही हाच तर माझा प्रयत्न आहे. कुणाचेंहि म्हणजे– 'स्वस्य परस्य वा'!

नवी दिल्ली.
५.९.'४९.

स्वतःच्या बाबतीत पापाचा तिटकारा पण दुसऱ्याच्या बाबतीत सहानुभूति व औदार्य हीं शीलाचीं विशिष्ट लक्षणें आहेत. बेटा, सामान्य प्रमादशील व अपराधी माणसातहि अपार सौजन्य दडलेलें असतें, अव्यक्त साधुत्व असतें म्हणून जो भौतिक किंवा आध्यात्मिक दृष्टीने अधिकारी बनला असेल त्याचें सर्वात मोठें भूषण दया आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Believe me, my lord, no ceremony that to great ones belongs, not the king's crown, nor the deputed sword, the marshal's trunch, nor the judge's robe, becomes them with one half so good as a grace of mercy does.

धीरोदात्त भाषण करणाऱ्या इसाबेलाचे तोंडीं शेक्सपीयरने हे शब्द घातले आहेत. याचें कारणहि तिने मोठ्या असंदिग्ध शब्दांत सांगितलें आहे,

'Go to your own bosom, my lord, knock there and ask your heart'. अपराध्याला शासन करण्यापूर्वी आपल्या अंत:करणाचा ठाव घ्यावा, आपलें चित्त तपासावें. मी 'संस्कृति' याच मनोवृत्तीला म्हणतो. स्वत:करिता न्याय व इतरांकरिता क्षमेची प्रार्थना हाच संस्कृतीचा गाभा आहे. मुली, जगातील सामान्य दोषयुक्त स्खलनशील माणसें शीलवान् व्यक्तींना वचकतात, तीं स्वत: पाप करतील, पण चारित्र्यवानाला पाप-प्रवृत्त करायला कचरतील. चारित्र्यवान् व्यक्तींना पाप-प्रवृत्त करायला अनेकदा चारित्र्याचें सोंग करणारीं माणसेंच मायावी रूपें घेऊन येतात. शेक्सपीयर मोठ्या खोंचदार भाषेत म्हणतो,

· The cunning enemy of mankind, to catch a saint, with saints does bait the hook.

दांभिक, धर्मवादी, पुष्पितावाणीने भुरळ पाडणारें तत्त्वज्ञान सांगणारीं माणसेंच बहुधा सत्प्रवृत्त माणसाला पापात्मक धर्माकडे वळवितात.

शेक्सपीयर काही साधु नव्हता. एक चारित्र्य-दोषयुक्त नाटककार. त्याने काही धर्मग्रंथ लिहायला घेतला नव्हता. पण धर्मग्रंथात भिन्न धर्मीयांविषयीं जी तिरस्काराची व द्वेषाची भावना आहे ती त्याच्या ग्रंथात नाही. तो पापाबद्दल तिटकारा उत्पन्न करतो. पण पापी माणसाविषयीं कित्येकदा मोठ्या हळुवार व उदात्त भावना निर्माण करतो. आपल्या पापी नवऱ्याकरिता क्षमायाचना करणारी प्रेमविह्वल स्त्री म्हणते,

They say best men are moulded out of faults, and for the most part become much the better for being a little bad. वाल्याचाच वाल्मीकि होतो ना ? फक्त मन:पूर्वकता व प्रांजलता पाहिजे. वाल्याने पापेंहि मन:पूर्वक व उघड उघड केलीं. चोरून पाप केलें नाहीं. म्हणूनच वाल्मीकि झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पोरी, दुनिया अशाच लोकांची आहे. अजीवात, स्पेशल, सर्वस्वी दुष्टांची ती नाही. त्या दुनियेत माणसावर प्रेम करण्याचा संकल्प करून जगण्याची इच्छा करावी. त्यात पडेल तें सोसण्याची तयारी ठेवावी. मनात शंका, किंतु-परंतु, वानवा, यांना थारा देऊ नये. जें पटलें, प्रशस्त वाटलें, तें मन:पूर्वक करावें.

Our doubts are traitors & make us lose the good we might often win, by fearing to attempt it.

अगदी गीतेची आठवण येतें. 'संशयात्मा विनश्यति'.

नवी दिल्ली.
३.१२.'४९.

●

बवन लिहितो, 'आम्हाला सर्वच ठिकाणीं उमदीं माणसें भेटलीं.' कौटुंबिक जीवनाची शुचिता व उपयुक्तता यातच आहे. एरव्हीं कुटुंबें हीं संकुचित जीवनाचीं डबकीं होतील. तीं समाज-जीवनाचे विकासशील घटक बनण्याऐवजी वैयक्तिक जीवनाला कोंडून ठेवणारे कठडे बनतील. ज्यांचा रक्ताचा किंवा सोयरिकीचा संबंध नाही, त्या व्यक्तींना अगत्यपूर्वक आश्रय देऊन त्यांचा स्नेह संपादन करणाऱ्या कुटुंबात पैस असतो, तीं कुटुंबें जीवनविकासाचीं साधनें होतात.

१३९, कांस्टिटयूशन हाऊस नवी दिल्ली.
७.१२.'४९.

●

स्नेहाबरोबर जी काळजी येते तिच्यामुळे जीवनाला सार्थकता व व्यापकता येते. आईला मुलाची काळजी असते म्हणून तिच्या जीवनात उदात्तपणा येतो. ज्याचा कोणावरच स्नेह नसेल तोच नि:संग व निश्चिंत राहू शकेल. पण मग त्याला आयुष्य इब्सेनच्या डॉल्स्‌हाऊसमधील नायिके-प्रमाणे शुष्क व निरर्थक वाटेल. असें स्नेहहीन जीवन मला तरी अगदी आळणी व दुर्वह वाटेल. स्नेहाबरोबर चिंतेने जीवन अग्निपूत होऊन तेजस्वी बनतें.

नवी दिल्ली.
१२. १२. '४९.

●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथे तू तीन आठवड्यांकरिताच गेलीस हें खरें आहे. पण आपल्या योजना व ईश्वरी संकेत यांचा नेहमी मेळच असतो असें नाही. अशा प्रसंगीं मनात सारखा असंतोष वाळगण्यापेक्षा, 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें' आणि वर 'चित्तीं असू द्यावें समाधान'! प्रकृति अगदी संपूर्ण वरी होईतों कोणाची तरी शुश्रूषा घ्यावीच लागणार, कोणाला तरी त्रास द्यावाच लागणार. ज्यांचें नैसर्गिक नातें आहे त्यांच्यावर आपण आपला उपजत हक्क मानून कोडगेपणाने व निगरगट्टपणाने त्यांची सेवा घेतोच. त्यांना त्या कष्टात पुष्कळदा गोडी वाटत नाही. तीं माणसें वैतागतातहि. तरी आपण तें सारें सहन करतो. कारण त्यांचें व आपलें नातें रक्ताचें असतें. तेव्हा त्यांचें कर्तव्य आपल्या खस्ता खाणें जसें आहे तसेंच त्यांचा राग सहन करणें आपण आपलें कर्तव्य मानतो. नैसर्गिक नात्याचा हा गुण आहे. पण जीं नातीं स्नेहायत्त असतात त्यांच्या वावतीत आपण जरा सावध असतो. अति त्रासाने कदाचित् त्या स्नेहात अंतर येईल अशी अव्यक्त भीति आपणास वाटत असते. मला वाटतें हा स्नेहाचा उपमर्द आहे. त्रास व कष्ट सहन करण्याइतका कस ज्या स्नेहात नसेल तें तकलुपी, नाजुक व वेगडी असलें पाहिजे. पेंढारकरांच्या कुटुंवात तुला इतकें निष्कपट स्नेहाचें व अगत्यशीलतेचें वातावरण लाभलें आहे. प्रकृतीकरिता कोणावर तरी भार घालावा लागणारच. आपल्याकरिता हाल काढण्यातहि ज्यांना गोडी वाटते त्यांचें घर हेंच आपलें खरें निवाऱ्याचें ठिकाण.

नवी दिल्ली
१५. १२. '४९.

स्नेहामध्ये चमत्काराची शक्ति आहे. 'श्रद्धेने पर्वतदेखील हलविता येतो' असा अनुभवी माणसांनी निर्वाळा दिला आहे. निरपेक्ष-स्नेहात श्रद्धेपेक्षा कमी शक्ति नाही. त्यात प्रतिपादनाची, प्रतिमूल्याची तर अपेक्षा नसतेच, केव्हा केव्हा, प्रतिप्रेमाचीहि अपेक्षा सोडून द्यावी लागते.

मला माझ्या मुलीच्या स्नेहाव्यतिरिक्त काही नकोच आहे. तो स्नेह मिळाला म्हणजे त्यात सारें आलें. 'Every thing else shall be added unto you', असें आश्वासन आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझे सोनुले, स्वायत्त प्रेमसंबंध रक्ताच्या संबंधापेक्षाहि अधिक अभेद्य व मधुर असतो. Blood is thicker than water but affection is thicker than both.

धनतोली, नागपुर.
२८.१२.'४९.

●

स्त्री-पुरुषांचेंच नव्हे तर पुरुष-पुरुषांचें व स्त्री-स्त्रीचें नातेंदेखील रक्तसंबंध व विवाहसंबंध यांच्यावर अवलंबून नसलें तरच तें अगदी शुद्ध स्वरूपाचें असतें. अर्थात् मैत्रीइतकें शुद्ध व उदात्त नातें दुसरें नाही हें उघड आहे. स्त्री-पुरुषांचादेखील रक्त-निरपेक्ष व काम-निरपेक्ष स्नेह मित्रत्वाचाच असू शकतो. समाजात तसे संबंध स्थापन व्हावेत हाच आपला हेतु व प्रयत्नहि आहे. जेथें रक्ताचें नातें नसतें किंवा यौनसंबंध नसतो, तेथे जो स्नेह असतो तो वस्तुतः मित्रत्वाचाच असतो. त्या भूमिकेवर सगळीं नातीं एकवटून जातात.

धनतोली, नागपुर.
१९५०.

●

—विनोबांनी 'सर्वोदया'च्या येत्या अंकाकरिता एक लहानसा लेख लिहिला आहे. त्यात एक मोठा अद्भुत प्रसंग आहे. उद्धव श्रीकृष्णाकडे येतो. कृष्ण पूजेत गुंतलेले असतात. उद्धवाला थांबावें लागतें. काही वेळाने कृष्ण बाहेर येतात. उद्धव विचारतो, "करीत काय होता असें इतका वेळ ?" "पूजा करीत होतो" "कुणाची ?" "तुला नाही माहीत. तें आमचें गुपित आहे." "माझ्यापासूनहि गुपित ठेवता ?" "ठीक तर, ऐक. तुझीच पूजा करीत होतो मी."

मुद्दा आला लक्षात तुझ्या ? देव आणि भक्त, गुरु आणि शिष्य, एकमेकांचें उपासक असतात. त्यांनी एकमेकांची शुश्रूषा करायची असते. त्यांचा एकमेकांच्या सहवासाने उत्कर्ष होतो. फक्त एकपक्षीं लाभ होत नाही. एकाचाच लाभ झाला, तर दुसऱ्याचें पतन होतें असें मानावें लागेल. आणि एकाचें पतन झालें तर दुसऱ्याचें उत्थान कसें होईल ? मुलीच्या सान्निध्याने व सहवासाने बापाचेंहि उत्थान व उन्नतीच होत असते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समजलात मायबाई ! म्हणून तुझ्याजवळ येऊन राहण्यात कार्यहानि नाही वा कालापव्ययहि नाही.

सर्वोदय कार्यालय, वर्धा.

६.२.'५०.

पोरी, तुझा स्नेह संभाळणें व वाढविणें माझ्या ईश्वराराधनेचाच भाग आहे. माझा स्नेहसंग्रह माझ्या उपासनाविधीचें महत्त्वाचें अंग आहे. त्या पवित्र भावनेमुळेच तुझ्याकडे लक्ष देणें किंवा तुझ्या इच्छेला मान देणें म्हणजे कर्तव्य पराङ्मुख होणें आहे असें मला कधीच वाटत नाही. एरव्हीं मी स्वत:चीं कामें बाजूला सारून इतका वेळ देऊन तुझ्या आरामात व्यत्यय आणला नसता. काल तर मी जुलूमच केला. पण तोहि माझ्या साधनेचाच भाग होता.

असेंब्ली हॉल. नवी दिल्ली.

१३. ३. '५०.

तुझ्या जीवनाचें तारूं तुझ्या अहंकाराच्या खडकावर आदळून फुटणार असेल तर फुटो असें मी कधीहि म्हणणार नाही. तें मी बरा फुटू देईन ? ज्या स्नेहात अहंकार विरघळत नाही तो स्नेह कमकुवत मानावा लागेल. तुझा 'अहंकार'च असला — आहे कीं नाही तें मला तरी कोठे नक्की कळतें — तर तो सामान्य माणसाचा मोहमूलक अहंकार नव्हे. मला तुझ्या स्वभावातील हा निश्चयी करारीपणा विशेष आवडतो. त्याच्यावर तुझें तारूं नाही फुटणार. मुली, तुझें हृदय शाबूत आहे, तुझी वृत्ति 'संगीन' आहे. तुला संरक्षणाची गरज आहे आणि तें आम्ही देऊ शकतो, तुला काळजीची गरज आहे आणि ती आम्ही घेऊ शकतो, असें मानण्यात उलट आमचाच अहंकार असण्याचा संभव फार. तुझ्या मनोदेवतेच्या प्रेरणे-प्रमाणे तुला प्रयोग करू देण्याची व ते प्रयोग कौतुकाने पाहण्याची धमक आमच्यात आली पाहिजे. प्रयोगातून शिक्षण घेण्याचा आत्मवान् माणसाचा आग्रह असतो. तेव्हा तुला बोट धरून चालविण्याइतका किंवा पांगुळगाडा देण्याइतका मिथ्याव्यवसायी मी खचित नाही. पण माझ्या स्नेहदृष्टीला तुझ्या व्यक्तित्वाचें बिनचूक आकलन झालेलें आहे. स्नेहाने दृष्टि सूक्ष्म व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तीक्ष्ण होते, याचा अनुभव सामान्य संसारी व्यक्तींनाहि आहे. जेथे तो स्नेह परिष्कृत आणि मोहनिरपेक्ष असेल तेथे त्या दृष्टीत भ्रम व प्रमाद यांचाहि संभव कमी असतो. तुझ्या व्यक्तित्वातील विशिष्ट गुणांवर आणि शक्तीवर माझी जी निष्ठा आहे तिच्यातूनच तुझ्याविषयींचा माझा आत्मप्रत्यय उद्भवलेला आहे. म्हणूनच मी इतक्या विश्वासाने बोलतो. तुझ्या विषयींचा माझा प्रत्यय मिथ्या ठरणें शक्य नाही! कदाचित् कालावधि लागेल. लागो.

या वेळीं राष्ट्रात वैचारिक शून्यवाद व विवेकहीनत्व यांचें प्रस्थ आहे. सेवेच्या द्वारें विवेक व विचार यांची जागृति मुख्यत: केली पाहिजे. केवळ प्रक्षोभातून क्षोभच होण्याचा संभव असतो. अहिंसक क्रांतीला आवश्यक भूमिकेची निर्मिति करणें तुमच्या सारख्या तरुणींचें काम आहे. ता०क०——

उद्या अकोल्याला वेणू व प्रभा यांची भेट घेईनच. सौ० अक्का तेथे असल्यास त्यांनाहि भेटेन. माझ्या मुलीचा ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध आलेला असेल त्यांच्याविषयीं मलाहि आत्मीयता वाटणें साहजिकच नाही का? स्नेहाची गति जितकी सूक्ष्म व गहन तितकीच मनोरंजक व आनंददायक नाही का? एका वर्षापूर्वी तुला माझ्याजवळ राहण्याची किती तीव्र उत्कंठा होती! त्या वेळीं माझें चित्त थोडेंसें आत्मनिष्ठ बनलें होतें. आज तुझ्या पितृवात्सल्याने इतकी क्रांति घडवून आणलेली आहे की मी तुला सूचना करीत आहे. आहे कीं नाही स्नेहात जादू? अद्भुत करामत? बेटा, स्नेहाने मिळविलेल्या अधिकारात सत्ता असूनहि स्वामित्व नसतें, वास्तविकता असूनहि आढ्यता नसते.

अकृत्रिम व निर्व्याज स्नेहावर माझी निष्ठा उत्तरोत्तर वाढत आहे. जगात ती सर्वश्रेष्ठ शक्ति आहे.

तुझ्या जीवनाचा स्रोत मी पाहिलेला आहे. त्याच्या निर्मळ, पवित्र, शीतळ जलांनी माझें हृदयहि मी धुऊन घेतलें आहे. म्हणूनच मी इतक्या आत्मप्रत्ययाने बोलू शकलो आहे. मी पाऊल जपून, सावधगिरीने आणि विवेकपूर्वक टाकलें आहे. अगदी 'दृष्टिपूत' असें पाऊल आहे तें. 'मी तुमच्या-समोर एक क्षुद्र, अनधिकारी व्यक्ति आहे', इत्यादि तू म्हणतेस. हा विनय-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

युक्त शब्दांचा फुलोरा मला वाहू नकोस. दादा जीव देणें जाणतो. त्याच्या-जवळ तू आलीस. आता त्याच्याशी तुला हुज्जत घालावी लागणार. बेटा, स्नेहाचें असेंच असतें. ती काही सुतळी नव्हे, किंवा विजेची तारहि नव्हे. तिचें 'कनेक्शन' झटक्याने तुटत नसतें !

धनतोली, नागपुर.
२.५.'५०.

बेटा, या वेळीं आपल्या देशाला प्रसंगानुवर्ती व कालानुवर्ती लोकांची गरज नाही. या वेळीं कालाच्या पोटीं दडलेली आकांक्षा व आवश्यकता ओळखून देशाच्या परिस्थितीला इष्ट तें वळण लावण्याची नम्र इच्छा धरणाऱ्या वस्तुनिष्ठ, समयज्ञ व ध्येयपरायण तरुण-तरुणींची गरज आहे. अध्यात्ममार्गात व भक्तिमार्गात तुझा अनुभव आणि अधिकार माझ्यापेक्षा अधिक आहे. त्या मार्गात तू माझें 'उपनयन' आपुलकीने व आस्थेने करायला हवें. राजकारणात—नव्हे, लोककारणात – मला अनुभव व ज्ञान अधिक आहे. त्यात मी तुझा 'व्रत बंध' करीन. एकमेकांनी आपापल्या क्षेत्रात एकमेकांचा 'प्रवेश' करवून 'दीक्षा' द्यायची आहे. असें हें मोठें मधुर नातें आहे. अपत्यें तर दोघेंहि अपत्यें. 'पितरें'. तर दोघेंहि 'पितरें'. आचार्य तर दोघेंहि आचार्य. अंतेवासी तर दोघेंहि अंतेवासी. 'परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ,' भगवंताचें आश्वासन आहे. गंमत आहे ना ?

वर्धा, ४.५.'५०.

तुझ्या बाबतीत माझी स्थिति स्नेहजन्य तादात्म्याची आहे. मुलाची भूक आईला लागते म्हणतात. मुलाच्या पोटात भूक लागली की आईला पान्हा फुटतो. आईची थोर पदवी स्वीकारण्याची पात्रता माझ्या अंगीं नाही. पण, प्रेमळ पित्यालाहि आईसारखीच समरसता संपादन करता येते. तुझ्या हृदयात कळ निघाली, बुद्धीत आकांक्षा निर्माण झाली की माझ्या हृदयाला व बुद्धीला पान्हा फुटतो. समर्पण करावें लागतें, तेव्हाच समर्पणाची अपेक्षा करता येते. माझें समर्पण अजून उणें पडतें. तेव्हा तुझ्याकडून अपेक्षा करण्यात मी आपल्या पात्रतेच्या मर्यादेचें अतिक्रमण केलें. आता समर्पणाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जबाबदारी तुझ्यावर नाही. तें मीच करणार आहे. मुहम्मदाने पर्वताकडे जाण्यातच त्याची उन्नति आहे.

एक गोष्ट निर्विवाद आहे. या वेळीं तुला माझ्या सहवासाची गरज आहे. तसें नसतें तर माझ्या हृदयात ती आकांक्षा इतक्या उत्कटतेने उत्पन्न झाली नसती. ज्ञानाचा परिपाक विनयात होतो म्हणतात. "जाणत्याने व जाणकाराने नम्रपणें जाणवून द्यावें, करवू नये, लादू नये," काल विनोबा म्हणाले. शास्त्र ज्ञान करवितें, तें आचरण करवीत नाही, हें वस्तुनिष्ठ सत्य आहे. माझ्या भूमिकेत फरक इतकाच की मी ज्ञानी नाही, स्नेही आहे. मी माझें ज्ञान लादणार नाही, पण तटस्थहि राहणार नाही. माझा जिव्हाळा माझ्या ज्ञानात कळकळीची साखर घालील. त्यातून मला समर्पणाची असीम शक्ति लाभेल !

धनतोली, नागपुर.

६.५.'५० ●

स्नेह नेहमी उत्कट असावा त्यात मिळमिळीतपणा, आळणीपणा काय कामाचा ? याला मी 'भावनावशता' म्हणण्याइतका का हृदयहीन आहे ? हृदयाच्या उदात्त भावना असतात त्यांच्या उमाळ्याने हृदयाचें प्रक्षाळण होतें; त्यांच्या कारंज्यांनी जीवनाचें प्रोक्षण होतें.

धनतोली, नागपुर.

४.७.'५०. ●

रामसिंग भानावत म्हणून अत्यंत मागासलेल्या आदिजनांपैकी एक कार्यकर्ते आहेत. अलीकडे त्यांची माझ्यावर मोठी माया आहे. परवा म्हणू लागले, 'लोक म्हणतात, थोर संतांच्या ठिकाणीं देवाचें दर्शन होत असतें म्हणून. पण मला तुमच्यामध्ये माणूस पहायला मिळाला. तुमच्याबरोबर मला राहता येईल का ?'

बेटा, माझें हृदय भरून आलें. या 'प्राकृत' जनांच्या स्नेहाला जर मी पात्र ठरलो तर भगवान् माझ्यावर प्रसन्न झाला असें नाही का तुला वाटणार ? मुली, स्नेह हा कुणाचाहि असो, तो अकृत्रिम असला तर त्याच्या अंगीं परीस बनण्याची पात्रता असते.

धनतोली, नागपुर.

८.२.'५१. ●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला प्रचंड अपयश आलें म्हणून तुला यावें असें थोडेंच आहे ? माझे दोष माझे आहेत. त्यांच्यामुळे मला अपयश आलें. माझे दोष मी तुला नडू देणार नाही. कारण, तू माझें औरस अपत्य आहेस. एखाद्या बापाला जर महारोग झाला तर तो प्रेमातिशयामुळेच मुलापासून दूर राहील. त्यात त्याच्या प्रेमाचा महिमा आहे. तेव्हा माझ्या दुर्गुणांचा संसर्गदोष मी तुला लागू देत नाही यात विशेष तें काय आहे ? तो बापाचा स्वभावगुणच नाही का ? दारुडा बाप, विडी ओढणारा बाप, तीं व्यसनें आपल्या मुलांना लागू नयेत असेंच इच्छितो.

पुन्हा असें पहा की माणसाला स्वतःचें दोष गुणांपेक्षा अधिक प्रिय असतात. गुण देवाचे असतात. ते सगळ्यांकरिता असतात. घरातील अन्न, पाणी, फळें, खाऊ सगळ्यांकरिता असतात. पण तपकीर, तंबाखू, माजुम खास माणसासाठीच असते. त्या वस्तु तो काळजीपूर्वक आपल्यापाशी बाळगतो. त्याचप्रमाणे माणूस आपले गुण दिमाखाने मिरवितो. पण दोष स्वतःचे खाजगी म्हणून पुरलेल्या धनाप्रमाणे काळजीपूर्वक दडवून ठेवतो. म्हणून तू माझी 'लाडकी पोर' असलीस तरी मी आपल्या दोषांच्या ठेव्याला तुला हात लावू देणार नाही.

माझ्या या विवेकाचा परिणाम माझ्या वृत्तीवरहि झाला आहे. माझ्यावर दुसऱ्यांच्या दोषांचा परिणाम होत नाही. पण त्यांच्या गुणांची मात्र छाप पडते. त्यामुळे इतर माणसें कुठल्यातरी बाबतीत मला माझ्यापेक्षा सरस वाटतात. ही आत्मग्लानि (Inferiority complex) नव्हे ! त्यामुळे अहंतेचा फुगा फुलत नाही, इतकेंच ! म्हणूनच तू व इतर जवळचीं माणसें अगदी आवेशाने माझ्या दोषांची उजळणी करीत असलीं तरी माझा अहंकार चवताळत नाही ! नम्रपणें आक्षेप प्रतिपेध खिशात घालतो. जाता जाता हें थोडेंसें हृदयाविष्करण केलें !

'आपला दुर्गुण लाविती पराला, नेणती तयाचा गुण काही',
या कोटीपासून दूर राहण्याचा प्रयत्न आहे !

लाहोरें-सावंगें
१६.५.'५१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नंतर ताईकडे गेलो. ताई म्हणजे ताराची आई. तारा आता बाबू लोकांच्या वसाहतीत रहायला गेली आहे. ताईची दाढ दुखत होती. मला पाहिल्यावरोबर मिठी मारली. तिला कुणीसें सांगितलें की बावनाव्या वर्षी जरा जपूनच जगा, म्हणून अगदी माझ्या पोटाशी वसून राहिली! मलाहि बावनवर्षें पुढल्या महिन्यात पूर्ण होतील. पण बावनाव्या वर्षी आम्हाला आम्ही सात वर्षांचीं आहोत असेंच वाटलें! पोरी, 'ताई' ही एक संस्था आहे. तो एक सांस्कृतिक संकेत आहे, तें एक भावनेचें आधारभूत प्रतीक आहे. पण त्या संकेताचें, प्रतीकाचें, संस्थेचें आलंवन माझ्या शारदाताई सारख्या वहिणीच नाहीत का?

नागपूर.
१९. ५.'५१ ●

आठ दहा दिवस पुन्हा माझ्या मुलीच्या सहवासात रहायला मिळेल, एवढें मला पुरे आहे. ज्या आनंदात निरपेक्ष स्नेहाखेरीज दुसरा काहीहि प्रेरक हेतु नाही, तो आनंद जीवनाचें अंतिम मूल्य आहे. 'अन्नं ब्रह्मेति व्यजानात्, पासून 'तपोब्रह्मेति' आणि 'विज्ञानं ब्रह्मेति' या ब्रह्म परंपरेत शेवटला टप्पा 'आनंदं ब्रह्मेति' आहे! म्हणून इतर तेवढे कार्यक्रम आणि विमलकडे जाणें ही फक्त वैयक्तिक बाब असा अवास्तव व अप्रशस्त भेद माझ्या मनाने कधी केला नाही. जें करायचें तें मनःपूर्वक करायचें असें वळण लागल्यानंतर त्यात भावनेचें पावित्र्य व हेतूची शुद्धता कशी वरें असणार नाही? त्यामुळे इतर कार्यक्रम रद्द झाले असले तरी तुझ्यावरोबर राहता यावें म्हणून येण्याचें ठरविलें! तुझ्याकरिता नव्हे, माझ्याचकरिता. मी कोणाकरिताच काही करीत नसतो हें तुला माहीतच आहे!

नागपुर.
१९. ५.'५१ ●

काल नाताळचा दिवस होता. टॉमसचें पत्र आलें. टॉमस, सौ० सुदाम्मा, चि० राजू व रणजित यांनी नव्या वर्षाप्रीत्यर्थ अभिवादन पाठविलें. टॉमसची व माझी पहिली भेट आगगाडीत झाली. दोघेहि एकमेकांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अपरिचित होतो. आता एका कुटुंबातील झालो आहोत. या अव्याख्येय व असीम स्नेहालाच ईश्वर म्हणतात. वासना, लोभ व भय यांपासून मुक्तप्रेम म्हणजेच खरें उन्मुक्त प्रेम — फ्री लव्ह ! त्या प्रेमावर आधारलेली व्यवस्था म्हणजेच रामराज्य, भगवंताची सत्ता, मानवात्म्याचें राज्य !

दुर्दैवाने जगात दुःख, दैन्य आणि दारिद्र्य इतकें आहे की सेवेची संधि शोधायला कोठे जावें लागत नाही. माणूस जेथे असेल, तेथे हवेप्रमाणे सेवेची संधि नित्य उपलब्ध आहे. स्नेहमात्र शोधावा लागतो,संपादावा लागतो, वेंचावा लागतो आणि सांठवावा संभाळावा लागतो. आजचा व्यवहार काम, लोभ व भय या तीन तत्त्वांवर उभारलेला असल्यामुळे त्याचें पर्यवसान मत्सरात, आक्रमणात व युद्धात होतें. म्हणून निरपेक्ष स्नेहावांचून दैवी संपत्तीला दुसरें अधिष्ठान नाही. खऱ्या स्नेहाला प्रभुत्वाचें वावडें आहे. त्याला असूया माहीत नाही, मत्सर ठाऊक नाही. तो लोभात पडत नाही. तक्रार करीत नाही. अशा स्नेहाचें पावित्र्य व थोरवी ईश्वरभक्तीपेक्षा यत्किंचितहि कमी नाही. निरपेक्ष व निरुपाधिक स्नेह हेंच अमृततत्त्व आहे.

धनतोली, नागपुर.
२६.१२.'५१

दुसरें माणूस आपल्या तंत्राने वागावें अशी इच्छा असणें हें मी जुलमी-पणाचें लक्षण समजतो. शिवाय, त्यात सदभिरुचि व संस्कारिता यांचा अभाव आहे. आपल्यासारखीं सगळीं माणसें व्हावीं असें ज्याला वाटतें, त्याला जगात स्वतःपेक्षा सरस कुणीच दिसत नसलें पाहिजे. अशा नतद्रष्टाला काय म्हणावें ? सगळीं माणसें माझ्याच तंत्राने वागू लागलीं तर त्यांच्या संगतीपासून लाभ तर राहोच; पण आनंद तरी मिळेल का ? एकमेकांच्या गुण-भेदामुळे व स्वभावभेदामुळे परस्परांचें व्यक्तित्व व्यापक आणि संपन्न बनतें. यालाच सहवासाचा लाभ म्हणायचें ! तेव्हा माझ्या स्वभावाचा रूळ सगळ्यांच्या व्यक्तित्वावर चालावा असें मानण्याइतका मी अरसिकहि नाही आणि अहंमन्यहि नाही. माझ्या मुलीचा किंवा मुलाचा चेहरा माझ्याइतका कुरूप व्हावा असें मला कधी तरी वाटेल का ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भिन्न स्वभावापासून लाभ होणें यालाच सत्संगाचा महिमा किंवा सहवासापासून फायदा म्हणतात. यात सहन करण्याचा प्रश्नच नाही. एकमेकांचें वैशिष्टच 'सहन' नसतें करायचें. त्याचा संग्रह करायचा असतो. 'सहन' फक्त अप्रिय गोष्टी कराव्या लागतात. मायेच्या माणसाचा 'स्वभाव' म्हणजे काही आपत्ति किंवा व्याधि नव्हे ! त्यात 'सहन' काय करायचें असतें ? जुळवून मात्र घ्यावें लागतें. आपण चिन्नाचे कपटे, एकाद्या आकृतीचे ठोकळे जुळवितो त्याप्रमाणे त्यात कलाहि आहे आणि विकासाचा आनंदहि आहे. एकमेकांना संभाळणें, जुळवून घेणें, यात विलक्षण गोडवा आहे. तू म्हणत्येस 'मला हें आवडत नाही', मी म्हणतो, 'मला हें चालणार नाही.' दोघांनीहि म्हणायचें जुळवून घेण्याचा पवित्र आनंद मिळवू या !

दरेकाच्या स्वभावातील खुव्या, मख्ख्या आणि वऱ्या किंवा तऱ्हेवाईक वारीक सारीक लकेरी इस्तरी फिरवून सारख्या करून घेण्यात काहीच गोडी नाही. दरेकाच्या व्यक्तित्वातील हे विशेष टिकू दिले पाहिजेत. कोणाच्या स्वातंत्र्याचें अपहरण करून का कोठे सहवासाचा आनंद लाभतो?

माणसाचें एक वहिरंग रूप असतें आणि त्याचें एक अंतरंग स्वरूप असतें. यांत फरक व अंतर नेहमी राहील. पण त्यातील तफावत व विरोध कमी कमी करावा लागतो. व्यक्तित्वाच्या वाह्य आवरणाप्रमाणे, खोलीप्रमाणे किंवा रूपाप्रमाणे जो व्यक्तित्वाचें तत्त्व, त्याचें उपादान, वरळू इच्छितो, तो दांभिक, तो अंधतमात प्रवेश करतो. जो आपल्या व्यक्तित्वाच्या द्रव्यभूत तत्त्वाला अनुसरून त्याचें रूपहि बदलतो, तो आपल्या स्वधर्माला जागतो.

नवीन मर्यादा, क्रांतिकारक व भावरूप स्थापन करणें हा तुझा 'स्वधर्म'. अधर्माला मर्यादांची चाड नसते. तो वेरड व वेशरम असतो. मर्यादा पाळण्याची वतावणी करणारा दांभिक असतो. त्या दोघांचाहि उपयोग नाही. ज्याला नैतिक मूल्यांची चाड आहे अशा चारित्र्यवान् पण निर्भय व निर्भीक माणसांनीच नवीन मूल्यांचा आविष्कार करायचा असतो.

मी तुझी ही भूमिका मानली आहे. म्हणूनच मी अगदी वारीक सारीक वावतीतहि लक्ष घालतो. तुझ्या विशिष्ट आवडी-निवडी व वैयक्तिक मर्यादा कायम रहाव्या असा मी प्रयत्न करीन. कारण तुझ्या व्यक्तित्वाचें चिपाड

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

थोडेंच करायचें आहे ? पण त्याचा जो विशिष्ट 'रस' त्याची मात्र अभिवृद्धि झालीच पाहिजे. तुझ्या व्यक्तित्वातील बेफिकिरीची व फक्कडपणाची लकेर कायम रहायलाच हवी.

मद्रास एक्स्प्रेस.
१८.२.'५२.

माझी निष्ठा निर्भेळ व निरपेक्ष स्नेहावर जितकी आहे, तितकी इतर कुठल्याहि तत्त्वावर नाही. त्यामुळेच मी स्वत:ला कधी कुणाचा शिक्षक अगर वाटाड्या मानलें नाही. स्नेहामध्ये अद्‌भुत दृष्टि व दर्शन असतें. स्नेह जसा स्वत:च्या डोळ्यात प्रकट होतो, तसा तो इतरांच्या डोळ्यात प्रकाशहि पाडतो. न देता, न कळत, शिक्षण दिलें जातें आणि घेतलें जातें. मी तर्कनिष्ठ व बुद्धिवादी आहे. पण तर्क व बुद्धि यांच्यावर अंतिम प्रमाणें म्हणून माझी निंष्ठा असली तरी खरी भिस्त स्नेहाने प्राप्त होणाऱ्या अंतर्दृष्टीवरच आहे.

वर्धा
१२.३.'५२.

समाजातील संसार मोक्षमय व्हायला बंधनें तोडावीं, स्नेहसंबंध तोडू नयेत. वैयक्तिक संन्यास हा सामाजिक गुण नव्हे. वैयक्तिक अहिंसा वैयक्तिक दान हीं सारीं वैयक्तिक मूल्यें होतीं. पुण्यसंपादन व वैयक्तिक उद्धार हें त्यांचें साध्य होतें. स्नेहयुक्त संन्यासात बंधनकारक नात्यांचा निषेध आहे. पण स्नेहाला पोषक नात्यांचें विधान आहे. 'घर सुटलें त्या क्षणाला अनायासें संन्यास साधला' हे खरें. पण त्याने फक्त कुटुंबाच्या भिंती ढासळून त्याचें आवार क्षितिज व्यापीं झालें. त्यामुळे आता 'तू' कन्या, बहीण, मैत्रीण, म्हणून अधिक अनासक्त व पवित्र स्नेहाच्या भूमिकेवरून जगात वावरशील. स्वावलंबन म्हणजे कोणाच्या भरवशावर न जगणें,' पण 'स्वावलंबन' म्हणजे 'इतरांच्या जीवनात सामील होऊन त्यांना जीवन देणें आणि जीवन मिळविणें.' 'ब्रह्मचर्य' म्हणजे स्नेहातून विकार व वासना यांचा निरास करणाऱ्या भावनांचा आत्यंतिक उत्कर्ष ! त्या भावनांचीं नातीं म्हणजेच कन्या, बहीण, मैत्रीण !

बखतियारपुर.
२४.७.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांति व नीहार यांनी तर मुद्दाम सुपारी आणवून ठेवली होती. सोनू, आपल्याला बेंगलूरच्याप्रमाणेच धनवादलाहि एक 'घर' आहे हो, घरच तें आपलें. आपण संकुचित कुलाभिमानामुळे घरकुलात राहत असतो. तो कुलाभिमान नाहीसा झाला म्हणजे 'घर सुटतें.' 'घर सुटतें' पण माणसें नाही सुटत. सगळीकडे घरेंच घरें होऊन जातात. याचें नांव विधायक भावरूप संन्यास ! जिकडे तिकडे घरेंच घरें झालीं म्हणजे मग 'हें विश्वचि माझें घर' ही भावना वाणते.

पुरूलिया.
२७.७.'५२.

आज मीराला भेटलो. त्यागात व क्लेश सहन करण्यात ती दामोदर-पेक्षा कमी नाही. पण अतिशय प्रेमळ व हृदयवान् आहे. दामोदर इतकीच. त्यामुळे तिला भडभडून आलें. हृदय अश्रूंच्या रूपाने विरघळून वाहेर पडलें. महादेवीताईनी तिला बनारसला बोलाविली आहे. पण तेथे दामोदरचे हाल आपल्याला बघवणार नाहीत असें विचारीला वाटतें. मुलीच्या बापाचें माझें हृदय ! अतिशय कळवळलें !

ही नातीं मोठीं चित्तशुद्धिकारक असतात. भैयांनी घेऊन दिलेलीं धोतरें मी कटाक्षाने वापरतो. त्यातहि गोडी वाटते. मी काशीला गेलो. दामोदरने लिहिलें, 'मी स्फूर्तीच्या अखंड झऱ्याजवळ नेहमी राहतो, पण दादा आले म्हणजे नवीन उत्साह नवीन स्फूर्ति वाटते. स्फूर्तीच्या गंगेमध्ये यमुनेची भर पडल्याची प्रतीति येते !' या अशा स्वायत्त प्रेमसंबंधात मोठी जादू असते असें नाही तुला वाटत ? भगवंताशी आपलीं जीं अनंत नातीं असतात तीं हींच नातीं नाहीत का ? 'तोहि मोहि नाते अनेक !' 'तुझी-माझी अनेक नातीं आहेत !' हीच तीं अनेक नातीं. या नात्यांनी आपण अनंतालादेखील कोंडून ठेवतो. म्हणजे आपणच आपल्या अहंतेची कोंडी फोडतो.

वर्धा.
१०.८.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्नेहालाच साधना मानण्याचें साहस मी आयुष्यात केलें आहे. त्यात विनोबा म्हणतात, हें 'सख्यभक्ती'चें युग आहे. तेव्हा प्रेमामध्ये सूर्यकिरणांपेक्षाहि जास्त भेदक शक्ति असते हें कां मला कळत नाही? माझ्या साधनेत आणि प्रेमात उत्तरोत्तर अभेद स्थापित होत आहे म्हणूनच कधी त्यात 'आसक्ति' दिसते, कधी 'आतुरता' दिसते, कधी Sentimentalism a Excitement दिसते! माझा स्नेह अधिकाधिक उन्नत व पुनीत होत आहे हा माझा प्रत्यय आहे! पण तो एका स्नेहजीवी अल्प व्यक्तित्वाच्या माणसाचा प्रत्यय आहे. दादा अल्प आहे; पण स्नेह अपार आहे. मातीच्या वोळक्यात अमृत आहे! मी कर्तव्य आणि प्रेम यांच्यात विरोध कधीच येऊ दिला नाही.

पाटणा.
१३.१२.'५३.

जेव्हा माणसामध्ये देव पाहण्याचें स्वरूप साधनेला प्राप्त होतें, तेव्हा ती सेवेमध्ये परिणत होते. साधना कुठली आणि सेवा कुठली, हें निवडून काढता येत नाही. 'मी सेवा करतो', ही भावना उरत नाही. अहंता सेवेमध्ये विरघळून जाते. साधना व्यापक बनते. ती मानव्यव्यापी स्वरूप धारण करते. ही साधना आणि ही समाजसेवा असा भेद उरत नाही. भूदानयज्ञ ही तुझी साधना झाली. अमुक माझ्या आत्मसंतोषासाठी आणि तमुक लोकाराधनासाठी असा फरक आता नाही. साधना निराळी आणि जबाबदारी निराळी, कर्तव्य वेगळें आणि अधिकार वेगळा, असाहि भेद करता येत नाही. आत्मोद्धार व लोकसंग्रह एकमेकात मिसळले!

आगगाडी.
१.४.'५४.

जळगांव ते भुसावळ सुधाकर कुलकर्णी बरोबर होता — बरोबर म्हणजे त्याच गाडीत. प्रेमात प्रतिनिधित्व चालत नाही याचा अनुभव आला. सुधाकराच्या भेटीने बरें वाटलें. पण, अखेरीस सुधाकर तो सुधाकर, आणि तात्या तो तात्या! त्याच्या आईने मुद्दाम झुणका व पुऱ्या करून पाठविल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होत्या. पण, माझी 'अव्रतनिष्ठा' आडवी आली. कणिक व पीठ आणि तेल, सारेंच गिरणीचें ! नुसत्या भावनेच्या झुणकापुऱ्यांवर मिटक्या मारीत ताव मारला ! प्रत्यक्ष एक घांसहि न खाता गोडी चाखली ! डब्याला स्पर्शंहि न करता अव्यक्तप्रसाद ग्रहण केला. त्याने आणलेले आंबे ठेवून घेतले. माझ्या पिशवीतील त्याला दिले. त्याच्या आईने धाडलेली शिदोरी उघडता आली नाही म्हणून चहा व ८–।। चीं केळीं खेरीज करून खाण्याचा एकहि पदार्थ विकत न घेता प्रवास संपविला. तू मिठाईचा डबा मात्र माझ्यापाशी द्यायला विसरलीस !

पाटणा.

९.६.'५४.

श्रीपादचें पत्र आलें. म्हणतो, "आमच्या सान्निध्यात तुम्हाला व ताईंना आनंद होतो हें आम्ही आमचें भाग्य समजतो. तुम्ही आलात, राहिलात, जेवलात की सौ० माणिकला कृतार्थता वाटते, मुलांना आपलीं माणसें भेटल्याचा आनंद होतो. मला तुम्हा दोघांच्या संगतीत राहण्याची संधि नेहमीच मिळते. यामुळे माझ्यापेक्षा सौ० माणिक व मुलें यांच्या आनंदाचें महत्त्व अधिक आहे. वर्षांतून एकदा तरी ही संधि तिला मिळत रहावी असें मला वाटतें."

प्रबोध चोकसी म्हणतो, "बाबलाला किती तरी वडील माणसें आहेत. मला कोणीच लाभलें नाही." तेव्हा बाबलाने त्याला सुचविलें, "दादांना पकड," बाबला स्वतः म्हणतो, "दादा मला काकांच्या ठिकाणीं आहेत." बूबू म्हणते, "दादांच्या प्रेमात आईच्या प्रेमाची छटा आहे." टॉमस म्हणतो, "निरपेक्ष पितृत्व आहे." भाऊ महाजन म्हणतात, "मला सत्तेची मांडी सांपडली." सोपान-लाभूबेन म्हणतात, "अनने बन्नेने साथेज दादा मळ्या." गुजराथेत एक मुलगी एकदाच भेटली, तिने लिहिलें, "तुम्ही मातेसमान वाटला" – हीं सारीं माझ्या जीवनाचीं भूषणें आहेत. माझे पोरी, तुझ्या प्रतापाने हीं लेणीं ल्यायला माझें व्यक्तित्व पात्र बनो. आज तर हृदय अनुदार आहे; वृत्ति कृपण आहे. तुझी सत्यबाला लिहिते, 'आपकी बेटी.' तिला लिहिलें, तुम्ही सगळ्या जणी आपल्या जीवनातील थोरपणा थोडा थोडा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला बाप म्हणून द्या. माझें तोकडें व्यक्तित्व उन्नत होईल, माझें कोतें हृदय विशद होईल! मनू, तू माझें लेकरू आहेस. तुझें प्रेम माझ्या व्यक्तित्वाला षोडशकला संपन्न करील.

फलेजाघाट, बोट.
१६.६.'५४.

लक्ष्मण निरंतर रामाच्या सान्निध्यात होता. भरत लांब होता. पण दोघांचेंहि बंधुप्रेम सारखेंच. उलट भरताचें जास्त उत्कट. कारण, जवळ राहण्याची इच्छा असूनहि रामाच्याच कार्याकरिता त्याने लांब राहण्याचें पत्करलें. त्यामुळे त्याला रामाचा निरंतर घ्यास लागला. लक्ष्मणाचें शुश्रूषात्मक प्रेम व भरताचें वियोगात्मक प्रेम यांच्यात अंतर नव्हतें. दोघांचीहि सगुण भक्तिच. पण, कैकेयीसाठी जर भरताने रामाच्या सहवासाचा त्याग केला असता तर तें मात्र अधिक देहनिष्ठ प्रेम झालें असतें. आपणास जें कारण अयुक्तिक आणि चुकीचें वाटतें त्याकरिता सत्संगतीचा किंवा स्नेहीजनांच्या सहवासाचा त्याग करण्यात विपरीत शरीर निष्ठा आहे.

अध्यात्मावर माझा अधिकार नाही. पण, निर्भेळ प्रेमाचें स्थान माझ्या जीवनात अनन्य आहे. त्याचें दर्शन व प्रत्ययहि मला आहे. म्हणून ही 'चर्पटपंजरी' ची 'कंथा' रचीत बसलो. आता हें 'स्नेहमाहात्म्य' पुरे करतो.

पाटणा.
१३.८.'५४.

तुझ्या स्नेहार्द्र क्रांतिसंदेशामुळे तुझा परिवार सतत वाढत जाणार. हें भाग्य दुर्लभच नव्हे, तर अलौकिक आहे. स्नेह हेंच आपल्या समाज रचनेचें अधिष्ठान, त्याचीच अभिव्यक्ति आपल्या वाणीतून, कृतीतून व अस्तित्वातून व्हायला पाहिजे. त्या वृत्तीचा आविष्कार म्हणजेच तुझा हा वाढता वाडवडिलांचा व लहान थोर भावंडांचा परिवार. या गोकुळातूनच नव्या समाजाचा विकास होईल. तेव्हा या वाढत्या गोतावळ्याला घाबरू नकोस, कंटाळू नकोस. उलट 'माझिये जातीचे मज भेटो कोणी' म्हणून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रार्थना करीत जा. आता कामकाजाचें जग व दुकानदारीचें जग आपल्याला नको आहे ना? खरी मकानदारी ती हीच!

आगगाडी.
२३. ९'.५४.

•

मानव हेंच आपल्या चळवळीचें अधिष्ठान व प्रमुख साधन असल्यामुळे अनासक्त प्रेमसंग्रहाच्या प्रक्रियेतून सुटका नाही. हे असे वैयक्तिक स्नेहसंबंध वाढणार व ईश्वरी संकेत म्हणून त्यांचें स्वागतहि करावें लागणार. मानव आपल्या साधनेचें उपकरण नव्हे; आलंबन आहे, आराध्य दैवत आहे. आपली साधना व्यक्तिवादी किंवा व्यक्तिनिष्ठ नाही; पण आत्मनिष्ठ आणि सामाजिक आहे. त्यामुळे अनासक्त व निरपेक्ष स्नेह हें तिचें प्रमुख अंग आहे.

पाटणा.
२१.८.'५४.

•

चि० बाबलाचें पत्र आलें. मनू, काय सांगू? तुझ्या ता० ३० च्या पत्रात आणि त्या पत्रात केवढें साम्य आहे! म्हणतो, "आपको शतशः प्रणाम करने के लिए यह पत्र लिख रहा हूं। आपने मुझे जो दिया है, उसके लिए क्या लिखूं? मैं जानता नहीं कि प्रेम की जमाखर्ची होती है या नहीं। यदि होती होगी तो मैं ऋण से लद जाऊंगा। आज चार सभाओं में उत्तरोत्तर अधिक सफलता से बोला। अपनी बडाई करने के लिए नहीं, अपने अंतर के संतोष को प्रगट कर आपको भी अपने बेटे की सफलता का संतोष देने के लिए लिखता हूं। मेरे चिंतन में, या भाषण में, जो कुछ भी व्यवस्थितता है – या शास्त्रीयता है, वह सब आपकी देन है।

१० / ११ सितंबर को ताई यहां नहीं आ सकती क्या? यहां के लोगों को पता तो चले कि इस जमाने में भी मैत्रेयी-गार्गी बसती है।"

प्रभाताईचें कार्डहि त्याच थाटाचें. पण, तुझें ता० ३० चें पत्र म्हणजे भगवंताचें 'पसायदान' आहे. मी अमृत प्यालो. आकंठ प्यालो. "अब न मरेंगे, हम अमर भये!" "तुमचा बहिश्चर प्राण – मनूराजा" हे तुझे सहीचे शब्द सोन्याच्या अक्षरांनी कोरून ठेवावेत! माझ्या हृदयावर कोरले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गेले. मी अनंत प्राणवान् बनलो. आज जयपुराहून केलेली तुझी तारहि मिळाली. समाधान वाटलें. देव तुला हुरूप देईल आणि अखंड यश देईल. तुला खूप खूप आयुष्य लाभो.

धकजडी (बेनीपट्टी)
२.९.'५४.

भावी समाजरचना आर्थिक स्वार्थाऐवजी स्नेहाच्या पारमार्थिक पायावर उभारायची आहे ना? तो स्नेह का अस्मानात राहील? निव्वळ भावनात्मक राहील? त्या स्नेहाकरिता खस्ता खाणें, निरपेक्ष कष्ट करणें, हेंच सामाजिक तप नव्हे का? म्हणून मनूच्या शरीराला मी पृथ्वीपेक्षाहि अधिक किंमत देतो. मला निराळें तप माहीत नाही. ज्या व्यक्तींमध्ये सामाजिक मूल्यांचा उत्कर्ष झालेला असतो, त्यांच्या शरीराची जोपासना ही थोर समाजसेवा आहे. तपावांचून तत्त्वज्ञान मुरत नाही असें तूच म्हणत्येस ना? स्नेहाचें प्रत्यक्ष अनुष्ठान तप नव्हे काय? माणूस मोहवश व विकार वश न होता जर जागरण, भूक, शीतोष्ण सुखदुःख स्नेहाकरिता सोसू लागला तर तें तप नव्हे काय?

गढा, जबलपुर.
२२.१०.'५४.

एक गोष्ट मात्र निक्षून सांगतो. कमीत कमी आठ दिवस तरी माझ्याजवळ राहशील तर तुला खात्रीने पुष्कळ बरें वाटेल. मनूराजा 'माझा मनूराजा' आहे, या गोष्टीत अंतर पडणें शक्य नाही असें तूच म्हणतेस ना? पंढरपुरला असतांना, "कितीहि कामें असलीं तरी घटकाभर तरी या," गयेला असतांना, "Cancel all programmes and come," पुरीला असतांना, "your presence necessary," येथून दिल्लीला गेल्याबरोबर फोन करून, "मी तरी यायला नको होतें; किंवा तुम्हाला तरी दिल्लीपर्यंत आणायला हवें होतें," पन्हाळ्याला असतांना, "आम्ही नाही येथे राहत, आम्हाला बरोबर घेऊन जा," म्हणणारा माझा निरहंकारी मनूराजा माझा प्राण आहे. त्या वेळीं 'मनूपेक्षा काम मोठें' असा अविवेकी विचार त्याच्या मनाला शिवला नाही. आता मनू स्वतः काम करू लागली. त्या वेळीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मात्र ती निवड करू लागली. बेटा, बरोबर नाही हें मी सांगतो तेंच बरोबर आहे. "तुम्ही या," म्हणून बोलवण्यात किंवा "मी येत्ये" म्हणण्यात निरहंकारहि होता आणि खरा विवेकहि होता. त्यात 'जाणीव' नव्हती आणि 'नेणीव'हि नव्हती, 'घोर अंधारात शिरणें' आणि 'त्याहून घोर अंधारात शिरणें' याची विवेचना नव्हती. अगदी निरुपाधिक सहजावस्था होती ती.

वैराग्याचा परिपाक जर आध्यात्मिकतेत न झाला, तर व्यक्तिवादाला तुटकपणाचें स्वरूप कसें येतें याचें प्रत्यंतर आश्रमात राहिलेल्या किती तरी व्यक्तींच्या जीवनात पहायला मिळतें. त्यांच्या दृष्टीने इतर माणसें म्हणजे सेवेचीं साधनें किंवा स्वतःच्या साधनेचीं जिवंत उपकरणें. अलीकडे एक आणखी नमुना पहायला मिळाला. एकजण आजारी माणसाच्या सेवेला येऊन राहिले. सेवेतच अभिनिवेश निर्माण झाला. याची सेवा आजारी माणसाला जाचू लागली. तें माणूस कंटाळलें. सेवकाचा तिटकारा आला. तरी याचा सेवाग्रह चालूच. आजाऱ्याला भेटायला इतर माणसें येत, त्याच्याजवळ बसत, त्याला कुरवाळीत. शुश्रूषक म्हणाला, "मी अंमळ तुला तेल चोळून देतो." दुखणेकरी माणूस म्हणालें, "नाही, मला नको आहे." शुश्रूषक चवताळला, "तुला स्नेहाचा स्पर्श आवडतो; सेवेचा मात्र सहन होत नाही."

रागा-रागात केवढें मूलभूत तत्त्व बोलून गेला विचारा! जीवनाचें तत्त्व, सत्त्व, उपादान, स्नेह आहे, सेवा नव्हे. स्नेहाच्या पोटीं सेवा उत्पन्न होऊ शकेल. पण सेवा ही स्नेहाची जननी होईलच असें नाही. ज्या सेवेची परिसमाप्ति स्नेहात होत नाही ती सेवाच नव्हे.

झालें. सेवकाला रजा मिळाली. जिकडे-तिकडे सांगत सुटला, "मी बेकार झालो. सेवेतून मोकळा झालो. आता या आयुष्याचें काय करू? त्याला हें कसें कळत नाही की स्नेहाला सेवेची संधि लागत नाही, बरोबर जगणें स्नेहाला पुरेसें वाटतें. एकमेकांचीं कामें करणें सेवा नव्हे, मदतहि नव्हे, तो फक्त बरोबर जगण्याचा आनंद आहे. प्रेमाला आरंभ आपुलकीतून होतो आणि परिसमाप्ति तादात्म्यात होते. 'तो मी आहे' या भावनेत दुसऱ्याला विषय किंवा संपत्ति मानता येत नाही. तेथे मालकीच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भावनेला, थारा नाही. त्यामुळे खरा स्नेह नेहमी शारीरिकतेच्या वर उठवितो.

पाटणा.
१६.११.'५४.

●

आत सुधारस असला तर वाणीतूनहि अमृताची गोडीच वाहेर पडते. तू कार्यकर्त्यांविषयीं लिहिलेस तें खरें आहे. त्यांना मायेच्या शब्दाची गरज असते. आमच्याजवळ त्याचेंच मोठें दुर्भिक्ष. हृदयातील सगळ्या आशयाचा कषाय झालेला. वाणीत गोडी कशी यावी ? गुळचट आणि पोकळ भाषेने कार्यकर्त्यांचीं मनें जिंकलीं जात नाहीत. हृदयातच सद्‌भाव हवा. त्याचीच तर उणीव आहे.

पाटणा.
१५.१.'५५.

●

येथें अण्णा, रंगा, एकनाथ, गजानन, इत्यादि 'सवंगडी' भेटले. सवंगड्याची भेट म्हणजे 'सत्संग' नव्हे. सत्संगातदेखील 'अभिसंधि' व 'उपाधि' असतो. लाभाची आकांक्षा असते. लाभाच्या पोटीं लोभ निपजतो. येथें नुसतीच सोवतीची गोडी ! दादाला मनूच्या संगतीत 'आराम' आणि 'राम' असा द्विगुणित आनंद होतो. नुसताच 'आराम' 'हराम' आहे. जो 'आराम' देत नाही त्या 'रामात' हि 'राम' नाही. विचाऱ्या गजाननलाहि 'आराम' करावा लागतो. पण त्याचा विश्रामहि कष्टमय आहे. माझा विश्राम अगदी निर्भेळ ! कष्टाचें व श्रमाचें नांव नाही ! एकांतात विश्रांति असते असेंहि नाही. निःशब्दता असते. पण शांति नसते. तसेंच सत्संगाचें. सत्संगात अवांतर हेतु असतो. निर्भेळ मैत्रीला कित्येकदा तो अंतरायभूतहि ठरतो. दोस्ती, निर्भेळ दोस्ती, निरपेक्ष दोस्ती जीवनाचा प्रकाश आहे.

गांवदेवी, मुंबई.
११.४.'५९.

●

सगळ्या संवंधांचें मूल कारण व उपादान प्रेम हेंच आहे. तरी पण निरनिराळे संवंध निरनिराळ्या औपाधिक आलंवनामुळे स्थापन होतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हीं आलंबनें औपाधिक असल्यामुळे "गौण" असतात पण मिथ्या मात्र नसतात. त्या संबंधामध्येहि निरपेक्ष – निर्विकारी प्रेमाचें प्रमाण जितकें अधिक असेल तितके ते संबंध टिकाऊ आणि शुद्ध होत जातात. परंतु त्याच्यातील विविधता कायमच राहते. पत्नी, पुत्र, आई, वडील यांच्या बाबतीत जी जबाबदारी वाटते तशी भाऊ, वहीण, सासू यांच्याविषयीं वाटत नाही. प्रेम सर्वांवर सारखेंच उत्कट असेल. पण कर्तव्यें व दायित्वें भिन्न भिन्न असतात. वास्तविक पारमार्थिक संबंध व नातें एकच प्रेमाचें. पण, हीं औपाधिक व अवांतर आलंबनेंहि खोटीं नाहीत. या विविध संबंधांची विविधता राखूनहि त्यांच्यात जेवढी निरपेक्षता व निर्व्याजता येईल तितकी ती विविधतादेखील शुद्ध, व्यापक प्रेमाकडे नेणाऱ्या सोपानासारखी उपयोगी ठरेल. काळ आणि वेळ यांचें जसें द्विविध स्वरूप असतें—एक घड्याळाचा, पंचांगाचा औपाधिक वेळ आणि दुसरें निरुपाधिक, निरवधि कालतत्त्व; त्याचप्रमाणे मानवीयसंबंधाचें हें द्विविध स्वरूप आहे— एक, विविध नात्यांवर व भूमिकांवर आधारलेलें स्नेहमूलक आणि दुसरे, नाते व भूमिका निरपेक्ष केवळ प्रेमावर अधिष्ठित. मुख्य प्रवाह प्रेमाचाच. "सामुद्रोहि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः !"

जबलपुर.
१७.३.'६०.

चि० इंदु पलीकडच्या खोलीत राहो कां अलीकडच्या खोलीत राहो. तिचा खरा जीव तुझ्यात असल्यामुळे जेथे तू राहाशील तेथेच तिचा जीव खिळून राहील. दोस्तीची गंम्मत काही अजबच आहे. दोस्तीत साधना नाही, फायदा नाही, वायदा नाही, कायदा नाही, निरवळ दोस्तीच आहे ! तिचा लुत्फ अमृताहून विलक्षण आहे ! दोस्ती म्हणजे खेळ नव्हे !

सांताक्रूज, मुंबई.
१.२.'६१.

आपल्या जवळच्या दोन माणसांत गैरसमज व्हावा हें मला खपत नाही. माझें चित्त अस्वस्थ होतें. त्यामुळे "खरोखर मनात किंतु आला आहे का ?" हें मी अगोदर जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याने म्हटलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'किंतु आला आहे' तर त्याचीं कारणें जाणून घेऊन तो नाहीसा करण्याचा प्रयत्न करतो. त्याने म्हटलें 'किंतु आला नाही' तर जास्त शहानिशा करण्याची आवश्यकता मला वाटत नाही. त्याच्या मनात किंतु आला आहे असें मानायला माझ्याजवळ भर भक्कम पुरावा आणि आधार असला तरी आता तो इनकार करीत असल्यामुळे त्याला आपली पूर्वीची वागणूक मान्य नाही हें उघड आहे. एरवी आता संपादणी करण्याचें किंवा इनकार करण्याचें त्याला काय प्रयोजन? मैत्रीत अंतर पडू द्यायचें नाही हा एकच हेतु त्याच्या या दुटप्पी वाटणाऱ्या वागणुकीचा असू शकतो. म्हणजे तोहि मित्रत्वाचा आकांक्षी आहे. त्यालाहि आपल्या स्नेहसंबंधाची चाड व गरज आहे. तो काही बेदरकार नाही. गैरसमज झाला असतांना बेचैन होणें व तो दूर करून घेण्याकरिता आपण होऊन धडपडणें यात कमीपणा किंवा लोचटपणा तर नाहीच, उलट हें मैत्रीचें मूळ लक्षण आहे. मला असें वाटतें की मैत्रीला आरंभ असतो पण अंत नसतो. ती एकदा जुळली की तुटत नाही. प्रत्यक्ष व्यवहारात परिस्थितीमुळे अंतर पडेल, त्यामुळे जवळीक कमी झाल्याचा भास होईल, पण आपुलकीत अंतर पडणार नाही.

काशी.
१९.२.'६१.

परवा रात्रीच तू पुण्याला पोचली असशील? रावसाहेबांना मनापासून आनंद झाला असेल याबद्दल मला शंका नाही. साठे दांपत्य, महाजन दांपत्य, गुलवेन या सर्वांच्या आनंदाची कल्पना मी करू शकतो. स्नेहाचा सोहळा जगातील खरा अनुपम सोहळा. त्यात अहंभावाचा कुठे मागमूसहि राहत नाही. माणूस 'लीन' होऊन जातें. 'आपुलें मरण पाहिल्या'चें देखील भान उरत नाही.

धनतोली, नागपुर.
१७.३.'६१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण पांचवें

स्नेहायत्त परिवार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: ५ :

परिचयाच्या अभावीं कुठल्याहि संस्थेतील अधिकारी किंवा वजनदार माणसें मला बोलावीत नाहीत. संस्थेतील एकादी अप्रसिद्ध व सामान्य व्यक्ति परिचयाची असते. तिने बोलावलें म्हणजे मोठ्या आस्थेने जातो. त्यामुळे माझ्या परिचयाचें क्षेत्र जरा निराळें पडतें. लहान व मामुली माणसांचाच परिचय होतो. पण मामुली माणसांचा स्नेह व अगत्य मात्र मामुली नसतें ! त्यात औपचारिकता व थाटमाट कमी असतो, पण जिव्हाळा व वास्तविकता भरपूर असते. संतोपकडे जाण्याची फार इच्छा होती, पण वेळाच्या अभावीं जाऊ शकलो नाही. तुझ्यामुळे माझ्या स्नेहीजनांचे वर्तुळ वाढलें.

काल मालती दंडे हिचें एक कार्ड आलें. 'तुमच्या आशीर्वादाने बी. ए. पास झालें' एवढें एकच वाक्य तिने लिहिलें आहे. केव्हा केव्हा एकाच वाक्यात सबंध ग्रंथ सांठवलेला असतो, नाही ?

नवी दिल्ली
३. १२.' ४९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीपादचें पत्र आलें. या पाळीला भावनाविवश होऊन पत्र लिहिलें आहे त्याने. म्हणतो, "तुमचें पत्र वाचीत असता तुमच्या सान्निध्याचा अनुभव होत असतो. एकापरीने हें चांगलें आहे खरें. पण त्यामुळे जी एक अस्वस्थता व कालवाकालव होते तिच्यायोगे त्या आनंदावर उदासीनतेची छाया पसरते. अशा प्रकारचा हा विचित्र अनुभव फक्त तुमच्याच बाबतीत होत आहे आणि त्याला तुमचा स्वभावच कारण आहे. पूर्वी घर सोडून शाळेसाठी बाहेर जातांना मनात जी कालवाकालव होई तशाच तऱ्हेची अस्वस्थता गेल्या दोन तीन खेपेस तुमचा निरोप घेतांना झाली होती. इतक्या दिवसांच्या अनुभवानंतर मला असें वाटू लागलें होतें की माझ्या अंतःकरणातील 'भावुकतेचा' झरा आटून गेला आहे. पण तो पूर्वपेक्षा जोराने वाहू लागेल कीं काय असें वाटू लागलें आहे. हें जें होत आहे तें बरें कीं वाईट याचा निर्णय अद्यापि करू शकलो नाही. पण एकूण माझ्या स्वभावाच्या विरुद्ध हे सर्व असावें असें वाटतें." किती मनःपूर्वक लिहिलें आहे हें. त्याच्या भावनेचा पावन झरा पुन्हा जोमाने वाहू लागला तर त्यात काही वावगें आहे का गं? माझ्या विमललाच या प्रश्नाचें खरें उत्तर माहीत आहे.

बेंगलूरचे छोटूभाई देसाई यांचें पत्र आलें. छोटूभाईंची पत्नी सरला तुझ्या व बबीच्याच वयाची आहे. माझ्या स्नेहायत्त परिवारात या जोडप्यांचें स्थानहि फार महत्त्वाचें आहे. असा परिवार वाढत गेला म्हणजे 'अवघाचि संसार सुखाचा' होतो!

गिरिधारीजीमुळे येथे करमतें. काल दुपारीं त्यांच्या बरोबर नं. २ हार्डिंज एव्हेन्यूमध्ये जेवायला गेलो होतो. आज दुपारीं 'लक्ष्मींत' जाऊन आलो. काल रात्री बिंदूकडे गेलो होतो. आज मदन पंक्तीला होता. एकूण प्रभूने 'सह नौ भुनक्तु' चें वैभव भाग्यात लिहून ठेवलें आहे. जो एकटा जेवतो तो चोरून खातो, नाही?

नवी दिल्ली
१४.१२.'४९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल रात्री ८.३० च्या सुमाराला येथे पोचलो. मी वर्ध्याहूनच पुढे ब्राह्मणपुरला जाणार असें पूर्वी ठरले असल्यामुळे सौ० सरस्वती, बेबी, डॉ० सोनार, बबन व चंदु ही मंडळी मुद्दाम मला भेटायला आली होती. सौ० सरस्वती व चंदु यांची प्रकृति थोडी अस्वस्थ असल्याचें समजल्यामुळे मी नागपुरला यायला निघालोच होतो. इतक्यात ही मंडळी आली. किती आनंद झाला असेल मला तूच सांग. नातें, नातें तें आणखी काय असतें ? बेबीचें आणि माझें नातें जर जुळू शकतें तर सरस्वतीचें व माझें नातें जुळणें देखील तितकेंच स्वाभाविक नाही का ? त्या छोटचाशा गाडीत आम्ही सारीं जणें आणि सोनारांचा पट्टेवाला अगदी एकमेकांच्या सान्निध्याचें पवित्र सुख अनुभवीत आलो.

धनतोली, नागपुर.
११.२.'५०.

कलकत्त्याला तात्या परळीकर विमानतळावर होतेच. ता० १५ ला ते मला आगगाडीत भेटले होते. त्याच वेळीं त्यांच्याकडे उतरावें असें ठरलें होतें. हे परळीकर म्हणजे आपल्या महिलाश्रमाच्या कमूताई लेले यांचे सख्खे बंधु आणि इंदु म्हणजे ताराबाई मशरूवालांची अभिन्न सोबतीण सुशीला हिची सख्खी बहीण. इंदूने हें लग्न आपल्या आईच्या व इतर वडील माणसांच्या मताविरुद्ध केलें. कमूताई व द्वारकानाथ लेले यांचा विवाह जसा मिश्र विवाह आहे तसा इंदूचा विवाहहि मिश्र विवाह आहे. कमूताई प्रभु आहेत आणि इंदु ब्राह्मण आहे. द्वारकानाथ ब्राह्मण आहेत, तर तात्या परळीकर प्रभु आहेत. इंदु त्या वेळीं वर्ध्यालाच शिकत होती. तिच्या शरीराप्रमाणेच मनहि ऐसपैस व भरदार आहे. तिच्या लग्नाला मी प्रोत्साहन दिलें. तिच्या घरीं पहिल्यानेच गेलो. संसार नीटनेटका पण 'तंग' नाही.

या मिश्र विवाहात एक गोष्ट माझ्या दृष्टीने विशेष समाधानाची आहे. कमूताई व तात्या या दोघांनीहि मांस व मत्स्य अजीवात वर्ज केलें असून त्या बाबतीत तीं दोघें द्वारकानाथ किंवा इंदु यांच्यापेक्षाहि अधिक कडक आहेत. मला मांसाहारी माणसांबद्दल अनादर किंवा अस्नेह नाही, कित्येक मांसाहारी माझे जिवलग मित्र आहेत. पण मांसाहार-निवृत्त माणसांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व मांसाहारी माणसांत मी फरक करीत नसलो तरी एकंदरीत मांस-निवृत्ति मी सांस्कृतिक प्रगतीचें लक्षण मानतो. शिकारीनंतर शेती, हा सांस्कृतिक उन्नतीचा ऐतिहासिक क्रम आहे. इंदु फार दिवसांनी भेटली. होती तशी पठाणिस्तानची नागरिक आहे. नर्मदा पोद्दार (वर्ध्याला आपण ज्या श्रीरान पोद्दारांकडे उतरलो होतो त्याची वहीण) हिचें घरहि कलकत्त्यालाच आहे. ती सुप्रसिद्ध लक्षाधीश प्रभुदयाल हिम्मतसिंगका यांची सून आहे. महिला-श्रमाच्या संस्थापिका शांतावाई रानीवाला यांची भाची सुशील ही नर्मदेची सून आहे. नर्मदा माझ्या मुलींपैकी आहे. त्याचप्रमाणे कलकत्त्याचे प्रसिद्ध जवाहिरांचे व्यापारी ठाकुरलाल भाई मेहता यांचें कुटुंब अगदी घरच्या सारखें आहे. त्यांचे मुलगे व मुली यांचा अर्थातच माझ्याशी फार संबंध आहे. कलकत्त्याला मी त्यांच्याचकडे उतरत असें. इंदु, नर्मदा यांचीं लग्नें होऊन आठ-आठ, दहा-दहा वर्षें झालीं. तरी त्यांच्या घरीं प्रथमच गेलो. त्याचप्रमाणे ठाकुरलालभाईंच्या नवीन घरातहि पहिल्यांदाच गेलो. त्यांच्या इतकाच आनंद मलाहि झाला.

कलकत्त्याला सुमारे नऊ वर्षांनंतर गेलो. पण तें शहर जसें होतें तसें आहे. वाढलें भलतेंच आहे एवढें खरें. बाकी भयंकर प्रक्षुब्ध वातावरण आहे. सगळे एकमेकांवर नाराज आहेत, सगळे मिळून सरकारवर नाराज आहेत. इतकें भयंकर संकट कोसळल्यावर लोकांनी रागावूहि नये असें कोण म्हणेल ? रागावण्याचा त्यांचा हक्क मान्यच केला पाहिजे. फक्त 'क्रोधाचें' पर्यवसान 'संमोहात' होऊ नये याची काळजी घ्यावी. कलकत्त्याला गेलो म्हणजे 'वनस्पति बागेत' जात असतो. या पाळीला मात्र गेलो नाही. वेलूड व दक्षिणेश्वरहि चुकले. नमाकडे जेवावें कीं इंदूकडे असा मोठा गंभीर वाद सुरू झाला आणि त्याचे परिणामहि गंभीर स्वरूपाचे होण्याचीं चिन्हें दिसू लागलीं. तेव्हा नमानेच माझ्या पंक्तीला इंदूकडे जेवायला यावें अशी तोड निघून हा 'संकट प्रसंग' (crisis)टळला !

कलकत्ता.
१९.४.'५०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लीला म्हणते, 'तुमच्या सहवासात मला किती शिकता येतें ह्याची तुम्हाला काही कल्पनाच देता येणें शक्य नाही. तुम्ही एक शब्दहि बोलत नाही खरे, पण तुमच्या सान्निध्यात मी आहे ही जाणीव व तें सान्निध्यच किती सुखाचें आहे !'

आता हें ती माझ्याजवळ बोलली असती तर मी तिला विहारला नसतो का घेऊन गेलो ? बापाजवळहि हट्ट धरणें तुमच्या मानी स्वभावाला मानवत नाही का ? अशा कशा गं तुम्ही आतल्या गांठीच्या ? तुम्ही माझ्याजवळ हट्ट धरण्यात माझा गौरवच नाही तर माझ्या जीवनातील देवदुर्लभ आनंदहि आहे.

येथे दामोदर आहे. मीरा आहे, बेबी आहे, हरिश्चंद्र आहे. ही सारी मंडळी मला सिकंदराबादलाच घ्यायला आली होती. दामोदरने तुझी चवकशी केली. त्याने तुला पत्र पाठविलें.

ज्ञान येथे नव्हती. आता मुंबईहून आली. तुझ्याप्रमाणेच ती मोठी 'लीडर' आहे. पण ती राजकारणातहि उडी घेण्यास कमी करीत नाही. हैदराबादच्या सर्वच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळीत तिचा सक्रिय व प्रमुख भाग असायचाच. धंदेवाईक 'लीडर' नाही, पण 'हौसी' आहे. 'बेबी', मीरा आणि ज्ञानकुमारी यांच्या जोडीला तू असतीस तर ? आनंदात व लाभातहि किती तरी भर पडली असती ! निर्विकारी व अकृत्रिम प्रेमात हें वैशिष्ट्य असतें. त्याला मत्सराचा कधी स्पर्शदेखील होत नाही. त्यात जितके वांटेकरी होतील तितकीच त्याची खोली व आनंद यांची वाढ होते.

२२.४.'५०
हैदराबाद (दक्षिण)

आज गोविंदरावांचें पत्र आलें. लिहितात, 'तुमच्या प्रत्यक्ष येण्याने आम्हा सगळ्यांची कशी स्थिति झाली याचें वर्णन मी करू शकत नाही. — चि. वसंतला तुमच्या पत्राने व येण्याने जें समाधान झालें तें कुठल्या तरी औषधाने झालें असतें काय ? आणि उभयता तीर्थरूपांच्या समाधानाला यापेक्षा दुसरा कोणताच आधार उरला नव्हता हें तुमच्या उत्कट स्नेहाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उमगलें हें पाहून मला किती धन्यता वाटली —– स्नेहजन्य शक्तीचा प्रत्यय तुमच्या संगतीने वारंवार येत आहे.' 'पोरी' तुमच्या, माझ्या अपत्यांच्या, अशा शब्दांनी मला संजीवन मिळतें.

काल चांद्याचे भाऊ सावलीकर आले. त्यांना व त्यांच्या धाकट्या भावालाहि क्षयरोग जडला. कर्तबगार, सुशील व अत्यंत गोड तरुण ! माझ्या स्नेहातील अनेक तरुण माणसांना या भयंकर रोगाची बाधा होत असलेली पाहून काळजाचें पाणी पाणी होतें ! तरी लोक मला स्थितप्रज्ञ म्हणून मोठ्या 'कृपाळुपणें' हिणवायला तयारच आहेत.

धनतोली, नागपुर.

१२.३.'५१

भोगीहि अनपेक्षित रीतीने चांगली साजरी झाली. काल बल्लाकाका आले. दादाहि आले. वयानें बल्लाकाका माझ्याहून लहान. दादा आणखी धाकटे. पण मानाने दोघेहि मोठे. घराण्याची मर्यादा व लौकिक बल्लाकाकांनी संभाळला. कमाई केली. वडील भावाची जबाबदारी पार पाडण्याचा पतकर घेतला. दादा गुणांनी व विद्येनेंहि मोठे. म्हणून दोघांनाहि मनाने मोठे मानीत आलो. दोघेहि अचानक भोगीच्या दिवशीं आले. त्यामुळे दुप्पट गोडी आली.

संक्रांत म्हणजे तिळ-गुळ : स्नेह आणि गोडी. प्रीति म्हटली की ऋजुता आणि सरळपणा आला. गोडीत वागणुकीतील सौंदर्याचा अंतर्भाव होतो. संक्रांतीच्या दिवशीं प्रांजळपणा आणि गोडी दोन्ही वाढविण्याचा संकल्प करायचा असतो. दादांच्या ठिकाणीं दोन्ही आहेत. दादांविषयीं तू म्हणतेस तें अगदी यथार्थ आहे. दादांच्या व्यक्तित्वाचे मूल्यमापन करण्याइतका निकट परिचय तुला नाही हें खरें आहे. पण न्यायाच्या काटेकोर दृष्टींनेच तें खरें आहे. आपण काही चाणाक्ष मुत्सद्दी नाही. कुठल्याहि व्यक्तीबद्दल सहज अनुकूल ग्रह झाला तर तो आपल्याला इष्टच आहे. अनुभवाने तो चुकीचा ठरला तर आपला इलाज नाही. पण आपण अनुकूल ग्रहाचे रक्षणच करण्याचा प्रयत्न करीत राहू. एकाद्याविषयीं प्रतिकूल ग्रह झाला तर आपल्याला आवडू नये. तो चुकीचा ठरला तर आनंद व्हावा, तो चुकीचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठरावा असे सारखें वाटत रहावें. अनुकूल ग्रह करून घेण्याची तत्परता हा ऋजुतेचा गाभा आहे. प्रतिकूल ग्रह कायम ठेवण्याचा मनातल्या मनात किंवा उघडपणें प्रयत्न करीत राहणें कुत्सितपणाचे द्योतक आहे. हाच मित्रत्वाच्या विकासाचा मार्ग आहे. एरव्ही आजचा अमित्र उद्याचा मित्र कधीच होणार नाही. त्यामुळे अनुकूल ग्रह टिकविण्याची काळजी घ्यावी, प्रतिकूल ग्रह नाहीसा करून घेण्यासाठी उत्सुक असावें. आपण फसलो तरी नुकसान काहीच नाही. गमावण्यासारखी स्थूलसंपत्ति आपणाजवळ आहे तरी कोठे ?

नागपुर.
१४. १. '५२

माझ्यावर निरपेक्ष उपकार करणारांमध्ये प्रयागचे एक ॲडवोकेट श्री. विष्णुदत्त भार्गव यांची गणना होते. आतिथ्य आणि अगत्य यांची साक्षात् प्रतिमा आहेत. तुमची आई व चि० प्रभा यांना तीन-तीनदा प्रयागला न्यावें लागलें. त्या वेळीं प्रत्यक्ष परिचय नसतांना विष्णुदत्तांनी कृपेचा वर्षाव केला. काल आपली मोटार वळजवरीने दिली आणि गाडीत रात्रीकरिता शिदोरी जातीने आणून दिली. आवासाहेब म्हणाले, "तुमच्यावर ज्या माणसांचें प्रेम जडतें, तें एकदम उत्कट व निःसीमच जडतें !" सोनू, हा गुण त्या माणसाचा नाही का ? तो मला चिकटविणें गैर नाही का ?

सुधा (सुभद्राची मुलगी, सुप्रसिद्ध साहित्यिक प्रेमचंद यांची सून) राय हिच्याकडे अक्षरशः उभ्या उभ्या जाऊन आलो. धावत येऊन कमरेला विलगली. माझ्या छातीवर डोकें ठेवून लाडली. हें सारें अर्ध्या मिनिटात झालें ! मी म्हटलें, 'जाऊ मी ?' तोंड फुगवून म्हणाली, 'मला तुमच्याशी बोलायचेंच नाही जा ! हे तिचे निरोपाचे शब्द ! पण त्यात आशीर्वादच नाही का ?

आगगाडी.
१८.४.'५२.

काल सकाळीं १० ला धनबादला पोचलो. गीता साने स्टेशनवर आल्या होत्या. पण विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे कांति मेहता आला होता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांति मेहता हा कलकत्त्याच्या एका धनाढ्य जव्हेऱ्याचा मुलगा, सुमारे पंधरा वर्षांपूर्वी तो अगदी कोवळ्या वयाचा असतांना पंजाबात माझ्याबरोबर होता. खूप दोस्ती जमली. त्याचे वडील, आई, भाऊ, वहिणी, भावजय, सगळ्यांचीच ममता माझ्यावर जडली. तो संबंध घट्ट होत गेला. आता कांति विवाहित आहे. त्याची बायको नीहार नांवाची माजी कम्युनिस्ट बंगाली मुलगी आहे. आता त्यांना आठ-दहा महिन्यांचा मुलगा आहे. नीहार म्हणजे दंत. नीहार-कांति योग आहे हा, दोघांनीहि माझ्यावर जें प्रेम उधळलें तें काय सांगू ? दोघेहि मिळून मजुरांची सेवा करतात.

गीता साने आग्रहपूर्वक मला घेऊन गेल्या. बराच वेळ त्यांचेकडे होतो. अगदी निकटचा संबंध असा पहिल्यानेच आला. सांगण्यासारखे काही नाही. त्यांचे पति नरसिंग (धरमवार) यांचा व माझा परिचय जुनाच आहे.

तिसरे प्रहरीं धनबादला व सायंकाळीं झरियाला भाषण झालें. रात्रीं झरियालाच झोपलो, कांतीने व नीहारने मनस्वी आग्रह केला. त्याच्याकडे गेलो नाही ही चूक झाली. मला कागदी खाकरे मानवतात म्हणून कांतीने मुद्दाम आठवण ठेवून नीहारकडून खाकरे करवून माझ्याबरोबर दिलें.

पुरुलिया.
२७. ७. '५२.

कालपासून भालवांच्या भेटीची तीव्र उत्कंठा लागून राहिलेली होती. तेहि माझी वाट बघत नुसतेच बसून राहिले होते. प्रभाकरचीहि कोण आठवण येत होती. सकाळीं येऊन कुशीत शिरला. प्रेमाचें भरतें आलें. भालवा येऊन भेटले. नाना, भालवा व मी माईंकडे जेवलो. भालवा म्हणाले, "या गांधींच्या लोकांत दादाच काय ते सगळ्यांना मानवतात. त्यांच्या कानपिचक्याहि गोड लागतात !" मला भालवांच्या सहवासात मानसिक आराम मिळतो. भालवांनी सांगितलें, "विमलाबाईंची प्रकृति अगदी उत्तम झाली आहे. सफरचंदासारखे गाल झाले !" माईंनी री ओढली. म्हणाल्या, "मी त्यांची दृष्टच काढली, इतक्या चांगल्या झाल्या आहेत." माझें वजन घ्यायला हवें होतें कोणी. शरीर विसर्जनाच्या कल्पनेबद्दल तुझी त्यांनी जी हजेरी घेतली तिच्याबद्दलहि त्यांनी गंमत सांगितली. दिवस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फ़ारच मजेत गेला. पोरी ! देवावर विश्वास असेल तर एक सूत्र लक्षात ठेव, 'जें शरीर आपण निर्माण करू शकत नाही. त्याचा नाश करण्याचा हक्कहि आपल्याला नाही. मग तें इतरांचें असो वा स्वतःचें असो.' इतरांचीं शरीरें अधिक मोलाचीं मानावीं हें बरोबर आहे. पण स्वतःचेंहि आपल्या निर्भेळ मालकीचें मानू नये. यालाच अनहंकार म्हणायचें.

सकाळीं प्रभाकर भेटून गेला. स्नेहाचें अभ्यंगस्नान घातलें त्याने मला. नंतर भालबांच्या गिरसप्पांत यथेच्छ शीतळ, शुभ्र तुषारांचा आस्वाद घेऊन आलो. ब्राह्मीच्या पाल्याची आठवण देऊन आलो. बाबा (भाळजी) पायां पडले. मला भडभडून आलें. म्हणाले, "मी औपचारिक नमस्कार करणारांपैकी नव्हे. त्यात भावना आहे." हृदय प्रार्थनेने भरून आलें.

कोल्हापुर
२१.९.'५२.

चि. गोविंदरावाचें पत्र आलें. दगदगलेला आहे. म्हणतो, "मी जलचरासारखा आहे. स्नेहाच्या ओलाव्या खेरीज माझी जीवनयात्रा कुंठित होऊन जाते. प्रसाद आणि तीर्थ पोटभर थोडेंच घ्यायचें असतें. टॉनिक घेतल्याने शक्ति वाढते हें खरें असलें तरी कुणी टॉनिकच्या गोळ्यांच्या आहारावर राहत नाही. तुमचा सहवास व तुमचा स्नेह म्हणजे प्रसाद व तीर्थ आहे. दही हांडीच्या एका थेंबाने समाधान होतें."

या श्रद्धेला मी पुरेन का ? दहीहांडी फुटली नाही, तोंवरच झांकली मूठ आहे. 'प्रसाद', 'तीर्थ' व 'टॉनिक' मानतो तोंपर्यंतच गोविंदरावाची खैर आहे.

आगगाडी.
१.४.'५४.

परिवारापैकी रमेशभाई विनोबांजवळ आहे. रजनीबाबू आज-उद्या येईल. रामभाऊ माझी परिचर्या व 'शुद्धगृह-आंदोलन' करतो. तरुणभाई आहे. दिगंबर बाबूंच्या भावनावशतेमुळे त्यांना मानसिक कष्ट होतात. नागेश्वरबाबूंचें त्रिकालसंध्येप्रमाणे दिवसातून तीन संत्र नवीन नवीन होत असतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

टाइपिस्ट वर्माबाबू बेफिकीर 'तरणाबांड' आहे. कपिलभाई काम रेटतो. दादा या सगळ्यांच्या सहवासात आहे पण भानगडीत नाही. सगळ्यांना मदत करतो. विवंचना कोणाचीच वाळगीत नाही. घर मात्र गजबजलेलें आहे. विदेही लक्ष्मीबाबू नेहमी अंतराळीच राहतात. विनोबांच्या पायांना विश्राम नाही, त्यांच्या 'चाकांना' नाही.

पाटणा.
४.१०.'५४.

विनोबांपासून तों अगदी यःकश्चित् कार्यकर्त्यापर्यंत सगळ्यांनाच तुझ्याविषयीं जो जिव्हाळा आणि जें अगत्य आहे तें पाहून दादाचे वेंचाळीस पूर्वज उद्धरले ! जयाबेन व वजूभाई यांचा जिव्हाळा माझ्यापेक्षा कांकणभर जास्तच आहे. तू राजकोटला जाऊन राहणें हीच सर्वात अधिक स्वाभाविक गोष्ट आहे असें त्यांचें मत. सौराष्ट्रात काय थंड हवेचें ठिकाण नाही हा त्यांचा प्रश्न. त्यांना असें वाटतें की त्यांच्याकडे तू रहावेंस हें त्यांचें विशेष भाग्य आहे तें कोणी हिरावू नये. चतुर्भुजभाई म्हणतात, 'गोंदियालाच पाठवा आणि काळजी सोडून द्या. आम्ही सारें संभाळतो.' भाई धोत्रे विशेष आस्थेने चौकशी करतात. गोमतीकाकूंची प्रेमदृष्टि कासवीप्रमाणे तुझ्यावर असते असें आढळून आलें. मुंबईला तुझें भाषण ऐकून फार प्रसन्न झाल्या. शंकर-रावांनी कर्णोपकर्णीं चर्चा करून आणि द्वारकोने विनोबांना खास पत्र लिहून तुझ्या तब्येतीची दौंडी वाजविली आहे. विनोबांनी चि० बाळला तुला तार करण्याबद्दलहि सूचना केली होती. आस्था-अगत्य यांचा महोदधि आणि वात्सल्य-प्रेम यांचा रत्नाकर यांचा संगम येथे आहे. त्यात मनूविषयींचा दादाचा प्रेमा म्हणजे 'सामुद्रोहि तरंगः' ! इतक्या मंडळींची शुभकामना व चिंतायुक्त स्नेह असल्यावर ईश्वरी कृपा प्रकट झाल्यावांचून कशी राहील ? शंकरराव, नायकम्‌जी, आशादीदी, रावसाहेब, सिद्धराजभाई, करणभाई, इकंडा वारियर, लाला अचिंतराम, वऊ, नुमा, किती किती नांवें लिहू ? राजम्माच्या आई म्हणाल्या, "विमला मला असें निक्षून सांगून आली होती की तुम्ही संमेलनाला याल तरच मी त्रिवेंद्रमला पुन्हा येईन. आता मी आल्यें; त्या अर्थी विमलाने माझ्या घरीं आलेंच पाहिजे. उपचार-शुश्रूषा मी करीन.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महाराज आले आहेत. कार्यक्रमाच्या सुरवातीला एक-दोन भजनें म्हणतात. अगदी एकटेच आले आहेत. विचारे 'परागंदा' दिसतात. आज-पासून कॉफीची सोय करीन. त्यांनी तुझी चवकशी केली यात नवल कसलें ?

अमृतावहनची ओळख करून घेतली. त्या म्हणाल्या, "I can't give expression to what I feel for Vimalaji's dignifed, impressive and attractively pure personality." तू येथे येशील या आशेने कोडाय कॅनॉलला त्यांनी स्वत:च्या बंगल्यात तुझी खोली सजवून तयार ठेवली होती. गोकुळभाई, दादासाहेब, ढेबरभाई सर्वांचेंच आमंत्रण आहे.

तुझ्या आजाराच्या स्वरूपावद्दल सर्वच लोकांना काळजी वाटते. त्यामुळे शक्य तितक्या लवकर मुंबईला तुला नेऊन संपूर्ण तपासणी करून घेण्याचें मी ठरविलें आहे. दिवस वगैरे मी कलकत्त्याला आल्यावर ठरवीन.

काल दुपारच्या अधिवेशनात राजाजींचें भाषण 'आजीबाई घाटाचें' झालें. दोनचार बोचकारेहि प्रतिपक्षीयांना घेतल्यावांचून त्यांचें समाधान झालें नाही. 'असुर, राक्षस, रावण' सगळ्यांची उपमा त्यांना राजाजींनी दिली. मुख्य उपदेश, 'खर्च कमी करा, काटकसरीने नीट नेटका संसार करा!' एक गोष्ट मात्र फार महत्त्वाची बोलले. सैन्याचा खर्च व सैन्य कमी करणें हा आजचा मानव धर्मच नव्हे तर हीच खरी मुत्सद्देगिरिहि आहे, असें ते म्हणाले. ज्याची सैन्य व लष्करी खर्चात कपात करण्याची मानसिक तयारी नसेल त्याने सर्वोदय समाज सोडून द्यावा, असा इशारा राजाजींनी दिला.

विनोबांनी प्रार्थना प्रवचनात नि:शस्त्रीकरणाचा शास्त्रशुद्ध ऊहापोह केला. श्रद्धेयांना माझ्या येण्याची उत्कंठा लागली होती. म्हणाले, 'अब जान में जान आ गयी.' प्रभावतीजींच्या विमलप्रेमाला भरतें आलें ! धीरेन्‌दांचें विमलप्रेम उचंबळलें !

आज राजेंद्रबाबू, ढेबरभाई आले. श्रीमन्‌जी कालच आलेले होते आज सकाळीं मध्यप्रदेशच्या कार्यकर्त्यांसमोर विनोबांचें मोठें रसाळ भाषण झालें. संमेलनातील त्यांचें मुख्य भाषण आज सकाळीं झालें. त्यांचें मन व हृदय आपल्यापेक्षा किती तरी उदार व उदात्त आहे. त्यामुळे परिस्थितीचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याचें आकलन जितकें सूक्ष्म तितकेंच वैशिष्टयपूर्ण असतें. घटनांच्या त्यांच्या मनावरील प्रतिक्रियाहि इतरांना मार्गदर्शक ठरतात. त्यांचें प्रवचन संपल्यावर सकाळचा कार्यक्रम संपला. विनोबांचीं भाषणें, मुलाखती व प्रवचनें पहाटे ५ ते रात्रीं ८ पर्यंत अखंड चालतात. आता तामिळनाडमध्ये शुचिर्भूत होऊन प्रवेश करता यावा म्हणून जून १ च्या ८ पासून ७२ तासांचा उपवास विनोबा करणार आहेत.

आज दुपारीं 'चक्रीपुराण' व त्यानंतर श्रद्धेयांचें भाषण, संध्याकाळीं प्रार्थना प्रवचन.

संमेलनात शोभा व कला भरपूर आहे. माडांच्या झाडांमुळे नैसर्गिक सौंदर्याची उणीव नाही. जेवण उत्तम आहे. फक्त शिस्त व व्यवस्था यांचा अभाव आहे. भाषिक दुरभिमान व प्रांतीय दुराग्रहाचा दर्पहि चांगलाच आहे, तामिळ भाषणें मोठ्या शांतपणाने ऐकायचीं आणि संमेलनाध्यक्षाचें भाषणहि ऐकण्याचें सौजन्य दाखवावयाचें नाही, असा प्रकार दिसला. विनोबांचें मात्र भक्तिभावाने ऐकतात.

कांचीपुरम्.
२८.५.'५६.

कांचीपुरम्च्या संमेलनाबद्दल फारसें लिहिण्यासारखें नाही. राजेंद्र-बाबू, ढेबरभाई, श्रीप्रकाशजी व कामराज इत्यादि मंडळी होती. श्रीमन्जीहि होते. दक्षिणेकडील लोकांचें सौजन्य, अगत्य आणि नम्रता यांचें भान सर्वत्र होत होतें. भाषिक संवेदनेमुळे मात्र वृत्तीत तुरटपणा प्रमाणाबाहेर आलेला आहे. व्यवस्थाशक्तीची उणीवहि बऱ्याच प्रमाणात भासली. श्री-प्रकाशजींची मित्रपरायणता प्रसिद्धच आहे. मित्राकरिता वाटेल तें करण्याची त्यांची तयारी असते. त्यांच्या या गुणाचें कौतुक या भागात बरेंच होतें. कामराज अतिशय नम्र आणि भाविक वाटले. इतका साधा व निरहंकारी मुख्यमंत्री दुसरा नाही म्हणतात. अर्थात् नबाबानू अपवाद आहेत.

ढेबरभाई वजूभाई आणि श्रीमन्जी यांच्या विनोबाभक्तीत उत्तरोत्तर अंतर येत आहे असा भास होतो. ढेबरभाई व श्रीमन्जी यांना विनोबांच्या बोलण्यातील तिखटपणा जाणवतो. त्यात जवाहरलालजींच्या इभ्रतीला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धक्का बसतो असें त्यांना वाटतें. या पाळीला या मंडळीचा विरस झाला. विनोबांचा विनोद थोडा झोंबणारा होता, अमृतांजनाप्रमाणे ! पण, मोठा प्रांजळ आणि दिलदारीचा होता. थोडें अंग चुरचुरलें तर हरकत नाही. पण, झोंबण्याचें कारण नव्हतें.

नायकमदादा विनोबांच्या पदयात्रेत काही दिवस होते. त्यांचें 'हृदय-परिवर्तन' झालें. विनोबांवर त्यांची निष्ठा बसली. वृत्तीत प्रेमळपणा व मार्दव वाढलें.... मात्र अधिकच उवगले. त्यांना भूदानातदेखील election stunt चा वास येतो.

यंदा संमेलनाला स्त्रिया बऱ्याच आल्या होत्या. रामेश्वरम् यात्रेचा भाग यात बराच असू शकतो. तरी पण एकंदरीत संमेलनाची लोकप्रियता सारखी वाढत आहे यात शंका नाही. विनोबांनी तामिळनाडमध्ये बेमुदत संचार करण्याचें ठरविलें आहे. नवीन संकल्पाचा उपक्रम उपवासाने करणें त्यांना युक्त वाटलें. आज उपवास सुरू झाला असेल. शंकरराव, अण्णा-अप्पा, रावसाहेब व मी इतक्या मंडळींनी त्यांच्यावरोवर चार पांच दिवस एकाच वेळीं रहावें अशी इच्छा त्यांनी प्रकट केली. ऑगस्टच्या सुमाराला केव्हा तरी येवू असें शंकरराव म्हणाले. मी काहीच बोललो नाही. एक गोष्ट सामान्य रीतीने सांगून टाकली, "मुलीच्या प्रकृतीकरिता जें जें करावें लागेल तें मी तुमच्या भूदान खात्यातहि मांडणार आहे. तें माझें फक्त वैयक्तिक काम नाही. पारमार्थिक आहे."

यंदा संमेलनात भाषणें थोडीं झालीं पण एकंदरीत बऱ्यापैकी झालीं. 'चक्रीपुराणात मोतीलालजी केजडीवाल यांचें भाषण फार व्यवस्थित झालें. भाषा, शैली, मांडणी, सर्वच छान ! मुख्य ठराव यंदा धीरेन्दांनी मांडला. त्यांचें भाषण सर्वांग सुंदर झालें. एक एक वाक्य मोठें रेखीव, ठसठशीत व अर्थगंभीर होतें. सर्वोदय समाजाच्या चिटणीसपदाचा राजीनामा शंकररावांनी दिला. तो स्वीकारण्यात आला. वल्लभस्वामींनी ती जबाबदारी पतकरण्याचें नाकारलें. त्यांना सर्वोदय समाजाचें गबाळ संघटन पसंत नाही. विनोबांच्या सूचनेवरून कृष्णदास गांधी सर्व सेवा संघाचें सदस्य झाले. अप्पांनी निरनिराळ्या प्रांतातील शिबिराकरिता जाण्याचें कबूल केलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१० लक्ष गुंड्या सूत्रांजलीत मिळविण्याची जबाबदारी कनु गांधींवर सोपविण्यात आली.

तालिमी संघात तामिळनाडचे शिक्षणमंत्री, सुब्रह्मण्यम्, यांचें भाषण बरेंच हिंमतीचें झालें. त्यांनी सरकारतर्फे विनोबांना सर्व प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें. यंदा एकाहि स्त्रीचें भाषण मात्र झालें नाही. परवा रात्रीं शांतिनिकेतनच्या मुलींनी 'बुद्धं शरणं गच्छामि' या बंगाली-हिंदी नाटकाचा प्रयोग फार कलात्मक रीतीने केला. आशादीदींची करामत !

'विमलम्माल' 'विमलाक्का' चें तामिळनाड भाषिक दुरभिमानाने पिटलें नाही तर विनोबांच्या वास्तव्याचा फार सुपरिणाम होईल. विनोबायात्री मंडळांपैकी महादेवीताईंनी विमलला मद्रासला विश्रांतीकरिता बोलावलें आहे. बाळ म्हणतो, विमलताई म्हणतील तेव्हा मी त्यांच्यापाशी येऊन रहायला तयार आहे. त्यांनी फक्त मला कळवावें. विनोबांचें देहभान उत्तरोत्तर कमी होत असल्याचें प्रत्यक्ष दिसतें. 'आसक्ति' व 'संबंध' यांच्यावर उठलें त्यांचें प्रकरण आता ! आपल्याच धुंदीत असतात. पहाटे ३ ते रात्रीं ८ पर्यंत एका क्षणाची उसंत नाही. रात्रीं ८ नंतर मौन. थकवा दिसत नाही, कंटाळा नाही, उबग नाही. नित्य तत्पर आणि नित्य ताजेतवाने असतात. शारीरिक मर्यादावर आत्मसत्तेची सरशी दिसून येते. त्यामुळे तर ते सहजपणें म्हणतात की "देहात्मपृथक्करणाचें शिक्षण म्हणजेच खरें शिक्षण ! आत्मज्ञानावांचून आज तरणोपाय नाही." इत्यादि इत्यादि.

शंकरराव व विनोबा यांची पहिली व अखेरची भेटहि कालच झाली. सत्याग्रहाचें जें नवीन दर्शन शंकररावांना झालेलें आहे त्याची माहिती त्यांनी विनोबांना दिली. कृष्णमूर्तींच्या वाङ्मयाचें परिशीलन केल्यानंतर नियमित व ठराविक प्रार्थनेवरील त्यांचा विश्वास पार गेला. पदयात्रेच्या तंत्रात अर्थात् विनोबांच्या, त्यांच्या व तुझ्यासारख्यांच्या – प्रार्थनेचें अनिवार्य स्थान आहे. दादा, जे. पी. वगैरेंच्या पदयात्रामध्ये लोकांना प्रार्थनेची अपेक्षा नसते. पण शंकररावांच्या असते. तेव्हा पदयात्रा कशी करायची, हा शंकररावांपुढे प्रश्न आहे. विनोबा म्हणाले, "सभेच्या सुरवातीलाच सांगून टाकावें की आपण प्रार्थनेची प्रथा कां बंद केली म्हणून; त्यात काय आहे ?" अधिक चर्चा पुढे केव्हा तरी अनुकूल प्रसंगीं होईल.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जे० पी० बरोबर असल्यामुळे दर मोठ्या स्टेशनावर रेल्वे अधिकारी, सरकारी अधिकारी, सार्वजनिक कार्यकर्ते त्यांच्या समाचाराला येतात. नामांकित आंबे व केळीं यांच्या डाल्या देऊन जातात.

आंध्रमध्ये काजू, आंबे आणि राजमेंद्रीची केळीं प्रसिद्ध आहेत. उत्तम जिन्नस पाहिला की मनूची आठवण होते. वालटेरला अननस घेतलें. उद्या तुझी भेट होईल. आंबे-केळीं प्रभावतीजी तुझ्याकरिता वेगळी काढून ठेवणार आहेत. दार्जिलिंगचे फुटाणे कांचीपुरमला मंडळींना खूप आवडले. जे० पी० नी खूप आवडीने माझ्या जवळून मागून घेतले. म्हणाले, एकच वस्तु खाण्याची पाळी आली, तर हीच खाईन.

उत्कलमध्ये सर्वत्र पाणीच पाणी दिसतें. वादळीवाऱ्यामुळे मद्रासकडे जाणारी मेल काल ११ तास उशिरा गेली. साधारण नद्यांना पूर आहे. मैदाने शेतें जलमय आहेत. थेट हावड्यापर्यंत सगळी पृथ्वी समुद्रवलयांकित दिसते.

कलकत्ता मेल.
१-२.६.'५६.

मला येथे अगदी खूप करमतें. व्यवस्था उत्कृष्ट आहे. माणसें त्याहून सरस ! येथील गोशाळेतील गाई तिन्ही वेळा सारखेच दूध देतात. तसे बाळकोबा आहेत मायाळू आणि कनवाळू; शालीनतेची प्रतिमा ! त्यांचा समागम नाही. पण सान्निध्य आहे. सबंध दिवस, जवळजवळ चौदा तास अखंड 'पय:पान' करवीत असतात. एक बाळकोबा आणि दुसरे दादा साहेब पंडित ! 'गुरुमाउली !' शरद चांगला सोबती आहे. मितभाषी आणि अमितकारी ! आता रंगा आला. दोन दोन पुत्र आले. आणखी काय हवे बरे ?

मध, लिंबू, कडुनिंबाचा रस, कोशिंबीर, भाज्या, लोणी, दहीं, ताक, खिचडी, पोळी, फळें – काय कमी आहे? दोनदा कटिस्नान, मातीच्या पट्ट्या, मालीश, फिरणें ! यांशिवाय दोन वेळा फिरणें. केवढा इतमाम आहे ? मला तर मोठी मौज वाटते. हे उपचार म्हणजे सोहळेच आहेत. सोपस्कार आहेत ! न करमायला काय झालें ?

उरुळी कांचन.
१७.४.'५९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवा येथे आल्यावर काही दिवस सिंहगडावर जाऊन राहण्याचा विचार केला, श्री. गुलबेन यांचें घर आहेच. चि० लल्लूला पडसें झालें आहे. टॉन्सिल्स्वर सूज आहे. त्याला बरें वाटलें की जाऊ म्हणतो. श्री. काका अत्रे येथेच आहेत. बरेच दिवसांत तुझी भेट न झाल्याची तक्रार करीत होते. चि० गजाननहि दोन दिवस राहून गेला. येथे कुटुंबसंस्था नसून कौटुंबिकता भरपूर आहे त्यामुळे सगळीं कामें सहज सहयोगाने अगदी खेळीमेळीने होतात. 'क्लब' आणि 'घर' यांचा मोठा मधुर समुच्चय आहे. महाबळेश्वरला व येथे चि० गोविंदरावला तुझी आठवण सारखी येत होती. दादाला मनूची आठवण येत होती या म्हणण्यात काही स्वारस्य आहे काय ? लल्लूला मात्र 'विमल आत्या' हवी ! ताराबाईंची चक्कर रोज होते. रावसाहेब, भाऊराया, डॉ० दातार, डॉ० आपटे, 'इंटरनॅशनल दीक्षित', सगळेच तुझी चौकशी करतात. काल वसंत व्याख्यानमालेत रावसाहेबांचें मौलानांच्या पुस्तकावर समालोचनात्मक गरगरीत व्याख्यान झालें, पुण्याच्या नागरिकांना त्यांनी मोठचा पथ्यकर रसायनाचे घुटके पाजले.

पुणें.
२१.५.'५९.

आम्ही ता० २४ ला संध्याकाळीं येथे आलो. चि० लल्लू व मीदेखील अगदी न थकता वर चढून आलो. येथील सर्वात अवघड शिखर म्हणजे 'वटाटा शिखर' (potato point). तेथील शिळेवरदेखील काल चढून आलो. तेव्हा आता डोंगर चढण्याच्या बाबतीत तेहतीस टक्के मार्कांपेक्षा वरच्या इयत्तेत मला घालायला हरकत नाही. श्री गुलबेन, त्यांचा मुलगा आरदेशीर व मुलगी शिरीष ही मंडळीहि आमच्या सोबत आली आहेत. गुलबेनचा निकट परिचय आताच झाला. अतिशय निरलस, निरभिमानी व मधुर स्वभाव आहे त्यांचा. 'तुटकपणा' तर दूरच राहो, पण 'एकांतप्रियता'-सुद्धा नाही. काल संध्याकाळीं रावसाहेबहि पांच सात बालगोपालांसह आले. आम्ही १०/१२ जणें अगोदरच होतो. खूप 'गोकुळ' रंगले आहे. आज संध्याकाळीं रावसाहेब परत जातील.

सिंहगड.
२७.५.'५९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चि० रंगा तीन सव्वातीन महिने माझ्याबरोबर होता. अतिशय प्रेमळपणाने व हळुवारपणाने माझ्या गैरशिस्त जीवनातील गैरसोयी आणि माझ्या चमत्कारिक स्वभावाचें (ताण) त्याने सहन केलें. आपण होऊन सगळे हाल सोसून 'माझा संभाळ' करायला सरसावणाऱ्या या देवमाणसां-मुळेच जगाला सुभगता आली आहे. मी तोळाभरहि देऊ शकत नाही, पण देव मला धडाभर देतो. हा प्रेमाचा मोबदला नव्हे. हा त्या प्रेमस्वरूप परमात्म्याचा प्रसाद आहे. हीं माणसें जर अपात्रीं प्रेम उधळतात तर मी कृपण का व्हावें? कौटुंबिकतेची प्रभा फांकली की विश्व उजळतें! तुला या प्रवासात हाच अनुभव आला. या कौटुंबिकतेला पूर्व-पश्चिम, काळा गोरा, आर्य-म्लेच्छ इत्यादि कुठलाहि भेद खपत नाही. 'तस्य भासासर्वमिदं विभाति.'

हैदराबाद.
२४.७.'५९.

येथे काल दुपारीं २ ला पोचलो. सहातास बसचा प्रवास चांगला झाला. चि. इंदूने बरोबर शिदोरी दिली होती. बाबूलाल व गोविंदराव शिंदे हे सवंगडी होते. साताऱ्याला गोपाळकाला मोटार स्टॅन्डवरच केला. येथे आल्यावर भाऊ महाजन व डॉ. आपटे-कमलाताई यांस भेटलो. डॉ० आपटयांना तुझ्या व्याधीची हकीकत सांगितली. त्याचें म्हणणें असें की "विमलताईंनी माझ्याकडे व कमलकडे अगदी आपलें घर म्हणून यावें. माझ्याकडे आलें म्हणजे माझाच उपचार केला पाहिजे असें नाही. आयुर्वेद, होमिओपॅथी इत्यादींपैकी कुठलाहि उपचार करावा. फक्त मधून मधून कान मी तपासून पाहीन. मला जेव्हा वाटेल की आता धोका आहे, तेव्हा फक्त सावधगिरीची सूचना देईन. आज जेवढें मी ऐकलें आहे त्यावरून मला ऑपरेशनची गरज वाटत नाही. मला वाटतें इतर उपचारांनी काम भागेल. ऑपरेशन करण्याचीच गरज मला वाटली तरी मी आग्रह धरणार नाही. त्यांनी घर म्हणून यावें."

चि. इंदूने तीन तीनदा सांगितलें, "ताईंनी इकडे अवश्य यावें." भालबा म्हणाले, "त्यांना तुम्ही आश्वासन द्या की भाळजी स्वतःच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुलाबाळांकरिता काही अजून खचलेला नाही. मी त्यांना पुण्याहून गाडीतून आणू शकेन. मागे बेळगांवला मी स्वतः त्यांना पोचवू शकलो नव्हतो. माझ्या मनात त्या गोष्टीची चुटपुट राहून गेली. पुण्याहून मी त्यांना घेऊन येईन. दादा, तुम्ही त्यांचें मन वळवा. मी एरवी कितीहि सभ्यपणाने बोलण्याचा आव आणला तरी विमलाताईंशी बोलतांना अगर त्यांना लिहितांना माझा सगळा आडदांडपणा व अवखळपणा उफाळतो."

मनू, शरीराला शीतोष्ण व जराव्याधि यांचा क्लेश व्हायचाच. पण, अशा वेळीं भालबांसारख्यांचें आप्तत्व आणि डॉ. आपटे-कमलताई सारख्यांचीं स्नेहयुक्त आस्था पाहून फार समाधान वाटतें.

पुणें.
२५.११'५९.

तू रावसाहेबांना लिहिलेलें पत्र मला फार आवडलें. त्यात प्रांजळपणा ऋजुता आणि व्यवहार्य सौंदर्य आहे. रावसाहेबांसारख्या सुज्ञ व मर्मज्ञ रसिकाला तें फार हृदयंगम वाटलें असेल. पटवर्धनबंधूंच्या मैत्रीची भर तुझ्या वैभवात पडली हें मोठें भूषणावह आहे. तुझ्या या व्यापक व स्निग्ध कौटुंबिकतेची नव्हे, विश्वकौटुंबिकतेची — दीप्ति व रम्यता तुझ्या पत्रात प्रत्ययाला येते. अंतःकरण हर्षित होतें. तुझें हें वैभव जसजसें वाढत जाईल तसतशी माझी तृप्तिहि वाढत जाईल.

जबलपुर.
३.३.'६०.

आज सकाळीं चि० बाळूकडे गेलो असतांना अनायासें श्री काका अत्रे व त्यांचे मेहुणे मामा टिकेकर भेटले. त्यांच्यावरोवर जाऊन चि. सौ. सुनंदाला भेटून आलो. काका अत्रे म्हणजे आधुनिक सत्पुरुष. त्यांच्या पायावर डोकें ठेवावें, अशी त्यांची थोरवी. त्यानंतर पी. वाय्. विमाताईंकडे गेलो. — चि० निर्मलबरोबर ही मंडळी काल मूळतापीला जाऊन आली. पू० विनोबांनी प. पू० भाऊसाहेबांना काही प्रश्न केले. भाऊसाहेबांनी मोजक्या शब्दांत असंदिग्ध व शास्त्रशुद्ध उत्तरें साध्या सरळ भाषेत मोठ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समर्पक रीतीने दिलीं. पी. वाय. अगदी फारच प्रसन्न होऊन आले. म्हणाले "असंदिग्ध ज्ञान व स्वच्छ दर्शन तेथें मूर्तिमंत माझ्यासमोर उभें राहिलें. हा माणूस जिवंत आहे तोंवर हें ज्ञान टिपून घेतलें पाहिजे !" मनसोक्त वाखाणणी करीत होते. विमाताई त्यांची री ओढीत होत्या.

या सर्वच मंडळींनी अर्थातच तुझ्याविषयीं चवकशी केली. अत्रे काकांनी केली यात नवल नाही. पण विमाताई – पी. वाय. यांनी तितक्याच आस्थेने केली. ताराने अगदी वेबी इतक्या अगत्याने चवकशी केली. हीं सारींच माणसें प्रांजळ. आपल्याला ज्या वेळीं जें वाटेल व पटेल तें आपल्या वागणुकीत उतरलेंच पाहिजे हा त्यांचा बाणा ! म्हणून मी त्यांना साधुजन व सज्जन म्हणतो. त्यांच्या अंगीं जीवन परिवर्तनाइतका जोम व कस आहे. याचेंच नांव जिवंतपणा.

नागपुर.
२३.१०.'६०.

●

आज श्री. बापुराव पत्तरकिने यांची तार आली. त्यांच्या बंडूचें लग्न सोमवारीं सकाळीं ८.३० वाजता आहे. बापुराव माझे जिवलग मित्र व उपकार कर्ते. वेबी माझी प्रियकन्या. तिच्या एकुलत्या एक भावाचे लग्न. तेव्हा या प्रसंगाचें महत्त्व त्रिगुणित तरी आहे. त्यात पुन्हा वधू माधवराव कानेटकरांची मुलगी. असा चौफेर हल्ला आहे. बापुरावांना माझी वृत्ति व मतें माहीत आहेत. म्हणून निदान ते तरी मला आग्रह करणार नाहीत अशी आशा होती. तथापि त्यांची तार आल्यानंतर गेलो असतो. परंतु आता तें अशक्य आहे. सिद्धराजांच्या चिरंजीवाचें लग्न ता० २० ला गोरज मुहूर्तावर आहे. त्यानंतर ता. २० लाच रात्रीं निघालो तरी २१ ला लग्नाच्या वेळीं नागपुरला पोचता येणें अशक्य आहे. येथे मी अनायासें उपस्थित आहे. तेव्हा येथील लग्न टाकून जाणेंहि अप्रशस्त होईल. तसें बापुरावांना लिहीत आहे.

काशी.
१८.११.'६०.

●

काल संध्याकाळीं प्रभावतीजी आल्या. लगीन घाईत आहेत. माडीवरच शेजारच्या खोलीत आहेत. मधून मधून डोकाऊन जातात. एकच पालुपद व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ध्रुवपद — "विमलावहन, विमलावहन !" त्यात सगळ्या रागांचे माधुर्य एकवटलेलें आहे. बाइदेवहि भेटल्या. प्रभावतीजीवरोबर उद्या संध्याकाळीं कलकत्त्याला जातील. तू आसामात जावेंस असें त्यांना वाटतें.

दोघीहि काल रात्रीं 'मूलोद्योगात' होत्या. धीरेन्‌दांचें म्हणणें, "आपला एक परिवार आहे. जीं माणसें आपल्याकडे येतात त्याचें कौटुंबिक संबंध शिथिल होऊन जातात. त्यांच्यापैकी जीं माणसें तरुण आहेत, त्यांच्या लग्नाची चिंता कुणी करावी ? ती जवाबदारी आपली आहे. मी ८ वर्षात १७ तरुण-तरुणींचीं लग्नें जुळविलीं आहेत. जमनालालजींच्यानंतर 'शादीलाल' उपाधि मलाच शोभेल. कोण म्हणतें मी 'कुटुंबवत्सल' नाही ? आता दूर जाऊन पडलो. नाही तर मी माझा 'पोर्ट फोलिओ' संभाळलाच असता."

आज लग्न-विधीचें अंगभूत कार्यक्रम वृक्षारोपण, कताई, प्रार्थना इत्यादि आहेतच. समारंभाचें वातावरण गंभीर असून प्रसन्न आहे ! प्रभावतीजी आल्या लग्नाकरिता. पण पदोपदी त्यांच्या तोंडून न कळत उद्‌गार निघतात, "विमलबहन के विना मुझे सूना सूना लगता है !" माझ्या धन्यतेला पारावार नाही !

जे० पी० दुपारीं अपर इंडियाने आले. रात्रीं जातील. ता. ९ डिसें. च्या वैज्ञानिकांच्या बैठकीसंबंधाने काही निश्चित ठरलेलें नाही. ता. २६ ला कदाचित् कलकत्त्याला जे० पी० मला सांगू शकतील. एकंदरीत मला वाटतें.— ता. १० ला सकाळीं आपण झांशीला पोचू शकू. शंकररावहि दुपारीं त्याच गाडीने आले आहेत.

वाराणसी
२०.११.'६०

मी आणखी पंधरा दिवस रहावें अशी वेट्राबेट कुटुंबाची मनापासून इच्छा आहे. त्यांच्या स्नेहाने अभ्यंग स्नान करून पवित्र व कृतार्थ होऊन येथून निघणार आहे..त्यांच्याकडे वर्षभर राहिलो तरी मला संकोच नाही, त्यांना कंटाळा नाही. या सगळ्या त्या विश्वंभराच्याच ऊर्जित सत्त्व संपन्न प्रतिमा आहेत. कृतज्ञता मिश्रित प्रेमाने माझें हृदय भरून येतें. हा सगळा मनुमहिमा ! त्याच्या आधारेंच दादाचें जीवित तगलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चंद्राताई काशीहून आल्यापासून आजारीच होत्या. आता बऱ्या आहेत. आजच पहिल्यांदा भेटू शकल्या.

सांताक्रूज, मुंबई.
४. २. '६१.

•

आजपर्यंत बेंद्रावेटांच्या स्नेहतीर्थात निवास होता. उद्या त्यांचा निरोप घेणार. माझें उरलेलें आयुष्य त्यांना देता आलें असतें तर तें त्यांच्या पायीं वाहून कृतार्थ झालो असतो ! माझ्या मनूची प्रभावळ आहे ही ! मनू अधिकच शोभतो त्यामुळे ! तुमच्या सगळ्यांच्या जीवनाची टवटवी वाढविण्याकरिता खतासारखा उपयोगी पडलो तरी चीज झालें असें वाटेल.

सांताक्रूज, मुंबई.
७. २.' ६१.

•

एकंदरीत पुण्याचा मुक्काम खूपच मजेचा झाला. गोविंदरावच्या विऱ्हाडी विलक्षण मोकळेपणा वाटतो. कौटुंबिकता आहे, पण अगदी क्लबच्या इतकें स्वातंत्र्य आहे. सगळीं जणें मिळून सगळीं कामें करतात. सार्वजनिक कार्यक्रमातहि भाग घेतात. पण हें सगळें लीलेने व सहजतेने घडतें. कुणालाहि ताण अगर भार वाटत नाही. फिरणें, उनाडणें, गप्पा-गोष्टी सगळें जितक्या आनंदाने होतें तितक्याच आनंदाने कामेंहि होतात. क्लबच्या सदस्यांची संख्या सारखी वाढत जाते, येणारे, जाणारे सतत असतात, सगळ्यांना काहीतरी खायला दिलेंच जातें. तक्रार नाही, धुसपुस नाही, कंटाळा नाही. 'आजादी' आहे आणि 'मस्ती' आहे. असेंच वातावरण आणखी कोठें बघायचें असेल तर वेंद्रावेटाकडे पहायला मिळतें. पण 'गोविंद भवना'चें वातावरण आगळेंच आहे !

पुणें.
८. ६. '६२.

•

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण सतावें

रसिक प्रवासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: ६ :

ठरल्याप्रमाणे मी ता. २१ ला गुडेगांवला जाऊन आलो. प्रवास गमतीचा झाला, एकंदरीत माधवराव कानेटकरांसारखे जुने स्नेही बरोबर होते. दुधात साखर ! १२.३० च्या बसने निघून २.३० ला रामटेकला पोचलो. चिंतामणराव तिडक्यांकडे जेवलो. सायंकाळीं ५च्या सुमाराला एका उघड्या रेंगीने पुढे निघालो. पावसाळ्यात बैल 'इसामले' (विसावले) असल्यामुळे आम्ही गाडीत बसण्यापूर्वी एका बैलाने उधळण्याचे ठरविलें. तो काही केल्या कह्यात येईना ! म्हणून एकजण त्याची वेसण धरून गाडीच्या पुढे-पुढे चालला आणि आम्ही गाडीच्या मागे-मागे चालू लागलो ! गांवातील लोकांची आमची ही अगदीच छोटेखानी पण अपूर्व मिरवणूक पाहून थोडीशी करमणूक झाली. आमच्या हातून न कळत इतकी सार्वजनिक सेवा घडल्याचे आम्हालाहि समाधान लाभलें.

बैल आणि घोडा यांचें सख्य परंपरासिद्ध व प्रसिद्धहि आहे. बैलाची वेसण एका माणसाच्या हातात गेलेली पाहून गाडीने त्याचा कैवार घेतला. एका चाकाची खीळज सांडलेली आढळली. समोरच बुरुडाचें दुकान होतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याच्याकडून बांबूची एक खिळी घेतली. पण ती टिकण्याची आशा नसल्यामुळे एका दुकानदाराकडून दोन मोठे खिळे घेतले. इतक्यात दिवस मावळला आणि अमावस्येच्या 'चांदण्यात' आमचा प्रवास सुरू झाला.

बैल व गाडी यांचा पाठपुरावा रस्त्यानेहि यथाशक्ति केला. खांचा, खळगे, भरपूर होते, गाडी अगदी आडवी होईल इतका रस्ता वाईट होता. मधून मधून चिखल व दलदल होतीच. गाडी वांकडी झाली म्हणजे मला आपला तोल मोठ्या कुशलतेने संभाळावा लागे !

अशा रीतीने दोन तास गमतीचा प्रवास गेल्यानंतर आम्ही गुडेगांवला पोचलो. सुमारे ९.४५ ला लक्ष्मीपूजन व प्रार्थना झाली. ११.४५ च्या सुमाराला तेथील गोंडाच्या घरीं 'रांधलेल्या' जिन्नसांचा थोडा थोडा मासला 'प्रसाद' म्हणून मुद्दाम मागविला व खाल्ला. १२.३० पासून पहाटेपर्यंत सारखी 'दंढार' चालली, दंढारमध्येच थांबवून सुमारे १.३० ला आमचीं दोघांचीं व्याख्यानें करविण्यात आलीं आणि २.३० पर्यंत आम्ही 'दंढार' पाहिली. तुकारामबोवा ठाकुरांनी येथील आदिवासियांमध्ये वराच एकोपा व जागृति केली आहे.

ही झाली ता. २० ची हकीकत. ता. २१ ला सकाळीं ६.२० ला पंचमनराव गोंड, तुकाराम बोवा, माधवराव कानेटकर व मी पायीच पांच मैल चालून रामटेकला आलो. रामसागर तलाव, तलावा पलीकडील डाकबंगला, राम मंदिराचा भाग हें सारे दृश्य मनोरम दिसत होतें. उन्ह फारसें जाणवलें नाही. सुमारे ८ ला रामटेकला पोचलो. बसला तीन तास अवकाश होता, म्हणून चितामणराव तिडक्यांना बरोबर घेऊन गडावर जाऊन 'रामदर्शन' घेऊंन आलो. दिवाळी प्रीत्यर्थ श्रीराम व लक्ष्मण यांना नवीन वस्त्रें व अलंकार घातले होते.

११.३० च्या बसने निघून १२.४५ ला नागपुरला परत आलो. मनसर ते कामठीपर्यंत अनेक गौळ्यांचे 'गौळवाडे' आहेत. त्यांनी कावेने गाई व म्हशी रंगविल्या होत्या. रेडे मात्र विशेषच रंगविले व सजविले होते. काही जणांनी रेड्यांना सोनेरी व रुपेरी रंग दिला होता. हे रेडे टक्करीचे होते. रेड्यांची टक्कर पहायला उत्सुक अशा प्रेक्षकांचें मेळे वाटेत दोन-तीन ठिकाणीं दिसले. गुडेगांव येथील गुटगुटीत शरीराच्या गोंडाप्रमाणेच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे गवळीहि कुस्ती खेळायला जितके तयार तितकेच नाचायला तयार असतात! मुरलीधर गोपाल हा ज्याप्रमाणे नृत्यकुशल त्याचप्रमाणे युद्ध कुशलहि नव्हता का? नृत्यातहि कला आहे आणि कुस्तीतहि आहे. नृत्यात लालित्य आहे म्हणून ती 'जनानी' कला नव्हे आणि कुस्तीत लालित्य नाही म्हणून ती मर्दानी नव्हे! कलांचे 'मर्दानी' व 'जनानी' असे भेद पाडणें अगदी अयथार्थ व गैर आहे.

धनतोली, नागपुर.
२३.१०.'४९.

●

खिडकी जवळच्या जागा साऱ्या अरसिक लोकांनी पटकावलेल्या होत्या. विमानात बसल्याबरोबर हीं सारीं माणसें खुशाल पेंगायला लागलीं आणि लवकरच झोपण्याच्या तयारीलाहि लागलीं. मग खिडकीजवळ बसण्याची हौस तरी कशाला? बाहेर अगदी काळाकुट्ट अंधार होता. तरी-पण डोळे मिटल्या नंतरच्या काळोखात आणि डोळ्यांनी दिसणाऱ्या अंधारात फरक नसतो का गं? डोळे मिटल्यानंतर दर्शनाचा अभाव असतो, डोळे उघडे ठेवल्यानंतर दिसणाऱ्या अंधारातहि-अंधाराचेंच कां होईना पण, दर्शन असतें. आणि अंधाराचें दर्शन हें अज्ञानाच्या जाणिवेइतकेंच उपयोगी असतें. अंधाराचें दर्शन व अज्ञानाचा बोध यांत प्रकाशाचें तत्त्व अनुगत आहे. म्हणून खिडकीजवळ वसून अंधाराची गंमत पहावी असें मनात होतें. पण मनोरथात वसून नेहमीच सहल करता येत नाही.

अंधार अगदी स्पष्ट दिसत होता. अगदी आकाशव्यापी अनंत अंधार. पण हा 'अन्ध तम' किंवा अप्रकाश मात्र नव्हता. एकाद्या रहस्यवादी कवीच्या गूढ काव्यासारखा तो मनोवेधक वाटत होता. आमचें विमान मात्र अंधारात चांचपडत नव्हतें — गूढवादी कवीच्या प्रतिभेप्रमाणे. त्या दशदिशांना व्यापणाऱ्या अंधारातून तें निश्चित वेगाने व निश्चित मार्गाने निश्चित मुक्कामाकडे चाललें होतें. देशाच्या आजच्या परिस्थितीत आपल्या पुढाऱ्यांनाहि अशीच निश्चित दृष्टि लाभली तर काय बहार होईल?

दिल्लीशहर मोठें नयन मनोहर दिसत होतें. शहर नव्हे; दिव्यांच्या वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार, लांबसडक, नागमोडी, चतुष्कोन, अशा अनंत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाराच्या व आकृतींच्या रांगा त्या अंधःकाराच्या महासागरात दिसत होत्या. सभोंवारच्या आकाशातील ताऱ्यांपेक्षा खालच्या आकाशातील हे तारे अधिक दैदीप्यमान दिसत होते. समुद्र अगदी प्रशांत असतांना कार्तिक मासात भाविक कुलांगनांनी कौशल्याने सोडून दिलेल्या दीप दानाच्या दिव्यांची आठवण मला झाली. त्या अंधारात आपल्या नागपुरचे सारे दोष पोटात घालण्याची शक्ति असल्यामुळे दिल्ली इतकेंच नागपुरहि नयन मनोहर दिसत होतें. अंधारात साऱ्या शहरातील भेद पार गडप होऊन जातात. एक प्रकारचें अभावात्मक ऐक्य भासू लागतें. अमावास्यादेखील पूर्णिमेइतकीच रम्य असते. अंधाराचेंहि सौंदर्य पाहण्याची दृष्टि लाभली म्हणजे विषम प्रसंगातहि आशेची प्रभा दिसू लागते. ही दृष्टि तुझ्या दादाला लाभेल का ?

तीनच तासांचा हवाई प्रवास होता. मौज वाटली. थंडी भयंकर होती. पण वाहेर. थंडी आणि अंधार यांचें साम्राज्य वाहेर होतें. आणि आत थंडीने सुखावह वाटणारी ऊव व अंधःकारामुळे कमी तीव्र भासणाऱ्या — प्रकाशाचा गोडवा होता. वाहेर अनियंत्रित निसर्ग, आत सुनियंत्रित कला.

त्या घनदाट अंधःकारात त्याच्याहिपेक्षा काळे ढग आयुष्यातील समस्यांप्रमाणे दृष्टीपुढे तरंगतांना दिसत. सर्वत्र पसरलेल्या काळोखांत हे आणखी काळे ढग असल्यामुळे तो काळोख कमी निविड वाटत होता. आयुष्यात समस्या आल्या म्हणजे एकंदर आयुष्य समस्येसारखें वाटेनासें होतें. अंधारातदेखील केवढा भव्य आशय भरलेला आहे; नाही ? अशा रीतीने त्या अफाट अंधकारात तरंगत असतांना कोणाची आठवण झाली असेल ?

धनतोली, नागपूर.
१७.१२.'४९.

ता. ४ ला सकाळीं लगवगीने सारीं कामें उरकीत कसावसा ८ ची वस गाठण्याकरिता वस स्टॅन्डवर पोचलो. अर्थात् शेवटपर्यंत वस चुकण्याचा नव्वद टक्के संभव नेहमीप्रमाणेच होता. पण नेहमीप्रमाणेच अगदी आयत्या वेळीं वस गांठली. आणि दुपारीं तीन वाजता जवलपुरला पोचलो. मोटर लॉरीत अगदी सचैल धूलिस्नान घडलें. लहानपणीं क्वचित् तालीम-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खान्यातील लाल माती अंगाला लागली असेल ती खरी. पण त्या दिवशीं सारें शरीर धुळीने माखलें गेलें ------ अगदी मृण्मय झालें. दुर्गंचे लाला मोहनलाल बाकलीवाल यांची सोबत होती. जबलपुर स्टेशनवर कसेबसें तोंड धुऊन मेल गांठली. आणि रात्रीं १०.४५ ला अलाहाबादला पोचलो. रात्र वेटिंगरूममध्ये काढली.

ता० ५ ला मी अगदी विक्रम केला. पहाटे उठून रिक्षेत बसलो आणि तडक दारागंजात धर्माधिकारी यांच्याकडे गेलो. सगळीकडे दाट धुकें पसरलें होतें, थंडी मी म्हणत होती. पण त्यांच्यासमोर हार मानणें कमी-पणाचें वाटलें. मुकुंदशास्त्र्यांचा मुलगा लालू याला बरोबर घेऊन धुक्याने पूर्णपणें आच्छादित झालेल्या गंगेवर गेलो. मारली बुडीन् काय? त्या हिमतुल्य पाण्याच्या स्पर्शानें बाहेरची थंडी पार नाहीशी झाली. परत स्टेशनावर येऊन आग्र्याची गाडी गांठली.

गंगाकिनारीं प्रवास सुरू झाला. मिर्झापुर ते चुनार हा भाग सोडला तर बाकीचा सारा प्रदेश अगदी सपाट मैदानाचा आहे. युक्त प्रांतातील इतर काही भागात घरें बोडकीं, धाब्याचीं आहेत. या भागातील घरें कौलाराचीं आहेत. अगदी क्षितिजापर्यंत गहूं, वाटाणा, हरभरा व सरसों हीं पिकें पसरलेलीं दिसतात. मधून मधून उसाचें मळें, पेरूच्या बागा, आमराया आहेत. मिर्झापुर जवळील विंध्याचल स्टेशनानजीकचा डोंगर रमणीय आहे. हौशी लोकांची 'आरोग्य भवनें' लांबून मोठीं सुंदर दिसतात. मिर्झापुरचा फक्त 'बिनबुडा'चा लोटाच प्रसिद्ध नाही; मिर्झापुर जवळील विंध्याचलचीं जातीं व चक्क्याहि प्रसिद्ध आहेत. चुनार येथील डोंगर व किल्लाहि आगगाडीतून लक्ष वेधतात. मुगलसरायहून तुला तार करायला गेलो, पण तारबाबूजवळ मोडच नव्हती.

सुमारे १५.४० ला आग्र्याला पोचलो. गेल्याबरोबर सार्वजनिक सभा-चक्र सुरू झालें! तेथून सोसाटयाच्या वाऱ्यात व कडाक्याच्या थंडीत जीप-मधून शोणभद्राच्या काठीं धनडोह येथील शिबिरात आलो.

सकाळीं ९ ला राजगीरला पोचलो. राजगीर किंवा राजगृह हें जैनांचें प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. तपोनिष्ठ मुनींनी मननासाठी व मौनासाठी विविक्त स्थळें शोधण्यात जी विलक्षण रसिकता दाखविली तिचा प्रत्यय येथेंहि येतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

डोंगरावर अनेक जैन मंदिरें आहेत. एका डोंगराच्या पायथ्याशी गरम झरे व गरम पाण्याचीं कुंडें आहेत. आंतड्याच्या व वाताच्या विकारांवर या झऱ्याच्या स्नानाने गुण येतो म्हणतात. आम्ही तेथे मनमुराद अंघोळ केली. थंडीमुळे तें गरम पाणी मोठें सुखावह वाटलें. अंघोळीनंतर शिबिरात दोन तासपर्यंत अस्खलित, वक्तृत्वपूर्ण आणि विचारप्रवर्तक भाषण झालें.

राजगीरहून खड्गपुरला सुमारे १०० मैल जीपने प्रवास करावयाचा होता. रस्ता धुळीचा, वाळूचा वाईट. राजगीर सुमारे १३.२० ला सोडलें. मध्ये बिहार शरीफच्या अलीकडे नलन्दा विद्यापीठाचें अद्भुत अवशेष पाहिलें. ध्वजाबाबूंनी मुद्दाम दाखविलें. केवढें विशाल काम आहे !

नलन्दाकडून सुमारे १४.३० ला जीपमध्ये बसलो. धूळ, वाळू आणि खांच खळगे म्हणजे हा रस्ता. जवळ जवळ १०० ते १०५ मैलांचा प्रवास केला. संध्याकाळच्या सुमारास वाळूत जीप रुतली. मी व ध्वजाबाबू ढकलू लागलो. आम्हाला ती कसली दाद देते ! अगदी अंगदाच्या पावलाप्रमाणे 'अकंप्य' राहिली. शेवटीं एका लॉरीवाल्याने व वर्तमान पत्रावरून माझ्या कार्यक्रमाविषयीं माहिती असणाऱ्या काही उतारूंनी तिला वठणीवर आणली आणि सुमारे ८ वाजता रात्रीं आम्ही खड्गपुरला पोचलो. पुन्हा दोन तास पर्यंत व्याख्यान दिलें. थकल्यामुळे अकुंठित आणि अस्खलित गतीने नाही चालू शकलें, पण श्रोत्यांना तेंहि आवडलें. कारण दादा धर्माधिकारी याचें व्याख्यान पसंतच करायचें अशा मनोवृत्तीतच सर्व मंडळी होती.

ता० ७ ला पहाटे ५ ला निघून बरिहारपूरला गाडी गांठायची होती. निघालो. आगगाडी गांठली. सुमारे ९.३० ला कहल गांवला पोचलो. शिबिरात दोन तास व्याख्यान. अध्यक्ष म्हणाले, 'एकादें अत्यंत मधुर संगीत ऐकल्यानंतर त्याचा ध्वनि जसा कानांत घुमत राहतो, तसें या व्याख्यानाचें होतें !' माझा कुठल्याहि कलेशी, बादरायण कां होईना, पण संबंध आहे याची जाणीव मला झाली.

मध्यंतरीं पिरपैंती व महगामा हीं गांवें घेतलीं. उत्तररात्रीं २.३० ला भागलपुरला पोचलो. पाटण्याच्या सदाकत आश्रमाप्रमाणेच भागलपूरची काँग्रेस कमेटीहि थेट गंगाकिनारीं आहे. गंगा व हिमालय यांचें आकर्षण ही माझ्या स्वभावातील एक मोठी पठाडी गोम आहे !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भागलपुराहून पूर्णियापर्यंत विमानाने जायचें ठरलें होतें. विहारचे आरोग्यमंत्री ना० जगतलाल चौधरी छोटेखानी विमान घेऊन आले. त्यात त्यांच्याबरोबर ध्वजाबाबू व मी बसलो आणि मोठ्या ऐटीत पसतीस मिनिटांत पूर्णियाला पोचलो. या लहान विमानात मी समोर बसलो होतो. त्यामुळे गरुडावर किंवा उच्चैःश्रव्यावर बसल्यासारखें वाटत होतें. या लहानशा विमानावर आरूढ झाल्यानंतर आजीबाईंच्या नवलकथांतील पंखांच्या घोड्यांची आठवण कोणाला होणार नाही ?

पूर्णियाहून मोटारने वनमनखीला आलो. हा सारा प्रदेश म्हणजे कोसी नदीच्या विध्वंसक प्रवृत्तीचें क्रीडा स्थल आहे. ही नदी मोठीच लहरी व उच्छृंखल आहे. तिचा प्रवाह कसा व केव्हा बदलेल, तिला किती फांटे फुटतील याचा काहीच नेम नाही. त्यामुळे तिची अगदी अरुंद धारहि मोटारला अडविण्यास पुरेशी ठरते. आम्हाला दोन ठिकाणीं मोटार नावेवरून न्यावी लागली. म्हणजे एकाच दिवसात विमान, मोटार व नाव या स्थलचर, जलचर व नभचर वाहनांचा आश्रय आम्हाला करावा लागला. वनमनखीहून रात्रीं ११ च्या सुमाराला आगगाडीत बसलो, कारण तेवढेंच एक वाहन शिल्लक राहिलें होतें ! सुमारे १२.३० ला रात्रीं मुरलीगंजला पोचलो. तेथे तंबूत रात्रीं झोपलो. कोसीने या मुलुखात बराच उच्छाद केलेला असल्यामुळे येथे मुख्य पिकें म्हटलीं म्हणजे तंबाखू आणि नीळ हीं आहेत.

मुरलीगंजाहून सकाळीं पुन्हा जीपमध्ये बसलो. आता आमचा प्रवास कोसीच्या क्रीडा भूमीतूनच होत होता. जसजसें पुढे जावें तसतसा तिचा लहरीपणा व व्रात्यपणा वाढत जातो. दोन-तीनदा नावेवरून जीप नेऊन आम्ही मधेपुऱ्याला आलो. तेथून दुपारीं सहरसा.

धडपड करीत सहरसा येथे आलो खरे; पण इतक्या दिवसांचा वचपा निघाला. ना० जगलाल चौधरींचें विमान ठरल्याप्रमाणे अगदी वेळेवर १५.३० ला आलें. आमच्यासाठी दुसरें विमान येणार होतें. जगलाल बाबूंच्या 'कर्णधाराने' तसें सांगितलेंहि. त्यामुळे आम्ही हातचें विमान सोडून पळत्याच्या आशेवर विमान तळावर सूर्यास्तापर्यंत बसून राहिलो. शेवटीं आमचें विमान काही आलें नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भुताटकीच्या कल्पनेने मालकाने सोडून दिलेल्या एका कोंदट व मोडकळीला आलेल्या घरात कॉंग्रेस कचेरी आहे. तेथे ध्वजावाबूसह मुक्काम ठेवला. खादी भंडारचे भुवनेश्वरबाबू यांच्याकडे वरण भाताची सोय झाली. बाजारात एका दुकानात चहाहि मिळाला. थंडी इतकी होती की चहाखेरीज चालणें शक्य नव्हतें.

सहरसा हें आता जिल्ह्याचें 'सदर मुकाम' झालें आहे. तरी पण तें 'काळेपाणी' आहे. सगळीकडे दलदल व बोरूंचें रान आहे. जमीन कोसीने दिलेली असल्यामुळे सुपीक आहे. दगडाचें नांव नाही. अगदी खडासुद्धा टाकून पाहता येणार नाही. घरें बांबूचीं व गवताचीं. दिसायला सुवक, सुंदर, स्वच्छ ! जमीन सुपीक; पण कोसीमैया शेती करू देईल तेवढीच शेती ! पाण्यावर तेलकट तवंग येतो, मलेरियाचे माहेरघर. 'हूकवर्म' चें भयंकर प्रमाण. पावसाळ्यात सगळा प्रदेश अगदी दुर्गम होऊन जातो. घरातील दरेक माणूस मलेरियाने आजारी होतें, पण औषध आणायला देखील वाट नसते. एकदा एका गांवातील विस्तव विझून गेल्यामुळे तीन दिवस चूल पेटली नाही. शेवटीं एका नावाड्यापाशी आगपेटी होती, तिने दरेकाचा गृहाग्नि प्रदीप्त करून जठराग्नि शमविला ! दळणवळणाची सोय नसल्यामुळे दुधदुभतें व तूप बाहेर जाऊ शकत नाही. दहीं उत्तम व भरपूर मिळतें. तूपहि खूप स्वस्त आहे. पण सगळ्या जगापासून तोडून टाकल्या सारखा हा भाग असल्यामुळे येथे माणूस अडकलें की अडकलेंच. नाही म्हणायला एक आगगाडी आहे. पण कोसी केव्हा आणि किती ठिकाणीं तिच्या मार्गाचीहि नासधूस करील याचा नेम नाही. अर्थात् ती गाडी वक्तशीरपणा पाळू शकत नाही. आणि एकाद्या दिवशीं मुळीच जाऊ शकत नाही.

सहरश्याहून बिनतारी संदेश पाठविले, 'जरूरी तारा' केल्या, पण दुसऱ्याहि दिवशीं, म्हणजे ता. १०ला सुद्धा, सबंध दिवस विमानाचा पत्ता नाही. सूर्यास्तापर्यंत विमानाची प्रतीक्षा करून परतलो, इतक्यात विमान आलें. आमचा कर्णधार मात्र विक्षिप्त आणि बेजबाबदार निघाला. अगदी कोसीच्या ब्रीदाला अनुसरणारा. अंधारात विमान जाणार नाही हें आम्हाला माहीत होतें. पण आमचा कर्णधार म्हणाला की विमानात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'मोबिल ऑईल'च नाही. ता० ९ ला पेट्रोल नव्हतें म्हणून याच वहाद्दराने विमान मध्येच कोठेतरी टाकून दिलें होतें, त्यामुळे तें आमच्यापर्यंत पोचलें नव्हतें. आमच्या कार्यक्रमाचा गोंधळ त्याच्या नालायकीमुळेच झाला ! पण तो गवरु भारीच विलंदर. त्याला त्याची मुळीच खंत वाटत नव्हती.

स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीने 'मोबिल ऑईल' मिळवून ता० ११ ला सुमारे ९ वाजता आम्ही सहरश्याच्या दलदलीतून उड्डाण केलें. 'सहरसा' गांवाला 'सहर्षा'हि म्हणतात. पण आम्हाला मात्र तेथे हर्षापेक्षा विषादच जास्त वाटला.

वरून विमान चाललें होतें, खालीं एकाद्या पिसाट अवदसेच्या पिंजारलेल्या केंसाप्रमाणे कोसीच्या अनंत धारा भरमसाट पसरलेल्या होत्या. 'वहुशाखाह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्' ! कोसीला उद्योग नाही; उद्देश नाही. तिने अशा व्रात्यचेष्टा कराव्या हें साहजिकच आहे. काकासाहेबांनी या नदीला नसतेंच 'लोकमाता' म्हटलें, ही 'विमाता' भासते.

पाटण्याहून १२ ता० ला सुमारे ९ ला दिल्लीकरिता रवाना झालो. लहान होडी व गलवत यांच्यात जो फरक असतो, तोच फरक लहान विमान व मोठें विमान यांत असतो. 'नैया मोरी डगमग डगमग डोले'चा अनुभव येथे येत नाही. संथगति व शांतवेग, गति आहे, वेग आहे, पण आवेग नाही, आंदोलन नाही. कोणी म्हणतात हा प्रवास नव्हे, हें फक्त स्थानांतर आहे. मला नाही तसें वाटत. जलविहारा व विपिनविहाराइतकाच आह्लाददायक गगनविहार आहे. आकाशाच्या अनंत पोकळीतदेखील अद्‌भुत काव्य सांठविलेलें आहे. मोठ्या विमानाची गति सात्त्विक तेजाप्रमाणे वेगयुक्त व प्रशांत विमानाच्या प्रवासाला स्थानांतर म्हणणें अगदी अरसिकपणाचें आहे.

काका (कालेलकर) प्रमाणे माझ्या कराग्रीं नव्हे जिह्वाग्रीं— रसवंती नाचत असती तर मी प्रवास वर्णनें लिहून लिहून वाचकांना भंडातून सोडलें असतें. म्हणूनच 'खुदा गंजोंको नाखून नहीं देता !' काका कलेला अगदी अक्षरशः बोटांवर नाचवितात !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आता बिहारचा निरोप घेतला. बिहार व पंजाब या दोन्ही प्रांतांनी माझ्यावर विशेष लोभ दाखविला. बिहारच्या लोकांना भाविक पण निर्बुद्ध म्हणतात. धर्मक्रांतिकारक पुरुष बिहारमध्ये निपजल्यामुळे 'मागधा', 'मगहा' वगैरे शब्दांना वाईट अर्थ प्राप्त झाला. त्यात विशेषतः बौद्धांविषयींचा 'किचड' आहे. पण बिहार ही विहाराची पवित्र भूमि आहे. क्रांतिकारक धर्मवीरांची व राज्यसंस्थापक राजपुरुषांची, तपस्व्यांची व सम्राटांची बिहार-भूमि आहे. बुद्ध, महावीर, गुरुगोविंदसिंह, मंडनमिश्र यांच्या प्रमाणेच विष्णुगुप्त, चंद्रगुप्त, अशोकहि बिहारातच झाले. पहिला हिंदी गवर्नर बिहारात नेमला गेला आणि पहिला लोकाध्यक्षहि बिहारचा राजेंद्रच होईल असा रंग दिसतो ! बुद्ध आणि बुद्धू या शब्दात फक्त मात्रेचाच फरक असल्यामुळे बिहाऱ्यांना 'बुद्धू' म्हणायचें असल्यास गोष्ट निराळी ! बिहारी भाविक आहेत आणि पंजाबी तल्लख आहेत. 'काव्य प्रवण बंगाल, व्यवहार-वादी व मुत्सद्दी महाराष्ट्र आणि गणितवादी व हिशेबी दक्षिण भारत' असें कृत्रिम भेद रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'प्रबुद्ध भारत' नांवाच्या चाळीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या पुस्तकात केलें असलें तरी तें खरें नव्हेत !

गंगामाईच्या लीलाभूमीतून आमचें विमान चाललें होतें, ता० ५ पासून गंगेचें दर्शन सुरू झालें. पाटण्याला गंगा, भागलपुरला गंगा, आऱ्याला गंगा ! बिहारमध्ये आकाशात संचार करतांना व बिहारमधून दिल्लीकडे जातांना सर्वत्र गंगा, शोणभद्र, शरयू, गंडक व रामगंगा यांचा संचार पहायला मिळतो. किती तरी पवित्र संगमाचें दर्शन घडतें. लहरी, नाठाळ, चंचल व उत्पाती कोसीच्या विक्रीडित भूमीपेक्षा गंगा, शोणभद्र, शरयू व गंडक यांचे हें संचारक्षेत्र किती तरी अधिक व्यवस्थित वाटतें.

आमचें विमान सुमारे ६५०० फुटांच्या ऊंचीवरून सुमारे १६० मैलांच्या गतीने चाललें होतें. उजवीकडे गंगेचा प्रवाह आमच्याबरोबर प्रवास करीत होता. काशी व लखनौ ही दोन प्रमुख विमानतळें लागतात. पण काशीचें किंवा लखनौचें दर्शन मात्र होत नाही. फरुदाबादच्या पलीकडे गेल्यानंतर लांब क्षितिजावर रजतराशीप्रमाणे हिमगिरी दिसू लागतो. भोंवताली ढगामुळे धुकें पसरल्याचा भास होत असला तरी त्या उंच शिखरावर सूर्यप्रकाश असल्यामुळे गंगेचा पवित्र प्रवाह व हिमनगऱ्यांचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकाच वेळीं दर्शन होतें. आधीच उच्च वातावरण त्यात पुन्हा दोन भव्य विभूतींचें युगपद् दर्शन. त्यामुळे उच्च भावना व उच्च कल्पना सहजच सुचतात. पण अभिव्यक्तीची कला अवगत हवी ना ?

विमानात हवामान जाणवत नाही. माझ्या सारख्या 'हलक्या कानाच्या' माणसाला थोडा 'कर्णशूल' – अगदी सौम्य - एकादे वेळीं होतो. एरव्ही प्रवास मोठा सुखकर वाटतो. कित्येकांना ही गांधी-विरोधी प्रवास-पद्धति वाटते. कदाचित् त्यांच्या मतें गांधीमत म्हणजे विज्ञान-विरोध व पुराण-प्रियता असेल !

या विमानाचा खलाशी इंग्रज किंवा निमगोरा होता. मोठा दक्ष व सभ्य. हिंदी तांडेलात हें गुण अजून या प्रमाणात कां आढळू नयेत ? कारण उघड आहे. गोऱ्या माणसाची 'साहेबी' उसनी नसते. त्याची ती 'साहेबी' नसते. तो त्याचा उपजत स्वभाव असतो. जोडे पुसणाराहि साहेबी पोशाक करतो. पण हिंदीमाणसाने कोट पॅंट घातली आणि वारुणीची मात्रा घेतली की त्याचा दिमाख अस्मानात चढतो ! कर्तव्यनिष्ठा, कष्टाळूपणा, चिकाटी या गुणाऐवजी त्यांच्या ठिकाणीं चढेलपणा, तुसडेपणा, उसनी ऐट हे दोष येतात. अस्सल व वेगडी यांतील जो फरक तो तेथे दृष्टोत्पत्तीला येतो. साहेबी पोषाक सुटसुटीत, सोयीस्कर व तरतरीत असतो. पण तो घातल्या-नंतर ते गुणहि बाणले पाहिजेत. गोऱ्या माणसाची ती सहजावस्था आहे. तो आपल्या स्वाभाविक परिस्थितीत असतो. पण याचें कृत्रिम असतें. म्हणून अशी विप्रतिपत्ति दिसून येते.

त्याचप्रमाणे हिंदूपेक्षा मुसलमान व त्याच्या खालोखाल शीख, ख्रिस्ती वगैरे जास्त यंत्र विशारद असल्याचें जें दिसून येतें त्याचेंहि कारण हेंच आहे. यंत्रांचें शिक्षण घेतांना हिंदूला आपल्या जातीय व कौटुंबिक परंपरेच्या प्रतिकूल वर्तन करावें लागतें. त्यामुळे त्याच्या वैयक्तिक प्रयोगाला सामाजिक अनुमोदनाचा आधार नसतो. जातिनिष्ठ व्यवसाया-पासून ही अपरिहार्य हानि झालेली आहे.

यंत्रामुळे जीवन अधिक व्यामिश्र, गुंतागुंतीचें झालें आणि जोखीम व अपघात यांचें प्रमाण वाढलें हेंहि खरें आहे. पण धाडस व जोखीम यांचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संबंध अभेद्य आहे. किंबहुना, धोका आहे म्हणूनच धाडस आहे. संकट नसेल तेथे पराक्रमहि नाही. आगगाड्या, मोटारी, जहाजें, विमानें हीं सारीं धाडसाचीं प्रतिफळें आहेत. म्हणूनच तेथे अपघाताचा संभवहि अधिक आहे. अहिंसक समाजरचनेत जर विज्ञान-निषेध आवश्यक मानला गेला तर तें एक मोठें दुर्दैव मानावें लागेल. विज्ञान व अहिंसा यांच्या समुच्चयानेच खरी सत्त्वप्रधान समाज-व्यवस्था निष्पन्न होईल.

ता० १३ ला सकाळीं १०.४० च्या सुमारास अबोहरच्या पलीकडे पंचकोसीला पोचलो. येथे 'पंचक्रोशी'ला पंचकोसी म्हणतात. प, ब, च, ज; ख, घ, फ, भ, थ, ध, त, द या वर्णांत अभेद करण्याची येथील लोकांना सवय आहे. पंचकोसी स्टेशनवर गाडे, घोडे व उंट या वाहनांची सोय होती. घोडे पाहून तुझी आठवण झाली. मी मात्र येथे शहाणपणा सांगायला आलो होतो म्हणून आपला उंटावरच वसलो — नव्हे सांडणीवर स्वार झालो. कारण संदेश सांगायला आलो होतो.

पंचकोसीपासून पाकिस्तानची सरहद्द फक्त चार-पांच मैलावरच आहे. लोकांमध्ये एकप्रकारची अस्वस्थतेची व अशाश्वततेची भावना असते. त्यांचें चित्त नीट कशात लागत नाही. त्यामुळे एक प्रकारची कुरकुर करण्याची वृत्ति असते. पुन्हा शरणार्थींची संख्या पुष्कळ. अमानुष अत्याचार, खून, स्त्रियांवर वळजवरी वगैरे प्रकार सहन केलेले व स्वत: तसे प्रकार केलेले लोक पुष्कळ आहेत. त्यांच्या प्रदेशात तीन दिवस राहिलो. त्यांना नवीन उमेद लाभली, मला वहुमूल्य अनुभव मिळाला.

हा भाग सिंध व मारवाड या दोन प्रांतांच्या सीमेजवळ आहे. याच्यावर 'रेगिस्ताना'ची वरीच कळा आहे. शेती गहूं, ज्वारी, भाजीपाला व मुख्यत: सरसोची. ऊसहि थोडासा होतो. कोसीच्या भागातील जमिनी-सारखीच ही जमीनहि वाळूमिश्रित आहे. मधून मधून वाळूचें 'टीवें' आहेत. गुरें धिप्पाड व रगदार आहेत. गायी म्हसी दुधाळ; पाणी मात्र अगदी मोजकें. सतलुजचे वारके वारके कालवे आहेत. पंचकोसीत एकच विहीर आहे. ती अगदी मनोऱ्यानी वगैरे मशिदीसारखी नटविली आहे. मोठी नखरेल दिसते ! पण विलक्षण 'गहिरी' !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जमीनदारीचें प्रस्थ फार जबरदस्त आहे. किसान अगदी वर्दळीवर आलेले आहेत. त्यामुळे साम्यवाद्यांचें फावतें. माझा सांडणीवाला म्हणाला तुम्ही आपल्या 'लेचकरां'त या जमीनदारांची हजेरी घ्या. घरें मातीचीं व धाब्यांचीं. जमीनदारांचे वाडे मात्र विटांचे व अनेक चौकांचे आहेत. गांवांत बहुतेक घाण्या उंटांच्याच. पिठाची चक्कीदेखील उंटाची. हिला इकडे 'खरास' म्हणतात. पोषाकात तहमती व साफे जास्त. तहमती निरनिराळ्या रंगांच्या. पायजामे अर्थातच आहेत. अगदी भगवी वस्त्रें घालणारे सन्यासीदेखील भगवे पायजामे वापरतात. हिवाळ्यामुळे ब्लॅंकेट, रग, रजया, लेप पांघरून रस्त्यांवर, प्लॅटफॉर्मवर, सभेत, बाजारात लोक हिंडतात. बायका उकीरड्यावर गोंवऱ्या थापतात, रस्त्यावर शेण वेंचतात, पण तोंडावर सबंध बुरखा घेऊन. भुताटकीचा प्रकार वाटतो! लहंगे-फडक्या आणि सलवार कुडता यांचा रिवाज आहे.

उंटाला कांटेरी झाडें विशेष आवडतात. येथे बाभळीचीं, बोरीचीं, 'केर'चीं झाडें व कांटेरी झुडपेंच आहेत. क्वचित् एकादें निंबाचें झाड डोकावतें. कापसाचीं शेतेंहि बरींच आढळतात.

एकूण मारवाड व पंजाब यांचें मिश्रण दिसून येतें. भाषेतहि त्याचा प्रत्यय येतो. भडक रंगाची विशेष आवड आहे.

पंचकोसी (अबोहर)
१४.१.'५०.

पहाटे अलाहाबाद आलें. मुकुंदशास्त्री धर्माधिकारी स्टेशनवर हजर होते. फक्त तीन तासच वेळ होता. तेवढ्यात मुकुंदशास्त्र्यांच्या घराला भेट व त्रिवेणी स्नान बसवावयाचें होतें. मुकुंदशास्त्र्यांना म्हटलें 'घरीं नेण्याचा मोह सोडा.' पण ते म्हणाले, 'हें नई होऊ सकत आहे.' 'सकणें' 'सोधणें' फक्त तात्यासाहेब केळकरांच्या कोंकणातच आहे असें समजू नकोस. म्हाताऱ्या कोचवानाच्या टांग्यातून संथपणाने सहा मैल जाऊन मुकुंदशास्त्री धर्माधिकाऱ्यांच्या घरीं चहा घेतला. तेथून रिक्षेने त्रिवेणीवर जाऊन स्नान केलें आणि बरोबर ८ ला परत स्टेशन गांठलें. गाडीला तब्बल तासभर वेळ होता. सारें काही यथास्थित झालें. या गाडीतहि जागा भक्कम आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाळूला मोठी काळजी होती. कलकत्त्याला विमानाने जाऊन भागलपुरला जावें असा त्याचा कोण आग्रह! पण माझा हा प्रवासच सुखकर झाला. आणि वर त्रिवेणी स्नान पदरात पडलें तें निराळेंच. 'तेणें तुझी काय नाही केली चिंता!'

प्रवासात काही कमी म्हणून पडलें नाही. काल एकदाच चहा मिळाला. पण मग त्याची आठवणहि आली नाही. आज पुन्हा पोटाला सक्तीची विश्रांति मिळाली आहे. सक्तीची आणि 'मोफत' मिळाली आहे. तेव्हा तक्रार तरी कशी करावी?

मुगलसरायला कितीदा तरी आलो असेन. पण या पाळीला येथील एका माकडाच्या अभिनव 'टेकनीक'चा कटु अनुभव आला. हें माकड डब्यात शिरून उतारूंचा जिन्नस लांबवते आणि काही खायला दिलें म्हणजे परत करतें. मला मात्र फक्त पन्नास टक्केच अनुभव आला. त्याने माझी डायरीच लांबवली. त्याला तिचेंच महत्त्व वाटलें. मी त्याच्याकरिता चांगल्या सहा आण्याच्या पुऱ्या व स्पेशल भाजी घेतली. नाखुशीने व नाइलाजाने त्याच्या अंगावर तुकडे फेकले. पण तें मोठें क्रांतिकारक! तुकड्यांना वश होण्याइतकी त्याची दानत क्षुद्र नव्हती! त्याने चोरीच्या तंत्राचा प्रयोग मला चीड आणण्याकरिता केला होता. माझ्या दिनचर्येच्या टिप्पणांचे त्याने तुकडे तुकडे केले. आणि बेगुमानपणें त्यांच्या वावड्या उडविल्या! कालपुरुषाच्या संहारचेष्टांची त्याने मला वानगी दाखविली. 'आपली दिनचर्या नमूद करून ठेवण्याचा हा अहंकारी उपक्रम कशाला?' जणू तें मर्कट मला हिणवून म्हणालें!

काही दिवस नागपुरला सारखें राहिलें म्हणजे शरीर कुरकुर करू लागतें. प्रवासात ते पुन्हा तरतरीत होतें. तरी पण नागपुर सोडणें जिवावर येतें. जीव राखून जगणें प्रशस्त वाटत नाही. नागपुर सोडतांना किती तरी लोकांचीं कामें अपुरीं राहून जातात. त्यांचा विरस होतो. शिवाय नागपुराहून बाहेर जातांना मालकिणीची मूर्ति डोळ्यापुढे उभी राहते. माझ्या अंतःकरणातील तिचें सिंहासन रिक्त झालेलें नाही. अजून ती तेथे विराजमान आहे.

सियालदा एक्सप्रेस.

१५.४.'५०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नंतर ११-३० ते २ पर्यंतचा वेळ गंगा-कोसी संगमावर जाऊन 'संगम-स्नान' करण्यात गेला. या संगमापर्यंतचा रस्ता इतका दिव्य आहे की 'जीप' गाडीलाहि अगदी 'रज्जुनृत्या'प्रमाणे सर्कस करावी लागली. आमचा गाडीवान् मात्र मोठा दिलदार व धाडसी. त्याने रस्त्याच्या दुर्गमते-समोर हार मानण्याचें नाकारलें. आपलें सगळें कसब पणास लावलें. जीपने स्वारीच्या घोडयाइतकी चपळता दाखविली. वाळूतून चालतांना तिने उंटाची शक्ति दाखविली आणि वेगाच्या व चपळतेच्या बाबतीत मात्र घोडयाशी स्पर्धा केली. बसण्याची जागा हत्तीच्या अंबारीइतकी आराम-शीर होती. म्हणजे एकाच वाहनात हत्ती, उंट व घोडा यांच्या स्वारीचें संयुक्त श्रेय मिळालें. संगमावर पोचलो तेव्हा आमचीं अंतःकरणें जर कोणी तपासलीं असतीं तर त्यात कोलंबस, कॅप्टन स्कॉट, डेव्हिड लिव्हिंग्स्टन, इत्यादि प्रदेश संशोधकांच्या अभिमानाची प्रतिच्छाया त्यांना दिसली असती. त्यात पुन्हा काल सोमवती अमावास्येचें महापर्व होतें. महाकुंभाचें पर्व होतें, आम्ही बापूंच्या भस्मविसर्जनाच्या क्षेत्रावर गंगा-कोसी संगमावर कुंभस्नान केलें. प्रदेश-संशोधकाच्या भूषणभावनेत धार्मिकाची भाविकता मिसळली. उन्हहि अगदी 'चिलचिलाती हुई धूप' होतें. म्हणून गंगा-कोसीचें तें शीतळ जळ मोठें सुखकर वाटत होतें. एकंदर ही स्नान-यात्रा मोठी धाडसाची उल्हासदायक झाली. तिच्यात कुंभ-स्नानाचें पावित्र्य होतें आणि स्नान-विलासी माणसाच्या स्नानातील 'क्रीडानंदहि' होता.

गंगा-यमुनांच्या संगमाच्या दृश्यात व गंगा-कोसी संगमाच्या दृश्यात एक महत्त्वाचें साम्य आहे. दोन्ही नद्यांच्या पाण्याचा निरनिराळा रंग संगमरेखेवरहि दिसतो, पण हें साम्य येथेच संपतें. प्रयागला गंगेचें पाणी करडया रंगाचें असून यमुनेचें निळें आहे. तेथे यमुना खोल व संथ आहे, गंगा ओघवती व उथळ आहे. येथे कोसीचें पाणी करडें व उथळ आहे आणि गंगा शांत-गंभीर असून तिचें पाणी किंचित् हरितवर्ण आहे. पण काय गंमत आहे पहा ! प्रयागच्या गंगेला लोक खेळकर, लीलापटु, इत्यादि विशेषणांनी गौरवितात तर येथे मात्र बिचाऱ्या कोसीला थिल्लर, चंचल अनित्यप्रवाहवती, इत्यादि अनेक प्रकारचीं दूषणें लावतात. मोठयांचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोषहि गुणरूप ठरतात आणि लहानांचीं भूषणेंहि मातीमोल ठरतात. "नेपाळेश्वर भाललग्न चिखला कस्तूरिका मानिती !"

आम्ही सोमवतीचें कुंभस्नान संगमावर करून पुण्य-संपादनाची आत्म-समाधानाची व आत्म-गौरवाची भावना अनुभवीत परत आलो.

हत्तीवर बसून स्टेशनवर जायला निघालो. अमावास्येच्या काळोख्या-रात्रीं काळ्या हत्तीवर बसून चाललो. हत्ती डोलत व नि:शब्द गतीने चालत असल्यामुळे अगदी 'नीरव अंध:कार' होता. ८.३० ला आगगाडीत बसलो. आगगाडी अगदी जीप-गाडीवजाच होती. खिडक्यांना दारें नाहीत किंवा कांचा नाहीत. फक्त तिसरा वर्ग. जेमतेम बसून कटारियापासून काढागोला-पर्यंत एका तासात आलो. तेथून पुन्हा उघड्या पण सुंदर ट्रकवजा मोटार-वेगनमध्ये बसून ११.३० ला पूर्णियाला पोचलो.

हा प्रवास शारीरिक दृष्टीने श्रमाचा असला तरी त्रासाचा किंवा कष्टाचा वाटला नाही. हा सर्व विविध अनुभव तुलाहि मिळाला तर केवढें शिक्षण मिळेल ! जीवनाला विशेष गोडी व टवटवी येईल ! त्यामुळे क्षणोक्षणीं तुझी आठवण येते !

पूर्णिया जिल्हा पूर्व बंगालच्या सीमेवर आहे. येथून दार्जिलिंग लांब नाही. सिलीगुडी फक्त १०० मैलांवर आहे. येथील हवा पावसाळी आहे. गवत हिरवें असून सकाळीं दंव पडतें. हाहि कोसीचाच भाग पण त्यामानाने थोडा निराळा. नवगछियामध्ये मक्का फार होतो. अवघ्या विहारला पुरतो. या भागात निरनिराळीं पिकें होतात. उडीद दोन्ही भागांत पिकतें.

या भागाचें पूर्वबंगालशी पुष्कळ साम्य आहे. दृश्य मनोहर, पण हवा-पाणी दोन्ही विकारी. बांबूचें कुंपण असलेली मळेवजा सुंदर गवताचीं खोपटें आहेत. गवताचीं छप्परें मोठीं कलापूर्ण आहेत. इकडे म्हणच आहे; 'छाजा, वाजा, केश, एई तो वंगदेश' ! छाजा म्हणजे छप्पर, वाजा म्हणजे वाद्य-संगीत आणि सुंदर केशरचना, मिळून वंगदेश होतो. आमचा मुक्कामहि एका टुमदार व सुबकशा गवती झोपडीत आहे. का आहे कीं नाही बहार ?

पूर्णिया.
१८.४.'५०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवध-तिरहुतची गोगलगाईच्या गतीने चालणारी आगगाडी आणि तिच्याशी स्पर्धा करणारी 'स्टीमर' या वाहनानंतर विमानात बसलो. विमान ११.४९ ला निघालें आणि १.३० ला दमदम विमान तळावर पोचलें. भर दुपारची वेळ होती. उन्हामुळे सर्वत्र एकप्रकारचें विरविरीत धुकें पसरलें होतें. प्रकाश अतिशय उग्र व प्रखर असला म्हणजे अतिप्रकाशामुळेच माणसाच्या दर्शनात व्यत्यय येतो. नित्य प्रसिद्धीच्या लखलखाटात किंवा लोकैषणेच्या झगझगीत उजेडात राहणाराला वस्तूचें यथातथ्य आकलन होत नाही तें याचमुळे. पाटणा ते कलकत्ता एकंदरीत देखावा रुक्षच आहे. नद्या, शहरें, वनश्री, कशाचीच शोभा नाही. उजवीकडे क्षीणजल असा दामोदरनद मात्र सारखा बरोबर प्रवास करतांना दिसतो.

पहाटे ६.१५ ला पुन्हा आमचा 'गगनविहार' सुरू झाला. काल दुपारच्या चंद्रप्रकाशात सारी सृष्टि ढाक्याच्या पारदर्शक मलमलीचें अवगुंठन घेतल्यासारखी दिसत होती. आज मात्र खाली शुभ्र ढगांची विछाईत होती आणि वर निळ्या आकाशाचा चांदवा होता. आदिवासी लोक 'फर'च्या रंगासारख्या कापडामध्ये कांचेचे तुकडे गुंफून मोठ्या सुंदर चित्राकृति काढतात हें तू पाहिलें असशील. ही ढगांची पांढरीशुभ्र विछाईत त्यासारखी दिसत होती. मधून मधून भगदाडें असत तेथून खालचें दृश्य बघतांना आपण पाण्याच्या तळाशी असणाऱ्या जलदेवतांची सृष्टि बघत आहोत असा भास होत असे. नारळी-पोफळींचीं कुंपणें असलेलीं तीं मळेवजा घरें आणि त्यांच्यामागे तीं चिमुकलीं 'पूकुरें' – मोठें बहारीचें दृश्य दिसत असे. नंतर ते ढग विरळ व तुरळक होत चालले. तेव्हा खालचें दृश्य रुपेरी जरीचीं फुलें काढलेल्या विछायतीसारखें दिसू लागलें.

हे ढग लवकरच सूर्य प्रकाशाने प्रकाशित झाले. वस्तुस्थितीवर आशेचें 'अपिधान' असावें आणि खाली आशेचें 'उपस्तरण' असावें, असें आशानिष्ठ माणसाचें मन असतें. वर खाली, आजूबाजूला सूर्यप्रकाशाने प्रकाशित झालेलें हें रुपेरी ढग पाहून मला आशानिष्ठ माणसाच्या मनाची आठवण झाली. आज सूर्योदयाच्या वेळीं भूमातेवर आकाशाचें प्रावरण होतें. निराशावादी माणसाच्या दृष्टीची गति प्रतिबद्ध करणारें किंवा स्वप्नवादी माणसाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृष्टिआड सृष्टि झोकणारें तें धुकें नव्हतें, भूलोकाला स्वलोकाशी जोडणारें व्यवहारनिष्ठ आदर्शवाद्याचें तें पारदर्शक आच्छादन होतें. मोठीच मौज होती !

सुमारे अर्ध्या तासाने ढग वितळले. खालचा वर्फाचा समुद्र विरघळला. 'मेदिनीपुर' दिसू लागलें. ज्याला मिदनापुर म्हणतात तें हेंच. या 'मेदिनीपुर' ला आम्ही शिकत होतो. १९०६-७ सालच्या चळवळीतील हुतात्मा खुदीराम वसु याचें घर आम्ही मोठचा भक्तिभावाने लोकांना दाखवीत असू. गदाधर चक्रवर्ती (रामकृष्ण परमहंस) मेदिनीपुर जिल्ह्यातलें! सरकार त्या मेदिनीपुरला hot-bed of Sedition म्हणत असे. लहानपणच्या किती तरी आठवणींची गर्दी झाली. मालकिणीचें पहिलें पत्र मला मेदिनीपुरलाच आलें होतें. तिची आठवण झाली ! मी पृथ्वीपर्यटण करतो, अस्मानात सहल करतो, पण ती विचारी त्या निर्दय भिताडांमध्ये कैद आहे. मी मुलूखभर स्वैरपणें हिंडतो, आणि ती मात्र बंदीवासात आहे ! तिची आठवण पदोपदी येते. ती आठवणदेखील माझ्या जीवनातील वहुमोल संपत्ति आहे.

कलकत्ता ते नागपुरचें दृश्य पाटणा ते कलकत्ता या दृश्यापेक्षा पुष्कळच चांगलें आहे. उंच डोंगर आहेत, पठारें आहेत, नद्या आहेत, कालवे आहेत, दऱ्या आहेत आणि जंगलेंहि आहेत. सकाळच्या स्वच्छ प्रकाशात घाटांवरील नागमोडी वळणाचे रस्ते, नद्यांचीं वळणें, काही नद्यांचें उगम, सारें काही स्पष्ट दिसतें. ज्या डोंगरांचीं शिखरें वर जाऊन पाहता आलीं नसतीं, त्या शिखरांचा वरचा भाग पहायला मिळतो. मुंवईला जातांना विमानातून कसारा घाटाच्या शिखरांचें वरचें दृश्य पाहतांना माणसाचें हृदय आत्मगौरवाच्या भावनेने फुलून येतें. छोटा नागपुर, उडीसा, छत्तीसगड, भंडारा, रामटेक या भागांतील पर्वतश्रेणी एकाच वेळीं दिसतात. शुभ्र ढगांमुळे कित्येक डोंगर समुद्रात पोहत असल्यासारखें भासतात. आणि लहान डोंगर तर लस्सीच्या कटोऱ्यात तरंगणाऱ्या वर्फाच्या तुकडचांसारखें दिसतात. उन्हामुळे सगळ्या सृष्टीवर मच्छरदाणीचें आवरण असल्याचा भास होतो. लहानपणीं आमची आजी अगदी तलम पांढरा पारदर्शक मुकटा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाळायला लावत असे. त्यातून खालच्या सर्व वस्तु दिसायच्या. त्याची मला आठवण झाली. काही पठारें आणि मैदानें अगदी रुक्ष आहेत. हिरवळेचें किंवा झाडाझुडपांचें नांव देखील नाही. नद्यांनादेखील पाण्याचें वावडें आहे.

मी मोटार, आगगाडी, नाव, विमान या निरनिराळ्या वाहनांतून नेहमीच प्रवास करतो. तरी पण मला खिडकीजवळ बसून प्रदेश बघावासाच वाटतो. कालची सृष्टि आज नसते, मागल्या क्षणाची या क्षणीं नसते. ती प्रतिक्षणीं नवीन होते. त्यामुळे तिच्या रूपात निरंतर नवीनता दिसते. तुला नाही तसें वाटत ?

अशा रीतीने चार तासपर्यंत जमीन व अस्मान यांच्यातील भेद व अंतर विसरून दोन्हींच्या नित्यनूतन सौंदर्याचा आनंद अनुभवीत १०.१५ला नागपुरला पोचलो.

प्रवास—नागपुर.
१९ व २०.४.'५०.

काल सकाळीं ८.४० ला छिंदवाड्याहून निघालो आणि सुमारे १२.३० ला येथे पोचलो. रस्ता सबंध ८५ मैल घाटाचा आहे. तुझेच विचार मनात घोळत होते. तुला नागपुराहून मोटारने आणली तर मौज खूप वाटेल पण इतक्या आढ्या-वेढ्यांचा व नागमोडी वळणांचा रस्ता तुला मानवेल का, हा प्रश्न मनात येई. या उन्हाळ्यात ठिकठिकाणीं जंगलेच्या जंगलें अगदी खराट्यांचीं झालेलीं आहेत. तरी पण एकंदरीत हिरव्या, तांबड्या व केशरी रंगाच्या निरनिराळ्या छटांची नुसती खैरात आहे! पिवळ्या केशियाची सुमनसमृद्धि पाहून विमाताईंचा आनंद मावेनासा होत असे. पिंपळ व मोह यांच्यात भगवीं वस्त्रें धारण करण्यात चुरस लागली आहे. पण मोहाचीं भगवीं वस्त्रें अर्जुनाच्या त्रिदंडी संन्यासापैकी आहेत. अनंत वैभवशालिनी व अखंड सौंदर्यशालिनी सृष्टिमातेचें अविनाशी सौभाग्य पाहत असतांना मध्येच गुलमोहोराचीं दोन झाडें शेजारीं शेजारीं उभीं दिसलीं. एक पिवळ्या रंगाचें आणि दुसरें लाल. विमाताई चटकन् उद्गारल्या, हळद-कुंकू आहे! तांवियाचा डाक बंगला मुद्दाम बघितला. खालचें दृश्य विमानातून दिसतें तसें दिसत होतें. या डाक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बंगल्यातून समोर दिसणारा सौंदर्य-विस्तार अप्रतिम आहे. हें सगळें बघत असतांना मला मात्र माझ्या 'कन्याकुमारी अंबिके'ची आठवण येत होती.

येथे अक्षरशः अपरिग्रही बनून आलो. आबा साहेबांनी धोतर, सदरा, टोपी वगैरे देऊन 'लज्जा रक्षण' केलें. या प्रकारें तरी 'मंत्र्याचीं वस्त्रें' अंगावर चढलीं. तीं 'मोराच्या पिसा'प्रमाणे 'उसनीं' मात्र कोणाला भासलीं नाहीत. एरव्ही तरी मित्रांच्याच मदतीने आयुष्य सुखाने कंठू शकलो आहे. फक्त 'आयुष्य' खेरीज करून बाकीचें सारें मी उसनेंच घेतलें आहे. माझें असें काय आहे? तेव्हा कपडेदेखील आपलेच हवेत असा तरी आग्रह कशाला धरू? उसन्या घरात राहतो, उसनीं वाहनें वापरतो, उसन्या वैभवांत नांदतो, मग उसनवारीची लाज तरी कशाला धरू? तीहि सोडून 'सर्वत्र विजयी' व्हावें झालें.

पचमढी हल्ली सरकारचें सदर मुकाम आहे, म्हणून हें दरबारक्षेत्र आहे. येथे आल्यापासून अनेक कामें करावीं लागत आहेत. नागपुराहून फोनांची फैर चालूच आहे. काल पहिल्यांदाच गव्हर्नरांच्या कोठीवर गेलो. आमची 'मदालसा' तेथे अनायासेंच भेटली. जुन्या आठवणी निघाल्या. × × जींचें 'रामायण' झालें. × × त्यांच्याजवळ शिकत असतात. डॉ. उद्दनवाडीकर भेटले. तुझी चवकशी केली.

पचमढी,
८.५.'५०.

आम्ही सर्वांनी शिवनेरीवर जाऊन येण्याचें ठरविलें. ता. २७ ला सकाळीं ९ ते दुपारीं २ पर्यंतचा वेळ त्यात घालविला; नव्हे, सत्कारणीं लावला म्हण. शिवनेरीवर सृष्टि सौंदर्याचा अभाव अगदी लक्षात येण्याइतका आहे. काही करवंदीच्या जाळ्या, एकटें दुकटें निवडुंगाचे झुडूप आणि मोटेच्या आकारासारखी पिंवळीं फुलें खेरीज करून वनश्रीचें नांवहि नाही. डोंगराच्या कुशीत लेणीवजा खोल्या आहेत. पहिल्या माथ्याची चढण चढल्यानंतर दुसऱ्या माथ्यावर शिवाईचें देऊळ आहे. त्यातील जुन्या मूर्ती-सारखीच नवीन मूर्ति हुबेहुब करवून घेतली आहे. वर पाण्याचीं टाकीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुबलक आहेत. महाराष्ट्रात डोंगराच्या टोंकावर कृष्णाकांठचीं मिरज-सांगली कजेल खिल्लारी गुरें दिसलीं. गवत कांपायला आणि भारे करायला ठाकर लोकहि आलेले होते.

या शिवनेरीवर महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य उदयाला आला. श्री शिवरायांच्या जन्माची जागा जशी पूर्वी होती तशीच पुन्हा बांधून घेतली आहे. त्याठिकाणीं बसून मी १०.३० ते ११.३० एक बौद्धिक घेतलें. नंतर मंडळींनी एका मशिदीसमोर मुरमुरे-वाटाणे खाल्ले. गंगा-यमुना नांवाचीं दोन टाकीं फारच चांगलीं आहेत. चांगलीं लांबरुंद व खोल आहेत. कपारीत असून कोरलेलीं आहेत. पाणी स्वच्छ व मधुर. ठाकर लोक तेथे नाचणीच्या व नागलीच्या भाकरी आणि वांग्याची भाजी करीत होते. त्यांच्या भाकरीची चव पाहिली. नंतर वर गेलो. तेथे दरगे वा इदगाह आहे. एक डोंगर खाली उतरून एका वडाखाली १२.३५ ते १.३० दुसरें बौद्धिक घेतलें. २.३० ला खाली आलो. जेवलो. पत्रें लिहिलीं. ४.४० ते ५.५० पुन्हा बौद्धिक. सारीं बौद्धिकें घेतांना पारिभाषिक भाषेत शास्त्रीय पद्धतीने पण सुबोध व सुस्पष्ट विवेचन केलें. युवकांच्या स्वतंत्र संस्थेची गरज नाही हेंहि अर्थात् सांगितलेंच. सायंकाळीं ६.४० ते ७.५० जाहीर भाषण केलें. आणि रात्रीं ८.३५ ला ठेल्याने निघून रात्रीं १.३० ला नगरला आलो. समोरच्या सीटवर होतो. म्हणून अगदी हवाबंद कमरा होता. पण अवघडून बसावें लागलें. अंग बरेंच अवघडलें. तावडतोब बीडला येता यावें म्हणून फिरोदिया व काका गरुडांकडे बीडच्या माणसाचा तपास केला. तो सांपडला नाही. तेव्हा नाइलाजास्तव काका गरुडांकडे हाडें टाकलीं.

रात्रीचे २.१५ वाजले होते.

जुन्नरपासून तीन मैलांवर शिरवली गांवीं राष्ट्रसेवादलाचीं मुलें रस्ता तयार करण्याचें उपयुक्त विधायक कार्य करीत आहेत. तेथे जाऊन येण्याबद्दल भाऊ रानडयांची चिठी आली होती. माझी फार इच्छा होती आणि श्रीपादांचाहि आग्रह होता. पण संवड झाली नाही. खेद वाटला.

नगरचे काका गरुड हे नगरचे एक प्रमुख पुढारीच नसून माझा भाचा प्रा०मनु जकाते याचे चुलत सासरेहि आहेत. रावसाहेब, अच्युतराव यांच्या-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पैकी नगराला कोणीच नव्हतें. ता० २८ ला सकाळीं स्वामी सहजानंदांची भेट झाली. त्यांनी नगराला परत येतांना व्याख्यान देण्याचा मनस्वी आग्रह केला.

बीडहून अण्णासाहेब तेलप आले होते. त्यांनी एक स्टेशन वॅगन केली. नगर जिल्हा काँग्रेसची ही गाडी लॉरी व टूररचें 'कांप्रोमाइझ' आहे. २८ ला सकाळीं ९ ला निघालो. फ्रीप्रेसमध्ये नागपुरच्या धान्य परिस्थितीबद्दल प्रक्षोभकारक मजकूर वाचला. चित्ताने ठाव सोडला. जिवाची लाही झाली. मनु, त्या तळतळाटाचें वर्णन करता येणें शक्य नाही. तू मला ओळखतेस. वाटलें तडक नागपुरला परत यावें.

रस्त्यात सुमारे अर्ध्यावर सांकत सातोंडा नांवाचा गांव लागला. हैदराबादच्या Police action ला येथूनच आरंभ झाला होता. येथून सुमारे एक मैलावर एक दरी आहे. तेथे एक अरुंद पण उंचावरून पडणारा धवधबा आहे. खाली एक स्वच्छ पाण्याचा खोल खळगा आहे. काही अंतरावर एक लहानसा धवधबा व खळगा आणखी आहे. जवळच देऊळ आहे. अशा ठिकाणीं शिवाचें देऊळ कसें नसेल ? पण त्यात राम, गणपति व शनिहि आहेत. म्हणून या गांवाला रामेश्वर सातोंडाहि म्हणतात. तेलप व मी ११.५० ला खाली उतरायला लागलो आणि सारें बघून १२.१२ ला वर आलो. काही पायऱ्या फारच उंच व अवघड आहेत. सातोंड्याला एक पोरगा पिकलेला आंबा खातांना दिसला. या वेळीं आंबे आहेत म्हणे !

काल दुपारीं दीडला बीडला आलो. अंघोळ वगैरे आटपून ३.४० ते ५.५० उद्घाटनाचें भाषण केलें. वहारीचें साधलें. भरीव, भरदार व रसाळ ! सायंकाळीं ६.४० ते ७.५० जाहीर भाषण केलें. ता. २७ ला दुपारीं जेवलो होतो त्यानंतर काल रात्रीं ९ ला जेवलो. ९.३० ला रात्रीं प्रार्थना झाली. १० पासून पुन्हा बौद्धिक ठरलें होतें. पण लोक दमले होते. म्हणून तें रद्द करण्यात आलें.

हें शिबिर क्लबाच्या आधुनिक पद्धतीच्या सुंदर इमारतीत व तिच्या प्रशस्त पटांगणात आहेः मला एक नवीन तंबू रहायला दिला आहे. मी एकटाच आहे. कोटेच्यांची धाकटी भावजय, पोरसवदा सूरज, माझी निगा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राखते. मंडळी वेताची, त्यांची पातळीहि वेताची. हल्ली काँग्रेसच्या संयोजनांना फारसें प्रतिमोदन (response) नाही !

वीड (हैदराबाद)
२९.११.'५०.

कठोर हा गांव तापीतीरीं आहे. पांच-सहा हजारांचाच गांव आहे. पण संपन्न आहे. तापीच्या पैलतीरावरील खोलवड हा गांव तर दोन अडीच हजार वसतीचाच आहे. पण तो बाहेरी व्यापाराचा गांव आहे. त्यामुळे मोठा टुमदार व सुबक आहे. जणू काही मुंबईचाच एक तुकडा कापून तापीतीरीं आणून ठेऊन दिला कुणी ! सुरत, नवसारी, बारडोली या तालुक्यातील पुष्कळच लोक 'वणजे' करिता आफ्रिकेत गेलेले आहेत. त्यांची ही 'विलायत' (Home) आहे. म्हणून येथील घरें ढबदार व झोंकदार आहेत. पत्रें व सीमेंट यांचा सढळहाताने उपयोग बांधकामात झालेला आहे. त्यामुळे गांवांना एक प्रकारची 'रौनक' (शोभा) आलेली दिसते.

मी मूळतापीचा. तापीच्या माहेरचें मायेचें माणूस मी. म्हणून काल संध्याकाळीं तापीवरच फिरायला गेलो आणि आज अंघोळहि करून आलो. तापी व नर्मदा यांच्यावर माझी मोठी ममता आहे. हल्ली मी तापी व नर्मदा यांच्या अंतर्वेदांत आहे. त्यामुळे मला सहजच गंगायमुनांची आठवण होते. तापी काहीशी यमुनेच्या वळणावर आहे. तिची वाळू व माती यमुनेच्या लाडक्या कृष्णाच्या वर्णाची आहे. पण यमुनेची वाळू काळी असून गुळगुळीत व बारीक आहे. तशी तापीची नाही. ती खरखरीत व जाडीभरडी आहे. तापी यमुनेइतकीच असुंदर आहे. नर्मदा त्या मानाने मोठी देखणी आहे. अगदी पांगारकरी भाषेत सांगायचें झालें तर नर्मदा मोरोपंतांच्या कवितेसारखी आहे तर तापी वामन पंडिताच्या कवितेसारखी आहे.

पण रूपाने साधीसुधी असली तरी तापी जीवनरसाने मात्र संपन्न आहे. तिच्या खोऱ्यातील जोंधळा, वांगीं व इतर जिन्नस मोठें चवदार असतात. तापी तीरीचें दूधदुभते तर नामांकितच आहे; आणि सुरती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कापूस सर्वत्र वाखाणला जातो. जीवनाला गोडी देण्याची शक्ति तिच्या पाण्यात आहे.

परदेशात व्यापार करणारांचें हें 'वतन' पाहून तामिळनाडातील चेट्टिनाडाची आठवण झाल्यावांचून राहत नाही.

खोलवड व कठोर हीं गांवें बघून गौतमजींना नवल वाटलें. इतकीं डौलदार खेडीं, ते म्हणाले, मी काही पाहिलीं नाहीत. कठोरच्या तापी-तीरीच्या मातीत जादू आहे. समुद्राच्या पाण्याच्या प्रतिक्रियेमुळे तिच्यात विशिष्ट रासायनिक गुण येतो. म्हणून येथील पाण्यामुळे पूर्वी येथे काळा व लाल रंग अप्रतिम होत असे. वांगीं तर फारच रुचकर व लोण्यासारखी मऊ ! आपल्या इकडे तळेगांव जवळील वर्धा किनारीं वसलेल्या चित्तूरचीं वांगीं प्रसिद्ध आहेत, नर्मदा किनारीं ब्रह्माणीचीं वांगीं प्रसिद्ध आहेत, कृष्णा किनारीं कऱ्हाडचीं आणि दक्षिणेकडे उडूपी नजीकचीं. जोंधळा व वांगीं त्या त्या भागांतील काही खास ठिकाणांचीं प्रसिद्ध आहेत.

या भागात पाटीदार लोकांची संख्या विशेष आहे. स्त्रियांचा पेहराव विशिष्ट प्रकारचा आहे. साडीला कासोटा असतो आणि ती बहुधा गुडघ्या-पर्यंतच असते. कामकरी पोषाक आहे हा.

कठोर (जि० सूरत)
२.३.'५१.

•

१२.३० ला बस निघाली. आधीच दुपारचें उन्ह. त्यात गर्दीला सुमार राहत नाही. मोटारीतील गर्दी कमी करण्याची भरपूर ताकत माझ्या अंगीं आहे. पण आपल्या देशातील जनताजनार्दनाला गर्दीवांचून चैन पडत नाही. बैलगाडीत बसतांना बैलाच्या जिवाची पर्वा नाही. रिक्षेत बसतांना रिक्षावाल्याच्या जिवाची पर्वा नाही, मग सायकल, मोटार, आगगाडी ही तर बोलून-चालून यंत्रेंच आहेत ! जनस्पर्शाची आकांक्षा इतकी भयंकर आहे की माणसामाणसांत तिळ ठेवण्याइतकें अंतरहि सहन होत नाही ! कोठे तुझा 'स्पर्श-विवेक' ! आणि कोठे हा स्पर्शातिरेक !

सुमारे १.४५ ला कांरजें आलें. ४.३० पर्यंत स्टॅन्डवर बसावें लागलें. सॉमरसेट मोमचें Summing Up वाचीत बसलो. खुसखुशीत विवेचन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. त्यामुळे कंटाळा आला नाही. सत्संगतीत वेळ गेला. मोटार स्टॅन्डवर गर्दी होती. गोंगाट होता, गडबडहि होती. पण गर्दीमुळेच एकांत होता, गोंगाटामुळे शांतता होती आणि गडबडीमुळे निवांतपणा होता.

४.३० ला पुन्हा बसमध्ये बसलो, अलीकडे काडयांची पेटीहि कुणी इतकी भरगच्च भरीत नाही. ६ ला दारव्ह्याला पोचलो. ६.५० ला सायंकाळीं दिग्रसला पोचलो. मंडळी वाटच बघत होती. तावडतोब अंघोळ केली. नुसताच चहा पाजणें यजमानाच्या आतिथ्याला शोभण्यासारखें नव्हतें. म्हणून आधी दूध-पोहे दिले. कारण ता.७ ला दुपारीं जेवल्यानंतर जेवलो नव्हतो. पोहे भिजून मऊ होऊ नयेत याची काळजी घेण्यात आली होती. कुरकुरीतहि नव्हते. दांतांना व्यायाम झाला, पोटाला शिक्षा झाली.

तावडतोब परिषद. रात्रीं १२ पर्यंत चालली. भाषण बरें केलें. पण शरीर दमलें असावें — असा माझा तर्क आहे. कारण आवाजात ओघ व गोडी अंम्मळ कमी उतरली. रात्रीं १२ ला जेवलो. तावडतोब निघून धामणगांवला मेल गांठायची होती. पण आमचे यजमान रात्रभर मोटारीची व्यवस्था करीत होते आणि मी प्रतीक्षा करीत होतो. असा व्यवस्था-प्रतीक्षांचा मोठा गोड कार्यक्रम पहाटेपर्यंत चालला !

नागपुर एक्स्प्रेस.
९.३.'५१.

सकाळीं १० ला विमानात बसलो. अस्मानाचा आजचा थाट वेगळाच आहे. अस्मानाच्या रागरंगाचा परिणाम जमिनीवर होतोच. आज पांढरे व करडे ढग टोळकी करून सहल करायला निघालेले आहेत. त्यांच्या सांवल्या जमिनीवर निळ्या-काळ्या शाईने काढलेल्या असंशोधित देशांच्या व बेटांच्या नकाशासारख्या दिसतात. पण त्यामुळे जमिनीला टीप कागदाचें स्वरूप आलें आहे. जमिनीला अस्मानाचें दिव्यत्व यावें असें मला वाटतें, पण जमिनीवर अस्मानाची छाया पडावी किंवा तिला अस्मानाच्या ब्लॉटिंग पेपरची भूमिका प्राप्त व्हावी असें कोणाला वाटेल ? म्हणून विमानाला ढगांचा फडशा पाडतांना पाहून माझ्या पृथ्वीनिष्ठ मनाला फार समाधान वाटतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृश्य तेंच आहे. तीच गोदामाई, तेंच हिंगणघाट, सारें तेंच तें. पण या "तेंच तें पणात'हि शिळेपणा नाही. ढग तुडवितांना विमान बोगद्यातून जाणाऱ्या आगगाडीसारखें मुसंडी मारून जातें. झोंपाळ्यासारखें झोंकेहि बसतात. मौज आहे, झालें.

विमान, नागपुरच्या वाटेवर.
१३.४.'५१.

भागलपुरापासून सुमारे १० ला मोटारने निघून सुमारे तीस मैल प्रवास केल्यावर ११.१५ ला मंदार विद्यापीठात आलो. एका प्रचंड पालथ्या नगाऱ्याच्या आकाराचा काळ्या खडकाचा डोंगर आहे. हलवायाच्या बासुंदी घोटण्याच्या पालथ्या कढई सारखा दिसतो. त्याच्या टोकावर एक जैन मंदिर आहे. पायथ्याशी हें विद्यापीठ आहे. अद्वैताच्या पायावर तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण देणें हें उद्देश्य आहे. प्राचीन गुरुकुलाच्या आदर्शात सहशिक्षणाची भर घातली आहे. आदर्शानुरूप विद्यार्थी मिळाले तर तें विन-सरकारी विद्यापीठ कसलें ? आदर्शांची उच्चता व विद्यार्थ्यांची योग्यता यांचें व्यस्त प्रमाण हटकून असायचेंच.

डोंगर बघितला की माझे पाय वळवळलेच ! मी म्हटलें 'वर जाऊन येतो' एक म्हणाला, 'भर मध्याह्नीं ? भाजून निघाल !' दुसरा परिचित कैवार घेऊन म्हणाला, 'भर उन्हात गंगा-कोसी संगमावर स्नानाला जाणारा, ऐन दुपारीं डोंगर चढणारा हा मरतुकडा माणूस काहीहि करील !' पण मला राववून घ्यायचें सोडून डोंगरावर चढण्याची चैन कोण करू देणार ?

डोंगर अगदी निर्वृक्ष आहे. खालीहि झाडें फक्त ताडाचीं आहेत. बाकी झाडें झुडपें जवळ जवळ नसल्यासारखीच ! डोंगरावर सुंदर पाण्याचे कुण्ड आहे म्हणे ! पण वर जायला वेळ व परवानगी नसल्यामुळे ते आम्हाला अमृतकुंभा इतकेच दुर्मिळ. तख्तपोशावर बादल्यांच्या गर्दीत जाहीर स्नान झालें. आणि विद्यापीठात उत्तम भोजन झालें !

या पर्वताची अशी आख्यायिका सांगतात की समुद्र-मंथनाच्या वेळीं याचीच रवी केली होती. पण आकार मात्र रवी सारखा नाही. उलट एकाद्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ग्रीक दैत्याच्या शिरस्त्राणासारखा दिसतो. एखाद्या पाश्चात्य असुराने आपली हॅट पालथी ठेवल्याचा भास होतो.

सकाळीं ६ ला पुन्हा जीपमध्ये बसलो. इकडील नद्यांच्या उथळपणाला व थिल्लरपणाला सीमा नाही. इकडून जातांना जीं वाळूचीं मैदानें होतीं, तींच आता थेट आधुनिक विद्वानांप्रमाणे पाण्याने भरून गेलीं होतीं. वसंतराय आणि गुड्डाच्या रस्त्यावर चिखल झाला होता आणि आमची जीप अगदी वर्तमानपत्राच्या बेगुमानपणाने तो आमच्यावर उडवीत होती.

हैदराबाद, जबलपुर, डोंगरगड येथील प्रचंड काळ्यागोऱ्यांचे डोंगर तू पाहिलेले आहेस. त्याच्यांपैकी काही प्रवास करीत करीत गुड्डा व वसंतराय यांच्यामध्ये राजमहालपर्वतात येऊन वसलेले आहेत.

संथालाचीं गांवें, वनश्री, डोंगर वगैरे पाहिलें म्हणजे वाटतें विमल असती तर ! सारखा जीपचा प्रवास, उन्ह, पाऊस इत्यादि गैरसोयी पाहिल्या म्हणजे वाटतें पोरीचे हाल झाले असते ! माझ्या बाबतीत मात्र आदळ आपटीने, धक्कयाचपेटयांनी व गैरसोयीने मला टवटवी येते असेंच धरून चालण्याचा संकल्प लोकांनी केलेला आहे. आणि तोच बरोबर आहे. वेगाने मेंदूला तरतरी येते आणि धक्क्यांनी चेव येतो.

गुड्डाला कार्यक्रम ठेवण्यात आला नव्हता, पण वसंतरायच्या लोकांनी म्हटलें, 'कालचें भाषण आम्ही जमेस धरत नाही, आमचा विरस झाला !' म्हणून मुद्दाम गुड्डाला सकाळीं भाषण ठेवलें. विद्यार्थी व शिकलेले श्रोते होते. भाषण रंगलें. त्यात ओज होतें, अप्रतिहत आवेश होता, अकुंठित वेगहि होता. कालचा वचपा निघाला. ८.३० ते ९.२५ भाषण करून निघालो.

निघतांनाच वैद्यनाथबाबू म्हणाले, 'एका गाडीवर माझा भरवसा नाही. तिचें केव्हा काय बिघडेल, देव जाणे'. पुण्याला कोल्हापुरच्या गाडी-करिता जातांना तसा प्रसंग आपल्यावर आलाच होता. पुन्हा परवा कोल्हापुराहून परत आलो तेव्हा गांवात जातांना मोटारने संप पुकारला होता. मजुरांनंतर यंत्र व उपकरणें यांचीच संपाची पाळी आहे ! तीस मैल आल्यावर आमच्या गाडीने पुढे जाण्याचें नाकारिलें ! तीस मैल मात्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खूप वेगात आली. सृष्टि-सौंदर्याचें अवलोकन व चिंतन वेगात खूप चांगलें होतें. गुड्डुयापासूनच्या रस्त्यावर दोन्हींकडे काळ्या खडकांचे निरनिराळ्या आकारांचे डोंगर उभे आहेत. काही डोंगर वसलेल्या हत्तीच्या आकाराचे आहेत. मागले पाय, मधली पाठ, गंडस्थल आणि पुढचे पाय यांचा आकार दिसतो. काही डोंगर वसलेले नंदी, वसलेला वराह, कासव इत्यादींच्या आकारांचे आहेत. त्यांचें सौंदर्य पाहत पाहत मजेत तीस मैल आलो. काही डोंगर मध्यमवर्गीय बुद्धिजीवी व्यक्तीच्या व्यक्तित्वाप्रमाणे ढासळून वारगळलेलेहि आहेत.

तीस मैलांनंतर एक तास दुसऱ्या जीपच्या प्रतीक्षेत व्यर्थ घालविल्या-नंतर एका 'बस'मध्ये बसून पुढे निघालो. माणसाच्या पाठीचा कणा ताठ रहावा अशी काळजी मोठ्या दक्षतेने माझ्या 'सीट' पुरती घेण्यात आली होती. माझ्या 'सीट' ला 'तक्क्या' नव्हता. म्हणून अगदी सामुदायिक प्रार्थनेत बसल्याप्रमाणे ताठ बसून आलो. ११ ते १.१० बसावें लागलें. आम्हाला जसीडीहला १२.३० ची गाडी सहज गांठता आली असती. पण बसच्या सत्यवादी ड्रायव्हरने गाडी मिळणें शक्य नाही म्हणून आम्हाला बजावलें होतें ! म्हणून त्याने अगदी हरिश्चंद्राच्या ऐटीने आपलें वचन पाळलें आणि आम्हाला १-१० ला देवघर, वैद्यनाथ धाम, येथे पोचविलें. आगगाडी निघून गेलेली होती. म्हणून आम्ही दुसऱ्या जीपच्या शोधात लागलो. दरम्यानचा वेळ श्री वैद्यनाथाच्या दर्शनात व दहीचिवडा आणि सत्तू खाण्यात घालविला ! उरलेला वेळ पुन्हा झोपेत गेला.

मोठ्या मुष्किलीने सुमारे ४.३०ला जीप मिळाली. ४.४०ला निघालो. मोटार उत्तम होती. पण रस्ता कच्चा व वळणांचा. संथालाचीं गांवें, फणसांचीं झाडें आणि डोंगर व वाळूच्या शुष्क नद्या यांची शोभा पाहत पाहत चार तासांच्या प्रवासानंतर करमाटांडला पोचलो. तेथून सुमारे ८.५० ला करों येथे पोचलो. प्रचंड सभा जमली होती, शिविरात कार्यकर्ते पुष्कळ होते, लोक निराश होऊन निघून गेलेले होते. आणि कार्यकर्तेंहि पुष्कळसे निघून गेले होते. एका मित्रांनी 'शतं विहाय भोक्तव्यम्'चा आग्रह केला. जेवण उरकलें. रात्रीं १० ते ११ पर्यंत भाषण केलें. फार छान ! ओजस्वी व विचारयुक्त.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आजचा योग विघ्नयोग होता. दिवसभर विघ्नें सामान्य स्वरूपाचीं आलीं, रात्रीं मात्र जें विघ्न येणार होतें – नव्हे आलें होतें, त्यातून आम्ही कां व कसें पार पडलो हेंच कळत नाही. जीप नवीन व चांगली होती. पण एका उतारावर एक ओढा व पूल होता. पुलावर फळचा किंवा माती नव्हती. एका कडेला माती होती आणि बाकी सगळें भगदाडच होतें. त्या भगदाडा-वरून वेगात आमची गाडी चालली ! आम्हाला वाटलें एका क्षणात आम्ही परलोकवासी होणार ! पण देवाज्ञा नव्हती. म्हणून त्याच क्षणीं अकल्पित चमत्काराने मोटारीसकट सही सलामत पार पडलो ! एका निमिषात सारें झालें. घावरायलाहि अवकाश मिळाला नाही ! एका क्षणात हंसायलाच लागलो ! अपघात झाला नाही याबद्दल धन्यता वाटत होती, पण केवढा भयंकर अपघात होता होता टळला याचा अभिमानहि वाटत होता. जो झाला नाही त्या अपघाताची भीषणता आम्हाला भूपणभूत झालेली होती. आहे कीं नाही माणसाच्या मनाची गंमत ?

मंदार विद्यापीठ. भागलपुरापासून ३० मैल.
३०.४,'५१.

दुपारींच सेंकडक्लासमध्ये 'बर्थ'चें रिझर्वेशन केलें. रात्रीं गाडीत येऊन बसलो. गार्डने शीळ दिली. वाळू, सोनार, यादव यांची पाठ फिरली. इतक्यात एक 'लगीन' येऊन थडकलें ! जागा मिळेना. माझ्या डब्यात वरचे दोन बांक होते. मी म्हटलें, 'या', वरेंकरता 'ब्रह्महत्या' ! माझ्या डब्यात सामान आणि माणसें यांची इतकी गर्दी झाली की मलाच जागा उरली नाही. तिकिट कुणाच जवळ नाही. कारण बांदल नि गैरशिस्त-पणावांचून लग्नाला मौज नाही ! शेवटीं मी सांखळी ओढली ! पण उपयोग काय ? गाडी थांबली ! काही ठळक ठळक माणसें खाली उतरलीं ! पण नवरी मुलगी, नवरदेव आणि किरकोळ स्वाऱ्या आणि २५/३० सामानाच्या 'डागा' आमच्याच डब्यात राहिल्या. घागरा, घुंगुट यांनी आपल्या कुलीनत्वाची साक्ष देणाऱ्या त्या कुलवधूला वर झोप म्हणण्याची कोणा आर्याची प्राज्ञा होती ? मीच मुकाट्याने वर गेलो आणि माझें अंथरूण त्यांच्या हवाली केलें ! मानवी योजना या अशा कधी कधी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फिसकटात ! यात अपयश आहे, पण पराजय नाही ! मानला तर आनंदहि आहे !

भुसावळपासून एकटाच होतो. चाळीसगांवला एक सोवती आले. एरव्ही, माझी केव्हा कशी फजिती होईल याचा काही एक नेम नाही. ता. ६ ला बिहारातून परततांना भर दुपारीं गोंदियाला पाणी प्यायला उतरलो. नंतर डबाच सांपडेना ! तुमसरलाहि सांपडला नाही. अखेरीस गोंदिया तें भंडारा, तब्बल दीड तास, सर्व्हंटांच्या डब्यात बसून आलो ! म्हणूनच तुझ्या बंधुवर्गांचे निक्षून सांगणें आहे, 'सोवत्यावांचून प्रवास करू नका !' पण माझी पांगळ्याची काठी आहे माझी 'मनी !' सोन्यापेक्षा बहुमोल, चंदनापेक्षा सुगंधी आणि हस्तीदंतापेक्षा धवल ! तेव्हा 'प्रवास आणि निवास यांना सहवासावांचून अंगची अशी स्वतंत्र गोडी नाही ! रामावांचून नुसताच आराम सुखकर होत नाही,' हें म्हणणें मान्य केलें तरी सहवास म्हणजे 'दुकटेपणा' नव्हे. या वयात आणि या अवस्थेत अनुकूल वृत्तीचें अपत्यच सहवास-सुख देऊ शकतें !

आता याच डब्यात बघ की, सोवतीला काही तोटा नाही. पण एकमेकांशी एक अवाक्षरहि न बोलण्याचा सभ्य लोकांचा रिवाज आम्ही कसोशीने पाळत आहोत. त्यात पुन्हा माझा डबा 'शुभमंगल' डबा आहे. रात्रींहि नूतन विवाहित मारवाडी वधू-वरें माझ्या डब्यात होतीं आणि आता गुजराती नूतन परिणीत जोडपें आहे. रात्रींच्या जोडप्याप्रमाणेच यांच्याहि हातात 'कंकणें' आहेत. रात्रींच्या नवऱ्या मुलीने आपलें तोंड जगाला दाखवायचेंच नाही असें ठरविलें होतें. या मुलीने तसा निश्चय केलेला नाही. पण बांकावर कितीहि जागा असो, शिस्तीने एकाच आसनावर अगदी ताठ बसण्याचा नियम हिनेहि पाळला आहे. फार तर डुलकी देते. पण नवऱ्यामध्ये आणि आपल्यामध्ये निदान दोन माणसांचें अंतर रहावें इतकी काळजी घेते आणि एकमेकांना संभाषणाच्या योग्यतेचें दोघांपैकी कोणीच मानीत नाही. या मंगलमय मौनात मीहि सामील झालो आहे.

नागपुर एक्स्प्रेस
१९.५.'५१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मंडळींना म्हटलें मला कारंज्याला अगर नागपुरला पोचवून द्या. पावसाचा जोर कमी होईना. आर्वीच्या रस्त्यावर बावीस मैलांत बावन्न नाले व ओघळ, रस्ता उपमेय होण्याइतका वाईट. पण मंडळी जितकी खटपटी तितकीच लटपटी ! वाटेल तें करून, थापा मारून, एक लँडओव्हर मिळवली ! पण जेवल्यावांचून कोण निघू देणार ? ८ वाजता एक प्रमुख कार्यकर्ते म्हणाले, एका तासात जेवण तयार होईल. जेवल्यावांचून जाऊ नका. हा तासहि घड्याळाचा नव्हता. अघळपघळ होता. तो और घंट्यांचा तास निघाला ! दरम्यान सोनाऱ्याहून माझ्याकरिता रेंग्या येऊन गेल्या. पण मला कोणी कळविलेंदेखील नाही. ११ नंतर जेवायला बसलो. जेवणाची गरज नव्हती. पण जेवल्यावांचून गत्यंतर नव्हतें ! रात्रीं ११.३० नंतर लँडओव्हरने निघालो. पुलगांव-आर्वीचा रस्ता अगदी सर्कशीच्या व सिनेमाच्या लायकीचा होता. ओढ्यांना पूर मात्र नव्हता ! तो ओसरला होता.

उत्तर रात्रीं २ ला कारंज्याला पोचलो. चिखल खूप होता. सावंग्याच्या रेंग्या निघून गेल्या होत्या. नारळ्यांकडे आणखी तीन पाहुणे होते. २.३० ला तेथे गेलो. २.४५ ला झोपलो.

३.४५ ला उठलो. प्रातर्विधि. नारळ्यांच्या मुनीमाने एक रेंगी दिली. ती 'रेंगी'च होती. म्हणजे 'रांगत' होती. चार माणसें एकमेकांवर आदळली असतीं. रस्ता दगडांचा व खांचखळग्यांचा ! एका तमंच्याला बरोबर घेऊन ४.४५ ला पायींच निघालो. हवा मोठी तरतरी आणणारी व प्रसन्न होती. चिखल मात्र तुडवावा लागला. पांच वर्षें राजकारणात काढल्यामुळे तें अंगवळणीं पडलें होतें ! दोन तास लागले सात मैल चालायला ! गांवाशेजारीं आलो, तो नदीला पाणी ! पण इतक्यात माझ्याकरिता कारंज्याला जायला निघालेली 'रेंगी' आली. गाडीवानाने हात धरून नदीतून आणलें. एका पाटलाची सजलेली घोडी आली. तमंच्यासह तिच्यावर बसून गांवातून एक फर्लांग मिरवीत मामांच्या वाड्यात आलो. 'दादा आला ! दादा आला !' आनंदाची आरोळी दुमदुमली !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पू. आई आली आहे. मुलें, मुली, सुना मिळून आठ दहा धर्माधिकारी आले आहेत. भीकूलालहि आहेत. आजचा दिवस राहीन. शेवटीं मामांच्या उत्कट स्नेहाची फत्ते झाली. लग्नाला मी हजर राहू शकलो !

लोहारे-सावंगे.
१६.६.'५१.

आमची जुनीच फोर्ड व्हिल्ट गाडी आणि तिचा कुशल सारथि सोहनलाल तैनातीला होते. माझ्या प्रवासात जर अडचणी, अडथळे आणि अरिष्टें आलीं नाहीत तर त्याला चवच येत नाही. आमच्या गाडीला अक्षरश: सरकस करावी लागते. कालव्यांच्या बांध्यावरून उडया मारणें, चिखल तुडविणें, पाण्यातून धावणें, रस्त्याला पडलेल्या भेगा, तडा, भगदाडें ओलांडणें हें सारें विक्रम आमची गाडी करते. परवां संध्याकाळीं मात्र चिखलात रुतली ती रात्रभर जायबंदी झाली. पायीं चिखल तुडवीत, निसरड्यावरून व पाण्यातून तोल संभाळीत नजदीकचें गांव गांठलें. ओल्या कपड्यांनी रात्र काढली. काल कालव्यांच्या किनाऱ्याच्या वाटेने निघालो तो एवढाली भगदाडें आडवीं आलीं की शेवटीं अबोहरला कसेंबसें परत आलो. रात्रीं येथें जाहीर भाषण केलें. आज सकाळीं येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण केलें. भाषा, मांडणी, ओज, सारें काही औरच साधलें ! ता. २७ ला रात्रीं सीतो या खेड्यात केलेलें भाषण इतकें फक्कड झालें की तसें भाषण मुंबई-पुण्यात झालें असतें तर लोकांनी मला डोक्यावर घेऊन मिरविलें असतें ! पण माझी कलाच अशी 'लहरी' आहे. भाषाहि इतकी बेमालूम उतरते की लोक मला उर्दू पंडित मानू लागले आहेत. अडचणींमुळे व अडथळ्यांमुळे प्रवासाला खुमारी येत असली, तरी हें 'काव्य' तुला मानवलें नसतें ! तुझा प्रवास सुखकर व ज्ञानवर्धक होवो ! माझा प्रवास आधुनिक साधनांच्या व सोयीच्या अभावाला सरावलेल्या भागांतून चाललेला आहे. तुझा अगदी विरुद्ध परिस्थितीत होत आहे. पण तुझी आठवण मात्र फार फार होते. बेटा ! तू असतीस तर या प्रवासाच्या उपयुक्ततेत व गोडीत अनंत पटीने भर पडली असती. अडचणीत, आपत्तीत,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गैरसोयीत आपल्या वृत्तीचें माणूस, आणि तीहि पोटची पोर, असली तर त्या गैरसोयीच्या प्रवासालाहि कारल्याच्या खमंग भाजीची चव येते आणि तिचा तुरटपणाहि कुलूच्या सफरचदाप्रमाणे रुचकर लागतो !

अबोहर.
३०.७.'५१.

काल बुलढाण्याहून एक पत्र तुला धाडलें. दुपारीं शास्त्रीबोवांच्या मळ्यावर गेलो. सडेच राहतात. पण एकादा शाळामास्तर, एकादा विद्यार्थी जवळ ठेवतात. त्याला चहा व स्वयंपाकापासून तों बागाईत, सफाई, गीता इत्यादि सारें शिक्षण मोठ्या आस्थेने देतात. स्वस्थ कधी बसत नाहीत. कुठल्या तरी लोकोपयोगी कामात किंवा कार्याच्या चिंतनात नेहमी असतात. खरे खडतर, अनासक्त व निरपेक्ष लोक-सेवक आहेत.

सायंकाळीं ५ ला निघून सावरगांव (डुकरे) येथे गेलो. मोटार निवडणूक छापाची होती. भाड्याच्या टांग्याच्या तट्टाप्रमाणे भरधाव सुटली. पाऊण तासात पोचलो. गांव पाहिलें. ग्रामसुधारणेला आवश्यक सगळ्या संस्था, सगळ्या चळवळी मोठ्या व्यवस्थित रीतीने चालू आहेत. कार्यकर्त्यांची कळकळ, दक्षता, टापटीप वाखाणण्यासारखी आहे. सामुदायिक लग्नांपासून तो रामनवमीच्या उत्सवाला नवीन वळण लावण्यापर्यंत सगळ्या चळवळी जारीने अंमलात आलेल्या आहेत. गांव बघण्याजोगे आहे.

रात्रीं पंचायत पर्वाच्या समारोपादाखल माझें भाषण फार सुश्राव्य झालें. खेड्यांतील स्त्री-पुरुष उत्सुकतेने ऐकून गार झाले. भाषा सोपी व प्रतिपादन सुबोध व सूक्ष्म आणि मांडणी ओजस्वी व स्फूर्तिदायक ! चांगला रंग भरला !

पण पुढला प्रकार मात्र अंमळ अनपेक्षित झाला. रात्रीं १०.३० ला निघून मलकापुरला मेल गांठायचें ठरलें होतें. तसें बजावलें होतें ! त्यांनी तीच पंचायती मोटार दिली. तिला दिवे नव्हते. चंद्राच्या शीतळ प्रकाशात मोटारीच्या चारहि चाकांखाली बेगुमानपणें कायद्याची पायमल्ली करीत बुलढाण्याला रात्रीं १२ ला पोचलो. मेल गांठणें अगत्याचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होतें. पण बुलढाणा ते मलकापुर भरचांदण्यात कायदा तुडवीत जाण्याची हिंमत होईना. म्हणून रात्रभर झोपलो.

मुष्टिफंड, पुस्तकें, मासिकें, वर्तमानपत्रें, रोग, रोगी, केरकचरा, सोनखत या सगळयांचा चोख हिशेब ठेवणाऱ्या माझ्या यजमानांनी प्रवास खर्चाचा मात्र हिशेब मला न विचारताच केला आणि झालेल्या खर्चाची जवळ जवळ निम्मी रक्कम माझ्या हातीं दिली. माझ्या 'चरण रजांनी' त्यांचें गांव 'पुनीत' करण्याची संधि त्यांनी मला दिली होती. ती संधि माझ्या पदरात अगदीच फुकट पडावी हें त्यांच्या हिशेबी वृत्तीला पटलें नसावें !

चंद्राला साक्ष ठेवून बेदरकारपणें कायद्याच्या पायघड्या घालीत भरधाव चालणारी व आपल्या गोंगाटाने सगळ्यांना जागविणारी आमची मोटार गाजावाजाने अस्मान दणाणून सोडणाऱ्या आणि कायद्याला तुडवीत नाचणाऱ्या आपल्या कॉंग्रेस राजवटीची द्योतक होती.

मूर्तिजापूर.
८.३.'५२.

काल दुपारीं येथे पोचलो. गयाताई स्टेशनवर आली होती. ती व शांता घारवाडकर अशा दोन वहिणी येथे आहेत. त्यांच्याकडेच दादरला उतरलो. आबासाहेबहि येथे आपल्या बंधूंकडे आहेत. स्टेशनापासूनच बरोबर होते. त्यांच्याबरोबर टॅक्सीतून फेरफटका करून आलो. मदनकडे कुणीच नव्हतें. प्रभाकर पाध्यांकडे अगदी अनपेक्षितपणें जयप्रकाशबाबूंची कित्येक वर्षांनी गांठ पडली. मधु लिमये आपल्या भावी पत्नीसह होता. कमू पाध्ये आता कॉर्पोरेटर झाली आहे. मात्र जेवढीच्या तेवढीच आहे अजून ! बापूसाहेब जेस्त्यांकडे मीना व बच्चू यांची भेट झाली. आबासाहेबांच्या बंधूंकडेहि जाऊन आलो. मीना-बच्चू विवाह २० /५ ला आहे.

रात्रीं दोन तास भाषण केलें. रेखीव व ठसठशीत. भरीव स्वरूपाचें. भाषा व ओघमात्र मनासारखा नाही साधला. सूरहि लागला नाही. श्रोते सुशिक्षित होते. गर्दीहि बरी होती. 'स्त्री-जीवनाची मूलभूत समस्या' हा विषय होता. साहित्यिक व कलाप्रिय श्रोते म्हणाले, 'एखाद्या प्रमाणबद्ध सजीव

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिल्पाकृतीप्रमाणे भाषण झालें. दोन तास मंत्र मुग्ध होतो. श्रीपादराव नवरे म्हणाले, "हा बोमशेल' कितपत पचनीं पडेल देवच जाणें !' माझे जुने मित्र गोविंदराव जोशी (जी.एन्) पुष्कळ वर्षांनी भेटले. त्यांच्या पत्नीहि होत्या. मुलगी पहिल्यांदाच पाहिली. मॅट्रिकला बसली आहे. या पाळीला समुद्राचे मात्र ओझरतेंदेखील दर्शन झालें नाही. समुद्राकडे पाहिलें म्हणजे अफाट विस्ताराच्या भावनेने चित्ताला व्यापकता येते.

मुंबई.
१.५.'५२.

आज सकाळीं सुमारे ७ ला येथे पोचलो. रात्रीं गाडीत गर्दीचा कहर होता. दुसऱ्या वर्गात व इंटर क्लासमध्ये जागा मिळाली नाही. रामभाऊंमुळे कशीबशी बसण्यापुरती जागा तिसऱ्या वर्गात मिळाली. तू सकाळीं दाखविलेल्या आसनांचा इतक्या तावडतोब उपयोग होईल अशी कल्पना नव्हती ! विशेषें-करून सर्वांगासनात पद्मासनावर टांगून राहून जप करण्याच्या तुझ्या साधनेचें मला अनुकरण करावें लागलें. रामभाऊंनी आपलें भव्यशरीर मोठ्या शिताफीने दोन बांकामधील अगदी अरुंद खिडीत कोंवलें होतें. तें अर्धवट 'भूमिगत' होतें. त्यांनी काल सांगितलेल्या त्यांच्या चरित्राचा प्रत्यक्ष दाखला पाहिला ! दारापर्यंत जायला, तापलेल्या निखाऱ्यावर चालल्याप्रमाणे, भूमिस्पर्श न करता जवळ जवळ अंतराळात तरंगावें लागे ! पण एकंदरीत रामभाऊंमुळे आलो आपल्या ऐटीत ! दोघेंहि झोप घेतल्यावांचून राहिलो नाही. येथे आलो तेव्हा आमच्या मुद्रेवर प्रवासाची कळा अजीवात नव्हती. खूप गंमत झाली.

पुणें.
२१.५.'५२.

काल तुला एक पत्र पाठविलें. सोलडपुरला पाऊणशेंवर्षांचा जो व्यक्तित्ववान् म्हातारा पाटील भेटला, तो म्हणजे एक मनोरंजक वल्ली किंवा नुसतेंच एक गवर धेंड नव्हतें. त्याने आमच्या कामात बरेंच लक्ष घालून पुढाकारहि घेतला. त्याच्यामुळेच तेथे थोडेसें काम झालें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथून तिसरे प्रहरीं, पण भर उन्हातच पुन्हा रवाना झालो. दादा भाईंना थकवा म्हणून माहीत नाही. महेशबाबूंना आपली अबरू संभाळायची होती. मगनबाबू कोठारी व गोपीकिसन जोशी मागे राहू शकत नव्हते. म्हणून आमचे संपूर्ण टोळके निघाले. पाऊल वाटेनेच चालत होतो. त्यामुळे धुळीचा त्रास झाला नाही.

सुमारे दोन सव्वादोन तासांनंतर रन्हाईला पोचलो. श्री ठाकुरलाल पटेल यांच्या भव्य वाड्यात उतरलो. अनेक वर्षांनंतर दहा दहा घोडे बाळगणारा—आणि तेहि चांगल्यांपैकी व चांगल्या स्थितीत—हौशीमाणूस पाहिला. इतके घोडे पाहून बाबांची (भालबांची) आठवण झाल्यावांचून कशी राहील ?

पोचल्याबरोबर सभा केली. महेशबाबू दादाभाई व मी बोललो. रात्रीं हरद्याला जाऊन भाषण करायचें होतें. तेथून पुन्हा रात्रीं रन्हाईला परत यायचें होतें. म्हणून हरद्याला मोटारनेच जाणें, येणें करायचें ठरलें. पण हरद्याची मोटार आली ती सुमारे ९.४५ ला रात्रीं आली. एक मोठी जीपवजा लष्करी अवजारें वाहून नेण्याची गाडी होती. टांग्याच्या घोड्याप्रमाणे आडत-आडत, थबकत थबकत, हबकत, हबकत चालण्याची तिला खोड जडलेली होती. त्यामुळे ९ ची सभा जाहीर झालेली असूनहि मोटारभवानीला माझ्यापर्यंत पोचायला ९.४५ झाले. १० ला रवाना झालो. मोटारभवानीने पुन्हा आपलें तेंच रंगढंग सुरू केलें. सभेच्या ठिकाणापासून एका फर्लांगावर तिने बैठकच मारली ! आम्ही सभास्थानीं पोचलो तेव्हा १० मिनिटांपूर्वीच लोक कंटाळून घरोघर निघून गेलेले होते. रात्रीं ११ ला सभा रीतसर बरखास्त करून भाषण न करताच परतलो. रागावलेल्या दाईप्रमाणे मोटारने आमची बेसुमार आदळ-आपट केली ! उचलबांगडी करून शाळेत नेतांना उनाड मुलांचीहि कोणी इतकी बेगुमानपणाने आदळआपट केली नसेल कधी ! दमलो-भागलो होतो. तशाहि स्थितीत डुलकी घेण्याचा स्थितप्रज्ञाप्रमाणे आव आणला. इतक्यात भुवईच्यावर कपाळात धाडकन झाडाच्या फांदीचा एक भक्कम सोटा जोराने बसला ! लाठी-माराचा अनुभव मला आला नव्हता. ती उणीव भरून निघाली. तरी पण मी आपल्या चित्ताची साम्यावस्था ढळू दिली नाही !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अगदी टेंकीला आलो होतो. रात्रीं १२ ला परत पोचलो. तों पटेलांच्या वाड्यात 'रामायण' चाललें होतें. शिष्टाचाराची चाड दाखविण्याकरिता म्हणून बसलो. आज पहाटे ४ ला निघायचें होतें. काल रात्रीं अंथरुणावर हाडें टाकायला १ वाजला.

पूर्वयोजनेप्रमाणे पहाटे उठलो. प्रार्थनादि आटपायला ५.३० झाले. मी चांगला पट्टीचा चालणारा आहे. पण कालपासून पावलें, कंवरडे, पाय सारेंच आंबलें होतें. चालणें जिवावर आलें होतें. पण मन शरीराची कुरकुर चालू द्यायला तयार नव्हतें. निघालो. आम्ही काही ज्ञानदेवासारखे नम्र नाही. ज्ञानदेवाला 'आचार्यांसी वाट पुसत पाऊल टाकण्यात कमीपणा वाटला नाही. पण आम्ही पडलो स्वयंप्रज्ञ. आम्हाला आपल्या मौलिकतेचा केवढा ताठा ! आम्हाला 'वाटाड्या' कसा खपेल ? नवीन वाटा पाडणें हें आमचें ब्रीद ! म्हणून आम्ही कणारद्याला जायला म्हणून निघालो आणि थेट विरुद्ध दिशेकडे वळलो ! आम्ही आपल्या प्रापंचिक व सार्वजनिक व्यवहारात अनेकदा असे 'अकलेचे थेर' केलेले आहेत !

माझ्या आणि विनोबांच्या भूदानयात्रेत इतका फरक नसला तर विनोबा विनोबा कसले आणि मी मी कसला ! दरिद्रनारायणाच्या अश्वमेधाचाच घोडा आणि अश्वमेधातील भारवाहू गाढवें व 'लद्दू-तट्टू' यांच्यात काहीच कां फरक नसेल ? विनोबांच्या मानाने आमचें खूर लहान आणि कान वरेंच लांब पडतात.

उद्योगातून फलनिष्पत्ति व्हायला हिरीरीचा त्वेष तरी हवा किंवा धर्माचरणाची सात्त्विक तेजस्वी तळमळ तरी हवी. एरव्ही निष्काम कर्माचें पर्यवसान निष्फळ कष्टात होण्याचा संभव फार. माझ्या अंगीं तपाचें तेजहि नाही आणि शर्यतीच्या घोड्याचा तावहि नाही. त्यामुळे माझ्या अहंकाराचा फुगा फुटला. कल्याणकामना आणि निस्पृहता असली म्हणजे देव अंत पाहत नाही हा अनुभव मात्र आला. तो धारिष्ट पाहतो. त्याच्या कसोटीतहि कृपाच असते.

गाहल.
३०. ५.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल धनवाडघाला आतिथ्याचा कहर झाला. भाज्यांचे पांच द्रोण होते. 'मिरच' नको म्हणून सांगितल्यामुळे सगळचा भाज्यांमध्ये मोहऱ्यांची भुकटी घालून भाज्यांचें लोणचें केलें होतें ! तें चांगलेंच झोंवत होतें. याखेरीज आंव्याच्या पानांची भजी, भज्यांची कढी, फोडणीचें वरण, शिरा, आमरस, दही इत्यादि पदार्थ होतेच ! शरीर आपलें नव्हे अशा अनास्थेने वागत असलो, तरी पोटाच्या बाबतीत तसें करता येईना.

ठरल्याप्रमाणे भर उन्हात निघालो. सारंगपुरला सभा झाली. नांगरलेल्या शेतातून चालावें लागल्यामुळे पायांना दुप्पट चालल्याचें श्रेय मिळे आणि वहाण घालून चालत असल्यामुळे वहाण व तळवा यांच्यामध्ये माती शिरून तळवे हुळहुळे झाले. पिटकुळचा आल्या आणि फुटूनहि गेल्या ! इतका सराईत चालणारा मी ! पण या वेळीं वहाणांनीच दावा साधण्याचें ठरविलें. तरी पण पायांच्या तक्रारीची दाद न घेण्याचें मी ठरविलें. सारंगपुर नंतर चौकडीला येऊन सभा केली. संध्याकाळचे ७.३० झाले. खिडकिया व छीपावड येथे अजून सभा व्हायच्या होत्या. खिडकियाला ८.४० ला पोचलो. गेल्यावरोवर भाषण केलें. पुन्हा पुढे चाललो. ९.४० ला छीपावडला पोचलो. भारतीय संस्कृतीप्रमाणे आधी आतिथ्य मग काम ही परंपरा ठरलेली. त्याप्रमाणे १०.४० पर्यंत जेवण झालें. नंतर १२.१० पर्यंत सभा.

आम्ही पू० विनोबा व जवाहरलालजी यांचा कित्ता समोर ठेवून कार्यक्रम ठरवितो पण त्यांचें तपहि नाही आणि व्यक्तित्वहि नाही ! त्यामुळे अंतराळीं लटकत राहतो. काल खिडकियाची सभा अर्धवटच झाली. छीपावडची वरी झाली. रात्रीं १२.३० नंतर अंथरुणावर पडलो.

आज सकाळीं सुमारे ६½ मैल चालून मांदल्याला आलो. आमराईत मुक्काम ठोकला. दुपारीं २.३० ते ३.४५ पर्यंत शाळेत सभा झाली. दादाभाईंचे व माझें भाषण झालें. सकाळपासून महेशवावूहि आमच्या पथकात सामील झाले. त्यांचेंहि भाषण झालें. पुन्हा ४.५ ला रवाना झालो. ६ /६½ मैल चालून मसणगांवला आलो. मांदल्यालाहि माचक नदी आहे. पण तिच्यात पाण्यापेक्षा खडक व गोटेच जास्त ! तेथे अंघोळ जेमतेमच झाली. येथे मसणगांवला मात्र विहिरीवर मुबलक पाणी मिळालें. आज पायाच्या पुळचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फुटल्यामुळे वरीच तक्रार त्याने केली. पण तेरा मैल चालून आलोच. आता उद्याचा आणि परवांचा दिवस आहे. टप्पे जरा लांवचे असले तरी पाय दगा देणार नाही अशी आशा वाटते. शरीरावर मनाचा जोर चालायला मी काय असा विनोबा लागून गेलो आहे ?

मसणगांव.
३.६.'५२.

तिसरे प्रहरीं वडा अवगांवहून निघून संध्याकाळीं ऐन तिन्हीसांजांच्या वेळीं, नर्मदा किनारीं हंडियाला आलो. सुमारे १७/१८ मैलांचा प्रवास झाला दिवस भरात. पण निघतांनाच इतका प्रवास म्हणजे काहीच नाही, असा आविर्भाव दरेकाने आणलेला होता. या मुली थकतील, आमच्या सोवत्यांपैकीहि एकाद दुसरा गळाठेल, हें मला माहीत होतें. फुशारकीचें किंवा प्रौढी मिरवण्याचें माझें वयहि नव्हतें. तेव्हा प्रवास मलाच जड जाईल, मीच थकेन इत्यादि वाक्यें मी मधूनमधून म्हणत गेलो. मी आपला दुवळे-पणा कवूल करीत गेलो. दुवळेपणा कवूल केला म्हणजे वळ वाढतें असा माझा अनुभव आहे. पण, माझ्या प्रांजळपणाचा फायदा इतर कुणी घेतला नाही. मजल रेटण्याइतका सराव अर्थात् मला आहेच. त्यामुळे न रेंगाळता मुक्काम गांठला.

हंडिया हें गांव इतिहास प्रसिद्ध आहे. पण येथे फक्त नर्मदा-स्नान तेवढें पदरात पडलें. गेल्यावरोवर नर्मदा स्नान केलें आणि नर्मदेच्या जीवन रसाने मधुर झालेलीं अनेक प्रकारचीं खरवुजें चाखलीं. रात्रीं सभा झाली.

नागपूर.
९.६.'५२

हें पत्र मी तुला झांशी स्टेशनावरूनच लिहीत आहे याचें तुला आश्चर्य वाटेल. मलाहि विस्मय वाटत आहे. माझ्या विस्मयात मनस्तापहि भरपूर आहे. माणसाला अपराध कदाचित् टाळता येतील. पण चुका टाळणें त्याला साधेलच असें नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी अगदी सावध राहून रात्रीं १२.३० ला येथे उतरलो. त्यानंतर झोपेचें विनाकारण खोंबरें होऊ नये या मोहाने लखनऊच्या गाडीत जाऊन झोपलो. Train examiner, मुकद्दम, फर्राश, या सगळ्यांनी मला पाहिलें, 'तुम्ही झोपा, गाडी पहाटे ३.४५ च्या सुमाराला सुटेल. आता १.१५ वाजलाच आहे.' असा दिलासाहि दिला. मी झोपलो. सकाळीं ४.४५ ला उठून पाहतो तों झांशी स्टेशनाच्या विशाल प्रांगणात माझा डबा एकीकडे पडलेला ! मी डब्यात आहे हें इतक्या लोकांना माहीत असूनहि माझ्या अस्तित्वाची दखल घेण्याची बुद्धि कोणाला झाली नाही !

परिणाम उघड आहे. लखनऊला थांबता येणार नाही. रात्रींच तेथून पुढे जावें लागणार. उद्या सकाळीं गोरखपुरला पोचेन. तेथे गिरिधारीभय्या नसले म्हणजे आनंदाला पार नाही !

काही माणसांना असामी बनवावें लागतें. काही उपजतच असामी, जन्मसिद्ध अजागळ असतात. त्यात आनुवंशिकतेचा भाग नसतो. तें त्यांचें व्यक्तिगत वैभव असतें. पण ते जन्मजात गफलत बहाद्दर असतात. त्यांपैकी मी आहे. या बाबतीत मी उसनवारी केलेली नाही. त्यामुळे अनुभवापासून बोध घेण्याचें माझें शील नाही !

स्वराज्यात ज्याचा तो मालक. कुणाची जबाबदारी कुणावर नाही. आगगाडीच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातहि दिवे असलेच पाहिजेत याची जबाबदारी कुणावर नाही. अर्थात् स्टेशनमास्तरांकडे काल रात्रींच्या प्रकाराबद्दल तक्रार करूनहि हंशील काहीच झालें नाही. 'मानवी सहानुभूतीचें दूध' मात्र भरपूर मिळालें ! तरी माझें स्वातंत्र्य प्रेम कमी होणार नाही. आणि कोणी मला कितीहि बजावलें, सावधगिरी, चवकसपणा, दक्षता, यांचें कितीहि महत्त्व सांगितलें तरी माझा गबाळग्रंथीपणाहि कमी होणार नाही.

काही गांवांचे आणि माझे ग्रह फारसे जुळत नाहीत. या झांशीला यतिराजांबरोबर कितीदा तरी आलो. पण कधी झोपायला जागा मिळण्याची पंचाईत, तर कधी खायला मिळण्याची मारामार ! आणि कधी कधी तर मोटारच पुढे नेण्याची पंचाईत ! येथे सहानुभूतीला उणीव नाही. पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कार्यक्षमतेचें नांव नाही. भारतीय संस्कृतीचें व स्वराज्याच्या राजवटीचें प्रतीक आहे जणू !

झांशी स्टेशन.
१९.६.'५२.

गोरखपुरच्या स्टेशनावर यशवंत लेले अगोदरच येऊन पोचले होते. त्यांना मी मला गिरिधारी भैयांकडे पोचवून देण्याविषयीं सांगत होतो, इतक्यात भैया लगबगीने येऊन दाखल झाले !

झांशीहून लखनऊपर्यंत अगदी कंटाळून गेलो होतो. झांशीहून निघालो तो लवकरच चिरगांव लागलें. चिरगांवला हिंदीचें सुप्रसिद्ध कवि मैथिलीशरण गुप्त व सियारामशरण गुप्त राहतात. विनोबांच्या भूदानयज्ञावर दोघांनीहि कविता केलेल्या असून सियारामजींनी ईशावास्याचें हिंदी केलें आहे. झांशीचा किल्ला बराच वेळ दिसत होता. झांशी म्हटली की कक्का धुळेकरांची आठवण होतेंच. कक्कांची सून म्हणजे मामांच्या धाकट्या सुनेची वहीण. काटोलच्या पांड्यांची मुलगी.

झांशी, उरई, कालपी हीं गांवें पाहताच 'मर्दानी झांशीवालीं'ची आठवण झाल्यावांचून कशी राहील ? तो किल्ला पाहिल्यावरोवर 'फेकला तटाहुनि घोडा' कवितेचें स्मरण झालें. झांशीच्या राणीची कीर्ति आज दिगंतात व्यापून राहिली आहे. पण त्या सुप्रसिद्ध समरकार्यापूर्वी तिला सभ्य लोक 'धटिंगण' 'दांडगी' वाई समजत असत. तिची ही पुरुषी वागणूक लोकांना आवडत नसे. समाजाच्या प्रचलित रूढींचे उल्लंघन करणाऱ्या वीरांच्या नशिबीं हें लिहिलेलेंच असतें.

कालपीचा तो यमुनेचा सुप्रसिद्ध सुंदर पूल लागला. घनश्यामाच्या श्यामवर्ण कालिंदीचें रूप कालपीला वरेंच साजिरें आहे. पूल तर फारच सुंदर आहे.

सायंकाळच्या पूर्वीच कानपुर आलें. गंगामैयाचा पूल आला. गंगायमुनांच्या 'दोआवा' मधून (अंतर्वेदांतून) वाहेर पडलो. आगगाडीत लोक माझ्याशी वोलतांना म्हणाले, 'आप तो यहीं कानपुर-लखनऊ के आस-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पास ही रहते होंगे ! दोआवा की जबान ही नहीं छिपती जनाब !' मी त्यांना सांगितलें की मी नर्मदेच्याहि दक्षिणेकडला आहे म्हणून. यमुनेनंतर गंगामैया बघितली. दोन्ही पुराणप्रसिद्ध लोकमातांचें पुण्यदर्शन झालें !

आता लखनऊच्या मार्गाला लागलो. उन्नाव आले. हा कनौजियांचा (कान्य कुब्जांचा) मुलूख. कोठे कान्यकुब्जांची ती ताठर, उभी भाषा ! आणि लखनऊची ती थेट दरबारी भाषा ! साधें एकरंगी चढाव जोडे असले तरी त्यांना नकशी असायचीच !

कानपुर ते लखनऊच्या दरम्यान धाकटी लाईन व मोठी लाईन अगदी जवळ जवळ व समांतर आहेत. लखनऊ मेल आणि कानपुर-कटिहार पॅसेंजर या मोठ्या व छोट्या गाड्यांची शर्यतहि बराच वेळ चालली ! मधून मधून तर दोन्ही गाड्या अगदी दोन हातांच्या अंतरावर धावत होत्या !

लखनऊला उतरता आले नाही. झांशीहून तार केल्यामुळे लखनऊच्या मंडळींनी कार्यक्रम ठेवला नव्हता. नाही तर मोठी पंचाईत झाली असती. अगदी कंटाळलो होतो. त्रास मुळीच झाला नाही. पण उगीचच कंटाळतो अलीकडे. लखनऊला गांधी आश्रमाचें महेशचंद्र व कृष्णदास आले होते. त्यांनी उत्कृष्ट चहा आणि टोस्ट मागविला. लखनऊचे प्रसिद्ध आंबे, सफेदेहि होते. लखनऊचा सफेदा, दसरिया आणि तिसरा एक आंबा मोठा प्रसिद्ध आहे. खातांना कोणाची आठवण झाली, सांग पाहू ? मी थांबू शकलो नाही म्हणून त्यांचा फार विरस झाला. मीहि राजा तारेची वहीण इंदु वैद्य हिला व तिचें यजमान डॉ. देव यांना भेटू शकलो नाही.

रात्रीं १० च्या गाडीने निघालो. दुसऱ्या वर्गात झोपायला जागा मिळाली. सकाळीं वस्ती स्टेशनावर चहा मिळाला. सहजनवा स्टेशनानंतर इरावती नदीचा पूल लागला. हा भाग गौतम बुद्धाच्या आयुष्याशी पुष्कळच निगडित मानला जातो.

फणस, आंबे, केळीं, ताड, पुष्कळ आहेत. क्वचित् अननसहि आढळतात. लखनऊप्रमाणेच गोरखपुरचा 'कपूरा' आंबा आणि विहारचा 'मालदा' आंबा प्रसिद्ध आहे. गोरखपुरला भैयांनी लखनऊचा सफेदा व गोरखपुरचा कपूरा मोठ्या आग्रहाने खाऊ घातला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोरखपुरला वगीच्याच्या सडकेवर दोन्हीकडे चिंचाच आहेत हें तू पाहिलें असशील. चिंचांची ही 'ॲव्हेन्यू' मोठी बहारदार आहे; नाही ?

हनुमान प्रसादजींशी परिचय झाला. आम्ही एकमेकांशी मोजके बोललो, बेतावेतानेच भेटलो. त्यामुळे दोघांचेंहि परस्परांविषयीं प्रतिकूल मत व्हायला संधि मिळाली नाही. ते श्रुति–स्मृति–पुराणवादी आणि मी फक्त देवपरायण व जीवननिष्ठ! म्हणून तर भैयांवर माझें इतकें उत्कट प्रेम आहे.

हनुमान प्रसादजी मात्र मोठे शालीन. अगदी गोरखपुरच्या जमिनी-सारखे. त्या जमिनीत दगडाचें नांव नाही. कपडे धुवायला परीट ताडाचें ओंडके अर्धे चिरून वापरतात ! माती भुसभुशीत. वेलच्याने खणता येण्यासारखीं !

रानीपतरा (पूर्णियां)
२१.६.'५२.

●

दुमका हें गांव डोंगराच्या मध्ये आहे. लहानसे व तुटक डोंगर आहेत. हवा मोकळी आणि गार आहे. मी बसलो आहे तेथून हिजला टेकडी दिसते. पलीकडे मयुराक्षी नदी आहे. वारा खूप जोराचा येत आहे. या वेळीं भाताचीं हिरवीं शेतें, मक्क्याचीं शेतें, ताड, फणस, त्रांबू, आंब्याची झाडें आणि मधून मधून डोंगर व पावसाळी नद्या यांमुळे दृश्य मोठें रमणीय आहे. सगळ्यात उंच डोंगर त्रिपुटीचा आहे. पण सगळ्या तुरळक टेंकड्या, रांग म्हणून नाही. छान दृश्य आहे. अर्थातच इगतपुरीची सर नाही येणार. देवघरच्या इतकी उत्तम हवा नसली तरी हवा चांगली आहे.

दुमका.
१२.७.'५२.

●

दुपारीं 'नौलाखिया बालकृष्ण मंदिर' पाहिलें. हें देऊळ चारुशीला राणी नांवाच्या एका मातबर विधवेने तिच्या पतीच्या स्मरणार्थ बांधलें आहे. त्याचें नांव 'यतींद्र स्मृति' असें ठेवलें आहे. नऊलाख रुपये खर्च आला. देऊळ कथ्था रंगाच्या दगडाचें आहे. चुनारचा हा दगड दिल्लीच्या राजभवनाच्या दगडाच्या रंगाचाच आहे. कोंकणच्या जांभा दगडाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रंगाचा नव्हे. याच प्रकारचीं दोन अर्वाचीन देवळें म्हणजे बेलूर (कलकत्ता) व सारनाथ (बनारस) येथील. त्या देवळातहि साधेपणात सौंदर्य साधलें आहे. देवघर येथील देवळात कलात्मकता अधिक आहे. घुमट आणि खांब जास्त सुंदर असून, सभामंडपहि मोठा शोभून दिसतो. एकंदरीत देऊळ पाहून मनावर सहजसुंदरतेची छाप पडते.

देवळात सगळीकडे मातृत्वाचीं प्रतीकें आहेत. मेरी आणि ईशू यांच्या आकृतीच्या धरतीवर भिंतीवर आई-मुलांचीं उठावदार चित्रें आहेत. आत एका भागात बालकृष्णाची लहानशी मूर्ति 'गोकुळात' मांडलेली आहे. दुसऱ्या कप्प्यात बाल-ब्रह्मचारी यांचा रामकृष्ण परमहंस देवांच्या मूर्ति एवढी शुभ्र संगमरवरी मूर्ति आहे. या बाल ब्रह्मचारी महाराजांच्या मठाच्या विस्तृत आवारातच मठाच्या पुष्करणीसमोर हें देऊळ आहे. मठात कालीमातेचें मंदिर, हवनकुंड, शिवालय, संस्कृत विद्यालय, वसतिगृह, ब्रह्मचारी महाराजांची उपासना करण्याची इमारत, गोठा इ० इ० सुंदर इमारती आहेत. हवनशाळेत त्यांची रंगीत प्रतिमा आहे. त्यांच्या उपासना मंदिरात त्यांची समाधि, पादुका व खूप मोठी तसबीर आहे. त्यांची एक बिनशिंगाची अगदी खुजी करडचा रंगाची गायहि आहे. महाराजांना लागेल त्या वेळीं तिचें दूध मिळे म्हणून तिला 'कामधेनु' म्हणतात. देवळाच्या समोर सडकेपलीकडे चारुशीला राहतात. त्यांची हवेली आणि खासगी देऊळ तेथे आहे.

सकाळीं ७-५० ला मनसीहून आगगाडीने निघालो. आगगाडी कोसीच्या तिसऱ्याधारेपर्यंत कशी बशी आली. पुढे रेल्वे लाईन पाण्याखाली आहे. कोसीचें पाणी दाही दिशात पसरलेलें आहे. नावेखेरीज दुसरें वाहन नाही. बैलगाडी, घोडा, मोटार, काही चालू शकत नाही. बर्ढेयाचा ताल प्रदेश दहा बारा कोसांचाच आहे. येथे कोसीच्या असंख्य धारा आहेत. त्यांपैकी दोनच आगगाडीने ओलांडल्या. गांवेंच्या गांवें बेटें झालीं आहेत. गंगेत आणि कोसीत स्टेशनांकरिता खोप असतें — एकेका कप्प्यात रेल्वे अधिकारी राहतात. आम्हाला पुढे जायला ट्रॉली मिळेना. सरकारी अधिकाऱ्यांचा दौरा होता. त्यांनीच आम्हाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बसवून घेतलें. पाण्याखाली अदृश्य झालेल्या रूळांवरून गुडघा-गुडघा, कंवर-कंवर, पाण्यातून ट्रॉली चालली. पांच-सात ट्रॉल्या चालल्या. जेथे पाण्याला वेग असे तेथून कंवर-कंवर पाण्यातून कडेवर, खांद्यावर मुलें घेऊन पायी जाणाऱ्या स्त्रियांचे पाय लटलटतांना पाहिले म्हणजे त्यांच्याप्रमाणेच ध्वजावावूंची व माझीहि तिरपिट होई. जिकडे तिकडे पाणी आणि मध्ये जोराची धार ! काही ठिकाणीं ट्रॉल्या व सामान नावेवर ठेवावें लागे. काही ठिकाणीं फक्त सामान व आम्ही नावेवरून येत असू आणि ट्रॉल्या नुसत्याच पाण्याखाली दडलेल्या रूळांवरून येत. एके ठिकाणीं अत्यंत तीव्र धारेत ट्रॉली रूळावरून घसरली. काढायला चार-सहा तास लागतील. तेथे गळा गळा पाणी आहे, धारेचा वेग बघवत नाही, दोन्हीकडे डोह आहेत. दोन मोठाले पूल ट्रॉलीने ओलांडावे लागतात. एक सुमारे अर्धा मैल अतिशय अरुंद पूल आहे. कठडा नाही. त्यावरून अंगावर मुलें घेऊन बायका चालतात. ट्रॉलीवरून जातांनाच तर खालील पाण्याचा वेग पाहून पूल हलत असल्याचा भास होतो. 'कोसी रानी की जय' म्हणत लोक भीत भीत ओलांडतात. 'कोसी रानी' बरे का ? 'कोसीमाई' नव्हे ! माझ्या मनू, तू या वेळीं कां नाहीस ?

कोसी रानीची लीला गुलहौसी लोकांना व श्रमिकांनाहि मानवते. रात्रीं व दिवसा नावेतूनच सारे व्यवहार करीत मोठ्या आनंदाने विलासी लोक विहार करतात ! जेथे कोसी उच्छाद करते तेथे मात्र लोक तिला शिव्या शाप देतात. ती सुखसंपत्ति, धन-धान्य आणि तरुण जीव सगळ्यांचें हरण करते.

शेवटीं सुमारे अर्धा मैल पायी चालून सहरसा जवळचें स्टेशन गांठलें. याच सहरश्याला मागे मी व ध्वजावावू दोन दिवस अडकून पडलो होतो. शेवटीं विमानाने गेलो. तेंहि आता उतरू शकत नाही. टपालदेखील ट्रॉलीने व नावेने येते. भिजलें तर भिजलें. पण टपालापेक्षा किती तरी पटींनी मोलाचें जीव दगावतात. आजच दोन महिन्याचें मूल आईच्या कडेवरून धारेत पडलें. लोक धावून गेले. पाणीहि खोल नव्हतें. त्यामुळे खैर झाली. पाऊसहि नव्हता हें सुदैव !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिसायला तेवढें दृश्य फारच रम्य आहे. म्हशी आनंदाने फुगून उन्मत्त होत आहेत. पण बढैयाप्रमाणे येथील गाई-बैल मात्र पुष्ट नाहीत. दिवसा व रात्रीं नौका-विहाराची मोठी मौज आहे. वांबूच्या खोपींचीं हंगामी स्टेशनें कोसीच्या पाण्यात अर्धी अधिक गडप आहेत.

मनसी ते धमारा आगगाडी, धमारा ते कपडिया ट्रॉली, नाव व पायीं, कपडिया तें पंचगछिया स्टेशन पुन्हा आगगाडी, स्टेशन ते पटौडी हत्तिणीवर— अशा रीतीने वाहनें बदलत पटौडीला पोचून तडक सभेत येऊन बसलो.

मनसी स्टेशन.
१४.७.'५२.

पहाटे प्रार्थनेनंतर सामुदायिक प्रार्थनेची महती व प्रार्थना, प्रयत्न आणि सेवा यांतील अभेद या विषयावर प्रवचन केलें. नंतर ध्वजाबाबूं-बरोबर कालच्याच हत्तिणीवरून निघालो. ही हत्तीण एकाला आंदणात मिळाली आहे. सासऱ्याने चांगलाच सूड घेतला जांवई बापूंचा ! नाही ? विचारा खुराकदेखील घालू शकत नाही.

आम्ही कठड्यावांचूनच तिच्या पाठीवरील गादीवर बसलो होतो. काल एका खोंपटाच्या वांबूला माझा पाय अडकला होता. पण दुखापत नाही झाली. आज सकाळीं बोरीच्या झाडाला टोपी अडकली, सदराहि थोडासा फाटला. लागलें मात्र मुळीच नाही. पंचमढीला तुझे केस झाडाला अडकले होते त्याची आठवण झाली.

कोसी रानीच्या या प्रदेशाला 'कोसीप्रपीडित प्रदेश' म्हणत असले तरी पंचगछिया व पटौडी भागावर तूर्त तिची कृपा दृष्टि आहे. तिचा जनक हिमगिरीहि एकाद वेळीं लांब उत्तरेकडे डोकावत असल्याचा भास होतो.

हत्तिणीवरून दीड तासात चार मैल पंचगछिया स्टेशनावर आलो. ती धावली तरी गति काही वाढली नाही. पंचगछियाहून कपरियापर्यंत आग-गाडीने आलो. कपरियापासून पुन्हा आळीपाळीने ट्रॉली व नाव. आज पाणी वाढलें होतें. हंगामी स्टेशनांच्या खोपींचा अर्धा भाग पाण्यात होता. गंगेत व कोसीत हीं हंगामी स्टेशनें गवताचीं व बांबूचीं असतात. धमारा घाटापासून खास ट्रॉलीची परवानगी काढून ट्रॉलीने येथे आलो. एरव्ही मेल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गांठता आली नसती आणि खगडियाचा कार्यक्रम चुकला असता. कोसी राणीने मेहरबानी केली. पावसानेहि खैर केली.

मानसीहून काल ५.१० ला निघून ५.३२ ला येथे आलो. संध्याकाळीं जाहीर भाषण झालें. गर्दी खूप होती. खेड्यापाड्यातील लोक जमले होते. दीड तासपर्यंत लोकांनी तल्लीनतेने भाषण ऐकलें.

रात्रीं खादी-भांडारात गंडक नदीच्या अगदी कांठावर झोपलो. घराचा मागला भाग नदीच्या पाण्यातच आहे. खिडकीतून नदीचें पाणी दिसत होतें आणि गार वाऱ्याची झुळूक येत होती.

लोकांचा आग्रह कायमच आहे. 'हुजुर हमारे यहां भी कभी आया जायं !' जो तो म्हणतो. येथे कर्मणि प्रयोग व भावे प्रयोग आदरार्थी फार प्रचलित आहे. मराठीत 'आपण यावें', 'जावें' हा प्रयोग आहेच. पण त्याहि पेक्षा वायको 'तिकड'च्याविषयीं 'तिकडून यायचें झालें,' 'इकडे यायचें म्हटलें,' 'जायचें म्हटलें,' असा जो प्रयोग करते, त्यासारखा विहारचा प्रयोग आहे. 'आया जाय,' 'यावे,' 'क्या अब जाया जायगा ?' आता जायचें होईल का ?' अशासारखें हे प्रयोग आहेत. विनोवा म्हणतात गुजरातीत कर्मणि प्रयोग फार आहे. विहारी हिंदीतहि कर्मणि व भावे प्रयोग आहे आणि तोहि विध्यर्थ आहे.

समष्टिपुरला जायचें म्हणून पहाटे ३ ला उठलो. स्टेशनावर आलो. गाडी दोन तास तरी उशिरा येणार. मुळतापीच्या गाडीपेक्षाहि ही गाडी स्वच्छंदी आहे. चहा मागविला. चहा चांगला मिळणें मोक्षाइतकेंच कठिण ! चहाच्या नांवाखालीं जीं पेयें मिळतात त्यांच्यामुळे अस्वाद वृत्तीचा चांगलाच अभ्यास होतो. चहा इतका प्रचलित आहे. पण इतकें मचूळ आणि भयंकर पेय दुसरें मिळणार नाही. चहाचा मी गुलाम नाही बनलो. पण आता त्याचीहि 'गडी फूं' करण्याची कल्पना वारंवार मनात येते.

आज समष्टिपुरला सुमारे १०—११ ला सकाळीं सभा होईल. नंतर दुपारीं निघून दरभंगा. संध्याकाळीं दरभंग्याला भाषण. पुढला कार्यक्रम तुला पाठवून दिलाच आहे. गाड्या वेळेवर आल्या—गेल्या तरच सगळा कार्यक्रम साधेल. एरवी फक्त दगदग तेवढी पदरात पडेल !

खगडिया स्टेशन

१५.७.५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सहरसा जिल्ह्यात कोसीचा दरारा आहे तसा या भागात कमला नदीचा आहे. मोठ्या शीघ्र कोपी! तशाच आशुतोष! कमलेचें पाणी सगळीकडे माजलें आहे. कित्येक गांवांचीं बेटें झालीं आहेत. फक्त दिवसा-पुरती माणसें नावेंतून आपापल्या घरीं जातात. एरव्ही मोठ्या गांवात राहतात. काही मोठ्या गांवात सगळे व्यवहार नावेने करावे लागतात. बर्हिर्दिशेला देखील नावेतून जावें लागतें. कोसीप्रमाणेच कमलेला आंबा-फणसाचें वावडें आहे. आणखी एक साम्य आहे. पंचगछिया सुख वस्तु विलासप्रिय सरंजामदारांचें गांव आहे. खाण्यापिण्याची चंगळ. गाण्याच्या मैफलींची रंगत. परवा सकाळीं ज्यांच्याकडे न्याहारी केली. त्यांनी अगदी महालक्ष्मीच्या जेवणाचा बेत केला होता! त्याचप्रमाणे दरभंगा म्हणजे मैथिली ब्राह्मणांचा 'स्वदेश.' 'झा' लोकांचाच भरणा! रामानंद झाहि इथलाच! मैथिली ब्राह्मण मोठे भोजनवीर। दहीं-चूडा तर हवाच. बारा बारा शेर दहीं – घट्ट व मलईचें – एका बैठकीला झोडतात. वर पुन्हा बकरा-मासळ्या आहेतच! अर्थात् 'शांभवी'ची गुंगी पाहिजेच. श्रीमंत जमीनदार व भोजनपटु ब्राह्मण यांचा हा मुलूख! या वेळीं पुष्कळसा कमलेने जलाक्रांत केला आहे!

मागे याच मधुवनीला गाढवांच्या गाडीतून माझी 'धिंड'– नव्हे मिरवणूक काढली होती. या पाळीला जरा-जर्जर मोटारीतून आलो. गाढवांची जुळी वहीण शोभते.

येथे बिहार खादी समितीचें मुख्य केंद्र आहे. खादीचें हें आगर आहे. येथे खादी निवासातील लोकांसाठी एक व एक सार्वजनिक असे दोन कार्यक्रम होतील. नंतर रात्रीं पुन्हा आगगाडी. प्रदेश मोठा प्रसन्न दिसतो! क्षितिजापर्यंत पसरलेलीं सपाट हिरवीं शेतें, वेळू, ताड, शीशम, फणस, लीची, आंबे, वड, पिंपळ इत्यादि झाडें आणि सर्वत्र लहान लहान 'पोखरे' आणि आसमंतात झालेलें कमलेचें पाणी! व्हेनिसचा व श्रीनगरचा थाट बिहारात आहे. समोर कदंबांचीं फुलें फुललेलीं आहेत. पिंवळ्या लोकरीचे चेंडू.

आगगाडी.
१७.७.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मधुवनीला अंथरुणातील कपडेहि धुऊन घेता आलें. अंघोळीला बंद खोली मिळाली. खादी समितीच्या इमारतींच्या भोवताल कमलेच्या पुराचें पाणीं नव्हतें. दोन कदंबाचीं झाडें मात्र समोरच पिवळघा लोकरीच्या चेंडूसारख्या फुलांनी नटलेलीं मोठी मनोहर दिसत होतीं.

तिसरे प्रहरीं लहान मुलांची 'बुनियादी शाळा' पाहिली. त्यांच्या प्रार्थनेत सामील झालो. थोडेंसें भाषण केलें. दिल खोलून बोललो.

रात्रीं आगगाडीने निघण्याऐवजी मोटारीने निघालो. मध्ये एका ओढचावर नवीन पूल तयार होत होता. बाजूने वाट काढली होती. ती इतकी बाईट की आमची जीप चिखलात व पाण्यात रुतली ! दोन तास त्या अंधारात जंग जंग पछाडले, जीप काही निघेना ! शेवटीं दोन तासानंतर बैलांच्या मदतीने एकदाचा उद्धार झाला. आम्ही रात्रीं १२.३० ला दरभंग्याला पोचलो. १२. २० ची गाडी अजून स्टेशनात होती. ती गांठली. दुसऱ्या वर्गात झोपलो.

सकाळीं रकसोल जंक्शनच्या पूर्वीच उठलो. उत्तरेकडे निळ्या डोंगरांची रांग क्षितिजाच्या या टोंकापासून त्या टोकापर्यंत पसरलेली होती. जरा वेळाने सूर्यांचें किरण फांकलें. नगाधिराजाचीं हिमाच्छादित शिखरें एकामागून एक हिरण्य कांतीने विलसू लागलीं. त्या अनुपम शोभेने सारें क्षितिज व्याप्त झालें. त्या दिशेने जिकडे बघावें तिकडे तीं सोनेरी हिममय शिखरें ! ती शोभा कोण वर्णन करणार ? कशी वर्णन करणार ? अद्‌भुत सुषमा !

काही शिखरें पाहून शाळिग्राम शिळेच्या कोंदणात बसविलेल्या स्फटिक शिवलिंगाची आठवण होई. काही भाग नर्मदेच्या निळ्या पाण्यात आरसपाणी दगडांचें डोंगर प्रतिबिंबित झाल्याचाहि भास होतो. समुद्रामध्ये संगमरवरी पांढऱ्या शुभ्र प्रासादांची व मंदिरांची रांग उभारल्याची कल्पना होते !

नरकटिया गंजला गाडी बदलायला उतरलो. हिमवान् अगदी समोर होता. डोळे भरभरून त्याचें भव्य दिव्य सौंदर्य पीत होतो. पण तृप्तिमात्र होत नव्हती. माझे मनू, तुला मी ती शोभा दाखवू शकलो असतो तर डोळ्यांचें पारणें मात्र फिटलें असतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शेवटीं नरकटिया गंजाहून दक्षिणेकडे निघालो. हिमवंताकडे पाठ फिरली. सुमारे १०.२० ला वेतियाला पोचलो. तेथून जीपने वृंदावन-हें विहारातलें वृंदावन — येथे गेलो. याच ठिकाणीं १९३९ सालीं गांधी सेवा संघाचें संमेलन झालें होतें. आश्रमातून समोरच हिमगिरी आता पांढरा बुरखा घेतलेला होता. पण ढगांच्या पांढऱ्या बुरख्यातून तीं रूपेरीं शिखरें डोंकावत होतींच. आज भाग्याचा दिवस. सकाळीं उठल्यापासून देवतात्म्याचें दर्शन घडत होतें !

जवळच कुमार बाग आहे. या आमराईचा विस्तार दोन मैलांचा आहे. १९३९ सालीं येथे प्रदर्शन भरलें होतें. त्या वेळीं तुमची आई बरोबर होती. त्यानंतर १९४१ सालीं येथे आलो होतो. तेव्हा ती नुकतीच तुरुंगातून सुटून आली होती. बिहारात आली नव्हती. पण वृंदावनला आलो म्हणजे तिची आठवण होते. त्या दिवसांची स्मृति ! तें स्मृतिशेष झालेलें मधुर जीवन ! पोरी, ती व्यथा सांगायला का हवी ?

कर्मठपणा व तपाचरण या गुणांची माझ्यामध्ये उणीव आहे. तुमची आई मोठी बाणेदार. ती इरेस पेटून काम करते. तुरुंगात व बाहेर माझ्यापेक्षा जास्त आणि माझ्यापेक्षा चागले कांतणारी. पण तिच्या तीव्रतेत जोम असला तरी निष्ठेचा अभाव होता. त्यामुळे त्या तपाचा ताण पडला. तें उभरलें.

वृंदावनला कार्यकर्त्यांपुढे दुपारीं भाषण केलें. अंमळ निराळ्या धरतीचें. रात्रीं बेतियाला येऊन जाहीर भाषण केलें. अधिक खुलासेवार, अधिक विशद अधिक प्रभावशाली त्याच त्या मुद्याचीं, त्याच त्या क्रमाने, त्याच त्या भाषेत इतकी पुनरावृत्ति मी आयुष्यात केली नसेल ! पण शेवटीं मी काही यंत्र नव्हे. कितीहि प्रयत्न केला तरी दर ठिकाणीं काहीतरी नवीन सुचतेंच ! तरी पण अगदी निष्ठापूर्वक महारुद्राप्रमाणे त्याच त्या भाषणाचीं आवर्तनें करीत आहे.

आगगाडी.
१९.७.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल सुगौलीहून सायंकाळीं ४.६ ला निघून ४.४२ ला मोतीहारीला पोचलो. सायंकाळीं जाहीर भाषण झालें. असें भाषण कधी झालेंच नाही, भले भले लोक उद्गारले. चंपारण म्हणजे बापूंच्या चळवळीचें प्रथम क्षेत्र. लोक अगदी भान विसरले. बिहारचे लोक तू म्हणतेस त्याप्रमाणे 'विनयशील, सौम्यप्रकृति व कष्टाळू' नाहीत. तसे राजेंद्रबाबू आहेत. हे दिसायला साधे सुधे पण बुद्धीने चांगले तीक्ष्ण आहेत. श्रद्धावान् आहेत आणि पराक्रमीहि आहेत. माझ्यावर त्यांची विलक्षण ममता आहे. समाजवादी तर अगदी मंत्रमुग्ध होऊन जातात.

नेपाळमध्ये अगदी आपल्या सीमेवर कम्यूनिस्ट प्रक्रियेचें अकांड तांडव चालू आहे. तीन-तीनशें; चार-चारशें लोकांचें टोळकें धाड घालतें. जो श्रीमंत ताठर असेल त्याच्या अंगावर उकळतें पाणी ओततात. सत्तावादी राजकारणी मुत्सद्दी निशेत गुंग आहेत, नेपाळच्या कार्यकर्त्यांवर मोतीहारीच्या भाषणामुळे खूप परिणाम झाला.

मोतीहारीला डॉ. लंबोदर मुकर्जीकडे उतरलों. या गृहस्थांचें चरित्र अद्भुत रम्य आहे. कित्येक वर्षे तुरुंगात गेलीं. सहकुटुंब, सहपरिवारें, गडी माणसांसह तुरुंगात काळ गेला. दोन मुली तुरुंगाच्या अन्नावर वाढल्या. घरीं पाहुण्यांची जितकी गर्दी तितकेंच आतिथ्य विशाल! मोतीहारीला स्थानबद्ध केलें. पोलिसांनाच औषध द्यायला सुरवात केली. यश आलें. डॉक्टर म्हणून बस्तान बसलें. ध्वजाबाबूंचे मित्र आहेत. ध्वजाबाबू जुन्या क्रांतिकारकांपैकी. बॉम्बवाल्यांच्या गटांतले, कटांतले. रोमहर्षक जीवनाचा अनुभव त्यांना आहे. त्यांचे जुने सोबती भेटतात. मला म्हणतात, तुझ्या शब्दांत जादू आहे.

सकाळीं निघून १०.१० ला मुझफ्फरपुरला आलों. खुदीराम बसूने पहिला बॉम्ब सगळ्या भारतात येथेच टाकला. ध्वजाबाबू शाळेत होते. त्यांनी खुदीरामला कचेरीकडे जातांना पाहिलें होतें. येथे त्याचें स्मारक उभारलें आहे. बिहार खादी समितीच्या वसाहतीत उतरलो आहे. शौच-कूपातदेखील माशी नाही. लक्ष्मीबाबूंच्या बिऱ्हाडी मुक्काम आहे. केळ्यांच्या पोळ्या, वडे इत्यादि जिन्नस त्यांच्या मुलीने करून घातलें. खादीसमितीच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खास वसाहती वगळल्या तर सुगौली इतकी स्वच्छ जागा उतरायला क्वचितच मिळाली. सुंदर पुष्करणीच्या किनारीं टुमदार इमारत. तेथे करटुल्यांची भाजी मिळाली. तुमच्या आईच्या आवडीची. खातांना गळा दाटून आला! लंबोदर बाबूंकडे पिकल्या केळयांची भाजी, रसगुल्ले, बंगाली खुसखुशीत परांठे खातांना हिंगणघाटच्या डॉ० मझुमदारांच्या अकृत्रिम प्रेमाची आठवण झाली आणि आठवण झाली माझ्या मनिटलीची! मग घांस खाली कसा उतरावा?

मुझफ्फरपुर.
२०.७.'५२.

मुझफ्फरपुरला बूढीगंडक आहे. पुढे बागमती लागते. गंडकचें आणि बागमतीचें पाणी कित्येक मैलांपर्यंत पसरलें आहे. त्या पाण्यातच गांवें व शेतें आहेत. भूकंपापासून बागमतीचें पात्र अजीबात बदललें आहे. बिहारमध्ये कित्येक ठिकाणीं भूकंपामुळे हवापाण्याचे गुणदेखील बदलले आहेत. पूर्वी गळा फुगण्याचा आजार ज्या भागात फार होता, त्या भागांतून तो कमी झाला आहे.

सीतामढीला लखनवती नदी आहे. तिचें लक्ष्मणा नांव ठेवून देण्यात आलें. गांवापासून दोन मैलांवर जनकाला जेथें नांगर चालवितांना सीता सांपडली तें ठिकाण आहे. आता तेथें एक देऊळ उभारलें असून त्या देवळाच्या मागें एक लहानसें तळें आहे. तें सीतेचें जन्मस्थान मानलें जातें. गांवात जन्मस्थानाचें मंदिर आहे. पण तें खरें जन्मस्थान नव्हे.

सीतामढी म्हणजे जनकपुर नव्हे. जनकपुर तेथून २५ मैलांवर नेपाळात आहे. सीतामढीला रामनवमीचा उत्सव होतो; येथे पीठ चाळण्याच्या बांबूच्या बारीक चाळण्या व बाटोळीं सुपें मिळतात. तीं यात्रेकरू घेऊन जातात. सीतामढीहूनहि नगाधिराजाचें स्पष्ट दर्शन घडतें. रकसौल, नरकटिया गंज, वृंदावन व सीतामढी इतक्या ठिकाणीं त्याचें दर्शन झालें. आधी ३.४५ ते ४.३० Co-operative Society च्या सभेत भाषण केलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सायंकाळीं सीतामढीला ५.३० ते ७ जाहीर भाषण झालें. नंतर सत्यदेवबाबूंकडे जेवण झालें. जुने जमीनदारी थाटाचें घुमटांचें घर आहे. शरीरहि गोल घुमटासारखेंच आहे.

रात्रीं ११.४५ ला मुझफ्फरपुरला परत पोचलो. हाडें टाकलीं. सकाळीं पुन्हा आगगाडीत बसलो. सुमारे ९ वाजता सोनपुरला पोचलो. येथे नारायणी-गंगा संगम आहे. ही नारायणी म्हणजेच खरी गंडक. दृश्य भव्य आहे. सोनपुरच्या मेळ्यात हत्ती-उंटापासून तों शेळ्यांपर्यंत जनावरांचा देशात सर्वात मोठा बाजार भरतो. या सोनपुर स्टेशनचा प्लॅटफॉर्म आशियात सर्वांत लांबीचा प्लॅटफॉर्म आहे.

११-३० ला छपऱ्याला आलो. लक्ष्मीबाबू व ध्वजाबाबू यांचे सहाध्यायी प्रि. मनोरंजन यांच्याकडे मुक्काम आहे. गृहस्थ कवि आहेत. बापूंच्या पहिल्या चळवळीत त्यांच्या सभांतून स्वकृत पदें म्हणत असत. रसिक आहेत. माझें भाषण ऐकून म्हणाले, 'कविता आप बोलते हैं। हम तो तुकबंदी करते हैं।' बरोबरचीं माणसेंहि म्हणालीं. आजचें भाषण काही औरच रंगलें. लक्ष्मीबाबूंचे पुतणे गयेला प्रिन्सिपॉल आहेत. या प्रिन्सिपॉलप्रमाणेच तेहि म्हणाले होते की 'बडेबडे विद्वानोंके भाषण सुने। लेकिन ऐसा नहीं सुना !'

दुपारीं कार्यकर्त्यांच्या सभेत दीडतास भाषण केलें. सायंकाळीं जाहीर भाषण १। तास झालें.

छपरा
२१.७.'५२.

छोटा नागपुर आदिवासियांचा प्रदेश आहे. सृष्टि-सौंदर्य चांगलें आहे. रस्ते उत्तम. दामोदर नदी ही या भागाची गंगा आहे. खनिज संपत्तीच्या दृष्टीने युरोपात जसा रूर तसा हिंदुस्थानात हा भाग. सोनें व चांदी खेरीज करून सारें काही सांपडतें. टसरचें कापड गयेपेक्षाहि जास्त प्रमाणात होतें. बंगाली-बिहारीवादाचें कुरुक्षेत्र आहे हें. बंगाल म्हणतो, आमची कामधेनु हिरावून घेतली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दरेक गांवात सार्वजनिक उपासनेचा एक गवती मंडप असतो. त्याला 'हरमेला' (हरिमेळा) म्हणतात. उडीसाप्रांतात त्याला 'भागवतघर' म्हणतात. आसामातहि दर गांवीं असा मंडप असतो. 'ठाकुरवाडी' निराळी. गुजरातेत ज्याप्रमाणे 'हवेली' देवळाला म्हणतात त्याप्रमाणे इकडे 'ठाकुरवाडी' म्हणतात.

पुरुलियात देशबंधुदासांचें एक घर आहे. त्यांच्या पत्नी वासंतीदेवी मधून मधून येऊन राहतात. गांवाच्या मध्यभागीं एक तळें आहे. तळयात हिरवीं बेटें असल्यामुळे मोठी शोभा दिसतें. याच तळयाचें पाणी पितात. नांव मात्र मोठें गमतीचें — साहिबबांध. दुसऱ्या एका तळयाला नाझिरबांध नांव आहे.

हा मानभूम जिल्हा 'हिरण्यगर्भ' आहे. पृथ्वीच्या पोटात अमाप संपत्ति सांठवलेली आहे.

काल सायंकाळीं ६.४५ ला निघून रात्रीं १०.१५ ला येथे पोचलो. या भागाला 'सिंगभूम' म्हणतात. ही भूमिहि हिरण्यगर्भा आहे. सीमेंट, कोळसा, चीनीमाती इत्यादि संपत्ति तर आहेच. पण 'सुवर्णरेता' नदीहि आहे. तिच्या वाळूंतून मोठ्या श्रमाने गरीब 'हो' लोक सोनें काढतात. चहुंबाजूला डोंगराची 'छबी' काही 'न्यारी' आहे.

सकाळीं निश्चितपुरला बेसिक स्कूलमध्ये जाऊन आलो. मुलांशी उद्बोधक संभाषण केलें. लाठा, टसर इत्यादीचें कापड उत्तम विणलें जातें, 'मुकटा'ची उपपत्ति लक्ष्मीबाबूंनी सांगितली. किडा 'मुंह' कापून निघून जातो. म्हणून 'मुंहकटा' किंवा 'मुकटा' रेशीम. दुसरेहि तसेंच 'कटा' म्हणून रेशीम आहे.

नद्यांची नांवेंहि गमतीची. 'संजय' 'ब्राह्मणी' अशी नांवें. विनोबा विहार-मध्ये 'कर्मनासा' ओलांडून येणार आणि उडिसांमध्ये 'वैतरणी' ओलांडून प्रवेश करणार. तुलसीदासांनी म्हटलें आहे जो 'हरिविमुख' असेल, त्याला 'विबुधनदी'हि 'वैतरणी' होऊन जाते. याचाच अर्थ असा की जो 'हरिपरायण असेल त्याला 'वैतरणी'हि 'विबुधनदी' होते आणि 'कर्मनासा'हि 'मोक्षदा' ठरते.

सकाळीं १० ला कार्यकर्त्यांची सभा. तिसरे प्रहरीं १६ मैल जाऊन चायबासाला भाषण. चायबासा हे 'कोसा' रेशमाचे मुख्य केंद्र. संध्याकाळीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परत चक्रधरपुरला जाहीर भाषण. रात्री मुक्काम. सकाळीं जमशेदपुर. इकडे पावसाचा कहर आहे. तीस वर्षांत अशी सरवत्ती झाली नाही म्हणतात. सारखा पाऊस आहे आजहि.

लक्ष्मीवावू मुग्ध आहेत. म्हणतात, "दरवेळेला काहीतरी खास सांगताच ! कार्यकर्त्यांपुढे १ तास वोललो.

पुरुलिया, चक्रधरपुर.
२७ / २८. ७.'५२.

सकाळीं तुला पत्र लिहिल्यानंतर जिल्हा काँग्रेसचें अध्यक्ष परसरियाजी वावूलालजी तिवारी व गांधी आश्रमचे व्यवस्थापक रामदत्त शर्मा यांच्या वरोवर मोटारने ताल वहटला जायला निघालो. सुमारे २६ मैल गेलो. पण वेतवेने अडविलें, जोरात होती. जोम वाढतच होता. तेथील लोकांत विधायक कार्याविषयीं गोडी आहे. अडकित्त्यांचा माझा आवडता ग्रामोद्योग तेथे चालतो हें मी तुला लिहिलेंच आहे. म्हणून मुद्दाम तालवहट निवडलें गेलें. पण ही वेतवा आडवी आली. मागेहि तिने आम्हाला असेंच मुद्दामपणें अडविलें होतें. त्या वेळीं यतिराजांची मोटार झांशी ते हुशंगावाद आगगाडीने पाठवावी लागली होती. ही वेगवती अशा वेळीं 'लोकमाता' नव्हे, 'विमाता' वाटते.

तेथून परतल्यावर २.३० वाजता मानसरोवर नांवाच्या एका महागड्या हॉटेलमध्ये जेवलो. 'ऊपरकी टामटीम !' नंतर धुळेकरांच्या आयुर्वेद विश्वविद्यालयात भाषण केलें. तेथील रजिस्ट्रार म्हणाले, 'इतका गहन व सूक्ष्म विषय इतक्या सुलभ मार्मिकतेने व गंभीर मनोज्ञतेने मांडलेला यापूर्वी ऐकला नव्हता !' सगळ्याच कॉलेजातील प्राध्यापक म्हणाले, 'आमच्या कॉलेजात इतकें सहज उद्‌वोधक भाषण पूर्वी झालेंच नाही.' कालपासून आठ-नऊ भाषणें केलीं. एका शब्दाची अगर वाक्याची पुनरुक्ति केली नाही. वुद्धिवान्, हृदयवान् व क्रियावान् सर्वच म्हणू लागले, "जी नहीं अघाता. तवीयत नही भरती. चरणों में लोटने को जी चाहता है।" सियाराम शरण गुप्त हिंदीचे प्रथितयश कवि व साहित्यिक, म्हणाले, 'ये हिंदीवाले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाषा और शैली आप से क्यों नहीं सीखते ?' अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य पुन्हा गळ घालून गेले. पण दुसऱ्यांदा जाण्या इतकी संवडच झाली नाही.

संध्याकाळीं श्री लक्ष्मी व्यायाम मंदिरात भाषण केलें. व्यायामाच्या मार्फत सांस्कृतिक व आत्मिक विकास हा विषय घेतला. समोर 'झांशीवाली' चा भव्य पुतळा होता, तेव्हा वीरवृत्तीचेंहि विवेचन ओघालाच आलें. झांशीवालीचा हा सीमेंटचा पुतळा जुजबी आहे. पुढे ब्रांझचा पुतळा होणार आहे. छत्रीचें काम चालू आहे. पुतळ्यातील घोडा उडी मारण्याच्या बेतात आहे म्हणून तुला लिहिलें तें चुकीचें आहे. तो घोडा दुसऱ्या एका चित्रात पाहिला. चित्र झांशीवालीचेंच, पण पुतळ्याचें नव्हे. पुतळ्याचें चित्र मला भेट म्हणून मिळालें. तें आणखी कुणाला देऊ ? माझ्या मनूला पाठवीत आहे! त्या स्फूर्ति देवतेचें चित्र मनूलाच पाठवायला नको का ? झांशीवालीचेंहि माहेरचें नांव मनूच होतें हें तुला ठाऊक आहे ना ?

आज तिसरे प्रहरीं 'सैनिक' कचेरीत श्रीकृष्णदत्त पालीवाल यांचे विद्यमानें पत्रकार परिषद झाली. मार्मिक प्रश्नोत्तरें झालीं. नंतर जाहीर भाषण झालें. पुन्हा तेच उद्गार, "दूसरे भाषणोंसे नशा चढता है या हीक आती है. आपने अमृत पिला दिया." "हम निहाल हो गये. हम किस अंधकार में थे. आपने रोशनी दी. हमें क्या पता ? हम चारचार शॉर्टवाले लगाकर एक-एक अक्षर लिख लेते." त्यानंतर लागलीच कार्यकर्त्यांची सभा. सभाध्यक्ष म्हणाले, "हमको अनुपम और अनमोल निधि मिली !"

झांशी.
२३.८.'५२.

परवां आग्र्याहून पत्र पाठविलें. काल सकाळीं आमच्या परिचयाच्या 'ममी' थड्डाणी यांना पांच मिनिटें भेटून पॅसेंजरने मथुरेला आलो. आग्र्याहून गांधी आश्रमचे जीवनराम रावत माझ्याबरोबर मथुरेला आले होते. मथुरेच्या मुक्कामात सारखे बरोबरच होते. मथुरेला पोचल्याबरोबर यमुनास्नान केलें. आणि द्वारकाधीशाचें दर्शन घेतलें. यमुनेचा पूर वाढत होता. टांग्याने वृंदावनला गेलो. पावसाने सारखें झोडलें. कपडे भिजले पण दाद द्यायची नाही असेंच ठरविलें होतें. वृंदावनला बांके बिहारीचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दर्शन झालें. पण रंगजीचें देऊळ वंद झालें होतें. आणि तें चार वाजता उघडणार होतें. चार तास वृंदावनातच तळ ठोकला. भटकंती केली. पाहिजे तर मनमुराद उनाडलो म्हण. पावसाला फारसें जुमानलें नाही. यमुनेवर जाऊन वसलो, वोळांवोळांतून हिंडून वृंदावनच्या जीवनाचीं अंतरंगें पाहिलीं. उरलेला वेळ मानसिंगाच्या देवळात घालविला. हें देऊळ केवढें प्रचंड, अगदी उत्कृष्ट कलेचा नमुना. पण आता ऐतिहासिक अवशेषात जमा झालें. तें निरंतर अपूर्णावस्थेत राहणार! आगऱ्याच्या दयालवागेची समाधि आणि वृंदावनचें मानसिंह मंदिर पाहिलें म्हणजे सरकारच्या पंचवार्षिक योजनेची आठवण होते. चार तास मोठे मजेत गेले. अज्ञात अवस्थेचा व अप्रसिद्धीचा आनंद काही औरच, नाही का?

सुमारे ४-१५ ला रंगजीचें देऊळ उघडलें. तीं गोपुरें, निंवार्क संप्रदायाचीं तीं मुद्रा-चिन्हें, आणि ती मूर्ति! सारा थाट थेट दक्षिण भारतीय. 'विष्णुकांची'ची आठवण झाली. ऋषिपंचमीच्या दिवशीं जेवण सोडून पावसात केलेल्या ओल्यातपाचें चीज झालें. श्रद्धात्मक प्रतीक्षादेखील साधनाच नव्हे का? लवाड, मतलवी व दांभिक माणसें जर तीर्थें बाटवू शकतात तर श्रद्धावानांना तीं आपल्या श्रद्धेने शुद्ध कां करता येऊ नयेत? तीर्थांचे मक्तेदार ढोंगी व लुच्चेच आहेत का? असतील. पण म्हणून श्रद्धावानांनी नामोहरम कां व्हावें?

सायंकाळीं ५.३० ला टांग्यानेच मथुरेला परत आलो. तोच करीर, वाभुळ इत्यादि वृक्षांनी वेष्टित असा असुंदर रस्ता आणि भाड्याचा टांगा. मग थाट काय तो पुसतां?

रात्रीं ७.० ते ८.३० मथुरेला जाहीर भाषण व प्रश्नोत्तरें. फिरून तेंच उद्गार, "यह भाषण advertise ही नहीं हुआ. यह तो लाखों को सुनाना चाहिए। Intellectuals के लिए तो treat है। कृपया दुबारा आइए।" रात्रीं वराच वेळपर्यंत आणि पुन्हा आज सकाळीं दीनानाथ मंगलेश नांवाचा एक तरुण सतत 'शास्त्रार्थ' करीत वसला. त्याची कळकळ, उत्साह व आवेश पाहून कौतुक वाटलें. त्याच्या स्नेहाचें संपादन केलें. पण तो पडला रामराज्य-परिषद वाला. प्रामाणिक, स्नेहशील व उत्कट. पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याच्या वादाला सीमा नाही. मी त्याला शरण चिठी लिहून दिली आणि वर बजावलें, "बाबा शास्त्रार्थ सोड, तत्त्वनिष्ठ बन. शास्त्रार्थाच्या मागे लागशील तर वाद पदरात पडेल. पण तत्त्वाला आंचवशील !"

मथुरेला नवीनच निघालेलें प्राचीन वस्तुसंग्रहालय आज सकाळीं पाहिलें. पुन्हा यमुनास्नान आणि द्वारकाधीशांचें दर्शन.

अलीगढहून कैलाशभाई जीप घेऊन आले. १२.४० ला यमुना तीरावरील मथुरेची विलक्षण शोभा पाहत पाहत निघालो. पाऊस मी म्हणत होता. मोटार बेफामपणाने धावत होती. शर्यतीच्या घोड्याप्रमाणे — पिसाटाप्रमाणे. मध्ये मुरसान गांव लागलें. सुप्रसिद्ध क्रांतिकारक राजा महेंद्र प्रताप यांचें मूळ गांव. या गांवीं बैलांचा फार मोठा बाजार भरलेला होता. या जिल्ह्यात बरहद म्हणून दुसरें एक गांव आहे. तेथे घोडे आणि गाढव यांचा एवढा प्रचंड बाजार भरतो की नुसत्या नोंदणीचें उत्पन्न ५००० रु० आहे. गधा-घोड्यांचें हें संमेलन उम्मेदवारांच्या मेळाव्या-सारखेंच भासत असेल नाही ?

अलीगढ.
२६.८.'५२.

मेरठ म्हणजे मंदोदरीचा बाप मय याची राजधानी. श्रवण आपल्या आईबापांना गढमुक्तेश्वरला वाहून नेत असतांना येथे त्याला बुद्धिभ्रंश झाला. बाप म्हणाला, "येथील मातीचें एक ढेंकूळ घे आणि गांवाबाहेर आम्हाला ने. तेथे वाटल्यास आम्हांला टाकून दे." गांवाबाहेर गेल्यावर श्रावण भानावर आला. आईबापांनी त्याला पुन्हा ढेंकळावर उभा रहायला सांगितले. पुन्हा त्याची मति फिरली. बाप म्हणाला, "हा या मयपुरीच्या मातीचा गुण आहे !" तरी पण १८५७ चें आंदोलन येथूनच सुरू झालें. खादीचें सर्वात मोठें केंद्र हेंच आहे. आता ही मयपुरी राहिलेली नाही. हें शहाण्या मंदोदरीचें माहेर आहे.

मेरठ.
२९.८.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल सकाळीं १०.१५ ला मुरादाबादला पोचलो. श्री रामेश्वरदयाल एंजीनियर यांचेकडे उतरलो. मुझफ्फरनगरला ज्यांच्याकडे उतरलो होतो ते दिलीपसिंगहि एंजीनियरच होते. त्यांच्याप्रमाणेच हें गृहस्थहि सालस व श्रद्धावान् आहेत. उत्तरप्रदेशात व बिहारमध्ये कुठल्याहि घरात स्त्रिया आहेत असा भास होत नाही. ताट बहुधा वाढूनच बाहेर येतें. घरात जेवायला बसविलें तरी पुरुषच वाढतात. ताटातील अन्नाला मात्र गृहदेवीच्या स्पर्शाची चव असते. तिच्या अस्तित्वाचें तेवढेंच प्रमाण बहुधा उपलब्ध होतें. या दोन एंजीनियरांच्या मध्यमवयस्क धर्मपत्न्या तेवढ्या अगदी अगत्यपूर्वक विचारपूस करीत आणि जेवतांना समाचार घेत. या परिस्थिती-मुळे स्त्रीजीवन विषयक माझे विचार इकडच्या लोकांना मूलमंत्रा सारखे वाटावेत यात नवल नाही.

मुरादाबादची भांडी सगळ्या भारतात प्रसिद्ध आहेत. शहर उत्तर हिंदुस्थानी घाटाचेंच आहे. सुंदर गच्च्यांचीं घरें. गच्च्याहि मोठ्या प्रशस्त. मेरठ, सहारनपुर, बिजनौर या भागावर पंजाबची छाया स्पष्ट दिसते. घरें त्याच घाटाचीं. वरच्या गच्च्या थेट खानदेशी धाब्या सारख्या. शौचकूपहि बहुधा वरच्याच गच्चीवर. जणू खालचें आंगण कुणी वर नेऊन ठेऊन दिलें असावें

पंजाबमेल.
४-९,'५२.

काल सायंकाळीं ६.८ ला बनारसला पोचलो. विनोबांचें प्रार्थना प्रवचन सुरू होण्याच्या बेतात होतें. 'स्वच्छ काशी म्हणजेच स्वच्छ भारत,' हा विषय घेतला होता. 'शुचौदेशे प्रतिष्ठाप्य' हा आदेश असल्यामुळे धर्माचरणाचें क्षेत्र तर विशेषच पवित्र हवें, हा मुद्दा मांडला. प्रार्थनेनंतर विनोबांजवळ बोलत बसलो.

दामोदरची प्रकृति बिघडल्यामुळे त्याला वर्ध्याला जावें लागलें. तुझा 'लच्छुभैया' आहे. त्याला बरोबर घेऊन रात्रीं गंगेवर गेलो. वर पौर्णिमेचा चंद्र. खाली गंगेचें पूर्ण भरलेलें पात्र. गंगास्नान केलें. विश्वनाथाचें दर्शन घेतलें. फुलांचा श्रृंगार केलेला होता. आरती चालू होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लच्छूभैयाने तुझी आठवण केली. म्हणाला, "आज स्त्रियांना उद्देशून विनोबांनी सांगितलें की तपस्विनी, ब्रह्मचारिणी व ज्ञानसंपन्न अशी स्त्री निपजेल तेव्हाच स्त्रियांना खरें जीवन लाभेल, त्या वेळीं मला वाटलें की आमची ताई अशी होऊ शकेल." स्त्रियांमध्ये शुकाचार्य, शंकराचार्य, रामकृष्ण परमहंस, गांधी व विनोबा निर्माण व्हायला हवेत.

आज पहाटे ३.३० ला पुन्हा विनोबांजवळ वसलो. लच्छू म्हणाला, "तुमच्या इतके कुणाजवळच खुलत नाहीत ते." मला केवढें वरें वाटलें ? प्रार्थनेनंतर विनोबा माता आनंदमयींकडे गेले. ही त्यांची पहिलीच गांठ. आनंदमयी माता म्हणे रामकृष्ण परमहंस देवांप्रमाणे देहातीत अवस्थेत असतात. त्यांना मी पाहिलेल्या तर आहेत. पण आत्मज्ञ व्यक्तीच्या स्थितीची कल्पना मला कशी येणार ?

दिल्लीचें एक आमंत्रण आलें. त्यांनी गांधी वादावर वादविवाद ठेवला आहे. गांधीचा वाद वनविल्यावांचून त्याचें श्राद्ध यांना करता यायचें नाही. गेल्या सतरा वर्षांत मी वादविवादात भाग घेतला नाही. त्याने तत्त्वबोध किंवा जिज्ञासावृत्ति न वाढता पक्षाभिनिवेश आणि तर्कट मात्र माजते असा माझा अनुभव आहे.

काल आगगाडीत एका म्हाताऱ्या पंजाब्याला माझी 'पोर्टफोलिओ' फार आवडली. म्हणाला, 'केवढ्याची आहे ?' उत्तर दिलें, "माझ्या मुलीची आहे. तिला मोल नाही !" डब्यात तिघे शीख, एक पंजाबी आणि एक नेपाळी होता. सगळे मोठे मस्त गडी.

आज मात्र पंडे, पोलिस व खिसेकापू यांची सोवत माणिकपुरपर्यंत लाभली. पंडे पोलिसाला उद्वेगाने सांगत होते, "कलियुग आ गया हुजूर. नहीं तो वो यजमान पुण्यात्मा मिलते थे कि पंडे कभी थर्ड और इंटर में तो चले ही नहीं. फर्स्ट और सेकंड में चलते थे और जमकर जुआ होता था।" कलियुगाचा जयजयकार असो !

आगगाडी.

५.९.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कऱ्हाडला राजपतराव अळतेकरांकडे थांबलो. मागेंहि एकदा त्यांच्याकडे गेलो होतो. त्या वेळीं भैयाशास्त्री वाटवे यांच्याकडे उतरलो होतो. हे अळतेकर म्हणजे समर्थ चरित्राचे लेखक सदाशिव खंडो अळतेकर यांचे चिरंजीव. सुस्वभावी, अगत्यवान्.

८.४५ ला सकाळीं भाऊबरोबर एस्. टी. च्या बसने निघालो, दुपारीं १ ला येथे पोचलो. थत्ते वकिलांकडे उतरलो. महिलाश्रमात वर्ध्याला जे शिधुकाका थत्ते आहेत, ते यांच्याचपैकी. चिपळूणहून अगदी शेजारच्या डोंगरावर जें परशुराम क्षेत्र दिसतें, तियले हे सगळे थत्ते. अप्पा पटवर्धन मुद्दाम कणकवलीहून आलेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यापुरता त्यांचा सहवास लाभेल. रावसाहेब पटवर्धन आले असते तर दुप्पट लाभ झाला असता. समजुतीच्या घोटाळ्यामुळे येथेंहि बस-स्टॅन्डवर कोणीच आलें नव्हतें.

कऱ्हाड आगरकरांचें आणि चिपळूण चिपळूणकरांचें. कऱ्हाड ते हेळवाकपर्यंत कोयना आमच्याबरोबर होती. आमची वाट आणि कोयना अगदी अक्षरशः हातात हात घालून चालत होत्या. फक्त आमची बस मात्र कोयनेच्या उगमाकडे चालली होती म्हणून विरुद्ध दिशेने जात होती.

एरव्ही सडक आणि कोयना अगदी एका रथाला जुंपलेल्या आश्विनीप्रमाणे जोडीने चालतात. हेळवाकपासून दोन मैलांवर कोयनेचें सुप्रसिद्ध धरण व्हायचें आहे. कृष्णेपेक्षा कोयनाच मातबर आहे. पाणी मुबलक. दगड फारसे नाहीत. लाल मुरूम आणि लाल माती. खरी दौलत कोयनेचीच. ज्ञानदेवतुकारामाचीं क्षेत्रें इंद्रायणीवर आहेत. कोयना चिपळूणकर-आगरकर यांच्या मुलुखाच्या परिसरात आहे. घाट चांगलाच भव्य आहे. घाटानंतर वशिष्ठी नदी लागते. ती जवळजवळ चिपळूणपर्यंत. चिपळूण अगदी डोंगरांच्या कुशीत आहे. द्रोणासारखें. जी नदी आहे तिला खाडी म्हणतात. समुद्राच्या भरतीचें पाणी या नदीत येतें. पाणी खारें आहे.

थेट मराठी मुसलमान या भागात भेटतात. आडनांवेंहि मोडक, देसाई, अशी भाषा मराठी. क्वचित् लुंगी. एरव्ही धोतर.

चिपळूण
१६.९.'५२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल तिसरे प्रहरीं हायस्कूलला भेट दिली. शिक्षकांशी परिचय झाला. सायंकाळीं ५ ला निमंत्रितांची सभा. ५.४५ ते ६.३० भाषण केलें. कार्यकर्त्यांनादेखील अंमळ जड वाटलें म्हणे. मला आश्चर्यच वाटलें. रात्रीं ९.३० नंतर जाहीर सभा. जाहीर भाषण लोकांना आवडलें. मी अगदी कंटाळलो होतो. बोलण्याची वृत्तिहि नव्हती. एकंदरीत हिंदी भाषणाची खुमारी काही आली नाही.

सकाळीं ६ ला एस्. टी. च्या बसने अप्पा व भाऊ यांच्याबरोबर निघालो. थोडा वेळ वशिष्ठी नदीची सोबत होती. नंतर सोनवी नदी लागली. रस्ता फार मनोहर. संगमेश्वरला सोनवी नदीच्या पुलाचें दृश्य तर फारच बहारीचें. शिलांग—श्रीहटच्या दरम्यान एक अतिशय रमणीय पूल लागतो. त्याची सर याला नाही यायची. पण हेंहि दृश्य फार सुंदर आहे. याच संगमेश्वरला संभाजीला पकडला होता. परशुरामला कातळकडयाचें दृश्य तर अवर्णनीयच आहे म्हणतात. मला बघता आलें नाही. काटदऱ्यांनी त्याचें वर्णन केलें आहे.

वाळगी किंवा वाळी (काळ्या-पांढऱ्या) रंगांचीं गुरें पुन्हा दिसू लागलीं. वनश्री मोठी संपन्न ! भाताची, नाचण्याची, करडईची डोंगर माथ्यावरील लावणी, फणस पोफळी, साल, आंबे, नारळी या झाडांची गर्दी. नागमोडी वळणाचे घाट आणि नद्यांच्या कडेकडेने जाणारी वाट, बहार आहे !

संगमेश्वरला सोनवी व बाव या नद्यांचा संगम आहे. संगमेश्वर-पासून पुढे बाव नदीची सोबत. बाव (बावडी) म्हणजे विहीर. नदी अतिशय खोल असल्यामुळे 'बाव' नांव पडलें. पाणी स्वच्छ निळसर. तिच्या पात्रात ठिकठिकाणीं होड्या वावरतांना दिसतात. एक धबधबाहि लागतो, नदीच्या अगदी कडेनेच सडक आहे.

सुमारे १० ला रत्नागिरीला पोचलो. रत्नागिरि म्हणजे महाराष्ट्राचें उत्तमाङ्ग, महाराष्ट्राचा मेंदू. 'सर्वोदय' छात्रालयात मुक्काम आहे. छात्रालय बाळासाहेब खेरांच्या घरात आहे. त्यांनी आपलीं घरें सार्वजनिक उपयोगा-करिता दिली आहेत. याच आळीत टिळकांचें जन्मस्थान आहे. म्हणून ही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

टिळक आळी. टिळकांचें हें जन्मस्थान सर्वोदय छात्रालयाच्या समोरच्या बाजूला अगदी जवळच आहे. तेथे टिळकांच्या पुतळा आहे.

१९३८ पासून 'सर्वोदयात' माझ्यावरोबर काम करणारे माझे नित्य सहयोगी कै० मामा सावंत यांच्या पत्नीला भेटून आलो. अगदी पांढऱ्या समुद्रावर घर आणि माडांची बाग आहे. रत्नागिरीला भगवतीच्या किल्ल्याच्या दोन बाजूंना काळचा व पांढऱ्या वाळूचे काळा व पांढरा असे दोन समुद्र आहेत हें तुला माहीत आहेच. येथील समुद्राचें मनोरम दृश्यहि तू पाहिलेलें आहेस. सावंत ह्यात होते तोंपर्यंत त्यांच्या घरीं येण्याचा योग आला नाही. अतिशय स्नेह होता आमचा.

येथील आमदार मोरोपंत जोशी यांच्याकडे दुपारचें जेवण झालें. या वेळीं काकड्या व वाळके यांचा हंगाम सगळीकडेच आहे. उत्तरेकडे लोक ज्याप्रमाणे फूट नांवाची वाळके खातात त्याप्रमाणे इकडे 'कोसें' म्हणून वाळुक असतें तें खातात. दारिद्रय आहे. पण लोकांच्या तोंडावर तरतरीहि आहे.

सायंकाळीं कार्यकर्त्यांची परिषद, भाषण रंगलें. लोक म्हणाले, 'बौद्धिक मेजवानी' मिळाली. आता रात्रीं जाहीर सभा. उद्या सकाळीं ७.३० ला कॉलेजात भाषण. नंतर कणकवली. परवांपासून कोल्हापुर जिल्हा.

रत्नागिरि
१७-९-'५२.

सकाळीं ८.३० ला रत्नागिरीहून निघालो. भाषणानंतर स्वाक्षरीचा आणि चहापानाचा विधि झाला. सुमारे २.१५ ला दुपारीं येथे पोचलो. रस्ता अर्थातच निसर्गरम्य. टेंकड्या, घाट, नद्या, वळणाचे रस्ते, सारींच गंमत. मध्ये राजापुरचें दृश्य विशेष डोळ्यात भरलें. आंबा, आंबोली, कुंभारली आणि फोंडा या चार घाटांपैकी कुंभारली उतरून चिपळूणला आलो आणि उद्या फोंडा चढून निपाणीमार्गे गडहिंग्लजला जाणार.

गोपुरीला आल्यावरोबर नदीवर अंघोळ केली. पाणी स्वच्छ, प्रसन्न! गोपुरीला तीन बाजूंनी या नदीचा वेढा आणि सगळीकडे डोंगर. त्याच जांभ्या दगडाच्या इमारती. तोच लाल मुरूम. तीच तांबडी माती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सगळीकडे हिरवेंगार. काळ्या तांबड्या तुळतुळीत रंगाचीं वाळगीं गुरें मजेशीर आहे. चंदूची इच्छा होती. आणला असता तर बरें झालें असतें. आठवण येते.

भाऊरायांची प्रेमळ सोबत आहे. अप्पा तर संतच आहेत. शरीर हाडकुळें पण काटक, व तरतरीत. बुद्धि अनाग्रही पण ताठ आणि तरल. वृत्ति प्रेमळ, विनयशील, पण टणक व तेजस्वी. भाषा सोपी, सरळ पण अर्थव्यंजक व कमावलेली. परिश्रमनिष्ठेची कमाल. निर्भयताहि तशीच. महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला ललामभूत आहेत हीं माणसें.

गोपुरी (कणकवली)
१८.९.'५२.

सकाळीं तुला पत्र पाठविल्यानंतर सुमारे ९.३० ला मोटारने निघून १०.३० ला वडगांवला पोचलो. वडगांव तळेगांव जवळच आहे. तेथे पोटोबाच्या देवळात सभा झाली. पोटोबाचें देऊळ उभ्या जन्मात आजच पाहिलें. पोटोबाच देव झाला म्हणजे तो विठोबाच होऊन जातो. पोटोबाच विठोबा झाला म्हणजे अन्न हें ब्रह्म बनतें. आणि 'उदरभरण' हें 'यज्ञकर्म' ठरतें. म्हणून पोटोबाच्या देवळात दरेकाने आपापलें 'पोट' कापून देवापायीं वाहिलें की जगाचें मायपोट भरेल. पोटोबाचें देऊळ पाहून या कल्पना सुचल्या.

वडगांव हे मावळरानात आहे. तेथून आळंदीला गेलो. तेथील मंडळींनी तुझी आठवण केली. ज्ञानदेवाच्या समाधीचें दर्शन घेतलें. भाऊरायाचें हृदय उचंबळलें. तो विनोबांवरोबर आळंदीला आला होता. दुपारीं सभा झाली.

पुणें.
२४.९.'५२.

काल सकाळीं ९.३० ला ठाकुर प्यारेलालसिंह, नंदकुमार दानी, दादाभाई व रामानंद दुबे यांच्यावरोबर जीपने निघून सुमारे ११ला महानदी-वर पोचलो. पात्र विस्तीर्ण; पण वाळवंटच फार मोठें. पाण्याचें पात्र त्या मानाने लहान व खोलीहि कमी. तरी नावेतून जावें लागलेंच. पाण्यात व तीरावर मोटमोठाले खडक असून त्यांतून दगडांच्या चांगल्या लांबरुंद फरश्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निघतात. पलीकडच्या तीरावर दुसरी मोटार आली होती. त्या मोटारीने ११.४५ ला महासमुंदला पोचलो. मध्ये वेलसोंढा येथील कस्तूरवा केंद्रहि पाहिलें. महासमुंदला मुक्काम विवेकवर्धन आश्रमात व जेवण नेमीचंद शेठांकडे. येत्या निवडणुकीत हे मगनलाल वागडींचे प्रतिमल्ल आहेत.

तिसरे प्रहरीं ३.४५ ते ५.४५ कार्यकर्त्यांची सभा झाली. त्या सभेत माझा मेंदूच सुन्न पडला. सतत वर्षभर ग्रामोफोनच्या तवकडीप्रमाणे यांत्रिक रीतीने हा विषय मांडीत आलो. पण तवकडीची सुईच अडकली. एक शब्द किंवा वाक्य सुचेना ! कसेंबसें भाषण रेटलें. प्रश्नोत्तरें जोमात झालीं. पण कोणी विचारच केलेला नव्हता. रात्रीं जाहीर सभेतील भाषण लख्ख पैकी झालें. दिवाळीची भोगी असल्यामुळे रउताईणींचा 'सुआ' नाच चालू होता. फटाके फुटत होते. गोंगाट बराच होता. पण भाषण मात्र सर्वांनी लक्ष देऊन ऐकलें. रात्रीं ९.३० ला पुन्हा महानदी नावेने उतरून जीपने रात्रीं ११ ला रायपुरला परत पोचलो.

आज सकाळीं जीपने ७.३० ला ठाकुर साहेब, दानीजी, दादाभाई व दुवेजी यांच्यावरोबर ९.३० ला येथे पोचलो. येथून पांच मैलांवर जीप जोरात असतांना फाडकन् एक टायर फुटलें ! गाडीचा तोल जाऊन ती सडकेच्या वाजूला एका खळग्याच्या कडेशी जाऊन थवकली. एक चाक खळग्याच्या वर राहिलें. गाडी वांकडी मात्र झाली नाही. सडकेवर जशी ऐटीत चालली होती, तशीच ऐटीत थवकून खळग्याशी उभी ठाकली !

येथे तीन नद्यांचा संगम मानला जातो. सोंढुल नदी पैरी नदीला येथून २५ मैलांवर वरच्या वाजूला मिळते. येथे पैरी नदी महानदीला मिळते. दोन्ही नद्यांच्या संयुक्त पात्रात संगमावर एक चौथरा असून त्यावर कुलेश्वर महादेवाचें देऊळ आहे. नद्यात पाणी मांडी मांडीच आहे. वाळ जाडीभरडी. काही ठिकाणीं फसवी. भसकन् पाय रुततो. आम्ही संगमावर अंघोळ करून कुलेश्वराचें दर्शन घेतो तों राजीव लोचनाचें देऊळ बंद झालें. आता तीन वाजताच दर्शन होईल.

दसऱ्याला पंढरपुरला होतो. दिवाळीला राजीव लोचनला आहे. चंद्रभागेत ज्याप्रमाणे कंबर कंबर पाण्यातून नाव ओढून नेतात, तोच थाट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येथे आहे. दसऱ्याला भातावरील किडयांच्या उपद्रवामुळे इकडील लोकांच्या तोंडचें पाणी पळालें होतें. दिवाळीला त्यांच्या चेहऱ्यावर वळी दिसत नाही. त्यामुळे काल रात्रीं जेव्हा भाताच्या पिकाचा सौम्य सुगंध वाऱ्यात दरवळला तेव्हा मन प्रफुल्लित झालें.

राजीव लोचन राजीम गांवात आहे. आम्ही नया पारामध्ये उतरलो. राजीम त्या पार आहे. पुन्हा नावेने जाऊन राजीव लोचनचें दर्शन घेतलें. राजीव लोचनची मूर्ति काळचा रंगाची असून डोळे सोन्याचे आहेत. डोळे लांबून चमकतात. देऊळ जुनें आहे. खांबावर व भिंतीवर अनेक अवतारांच्या देव-देवतांच्या मूर्ति आहेत. शिव-पार्वती-गणेशाचें एक मंदिर आहे. राजीव लोचनाच्या देवळाच्या चाऱ्ही कोपऱ्यांवर वराह, वामन, नृसिंह व बदरीकेदार अशीं चार लहान लहान देवळें आहेत, आणि एकीकडे जगन्नाथाचें देऊळ आहे. पंडे ठाकुरलोक आहेत. त्यांचें देवाशी इस्टेटीचें भांडण झालें आणि आता एक तृतीयांश इस्टेट देवाला मिळालेली आहे. आम्ही दर्शन घेतल्यावर आम्हाला अनरसा व पिडियाचा प्रसाद मिळाला. पिडिया म्हणजे गुलाबजामुनच्या आकाराचा कणकेचा एक पदार्थ. तो पदार्थ राजीव लोचनचें वैशिष्टय आहे. देवावर सरशी करणाऱ्या पंडया-प्रमाणे !

नयापारा, राजीवलोचन.
१८.१०.'५२.

काल संध्याकाळीं ५ ला बसने निघून ७ ला घरघोडयाच्या लोक-शाळेत उतरलो. २२ मैल दोन तासात आलो. मोटारलॉरी अगदीच फुटक्या टिन पॉट सारखी, ड्रायवर 'प्यालेला', रस्ता जंगलाचा आणि रात्रीची वेळ. योग मोठा छान होता. पण ड्रायवर मात्र बाकबगार. त्यामुळे सुरक्षित पोचलो. बाबूरा हरकऱ्यांची लीलाहि घरघोडयालाच असल्यामुळे प्रभा-लीलांनी मिळून दुप्पट आतिथ्य केलें.

सकाळीं जशपुरराजाच्या सर्विस बसने घरघोडयाहून सकाळीं ७.३० ला निघून दुपारीं २.१५ ला येथे पोचलो. मध्ये जुन्या उदयपुर संस्थानाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राजधानी धर्मगड – हें गांव लागलें. धर्मंजयगडच्या सभोवर डोंगर व गांवाच्या कडेलाच माननदी असल्यामुळे दृश्य चांगलें आहे. दुसरें मोठें गांव म्हणजे बस-रस्त्यांचें जंक्शन पाथल गांव. जशपुर रायगडाहून १३५ मैल आहे. पण रांचीपासून ११० मैलांवर आहे. पाथगांवपासून येथपर्यंत संथाल परगण्याप्रमाणेच फणसांचीं वरींच झाडें आहेत. जशपुर विहारच्या सरहद्दी-वर असल्यामुळे भाषेवर व चालीरीतींवर बिहारची छाया स्पष्ट दिसते.

धर्मंजयगडापासून पाथलगांवपर्यंतचा रस्ता नवीन व चांगला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना फुलझाडें व कणेरीचीं झुडपें लावलीं आहेत. घाटहि सुंदर आहे. पाथल गांवपासून पुढे रस्ता फारसा चांगला नसला तरी सुंदर आहेच. वेलघाट म्हणून एक लहानसा घाट लागतो. आणि जशपुरपासून अलीकडे १२ मैलांवर लोरा घाट म्हणून एक मोठासा घाट लागतो. या दोन्ही घाटांमध्ये सुरवातीचा चढाव स्टेशन प्लॅटफॉर्मवरील पुलासारखा अगदी सरळ आहे. हे दोन अवघड चढाव वगळले तर मग घाटांत विशेष उल्लेखनीय काही नाही. हिवाळा असल्यामुळे सृष्टि सौंदर्याची लयलूट आहे. डोंगरा-वरील जंगल चांगलें दाट आहे आणि झाडेंहि उंच आहेत.

जशपुरनगर रचनेच्या दृष्टीने टुमदार आहे. इमारती साध्या पण सुबक. रांची ज्याप्रमाणे ११० मैलांवर आहे; त्याप्रमाणेच झारसुगुदा १०४ मैलांवर आहे. म्हणजे हा भाग विहार-उडीसा प्रांतांच्या मध्ये येतो.

गांव उंचावर असल्यामुळे थंडी चांगलीच कडाडली आहे. सबंध दिवस बसच्या प्रवासाने अंग ठेचलें गेलें.

या भागात चिरोंजी (चारोळी), आंवळे, आंबे, मध इत्यादि वस्तूंची भरमसाट विपुलता आहे. साखर व मीठ यांच्या अभावीं हे पदार्थ टिकविण्याची कला मात्र अवगत नाही. मधहि वायाच जातो.

दररोज वाटेत एक-दोन ठिकाणीं बाजार आढळतातच. बाजाराला जातांना किंवा परत येतांना जिन्नस कावडीतून वाहून नेतात. कावडीच्या टोपल्यामात्र उथळ द्रोणाच्या आकाराच्या पर्डीवजा असतात. आपण ज्यांना 'टुडर्या' म्हणतो, काहीशा तशा. ज्या भागात ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभाव आहे त्या भागातील स्त्रीपुरुष बाजाराकरिता शुभ्र व स्वच्छ कपडे घालून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जातात. स्त्रिया डोक्यावरील चुंबळीदेखील पदराने झांकून घेतात. त्यामुळे केसात केर होत नाही.

लंगोटचा व काचे वापरणारे पुरुष फार. दरेकाजवळ कुऱ्हाड असते. अगदी चिमुकल्या गुराखी पोरांजवळ कुऱ्हाड व चकमक असायचीच ! एक बदल मात्र खुपतो. कांशाची ढवदार, स्वच्छ व टिकाऊ भांडी वापरणारे लोक आता अल्युमिनियमचीं तकलुपी व रद्दड भांडीं वापरू लागले आहेत.

जशपुरनगर.
२७.१०.'५२.

पाथलगांव तें अंबिकापुरचा रस्ता फारसा रानाडोंगरांचा नाही. अंबिकापुरजवळ सात मैलांवर एक घाट लागतो. त्यात तीन वळणें चांगलींच अवघड असून जंगलहि निबिड आहे. डोंगर मात्र मातीचे ढीगच. जशपुरच्या रस्त्यात कोठे कोठें मुशीत ओतलेल्या एकाच प्रचंड खडकाचे पालथ्या रांजणासारखे व पालथ्या कढईसारखे डोंगर आहेत ! ती गंमत येथे नाही. केसकालच्या घाटात व घरघोड्याच्या जंगलात वनदेवाला नारळ फोडून प्रसाद वाटतात. इकडे कोठेच तो प्रकार आढळला नाही. तरी या भागातील लोकहि कुठल्या तरी वनदेवाची पूजा करीतच असणार !

अंबिकापुर
२८.१०.'५२.

१० ला निघून १२ ला येथे आलो. बरें आलो. दोन तासांत पन्नास मैल. सडक चांगली. पण रस्ता रुक्ष. डोंगर नाहीत. जंगलहि थोडेंसें. पिकेंदेखील भिकार. त्यामानाने पाथल गांव ते अंबिकापुरचें पठार हिरवेंगार आहे. वैकुंठपुर गांव लहानसें आणि असुंदर ! डोंगरदेखील लांब. सृष्टि-शोभा काही नाही. एक लहानशी नदी आहे. मनमुराद कपडे धुतले.

कपडे धुणें ही एक मोठी प्रचंड समस्या आहे. श्रीमंतांकडे सोय नसते. गरिबांकडे व्यवस्था नसते. त्यामुळे या क्षीणनीरा नदीवर दगड व चिमुकला धवधवा पाहून कपडे धुण्याचें अवसान आलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मणींद्रगड ३० मैलच आहे. शिवाय तें स्टेशन आहे. हा भाग पूर्वी अगदी 'अगम्य'च होता. बैलगाडी क्वचितच आढळते. मोटारीपूर्वी हत्ती हेंच एकमात्र वाहन होतें. दुपारीं मणींद्रगड आटपून संध्याकाळीं आगगाडीने चिरिमिरीला जाऊ. रात्रीं तेथे सभा व मुक्काम. उद्या सकाळच्या गाडीने निघून सायंकाळीं कटणी.

वैकुंटपुर.
२९.१०.'५२.

दुपारीं ११.४५ ला जनपदच्या लॉरीने निघून १.१५ ला मणींद्रगडला पोंचलो. वैकुंठ पुराहून मणींद्रगड ३० मैल असून रस्त्यात दोन घाट व बरेंच जंगल आहे. या ऋतूत डोंगर व जंगल शोभिवंत नसलें तरच नवल. पिकें मात्र भिकार. मणींद्रगड गांव डोंगरांच्या उपत्यकेत आहे. गांव लहानसेंच. शोभाहि बेताचीच. पण डोंगरांमुळे रमणीयता आहे. दुपारीं २.३० ते ३.४५ कार्यकर्त्यांची बैठक झाली. भाषण नामी झालें. मुद्देसूद,बांधेसूद आणि समर्पक. श्रोते शेलकेच होते.

सायंकाळीं ४.४७ ला आगगाडीने निघून ६ ला येथे पोचलो. हें गांव एकाद्या डोंगरी 'प्रवासक्षेत्रा' सारखें आहे. रात्रीं दिव्यांची शोभा फारच रम्य दिसते. पण पांच-सहा मैल सगळचा कोळशाच्या खाणी ! मणींद्रगडापासून चिरीमिरीपर्यंतचा रस्ता डोंगरां-जंगलाचा आहे. सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय आहे. बालाघाटचें सुपरवार, कानाकिसली इत्यादि अनेक जंगलांची आठवण होते.

लाहिडी नांवाच्या एका वृद्ध मक्तेदारांनी चालविलेली शाळा पाहिली. रात्रीं ७.५० ते ९ जाहीर भाषण केलें. मोठें बेतशीर व परिणामकारक. तेंहि लाहिडी हायस्कूलच्या श्रीमंडपात झालें. ही सबंध संस्था विभूति भूषण लाहिडी यांनी स्वताच्या खर्चाने उभारली आहे. विज्ञान, कला, उद्योग, व्यायाम, सामान्य ज्ञान, व्यावहारिक माहिती इत्यादि सर्व अंगें आहेत आणि बारीक सारीक बाबतीत हा चौसष्ठ वर्षांचा वयोवृद्ध संचालक जातीने व तरुणाच्या उत्साहाने लक्ष घालतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडीतून उतरल्या बरोबर लाहिडी यांच्या मुलाने सायंकाळीं ५लाच मारलेला एक प्रचंड व्याघ्रराज पाहिला. गायी ऐवढा तरी असेल. त्याचें कलेवरहि 'राजाश्रिया विराजित' दिसत होतें !

जीप गाडीतून वर चढलो. गांव डोंगरावर वसलेलें. एका घराच्या दोन खोल्यादेखील एका पातळीवर नाहीत. रस्तेहि यथातथाच. मसूरी, सिमला, अलमोडा इत्यादि ठिकाणीं कुठलेंहि वाहन नाही. येथे मात्र जीप गाडी घोरपडीसारखी सरसर चढत गेली !

गांवाच्या भोंवतालीं डोंगरांची व अरण्याची शोभा मनोवेधक आहे. गांवहि 'पर्वतीय प्रवास क्षेत्रा' सारखें. पण दवदार नाही. रचना अगदीच वेडीवांकडी. कोळशाच्या खाणींचा धूर नसला तरी घरोघरीं जळणाऱ्या कोळशांच्या धुराने सारें क्षितिज व्यापलेलें असतें. माणूस धुरकटून न निघालें तरच नवल !

या कोरिया भागात कोळसा फार आहे. ५-६ मैलांच्या परिघात कोळशाच्या खाणी पसरलेल्या आहेत. कोरियाच तें. त्यात काय नाही ? पटना आहे, नागपुर आहे, फक्त दिल्ली नाही !

चिरिमिरी
३०.१०.'५२.

सकाळीं आठच्या गाडीने चिरिमिरीहून निघून ९ ला पुन्हा येथे आलो. रस्ता मात्र खरोखरच रम्य आहे. डोंगरांवर कळकाचीं बेटें असल्यामुळे त्याच्या रमणीयतेत भर पडली आहे. काही डोंगर तर अगदी पालथ्या इरल्या सारखे दिसतात. आम्ही 'मणींद्रगड' म्हणतो. पण येथील लोक 'मनेंद्रगड' म्हणतात व लिहितात. पूर्वीचें नांव 'काली माटी,' 'जमशेदपुर' चें जुनें नांवहि 'काली माटी' च होतें. येथे कोळसा आहे. तेथे लोखंड आहे.

लहानशी नदी आहे. कपडे धुण्यापुरतें पाणी आणि मुबलक दगड. दादाभाई 'सदासादर' सोबती आहेतच. मग काय ? दोन दिवसांचे कपडे धुवून घेतले. उन्हात दोन मैलांची रपेट झाली. शरीरात ऊब आली. तपहि झालें. लोकांवर साधेपणाची छाप पडली. शरीरश्रमाचें श्रेय फुकटात पदरात पडलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येथे श्री रतनलाल मालवियांकडे मुकाम आहे. माझ्यावरोबर संविधान परिषदेत होते. येथील जनतेचे वास्तविक प्रतिनिधि ज्वाला प्रमुख म्हणून आहेत. पटना गांवीं राहतात. उत्साही व समंजस आहेत.

मणींद्रगड.

३१.१०.'५२.

रात्रीं कटणीपासून दीड मैलांवर कटायघाटाच्या मेळचात भाषण झालें. गर्दी खूप होती पण नुसतीच गर्दी नव्हती. श्रोत्यांची सभा होती ती. भाषणहि त्या थाटाचें झालें.

कटायला मी १९१० सालीं कटणीला पहिल्या इंग्रजी वर्गात शिकत असतांना गेलो होतो. त्यानंतर काल गेलो. नदी डोंगर कापून जाते. दोन्ही-कडे डोंगर व डोंगराच्या माथ्यावर मारुतीचें देऊळ आहे. प्रचंड पाषाण व गुहा आहेत. स्थान रमणीय आहे. रेहलीजवळ सुतार नदीचेंहि रानगिर म्हणून यापेक्षाहि रमणीय स्थान आहे. डोंगराच्या पायथ्याशी नदी असली की डोंगरावर बहुधा एकादें देवस्थान असतेंच. कटणी ते दमोहच्या रस्त्यात देखील डोंगर, जंगल व नदी यांचें सौंदर्य चांगल्यापैकी आहे. जंगल विरळ आहे. डोंगरहि त्या मानाने वसके. डोळचांत भरण्याजोगी शेती नाही. पण हिंवाळचामुळे वनशोभा चांगली आहे. सृष्टि सौंदर्याच्या संपन्नतेत व विविधतेत आपल्या प्रांतापुढे इतर प्रांतांनी अगदीच नाक खाजवायला नको काही.

दमोह.

२.११.'५२.

आज सकाळीं १० ला गौरीशंकरजी डालमियांकडे जेवून वसने रवाना झालो. माताजी, दामाजी व इतर वरीच मंडळी सोबत होती. मी 'मानाच्या जागीं', म्हणजे पुढल्या सीटवर होतो. वस तापलेली होती, खालून पायांना तापलेल्या लोखंडाच्या व एंजीनच्या डागण्या लागत होत्या आणि सगळी-कडून गरम झळा! जेवल्यावरोबर वसमध्यें वसलो होतो. नवाद्याच्या रुक्ष रस्त्यावरील डोंगर तापलेले होते आणि नद्या फलगूच्या सख्ख्या बहिणी झालेल्या. फलगूमध्ये कुठेतरी लोक तयार करतात. या नद्या म्हणजे नुसतेच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रखरखीत वाळवंटाचे रुंद पट्टे ! "अग्रे वह्निः पृष्ठे भानुः" । अशा थाटाने दोन तास बसचा प्रवास करीत नवाद्याला पोचलो. कुठलेंहि गांव आलें की दामाजींच्या खर्ज्यात "संत विनोबा अमर हो !" 'भूदानयज्ञ-सफल हो ! 'गरीब जनता अब न सहेगी । धन और धरती बंटकर रहेगी ।' हे 'नारे' सुरू होत.

नवाद्याला डाक बंगल्यात पोचताच माताजींनी अंघोळ केली आणि निपचित पडल्या ! त्या उन्हाने त्यांना अगदी गारद केलें. मी कामाला लागायला तयार होतो. पण मलाहि बळजबरीने विश्रांति देण्यात आली. ती पथ्यावरच पडली.

सुमारे तीन-पंधराला कार्यकर्त्यांची सभा झाली. नवादा सबडिविजन मधूनच सुमारे १०० कार्यकर्ते आले असावेत. दामाजीचें अध्यक्षीय भाषण कळकळीचें व अनुभवजन्य प्रतीतीचें झालें. अतिशयोक्ति त्यांच्या मानाने बरीच माफक होती. माझें भाषण व प्रश्नोत्तरें ऐकायला तू असतीस तर तूदेखील 'अद्भुत' हेंच विशेषण लावलें असतेंस. तुझ्या या गुणहीन बापाचीहि प्रतिभा एकादे वेळीं चमकून उठते ! प्रश्नोत्तरांनंतर वैयक्तिक गांठी भेटी, वर्तमानपत्रांच्या बातमीदाराची मुलाखत इत्यादि कार्यक्रम झाला.

सार्वजनिक सभा रद्द केली. रामनवमीमुळे लोक मेळयाला निघून गेले होते. गांवांमध्ये शुकशुकाट होता. मारुतिरायांच्या चित्राचे भले मोठाले लाल ध्वज घेऊन लोक दिंड्या काढतात. काही ध्वज जरीकाठीहि असतात. बाजारात जिकडेतिकडे विकायला ठेवलेले हे ध्वज फडफडतांना आढळतात. आपण निघालो त्या दिवशीं रांचीलाहि ते होतेच.

रात्रीं ९ ला परत आलो. प्रवास जीपमधून चांदण्यात झाला ! १०.३० ला डालमियांकडे जेवलो आणि त्यांच्याच 'साधनाभवन' बंगल्यात झोपायला आलो.

गया.

२३.३.'५३.

०

काल भागवत रामनवमी. अनेक घरांवर कपिध्वज फडकत होता ! कालचा दिवस अनेक दृष्टींनी मोठा भाग्याचा व लाभाचा ठरला. सकाळीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१० ला दामाजी बरोबर वसने निघून ११ ला टेकारीला आलो. टेकारीथाना हें मृदूचें कार्यक्षेत्र. मृदु भेटली. शाळेत भाषण केलें. जितकें गोड तितकेंच स्फूर्तिदायक ! नागरिक कार्यकर्ते आणि अगदी धाकटे विद्यार्थी, सगळ्यांच्या मुद्रेवर व्याख्यान उमटलें, त्यांचे डोळे चमकू लागले, "तुमचें तारुण्य कधीच क्षीण होणार नाही." विमलाबहनची आठवण लोकांना अर्थातच झाली. १२ ला निघून सियाडीहला गेलो. 'सिया' म्हणजे 'सीता' आणि 'डीह' म्हणजे 'गांव'. रामनवमीच्या दिवशीं सीतापुरला गेलो. लोकांनी दिंडी काढली. माझ्या हस्ते तलाव खणण्याचा मुहूर्त झाला. मृदूच्या हस्ते कंपोस्ट खताच्या खळग्याचें उद्‌घाटन झालें. मी जाहीर भाषण केलें. त्या मातीतील स्फूर्ति शब्दात उमटली. 'परशुरामाच्या अपयशाचें बीज', 'हरिश्चंद्राच्या शरीराचें मोल,' 'कांचनमृग म्हणजेच माया-मृग,' 'सोन्याची लंका' 'नांगरलेल्या जमिनीत गवसलेली भाग्यलक्ष्मी,' लोकमाता, या मुद्यांचें. रामनवमीच्या अनुरोधाने मधुर, मार्मिक, प्रेरणात्मक विवेचन केलें. टेकारी व सियाडीह येथे पंधरा-पंधरा मिनिटेंच बोललो. लोक हुरळून गेले. म्हणाले, "असलें भाषण जन्मात पहिल्यांदा ऐकलें, आम्ही तें कधीच विसरणार नाही !" मी म्हटलें, "सोन्याची लंका लोकांच्या जठराग्नीच्या भडक्यात भस्म होईल. तुमचे विभीषणाचें घर आहे !"

दोन वाजले. पुन्हा जीपने टेकारी. भूमाता आपला गुलाल उधळत होती. सूर्यनारायण तळपत होता. सूर्यापेक्षा धूळ अधिक तापते याचा अनुभव येत होता. टेकारीला सुमारे २.१५ ला जेवायला बसलो. ३ ला पुन्हा तडक निघून गयेला आलो. ४ वाजले. ४ ते ५ गया कॉलेजात भाषण केलें. प्राचार्य म्हणाले. 'इतकें सूक्ष्म, रोचक व सुबोध विवेचन उभ्या आयुष्यात आजच ऐकलें !' टेकारीचीं मुलें, सियाडीहचे नागरिक आणि गया कॉलेजची मंडळी म्हणाली "ऐसी मेवा-मिठाई कभी नहीं मिली !"

सायंकाळीं ५.३० ला जाहीर भाषण झालें. आझाद पार्कात कम्युनिस्टांची सभा होती. लोकांना जागेची नीट व निश्चित माहिती नव्हती. सभा आटपशीर पण निवडक लोकांची झाली. ×× चें भाषण त्यांच्या मानाने बरेंच समंजसपणाचें आणि फारच कमी असंबद्ध झालें. दामाजींचीं भाषणें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्यामानाने कळकळीचीं व परिणाम कारक होऊ लागलीं आहेत. शेवटीं माझं भाषण झालें. समाजवादी कार्यकर्ते, इतर कार्यकर्ते व नागरिक म्हणाले, "जिसने यह भाषण नही सुना, वह वंचित रह गया! जिसने सुढेरी में भाषण सुना वह उम्रभर नही भूलेगा!" गया जिल्ह्यातील कार्यकर्ते हुरळून गेले. म्हणाले, "ऐसे भाषण कोई नहीं करता. ये भाषण छोटे-बडे, पढे और अपढ सबके लिए होते हैं।"

लोकांनी बरें म्हटलें म्हणजे बरें वाटतें. पण जेव्हा माताजी व इतर लोक "विनोवा के बाद इन्हींका स्थान है; गृहस्थ होकर तपस्वी, त्यागी, संन्यासी से बढकर हैं, इसमें जरा भी अत्युक्ति नहीं है इ० इ०" भाकड गोष्टी बोलतात तेव्हा मात्र पोटात धस्स होतें आणि कळमळायलाहि लागतें. मनू, तुला माझी मन:स्थिति कळू शकेल. लोकांची स्तुति जर गोड वाटते तर निंदा कडू वाटते हें खरें असलें तरी अवास्तव स्तुति कशी मानवावी बरे? खोटी निंदा असली तरी आतील वस्तुस्थितीच्या प्रतीतीमुळे ती सहन करता येते.

सकाळीं माताजींना घेऊन दामाजी व मी विष्णुपदाच्या दर्शनाला गेलो. यथासांग दर्शन घेतलें. श्री शंकराचार्यांच्या मठांत दामाजींच्या प्रेरणेने स्तोत्रें स्फुरलीं! माझ्या गर्दभस्वरालाहि शंखध्वनीचें गांभीर्य आलें.

माताजी फार खुश झाल्या. म्हणाल्या, "प्रवास करावा आणि बघावें दादांबरोबरच. म्हणून तर मुली खुश असतात."

दुपारीं ३ ला जीपने निघून जहानाबादला गेलो. सकाळीं कन्या-कुमारी जगदंबेची मूर्ति पाहून मला माझ्या कन्या-कुमारींचें स्मरण झालें होतें. जहानाबादला जातांना बेला, मखदूमपुरच्या भूमीच्या दरेक इंचावर माझ्या मनूची सही होती. माझ्या 'बेटी'च्या बेदौलच्या भाषणाचीं रसभरीत वर्णनें मला सुखवीत होतीं.

जहानाबादला सार्वजनिक भाषण झालें. प्रतिभेला उन्मेष कोठून आले न कळे! कार्यकर्ते म्हणाले, "दिमाग साफ हो जाता है" समाजवादी म्हणाले "आपके भाषण के बाद हमारे पास आत्मसमर्थन की सामग्री इकट्ठी हो जाती है। हम आपके भाषण कंठ कर लेते हैं।" साहित्यिक म्हणाले, "यह

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाषा वैभव इतने सहज रूपसे कैसे आता है ?" दुपारीं राजकुमारीजींना आमच्याबरोबर येता आलें नाही तेव्हा त्या म्हणाल्या, "ऐसे भाषणोंसे जी थोडे ही अघाता है ?"

नंतर वीस मिनिटें कार्यकर्त्यांकरिता भाषण केलें. कार्यकर्ते म्हणाले, "इन भाषणोंसे हम नयी जिंदगी पाकर जाते हैं !"

गयेला यायला कचरत होतो. पण आल्यासारखें चीज झालें. तडक निघालो. स्टेशनावर आलो. आता डून एक्सप्रेसने मनूच्या भेटीकरिता रवाना झालो आहे.

गया
२५.३.'५३.

●

ठाकुर साहेब व दादाभाई यांच्या पंक्तीचा लाभ मिळावा म्हणून जेवायला इकडे आलो. जी मोटार परतवाड्याला घेऊन गेली होती; ती पंधरा मिनिटांनी परत येण्याचें आश्वासन देऊन गेली. पण तें आश्वासन मुत्सद्याचें आश्वासन ठरलें. १२० मिनिटें वाट पाहून मी भैयाकाकांबरोबर टांग्यातून निघालो. टांगेवाल्याच्या घोडीच्या तंगड्यात जितका कमी जोर होता, तितकाच जास्त जोर त्याच्या टकळीत होता. चार स्वाऱ्या भरल्या. कचेरीत भैयाकाका व एक स्वारी उतरली. टांगेवाला स्वाऱ्यांना साद घालीत होता. इतक्यात घोडी गुंतून खाली पडली. मोठ्या युक्तीने उभी केली. म्हणाला, 'बसा!' माझी शांति ढळली. म्हटलें, "आम्ही कसाब नाही!" इतक्यात भोंगे वाजवीत व आक्रोश करीत आमची मोटार आली. एक प्रवेश संपला. टांगेवाला घोडी दामटीत निघून गेला! पुढल्या निवडणुकीत मंत्री झाल्यावांचून राहत नाही. एकूण वाहनांच्या बाबतीत अजून आपले ग्रह बदलले नाहीत.

भूदान-यज्ञ शिबिर. अचलपुर.
२४.४.'५३.

●

आज हरद्याला पोचल्यावरोबर तुला एक कार्ड लिहिलें. १०.१५ हरद्याला पोचलो व ११.३० ला लँडरोवरने निघालो. उन्ह मी म्हणत होतें. गरम वारे सुटले होते. १६ मैलांचा प्रवास करायला दीड तास लागला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्रास मात्र झाला नाही. येतांना वाट चुकलो. पण त्या चुकीचा परिणाम मोठा गोड झाला. आम्हाला जवळचा व सरळ रस्ता सांपडला. माझी दरेक चूक जर अशीच माझ्या पथ्यावर पडत गेली तर ? देवाची केवढी कृपा होईल ?

रात्रीं आगगाडीची मोठी गंमत झाली. एके ठिकाणीं सिग्नल न दिल्यामुळे गाडी बराच वेळ उगीचच उभी राहिली. कारण काय, तर म्हणे स्टेशन मास्तर झोपी गेला. गाडीच्या गार्डाने जातीने जाऊन स्टेशनमास्तरांना जागें केलें. ही कदाचित् दंत कथाहि असेल. पण लोकांना ती खरी वाटली हें कशाचें द्योतक आहे ?

इटारसीला भुसावळ पॅसेंजर एक तास उशीरा आली. संडासातील नळाची तोटी बिघडली होती. स्टेशन मास्तरांकडे तक्रार केली. ते म्हणाले, गाडी आधीच उशीरा आली आहे. आपली तयारी असल्यास आणखी गाडी थांबवून घेतो. पण, गाडी आल्यावर डवे तपासण्याची जबाबदारी कोणालाच वाटली नाही !

हरदा तालुक्यातील एडि० डी० सी० ने स्वयंस्फूर्तीने भूदान-यज्ञाला स्वतःची थोडी जमीन देऊन आमच्या प्रवासात भाग घेण्याचा उपक्रम केला आहे. प्रत्यक्ष सरकारी रीतीने काम होत नसलें तरी त्यांच्या वजनाचा उपयोग मात्र होत आहे. विनोबांनी अलीकडे उपनिषदांच्या एका आदेशा-प्रमाणे लोकांना शोभेने, संकोचाने अगर लाजेमुळे, भीतीने व जाणिवेने दान करण्यास सांगितलें आहे – श्रिया देयम्, ह्रिया देयम्, भिया देयम्, संविदा देयम् । त्यांच्याप्रमाणेच जयप्रकाशबाबूंनाहि वाटतें की रक्तपात टाळण्याच्या बुद्धीने, स्वर्गाच्या लोभाने किंवा लोकांच्या भीतीमुळे जरी दान केलें तरी त्या पुण्यक्रियेच्या अंगभूत गुणानेच हृदय परिवर्तन व मनःशुद्धि होईल. लाक्षागृहात राहणाराने आग लागण्याच्या भीतीने जरी गृहत्याग केला तरी त्यात शहाणपणा आहेच. मला हें कळतें. पण मानवत नाही. माझ्या वृत्तीला तें रुचत नाही. मर्यादेला जमत नाही.

दुपारीं तजपुऱ्याची सभा खूप मोठी झाली. मंडप उभारला होता. पण गरम झळा मात्र सारख्या अंगाला लागत होत्या. घशाला कोरड पडत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होती. नुकताच प्रवास करून आलो होतो. जेवल्याबरोबर भाषण करावें लागलें. सभेला अनुरूप भाषण झालें नाही. तेथून सभेनंतर निघून कच्च्या रस्त्याने रात्रीं येथे आलो. सभा बरी झाली. भाषण झकास झालें. दोन्ही ठिकाणीं १०० /१०० एकर जमीन मिळाली. जास्तीत जास्त दान १० ते १४ एकर.

प्रजा सोशालिस्टांपैकी प्रेमवासनिक एम्. एल्. ए., कांग्रेसचे मगनलाल कोठारी, चंपालाल सोकल, लक्ष्मणराव नायक इत्यादि मंडळी बरोबर आहेत. तमंच्यापैकी सुरेंद्र तिवारी व बाबा मोहोड आहेत.

आज दादाभाई सोनतलाईला दुपारीं येऊ शकणार नाहीत. ते संध्याकाळीं नीमगांवला येतील. सोनतलाईला भर उन्हात १ ला पोचू.

रात्रीं मेजवानी कच्च्या भाताची व गिळगिळीत जाड पोळ्यांची झाली. तीहि अगदी 'शून्य घडी' ला (zero hour) ला. त्यामुळे आजच्या तारखेतहि जमेस धरता येते.

प्रवासात.
३०.४ व १.५.'५३.

म्हसळ्याहून १.३० ला निघून ३.२० ला गोरगांवला आलो. मध्ये एक खाडी ओलांडली. सायंकाळीं ४ ते ५.३० भाषण झालें. अस्खलित वक्तृत्वाला बहार आला! मोत्यांप्रमाणे शब्द! मोत्यांच्या हाराप्रमाणे वाक्यें! वेग व स्वर पकड घेणारे!

गोरेगांवहून ४.४५ ला निघून ६.४५ ला येथे आलो. महाड महाबळेश्वराच्या पायथ्याशी आहे. अहीमहींच्या नगराची जागा हीच. गांधारी नदीवर व खाडीवर आहे. महाबळेश्वर अवघें २३ मैल व रायगड १८ मैल.

महाड म्हणजे तुझ्या आचार्य भागवतांचा गांव. शिवराम महादेव परांजपे व गोविंद चिमणाजी भाटे इथलेच. दादासाहेब मावळंकर येथील मराठी शाळेत शिकले. 'गोविंदाच्या गोष्टी'तील सह्याद्री-वर्णनाची सहजच आठवण होते.

या कुलाबा जिल्ह्यात अनेक थोर व्यक्ति जन्मल्या. 'जनतेचे प्रातिनिधिक स्वराज्य स्थापू' अशी घोषणा करणारे वासुदेव बळवंत फडके शिरढोणचे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लोकांचें व्यापक स्वामित्व स्थापन करण्याचा संकल्प करणारे विनोबा गागोद्याचे. बाळाजी विश्वनाथ पेशवे श्री वर्धनचे. 'रागिणी' कर्ते वामन मल्हार जोशी गोरेगांवचे. चिंतामणराव देशमुख रोहे येथे राहणारे. पालें नाथजींचें !

दर ठिकाणीं लोकांनी तुझी चवकशी केली. अलिबागला तर वायकांची सभाहि ठेवली होती. सगळ्यांचा विरस झाला. कार्यक्रम वेळेवर व व्यवस्थित झाले. कोंकण म्हणजे पद्धतशीरपणा, वक्तशीरपणा आणि बेतशीरपणा. सगळी सोय अगदी तुझ्या कसोटीला उतरली असती. राहण्याची सोयदेखील. फक्त रस्तेमात्र डोंगरी, नागमोडी, अतिशय वाईट. प्रवास सगळा मोटारीचा एवढें मात्र तुला नडलें असतें.

माझ्या नैसर्गिक वक्तृत्व-कलेला लाउडस्पीकरच्या अभावीं आलेला बहर पाहून तुला धन्यता वाटली असती. त्या कलेचा नित्यनूतन आविष्कार पाहून तुला पाणीदार मोत्यांची वैजयंती आठवली असती. आवाजाचा टप्पा व स्वरहि बेताचा साधला. अगदी तुझ्या आदर्शाप्रमाणे कला नटली !

—महाड.
५.१०.'५३.

काल रात्रीं महाडला ९.३० ते १०.४५ जाहीर भाषण केलें. आजच्या नंतर प्रवास संपुष्टात येणार होता म्हणून काल जरा विस्तृत भाषण केलें. लोकांच्या मेंदूतील जाळीं व कोळीष्टकें निघालीं. फार खुश झाले.

आज सकाळीं ८.१५ ते ८.५० महाड शाळेत भाषण केलें. लाऊड स्पीकरमुळे फारच हळू बोललो. भाषण म्हणजे भाषण झालें. कमालीचें 'माधुर्य !' मुलें मुग्ध झालीं.

९.४५ ला निघून ११ ला इंद्रपुर. ११ ते १२ भाषण. अशिक्षित खेडवळाला जागा करून थरारून सोडण्याचें सामर्थ्य आजहि माझ्या वाणीतून प्रकट होऊ शकतें याचा प्रत्यय आला. अशिक्षितांमध्ये भाषण सर्वतोमुखी झालें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१.४५ ला निघून २.१५ ला कोलाड. कोलाडला लोक खूप जमले होते. सगळे खेडचापाडचातील. ते भजन-मंडळांच्या शर्यतीकरिता जमले होते. एकमेकांना ग्रंथांतील कूटप्रश्न व संदर्भ विचारण्याचा सामना चालू होता. इकडे छकडीच्या बैलांचे सामने होतात. शर्यतीचे खास बैल असतात. तसा हा बौद्धिक सामनाहि होतो.

२.१५ ते ३ भाषण केलें. उघडचावर. आकाशात गडगडाट होता. खाली चिखल. वर उन्ह. लोक उभे. त्यांचीं मनें व्यग्र. सावणवाल्याप्रमाणे शिरा ताणून ओरडलो. भाषण वारगळलें ! व्यर्थ कंठशोष !

३.३० ला निघून ४ ला येथे आलो. गोरेगांवपासून विष्णुभाई म्हणून एका उमद्या तरुणाने स्वतःच्या मोटारीतून येथपर्यंत आणून पोचविलें. डोंगरांचें पावसाळी वैभव बघण्यासारखें आहे. धबधबे लांबून दक्षिणेतील गोपुरांवरील निंबार्क संप्रदायाच्या गंधाच्या पट्टचासारखे दिसतात ! काही ठिकाणीं डोंगरांनी मोत्यांचे चंद्रहार घातल्याचा भास होतो.

तुझी उणीव मला जाणवली.

—रोहें.

६.१०.'५३.

मी अगदी लहान मुलाच्या निरभिमानतेने आपली 'फुशारकी' तुझ्याजवळ सांगतो. पण तितक्याच प्रांजळतेने हेंहि सांगू इच्छितो की माझ्या अल्पतेची जाणीव मला उत्तरोत्तर होत आहे. या देशाला विराट् पुरुषाची गरज नाही. अल्पात्म्याचें तर वावडेंच आहे. विश्वात्मा हवा. निदान पक्षी महात्मा. मला ना आकार ना गुण. त्यामुळे तोकडा पडतो. माझ्यापेक्षा उन्नत व उदात्त व्यक्तित्व पाहिजे. अधिक जोमदार, भरदार व निर्मळ सत्त्वाच्या माणसाने जर हें काम उचललें, तर चमत्कार होईल. कार्यकर्ते व नागरिक मला म्हणाले, तुम्ही आम्हाला 'नवीन दर्शन' प्राप्त करून दिलें ! तुमच्यासारखीं माणसें पाहिलीं म्हणजे त्यांना कृतीचीहि प्रेरणा होईल. माझी तुझ्यावर भिस्त आहे.

करजत.

७.१०.'५३.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल संध्याकाळीं ५.३० ला निघून ९.३० ला रात्रीं येथे पोचलो. मध्ये 'मोटारबेगम' ने थोडी 'नजाकत' दाखविली. एक चाक खचलें. त्रास झाला नाही. अनुगूलला रात्रीं मंडळी 'पेशवाई'ला आली होती. शंख वाजले, दुंदुभींचा निनाद झाला. बंगाली स्वागत झालें. औपचारिक स्वागत मी सहन करून घेतो. थोडी फार सवय झाली. तरी मला अवघडल्यासारखें होतेंच. पण जेव्हा स्वागतात जिव्हाळा असेल व सत्कारात श्रद्धा असेल तेथे मात्र मला मेल्याहून मेल्यासारखें होतें. आपण या स्वागताचे अधिकारी नाही. ही टोंचणी मनाला लागते. जेथे स्वागत औपचारिक असतें तेथे पाहुण्याच्या थोरपणाविषयीं भावनाहि नांवाचीच असते. पण या स्वागतात पाहुणा थोर मानला जातो. त्यामुळे आपण अनिच्छेने महान् लोकप्रवंचनेला कारणीभूत होत आहोत ही जाणीव बोचत राहते. अगदी शांतिनिकेतनच्या थाटाच्या त्या कमानी, ते रंगीत मंगलघट, त्या रांगोळ्या, त्या अनुपम झोपड्या आणि त्यात माझें निरुपम स्वागत! 'दे माय धरणी ठाय' झालें मला! कार्यनिष्ठा नसती तर, अगदी खरें सांगतो, लोकनिवृत्त झालो असतो.

मालती चौधरी यांचा आश्रम म्हणजे पवित्र आणि अकृत्रिम सदभिरुचीचा आविष्कार. या झोपड्या जितक्या सुबक व नीटनेटक्या तितक्याच स्वच्छहि आहेत. रंग मातीचेच पण मोठे नयनमनोहर. अंघोळीची व्यवस्था, शौचकूप, सारें काही अगदी उत्कृष्ट. झोपड्यावरील चित्रें थेट नंदबाबूंच्या नमुन्याचीं. शांतिनिकेतनाच्या कलाविभागात आल्यासारखें वाटतें. सारें काही सहज सुंदर आहे. सगळीकडे कलामय साधेपणा आहे, प्रसाधन निरपेक्ष शोभा आहे. तू या झोपड्या व त्यांतील सजावट पाहून बेहद्द खुश झाली असतीस. बसण्याचे बांक-वजा पाट, त्यांच्यासमोर अर्धचंद्राकार बसकीं मेजें, मोठा मजेशीर आहे सारा थाट! मालतीदेवी या बाबलाच्या सासू. त्यांचे यजमान मुख्यमंत्री आहेत. भुवनेश्वरला राहतात.

अनुगूल
३.११.'५३.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल सकाळीं कपडवणजला चि० वावलाचें विनोबांवर भाषण झालें. फारच मार्मिक, रसपूर्ण व समर्पक. मी तल्लीन झालो. नंतर मी भूदानावर भाषण केलें. दुपारीं मोटारने येथे आलो. येथील शिबिर बवलभाईंचें आहे. जुगतराम काका पुन्हा भेटले. जुगतराम काकांच्या चर्येवर सौम्य शांतीची व आत्मतृप्तीची शीतळ कांति दिसते. आणि बबलभाई ? तपामध्ये जी तरतरी व टवटवी, नाजुक सुगंध आणि माधुर्य असू शकतें त्याची प्रभा त्यांच्या व्यक्तित्वातून सहज फांकते. तुझ्या आवडत्या वकुल फुलासारखा कोमल सुगंध दरवळतो त्यांच्या व्यक्तित्वातून. रविशंकर महाराजांच्या व्यक्तित्वाची उंची गुजरातेत कुणातच नाही. पण जुगतराम काका व बबलभाई यांचेंहि स्थान फार उच्च आहे. बबलभाईंनी ताईंची आठवण केली.

काल दुपारीं येथील शिबिरात बौद्धिक घेतलें. इटोल्याचें बौद्धिक अद्वितीय होतें. श्रोत्यांपैकी काही जबाबदार व्यक्ति म्हणाल्या, "विनोबांच्या चांडिल प्रवचनानंतरचें स्थान या प्रवचनाला द्यावें." येथील बौद्धिक सुबोध मधुर झालें. रात्रींचें भाषण मात्र होपलेस ! मागल्या वर्षी येथे जाहीर भाषण झालें होतें. तें अजून येथील लोकांना आठवतें. कालचें मात्र अगदीच टाकाऊ !

भाषणांचें राहू दे. मियां मातर शिबिरानंतर वत्सलावहन नांवाच्या मुलीने व नानूभाई नांवाच्या प्रमुख कार्यकर्त्याने जें संयुक्त कार्ड पाठविलें त्यांतील दोन वाक्यें तुलाहि बहुमोल वाटतील. दोघेहि लिहितात, "दो दिनमें ऐसा महसूस हुआ कि हम हमारी माता से मिल रहे हैं। इतना आपका प्रेम आपके साथ विना वातचीत से मालूम होता था।" माझ्या हृदयावर हीं वाक्यें कोरलीं गेलीं.

आज पत्र लिहीत आहे. पण पाठवू कोठे ? अनायासें उद्याचा कार्यक्रम रहित होत आहे; उद्या अहमदावादहून पाटण्याला फोन करीन. सबंध प्रवासात चि. वावला व प्रबोध चौकसी हे दोन 'संगीन तमंचे' आहेत. तेव्हा त्रास होण्याचें कारणच नाही. गुजरातच्या प्रवासात एक तरी स्वामी भेटतातच. या शिबिरापासून एक स्वामी आमच्या तुकडीतच सामील झाले आहेत. संस्कृतचे पंडित आहेत. माझी 'पाटी' शुद्ध करून घेण्यास त्यांचा उपयोग होतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रात्रीं मोढासा येथे जाहीर भाषण केलें. लोक वरेच आणि शिकलेले होते. भाषण श्रोत्यांना आवडलें. पण इटोला येथील जाहीर भाषण वगळलें तर माझ्या मनासारखें जाहीर भाषण या यात्रेत मी करू शकलो नाही. शिबिरातील भाषणात मात्र मी सारा जीव ओतला. दर शिबिरात नवीन मुद्दे व विषय सुचत गेले.

चिंतन आणि आत्मपरीक्षण सारखें चालू असतें. माझें यज्ञ-दान-तपादि कर्म हेंच.

'तुम्ही आम्हाला नवीन डोळे दिलेत.' 'तुम्ही आमच्या आयुष्यात-क्रांति केलीत,' तुम्ही आमच्या बुद्धीला नवीन वळण लावलेंस.' असे उद्‌गार शिबिरातील बऱ्याच तरुण कार्यकर्त्यांनी काढले. 'तुमची मांडणी ऐकली म्हणजे हेंच सत्य आहे अशी पक्की खात्री पटते' असें बुद्धिवादी लोक म्हणाले, येण्याचें सार्थक झालें.

मोडासा येथील सभा आटपून रात्रीं १०.३० ला निघून ११ ला धनसुऱ्याला परत आलो. आज पहाटे ४.३० ला उठून मोटारस्टॅन्डवर गेलो. पहिल्या बसमध्ये जागा नव्हती. सकाळीं ६ ला दुसऱ्या बसने निघून तळोदला आलो. आता अहमदाबादच्या गाडीत बसलो आहे.

साबरमती आश्रमात उतरलो. या पाळीला 'हृदयकुंज' मध्ये बापूच्याच जागेत. भद्रकप्रमाणे अगदी त्यांच्या खोलीत नव्हे. आपण त्या भूमीवर पाय ठेवून पावित्र्याचा अनादर करीत आहोत कीं काय असें वाटल्यावांचून राहत नाही. मंडळींनी विचारलें, "विमलाबहन क्यों नहीं आयी ? वे कहां हैं ?" पेटलादला तुला जे गृहस्थ आणंदहून घेऊन गेले होते ते धनसुरा येथे होते. तुझी आठवण केली त्यांनी.

आज मथुरीताईंनी प्रार्थनेत जें भजन म्हटलें त्याने सारा जीव भारून निघाला. माझी वाचाच बंद झाली. एरवीहि पू० बापूंच्या प्रार्थना भूमीवर मी कसा बोलला असतो ? इतकें धाष्टर्य मला निर्लज्जालाहि नाही !

धनसुरा, आगगाडी, अहमदाबाद.
२१,२२,२३. ११.'५३.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एक पत्र तुला काल पाठविलें. काल राजकोटला वजूभाई व ढेवरभाई यांच्या संयुक्त बिऱ्हाडी उतरलो होतो. चीफ मिनिस्टरचें घर, पण सामान-सुमान नाही, गालिचे नाहीत, एक ही खुर्ची नाही, शिपायांना पोषाक नाही, पहारा मुळीच नाही. एकाद्या सामान्य कारकुनाचें घर तरी अधिक सजविलेलें असतें. अगदी साधें घर पण स्वच्छता आहे. एक मजली. एकाद्या खेड्यातील मराठी शाळेसारखें. वजूभाई म्हणजे 'मंत्रि-निर्मिति'. त्यांचेंहि बिऱ्हाड तेथेंच. तिसरे प्रहरीं शिक्षकांची सभा झाली. खूप मोठी सभा झाली. अर्ध्या तासात शिक्षकाच्या सामाजिक भूमिकेचें विवेचन केलें. भाषण उल्लेखनीय झालें. त्यानंतर ५.३० ते ७.३० सामुदायिक कताई, सामुदायिक प्रार्थना व माझें भाषण. ३० तारीख होती. दर तीस तारखेला हा कार्यक्रम असतो. कनु गांधीच्या राष्ट्रीय शाळेत होता. भाषणाचें दरेक वाक्य माझ्या हृदयातील निष्ठेने ओथंबलेलें होतें. त्यात कलाहि पहिल्या प्रतीची होती. श्रोते तल्लीन झाले.

रात्रीं ११ ला निघून सुमारे १२ ला ओखा येथे पोचलो. तडक होडीत बसून तीन मैल खाडी ओलांडून 'बेटा' वर गेलो. बेटावरील वस्ती बरीच मोडकळीला आली आहे. देऊळहि घुमटाचें नाही. साधें वाड्यासारखें. देवदर्शन घेतलें. घाईघाईने परतलो. बसने द्वारकेला आलो. द्वारका त्या मानाने टुमदार आहे. समुद्रावर व गोमती तीरावर. गोमतीच्या मुखावर अगदी सभा शाळेत झाली. शाळेचें स्नेहसंमेलन, एक पुनीतजी म्हणून भजनी गृहस्थ आहेत त्यांचें भजन व मध्येच माझें भाषण – अशी योजना होती. सभा विखुरलेली होती. पण शाळेच्या संमेलनाच्या घाटाची. माझें भाषण अगदीच टाकाऊ झालें. तू कानांत बोळें घातलें असतेंस ! माझ्या ठिकाणीं तें व्यक्तित्वहि नाही आणि तेवढी अमोघ कलाहि नाही. अशा सभा काबीज करण्याची शक्ति माझ्या अंगीं नाही. मला ती उणीव आज जाणवली !

सभेनंतर देवदर्शनाला गेलो. देवळाची भव्यता व स्थापत्य काही औरच आहे. देऊळ मात्र जुनें झालें आहे, डागडुगी चालू आहे. गोमतीवर जाऊन खाऱ्या पाण्याची चूळ भरून आलो. अंघोळहि खाडीच्या खारट पाण्यातच केली होती. आता संध्याकाळच्या गाडीने परत राजकोटकडे निघालो आहोत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सकाळीं एका खेड्यावर खेडुतांची मोठी परिषद झाली. वाक्यश: अनुवाद झाला. तिसरे प्रहरीं विशिष्टांची सभा क्रांति-प्रक्रियेतील स्थित्यंतराचें विवेचन केलें. संध्याकाळीं जाहीर भाषण. मुख्यमंत्री सर्व भाषणांना होते. त्यांचा अधिक परिचय झाला. 'गांधी-छाप मंत्रिमंडळ' म्हटलें जातें. वजूभाई व त्यांच्या पत्नी जयाबेन हें जोडपेंहि दोस्त बनलें. कनुभाई व आभा दोघेहि बरोबर येणार होती. पण आयत्या वेळीं आभाची प्रकृति किंचित् अस्वस्थ झाली. तेव्हा आमचें पूर्वीचेंच टोळकें आहे. आमट्यांकडे निघालो आहे.

द्वारका.
१.१२.'५३.

●

काल सकाळीं १०.३० ते १२ पहिली सभा जामोदला झाली. अगदी उन्हाळ्यासारखें उन्ह. तरी लोक उन्हात बसले. मीहि उन्हात बसलो. सभेत नि:शब्द शांतता नांदली. दुसरी सभा १ ते २ संग्रामपुर येथे झाली. खूप लोक जमले. तिसरे प्रहरीं टुणकी येथे प्रश्नोत्तरें झालीं. संध्याकाळीं एकलारा येथे चर्चा व प्रश्नोत्तरें. नंतर मोटारभवानी रुसली. डोळेच मिटून बसली. मिन्नतवारी व धाकदपटशानंतर डोळे उघडले. संतापाने फुत्कार सुरू झाले. रात्रीं १० ला येथे आलो. १०.३० ते १२.३० सभा चालली. ५ हजार माणसें पांच तास बसलीं होतीं. उन्ह-पाऊस, थंडी-वारा, अंधार-उजेड कुठल्याहि वेळीं लोक जमतात. मातीच त्यांना प्रेरणा देते! एक अमीर म्हणाला, "गरीब एकवटले म्हणजे पाहू!" मी सांगितलें, "मग पाहण्याची संधीच नाही. आणि शोभाहि नाही. मग ते पाहतील! शोभा आज आहे. पुण्यहि आजच आहे!"

सोनाच्छा.
४.२.'५४.

●

संध्याकाळीं ४.५० च्या बोटीने निघालो. फ्लेजा घाटावर मधुवनीच्या डब्याचा शोध केला. साधारण माहिती व निश्चित ज्ञान यांचें स्वराज्यातील नोकरवर्गाला वावडें आहे. अनमान धपक्याने प्रवास सुरू केला. डबा समस्तीपुरलाच तोडला गेला. लागलींच दुसऱ्या गाडीला जोडला गेला. केव्हातरी उत्तररात्रीं दरभंग्याला उतरलो. प्लॅटफॉर्मवर पथारी घातली. गात्रें सरळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केलीं. पहाटे ५ ची गाडीं ६.३० ला आली. आगगाडीचा घड्याळाशी संबंध नाही. दोन मुनि, दोन डॉक्टर, दोन पुढारी यांचें जर एकमेकांशी पटत नाही, तर दोन यंत्रांचेंच काय म्हणून पटावें? त्यांत घड्याळासारख्या क्षुद्र व किरकोळ 'यन्त्रिके'ची चाड आगगाडीसारख्या 'मार्गमहीषी'ने काय म्हणून बाळगावी?

उत्तरेकडील माणसांच्या मानाने दक्षिणेचीं माणसें अगदीच मिळमिळीत. आगगाडीला तिकिट लागतें हें येथील लोकांच्या गांवींहि नाही. 'वर्ग-निराकरण' त्यांनी आपल्या पुरतें केव्हाच करून टाकलेलें आहे. रेल्वे नोकरांना पैसे किंवा मार यांपैकी काय खायचें इतकीच निवड करायची असते. दक्षिणेकडील पंडे उत्तरेकडील काशी-प्रयागच्या पंड्यांच्या व गयावळांच्या पासंगाला पुरणार नाहीत. बेदरकारीच्या व आडदांडपणाच्या बाबतीत यांचा हात कोण धरू शकणार?

पुण्याला आपल्या डब्यात मराठी, सिंधी व दक्षिण भारतीय उतारू होते. सारेच एकजात भाषावारींच्या विरुद्ध! परवां काशी ते पाटणा एक वयस्कर बंगाली जोडपें होतें. तेंहि भाषावारीच्या विरुद्ध! आंतर प्रांतीय जीवनाची चव चाखलेला सामान्य नागरिक या 'तुकडेखोरी'च्या विरुद्ध झालेला दिसतो! 'जय हिंद!'

मधुवनी.
११.६.'५४.

ता० १३ ला रात्रीं ९ ला गाडी निघाली — सायंकाळीं ६च्या ऐवजी. गोपालबाबू अनायासें बरोबर होते. रात्रीं १२ ला उतरून समस्तीपुर खादी भांडारात गेलो. पावसाने फारशी गय केली नाही. ता० १४ ला सकाळीं ६.३० ला अवध-तिरहुत मेलने निघून ११.१५ ला कटिहार. खादी भांडार हुडकीत निघालो. अंघोळ, फराळ. कटिहारच्या लोकांनी काजू पहिल्यांदाच खाल्ला! दुपारीं २.२०ला निघून ३ला रानीपतरा. इंटर क्लासात कशी-बशी जागा मिळाली. सामान व माणसें यांच्या रेटारेटीत पिचून गेलो पण चिरडला गेलो नाही. रानीपतरा आश्रमात जाऊन स्टेशनावरून सामान मागवून घेतलें. वैद्यनाथबाबू भेटले. संध्याकाळीं प्रार्थनेनंतर थोडेसें भाषण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केलें. मला भाषण करायला सांगितल्यावांचून माझा सत्कार होत नाही असा सर्व लोकांचा प्रामाणिक समज आहे.

रात्रींच वैद्यनाथबाबू प्रवासी शिबिराच्या पथकावरोबर पायीं बिलौरीला गेले. मला आश्रमातच ठेवून दिले. ता० १५ ला सकाळीं जीपने मी बिलौरीला गेलो. ९ ते ११ 'चलता-फिरता' शिबिरात वर्ग घेतला. सुमारे ४०-४५ मंडळी २०-२२ गांवातून आली होती. दर गांवचीं दोन माणसें घेण्याचें धोरण आहे. It takes all sorts to make a world! तसें हें शिबिरहि एक लहानसें 'जग'च नाही का? खेड्यात काम करणारीं किंवा राहणारीं माणसें होतीं. भाऊ म्हटलें की, 'भाऊबंदकी' आलीच. गांव म्हटलें की 'ग्रामण्य'हि ठेवलेलेंच! बिलौरीला दोन गट आहेत. त्यांच्यात विस्तव जात नाही. एका भागातील सभेला दुसऱ्या भागातील अहंमन्य शिष्ट आले नाहीत.

संध्याकाळीं जाहीर भाषण केलें. रात्रीं पुन्हा ८.१५ ते ९-२० वर्ग. ९.४० ला जीपने निघून १०.३० ला कटिहार. गाडी रात्रीं ११ ला निघायला हवी होती. पण आमचा दुसऱ्या वर्गाचा डबाच मुळीं ११.१५ ला जोडण्यात आला. गाडीत तोबा गर्दी! आमच्या डब्यात मात्र मी धरून दोघेच. सकाळीं सोनपुरला उतरलो. पहाटे ५ ची गाडी ८.१० ला निघाली. अक्षरशः 'लगीन गर्दी'! दुसऱ्या वर्गात लोकांच्या सामानामध्ये कसावसा उभा राहिलो. बोट गांठलीं. केव्हा निघेल याचा नेम नाही. पत्र लिहीत बसलो.

मधून मधून कुठल्यातरी आश्रमात उतरण्याचा योग येतो. आश्रम शब्दाचें अगदी मातेरें झालें आहे. देवमंदिरापासून तो 'शयनमंदिर,' 'दुग्ध-मंदिर', आणि 'मदिरा मंदिरा'पर्यंत जशी 'मंदिर' शब्दाची शोभा करण्यात आली तशीच संभावना आश्रम शब्दाची होण्याचा रंग स्पष्ट दिसतो. गांधींने 'आश्रम' शब्द एका व्यापक अर्थाने रूढ केला. commune, प्राचीन गुरुकुल व आपली कुटुंब संस्था यांच्या वैशिष्टयांचा सुंदर समन्वय साधण्याचा त्यांचा हेतु होता. commune मधील ध्येयनिष्ठा व उत्कटता, गुरुकुलातील पावित्र्य आणि संयम, आणि कुटुंबातील सहजस्फूर्त जिव्हाळा व गोडवा यांचा संयोग आश्रमात आढळला पाहिजे. खेड्यातील लोक थोड्याशा गुणांचें देव्हारें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माजवितात त्याचप्रमाणे त्यागी व तपस्वी लोकांचा क्षुल्लक दोष पाहून खट्टूहि होतात. आश्रमात जर कित्ता घालून देण्यासारखें जीवन नसलें तर लोककल्याणाऐवजी लोक-चारित्र्याची हानि होण्याचाच संभव फार. कारण, या संस्था फक्त व्यक्तिगत किंवा पारलौकिक साधनेचीं उपकरणें नाहीत. त्यापेक्षा 'स्थायी शिविरें' वरीं.

मधुवनीला शेवटल्या वर्गात जातिवादाची मीमांसा केली. 'संस्कृतिवादी' सर्वोदयी वुजले ! आर्थिक विषमता अथवा वर्गवादाचें हिडीस स्वरूप लोकांपुढे मांडलें म्हणजे संग्रहशील माणसें चपापतात व बिचकतात. 'सत्तावादा'चें विश्लेषण केलें म्हणजे राजकारणी लोकांचा तिळपापड होतो. जातिवादाचें स्वरूपाविष्करण केलें म्हणजे जातिनिष्ठांचा जळफळाट होतो. 'हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितंमुखम्' तसेंच रहावें अशी मनातून सगळ्यांची इच्छा. मूठ झांकली आहे तोंपर्यंतच ती सव्वालाखाची !

फलेजाघाट, बोट.

१६.६.'५४.

काल सुमारे ११.३० ला निघालो. दरभंगा व सोनपुर येथे गाड्या वदलल्या. कोठेहि थांवावें लागलें नाही. 'बाढपीडित' प्रदेशाची चुणूक अनुभवायला मिळावी म्हणून मोतीहारी ते दरभंगा सुमारे अडीच तासांपर्यंत पाऊस आणि कोळश्याचा भुगा यांचा सतत मार खावा लागला. डब्याच्या वरच्या बाजूला पडदीच्या खिडक्या होत्या. पावसाची धार सरळ आत शिरत असे. डब्यात व बांकावर आणि सामानाच्या फळ्यांवर पाण्याची डवकीं सांचलीं. कपडे भिजले, सामान भिजलें, अंगहि भिजलें. कोळशाचे काळे काळे डाग कपड्यांना पडले. अशा थाटात सहा-सात तास मिरविलो. बिहपुरच्या प्रवासात मनूला आलेला अनुभव मलाहि यावा ही देवाची इच्छा. डब्यात पाऊल ठेवायला जागा नव्हती. टावेलाने पाणी टिपून तसाच वसलो. मोठी गंमत !

मुझफ्फरपुरला गाडी वदलली. कपडे वाळून गेले. आयतीच कोळशाच्या खाणीतील मजूराची ऐट मिरविता आली. श्रमजीवी पोषाक वदलण्यात कुठली शान होती ? तसाच वसलो बनारस मेलमध्ये.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सोनपुरला पुन्हा गाडी बदलली. पहेलजाला जहाजात बसलो. महेंद्रूला उतरलो.

पाटणा.
१९.८,'५४.

काल लहेरियाहून दुपारीं १२.४५ ला निघालो. मोटार म्हणजे 'हत्तीची दासी आणि गाढवाची सखी'! चाल हत्तीची आणि चिवटपणा व काटकपणा गाढवाचा. तंगड्या सरळ पडण्याचें कारणच नाही. ज्याप्रमाणे गाढवाच्या मागल्या तंगड्या सतत 'विठ्ठल विठ्ठल' करीत असायच्या त्याचप्रमाणे या मोटरचीं चाकें सारखीं एकमेकांकडे ओढलीं जायचीं! सुमारे २६ मैल अंतर तोडायला ३.३० झाले. यजमान म्हणाले, "मला ही सारी कल्पना होती. म्हणूनच मी दादांना आग्रहपूर्वक नाश्ता करवून आणलें. नाश्ता म्हणजे गिरणीच्या पिठाच्या कचोऱ्या. अर्थातच मी खाल्ल्या नाहीत. यजमान त्या वेळीं उपस्थित नव्हते. त्यांना लोकांनी सांगितलेंहि. पण मधुर अध्यासातून स्वतःची सुटका कोण करून घेणार?

विलायतेत दारू न पिणाऱ्या सोवत्याची इतर सोवत्यांना मोठी कदर वाटते. कारण त्याचा पेला त्यांना मिळतो. एका तरुणाला माझ्या नाश्त्याबद्दल विशेषच आस्था वाटत होती.

तिसरे प्रहरीं ४ ते ५.३० बौद्धिक. अगदीच पाणचट प्रश्न विचारण्यात आले. एक प्रश्न नवीन होता. पण अवघड. 'मनाची शांति कशी मिळवावी?' हा होता प्रश्न. मी काय उत्तर देणार? सांगितलें, 'मलाच ती लाभलेली नाही. माझें मन भलतेंच चपळ आहे. पण शांतीचा पाठलाग न करणें हीच शांति मिळविण्याची सर्वात नामी युक्ति आहे."

रात्रीं पुन्हा त्याच मोटारीशी गांठ. दीड मैलपर्यंत यजमानांनी आपल्या 'कीमती मोटर' मधून आणून पोचविलें. पुढे चिखलात रुतत, थवकत, अडखळत, रुसत, फुगत, धुसफूस करीत आमचा पौराणिक शकट चालू लागला. गोपालबाबूंच्या गांवाजवळ चिखलात रुतला. गोपालबाबूंच्या जावयाचे भाऊ व इतर माणसें यांनी पंकातून उद्धार केला. रात्रीं १० ला दरभंग्याला पोचलो. ८.३० ची गाडी अजून यायची होती आणि रात्रीं १.३० ची गाडी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वंदच झाली होती. आम्ही १.३० च्या गाडीकरिताच आलो होतो. आमचा संकल्प पार पाडण्याकरिता ८.३० ची गाडीच १२ ला आली. निघालो. आता ढोली जवळील जलमग्न प्रदेशातच सकाळचे ६ झाले.

धकजडी (वेनीपट्टी).
२.९.'५४.

आज सकाळीं ६ ला वसने निघालो. वस म्हणजे 'मायपोटा'ची प्रतिकृति. जो येईल त्याला जागा आहेच. कोण म्हणतें जगात लोकसंख्या वेसुमार झाली म्हणून ? जागेची उणीव वसवाल्याला कधी भासतच नाही. इतकीं माणसें कोठे आणि कशीं मावतात ते त्या 'सडकभवानी'लाच माहीत.

मध्ये वाळू, चिखल व दलदल तुडवीत नावेतून महानंदा नदी ओलांडली. यात्रेत उणीव राहू नये म्हणून नावेत वसल्यावरोवर सूर्याच्या लख्ख प्रकाशात हिमालय तळपतांना दिसला. ऋषि, मुनि आणि तपस्वी यांच्या तेजाची विभूति प्रत्यक्ष डोळ्यांपुढे उभी राहिली. या हिमालयाला उपमाच नाही. तो पांढऱ्या मेघासारखा आहे आणि नाहीहि, इंद्राचा ऐरावत, रुप्याचें गोपुर, आरसपानी घुमट, स्वच्छ पांढऱ्या स्फटिकाचे मनोरे, कशाची उपमा शोभत नाही. कारखान्यातील वर्फाच्या शिळेला त्याची सर येणें शक्य नाही. हा हिमालय हिमालयासारखाच आहे. दुसरी तुलना नाही.

पूर्णियाँ. (विहार)
१९.९.'५४.

सकाळीं झांशीहून एक कार्ड पाठविलें. झांशीचें स्टेशन म्हणजे माझ्याकरिता किती तरी गोड-तुरट स्मृतींचें निमित्त कारण ! मनूवरोवरहि कितीदा तरी त्या स्टेशनावर गेलेलो. सकाळीं ६.५०ला निघून सुमारे १० १५ला हरपालपुरला पोचलो. पाऊस सारखा 'मार्चिंग' करीतच होता. ओरछाला वेतवेचें भव्य दृश्य पुन्हा पाहिलें. मागे वोद्याहून जातांना तेंच दृश्य मनूच्या डोळ्यांनी वघितलें होतें. धसान नदीचें धरणहि सुंदर दिसलें. पावसाळ्यामुळे सारेंच खुलून उठलें होतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरपालपुरला खास मोटार किंवा मोटारीचें भूत—माझ्या दिमतीला दिलें होतें. कोचवजा बंद मोटार नव्हे, मोटारीचा सांपळा. पाऊस व वारा यांना सताड मुक्त द्वार ! अशा थाटात ३२ मैल आलो. पावसाने मात्र सबूर केली. नुसती हूलदेखील दाखविली नाही. ड्रायवरने आपल्या टोपीने एकदा मोटारची कांच जी पुसली. ती पुन्हा काही पुसावी लागली नाही. प्रवास अगदीच रुक्ष होऊ नये म्हणून येथून ४ मैलांवर ती पुराणकालीन महामाया आडली ! पुष्कळ, पुष्कळ ढकलून पाहिलें; पण व्यर्थ. शेवटीं बसला शरण गेलो. आमच्या मागोमाग मोटार-राणीहि एका ठेल्याची कांस धरून नव्या नवरीप्रमाणे मुरडत मुरडत येऊन दाखल झाली. मला मात्र काडीचाहि त्रास झाला नाही. देवाघरीं मी त्रास देऊनच आलो नाही त्यामुळे माझ्या वांटयाला तो येत नाही.

हा सारा प्रदेश म्हणजे छत्रसालाचा. महोबा हें दुर्गावतीचें माहेर. भूषणकवीने छत्रसालाचे गोडवे गाइले आहेत. "चाकचक चमूके अचाकचक चहुँ ओर; चाकसी फिरत धाक चम्पति के लाल की ।" शिवाजी व छत्रसाल या दोन त्याच्या स्तव्य विभूति. वाटेत छत्रसालाची छत्री लागली. नवगांव म्हणून एक टुमदार आरोग्य क्षेत्र लागलें. सगळा मुलूख डोंगराचा, किल्ल्यांचा, नद्या-खोऱ्यांचा, धरणा-तलावांचा ! छत्रपुरहि बरें आहे.

छत्रपुर (विंध्य प्रदेश)
१.१०.'५४.

०

जेसलमेर इतर शहराहून काही निराळेंच आहे. इकडील पिंवळा दगड प्रसिद्ध आहे. सारें शहर त्या दगडाचें बनलेलें आहे. दिसायला पिंगट आणि उदासवाणें बोडक्या इमारतींचें. पण दरेक इमारतीच्या दर्शनी भागावरील दगडी खोदकाम फारच नाजुक, मोहक आणि बारीक कलाकुसरीचें आहे. मध्ये डोंगरावर इंग्रजी कॅसलवजा किल्ला आहे आणि त्याच्याभोवती गांव आहे. किल्ल्यावरील जैनमंदिराचें खोदकाम प्रेक्षणीय आहे. देवळात एका तळघरात ताडपत्रावर लिहिलेल्या ग्रंथाचा बराच मोठा संग्रह आहे. मोगलांच्या तावडीतून मोठ्या शिताफीने या ग्रंथांचें संरक्षण केलें. आपल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृष्टीने जेसलमेरचें महत्त्व म्हणजे तें बाबूसाहेब व भीकूलाल यांचें मूलस्थान आहे.

जेसलमेर.

३०.१२.'५४.

आज पहाटे ३.३० नंतर मोटारने निघून देवघरला आलो. तेथून निघून येथे आलो. शाळेत मुक्काम आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांचें सारें जीवन सार्वजनिकच असावें, असा संकेत आहे. त्याचें उठणें, बसणें, खाणें-पिणें, शौच-स्नान, यांपैकी खाजगी काहीच नाही. यात्रेकरू, वाटसरू व लोककार्यकर्ता यांनी उघड्यावर जगावें, फार तर ओसरीत रहावें, विहिरीवर, नदीवर, तलावावर अंघोळ करावी, शेतात, मैदानात शौचाला जावें, जेथे वाढण्यात येईल तेथे जेवावें, मोकळ्या जागेत निजावें, अशी परंपरा आहे. त्याच्या आयुष्यातील कुठलाहि व्यवहार अप्रसिद्ध असता कामा नये असा सार्वत्रिक समज आहे. अर्थात् आता उघड्यावर जगतो आहे.

सरावाला १० ते ११.३० जाहीर सभा झाली. वक्तृत्व, कल्पकता, समय सूचकता इत्यादि गुणहि कळकळीच्या पोटीं जन्माला येतात. त्यामुळे मोतीबावू व स्थानिक कार्यकर्ते यांच्या वक्तृत्वापासून मला पुष्कळ शिकायला मिळतें.

काल तिसरे प्रहरीं मोटारने निघून ४.३० ला ब्रह्मनगामाला पोचलो. ५.३० ते ७ जंगी सभा. काल दुपारीं व संध्याकाळीं लाउडस्पीकर नव्हता. परवां दुपारीहि नव्हता. सभा मात्र मैदानी व जंगी. ऊर फोडून कंठशोष करावा लागला. जुनाट व छोटेखानी मोटारीत ६ माणसांऐवजी ९ माणसें बसत. मोटार बिघडली. चाक पंक्चर झालें. मधुपुरला रात्रीं ८.४५ ला पोचलो. १०.१५ पर्यंत भाषण झालें, ब्रह्मनगामा फार अवघड ठिकाण म्हणून प्रसिद्ध. अगदी मख्ख आणि गणंग माणूस विरघळला. वातावरण बदललें. खेडवळांनी म्हटलें, "फक्त हाच पुढारी आमच्या मनाला पटेल व बुद्धीला कळेल असें बोलतो. याला पुन्हा बोलवा. हा देहात्यांचा वक्ता आहे.'

मी काही फार चोखंदळ माणूस नाही. परिस्थितीशी जुळवून घेण्याकडेच एकंदरीत माझा कल. पण मलादेखील शौच ही एक समस्या होऊन बसते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोड्डा येथे प्रशस्त आणि चांगल्या डाक बंगल्यात मुक्काम होता. पण भंगी बाहेर गेल्यामुळे रिकाम्या कमोडमध्ये 'कमोडपॉट' ठेवण्याची सोय नव्हती. शेवटीं 'कमोड पॉट' शोधून स्वतःच ठेवून घेतलें. पण, पहाटे तीन-साडेतीनला उठलो तेव्हा तें साफ करायला कोणी नाही. कार्यकर्ते मोठ्या अगत्यपूर्वक विचारू लागले, "शौचाला जायचें असेल ना?" कमोडपॉट मी तरी साफ कोठे नेऊन करायचें? सर्व कार्यकर्त्यांचें शौच, स्नान, भारतीय परंपरेप्रमाणे उरकलें होतें. मागे औरंगाबाद, दाऊदनगर येथील डाकबंगल्यात तीच स्थिति झाली होती! काल एका शाळेत मुक्काम होता. शाळेला बोर्डिंग हाऊसहि होतें. पण शौचकूप नाही. एका पडक्या इमारतीचा पडका शौचकूप शोधावा लागला.

आज या गाडीचा शौचकूप अतिशय घाणेरडा. अधिकाऱ्यांना सांगून स्वच्छ करवून घेतला. अगदी गाडी चालू होण्याच्या बेतात साफ झाला. गाडी सुरू झाली. आत पाणी नाही. लक्खीं-सरायला गार्डाला कळविलें. म्हणाला, 'आता गयेपर्यंत सोय नाही.' डब्यात बिगर तिकिटाच्या आणि तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांची तुफान गर्दी! विद्यार्थी, वऱ्हाडी, भटके यांची गर्दी! एक म्हणाला, "तिसऱ्या वर्गात फारच बेबंदशाही आहे. आडमुट्ठे लोक भरतात. म्हणून दुसऱ्या वर्गात बळजबरीने शिरलो." जेथे ज्याची शिरजोरी चालेल तेथे तो तळ देतो! अशा गर्दीत डब्याच्या बाहेर पडण्याची सोय नाही. मोठ्या शिताफीने बाहेर पडलें तरी स्टेशनांवर पाणी नाही. जवळ पुरेसें मोठें भांडेंहि नाही. – त्या गमतीचें वर्णन कोठवर करावें?

•माझी मनू बरोबर असती तर तिच्याकरिता किंवा तिच्या निमित्ताने पाणी शोधून आणलें असतें. पण; एकट्याकरिता कोण यातायात करतो?

आपल्या देशातील माणसात देहासक्ति भरपूर आहे. देवभक्तीपेक्षा दैववाद अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे गैरशिस्तपणा व गबाळपणालाच साधेपणा मानतात आणि वाटेल त्या परिस्थितीत कसेबसें आयुष्य घालविण्यासच वैराग्य समजतात! इकडे आध्यात्मिक व त्यागी जीवनाचें देव्हारें तिकडे वैभव आणि ऐश्वर्य यांचा हपाप! असा विरोध दिसतो. त्यामुळे पाश्चात्यांच्या जीवनाचा त्यांना हेवा वाटतो!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आगगाडीत वर्तमानपत्र मिळालें. पहिली वातमी वाचली ती सेनापति वापट व नाना गोरे यांना मार वसल्याची. काही वेळ मनाला संताप सहन होईना !

आगगाडी.
१९.५.'५५.

एक दिवस राहून काल सकाळीं निघालो. वल्लाकाकांचे व्याही दादासाहेव गोवर्धन यांनी आपली 'जीप' दिली. गंगाधररावांनी सारथ्य केलें. दुर्गला आलो. भय्यासाहेव व नरसिंह यांची भेट झाली. भैयासाहेबांना पार्लमेंटरी जीवनावांचून कशात गोडी वाटत नाही. त्याच जीवनाविपयींचें चिंतन व विवेचन हल्ली चालू आहे. ववाताईंच्या जगातून या दुसऱ्या जगात काल प्रवेश केला. भैयासाहेवांना वाटतें पार्लमेंट हेंच खरें झुंझारांचें वीरक्षेत्र आहे. तेथे जाऊन साटमारी करण्यातच जीवनाचा खरा मजा आहे. निवडणुकांचें प्रांगण हेंच खरें पुरुषार्थ तीर्थ !

दुर्गला दोन-अडीच तास थांवून मेलने निघालो. संध्याकाळीं ५.३० ला विलासपुर. ताईची व यजमानांची भेट वरेच दिवसांनी झाली. आमचे रामराव भैया, ताईचे यजमान, अजून १९१७-१८ च्या काळातून वाहेर पडले नाहीत. त्या वेळच्या अनुभवांच्या व आख्यायिकांच्या अनुरोधाने आजच्या प्रश्नाकडे पाहण्याची त्यांची करामत विलक्षण आहे ! त्यांची दुनियाच निराळी. डॉ. ×× भेटले. त्यांनी भूदानाचें रडगाणें गायिलें. "संपूर्ण वेळ देणारे कार्यकर्ते नाहीत. दान मिळवणें दिवसेंदिवस कठिण होऊ लागलें आहे. माझा एक डोळा अंध झाला आहे, दुसरा अधू झाला आहे. इत्यादि." 'अंधेन नीयमाना: यथांधा: !' त्यांचें जग 'अंधेन तमसावृता: !'

तेथून ता. १७ लाच रात्रीं ८ ला निघून काल पहाटे कटणीला आलो. सकाळीं ६ च्या पॅसेन्जरने निघून दुपारीं १.४५ ला प्रयाग. पुष्कळ दिवसांत दारागंजच्या धर्माधिकाऱ्यांकडे गेलो नव्हतो. काल चार तास वेळ मोकळा होता. मुद्दाम गेलो. ती मंडळी माझीच आठवण करीत होती. विलासपुरला तर रामराव माझें नांवच घेत होते, इतक्यात समोर जाऊन उभा राहिलो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रयागच्या × × बरोबर नावेतून दारागंजपासून संगमापर्यंत गेलो. बरेच दिवसांनी त्रिवेणीमाईचें स्नान केलें. नावेनेच परत आलो.

हें पांचवें जग. × × म्हणाले, "आता अगदी निस्पृह झालो आहे. फक्त तुमच्या परिचयाच्या माणसांना माझाच पत्ता सांगून ठेवा म्हणजे झालें. नाही तर लफंग्या पंड्यांच्या तावडीत सांपडतील. अशा पंड्यांना देण्यापेक्षा गरिबाला जेऊ घालावें. आता ४५ वर्षांचें वय झालें. कसलाच हपाप नाही. फक्त यंदा गेय संगीत घेऊन मॅट्रिकची परीक्षा देऊन टाकली. एकदाचा बी० ए० झालो म्हणजे युनिवर्सिटीत संगीताचार्याची जागा मिळेल. पोटापुरते २०० / २५० रु. मिळाले म्हणजे झालें ! उगीच लोभ नको ! पन्नाशीच्या घरात जाता जाता बी० ए० ची मजल गाठता येईल.

"आता कशातच वासना उरलेली नाही. मुलाचें शिक्षण झालें म्हणजे मिळविली. त्याचें लक्षच अभ्यासात लागत नाही. उनाडत असतो, त्याची कोठे सोय लावून द्यायची आहे. आणखी काही नको. तसा सार्वजनिक कामातहि लक्ष घालतो. परवां नेहरूंचा संमान केला. × × म्हणाले की वैदिक ब्राह्मण असून चांडाळाचा संमान करता, लाज नाही वाटत ? ×× ना खरोखर श्रीकृष्णाचा साक्षात्कार झालेला आहे. कृष्णाप्रमाणे कच्छ वगैरे लावून मौनपूर्वक रानात गाई चारण्याचें व्रत श्रावणात करतात. देव त्यांच्यावर प्रसन्न आहे. पूर्वी पायीं चालत असे. आता मोटार-हवाईजहाज यांखेरीज बात करीत नाही. करोडपति झाला आहे. आज तर महारापोरांचीं पोरें शिकून शिकून सत्ता व संपत्ति मिळवू लागली आहेत. ब्राह्मणांची धडगत नाही. आमचा मुलगा शिकून तयार झाला म्हणजे काहीतरी दिवस पालटतील आमचे !"

तिसऱ्या वर्गाचा त्रास मुळीच झाला नाही. रात्रीं जागरण झालें नाही. जागाहि भरपूर मिळाली. जनसंपर्क भरपूर झाला. कटनी ते अलाहाबाद तर मला अद्वितीय महत्त्व अनायासेंच प्राप्त झालें; कारण त्या डब्यात रीतसर तिकिट घेऊन कायदेशीर रीत्या प्रवास करणारा ऊतारू मी एकटाच होतो. बाकी काही गोसावी, काही भिकारी, काही गारुडी, डोंबारी आणि काही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आंवटशौकी उडाणटप्पू फुकटचे ! सारेच चैनीखातर व गंमतीखातर प्रवास करणारे !

मीं दाढी करू लागताच साऱ्यांच्या कुतूहलाचा विषय बनलो. सगळ्यांनाच मौज वाटू लागली. मला सांगू लागले; "येथे केस राहिले, तेथे केस राहिले," म्हणून माझें मार्गदर्शनहि अगत्यपूर्वक करू लागले. सहयोग तेथेच सुरू झाला व संपला !

गोसावी, डोंबारी, साधु व उडाणटप्पू सगळ्यांची चर्चा मात्र बोलपटांबद्दल. 'रामनाम' हा विषय त्या समुदायात सर्वजनसामान्य विषय नव्हता. 'नाट्यं भिन्नरुचेर्हि जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्'. कोणी किती बोलपट पाहिलें याचा हिशेब झाला. एकाची स्मरणी १५० पर्यंत गेली. जबलपुरला जो८= त पाहिला त्यालाच अलाहाबादेत ।।= कां पडले याची शहानिशा झाली. एक म्हणाला, "अलाहाबादेत गुलहौशी व सुखवस्तु लोक जास्त असावेत." त्यांच्यातील विशेषज्ञ म्हणाला, "छे,तसें काही नाही. हा प्रश्न हौसेचा आहे. तें एक गांजासारखेंच व्यसन आहे. एकदा चटक लागली की लागली !" त्यावरून विषय बदलला. सिगारेटचे प्रकार व किमती यांची चर्चा सुरू झाली. एक गबरु म्हणाला, "पांच रुपये दराची पानपट्टी आणि पांच पैशाची एक सिगारेट प्यालो आहे पट्ठा !

'अज्ञात प्रवासी' म्हणून जे अनुभव आले त्यातील या मौजा आहेत. इतरांइतकाच मीहि अज्ञात आणि अनामिक ! अनामिकेचें 'आत्मनिवेदन' अनायासेंच आठवलें. माझ्या मनूने अनामिकेचें गाणें अगदी अलीकडेच तयार केलें आहे. मनू प्रत्ययावांचून स्वगत गीतें गुणगुणणार नाही. त्या गाण्यातील 'अनामिका' ही वस्तुतः 'सार्वनामिका' आहे. जात-गोत-घराणें याची कोंडी आपोआप फुटल्यामुळे तिचें घरटें भूगोलाएवढें, नव्हे, ब्रह्मांडाएवढें झालें आहे. 'सर्वं खलु इदं ब्रह्म' चा हा प्रत्यय द्योतक आहे. सारा संकोच हारपला ! आता त्या कमळाला मिटणें माहीतच नाही. सारेच आप्तेष्ट, सारेच नातेवाईक झाले. 'सोयरे सकळ प्राणसखे !' हा सख्य भक्तीचा उद्रेक आहे. धर्मशाळा, होटेल, डाक बंगले, घरें, हीं सारीं एकरूप झालीं. ब्रह्मांड सगळें प्रेमरसाने ओथंबून गेलें. मला 'अनामिके' ची भूमिका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि तिचा प्रत्यय मान्य आहे. अनामिकेचें विशिष्ट कार्य नाही. आंगठा तर्जनी, कनिष्ठिका यांना प्रयोजनें आहेत. मध्यमिका तर पट्टराणीच आहे. अनामिका तेवढी लौकिक प्रयोजनापासून व अहन्निष्ठेपासून मुक्त ! म्हणून ती विश्वात्म्याची, जगज्जीवनाची, परमात्म्याची.

हलद्वानी
२०.९.'५५.

सुमारे १ ला जे० पी० व प्रभावतीजी दुसऱ्या जीपने पाटण्याहून येऊन पोचलीं. सुमारे २ ला निघालो. आधी एका रस्त्याने अर्ध्यापर्यंत आलो. पाटण्याला जीपने बरेच 'नखरे' केले. पण अर्ध्या रस्त्यानंतर एक ओढा आडवा आला. तो दुर्लंघ्य ठरला. पुन्हा परतलो.. दुसऱ्या रस्त्याने आलो. शेवटले ४ मैल पदयात्रा झाली. गडद अंधारात टॉर्चच्या प्रकाशात भाताच्या शेतांच्या पाळीवरून तारेवरली सरकस झाली. अगदी उंटाच्या पाठीवरून चालण्याचा प्रयोग झाला. त्यात निसरड्याच्या जागा, ओढे, डबकीं, पाण्याचे पाट, खांच-खळगे, कांटे-सराटे, सारेच प्रकार होते. प्रभावतीजी, सुशीला गुप्त, देवेंद्र गुप्तांची वहीण प्रतिभा, आणखी एक भगिनी अशा चार महिला आणि सात-आठ पुरुष, अशी पलटण होती. सहा वर्षें अमेरिकेत राहून आलेले एक नव्या दमाचे तरुणहि होते. रस्त्याने अगदी परीक्षाच घेतली. कोणी घसरले, कोणी पडले, कोणी पडता पडता वांचले. या फजितींतहि एक प्रकारची गंमत मात्र होती. मी फार थकलो!

येथे मुक्काम प्रभावतीजींकडे आहे. 'तुम्ही माझ्या कैदेत आहात. माझा हुकूम निमूटपणें पाळा,' हें त्यांचें पालुपद. पाहुणचाराचा चांगलाच मारा होणार असें दिसतें.

आश्रमवासियांपुढे दररोज तीन तास टकळी चालवायची आहे. हा सगळा 'जल्पितयज्ञ' कशाकरिता, तें देव जाणें ! 'श्रोता, वक्ता च भगवान् परमात्मा वासुदेवोऽस्तु !'

श्री वल्लभस्वामींशी वोलणें झालें. त्यांच्या विवेकबुद्धीची माझ्यावर चांगली छाप पडली. त्यांना तारतम्य उत्तम साधतें. पूज्य विनोबांची मुक्त क्रांतीची योजना त्यांच्या तोंडून अवश्य ऐकून घे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जे० पी० व प्रभावतीजी दोघांनीहि तुझी फार आठवण केली. पदोपदी नांव निघतें. म्हणतात, "अशा रस्त्याने विमलावहनने यावें हें आम्हाला आवडत नाही. सडक लवकरच होईल. तेव्हा त्या येतील तर बरें." विद्यावहन, डॉ० ओमप्रकाश, या सर्वांनी नमस्कार सांगितला.

सोखोदेवरा आश्रम.
६.१०.'५५.

दोन दिवसांत चार भाषणें केलीं. मुख्य श्रोते म्हणजे स्वत: जे०पी०च. प्रभावतीजींचें अगत्य व उत्साह कौतुकास्पद आहेत. मोठ्या आस्थेने ऐकतात. सुराणा, सुशीला गुप्त, विद्यावहन मिळून टांचणें तयार करतात. नंतर ती मला दाखवूनहि देतात. पण, एकंदरीत काही भरीव व टिकावू स्वरूपाचें माझ्याकडून या मंडळींना मिळत आहे असें मला वाटत नाही. कृष्णराजभाई लघुलेखक व स्टेनोटाइपिस्ट पाठविणार होते, रेकॉर्डिंगचें यंत्रच बिघडलें. त्यामुळे लच्छूने दिगंबरवावूंना पिटाळलें. बिचारा वेठीला धरल्याप्रमाणे ८ मैल पायपिटी करून आला. परंतु, या भाषणांचा कितपत उपयोग होईल याबद्दल मला शंका आहे. तुझ्याकरिता टांचणें मी घेऊन येणार आहे. ती नीटहि करून देईन तुझ्याबरोबरच बसून.

नोव्हेंबरमध्ये तुला येथे कसें आणता येईल या विवंचनेत प्रभावतीजी आहेत. "विमलावहन गयेला असतात तेव्हा आम्ही येथे नसतो. आम्ही असतो तेव्हा त्या नसतात," असे उद्‌गार त्यांनी उसासे टाकून काढले. नंतर जे० पी० जवळ बोलल्या. जे० पी० म्हणाले, "त्यांचा कार्यक्रम योजनापूर्वक ठरवावा लागेल. जरा रस्ता नीट होऊ देत. आपण ठरवू की." मी 'सर्वार्थ साधन' असें मौन स्वीकारलें. त्यात सर्वभाषांतील सर्व शब्दांच्या सर्वच अर्थांचा समावेश होतो.

सोखोदेवरा आश्रम,
८.१०.'५५.

सिद्धराजभाईंच्या पत्नी, मुलगा व मुलगी सगळे येथेच आहेत. श्रमभारतीचा विकास डोळ्यात भरण्यासारखा होत आहे. एका पुरुषार्थवान्,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निष्ठावान् आणि ध्येयनिष्ठ पुरुषाची छाप सर्वत्र दिसते. एकसूत्रीपणा आहे, स्वच्छता आहे आणि शिस्तहि आहे. पूर्वी राजे लोक स्वतःच्या नांवाची राजधानी वसवीत असत. महंत मठांची स्थापना करीत असत, जवाहर-लालजी पंचवार्षिक योजनेच्या क्षेत्रांना नवीन तीर्थें म्हणतात; पण मला वाटतें धीरेन्‌दांच्या या वसाहतीसारख्या वसाहतीच 'नवजीवनाचीं तीर्थें' ठरतील.

या मंडळींनी ईशावास्य आणि गद्य वाक्येंहि भैरवीत वसविलीं आहेत. प्रार्थनेतहि श्रमदेवतेचा महिमा गायिला जातो.

समाजवादी आणि साम्यवादी समाजामध्ये मुख्य तत्त्व समविभाजनाचें आहे. सर्वांना सारखे उपभोग उपलब्ध व्हावेत, त्यात विषमता असू नये; सुखसोयीप्रमाणेच फुरसतहि सगळ्यांना सारख्या प्रमाणात उपलब्ध व्हावी, हा त्यांचा कटाक्ष. पण त्यात एकमेकांकरिता दरेकाने काही करावें अशी प्रेरणा नाही. संविभागामध्ये एकमेकांना भरविण्याची प्रेरणा नाही. 'दरिद्रान् भर कौंतेय'च्या ऐवजी 'परस्परं भर' अशी प्रेरणा नाही. ती प्रेरणा स्नेहा-वांचून, आत्मौपम्यावांचून येणार नाही. मुलाला जें मिळत नाही, त्याचा उपभोग करणें आईला शक्य होत नाही. तिला तें सहनच होत नाही. ही प्रेमाची प्रेरणा असते. वैज्ञानिक समाजवादात आणि गांधीच्या सर्वोदय-निष्ठेत हा मूलभूत फरक मला दिसतो. त्यात न्यायबुद्धीची, 'क्षुरस्य धारा निषिता दुरत्यया'ची प्रेरणा आहे. यात स्नेह, सहानुभूति व आत्मौपम्याची उभय कल्याणकारी स्फूर्ति आहे. अहिंसक क्रांतीकरिता स्वतःच्या जिवाच्या पायघड्या घालाव्या लागतील हें तुझें म्हणणें खरें आहे.

खादीग्राम.
११.१.'५६.

सकाळीं लोकगंगेत आपला मंद ओढा पुन्हा मिळविला. मंडपात 'प्रतिनिधि व कार्यकर्ते' या सदराखालीं बहुरंगी समूह गोळा झाला होता. 'वानरनीति' व 'मारुतिनीति'चें विवेचन केलें. मुलांना सुट्टी आहे. ट्रक, ट्रॅक्टर, बस, लॉऱ्या सर्व ग्राम-संमेलनाच्या कामाला जुंपल्या आहेत. अनुग्रह-बाबूंचाहि 'अनुग्रह' झाला. इतका भपकेदार कार्यक्रम योजिला म्हणजे गर्दी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आंवाक्यात ठेवणें हाच मुख्य कार्यक्रम बनून जातो. मेळा म्हणजे गोंधळ, गोंगाट, गर्दी ! अव्यक्त मानव्याचें विराट् रूप पहावयास मिळतें. तेथे बोलणें संपतें. "नमः पुरस्तादथपृष्ठतस्ते' एवढेंच शिल्लक राहतें.

अकाली लोकांनी तीन लक्षांची मिरवणूक काढली. गडबड नाही; गलबला नाहीं; गफलत नाही; तीन तीन लक्ष लोक नमाज पढतात. संपूर्ण शांति नांदते. बारकऱ्यातहि केवढी शिस्त असते. धार्मिक लष्करीकरणात भगवंताचें नीटनेटकें विराट्स्वरूप आढळून येतें. येथे मात्र अगदी थेट ११ वा अध्यायच पहावयास मिळतो. पण, इतक्या गैरशिस्तपणातहि दगाफटका, भांडणतंटे, अपघात मात्र क्वचितच होतात. मानव हा निसर्गतःच सभ्य दिसतो.

पुरेसे पैसे किंवा साधन-सामग्री गोळा झाली नाही. आमरण उपवासाचें 'पाशुपत' उपसलें. गर्दी अनावर झाली, आपल्या शरीराची तटबंदी उभारली. मृत्युलोकात जो मरायला तयार असेल त्याला सर्व गुन्हे माफ आहेत. मरणाला जो भीत नाही तो मृत्यूच्या भांडवलावर सत्तेचा व प्रतिष्ठेचा उदीम उभारतो. योद्धा व शिपाई यांची समाजात जी प्रतिष्ठा आहे ती याचमुळे. क्रूर, निर्घृण, बेगुमान माणसेंदेखील मरायला डरत नाहीत; मरायला कचरत नाहीत, आणि समाजावर आपला पगडा बसवितात.

१९५६.

काल रात्रीं ९ च्या सुमाराला पोचलो. काशी ते गया. डब्यात एक विधवा म्हातारी आणि तिचा अगदी अल्पवयस्क तरुण मुलगा यांचा संवाद ऐकत होतो. तेलुगूत संवाद चाले. मी अंदाजाने समजून घेत होतो. बाई मुलाला घेऊन तीर्थयात्रा करायला निघाली होती. मी दुरूनच बघत होतो. सामान अगदी बेताचें. कपडे अगदीच अपुरे. पण, निष्ठा आणि उत्साह अगदी व्यस्त प्रमाणात. तें दृश्य पाहून हृदय सहानुभूतीने भरून आलें. का ? याचें उत्तर अजून मला गंवसलें आहे कोठे ?

चि. ×× कडून प्रभाताईकरिता १०० रु० ची मनीऑर्डर आली आहे. तिच्या आजारात तिला मदत व्हावी म्हणून ! दुर्योधनाचे उद्‌गार आठवले,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

"जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः । जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।। केनापि देवेन हृदि स्थितेन। यथा नियक्तोऽस्मि तथा करोमि ।।" त्या दीन-वत्सलाने घाणीवर जगणाऱ्या शूकराचेंहि रूप घेतलें. त्याचें मांगल्य अत्यंत अमंगळ वस्तूतहि कसें दडलेलें असतें हें त्याच्या जाणत्या भक्तांनाच माहीत! मला आकलन कसें होणार?

काल आगगाडीत भेटलेला मुलगा आपल्या मातोश्रीसह भेटून गेला. शालिग्राम शिलेच्याच घडविलेल्या, पण मोठ्या पाणीदार मूर्ती! त्यांची दीनता पाहून मात्र चित्त विरक्त झालें.

१८.२.'५६.

•

आज औरंगाबादला जाऊन आलो. त्या ठाण्यात आता स्वयं-वितरणाचे समारंभ व्हायचे आहेत. कार्यकर्ते व इतरेजन यांची संयुक्त सार्वजनिक सभा झाली. माझें भाषण झालें. खरें म्हणजे तेथे, किंवा अशा सर्वच प्रसंगीं कार्यविशारद माणसांचीं भाषणें व्हायला हवीत. धीरेन्दा, श्रद्धेय बावला, तू यांच्यांपैकी कोणी जायला पाहिजे. केवळ मंत्र म्हणणाऱ्या उपाध्यायाची तेथे गरज नाही. स्वतः नैष्ठिक अनुष्ठाता असलेला 'होता' हवा आहे. पण 'स्टॉप गॅप' या नात्याने कोणी तरी आयत्या वेळीं हाताशी असावें लागतें. तेवढें करतो. औरंगाबादची मंडळी तुझी प्रतीक्षा मोठ्या उत्सुकतेने करीत होती. एकटी मनू! ती कुणाकुणाच्या वांटचाला येणार! देवाने तिला अनंतरूपें धारण करण्याचें लीलापटुत्व बहाल करावें.

औरंगाबादचा कार्यक्रम आटपून तडक निघालो. तेथे कार्यक्रमाची वाट पाहण्यात जो वेळ गेला तेवढ्यात मार्गारेट मीडचें 'Cultural Patterns and Technical Change' हें पुस्तक संपविलें. पुस्तकांतील माहिती उद्बोधक असून रोचक आहे आणि विवेचन सुबोध असून सोपपत्तिक आहे. आज ममफर्डचें Technics and Civilization वाचायला घेतलें. तूर्त हेंच माझें सगुण ब्रह्माचें आराधन आहे. ही विराटाची किंवा हिरण्यगर्भाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उपासना मात्र नव्हे ! 'विश्वात्मकें देवें' तशी दुर्बद्धि देऊ नये ! "देऊ तू नको दुष्ट वासना !"

गया.
१९.२.'५६.

गुंतकलला ज्या डब्यात वसलो त्या डब्यात एक विलक्षण तरुण प्रवासी भेटला. 'श्रीमद्‌भागवत' त्याच्याजवळ होतें. संस्कृत सारखें वाचीत होता. चर्या, पोषाख व वागण्याची लकब काहीशी रमेश पटेलांसारखी. भागवतच वाचतो, सतत वाचतो, त्याला त्या ग्रंथाचें वेड आहे. कुठल्या अध्यायात काय आहे, कुठल्या श्लोकात काय आहे, हेंदेखील विनचूक सांगतो. म्हणाला, "पूर्वी कादंबऱ्यांखेरीज काही वाचीत नव्हतो. वाचनाखेरीज दुसरें काही करीत नव्हतो. एका मित्राने भागवत वाचायला सांगितलें. एकदा हातीं घेतलें तेव्हापासून दुसरें पुस्तक हातीं घेतलें नाही; हें पुस्तक सतत जवळ वाळगतो. विसंवत नाही. यात काव्य आहे, साहित्य आहे, तत्त्वज्ञान आहे, विज्ञान आहे आणि सद्व्यवहाराची कला आहे, एकदा वाचलें की चटक लागल्यावांचून राहत नाही."

आदोनी
२४.३.'५६.

परवां रात्रीं मनमाडहून एक पत्र तुला पोतनीसांच्या पत्त्यावर पाठविलें. रात्रीं १.५५ ला मनमाडहून निघालो. दुसऱ्या वर्गाचा डबा आधीच भरून गेला होता. दोन कप्प्यांचा डबा होता. दोन्ही दारांच्या मध्ये पथारी पसरून फर्शीवरच आडवा झालो. पहाटे औरंगाबादला डब्यात पैठणयात्रींची गर्दी शिरली. त्यांच्यात आणि विहार-उत्तर प्रदेशच्या लोकांत एक फरक मात्र महत्त्वाचा होता. त्यांनी मला तुडविलें नाही आणि एक इसम खेरीज करून सगळ्यांनी दुसऱ्या वर्गाचीं तिकिटें काढलीं होतीं. अंथरुणाची वळकटी करून तिच्यावरच वसावें लागलें. यात्रेकरू स्वतःच्या लबाडीच्या, फसवेगिरीच्या आणि लांच लुचपतखोरीच्या 'सत्यकथा' मोठ्या फुशारकीने सांगत होते. परोपकाराकरिता खोटेपणा, लांच लुचपत आणि फसवेगिरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कशी करावी लागते याचें तत्त्वज्ञान सांगत होते. मधून मधून संतवचनांचे दाखले अर्थातच देत असत आणि वर निर्वाळा देत असत की विजय सत्याचाच होतो. असत्य इतर कुणाला दिसू शकलें नाही तरी त्या सर्वसाक्षी परमेश्वराला दिसतें, पैठणचा माणूस आगगाडीत हें 'रुपडें' धारण करतो.

सकाळीं जालन्याला स्टेशनवर उतरलो. माझी दखल घ्यायला कोणीच नव्हतें. एक नवखा उतारू म्हणून प्लॅटफॉर्मावर थांवलो. हमाल विचारू लागला "जायचें कोठे आहे ?" म्हटलें, 'बाहेर घेऊन चला.' पण पुढे काय ? टांगेवाला विचारू लागला, – अनेक टांगेवाले घोळका करून विचारू लागले – 'कोठे जायचें साहेब ?' म्हटलें, 'तेंच तर मला माहीत नाही.' सगळे एकमेकांकडे पाहून गोंधळल्यासारखे झाले. सामान उचलून तिसऱ्या वर्गाच्या प्रतीक्षालयात बसलो. वर्तमानपत्राच्या एजंटाला विचारलें शिविर कुठल्या गांवीं आहे, कुठल्या रस्त्यावर आहे, त्याला पत्ता नाही. एक शिकलेले गृहस्थ म्हणाले, 'देशपांडे वकिलांकडे चवकशी करा'. टांग्यात बसून तेथे गेलो. त्यांनी गेवराई गांवाचें नांव सांगितलें. मोटार स्टॅन्डवर बस मिळेल म्हणून सांगितलें. टांगा तडक तिकडे वळविला. ओळीत उभा राहिलो. बसमध्ये शिरलो. सुमारे ११ ला येथे पोचलो.

गैरशिस्तपणा, गबाळग्रंथीपणा व बत्थडपणा, या भारतीय गुणांच्या बाबतीत 'तांस्तितिक्षस्व'चा उपदेश तुला केला. तो उपदेश स्वत:च्या जीवनात गिरविण्याची संधि देवाने वाढून ठेवली. देव जितका दयाळु तितकाच नित्यतत्पर आहे ! या मंडळींनी पैसे खर्च केले, परवां रात्रीं जालन्याला खास मोटार पाठविली, माणूस पाठविला; पण पैसा आणि कष्ट फुकट जाऊ नयेत याची काळजी मात्र घेतली नाही. 'पंचवार्षिक योजने'चा कित्ता अक्षरश: गिरविला. जालन्यात कुणाला सांगून ठेवलें नाही. जालन्यात अमक्याकडे चवकशी करा म्हणून मला कळविलें नाही. खर्च आणि कष्ट करण्यात कसूर केली नाही !

वाटेत आमची बस मागे टाकून बिंदुसाहेबांची मोटार पुढे गेली. रतनलाल त्या मोटारीत होते. पण, जालन्याला स्टेशनवर चौकशी करण्याची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वुद्धि त्यांना झाली नाही. सकाळीं ८ पर्यंत सर्व मंडळी जालन्यात होती. त्यांना वाटलें रात्रींच दादा गेला असेल. रात्रींची गाडी त्यांच्या माणसाने पाहिली. तंतोतंत व विनचूक सूचना-पालनाचा हा नमुना नव्हे काय ?

अशी गंमत झाली ! तुझ्या मनोरंजनाकरिता जरा सविस्तर हकीकत लिहिली. या वावतीत नुकतेंच तू चिकित्सात्मक विश्लेषण करीत होतीस म्हणून !

नागोरीजींना काही वोललो नव्हतो. वयाची मर्यादा राखली. येथील मंडळींची मात्र विंदुसाहेवासमक्ष चांगलीच कानउघडणी केली. सांगितलें की अशा रीतीने पैसा, कष्ट आणि वस्तु उवळणें हा सामाजिक गुन्हा आहे.

येथे पोचताच शिविरात गेलो. विंदूचें भाषण चालू होतें. त्यानंतर थोडेंसें भाषण केलें. त्यांच्यावरोवरच टी० वी० मध्ये उतरलो. कलेक्टर-पासून पट्टेवाल्यापर्यंत सरकारी नोकरांचा तांडा तैनातीत होता. ११.३० ला चहा, ११.४५ ला फळें आणि १२.३० ला जेवण अशी पाहुणचाराची फैर झडली. काल दिवसभर व रात्रीं ८ पर्यंत हा सगळा 'ताफा' सारखा गिरक्या मारीत होता. सगळ्या समारंभात मीहि सामील होतो. तहसील कचेरीची तपासणी, दवाखान्याच्या इमारतीचें भूमिपूजन इत्यादि इत्यादि. दुपारीं दोन तास शिविरात माझें 'वौद्धिक' झालें. रात्रीं दीड तास जाहीर भाषण. गर्दी खूप होती. नेहमीप्रमाणे 'लाऊडस्पीकर' कुरकुरत होता. श्रोते मात्र अगदी शांत होते.

माणसांना इष्ट तें वळण लावण्याचीं दोनच साधनें आहेत. एक 'नियंत्रण' आणि दुसरें 'विभूतिमत्व'. 'नियंत्रण' आज ज्या प्रमाणात करावें लागेल त्या प्रमाणात केलें तर तें व्यक्ति-स्वातंत्र्याला जखडून टाकील. माणसें, उपकरणें व साधनें वनून जातील. म्हणून आज विभूतिमत्वाची गरज आहे. विभूतिमत्व आपला प्रभाव वेमालूमपणें पाडतें. त्यात प्रभुत्व नसतें; प्रशासन नसतें. स्फूर्ति व प्रेरणा त्यांतून सूर्य किरणांप्रमाणे फांकतात. ती व्यक्ति पूजा किंवा प्रभुत्व महिमा नव्हे– 'Cult of Personality' नव्हे. दिवा प्रकाशतो म्हणजेच प्रकाश देतो. विभूति नांदते म्हणजेच ती प्रेरित करते. तसें विभूतिमत्व विनोवा, विमल आणि जे०पी० यांच्या व्यक्तित्वांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि धीरेन्दांच्या, अप्पांच्या कर्तृत्वात आहे. या माणसांपैकी कुणीहि या वेळीं स्वतःच्या व्यापाचा उपसंहार करणें म्हणजे स्वधर्म त्याग करणें होय. अजागळपणा, बेसावधपणा, जडत्व या दुर्गुणांवर स्वयंप्रभावी विभूतिमत्व हा एकच उपाय आहे. म्हणून मनूराजाने विश्रांति घ्यावी, हवी असेल त्यापेक्षा जास्त घ्यावी, पण कार्यनिवृत्तीची कल्पनादेखील मनाला शिवू देऊ नये.

आजहि मुक्काम टी. वी. तच आहे. काल सरकारी अधिकाऱ्यांनी सारखा पिंगा घातला होता. आज खानसाम्याने चहादेखील विचारला नाही. "आमच्या घरीं शंभर गाई; सकाळीं उठून काहीच नाही." येथील मुन्सिफांनी मात्र मोठ्या आस्थेने घरीं बोलावलें. पण, चर्चा करण्याची त्यांची इच्छा मात्र पूर्ण होऊ शकली नाही.

गेवराई
५.४.'५६.

ता. ६ ला पहाटे जालना-स्टेशन मास्टरने सांगितलें की पहिल्या, दुसऱ्या वर्गाचीं तिकिटें बंद आहेत. त्याला फोनने तशी खास सूचना मिळाली होती. मी तिसऱ्या वर्गाचें तिकिट काढलें. तिकिट मास्तराने मनमाडच्या पुढचें तिकिट देण्याचें नाकारलें. स्टेशनमास्तर म्हणाला त्याने द्यायला हवें होतें. रात्रीं तिकिटावांचून वेटिंग रूममध्ये राहण्याची परवानगी विचारली, तेव्हा 'टक्क्याचा खेळ' झाला!

ता० ६ च्या पहाटेच्या गाडीने शिक्षण मंत्री गोपाळराव एकबोट जालन्यालाच उतरले. मी त्यांची पहिल्या वर्गाची जागा काबीज केली. वरची जागाहि मोकळी होती त्या कुपेमध्ये! तिकिट इन्स्पेक्टरजवळ मनमाड-पर्यंतचें पहिल्या वर्गाचें व गयेपर्यंतचें दुसऱ्या वर्गाचें तिकिट मागितलें. माझ्या डब्यात एक वरिष्ठ रेल्वे अधिकारी होता. त्यानेहि सांगितलें. पण, मला फक्त पहिल्या वर्गाचें मनमाडपर्यंतचें तिकिट मिळालें.

या झाल्या अज्ञातवासाच्या मौजा! स्टेशनावर एकबोटचांना घ्यायला आलेल्या लोकांपैकी एका सद्गृहस्थाने मला ओळखलें. जालन्याला त्रास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पण आज माझ्या तिकिटाची व्यवस्था झाली नाही याची दखल मात्र घेतली नाही. ही ज्ञात अस्तित्वाची गंमत !

एक कुटुंब, त्रिस्थळी यात्रेला निघालेलें, डब्यात होते. त्यांच्याजवळ दुसऱ्या वर्गाचा पास होता. त्यांच्यापैकी एकातरुणापाशी तिसऱ्यावर्गाचा पास होता. तो रेल्वे अधिकाऱ्याचा डोळा चुकवून जेवायला म्हणून दुसऱ्या वर्गाच्या डब्यात आला. त्याला T. T. I ने पकडलें. मग त्या तीर्थयात्रेकरूंनी खोटेपणा आणि मनधरणी या दोन व्यवहार-चातुर्याच्या भात्यांतील हुकमी अस्त्रांचा प्रयोग केला. तो पाहून तुला शिसारी आली असती ! जालन्याला जातांना असाच एक तीर्थयात्री आमच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यात होता. त्याला वांचविण्याकरिता इतर यात्रेकरूंनी कावेबाजपणा थापाडचेपणा व लाच-लुचपत-पटुत्वाचा जो प्रयोग केला तो पाहून तुला काय वाटलें असतें देव जाणे ! लांचलुचपतखोर अधिकाऱ्यांचा जन्म अशा खुळचा भाविक व लबाड धर्मध्वजी लोकांच्या पोटीं कसा होतो याचा पुरावा पहायला मिळाला असता. रात्रीं डब्यात एक off-duty गार्ड शिरले. रेल्वे अधिकारी व गबर प्रवासी लांचलुचपतखोर कसे असतात याचें त्यांनी रसभरित वर्णन केलें.

गेवराईचे यजमान अतिशय विनयशील व अगत्यशील गृहस्थ होते. त्यांनी मोठ्या आस्थेने शिदोरी दिली. पोळचा, भाजी, चटणी व गूळ. ज्या फडक्यात पोळचा बांधल्या होत्या तें कदाचित् तू कंदीलाची कांच पुसण्याकरिताहि वापरलें नसतेस. ज्या पानात चटणी होती तें पापडापेक्षाहि ठिसूळ होतें. उन्हाळचामुळे पोळचा 'प्लायवुड' सारख्या टणक व चर्वणातीत झाल्या होत्या. गाडीत ती शिदोरी उघडून जेव्हा मी क्षुधाशांति करू लागलो तेव्हा इतर उतारूंना माझ्या मेंदूच्या शाबूतपणाविषयीं शंका येत असावी. पण, एकादशीच्या फराळाला कां कोणी नांवें ठेवतें ? ग्रामलक्ष्मीचा तो प्रसाद मी श्रद्धापूर्वक पोटभर ग्रहण केला. 'अन्नं न निंद्यात्' ! 'हितभुक्, मितभुक्, 'अशाक भुक् !' 'मा फलेषु कदाचन' ! हीं विनोबासूत्रें लक्षात घेऊन 'अन्नाग्रही' बनलो आहे. नाही म्हणायला इटारसीला एक खरबूज घेतलें. पण, तें अगदी सपक निघालें, म्हणजे अस्वाद व्रताचें आचरण अनायासेंच घडलें.

गया.

८.४.'५६.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गयेला काका, गोविंदराव, सिद्धराजभाई, कृष्णराजभाई इत्यादि मंडळी होती, त्यामुळे मन रमलें होतें. निघतांना जरा अवघड वाटलें, पण, येथे आल्यावर मात्र निराळाच प्रत्यय आला. आता सगळीं ठिकाणें सारखींच वाटू लागलीं. पाटणा, गया, काशी, सगळीं आपलींच गांवें ! आता फरक वाटत नाही. ज्या दिवशीं सगळींच गांवें काशी सारखीं वाटू लागतील तो धन्य दिवस ! आज मात्र काशीच्या गंगामाईचें आकर्षण वाटतें. त्यांची पकड मनावर असल्याची साक्ष येथे आल्यावर पटली. दोन्ही वेळा गंगास्नान करतो. विश्वनाथ मात्र धर्मध्वजी सत्ता लोलुपांच्या गराड्यात सांपडला. मनानेच दर्शन घेतो.

भायाने जे घर रहायला दिलें तें माझ्या वेताचें आहे. मला पसंत आहे. जागा पुरेशी आहे. खोल्याहि स्वतंत्र आहेत. अशीं घरें तरी मला आयुष्यात किती रहायला मिळाली असतील ! वडिलांच्या आमदानीत अगदी चढत्या काळातदेखील बाजारात, चवाठ्यावर, चाळीत राहिलो आहोत. आणि देशभक्तीच्या काळात तर काही विचारूच नका. त्यामुळे मी पसंत केलें.

'मला घर पसंत आहे' असा प्रामाणिकपणें निर्वाळा दिल्यावर आता थोडेंसें वस्तुनिष्ठ वर्णन तुझ्या मनोरंजनाकरिता करतो.

घर म्हटलें तर थेट सडकेवर आहे, म्हटलें तर अगदी अरुंद बोळांतहि आहे. पण बोळापेक्षा सडकेवरच जास्त आहे. सगळीकडून उंच घरांचें कोंदण आहे, त्यात रत्नासारखें आपलें घर वसविलेलें आहे' समोर मोकळें आहे. बाजार, आकाश, आणि गंगा असें तिरंगी दर्शन घडतें. जुन्या राजमहालात ज्याप्रमाणे 'कोपभवन,' 'श्रृंगारभवन' वगैरे भाग असत, त्याप्रमाणे या घरात हवेची खोली, उन्हाची खोली, अंधाराची खोली, अशी व्यवस्था आहे. सैंपाक घराला एकच दार आहे. खिडकी नाही, झरोखा नाही. अन्नाची वाफ बाहेर जायला नको. दार बंद केलें की डोळे मिटून जेवणाचें श्रेय मिळू शकतें. संपूर्ण खासगीपणा आहे — Complete Privacy !

इतर खोल्यांना खिडक्या मोठ्या व भरपूर आहेत. दरेक खोली अगदी स्वतंत्र आहे. एका खोलीचा दुसऱ्या खोलीशी संबंध नाही. अगदी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

regional councils चा खाक्या आहे. फरशी लाल रंगाची चांगली गुळगुळीत आहे. मधून मधून पापुद्रे निघालेले असल्यामुळे अगदीच शावूत सणंगासारखी नाही. जिकडे मोऱ्या केल्या आहेत त्या बाजूला पाणी सहसा वळत नाही. व्रात्य मुलाला ज्याप्रमाणे उचलबांगडी करून शाळेत पोचवावें लागतें त्याप्रमाणे फरशी धुतल्यावर केरसुणीने गोंजारून पाणी मोरीकडे वळवावें लागतें. जेथे मोरी आहे तिकडे उतरण नाही, जिकडे उतरण आहे, तेथे मोरी नाही, अशी पंचवार्षिक योजनेच्या धरतीची व्यवस्था आहे.

अंघोळीकरिता एक कपाटवजा जागा आहे. पूर्वीचे लोक देवघरासाठी ठेवीत असत तशी. सैंपाकघरातील मांडपाणी तेथेच येतें. एक बादली समोर ठेवून कसेबसें बसता येतें. अत्यंत सावध व जागरूक न राहिलें तर डोक्याला, छातीला किंवा खांद्याला नळाचा टोला बसतो. दार बंद केलें की जिवंत समाधीचें श्रेय लाभतें. शौचकूप जिन्यासमोर आहे. तिसऱ्या वर्गाच्या Water closet पेक्षाहि आटपशीर ! Flush चा आहे हें त्यातल्या त्यात सुख ! न्हाणीघर व संडास दोन्ही ठिकाणीं दोन-चारदा जाऊन आलें म्हणजे सर्कशीचें शिक्षण मोफत व आपोआप मिळतें !

वर गच्ची प्रशस्त व मोकळी आहे. गंगाईचें कामापुरतें दर्शन घडतें. वारा अनिरुद्धपणें संचार करतो. घराचें धड कितीहि कोंदट जागेत असलें तरी त्याचें डोकें मोकळ्या आकाशात व स्वच्छ हवेत वावरतें !

एवंगुणविशिष्ट हें आपलें घरकुल एकंदरीत मला पसंत आहे.

काशी.

९.५.'५६.

सिलीगुडीपर्यंतच्या प्रवास अगदी पाच्छाच्या ऐटीत झाला. गर्दी बेताची असते. दोन्हीं गाड्या पाठशिवणीचा खेळ खेळतात. आमच्या गाडीचा पाठलाग एक गाडी करीतच होती. दुसरी अवचितपणें एका वळणावर पुढे येऊन ठाकली. दोन्ही अमोर-समोर येऊन एकमेकींवर गुरगुरल्या. झुंज मात्र झाली नाही. गाडी अगदी गजगतीने चालते. लल्लू एवढीं मुलें, धावण्याच्या शर्यती गाडीशी लावतात. गाडी थेट बाजारातून जाते. कोणी ड्रायव्हरला चिट्ठ्या देतात. कोणी उडी मारून गाडीत शिरतात, वाटेल तेथे उतरून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जातात. लहान मुलें वेडावतात, रस्त्यावरून वाकुल्या दाखवितात. गाडीत बसलेल्या एकाद्या लहान मुलाला चपराकहि लगावतात.

गाडीचा व मोटारचा रस्ता एकच असला तरी गाडीतून दृश्य विशेष भव्य दिसतें. डोकें गरगरण्याचा प्रश्नच नाही. गाडीचीं वळणें, वळसे, Coops वगैरे बहारीचे आहेत. करसियांगपर्यंतचें दृश्य डोंगर-दऱ्यांचें आहे. करसियांगनंतरचें नद्या-खोऱ्यांचें व मैदानाचें. आपआपल्या परीने दोन्हीं अनुपमच ! आज सोनाद्यापर्यंत दाट धुकें होतें. गाडीचें एंजिनदेखील दिसेना. करसियांगला मक्याचीं कणसें पाहून तुझी व मित्रवर्यांची आठवण झाली.

आगगाडी.
२३.५.'५६.

काल संध्याकाळीं मद्रासला पोचलो. गर्दीच गर्दी ! कांचीपुरमकरिता सकाळीं ६ खेरीज गाडी नव्हती. सर्वांनी एगमोर स्टेशनवर रात्र काढावी हा एकच मार्ग होता. श्रीकृष्णजींकडून स्टेशनावर कोणी आलें नव्हतें. सुदैवाने दक्षिण भारत हिंदुस्थानी प्रचारसभेचे श्री. भालचंद्र आपटे भेटले. टॅक्सीकरून द० भा० हिंदुस्थानी प्रचार सभेत गेलो. निर्मला व कुसुमची धाकटी बहीण बेबी यांनाहि बरोबर घेतलें. ता० २४ ला कलकत्त्याला अंघोळ केली होती. त्यानंतर काल रात्रीं केली. पूर्व किनाऱ्यावर सर्वत्र पाऊस पडून गेलेला असल्यामुळे उष्णता सुसह्य आहे. पहाटे व रात्रीं गार वारे असतात. धर्मस्नान घडत नाही.

द० भा० हिं० प्र० सभेत अंघोळ आटपल्यावर अशी शक्कल निघाली की रात्रीं १०.१० चें गाडीने निघून रात्रीं चिंगलपेट प्लॅटफॉर्मचीं 'डॉमिटरी' करावी आणि सकाळीं ६ ला तेथून निघून ७.१५ ला कांचीपुरम्‌ला पोचावें. विचार आला की अंमलबजावणी झालीच. तो काही S. R. C. Report थोडाच आहे ? जेवण बाद केलें. बबाताईंच्या नाकींनव आलें होतें. तरी निघालो. रात्रीं १२ ला चिंगलपेटला आलो. बबाताई, निर्मला, बेबी देशपांडे व कुमुद जोग या स्त्रियांच्या डब्यात बसल्या. आम्ही पुरुषांच्या डब्यात स्वस्थ बसून आल्याची कल्पना करून घेतली. रात्रीं १२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते पहाटे ४ चिंगलपेट प्लॅटफॉर्मवर झोपण्याचा प्रयत्न केला. "यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोष: ?"

सबंध प्रवास तिसऱ्या वर्गाने केल्याचा आरोप येऊ नये म्हणून व ववाताईंच्या आरामाचा काहीच विचार मी केला नाही असा त्यांचा समज होऊ नये म्हणून चिंगलपेट ते कांचीपुरम् १५ मैलांचा प्रवास आम्ही दुसऱ्या वर्गाने ऐटीत करीत आहोत. दार्जिलिंग ते सिलिगुडी चैनीत प्रवास, चिंगलपेट ते कांचीपुरम्‌चा चैनीत प्रवास. सुरवात गोड, शेवट गोड. आवर्त दशांशाच्या नियमाप्रमाणे मधलाहि गोड !

कांचन गंगेपासून थेट पूर्वसमुद्रापर्यंत आलो. त्या मानाने हवामान जाणवलें नाही. पुन्हा महानदी, गोदावरी व कृष्णा यांचीं भव्य व मनोज्ञ पात्रें पाहिलीं. शोणभद्र, महानदी, गोदावरी व रायचूर आणि विजयवाडा येथील कृष्णा हे भारतातील सर्वात मोठे पूल मानले जातात. सर्वात मजबूत आणि भक्कम पायाचा गंगेवरील इशुरदी येथील पूल पूर्व पाकिस्तानात गेला. हिमालय जर देवतात्मा तर गंगा विष्णुपादोदक आणि समुद्र तर विष्णूची सासुरवाडी ! केझुरिनाचीं उपवनें, ताडा-माडा-पोफळांची राई, काजूच्या बागा, निळें डोंगर आणि अफाट मैदानें, सगळें काही मनोज्ञच आहे. सृष्टि माता कोठेहि असुंदर नाही. अंबिकेप्रमाणे ती नित्य शिवा आहे आणि त्रिपुर सुंदरीहि आहे. ववाताई म्हणते मला सृष्टि सौंदर्य पहावेंसें वाटतें, नद्या, तीर्थें व समुद्र यांचें स्नान करावेंसें वाटतें. आकांक्षा ऊन्ह, पाऊस, थंडी सहन करणाऱ्या वृक्षांच्या; प्रकृति मात्र सुकुमार वेलीची ! ववाताईंची समस्या म्हणजे स्त्रीजीवनाची समस्या ! कॉफी मचूळ लागते, गर्दीत जेवण जात नाही, अंग धुतलें नाही तर खातांना मळमळतें, जागरण व धांदल मानवत नाही ! पर्यटनाची हौस मात्र आहे ! पण, फजितीतहि ववाताईंना गंमत मात्र वाटते. त्यामुळे वातावरण 'मेघमेदुर' होत नाही.

२५ ला गाडीत जागा व वेळ दोन्ही मुबलक. त्यामुळे 'Far from Moscow' Book II वाचून काढलें. रचनात्मक उद्योगावरील 'रामायण' आहे तें. सृष्टिसौंदर्याबद्दलचीं खालील वाक्यें पहा कशीं गमतीचीं आहेत तीं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

"Don't slander Mother Nature, she is lovely everywhere. You only need to be able to see her beauty and appreciate it....See, the Sun has already gone, it is behind the tall hill over there. But you can see the glory of its magic touch on the Snowy canvass before you....look at the molten gold of those Sunbeams filtering through the Snow!

That hill over there is a picture in itself. It seems all of one colour yet what a wealth of tones and half tones it has. The dull gold of the peak turns to a pale lilac further down which deepens to a rich purple at the foot

Any one who can perceive beauty in Nature to which others are oblivious, is an artist."

आहे कीं,नाही वहार? वर्णन वाचून स्मृति जागृत होते? ही सृष्टि इतकी चित्त वेधक नसती तर तिला माया कुणी म्हटलें असतें! ती भुरळ पाडते आणि दिव्य दृष्टिहि देते. अरसिकाला भुरळ पाडते, रसिकाला अभिरुचि देते.

तामिळनाडचें हें उद्यानसदृश दृश्य पुन्हा मनाला रमवू लागलें. मणिहारी घाटावरील गंगेच्या वाळवंटाचें सौंदर्य किंवा कराची येथील समुद्रकिनाऱ्यावरील वाळवंटाची शोभा आणि राजस्थानांतील 'टीब्यां'ची छवि काही कमी नयनमनोहर नाही! 'सर्वे भद्राणि पश्यन्तु!'

ताडाचीं फळें, आंबे, शहाळीं, काजू इत्यादि जिन्नसांना मनूने चाखल्यावांचून चव येत नाही. त्याचप्रमाणे या दृश्यांचें रम्यत्व मनूराजांना निवेदिल्यावांचून आल्हाद पूर्णपणें देऊ शकत नाहीत.

पहाटे ४ पासूनच गाडीत गर्दी सुरू झाली. दांतहि आपले नि ओंठहि आपले! गाडी बदलण्याची पाळी आली की बबाताईंच्या कपाळाला आंठ्या चढतात. एका तिकिटात इतक्या निरनिराळ्या गाड्यात बसायला मिळतें याचें तिला काहीच कौतुक वाटत नाही!

सुमारे ८.३० ला सर्वोदयपुरम्‌मध्ये आलो. काकांकडे वसतिस्थान निर्देशनाचें काम आहे. त्यांच्यापासून तो शेवटच्या इसमापर्यंत सर्वच सामान्य व विशिष्ट व्यक्तींनी 'विमल नहीं आयी?' म्हणून प्रश्नांचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भडिमार केला. उपस्थितीपेक्षाहि अनुपस्थिति अधिक डोळ्यांत भरते ती अशी ! प्रसिद्ध वस्तूच्या उपस्थितीपेक्षा अनुपस्थिति अधिक भावरूप ठरतें! अनामिकेचें नांव सर्वतोमुखीं आहे !

सर्वोदयपुरम्‌मध्ये प्रदर्शनाचें महाद्वार, विनोबाकुटीरचा दर्शनी भाग यांतील कला कौशल्य फारच कौतुकास्पद आहे. माडाच्या पानांवर ही सगळीं कलाकुसर केली आहे हें विशेष. पांच प्रकारच्या भोजन शाळांतून निळनिराळ्या प्रकारच्या जेवणाची व्यवस्था आहे. मोठमोठाले मंडप आहेत. त्यांत तिसऱ्या वर्गाच्या प्रतीक्षालयाप्रमाणे आपापल्या पथाऱ्या पसरून लोक पडलेले आहेत. नेतानिवासांत तीच स्थिति आहे. फक्त खाटा आहेत. व्यवस्था बरी आहे.

संमेलनाला आरंभ दुपारीं ३ ला झाला. संमेलनाचे अध्यक्ष अप्पा पटवर्धन आहेत. ते आपल्या खोलीत आहेत. किंवा असें म्हणावें की आपण त्याच्या खोलीत आहोत. काकासाहेबांनी अप्पांचा परिचय संमेलनाला करून दिला. 'अत्यंत पवित्र पुरुष' अशा विशेषणांनी अप्पांना गौरविलें.

काकांच्या भाषणाला धर्मोपदेशकाचें रूप येत आहे. कारण 'काकासाहेबांनी' दाढी ठेवलेली आहे. काका आता वडीलधारे माणूसच नाहीत. पुरोहित बनले आहेत. प्रास्ताविक भाषणात काकासाहेबांनी आस्तिकतेची विनोबाकृत नवीनच व्याख्या सांगितली. नास्तिक म्हणाला, "माझा देवावर विश्वास नाही." विनोबा म्हणाले, "त्याची मला काळजी नाही. कारण देवाचा तुझ्यावर विश्वास आहे."

'पवित्र कार्याचा, पवित्र मुहूर्तावर, पवित्र पुरुषाच्या हस्तें उपक्रम.' काकांनी अध्यक्षांचा परिचय दिला. राजाजींनी तामिळमध्ये भाषण केलें.

कांचीपुरम्
२७.५.'५६

काल दोन्ही वेळा फिरायला गेलो होतो. आजहि सकाळीं जाऊन आलो. हा क्रम चालू राहिला तर बराच फायदा होईल अशी आशा वाटते. बबाताईंनी बाजरीचें पीठहि तयार करविलें. पपया भरपूर आहेत. उत्तम ताक व दहीं आहे. फिरायला एकटाच जातो. सगळीकडे अगदी बारीक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लाल रेजग्यांचीं मोकळीं मैदानें आणि भाताचीं रिकामीं शेतें पसरलीं आहेत. मधून मधून गांवें आणि गांवांच्याभोवतीं झाडें झुडपें, कोठेंहि डोंगराचें नांव नाही. तरी पण सृष्टीचें रूप मोठें सुंदर दिसतें. एकंदरीत सृष्टि असुंदर नाहीच. येथें तिचें रूप मोकळें आणि विशद आहे.

भैयासाहेबांच्या घरीं आणि बबाताईंच्या घरीं जितकीं आंगणें तितक्या वाटिका! गुलाब, मोगरा, जाईजुई, जासवंद हीं फुलझाडें तर आहेतच. शिवाय सुंदर ताड आहेत, वेल आहे, शेवगा आहे. भैयासाहेबांच्या अंगणात किती तरी रंगाचे आणि रूपांचे गुलाब आहेत. येथे माझ्यासमोर मेजावर बबाताईंनी दोन तीन प्रकारच्या गुलाबांची परडी ठेवली आहे. पानांच्या आकाराचीं लाल फुलेंहि आहेत. या फुलांच्या वल्लरी मोठ्या शोभून दिसतात.

बेमेतरा.
३.३.'५८.

येथे आल्यापासून सगळीं पथ्यें आणि निर्बंध झुगारून दिले आहेत. डॉ० सेन यांच्या पत्नी, येथील माताजी, नाश्ता आणि जेवण मिळून चारदा खायला देतात. त्या देतील तें खातो. चारहि वेळा डॉ०सेन स्वत: बसून खाऊ घालतात. भात आणि बटाटे व मसाले दर जेवणात असतातच. वरणहि असतें. येथे विश्वासपूर्वक आलो आहे. पहावें आता काय पदरीं बांधून जातो तें.

येथील पाण्याचाहि गुण आहेच. सगळ्याच प्रकारच्या रोगांनी ग्रासलेलीं माणसें येथे आहेत. त्यांना येथील हवापाण्याचाहि लाभ मिळतो. डॉ० सेन यांच्यावरील श्रद्धेमुळेच अधिकांश लोक येतात. ७९ वर्षांच्या वयात चिमणी इतकें खाऊन पहाटे ४ ते रात्रीं १०.३० पर्यंत स्वारी सारखी चकरा मारीत असते. आजाऱ्यांकडे लक्ष देणें, पाहुण्यांची चवकशी करणें, कामावरील मजुरांची देखरेख करणें, इत्यादि सारखें चालू असतें. क्षणभर एके ठिकाणीं बसवत नाही. एकट्याला बरें वाटत नाही. सारखें कोणी तरी जवळ हवें. बरें, कुठल्याहि आजारी माणसाशी त्याच्या प्रकृतीबद्दल बोलत नाही. त्याला काही सांगत नाही. विक्षिप्तपणा आणि प्रतिभा यांची जोडगोळी अभेद्य दिसते. त्या माताजीहि सकाळपासून रात्रीपर्यंत यंत्रवत् काम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करीत असतात. हात आणि तोंड यांना एकाच वेळीं गति देणारें प्रेरक तत्त्व त्यांच्या शरीर रचनेत कोठे तरी असलें पाहिजे. डॉ० सेन यांचे पाय आणि तोंड एकाच वेळीं चालतें आणि माताजींचे हात आणि तोंड ! यांचें चालतें-बोलतें ध्यान आणि त्यांचें बोलतें-करतें ध्यान !

व्यवस्था, शिस्त आणि स्वच्छता यांचें अस्तित्व अभावाने जाणवतें.

पाण्याप्रमाणेच हवाहि स्वच्छ आणि हितकर आहे. चांगलें प्रशस्त पठार आहे. सगळीकडे शेतें आणि मोहाचें तुरळक जंगल आहे. चहूंकडे टेकड्या मोठ्या शोभून दिसतात. पावसाळ्यात सगळें वैभव खुलून दिसत असेल. खादीग्राम, गांधीग्राम, सोखोदेवरा, गोपुरी, कैनाड, देवपोटांगी, कौसानी, टिहरी, पौडी, सगळींच ठिकाणें चांगलीं आणि रमणीय. एकंदर सृष्टीत सगळीचकडे रमणीयता आहे. वाळवंटाचेंहि भव्य सौंदर्य काही कमी रमणीय दिसत नाही !

एकंदरीत सबंध देशात पाण्याची टंचाईच आहे. उदंड पाणी जवळ-जवळ कोठेच नाही. अलमोडा, नैनीताल, टिहरी, पौडीकडे पाणी मुबलक असून दुर्मिळ आहे. इकडे पाण्याची उणीवच आहे. येथील पाणी चांगलें पथ्यकर आहे पण मुबलक नाही. बेताने वापरावें लागतें. मोजकें मिळतें. एक बांध बांधण्याची योजना डॉ० सेन यांनी केलेली आहे पण ती अमलात येईल तेव्हा !

काल सकाळीं डॉ० सेन यांच्या बांध-योजनेची जागा आणि सात-जोगिणींची टेकडी चढून आलो. संध्याकाळीं 'गोगलीबाबा' ची टेकडी पाहून आलो. त्या निर्जन अरण्यातील प्रचंड शिलांखाली एक गुंफा आहे. तिच्यात म्हणे कोणी तपस्वी राहत होता.

आज डॉ० सेन यांच्या संस्थेच्या इस्टेटीपैकी 'दार्जिलिंग पॉइन्ट' नांवाची जागा पाहून आलो. जवळ जवळ एक मैलपर्यंत हिंडलें असतां सारखा जो मनोरम देखावा दिसतो, तो 'दार्जिलिंग'च्या धरतीवर आहे. शांतिनिकेतन-ची काही मंडळी येथे आली होती. त्यांनी या जागेचें 'नामकरण' केलें. भव्य प्रमाणात किंवा अल्प प्रमाणात सौंदर्य सगळीकडेच आढळून येतें. जेथे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रयोजन परत्वें जाण्याचा अगर राहण्याचा योग येईल तेंच स्थान रम्य व पवित्र दिसू लागलें तर काय वहार होईल ?

नवेगांव.

१६.३.'५८.

●

'जैनेंद्रांना बिनशर्त शरणागति' हें आजचें माझें धोरण आहे. त्याप्रमाणे काल त्यांच्याबरोबर राजेंद्रबाबूंच्या मुलाखतीला जाऊन आलो. राष्ट्रपति भवनात राहणाऱ्या लाट साहेबांच्या किंवा राष्ट्रपतीच्या प्रत्यक्ष मुलाखती-करिता जाण्याचा आयुष्यातील हा पहिलाच प्रसंग. सौजन्यपूर्ण औपचारिक गोष्टी झाल्या. आणखी यापेक्षा अधिक होणार तरी काय होतें ? सर्वोदय परिवाराविषयीं काही जिव्हाळ्याची चर्चा व्हावी अशी जैनेंद्रांची फार इच्छा. पण त्याकरिता अधिकार त्यांचाहि नव्हता आणि माझाहि नव्हता. आकांक्षा फार, योजकतेचें नांव नाही, असा थाट !

आकांक्षेला अनुरूप योजकतेचा अभाव हाच एकंदर सगळ्या कार्यातील मुख्य दोष दिसतो. शिबिरात भाषण करायला दादा, विशिष्ट सभेत भाषण करायला दादा, आळीं आळींतील चव्हाटयांवरील जाहीर सभेत भाषण करायला दादा ! — असा बेत आहे. काल संसद सदस्यांची सभा झाली. दादा कृपालानींचें मुख्य वक्ता म्हणून नांव होतें. ते येऊ शकले नाहीत. जे सदस्य हजर होते त्यांना वळवून वळवून वसमधून आणावें लागलें. अध्यक्ष अनंत शयनम्. वक्ता मी. एका उपवक्त्याने अगदी अप्रयोजकपणाचें भाषण तारस्वरात केलें ! अनंत शयनम् यांनी काय भाषण केलें, तें त्यांचें त्यांनाच माहीत. 'संसदीय पद्धती'च्या बाबतीत मी जे मुद्दे मांडले, ते आकाशतत्त्वात विलीन होऊन गेले !

आज व उद्या लोकतंत्र दिवस आहे. श्रीमन्जी, अशोकभाई इत्यादींची नांवें आहेत. प्यारेलालजींचेंहि नांव आहे. पण, दिल्लीतच नाहीत. मला जावें लागणार राजघाटच्या प्रार्थनेत. बुद्धिजीवी दिवसांचें अध्वर्युत्व पू० काकासाहेबांकडे आहे. तेहि दिल्लीत नाहीत. 'राजदूत दिवसाचा' प्रसंग कोणी साजरा करावा हें अजून ठरलेलें नाही. म्हणून मीच आता १८ पर्यंत रहावें हा जैनेंद्रांचा आग्रह !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जें जें प्राप्त होईल तें तें करून मी येथून काशीला जाईन. अर्थात् जैनेंद्राची मर्जी संभाळून. कारण, त्यांच्या कौटुंबिक समस्यांकरिताहि मी एक दिवस द्यावा हें त्यांचें म्हणणें आहेच. ज्याच्या स्वत:च्या कौटुंबिक जीवनाचें असें धिडवडे निघाले. त्याचीहि अशी विटंबना! तो दुसऱ्याला काय ज्ञान देऊ शकणार?

जैनेंद्र म्हणत होते, "विमल के दो पत्र आये, और ऐसे पत्र थे जिनका जवाब देना जरूरी था। लेकिन मैं पत्र ही नहीं लिख पाता!" तू म्हणे "'निर्बल के बल राम' ची थट्टा उडविली आहेस! दादा व तुम्ही स्वत:ला 'निर्बल', 'पामर' काय मानता? निर्बलत्व आहे कोठे?" इत्यादि इत्यादि. "निर्बलत्व आहे कोठे? आहे कोणाला?" "जो पाहतो त्याला." "तो कां पाहतो?" तेवढेंच समजलें तर निर्बलत्वाचा मागमूस तरी राहील काय?

नवी दिल्ली.
११.४.'५८

मेल दीड तास उशिरा येणार असल्यामुळे आमच्या गाडीवरहि तिची छाया पडू लागली. भुसावळला ७.५ ची सकाळची गाडी तरी मिळू शकेल किंवा नाही याची शंका वाटू लागली. ज्याला विचारावें तो कानावर हात ठेवून, एकच उत्तर देई, 'अतर्क्य महिमा तुझा!' आगगाड्यांच्या हालचाली अगदी 'देवो न जानाति' सदरांत गेल्या आहेत. रेल्वे खात्यातील बेबंदशाहीला सीमा राहिलेली नाही. माणसाला आपला जीव प्यारा आहे, म्हणून दररोज एकाच अपघातावर निभावतें!

वा न वा नको म्हणून रात्रीं १२.३० वाजता बडनेरला आरामाची जागा सोडून मेलमध्ये एका तिसऱ्या वर्गाच्या डब्यात शिरलो. मूर्तझापुरला क्रूमॅन व कंडक्टरच्या मदतीने दुसऱ्या वर्गाच्या डब्यात जेमतेम बसण्यापुरती जागा मिळवली. आलोचन जागरणाचें तप आचरीत पहाटे ४.३० ला भुसावळला पोचलो. प्रातर्विधि, दाढी व अंघोळ आटोपून तयार झालो. पहावें तों ६ वाजता, म्हणजे माझ्या गाडीच्या एकतास अगोदर, दिमाखाने डोलत डोलत पॅसेंजरीणबाई येऊन दाखल झाल्या! 'तुझा सगळा जागरणाचा व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जादा खर्चाचा खटाटोप फुकट गेला,' असें जणू त्या मिसकिलपणाने सुचवीत होत्या! माणसाच्या आत्मसमर्थनाच्या वृत्तीला अनुसरून मी म्हटलें, 'झालें तेंच ठीक झालें! निदान अंघोळ उरकून घेता आली!'

वास्तविक या सगळ्या धडपडीच्या मागे एकच 'प्रेरणा' होती! × ×चें मन खट्टू होऊ नये. नागपुरला समजलें होतें की मेल सुरतमार्गें जाणार म्हणून. भुसावळला व त्यापूर्वी वडनेरला जाहीर करण्यात आलें की ती मनमाड-दौंड मार्गें जाणार! ग्रहांच्या गतीप्रमाणेच आगगाड्यांची गति पालटते एकूण!

आगगाडी.
१४. ७. '५८.

परवां एक पत्र आगगाडीतूनच पाठविलें. परवां संध्याकाळीं ७ ला सुरतेला पोचलो. डॉ० वल्लभभाई पटेल नांवाच्या तरुण डॉक्टरांच्या 'अशक्त आश्रमात' उतरलो. अपंग व अशक्त माणसांचें तें इस्पितळ आहे. अगदी अनुरूप ठिकाण शोधून काढलें; नाही?

बावला उत्कलमध्ये गेलेला आहे. प्रवोध मात्र आलेला होता. त्याचा मेंदू तरतरीत व सुपीक आहे. व्यासंगहि आहे, आणि विचार शक्तिहि आहे. चर्चेनंतर माझ्या विचाराला गति मिळते. ववलभाई होते माधुर्याची मूर्तिच. मंद सुगंध वातावरणात दरवळू लागतो त्यांच्या सान्निध्यात. संस्थामुक्त सख्यत्वाची जागती ज्योत! हरिवल्लभ परीख यांची सोबतहि आहे. बवलभाई आणि हरिवल्लभ! लोखंडी स्प्रिंगवर मखमाली गादी!

काल शिबिरात सकाळीं अडीच तास दुपारीं स्त्रियांचें कॉलेज. कॉमर्स कॉलेज, आर्टस्-सायंस कॉलेज, आणि रात्रीं मैदानीं जाहीर भाषण, असे पांच कार्यक्रम झाले. प्रवोधला तें खपलें नाही. त्याने १७ चा अहमदाबादचा कार्यक्रम रद्द करविला. तेवढ्याकरिता माणूस पाठविला. उद्या महेसाणा शिबिर आहे. आज संध्याकाळीं तेथे पोचेन. १८-१९ ला भावनगर येथे सौराष्ट्राचें शिबिर आहे. सुरतेत वातावरण चांगलें दिसलें. उत्कंठा आहे, अगत्यहि आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अहमदावाद रद्द केल्यामुळे काल रात्रीं २.३० च्या गाडीने निघण्या-ऐवजी सकाळीं ६ ला निघालो. पहिल्या वर्गात फक्त हरिवल्लभ आणि मी दोघेच आहोत. तापी व नर्मदा यांच्या खोऱ्यांचें वैभव डोळे भरून पाहत चाललो आहे. तापी व नर्मदा या वेळीं संपूर्ण जीवनमय आहेत. भडोचचें दृश्य मोठें वैभवपूर्ण दिसतें. आणंदपर्यंत ववलभाईंची सोबत आहे. सृष्टि-वैभवात मानव्याचें हें जिवंत ऐश्वर्य अधिकच शोभून दिसतें. प्रबोध महेसण्याला पुढे गेला आहे. वजूभाई भावनगरला जाऊन बसले आहेत.

डेविड हॉगेटचें हरिवल्लभला आलेलें पत्र वाचायला मिळालें. अनेक महिने दवाखान्यात काढून मोडकें-तोडकें शरीर घेऊन बाहेर पडला आहे-पण मनाचा जोम आणि हृदयाचा जिव्हाळा जणू पूर्वीपेक्षाहि वाढलेला आहे. या माणसांमध्ये खरी आत्मशक्ति आहे. डंकन ग्रीनलीसचें जें पत्र मागे तुला दाखविलें होतें त्यातहि त्याच्या रगदार मनोवृत्तीची प्रभा फांकली होती. डेविडने काही पुस्तकांचीं नांवें सुचविलीं आहेत. त्यांचा शोध करणार आहे.

ववलभाई आणंदला उतरले. त्यानंतर बोरियावीचें स्टेशन आलें. हें सुरेंद्रजींचें किती तरी वर्षें निवासस्थान होतें. बोरियावीकरांनी त्यांच्या-करिता एक 'पक्कीकुटी'हि बांधून दिली होती. सहजच सुरेंद्रजींचें स्मरण झालें. त्यांचा स्नेह आठवला.

काल अहमदावादपासून रमेशहि बरोबर आला. "ताई ! ताई ! ताई !" — सारखा ध्यास आहे त्याला ! "ताई माझ्यावर रागावली नाही ना ?" — मी एवढेंच म्हटलें, "रागाचें इतकें ओझें सारखें अनेक दिवस वाहायला विमल तयार नाही. ती रागावली, आणि नंतर राग विरूनहि गेला. दुःख तिला झालें !"

रमेश म्हणजे चित्ताच्या ऊर्मींचा पुंजका. देवाने म्हणे माणूस स्वतःच्या आकृतीप्रमाणे बनविला. देव इतका कुरूप आणि दुबळा खात्रीने नाही. पण माणूस हा देवाइतकाच 'गूढ' आहे एवढें मात्र खरें ! 'देवाय तस्मै नमः ।' रमेश मुद्दाम रजा काढून आला आहे. आज रात्रीं मी भावनगरला जाईन. तो परत अहमदावादला जाईल. इतकें सगळें असूनहि सार्वजनिक प्रश्नांच्या बाबतीत विचार करण्याची शक्ति पुष्कळ बऱ्यांपैकी आहे त्याची.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रबोधने 'उत्तरदायी ग्रामसमाज' 'संपाचें नव संस्करण' व 'मार्क्स-वाद' या विषयांवर विचारप्रवर्तक लेख लिहिले आहेत. मूलगामी विचार करतो हा तरुण.

सुरतेला १७५ पर्यंत लोक शिबिरात होते. येथेंहि १५०च्या वर आहेत. सुरतेची सार्वजनिक सभा बरीच भक्कम झाली.

आगगाडी, महेसाणा.
१६, १७.७.'५८.

आबूरोडपासून गोकुळभाईंचा मुलूख लागला. स्टेशनवर जेवण घेऊन मंडळी आलीं होती. अहमदाबादलाच तर सगळे जेवण परत पाठवावें लागलें होतें. विमल वेट्राबेटने दिलेली शिदोरी मिटक्या मारून मारून आबूच्या पूर्वीच चाखली होती. त्यामुळे आबूहून फक्त उत्कृष्ट पेढ्यांचा द्रोण तेवढा घेतला. सिरोहीरोडपासून स्वत: गोकुळभाईंच गाडीत आले. माझ्या डब्यात न बसता दुसरीकडे बसले व दर स्टेशनावर येऊन भेटत असत. राणी स्टेशन-वर कृष्णराज मेहतांचे बंधु, धनपतजी, तांब्याभर चहा घेऊन हजर! जणू काही वराचा बापच प्रवासाला निघाला आहे. खैर इतकीच की अजमेरला जेवण घेऊन कोणी आलें नाही. गोकुळभाईंनी तेथेंहि निरोप पाठविलाच होता. अशा इतमानाने अस्मादिकांची स्वारी मध्यरात्रीं नंतर जयपुरला पोचली. १ वाजला होता. गोकुळभाईंबरोबर दासाहेबांकडेच उतरलो.

सकाळीं जीप घेऊन रामेश्वरजी अग्रवाल स्वत: मधुकरकडे गेले व त्याला दासाहेबांकडे घेऊन आले. टिफिनबॉक्समधील सगळे पदार्थ जवळ-जवळ शिल्लक होतेच. त्यात रमेशच्या पापड्या, लोणी व आबूच्या पेढ्यांची भर पडली. पेढे, केळ्याच्या चकत्या व चिवडा सगळ्यांनी मिळून खाल्ला. चकत्या सगळ्यांना खूप आवडल्या. विमल वेट्राबेटची पाठ थोपट !

तू न आल्यामुळे गोकुळभाई, दासाब, मधुकर, रामेश्वरजी सगळ्यांची कोण निराशा झाली ! माझ्या येण्याने झालेल्या समाधानापेक्षा तू न आल्यामुळे झालेला विरस किती तरी मोठा आहे !

सकाळीं ८.३० नंतर रामेश्वरजींबरोबर येथे आलो. येथेंहि सगळी-जणें तुझी वाट मोठ्या उत्कंठेने पाहत होतीं. त्यांचीं मनें खट्टू झालीं. एक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फारच सुंदर जाळीदार गवती झोपडी तुझ्याकरिता सजवून ठेवली आहे. येथे. कानाचें दुखणें जर उद्भवलें नसतें तर येथील हवेनेदेखील तुला बरें वाटलें असतें. स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, मोकळें आकाश, अफाट जमीन ! सगळीकडे हिरवळच हिरवळ ! मला सारखी तुझी आठवण होते ! "I cannot live in the present ! Simply cannot !"

स्वागताचे व आतिथ्याचे काही परंपरागत प्रकार फार जाणवतात. पाहुण्याजवळ सारखें बसून राहणें व त्यांच्याशी बोलत राहणें हा आतिथ्याचा एक आवश्यक भाग मानला जातो. माझी श्रवणभक्ति टिकत नाही ! अगदी कंटाळा येतो. गप्पाष्टकें करण्यापेक्षा किंवा गोष्टी करीत बसण्यापेक्षा भाषण करून मोकळें होणें परवडतें. सतत तैनातीत कोणी तरी राहिलें तर त्याची कींव येते.

जयपुर-जोधपुर वाद थोडा सौम्य झाला आहे. कुठलाहि वकील कोर्टात फिर्यादी, आरोपी, प्रतिवादी, वादी किंवा साक्षीदार म्हणून जायला तयार होणार नाही. त्याला ते कमीपणाचे वाटेल. पण वकील या नात्याने कोर्टात जाण्याची संधि तो सारखा शोधीत असतो. तुरुंगाप्रमाणेच कोर्ट-देखील आपल्या गांवीं नसलेलें बरें, असें कां वाटू नये ?

काहीतरी कारण काढून याच वेळीं विद्यार्थ्यांचीहि चळवळ चालावी अशीहि योजना मोठ्या शिताफीने केली आहे. स्वपक्षाच्या दांडगाईचा व उत्पातांचा निषेध करण्याचें नैतिक धैर्य कोणातच नाही. अहमदाबादला ज्योतिसंघाच्या मालमत्तेची नासधूस केली. कोणी 'ब्र' देखील काढीत नाही. इंदुभाई गांधीपटेलांचें नांव घेतात. पण अहमदाबादेत गांधीटोपीला धोका आहे, खादीला धोका आहे. कम्युनिस्टांखेरीज धोरण कोणालाच नाही !

खादीबाग. (चोमू).
२३.८.'५८.

•

सकाळीं घाई घाईने तुला एक पत्र लिहिलें. त्यानंतर दादरला रावसाहेबांकडे गेलो. अच्युतजी, माणिकताई, विजयाताई इत्यादि मंडळी होतीच. रावसाहेबांना हृदय विकार असल्याची जी शंका सकारण आली होती तिचें पूर्णपणें निरसन झालेलें आहे. त्या बाबतीत काळजीचें कारण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाही. आता काळजीचें कारण म्हणजे त्यांना 'टेंपरेचर' असतें. त्याचें कारण मात्र सांपडत नाही. त्यामुळे 'निदान' झालेलें नाही. आज एक्स्‌रे काढतील. त्यानंतर निदान होईल. श्रीस्वामी काकांकडेहि जाऊन आलो. पण, ते बाहेर गेलेले होते. मध्ये ते बेळगांवलाहि जाऊन आले. याचा अर्थ ते well च नव्हे, तर 'very much alive and kicking' आहेत. मात्र भेट झाली नाही.

जे० पी० च्या प्रतिरक्षणावरील पत्रकामुळे कार्यकर्त्यांमध्ये खळवळ झाली आहे. मला त्या पत्रकाची एक प्रत मिळाली—वर्तमान पत्रातील कात्रण. मला तें 'पत्रक' आक्षेपार्ह नाही वाटत. फक्त Cannot but support the traditional means' हे शब्द अप्रशस्त वाटतात. मुंबईच्या कार्यकर्त्यांनाहि तेच शब्द खुपतात. त्यांनी वल्लभस्वामींना त्या अर्थाचें पत्रहि पाठविलें आहे.

आज सकाळीं १०.१० ला श्री माधवराव चव्हाण यांचे सोबत बोटीनें निघालो. नवीनच अनुभव आहे – खाली अफाट दर्या, वर निरवधि आकाश ! अनंत क्षितिज !

दुसरीकडे मात्र किनारा व डोंगर दिसतात तेव्हा जमिनीच्या दर्शनाला काही अगदीच पारखा झालो नाही. पार्थिव वृत्तीच्या माणसाला व पार्थिव पिंडाला पृथ्वीचा पिंड सोडणें दुरापास्त वाटतें.

काशी ते दादर बत्तीस तासांच्या प्रवासाचा अनुभवहि नवीनच होता. मी भैया लोकांच्या डब्यात होतो. गर्दी इतकी की तिळ ठेवायला जागा नाही.—अगदी अक्षरशः. गर्दीच्या मानाने मला मात्र त्रास मुळीच झाला नाही. सगळे भैये खरे खडतर, निरक्षर, फार तर 'अल्पाक्षर !' पण मोठे सरळ, सालस व प्रेमळ ! त्यांनी मला मोठ्या काळजीपूर्वक संभाळलें. बत्तीस तासांपैकी २६ तास मी वरच्या फळीवरच अडकून पडलो होतो. खाली पाय ठेवायलाहि वाव नव्हता. मनमाड ते मुंबई तर वरच्या फळीवरहि तीन /तीन माणसें अवघडून, वांकून, सात तास वसलीं ! खिडकीजवळ जी 'सिंगल सीट' असते तिच्या 'तक्क्यावर' हि एकादा बहाद्दर घटकाभर वसून विसावा घेत असे. 'संडासा'पर्यंत जाण्याची सोय नव्हती. पण तशाहि स्थितीत खाणें,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चहा, गप्पागोष्टी, गाणें, थट्टामसकरी ऐटीत 'जारी' होतें. डब्यात ढेंकूण म्हणती 'घर माझें'ची स्थिति होती. एका भैयाने लिहून ठेवलें, "इस डिब्बे के 'स्वागताध्यक्ष' खटमल हैं". दादरला माझ्या सोबत उतरला. माझें सामान उचललें. नंतर सामान मला सोपवून स्वत: मात्र बेमालूमपणें निघून गेला. निरपेक्ष उपकार कर्ता !

खानदेशचे एक खादीधारी पाटील डब्यात आले. एकाने विचारलें, आपकी मातृभाषा मराठी है ?" "नहीं, नहीं, हमारे इधर अहिराणी चलता है, मराठी नहीं ! " एकाची मातृभाषा दुसऱ्याची विमाता बनली आहे. सगळ्या माता सवती-सवती झाल्या ! माता विमाता झाली की मातृत्व ठार होतें, सापत्नभावाची सरशी होते. 'सवती मत्सर' धुडगूस घालतो. पूर-पीडितांकरिता जो पैसा गोळा करण्यात येत आहे त्यात हजारों रुपयें 'ear-marked for surat and Ahmedabad' सहज मिळतात ! खानदेशाकरिता मोठ्या कष्टाने कवडी कवडी जोडावी लागते. हा गणपति-भाईंचा अनुभव !

गाडीत चार मुसलमान आले. गोड बोलून इतर उतारूंशी हां हां म्हणता दोस्ती केली. हैद्राबादचे 'मौलवी' अहमदाबादचे 'मुल्लाजी' एका क्षणात एकमेकांचे मित्र बनले. हिंदु प्रवाश्यांशी 'दोस्ती' झाली. मुसलमानांचें एकमेकांबरोबर 'सहभोजन' सुरू झालें. त्यांच्यात 'सहज बिरादरी' आहे. संगठन धर्म-सिद्ध आहे. हिंदूच्या भाषावादामुळे त्यांची जूट वाढते आहे. मुंबईत पुन्हा त्यांचें संघटन सुरू झालें आहे. त्यांच्यातून 'दीन' पार हरपलें आहे, मजहब मात्र अगदी जोमात आहे. त्यांची 'एकजूट' शुद्ध सांप्रदायिक आहे. फार मोठा 'खतरा' आहे. त्या गर्दीतहि प्लॅटफॉर्मवर उतरून नमाज उरकूनच घेतला त्यांनी !

समुद्राचें हें अगदी पाचूसारखें स्वच्छ व अथांग पाणी आणि हे वर इंद्रनील मण्यासारखें आकाश ! हें अगाधत्व व अनंतत्व पाहून मनूची आठवण येते. अच्युतजी म्हणाले, "मी विमलाताईंना सांगितलें 'होमियोपॅथी'-च चालू ठेवा म्हणून !" रावसाहेब म्हणाले, "त्यांना लवकर गुण येवो !"

चंद्रावती बोट

१९.११.'५९.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल तुला एक पत्र मुंबईहून आणि एक 'चंद्रावती' बोटीतून अशीं दोन पत्रें लिहिलीं. १२६ मैलांच्या प्रवासाला १४ तास लागले. प्रवास अगदी आरामशीर आणि अतिशय शांततेचा झाला. चंद्रकला बोट अगदी बेगमेच्या गतीने चालत होती. कमाल वेग, ताशीं १२ मैल. अगदी भरधाव चालली. पण धांदल किंवा लगबग मुळीच नव्हती. त्यामुळें हेलकावे अगदी सौम्य. बोट कनवाळू असल्यामुळे मला ती 'लागली' नाही. मुद्दाम त्या भीतीने काल लवंगा व वेलच्या विकत घेतल्या होत्या. उपयोग करण्याची पाळी आली नाही. वाटेत तीन बंदरें घेतलीं. म्हणून आणखीनच उशीर झाला. बोटीचा प्रवास स्वच्छता, सुखसोयी, निवांतपणा, व्यवस्था या सर्वच दृष्टींनी तुला खात्रीने मानवला असता. पण, त्यापूर्वीचा व त्यानंतरचा प्रवास खडतर होता. निरभ्र आकाश व शांत समुद्र यांच्या निरनिराळ्या प्रकाशातील निरनिराळ्या रंगच्छटा पाहून मनूच्या आठवणीने हृदय सद्गदित होत असे! येथे गोविंदराव शिंदे, बाबूलाल गांधी, चंद्राताई किर्लोस्कर इत्यादि खाशा स्वाऱ्या 'पेशवाई' ला होत्या. पंडित वकील यांच्याकडे मुक्काम आहे. कोंकणचें सुबक साजरें गोंडस स्वरूप मला फार आवडतें! निसर्गाचें हें रूप मोठें गोजिरवाणें आहे.

रत्नागिरी.
२०.११.'५९.

आज सकाळीं ६.३० च्या सुमाराला दमदम विमानतळाहून निघून ८.३० ला येथे पोचलो. चि० शकुंतला, खगेश्वरबाबू व प्रवीणराम बरुआ ही मंडळी घ्यायला आली होती. प्रवीणराम बरुआ म्हणजे श्रीकामाख्याराम बरुआ, माजी जि. जज्ज, यांचे चिरंजीव. त्यांच्या आग्रहावरून त्यांच्याच घरीं माझ्या राहण्याची व्यवस्था केली आहे. ते स्वतःची गाडी घेऊन आले होते. तू त्यांच्या घरीं एकदा उतरली होतीस असेंहि ते व इतर मंडळी म्हणाली. अगदी ब्रह्मपुत्राच्या कांठावर घर आहे. समोर दुथडी भरून वाहत असलेला हा महाप्रतापी नद व पलीकडील डोंगर अंथरुणावरूनहि दिसतात. ब्रह्मपुत्र वाहतच राहतो, थकत नाही, तसा आपला डोळाहि बघतच राहतो, थकत नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलकत्त्याला पहाटे पाऊस होता, विमान निघते कीं नाही अशी शंकाहि वाटत होती. पण, पाहता पाहता आभाळ निवळलें. ६ च्याऐवजी ६.३० ला निघालो एवढेंच. रस्त्यात ढगांचा अपूर्व चमत्कार पाहिला. स्वच्छ दुधाच्या मधुर बर्फाचा समुद्र पसरला होता. कोठे त्याचेच धवलगिरि होते, तर कोठे धवधवे होते आणि कोठे हिमनद्या होत्या! समर्थ साहित्यिकालाहि त्या सुषमेचें वर्णन करता येणार नाही, डोळ्यांतहि ती शोभा मावेना!

आसामात आलो, अगदी, 'विमलक्षेत्री' आलो. पण विमलवांचून येथे करमत नाही. तू उतरली होतीस तेथे उतरलो तरी तुझ्यावाचून मन रमत नाही. बाइदेवला भेटलो. त्या परवांच ग्रामदानी क्षेत्रांतून आजारी होऊन आल्या. तेथील पाणी बाधलें. आमांश झाला. चेहरा कोमेजला आहे. पिचून गेला आहे. लिंबाचें सरबत व पेज हा आहार आहे. पण कामाची कळकळ व हुरूप अदम्य आहे. तू यावेस असें येथे त्यांना व इतरांना खूपच वाटते. तीव्र उत्कंठा लागून राहिली आहे म्हटलें तरी चालेल. पण, तुला त्रास तर होणार नाही ही एकच भीति त्यांच्या मनाला वाटते. तरी तू पावसाळ्यात यावेंस आणि एके ठिकाणीं राहून मार्गदर्शन करावेंस. असें त्यांना वाटतें. तू आसामची आहेस व आसाम तुझें आहे अशी त्यांची अभेद्य भावना आहे. हल्ली बाइदेव आपल्या घरींच पानबाजारात आहेत. त्यांच्या थोरल्या बहिणीचे उपचार चालू आहेत. सोबतीला हेम काकती आहे. हेम भराली कुठल्याशा सभेकरिता परप्रांतात गेलेली आहे. समीरणलाहि कसला तरी रक्तदोष झाल्यावर त्वचेवर काळे चट्टे उमटतात म्हणे.

गुवाहाटी.
२१ जून १९६०.

काल दुपारनंतर शिबिरात एक बौद्धिक झालें. एक तासच बोललो. कार्यकर्त्यांच्या भूमिकेचें विवेचन केलें. त्यानंतर शरणीया आश्रमात गेलो, तेथे आतिथ्याला उधाण आलें. मला फक्त चहाच हवा होता. पण, तेथे अष्टभुजा, षोडशभुजा दुर्गेऐवजी किंवा सहस्रचंडीऐवजी अनंतभुजा जगद्धात्री अन्नपूर्णाच अवतरली होती जणू! अगोदर अननसाच्या फोडी व आंब्याच्या फोडी आल्यानंतर केळीं आलीं, त्यानंतर नीलो व लक्ष्मी अगदी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गरमगरम पुऱ्या व बटाटे-परवराची भाजी घेऊन आल्या, एक कन्यका बिस्किटेंच घेऊन आली आणि शेवटीं ऊत्कृष्ट चहा आला. दिवंगत झालेल्या माझ्या आईचें वात्सल्य अशी अनंतरूपें घेऊन अवतरलें. मनूचें घर तें. बाइदेवांच्या मेजाशेजारीं भिंतीवर मनूचें सुंदर चित्र आहे. सरोजिनी देवी, 'देवता' व विमल अशीं तीनच चित्रें आहेत. मनूविषयींची सारी आत्मीयता माझ्याबाबतीत व्यक्त झाली. सगळ्याजणी 'कोरस'मध्ये म्हणाल्या. 'शरणियात स्वागत आसे', असा आमचा निरोप विमल बाइदेवला सांगा.

वॉर्ड नं० १, २ व ३ मध्ये पदयात्रा संपली. तेथील नागरिकांची सभा काल संध्याकाळीं झाली. परवांच्या व कालच्याहि सभेत स्त्रियांची संख्या जास्त होती. स्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव प्रकर्षाने होत होती. लंकाद्वीपात, "स्त्री पंतप्रधान होऊ शकते किंवा नाही, पहिली जागा घेण्याची तिची योग्यता आहे कीं तिचें स्थान नेहमी दुय्यमच राहणार," असा प्रश्न मतदारांपुढे आहे. आसाम त्या प्रश्नाचें उत्तर देऊ शकेल.

राज्यभाषेचें व राजधानीचें भांडण येथेहि चालू झालें आहे. 'असमीया राज्यभाषा म्हणून जाहीर करा, गुवाहाटींला राजधानी हलवा', अशी मागणी आहे. तारासिंह व 'काकाजी' यांच्या मागणीपेक्षा ही मागणी समंजसपणाचीच मानावी लागेल. श्रीवामनराव देशमुखांनी – अकोल्याला सुमारे दहा वर्षांपूर्वी बापूसाहेबांच्या घरासमोर राहत असत, – 'काकाजीं'ना १ वर्षाची सक्त शिक्षा फर्मावली. महाविदर्भाचे हे सगळे कर्ण, द्रुप, द्रोण या वेळीं आपापले प्रतापी शंख फुंकित आहेत.

कालपासून सकाळीं सुमारे तीन मैल एकटाच फिरून येतो. येथे सूर्योदय ४.३० नंतरच होतो. काल कामाख्याच्या पायथ्यापर्यंत जाऊन आलो. आज ब्रह्मपुत्राच्या कांठाकांठाने हायकोर्टापर्यंत गेलो. ब्रह्मापुत्राचें पावित्र्य व सौंदर्य टिकू देण्यात आपल्या पुरुषार्थाचा उपमर्द आहे असें येथील लोकांनी ठरविलेलें दिसतें. एक तसूभर जमीनदेखील पाय ठेवण्याइतकी स्वच्छ राहू न देण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे !

गुवाहाटी.
२३ जून '६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल कॉटन कॉलेजात विद्यार्थ्यांकरिता व बरदलै लायब्ररीहॉल-मध्ये सार्वजनिक भाषण झालें. दरम्यानच्या वेळात विश्रांतीकरिता शरणीयाला गेलो होतो. परवां व काल दुपारचा चहा तेथेच झाला. येथे श्री कामाख्या-रामांच्या घरींहि आतिथ्याचा कडेलोट आहे. त्यांच्या धाकट्या सूनबाईंना वाटतें पाहुण्याला काय काय करून घालू न् काय काय नाही ! दररोज पांच प्रकारच्या तरी भाज्या असतात. शिवाय दहीं आणि लोणचें. मोठ्या शिताफीने अशा परिस्थितीत आत्मरक्षण करीत आहे. पहाटे गुपचुप फिरून येतो. एरव्ही मोटारीवांचून पाऊल टाकण्याची सोय नाही. पायीं चालण्याने मोटारीचा उपमर्द होतो. बिचाऱ्या पायांचा अपमान होतो याची तमा कुणाला आहे ? मोटार हें वैभवाचें चिन्ह आहे ! पाय काही ऐश्वर्याची खूण नाही. ते आयतेच मिळालेले आहेत !

दररोज एक भाषण तरी सार्वजनिक स्वरूपाचें होतें. लोकांना म्हणजे बुद्धिमान वर्गाला, atrophy of the intellect -ची बाधा झालेली दिसते. त्यांचा मेंदू बधिर झालेला आहे. प्रश्नदेखील कंठाळी आणि कायम ठशाचे. त्यामुळे दरेक ठिकाणीं चर्वितचर्वण करावें लागतें. माझा मेंदूदेखील आता फारसा तरतरीत राहिलेला नाही. दरवेळेला नवीन नवीन तारे तोडण्याची 'कुव्वत' आता राहिलेली नाही. सवयीमुळे भाषणें केलीं जातात. लौकिकामुळे लोक तीं गोड करून घेतात.

बाइदेवांच्या निष्ठेबद्दल व उत्साहाबद्दल मात्र फार कौतुक वाटतें. त्यांच्या वृत्तीला ओहटी म्हणून माहीतच नाही. गुवाहाटीत सर्व क्षेत्रांतील लोकांत त्यांच्याबद्दल विश्वास व आदर आहे. त्यांचे दोष, व उणिवाहि आढळून येतात. तरी पण सार्वजनिक जीवनात त्यांच्याइतकें अविरोधी व प्रभावी कर्तृत्व एकंदरीत कमीच दिसून येतें. फक्त सभेपुरतेंच त्यांचें दर्शन होतें. समीरणहि सभेपुरतीच दिसते. नीलो, लछिया पदयात्रेत आहेत. त्यांची भेट एक-दोनदा झाली. लिली म्हणे उजवली गेली. लखीमपुरलाच आपल्या यजमानांबरोबर राहते.

ता० २८ च्या विमानेचें रिझर्वेशन करविलें. तिकिट परतीचेंच आहे. २८ ला रोटरीमध्ये भाषण ठेवलें होतें. त्या क्लबाच्या मंडळींच्या संमतीनेच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तें रद्द झालें. तेव्हा आता ता० २९ ला काशीला पोचेन अशी आशा करण्यास हरकत नाही.

मी येथे आल्यापासून पाऊस नाही. मनस्वी उकाडा आहे. पाऊस खूप पडून गेला. पण त्याची बाधा मला मात्र झाली नाही. ब्रह्मपुत्राच्या दोन्ही बाजूंना आळीपाळीने सूर्योदय व सूर्यास्त स्वच्छ बघायला मिळतो.

आज दुपारचें जेवण शरणीयात आहे, सकाळीं राष्ट्रभाषा समितीत 'भाषिक गोंधळ' 'semantic confusion' विषयीं भाषण केलें. दुपारीं १ वाजता समीरणच्या कॉलेजात भाषण आहे आणि ३ वाजता महिला सभेत. असमीयाला राज्यभाषेच्या सिंहासनावर अभिषेक करण्याकरिता पुढच्या अधिवेशनात सरकारी बिल येणार आहे. सिलचरवाले म्हणतात, 'आम्हाला बंगाली पाहिजे !' एकमेकांची भाषा नको म्हणून तोंडातोंडी ऐवजी हातघाईवर प्रकरण आहे. भाषेत 'शब्दाशब्दी' असतें. पण भाषा तर एकमेकांची नको. तेव्हा 'मारामारी' व 'लट्टालट्ठी' हा एकच व्यवहाराचा मार्ग शिल्लक राहतो.

'Women against Slavery,' 'Dragon and Sickle' आणि 'Causes of World War Three' हीं तीन पुस्तकें वाचलीं.' 'Women against slavery,' स्फूर्तिदायक व हृदयस्पर्शी आहे. 'Dragon and Sickle' मध्ये मॉस्को व पेकिंग छाप कम्युनिझ्‌म्‌मधील भेदाचें मोठें मार्मिक व सोपें विवेचन आहे. 'Causes of World War Three' हें पुस्तक फक्त वाचनाकरिता नाही. त्यांचें तुझ्यावरोबर अध्ययन करीन. विश्लेषण थोडें गंभीर आहे.

गुवाहाटी
२४ जून १९६०.

काल राष्ट्रभाषा समिति, मुलींचें कॉलेज व महिला समिति अशा तीन संस्थांत भाषणें केलीं. बाइदेव सर्वच ठिकाणीं होत्या. विशेष म्हणजे दर सभेला अमियकुमार दास, माजी-शिक्षणमंत्री, अगत्यपूर्वक हजर असतात. त्यांच्या आस्थेविषयीं शंकाच नाही. बाइदेवांची कळकळ निःसीम आहे. पण अगदी जीव तोडून भाषण केलें तरी त्याचा परिणाम साफ पुसून जावा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशी एक रामबाण युक्ति त्यांनी काढली आहे. ती म्हणजे भाषणानंतर दर सभेत प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झालाच पाहिजे. विषय नवीन. त्यामुळे प्रश्न कुणाला फारसे सुचतच नाहीत. जे लोक ठराविक ठोकळेबाज प्रश्न विचारतात त्यांना उत्तरें नको असतात, फक्त स्वतःच्या मताचें प्रतिपादन करायचें असतें. अगदी प्रोफेसर मंडळीदेखील Pointless questions and listless Discussions करतात. ते भाषण ऐकतात पण वक्ता काय म्हणतो तें लक्षात घेत नाहीत. फक्त शब्द त्यांच्या कानावरून जातात. त्यामुळे सभेवर झालेला परिणाम नाहीसा होतो. पण, तो बाइदेवांचा सांस्कृतिक कार्यक्रम दिसतो. त्यांना तो आवश्यक वाटतो. मग हरकत कशाला घ्या ? मीहि त्याला सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सदरात घालतो. लहान मुलांच्या वादात ज्याप्रमाणे assertions and counter-assertions चाच खेळ असतो. तसें या प्रश्नोत्तरात बहुधा होतें. हें शंका समाधान नव्हे.

काल संध्याकाळचा वेळ मोकळा होता. भुवनेश्वरी व कामाख्याच्या डोंगरावर जाऊन यायचें ठरविलें. पण, आता मोटारचा रस्ता थेट देवळाच्या दारापर्यंत झाल्यावर पायी कोण जाऊ देणार ? म्हणून बाइदेव, हेमा-काकती, शकुंतला यांच्याबरोबर मोटारीनें गेलो. पण दिवस निवडण्यात चूक झाली. काल तेथे मेळा होता. बंगाली स्त्रीपुरुषांची एकच गर्दी झाली होती. असमीया लोक वैष्णव आहेत. त्यांच्यात तांत्रिक व शाक्त कमी. म्हणून त्यांच्यापैकी फार थोडे यात्रेकरू होते. यात्रेमुळे आज सकाळपर्यंत दर्शन बंद होतें. आम्ही डोंगरावरून गुवाहाटी, पांडु व ब्रह्मपुत्र यांची अद्‌भुत शोभा पाहत बसलो. वर्षाऋतूतील अनंत वैभव-संपन्न सृष्टिदेवी-देखील भुवनेश्वरीच नाही का ? पण, मनूवांचून सगळें सपक, आळणी !

गुवाहाटी.
२५ जून '६०.

काल रात्रीं दहा वाजता हैदराबादेहून निघून आज संध्याकाळीं ६.३० ला येथे पोचलो. प्रवास अगदी सुखाचा झाला. शक्यतो दिवसा प्रवास करण्याकडे माझा कल असतो. त्यामुळे खिडकीतून सतत बघता येतें. सृष्टीचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रूप पाहून मन कधीच विटत नाही. मुद्दाम बघायला कोठे जाणें परवडत नाही. म्हणून मुद्दाम नवीन नवीन मार्गांने दिवसा प्रवास करता येईल अशी योजना करतो. आगगाडीतून सहज प्रदेश पाहता येतो.

आता विश्वनीडम् विशेष शांत व रम्य दिसतें. जागाहि भरपूर आहे. इमारती अगदी साध्या – डामडौलाचें नांव नाही. मी पूर्वीच्याच ठिकाणीं उतरलो आहे. सौ० सुमित्राताई बुरडे पुन्हा संभाळायला आल्या आहेत. तेव्हा आता कसलीच उणीव भासण्याचें कारण नाही.

विश्वनीडम् (बेंगळूर)
२६.१०.'६०.

●

पुण्याला तुला सुरू केलेलें पत्र तसेंच अर्धवट राहिलेलें माझ्यावरोबर आलें. तें सोबत पाठवीत आहे. काल पहाटे एकनाथ-रंगा 'द्वंद्वसमास' फार उपयोगी पडला. त्यांना कष्ट पडले, पण माझी सोय झाली. ईश्वराने मला अदत्यसुख माझ्या लायकीपेक्षा शतपटीने जास्त दिलें आहे. रिझर्व्ह डब्यात जागा फारच बेताची होती. पाटण्याच्या डब्यात माझें एकट्याचेंच अबाधित साम्राज्य होतें. म्हणून तेथे जाऊन पथारी घातली. पुढे कल्याणपासून सोबत येऊ लागली व भारतीय लोकसंख्येच्या प्रमाणात फुगूहि लागली. पण, भुसावळ तें इटारसी रेल्वेलाईनवर काम करणाऱ्या एका मोठ्या gang ची सोबत लाभली. अरबाला त्याच्या झोपडीतून मोठ्या खुबीने पळ काढायला लावणाऱ्या उंटाचें त्याचें 'शील' होतें. गोंगाट-गलबला, ribaldry व जुगार यांचें अखंड सत्र सहा तास चालू होतें. Proletarian शीलाची भरपूर चुणूक मिळाली. गंमत वाटली. कंटाळा किंवा तिट्कार वाटला नाही. इटारसी ते जबलपुर गर्दी झाली. पण, ती फक्त numerical होती, tumultuous किंवा vociferous नव्हती ! मुंबईला वाटलें होतें की डब्यात अगदी एकांतवासाची पाळी येईल का ? देवाने या देशात अशी भलती तक्रार करू नये ही जाणीव करून दिली. जबलपुरला बेबी-बब्रनांनी मोटार आणली होती. प्रवास फार सुखाचा झाला. सांस्कृतिक कार्यक्रमाची जोड आरामाला मिळाली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सकाळीं पूर्णचंद्रजी व भाया यांच्या स्वाऱ्या भेटीला आल्या. भायाला गाईसंबंधीं सभेकरिता सकाळींच दिल्लीला जायचें होतें. दोघांनीहि 'नाश्ता' केला. 'Milk bread', खाकरे, मुगाचो डाळ, बेंगलूरी चिवडा हे सारेच पदार्थ बबनला फार फार आवडले !

विनोबा सकाळीं ७.३० ला शहरात आले. बबनच्या पूर्वीच्या घरासमोरील मैदानात त्यांच्याकरिता मुद्दाम झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. त्यांचें भव्य स्वागत झालें. शहरात रस्त्यावर 'अशोभनीय जाहिराती' कोठेंहि आढळत नाही. ही पूर्वतयारी करण्यात आली. बाबला, कुसुम, गौतम इत्यादि मंडळी विनोबांच्या बरोबर आहेत. बेबी-बबन, लल्लू, मुन्नी, साधना यांनी विनोबांचें दर्शन त्यामुळे विशेष अडचणीवांचून घेतलें. तिघांनीहि जेवणाचें आमंत्रण मोठ्या प्रेमाने स्वीकारलें. बेबी-बबनांच्या घरीं त्यांचा हक्कच आहे !

विनोबांचें म्हणणें,"हा मुळीं सत्याग्रहच नव्हे. डोळ्यावर होत असलेल्या आक्रमणापासून रक्षण आहे. सत्याग्रह म्हणायचेंच असलें तर हा "सौम्यतम" विशेषणाला पात्र आहे. त्याला ९५% लोकांची अनुमति आहे. हा सत्याग्रह नव्हेच. संरक्षणात्मक उपाय योजना आहे. त्यांत गैर असें काहीच नाही. त्यात जनसंघ, पुराणवादी सामील होतील, राजकीय विरोधी पक्ष त्याचा फायदाहि कदाचित् घेतील. पण, त्यात नुकसान काहीच नाही. ही काही वाईट बोलपटांविरुद्ध मोहीम नाही. वाईटप्रकारच्या चित्रांविरुद्ध किंवा पुतळ्यां-विरुद्धहि नाही. फक्त त्यांच्या सार्वजनिक 'प्रदर्शना'बद्दल आहे. खासगी किंवा मुद्दाम योजिलेलीं सार्वजनिक प्रदर्शनें वेगळीं, पण भर रस्त्यावर असलें प्रदर्शन करणें म्हणजे आक्रमणच ठरतें ! इत्यादि इत्यादि ! " माझी भेट दुपारीं होईल. उद्या प्रबंध समिति होईल. जे०पी० येणार नाहीत. शंकरराव कदाचित् येतील. अण्णाहि बहुतेक येणार नाहीत. बहुतेक अनुमोदनाचाच विधि पार पडेल.

जबलपुर.
११.११.'६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवां मुगलसरायला जनतेत बसलो. त्या वेळीं खूप जागाच जागा होती. धीरेन्दांनी त्या गाडीची फार शिफारस केली होती, ती खरी वाटली. पण बिहार सुरू होताच कोण गर्दी लोटली म्हणता ! जनसंपर्काचा कडेलोट झाला अगदी ! लोकगंगेची लाट एकदा उसळली म्हणजे फक्त स्नान-संध्येपुरतेंच उदंड पाणी देऊन ती थांबत नाही. नाका-तोंडात पाणी शिरून जीव गुदमरू लागतो. वरच्या बांकावर जागा धरून ठेवली होती. तेथे जाऊन बसलो. संध्याकाळीं ५ ते पहाटे ५ तेथे अडकून पडलो. तेथेंहि एका सद्गृहस्थाने आपला निकट संपर्क मला दिला ! माझ्या अंथरुणावर बसून शिरा-पुरी-भाजी मोठ्या आरामशीरपणें खाल्ली. स्वतःच्या मुंडाशाला व माझ्या चादरीला हात पुसलें, माझ्या प्याल्याने पाणी प्याला आणि तेथेंच ऐटीत चिलीम ओढली. रात्रीं अर्ध्या फळीवर माझ्या शेजारीं स्वस्थ झोपहि घेतली ! पोटभर जनसंपर्क ! होते सगळे काबाडकष्ट करणारे मजूर ! एक पंचा व एक उपरणें एवढींच वस्त्रें ! कलकत्त्याला दिवसभर कष्ट करून हात-दोन हात जागेत, कुणाच्या उंबरठ्यावर रात्र काढणारे मानवीय प्राणी ! पण मोठे मायाळू व प्रांजळ ! आपल्या संसर्गाचा लाभ त्यांनी मला मोठ्या दिलदारपणाने व नम्रपणाने दिला. अडाणीं, ओबडधोबड, पण मनाचीं सरळ माणसें !

एकेकाचें खाण्याचें कौशल्य मोठें कौतुकास्पद ! एकाने एका पानाच्या तुकड्यावर चणे घेतले. त्या तुकड्यावरच मीठ व मिर्ची. एका हातावर तो पानाचा तुकडा. त्याच हाताच्या आंगठ्याने दुसऱ्या हातावर हरभरे शिताफीने लोटायचा, लोटतांनाच त्यांना मीठ लागेल अशी काळजी घ्यायची, दुसऱ्या हाताने ते फांकायचा आणि मिर्चीचा एक शेंडा दांताने खुडायचा ! माझ्या अंथरुणावर बसून खाणाराने एका हातात पराठ्याची चळत घेतली. सर्वात वरच्या पराठ्यावर शिरा व भाजी ठेवली. खालून एक एक पुरी शिरा-भाजीबरोबर मोठ्या कौशल्याने तोडून तोडून खाल्ली. खाली माझ्या चादरीवर जें काही कण सांडले असतील तेवढेंच एरव्ही हातहि बरेच कोरडे राखले आणि खाली कुणाच्या अंगावर सांडू दिले नाही ! मी मात्र पाणीदेखील पिऊ शकलो नाही. W. C. कडे जाण्याची तर सोयच नव्हती !

सत्यभामापुर.
२४.११.'६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काल कटकचे स्वामी वकील आले. ते आणि गुणनिधि महान्ती या दोन वृद्धसुहृदांची तुला आठवण असेलच. स्वामी वकील आता ७६ वर्षांचे आहेत. पण तब्येत संभाळली आहे. अर्थात् ६८ वर्षांच्या ईश्वरभाईंची बातच काही और आहे. कितीहि थंडी असली तरी अंगावर एक पंचा पुरे आणि सदोदित हंसत राहतात. त्यांचें बाळपण मात्र अगदी अक्षय्य आहे खरें! आवाज तसाच खणखणीत, आणि उत्साहदेखील पूर्वीसारखाच दांडगा! हें सगळें योगाभ्यासाचें फळ की योगा-योगाचे? स्वामीजी व पूरबाई यांनी तुला फार फार विचारलें आहे.

शिबिरात काल दोन भाषणें केलीं. प्रश्न मुख्यत्वेंकरून तीन मुद्यावर असतात.

१. आता सत्याग्रहाचा मार्ग मोकळा झाला नाही काय? मग आर्थिक मुद्यावर सत्याग्रह करायला काय हरकत?
२. भाषावादावर काय उपचार करावा?
३. निष्पक्ष किंवा अविरोधी निवडणुका घडवून आणण्याचा खटाटोप म्हणजे चोरवाटेने निवडणुकीच्या राजकारणात शिरण्याचा प्रयत्नच नव्हे काय?

काल वस्तु-निष्ठा व सत्यनिष्ठा, आत्मनिष्ठा व लोकनिष्ठा, सृष्टि आणि मानव या मुद्यांचें विवेचन करून लोकतंत्राच्या मूल तत्त्वांपर्यंत आणून सोडलें. आज वैज्ञानिक लोकतंत्रात सत्यनिष्ठा, आत्मनिष्ठा, वस्तुनिष्ठा व लोकनिष्ठा यांची एकवाक्यता व संवादित्व कसें आवश्यक आहे याचा विचार व्हायचा आहे. सत्यनिष्ठा व आत्मनिष्ठा यांच्या पोटीं सत्याग्रहाचा जन्म कसा होतो आणि वस्तुनिष्ठा व लोकनिष्ठा यांच्या संयोगापासून वैज्ञानिक लोकनीति कशी उत्पन्न होते हें सांगितल्यानंतर भाषिक राज्यवाद व भाषिक अहंवाद यांचा समाचार घेता येईल.

सत्यभामापुर.
२५.११.'६०.

आज शिबिराचा समारोप झाला. भाषेच्या समस्येचा परामर्श आज घ्यायचा होता. त्याच विषयाचें विवेचन थोडक्यात केलें. दुपारीं येथून भुवनेश्वरला जायचें आहे. आज व उद्या शहरातील लोकांच्या लहान लहान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सभा होतील. सत्यभामापुरातील रमादेवीच्या माहेरची जागा आतापर्यंत कस्तूरबा केंद्राच्या ताब्यात होती. आता तें केंद्र बंद होणार. जागा मोठी आहे, माडाची बाग आहे, दोन पोखरे आहेत, पक्क्या इमारती आहेत. या जागेचा काय उपयोग करावा याचें संशोधन चालू आहे. गांधी निधीने देखील आतापर्यंत या जागेच्या दुरुस्तीकरिता जवळ-जवळ चवदा हजारांपर्यंत रकम खर्च केली आहे. रमादेवींच्या एका दत्तक भावाच्या ताब्यात ती होती. चवदा हजारांपैकी मुख्य भाग त्याला द्यावा लागला.

आज दुसऱ्या एका पराक्रमी महिलेशी परिचय झाला.—क्षमादेवी महान्ती. बाई ख्रिस्ती आहेत. तरुण स्त्रिया व मुली यांच्या शरीराचा जो अनैतिक व्यापार होतो त्याच्यावर उपाययोजना करण्याच्या उद्योगात ज्या स्त्रियांनी आपलें सगळें सामर्थ्य व बुद्धिमत्ता वेंचण्याचें ठरविलें आहे, त्यांच्यापैकी या बाई आहे. वेश्या व्यवसायाला आळा घालण्याकरिता व स्त्रीचा विक्रय थांबविण्याकरिता कुठल्या कुठल्या संस्था देशात कार्य करीत आहेत आणि कशा प्रकारें कार्य करीत आहेत याची हकीकत त्यांनी सांगितली. त्यांचें कार्य जितकें पवित्र तितकेंच नाजुक व जोखमीचें आहे. याहि बाबतीत ख्रिस्ती धर्म संस्थांचें कार्य अधिक पद्धतशीर व परिणाम-कारक आहे कारण, तें कार्य देवाचें मानण्यात येतें.

श्री रमादेवींनी एक सघन क्षेत्र घेतलें आहे. त्या क्षेत्रात पंचायतीच्या व विधानसभेच्या निवडणुकांच्या दृष्टीने नागरिकांचा पुरुषार्थ व जबाबदारीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न करण्याचा त्यांचा मानस आहे. मुंबईत जें काम चालू आहे, त्याची माहिती त्यांना हवी आहे. त्यांच्याकडे तुझीं पत्रकें, जाहिराती इत्यादि पाठवून दे. त्यांना त्या सगळ्या साहित्याचा चांगला उपयोग होईल.

येथील लोकांची राहणी पाहून माणूस किती कमी कपडे वापरून जगू शकतो हें लक्षात आलें. फक्त बुलूबाबू, शरदबाबू, ईश्वरभाई या त्यागी लोकांविषयीं मी लिहीत नाही. ईश्वरभाई तर उत्तररात्रीं २.३० वाजताच पोखऱ्यात स्नान करून शुचिर्भूत होतात. बुलूबाबूंच्या अंथरुणाचा आकार माझ्या ओव्हरकोटाच्या वळकटीएवढा होईल. पण, या भागातील सामान्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लोकहि फक्त धोतर व उपरणेंच वापरतात. रेशमी चादर किंवा गरम चादर क्वचितच कुणी वापरतें. पादत्राणें घातलींच पाहिजेत असें नाही. लहान मुलांच्या अंगावर देखील एक चड्डी व अर्ध्याबाह्यांचा लांडा सदरा, एवढेच कपडे असतात.

सत्यभामापुर.
२६.११.'६०.

विजयनगरम् ते जयपुर सृष्टिसौंदर्याची मेजवानी झाली. लहानमोठे डोंगर, टेकड्या, उंचवटे यांची जणू आरासच मांडली आहे. आणि डोंगर एकंदरीत उघडे-नागडे या ऋतूत कमीच. अगदी किनखाबी 'वागे' (अंगरखे) आणि भरजरीचें मंदील बांधलेले वरेच उत्तुंग व डौलदार डोंगर मोठ्या दिमाखात उभे होते. सालूर ते पोटांगीचा घाट तर विशेषच रमणीय आहे. एकंदरीत सगळा १०४ मैल रस्ताच मोठा शोभिवंत आहे. जवसाचीं व भाताचीं पिवळीं हिरवीं शेतें आणि कावेच्या रंगाची माती — शालू-शेल्याच्या नाजुक लाल किनारीचा भास होत होता. 'संन्यास्याचें भगवें वस्त्र हिरव्या जरीकांठी शालजोडीत हरवून गेलें.' या रविठाकुरांच्या वाक्याची आठवण झाली.

रस्त्यात मनूची आठवण सारखी येतच होती. येथे आल्यावर त्याच जुन्या खोलीत उतरलो. तें 'लेनिन मिक्श्चर', बापी, अण्णा, चतुर्भुजभाई, पाटणकर, मूर्ति इत्यादि मित्रांची सोबत! किती तरी आठवणींनी क्षणार्धात गर्दी केली. मिटकरी आहेत, अरुण लेले वर्धा-मुंबईकडे गेला आहे. तीच इमारत, तेंच आवार, पुष्कळ सुधारणाहि झालेली दिसते. पण, त्या जुन्या माणसांच्या वास्तव्याचा मनाला टवटवी आणणारा परिमळ मात्र नाही!

बुलूबाबू सोबत आले आहेत. तिसऱ्या वर्गात स्वतःचें सामान खोगिरा-प्रमाणे पाठीवर लादून. बसमध्ये बसून कोरड्या-पोळ्या व गूळ आवडीने व झोंकात त्यांनी खाल्ला! काहीहि खावें, कोठेंहि झोपावें, पडेल तें सोसावें पण सगळें आपल्या शानीत! असें त्यांचें भरीव व मजबूत जीवन आहे! ठिसूळ नाही, तकलुपी नाही, वेगडी तर नाहीच नाही! काल कटकला सौ० सुमित्राहि भेटली. अगदी किडकिडीत, किरकोळ पण जीवन तसेंच खडतर! चुनीआपाहि भेटली. शांतिसैनिक विद्यालयाचा स्त्री-विभाग

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संभाळायला काशीला जाणार आहे. चि० निर्मलचा आग्रह आहे आणि काशीला 'विमलाताई'च्या मार्गदर्शनावर विसंबून राहता येईल म्हणून 'योग्यता व हिंमत' नसूनहि धाडस करीत आहेत. स्वतां प्रतिज्ञापत्रकावर सही केलेली नाही. ता० ३० ला पुरी एक्सप्रेसने निघून ता० २-१२ ला सकाळीं ८ वाजता वाराणसी एक्स्० ने काशीला पोचेल. जागा वगैरे निर्मलने पाहून ठेवली आहे. ती स्वत: मात्र उत्तराखंडातील शिबिराकरिता गेली आहे. तिकडून इंदूरला जाईल.

रात्रींचें जेवण मिटकरींकडे झालें. गयेला बुनियादगंजात हें जोडपें आणि त्यांचा इवलासा मुलगा होता, तुला आठवत असेल. अत्रेकाकांची मोठी ममता होती त्या मुलावर! आता त्याला एक बहीण आहे. मोठ्या उत्साहाने जेवण तयार केलें त्या मुलीने. तुझी चवकशी दोघानींहि केली.

जयपुर (कोरापुट)
२८.११.'६०.

●

चि. अशोक दातार, लोकेंद्र, पुष्पा गुप्त व मी ता० २ रोजीं रात्रीं लखनऊहून निघून ता० ३ ला सकाळीं ७.४० वाजता हल्द्वानीला पोचलो. तेथून सकाळीं ९ वाजता बसने निघून संध्याकाळीं ५.१५ वाजता येथे आलो. गरमपानी ते आलमोडा नवीन रस्ता झाला आहे. तेव्हा आम्ही अलमोडा-कोसी मार्गे आलो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आमची बस फिरकीच्या जिन्यावर चढत असल्याप्रमाणे सारखी गिरक्या मारीत होती. लखनऊ-पासून आमच्याबरोबर वाजपेयीजी, त्यांचा शागिर्द श्रीपाल व राधेश्याम म्हणून एक कार्यकर्ता, ही मंडळी होती. मळमळ, वांत्या, गरगर यांमुळे लोकेंद्राला जीव नकोसा झाला. राधेश्याम व श्रीपाल निपचित पडून राहिले. इतरांनाहि गरगरू लागलें. माझी मात्र तरतरी व आनंद सारखा वाढतच गेला. पुष्पा लक्ष्मी-आश्रमात मुलींबरोबर रहायला गेली. आम्हा पुरुषां-करिता स्वतंत्र घर आहे. समोर कोसीचें खोरें आहे. सर्व बाजूंना डोंगर आहेत. मोठें सुंदर दृश्य आहे. वातावरणात जिवंत निवांतपणा आहे. ६००० फुटांवरहि दुपारीं गरमी होते. पण हवामात्र शीतल प्रसन्न आहे. अगदी बेतशीर! वातावरणात सर्वत्र धूळ व्यापून राहिलेली असल्यामुळे नगाधि-राजाचें दर्शन होत नाही. पावसाची सर आल्यावर होईल.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुंदरलाल, चंडी प्रसाद (चमौलीचा), विनय अवस्थी, विमलाची बहीण कमला ही मंडळी मुद्दाम आली आहेत. राधाहि आलेली आहे. पुरुष-मंडळी वरच्या टोकावर लक्ष्मी आश्रमात राहतात. काही महिन्यापासून एक स्कॉच तरुणहि तेथे राहतो. त्याच्याहि वरच्या टोंकावर एक बंगला आहे. त्यात आमच्या राहण्याची सोय सरलाबेन करणार होत्या. पण, तेथे पं० ओमकारनाथजी रहायला येणार आहेत – संभव आहे, पक्कें नाही. बंगला हिमालयाच्या समोर आहे. डाक बंगल्याच्या उजवीकडील ऊंच डोंगरावर. पंडितजींना अनुरूप आहे ठिकाण !

सरलाबहन थकल्या आहेत. राधा स्वतंत्र कार्य पिठोरागडकडे करीत आहे. येथे आश्रमात ४०-४५ मुली आहेत. पूर्वी सारखेंच जाडें-भरडें खडतर व कष्टाळू जीवन. लघ्वी किंवा शौचाला जागा, स्वतंत्र न्हाणीघर, या भारतीय संस्था नाहीतच. "आमच्या देशात डाकबंगलें, होटलें, मुशाफरखाने हवेत कशाला," इंग्रजांच्या काळात एक नामदार देशभक्त म्हणाले होते, "झाडाच्या सांवलीत तीन दगड ठेवले, एका भांड्यात आधी वरण शिजविलें तें द्रोणांत काढलें, त्याच भांड्यात भाजी केली, ती द्रोणांत ठेवली, नंतर त्याच भांड्यात भात शिजविला, पत्रावळीवर वाढून घेतला ! जेवण आटोपल्यावर पत्रावळ, द्रोण, फेकून दिले आणि झाडाखालीं स्वस्थ वामकुक्षी केली ! आणखी काय हवें ? कशाला हवें ? शौच, लघ्वी, स्नान या तीन विधींच्या बाबतीत कमीत कमी भारतीय परंपरेचें पालन व्हावें असा येथील आश्रम जीवनाचा संकेत दिसतो !

सुंदरलाल प्रभृतींना निरनिराळ्या 'वादां'ची व्याख्या थोडक्यात हवी आहे. कारण त्यांच्या क्षेत्रात सर्वच पक्षातील काही प्रमुख पुढारी आपआपल्या पक्षाचा व तत्त्वज्ञानाचा प्रचार करीत आहेत. त्यांच्याकरिता दररोज ४ ते ५ 'वादमीमांसा' करण्याचें ठरलें आहे. सकाळीं ९.४५ ते ११.४५ आश्रमात मुलींकरिता बौद्धिक होईल. हा क्रम ता० १२ पर्यंत चालेल. त्यात एक भाषण शाळेत होईल आणि एक जाहीर भाषणहि होईल. तेव्हा कौसानीचें वास्तव्य अगदीच फुकटात पदरात पडलें असें कुणाला वाटण्याचें कारण नाही.

कौसानी, आलमोडा.

४ जून '६१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परवां सुमारे ११ वाजता एका लहानश्या फेरीने सिद्धराजभाई, पूर्णचंद्रजी व मृदुलाबेन (साराभाई) यांच्याबरोबर निघालो. ब्रह्मपुत्र पार करायला दोन तास लागले. प्रवाहाच्या दिशेने प्रवास होता म्हणून दोन तास. एरव्ही चार तास लागले असते. फेरीत गर्दीहि बरीच होती. उरणच्या फेरी एवढीच असेल फार फार तर ही फेरी. कदाचित् लहानच. फेरीत सगळीं जणें ब्रह्मपुत्राचें भव्य दर्शन घेण्यात मग्न होतीं. कुणी कुणाशी फारसें बोललें नाही.

आम्ही जेवून निघालो होतो. मृदुलाबेनकरता डबा आणला होता. त्यांच्याबरोबर काश्मीरी पिकनिक बासकेटहि होती. त्या बासकेटमधील निरनिराळे खण, थरमॉस, चमचे, एकात एक बसणारे पांढरे कचकड्याचे पेले' इत्यादि सगळें कसें spick and span होतें ! मनूची आठवण झाली. खाणें, भांडी साफ करणें, इत्यादि सगळें मोठ्या सफाईने केलें त्यांनी ! चहाकरिता सोबती सिद्धराजभाई झाले. मी चहा घेत नाही हें ऐकून माझ्या सगळ्याच चहा-सोबत्यांचा फार विरस होतो. जे० पी० म्हणतात, "आप बिरादरीसे निकल गये !" इतर म्हणतात, "एक saving grace होती, तीहि गेली ! तुमच्यामुळे आम्हालाहि सर्वोदयात जागा होती !" चहाचें सामाजिक मूल्य पुष्कळच आहे.

टीपबंद व नीटनेटकें काम पाहिलें म्हणजे K ची व तुझी आठवण होते. K च्या भांडी साफ करण्याचें तुझें वर्णन वाचून शंकररावांना केवढें कौतुक व आदर वाटला होता ! ते म्हणाले, "केवढा मोठा माणूस ? पण हीं कामें उत्तम करतो. हें खरें अध्यात्म !"

सुमारे १.१५ वाजता आम्ही शीशीमुख घाटावर उतरलो. चि० लक्ष्मी व रजनी या दोघी आल्या होत्या. जीपहि होती. विनोबा सहा-सात मैलांवर माछखोवा येथे होते. सुमारे ३.३० वाजता त्यांच्या पडावावर पोचलो. गेल्या-बरोबर त्यांच्याकडेच गेलो. कुशल प्रश्न संपताच बोलणें सुरू झालें. विनोबांची प्रकृति छान आहे. वजनहि चांगलें वाढलेलें दिसलें. नेहमीप्रमाणे प्रसन्न व मस्तीत आहेत. या भागात ग्रामदानें बरींच मिळत आहेत. काल तर चवदा ग्रामदानें जाहीर झालीं. लोक आदिवासी तर नाहीतच. थोडे फार शिकलेलेहि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहेत. काही काही गांवात तर हायस्कुलेंदेखील आहेत. विनोबांना प्रश्न विचारतात, चर्चा करतात, नंतर ग्रामदान देतात. एकंदर वातावरण उत्साहाचें आहे. ग्रामदानाकरिता सगळया देशात पूर्वीपेक्षा परिस्थिति कमी अनुकूल खास नाही असें विनोबांचें निदान आहे. बिहारमध्ये फार काम होऊ शकतें असें त्यांस वाटतें.

त्यांनी सतत परिभ्रमण थांबवून एका क्षेत्रात राहून पदयात्रा करावी असें जे० पी० नीं त्यांना सुचविलें. आता विनोबांचा कुठल्याच प्रकारचा आग्रह नाही. या भागातील कार्यकर्ते जोंपर्यंत रहा म्हणतील तोंपर्यंत त्यांनी येथेच रहावें असें मी सुचविलें. नंतर बिहारमध्ये काही दिवस रहावें आणि पुढे दक्षिणेकडे वळावें असेंहि सुचविलें. विनोबांकडे येणें-जाणें जास्त सुलभ व वारंवार होऊ शकतें म्हणून त्यांनी काही आपण होऊन प्रयत्न करावा हें सगळ्यांनीच सांगितलें.

पाकिस्तानात जायला आज दोन्ही देशांची परिस्थिति प्रतिकूल आहे असें त्यांस वाटतें. राम-रावण युद्धापूर्वी एकमेकांबद्दल जशी भाषा वापरीत होते तशी भाषा दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये सुरू झाली असल्यामुळे पाकिस्तानात जाणें त्यांना उपयुक्त वाटत नाही. नागा प्रदेशात जाण्याच्या बाबतीत त्यांचें म्हणणें असें की सरकारला त्याविषयीं उत्साह नाही आणि आमची विमला म्हणते की फिजोलाहि तें फारसें आवडणार नाही. तो विरोध नाही करणार, पण Welcome हि नाही करणार. तेव्हा तूर्त पाकिस्तान व नागा प्रांत दोन्ही रद्दच समजले पाहिजेत.

तारासिंह, जबलपुर, काश्मीर या प्रश्नांच्या बाबतीत त्यांचें म्हणणें पूर्वीप्रमाणेच आहे. राजकारणी व्यक्तींनी भानगडी निर्माण करायच्या आणि आम्ही त्या निस्तरायच्या हा धंदा परवडण्यासारखा नाही. कदाचित् अहिंसेच्या दृष्टीने त्यांना भांडू देणेंहि इष्टच ठरेल. Corruption च्या बाबतीत त्यांना असें वाटतें की हा दोष इतका पसरला आहे की त्याला एकमात्र उपाय समाजपरिवर्तन हाच आहे. सर्वोदय-पात्र व शांतिसेना हें दोनच कार्यक्रम त्यांना परिस्थिति-अनुकूल व उपयुक्त वाटतात. अर्थात् भूदान-ग्रामदान हें तर पायाभूत कार्यक्रम आहेतच. त्यांच्या मतें ग्रामदान-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भूदानाला परिस्थिति अनुकूल आहे. लोकनीतीचा कार्यक्रम अतिशय आवश्यक पण आनुषंगिक मानावा. गौण नव्हे. या कार्यक्रमांच्या तुळेचाच तोहि आहे. पंचायत व लोकलबोर्ड पक्षनिष्ठ राजकारणापासून मुक्त ठेवण्याचा विचार सर्वमान्य होईल असें त्यांना वाटतें.

आमच्या बहुतेक सर्व चर्चांना मृदुलाबेन होत्याच. मधून-मधून त्यांनी चांगली भरहि घातली. कृष्णराजभाई काल दुपारीं आले. त्यानंतर तेहि सामील झाले. ग्रामदानी गांवकऱ्यांशी किंवा इतर गांवकऱ्यांशी विनोबांचीं जीं प्रश्नोत्तरें होतात, तो कार्यक्रम मात्र अगदी अद्‌भुत वाटला. त्यांची उत्तरें जितकीं समर्पक शास्त्रशुद्ध व चोख तितकींच सुटसुटीत, नेमकी, मधुर आणि सोपी असतात. विलक्षण हातोटी आहे. एकंदर वातावरणात गोडवाच गोडवा असतो.

काल सबंध दिवस विनोबांबरोबर चवघांचीहि मोठी महत्त्वाची व उद्‌बोधक चर्चा झाली. विनोबांनी अनेक महत्त्वाच्या विषयांवर पुष्कळच प्रकाश टाकला. फार समाधान वाटलें. या माणसाच्या व्यक्तित्वाची भव्यता व मोहकता उत्तरोत्तर वाढत असल्याची प्रतीति मला दर पाळीला येते. फार समाधान वाटतें. तिकडे K आणि इकडे विनोबा. दोन ध्रुव असतील पण, आमचें ब्रह्मांड वाटोळें आहे. उत्तर-दक्षिण दोन ध्रुव असलें तरी आम्हाला अभिन्नच.

वाटघटिया, आसाम.
३.८.'६१.

दुपारीं १२.३० वाजता ऋषिकेशहून बसने निघून संध्याकाळीं ७च्या सुमारास येथे पोचलो. ऋषिकेशला जेवण गांधी-आश्रमच्या मॅनेजरकडे झालें. निसर्गाचें भव्य रमणीयत्व, देव प्रयागचा संगम इत्यादि ठिकाणें बघतांना मनूची सारखी आठवण येत होती. K म्हणतोल, "स्मरणाने जीवन ठार होतें. स्मृति बंधनकारक आहे. तिने माणूस प्रत्यक्षाला पारखा होतो; अनुभूतीला अंतरतो. स्मरण म्हणजे जगण्यातील जिवंतपणाचें मरण !" अगदी खरें. पण, मला मात्र मनूचें स्मरण होतें ही वस्तुस्थिति आहे. जीवनातील खेदकारक व उद्वेगकारक प्रसंग आठवून कुढत राहण्यापेक्षा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आनंदाचे व कृतज्ञतेचे प्रसंग आठवले म्हणजे जवळच्या माणसांविषयींचा सद्‌भाव वाढतो. सगळीच स्मृति नाहीशी होत नाही, त्याला काय करावें ?

येथे श्रीनगरलाहि जुन्याच ठिकाणीं उतरलो. याच रेस्टहाउसमध्ये मागे आपलें शिविर झालें होतें. येथे चंडीभाई (चंडीप्रसाद भट्ट) भेटला. इतर काही मंडळीहि आलेली आहेत. सभाविभा नाही. रात्रभर विश्रांति आहे. येथून उद्या सकाळीं ९ वाजता बसने निघून ११ वाजता रुद्रप्रयागला पोचू. तेथे दुपारचें जेवण होईल. त्यानंतर ३ वाजता तेथून बसने निघून संध्याकाळीं बसच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोचू. परवां केदारनाथच्या मार्गाला लागू. शेवटला सात मैलांचा टप्पाच काय तो अवघड आहे म्हणतात. एक तट्टू बरोबर घेऊ त्या टप्प्यापुरतें. जेथे थकल्यासारखें वाटेल तेथे तट्टावर बसेन. तुंगनाथला जाणार नाही. केदारनाथहून परत येतांना पुन्हा रुद्रप्रयाग. तेथून पीपल कोटी व जोशी-मठ. जोशीमठचा पत्ता – 'विडला हाऊस' हा आहे. श्रीनगर, रुद्रप्रयाग, गुप्तकाशी, या ठिकाणीं व चमोली, गौचर, जोशी-मठ या ठिकाणीं तारहि आहे. दरेक ठिकाणीं गांधी-आश्रम आहेच. मी दररोज पत्र पाठवीनच. प्रकृतिहि सांभाळण्याचा प्रयत्न करीन.

बसचे रस्ते साधारण बरे आहेत. सरकारने दुरुस्तीचें काम सतत चालविलें आहे. एकतर्फी वाहतुकच चालू देतात. त्यामुळे वेळ जास्त लागतो. पण अपघाताचें भय कमी होते. तुकडोजी महाराजांच्या यात्रिकांना जेथे अपघात झाला तेथील रस्ता चांगला आहे, वळणहि फारसें अवघड नाही. पण गंगेची दरी मात्र भयंकर खोल आहे. त्या दृष्टीने ठिकाण भयंकर आहे खरें.

या पुढेहि रस्ता साधारण आहे. बसचा शेवटचा टप्पा चंद्रपुरीच्या दोन मैल अलीकडे आहे. उद्या रात्रींचा मुक्काम चंद्रपुरीलाच होईल. उद्यापासून पदयात्रा. अपघातांची भीति नाही. आपला भारत देश आहे. शौच आणि स्नान या बाबतीत आपली परंपरा सोडणें त्याला धर्मद्रोहाप्रमाणे वाटतें. इतरबाबतीत धर्म बुडालाच आहे. तेवढ्यापुरता तरी संभाळलाच पाहिजे असा सर्वत्र संकल्प दिसतो. म्हणून पूर्वजांचा तेवढा आचार कायम ठेवण्यात आला आहे. मला जो काय त्रास होईल, तो त्याबाबतीत ! शौच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि स्नान हें मुळीं स्वच्छतेचे विधि नाहीतच. ते धार्मिक विधि आहेत. जेवणाच्या बाबतीत मात्र आतिथ्य भरपूर आहे. ऋषिकेशला व येथेहि जेवण स्वच्छ आणि चांगलें मिळालें. वर पाऊस नाही. अनंत चतुर्दशीचें चांदणें अगदी स्वच्छ पडलें आहे. चांदण्यात अलकनंदेचें पात्र पाहून तुझी आठवण होते. हें दृश्य तुला फार आवडलें असतें !

श्रीनगर.
२३.९.'६१.

काल दुपारीं रामपुराहून रवाना होऊन संध्याकाळच्या आत गौरीकुंडला पोचलो. रात्रीं तेथे मुक्काम केला. गौरीकुंड ६००० फूट उंचीवर आहे. नारायण कोटी ते फाटा घोड्यावरच यावें लागलें होतें. फाटा ते रामपुर पायीं आलो. पण, रामपुरनंतरचा सगळा प्रवास घोड्यावरूनच केला. पावसाने खैर केली. पाऊस नसला म्हणजे प्रवासात कसलाच त्रास होत नाही. पाऊस असला म्हणजे मात्र त्रासाला सीमा राहत नाही. आज सकाळीं गौरीकुंडाच्या खूप गरम पाण्यात स्नान करून सुमारे ८ वाजता निघालो. दुपारीं १२ च्या सुमाराला येथे पोचलो. पोचल्यावरोबर आधी तडक देवळात शिरलो. त्या वेळीं मी एकटाच दर्शनार्थी होतो. निवांत दर्शन झालें, गोंगाट नाही, गडबड नाही, गोंधळ नाही. सुंदरलाल व जमलोकीजी पायीं आले. लोकेंद्रचें घोडें आधी पोचलें होतें. पण, तो अर्ध्या मैलावर गांवाबाहेर उतरून सुंदरलाल-जमलोकीकरिता थांबला. ते तिघे आल्यावर पुन्हा आम्ही दर्शन घेऊन आलो — याहि पाळीला चौघेच होतो. संध्याकाळीं आरतीच्या वेळीं पुन्हा दर्शन घेऊ. उद्या सकाळीं येथून दर्शन घेऊन रवाना होऊ. आज दुपारपर्यंत पाऊस नव्हता. स्वच्छ उन्ह होतें. तशीच कृपा उद्याहि झाल्यास लवकरच निघू. मी घोड्यावरूनच प्रवास करीन.

चि० लोकेंद्रने फक्त गौरीकुंड ते केदारनाथ घोडें केलें होतें. गौरीकुंडपासून सात मैल सारखें चढावेंच लागतें. ८००० फूट, ९००० फूट, १०,००० फूट, ११,००० फूट अशा पाट्या टप्प्या टप्प्यावर लागल्या आहेत. केदारनाथ जवळ-जवळ १२,००० फुटांवर आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मंदाकिनीच्या खोऱ्याची शोभा विलक्षण आहे. धवधबे, झरे, ओढे, यांचें दृश्य काही औरच आहे. ८००० फुटानंतर सगळे डोंगर बोडके. तरी गवतामुळे शोभून दिसतात. केदारनाथाच्या मागेच वर्फाचा डोंगर आहे. सकाळीं अगदी स्पष्ट दिसत होता.

घोड्यावरून आल्यामुळे माझी ठाकुरकी राहिली. एरव्ही ७००० फुटानंतर सारखी धाप लागली असती. पाऊल फुटलें नसतें. येथे मुक्काम मंदिराच्या गेस्टहाऊसमध्ये आहे. आतापर्यंत सर्वच ठिकाणीं व्यवस्था वरी झाली. सुंदरलाल त्यावावतीत वराच दक्ष आहे. त्या-त्या ठिकाणचीं माणसेंहि मोठीं अगत्यशील दिसलीं.

श्रीकेदारनाथ.
२८.९.'६१.

ता० १ ला वसने रुद्रप्रयागमार्गे रात्रीं गौचरला पोचलो. रात्रींच सभा झाली. ता० २ ला सकाळीं गौचरच्या प्रभातफेरीतील मंडळींवरोवर मौन प्रार्थना केली. वसनेच दुपारीं पीपलकोटीला पोचलो. तेथे वस वदलून जोशीमठच्या मार्गाने ११ मैल वसने गेलो. हेलंगच्यापुढे रस्ता कोसळला होता. तेथून जोशीमठ ९ मैल आहे. तेवढा प्रवास पायीं केला. संध्याकाळीं जोशीमठला पोचल्यावरोवर जाहीर सभेत भाषण केलें. ता० ३ ला शिविर सुरू झालें. ता० ६ ला सकाळीं समारोप झाला. दुपारीं विद्यार्थ्यांच्या सभेत भाषण केलें. ता० ४ पासून जोशीमठपर्यंत वस येऊ लागली होती. ता० ६ ला सुमारे १६.३० ला वसने निघून रात्रींच्या सुमारास पीपलकोटीला आलो. रात्रीं तेथे मुक्काम केला. ता० ७ ला सकाळीं तेथून निघालो. सुमारे ८.३० ला चमोलीला पोचलो. तेथून तीन मैल गोपेश्वरला जायचें होतें. तीन मैल सारखी चढण आहे. एक मैल पायीं गेलो. त्यानंतर गोपेश्वरच्या मंडळींनी पाठविलेल्या तट्टावरून दोन मैल गेलो. गोपेश्वरला सभा झाली. सुमारे १३.४५ ला तेथून पायीं चमोलीला येऊन वस गांठली. रात्रीं गौचरला मुक्काम केला. गौचरहून ता० ८ रोजीं सकाळीं ६.३० ला वसने निघून ११.४५ ला श्रीनगरला आलो. तेथून १४.४५ च्या वसने निघून १८.३० वाजता टिहरीला पोचलो. जाहीर सभेत भाषण केलें. ता० ९ ला सकाळीं विद्यार्थ्यांच्या सभेत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाषण करून ९.३० च्या बसने निघालो. नरेंद्रनगर व ऋषिकेश येथे बस बदलून सुमारे १५.३० ला हरिद्वारला पोचलो. हरकीपैडीवर अंघोळ केली. गांधीसेवाश्रमाच्या खादीभांडारात थांबलो. रात्रीं २०.२५ च्या गाडीने डून एक्स्प्रेसने निघालो.

चि० लोकेंद्र सर्वत्र सोबत होता. तो ता० ४ ला सकाळीं जोशीमठहून पायीं बदरीनाथला गेला व ता० ५ ला संध्याकाळीं परत आला. केदारनाथ व बदरीनाथचा आणि इतरत्र जेथे बस नव्हती तेथे त्याने सगळा प्रवास पायींच केला. सुंदरलालने अर्थातच पायीं केला. मला मात्र प्रकृतीने साथ दिली नाही. खोकल्याने अगदी ता. ४ पर्यंत पाठ पुरविली. रात्रीं बेजार करून सोडी तो. मध्ये एक दिवस थोडा तापहि आला. पोटाचा विकार जन्माचा सोबती आहेच. प्रकृति सारखी कुरकुर करीतच रहायची. आता प्रवासात कुणाला माझी सोबत होणें शक्य नाही. मी liability झालो आहे. त्यामुळे तुझ्या किंवा अगदी जवळच्या कुणा माणसाबरोबर प्रवास करणें जिवावर येतें. मला संभाळणें एक कामच होऊन बसतें. आनंदात विरजण पडतें. अजून मी १० ते १५ मैल पायीं चालू शकतो. २॥ ते ३ मैल डोंगरहि चढू शकतो. पण, ९००० फुटांपेक्षा अधिक उंचीवर मात्र चढण चढणें कठिण वाटतें. अशा स्थितीत हौसेखातर प्रवास करणें किंवा गमतीखातर कुणाच्या बरोबर जाणें चुकीचेंच ठरेल. बरोबरच्या माणसाला सोबतीच्या आनंदापेक्षा जबाबदारीचें ओझेंच जास्त होईल. याच कारणामुळे जोशीमठाहून बदरीनाथ अवघे १८ मैलांवर असतांना किंवा गोपेश्वराहून तुंगनाथ अवघे १५ मैल असतांना दोन्ही ठिकाणीं जाण्याची इच्छा मी आवरली.

सुंदरलाल, लोकेंद्र, चंडीभाई, नरेंद्र जमलोकी इत्यादि मंडळींनी मला काडीचाहि त्रास होऊ नये म्हणून स्वत:च्या जिवाचें रान केलें. प्रवासात सगळ्या ठिकाणीं अंघोळीला गरम पाणी व ताजें अन्न मिळालें. काही ठिकाणीं तर सुंदरलाल, लोकेंद्र यांनी स्वता स्वयंपाक केला. जोशीमठला चि० कमला नौटियाल व सिल्यारा आश्रमातील 'माताजी' या दोघीहि होत्या. बिडला हाऊसमधील शौचकूप व न्हाणींदेखील आधुनिक पद्धतीची होती. बऱ्याच ठिकाणीं शौचाची व अंघोळीची सोय नव्हती हें सांगायला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नको. तरी एकंदरीत दोन-तीन दिवसच अंघोळीवांचून राहिलो असेन. केदारनाथच्या मार्गावर व परत येतांना ठिकठिकाणीं भाषणें केलीं. खुद्द केदारनाथलाहि २८ ला रात्रीं थोडेसें भाषण केलें. ११७५० फुटांवर मेंदूची तरतरी व भाषण करण्याची शक्ति कमी होते असा अनुभव आला. गोपेश्वरला चंडीभाईचें घर आहे. आणि टिहरी म्हणजे सुंदरलालचें सदर मुक्कामाचें शहर. त्या दोघांच्या मर्जीखातर आणखी एक दिवस वाढविला.

सर्वोदयाविषयीं आस्था व प्रेम उत्तराखंडात विशेष दिसून आलें. कार्यकर्त्यांचें लोकांत वळणहि चांगलें आहे. सुंदरलाल तर चांगला धडाडीचा व कसलेला कार्यकर्ता आहे. त्याचें चरित्र मोठें रमणीय आहे. चंडीप्रसादहि त्यागी व निगर्वी आहे. दोघांचेंहि वजन बऱ्यापैकी आहे. 'कौसानीं–कन्यांनी' स्त्रियांमध्येहि चांगली जागृति केली आहे. जोशीमठ, गोपेश्वर, इत्यादि बऱ्याच ठिकाणीं सभांना स्त्रिया पुष्कळ येत असत. स्त्रीशक्तीच्या विकासाला हें पर्वतीय क्षेत्र बरेंच अनुकूल आहे.

लोकांत अठरा विश्वें दारिद्र्य असूनहि चोरीची प्रवृत्ति जवळजवळ शून्य आहे. उखीमठच्या मॅजिस्ट्रेट व थानेदाराचें म्हणणें असें की ३७९ कलमान्वये या भागात गुन्हें होतच नाहीत. लोक शिकले संवरलेले व समजूतदार आहेत. मात्र जुनाट व जीर्ण मतवादी आहेत. सरकारी अधिकाऱ्यांपैकी कुणाकुणाला सर्वोदय व साम्यवाद हीं जुळीं भावंडें वाटतात. सर्वोदयाच्या अनेक कार्यकर्त्यांचें टपाल फोडलें जातें आणि त्यांच्यामागे सरकारी हेर असतात.

मी एकंदरीत चार तट्टांवरून प्रवास केला. तट्टूवालीं पोरें चुणचुणीत होतीं. त्यांच्यापैकी दोघांना संस्कृत श्लोकदेखील येत होते. भिकारी जवळ-जवळ कुठेच आढळले नाहीत. गांवांतील लहान लहान पोरें-पोरी मात्र पैसा मागतात. पुजाऱ्यापासून भंग्यापर्यंत दक्षिणा सर्वांनाच हवी. यात्रेच्या मार्गावर सर्व प्रमुख ठिकाणीं सरकारने पक्के पायखाने व सफाईनायका-करिता पक्कीं घरें बांधलीं आहेत. रस्त्यांची दुरुस्ती अखंड चालूच असते. रस्त्यावरील मजूर प्रामाणिकपणें कष्ट करतात. गेटांच्या वेळाहि अशा बेताने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठरवून दिल्या आहेत की अपघातांचा संभवच राहू नये. त्यामुळे वेळ जास्त लागतो, पण सुरक्षिततेच्या दृष्टीने तें आवश्यक आहे. शेवटच्या 'गेट'च्या गाड्या मात्र मुक्कामावर पोचण्यापूर्वीच अंधार पडतो. तशा अंधारात अगदी चिचोळचा व अरुंद आणि कोसळलेल्या रस्त्यांवरून गाड्या चालू देणें अत्यंत धोक्याचें आहे. याची तमा यात्रेकरू किंवा मोटारवाले यांच्यापैकी कुणालाच वाटत नाही.

आनंदाच्या प्रसंगांचीच आठवण करून आयुष्यात प्रसाद निर्माण करावा, अशा अर्थाचा जो मजकूर मी लिहिला होता, त्यावरून तू काही समजावेंस हा प्रश्नच कुठे उद्भवतो ? कुठल्याहि वस्तूचें निरपेक्ष, यथातथ्य व शुद्ध दर्शन माझ्यासारख्याला साधत नाही. दरेक दृश्यावर व वस्तूवर संस्काराचें किंवा स्मृतीचें अवगुंठन येतें. अशा स्थितीत दुःखप्रद स्मृतीपेक्षा आनंददायी स्मृतींवरच भर द्यावा असा माझ्या मनाचा कल आहे. एकदा वाईट स्मृतींचा लोप करता आला तर कदाचित् पुढे सुखद स्मृतींचाहि लोप करता येईल, ही आशा. यात तुला बोध घेण्यासारखें काय आहे ? आणि काही बोध घ्यायचाच असला तर तो सर्वांनीच घ्यायचा आहे की स्मृतिनिरपेक्ष शुद्ध अवलोकन साधलें पाहिजे.

विनोबांची चळवळ मंदावली, तिचा प्रभाव लोकांवर पडत नाही, अशाहि स्थितीत कार्यकर्त्यांची निष्ठा, चिकाटी व कष्ट करण्याची तयारी पाहून माझें मन त्यांच्याकडे ओढ घेतें. त्यामुळे अगदी कंटाळलो व दमलो असतांनाहि मी त्यांच्या हांकेला 'ओ' देतो. एरव्ही आता माझ्यात अवसान उरलेलें नाही.

उत्तराखंडातील प्रवासात यापाळीला कुलीहि फार समंजस व सालस लाभले. पंडे, पुजारी, देवळाचे अधिकारी सारेच सभ्य आणि अगत्यवान् दिसले. सर्वोदयाच्या कार्यकर्त्यांविषयीं असा आदर क्वचितच आढळतो.

डून एक्स्प्रेस.
१०.१०.'६१.

•

काल एका खंद्या गड्याकडे गेलो होतो. तो अमृतोपचाराचा संशोधक आहे. सगळ्या पदार्थजाताला मरण आहे, पण मातीला मरण नाही. सगळें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मातीत विलीन होतें. माती मात्र नित्य आहे. म्हणून अमृतोपचार म्हणजे मातीचा उपचार. आजार कुठलाहि असो, केन्सर, क्षय, कुष्ठ रोग, हृद्-रोग, मोतीबिंदु, कर्णव्रण, सगळयांवर उपचार माती ! पोटात माती, कानांत माती नाकांत माती, डोळयांत माती, मातीचेंच उटणें, मातीवरच झोपणें ! अंगाला माती माखून सभोवती पांच, सात, दहा, धगधगणाऱ्या शेगडया ठेवून पंचाग्नीसाधन करायचें. शेगडयांची तोंडें रोग्याकडे असतात. एका मुलाला खूपच जाड कांचांचा चष्मा लागत होता. डोळयांत मातीचें अंजन घालून तो शेगडीवर डोळे शेकत होता. दुसरा अग्निमांद्यामुळे कंटाळलेला शेगडया जवळ पडलेला होता. सगळे आपला आजार कमी होत असल्याची साक्ष देत होते. मातीमुळे शेकाचा त्रास कुणालाच होत नव्हता !

तो उपचार वहाद्दर म्हणाला, "मी मेलेली माशी जिवंत केली, मेलेलें माणूसहि उठवून दाखवीन. पण, मला कुणी प्रेतावर प्रयोगच करू देत नाही !"

मी हतबुद्ध झालो. एक म्हणतो, 'मातीच अमृत आहे', दुसरा म्हणतो, 'ताकच अमृत आहे', तिसरा म्हणतो, 'मीठच अमृत आहे', चवथा म्हणतो, 'कडुनिंबाचीं पानेंच अमृत आहेत, त्याचा रस सुधारसच आहे,' पांचवा म्हणतो, 'गोमूत्रच अमृत आहे', सहावा म्हणतो, 'स्वमूत्रासारखें जीवनामृत नाही', सातवा सांगतो, 'उपवासच एकमात्र रामबाण औषध आहे' – आणि हे सगळे म्हणतात, "माझा उपचार अमृतमय आहे, पण दुसऱ्याचा विषमय आहे. तो कराल तर जीवनाला मुकाल." धार्मिक संप्रदाय परलोकाविषयीं आहेत. पण हे चिकित्सा-संप्रदाय अमृताच्या नांवाने माणसाचा जीव घ्यायला सरसावलेले आहेत. ते माणसाला समाधानपूर्वक मरण्याचें सुखहि लाभू देत नाहीत. सगळयांतर्फे प्रामाणिक साक्षीदार उभे आहेतच.

नागपुर.
२५.४.'६२.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकरण सातवें

चिर-विद्यार्थी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

: ७ :

शॉचें 'Everybody's political What's What' आज संपविलें. ३६६ पृष्ठांचें वरेंच मोठें पुस्तक आहे. तें मिळावें म्हणून मी वरीच खटपट केली. हौसेने वाचलें. पहिल्या वाचनाने माझ्या मनाची जी पकड या पुस्तकाने घेतली होती, ती या पाळीला नाही घेतली. पहिल्या वाचनाच्या वेळीं शॉच्या विदारक प्रतिभेचा खुसखुशीत व चुरचुरीत भाषेचा आणि चमत्कृतिपूर्ण शैलीचा पगडा मनावर वसतो. सुमारे दहा वर्षानंतर आता त्यातील सारेंच प्रतिपादन व विवेचन ताजें वाटत नाही. तरी पण पुस्तक एकंदरीत मजेशीर आहे. समारोप कसा मिस्किलपणाचा आहे पहा, This book can never be finished any more than the Annual Register can. But each of its successive writers must stop somewhere, not always because they have no more to say, and certainly not because there is no more to be said, but because they are tired of saying it, and their readers of reading it. I must stop leaving much unsaid.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

It is just a child's guide to politics. For my political experience has convinced me that though in this department everybody nowadays seems to know the x y z of everything, nobody knows the a b c of anything.

My Everybody's What's What is only an attempt by a very ignorant oldman to communicate to people still more ignorant than himself such social statistics as he has managed to pick up etc.

As to the future, beginning with the year 1944 —

(to be continued by them that can)

आहे कीं नाही गंमत !

मुरारपुर, गया.

२९.७.'५५.

●

ममफर्डचें 'Technics and Civilization' मला पुष्कळच उद्‌बोधक ठरलें. भाषिक संवेदनेबद्दल विनोबांचें म्हणणें त्याने फार समर्पक व शास्त्रीय पद्धतीने मांडलेलें आहे. यंत्राच्या भावरूप सांस्कृतिक भूमिकेचें त्याचें विवेचनहि मननीय आहे. एकंदर मांडणी समतोल आहे. जेथे त्याचीं मतें भिन्न वाटतात, तेथेहि विचाराला सामग्री पुष्कळ मिळते.

नागपुर.

२७.२.'५६.

●

काल एक बरेंच लांवलचक पत्र तुला पाठविलें. परवां तू पुण्याला गेलीस म्हणजे जें तुला मिळेल. शहादें-दौंडायचें भागांत जातांना तू अमळनेरच्या मित्रवर्याला कळविलें नाहीस असें दिसतें. कां ? वैयक्तिक स्नेहाची व अगत्याची भीति वाटू लागली म्हणून ? ही प्रतिक्रिया नव्हे काय ? व्यक्तित्वाचा उपमर्द म्हणजे व्यक्ति निरपेक्षता नव्हे. अलीकडे तुझी वृत्ति पालटत असल्याचा जो भास तुला होतो त्याचें बीज यात आहे. त्याच्या निराकरणाचा उपाय मला स्पष्ट दिसतो. पण, तो करून पाहण्याची तुझी तयारी हवी. अध्यात्मामध्ये साक्षात्काराचा जसा उपाय असतो तसाच सामाजिक मूल्यांच्याहि साक्षात्काराचा असतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्या मूल्यांच्या आविष्करणाची तळमळ तुला लागून राहिली आहे त्यांच्या अभिव्यक्तिविषयीं स्विट्झरचें मत खालील मार्मिक वाक्यांत आहे.

His (Sweitzer's) one request was that the form of our association should be as simple as possible. He desires no rigid, impersonal setup but rather direct personal touch from one individual to another, creating complete spontaneity of interest and spiritual concern for his undertaking.

Everett skillings.
[Post Script to Sweitzer's
My Life and Thought]

मर्यादा म्हणजे जुगुप्सा नव्हे आणि दुसऱ्याला कष्ट न देण्याची वृत्ति म्हणजे संकोच नव्हे. प्रौढत्वाबरोबर सामाजिकता व समरसता यांचा विकास व्हायला नको काय?

'प्रश्न उकलले नाहीत' असें तू लिहित्येस. वर मी जें लिहिलें आहे त्याचा विचार कर म्हणजे पुष्कळ उलगडा होईल. एरवी मी हें लिहिलें नसतें.

दौंडायचेंला आमचा राउळ भेटला? 'साळढाळ' व 'ऐसपैस' गडी आहे.

× × चें पत्र आलें आहे. "भूमिदानाचा मार्ग त्यागाचा असला तरी दंडशक्तीशिवाय संपूर्ण समाजाचें मतपरिवर्तन करण्याचा त्याचा दावा अवास्तववादी व आदर्शवादी वाटतो. त्या दृष्टीने समाजसंचालनात दंडशक्तीचें काय स्थान आहे, त्याचा शोध करावयाचा आहे. कायद्याकरिता पूर्वतयारी भूमिदानाच्या आरोहणामुळे होते हें पटतें. आरोहण प्रभावी करण्याकरिता शक्य तितक्या जास्त लोकांनी त्यात आलें पाहिजे हेंहि स्पष्ट आहे. परंतु कायद्याची कांस धरावयाची असेल तर त्या संस्थांवर बहिष्कार न टाकता अंतिम ध्येयाच्या पूर्त्यर्थ त्याचा उपयोग केला पाहिजे... त्याचप्रमाणे लोकशाहीत सत्याग्रहाचें स्थान काय व असल्यास त्याचें स्वरूप काय..." हें × × चे प्रश्न.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याच्या अगदी उलट पत्र दिल्लीच्या × × भाईंचें आलें आहे. त्यांना सध्यांच्या सरकारचा संपर्कदेखील नको आहे. सत्ता-निरपेक्षता म्हणजे सत्तेचा व सत्ताधिकाऱ्यांचा 'बहिष्कार' असा त्यांचा आशय.

हॅरॉल्ड लास्की म्हणजे काही निखारे खाणारा ज्वलज्जहाल क्रांतिवादी नव्हे. आस्ते कदमवाला 'फेबियन' आहे तो. पण, तोदेखील आपल्या State in Theory and practice या '३४ सालीं लिहिलेल्या ग्रंथात शेवटीं म्हणतो–

An adequate theory of Politics now must start, as its foundation, with the incompatibility of the sovereign state with the world economic order we require. It must reveal the state as above all, the guardian of class-relations which deprive us of the richer civilization that might be ours.

संस्थांबद्दल तो म्हणतो –

All institutions, whose past has been a majestic one contain, even in their decline, the power to delay the coming of their successors. They are by our habituation to them, a sort of prison made intimate, and even dear, by the association of an age-long history. Dwelling there in, to many of us, the prospect without seems vague and doubtful and hard. We weigh uneasily the price of escape from its confines; and the courage to attempt it is rare. But it is only as we make the effort that we can go forward with hope. For in no other fashion can we now add creative dignity to the human adventure.

'शस्त्र' आणि 'दंड' यांच्या आश्रयाच्याऐवजी नवीन अधिष्ठानें निर्माण करण्याच्या बाबतीत हा 'सुधारवादी'– क्रांतिवादी नव्हे – शास्त्रवेत्ता म्हणतो –

Reliance upon 'good faith,' in fact, is, at bottom, reliance upon reason in international affairs; and it is to the power of reason in international affairs that the argument has, constantly to return.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'Persuasion' व 'Negotiation' चें धोरण तें हेंच. हे उद्गार अराज्यवादी विलियम गॉडविन, जोसेफ प्राउढॉन, जॉर्जस सोरेल, यांचे नाहीत. विद्यमान सुधारवादी समाजवाद्यांचा प्रवक्ता जी. डी. एच्. कोल तर म्हणतो, To loose faith in reason is to loose faith in democracy. पुढे तो म्हणतो. –

By the democracy, I stand for, I mean making the people really free and self-governing, not the votes they record when they are neither. Voting is merely a handy device, it is not to be identified with democracy, which is a mental and moral relation of man to man.

x x भाई यांच्या पत्रांमुळे थोडा अभ्यास पुन्हा करावा लागला. One must'nt speak without book. मनूला पत्रें मनचीं लिहितो. तेथे 'नामूलं लिख्यते क्वचित्' हा न्याय लागू नाही. माझा विचार व प्रत्यय प्रामाणिक असला म्हणजे पुरें. पण, मनूला वांटेकरी केल्यावांचून अध्ययनदेखील अंगीं कसें लागावें ? म्हणून तुलाहि त्यात सामील करीत आहे. हा माझा 'नैवेद्य' आहे.

'People's China' मध्ये Chen-Shu-Tung नांवाच्या एका भांडवलदाराचा लेख आला आहे. खालील उतारे तुला उपयुक्त वाटतील.

Foreign friends are always asking me : 'Is it true that you capitalists are in favour of socialism too ?' 'Are you sure of your own personal future ?'

My answer is 'yes' to both. We Chinese Capitalists do favour socialism. We welcome the idea of socialist transformation. Those who take this path don't need to worry about their future. They will prosper. But not as capitalists. They will be working in socialist enterprises and drawing a salary. They will earn their living by work, just like all other who live by honest work.

Because imperialism and bureaucrat capitalism were the common enemy of the Chinese people, many of us national capitalists long ago joined the united front led by

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

the working class and the communist party of China. We have continued to follow the road along which they are leading. Many of us hold important governmental positions. Many have been elected people's Deputies or members of the Chinese people's Political Consultative Conference.

Today, China is moving to Socialism, which means the end of Capitalist form of ownership. But we national Capitalists are not being expropriated, as the unpatriotic bureaucratic-bourgeoisie, the tool of imperialism were. We are co-operating in gearing our enterprises into the socialist economic structure, the property of the entire people, in a peaceful process of transition by way of state-capitalism and a policy of redemption.

('People's China.' March 1956.)

व्यक्तींच्या सहयोगाने आणि शांतिपूर्ण मार्गाने क्रांति होत आहे, एवढें यावरून सिद्ध होतें. सर्वांनी वैतनिक कामकरी व्हावें, संक्रमणावस्थेत State Capitalism चा टप्पा अपरिहार्य नाही, हे अहिंसक प्रक्रियेचे अनन्य विशेष आहेत. या प्रक्रियेचें भारतीय वैशिष्ट्य विनोबांच्या व्यापाऱ्यां-करिता केलेल्या प्रवचनात आहे. प्रवचन बहारीचें आहे.

मुरारपुर. गया
९.४.'५६.

'२५ वां घंटा' नंतर तू मला दिलेलें एडमंड टेलरचें Richer by Asia पुस्तक वाचायला घेतलें. वावलाने बरीच वाखाणणी केली होती. खरोखरच पुस्तक जितकें कलात्मक आहे तितकेंच विचारप्रवर्तक व रोचक-हि आहे. 'फतहपुर-सीकरी'चें त्याचें वर्णन तर एक गंभीर चिंतनात्मक व मधुर गद्यकाव्यच आहे. 'पूर्व-पश्चिमवाद', 'विज्ञान-वेदांतवाद', 'काळा-गोरा वाद', 'हिंदू-मुसलिम वाद' या सर्व विषयांवर मोठें मौलिक व उद्बोधक विवेचन आहे. Institutional delusion च्या तत्त्वाच्या अनुरोधाने उपपत्ति लावली आहे. आपण सगळेच अर्धवट आहोत, सगळें जग म्हणजे एक मोठें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

थोरलें वेडयांचें इस्पितळ आहे, दरेक दुसऱ्याच्या शहाणपणाला वेड समजतो आणि स्वतःचा छळवाद चालला आहे असें मानतो, त्यामुळे गोंधळ माजला आहे असें सिद्ध करण्याचा सोपपत्तिक प्रयत्न आहे. संस्थांचे संदर्भ पालटले, माणसाची वृत्ति पालटली. पण आपल्या संदर्भाला अनुकूल संस्थांचें रूपांतर व मानवी संबंधांची पुनः स्थापना करण्याचें माणसाला भान नसल्यामुळे अजून कृत्रिम व भ्रांतिमूलक धारणांवर उभारलेले गट कायम आहेत. दरेक गटाला वाटतें की आपण वेगळे आहोत, विशिष्ट आहोत, इतरांपेक्षा सरस आहोत, आपलें श्रेष्ठत्व हिरावून घेण्यास इतर सारे टपून बसले आहेत, आपल्याविरुद्ध कट व कारस्थानें करीत आहेत. ह्या जो ग्रंथी किंवा मूढग्राह त्याचें नांव मानसशास्त्रात PARANOIA असें आहे. A mental disorder that takes the form of an obsession based upon delusions, specially a delusion that the patient is a subject of persecution Paranoia or persecution-mania is usually classified as a form of Schizophrenia. संस्थांना व समूहांना आज या भावनेची बाधा झालेली आहे असें लेखकाचें म्हणणें. वस्तुतः जगात सर्वत्र माणूस अजून शाबूत आहे. म्हणूनच मानव्याच्या विकासाची व 'एकजगा'च्या स्थापनेची आशा आहे. पुस्तकांत हें विशद केलें आहे. मागे आपण तिबेटविषयीं एक पुस्तक वाचलें नव्हतें का ? हिंदुस्थानबद्दल त्या तोडोचें हें आहे.

मुरारपुर, गया.
२३.४.'५६.

मुंबईकरांनी तुझ्याविषयीं दाखविलेली आस्था व आदर यांचें मूल्य फार मोठें आहे. या देशात सत्ता, शासन, मुत्सद्देगिरी यांचा परिणाम कधीच खोल होणार नाही. पण, तत्त्वनिष्ठा, मानवी सहानुभूति आणि ईश्वरभक्ति यांचा प्रभाव चिरस्थायी पडेल. मानवाला निष्ठेचें अगत्य आहे. अंतःकरणाची तळमळ शमविणारी निष्ठा असावी अशी निकड त्याला लागली आहे.

That same variety of faith is essential to those living in a sceptical age is amply demonstrated by the vigorous growth of new varieties of religion and religion-substitutes outside of the churches. The primal desire in man for a positive belief continues to assert itself and drives who are

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

unable to accept the Christian doctrines to seek some form of faith in the most unlikely places. Novel cults spring up and die down and numerous movements are started, lose direction and come to a stop.

Never was it easier for anyone with a striking personality and a few high-sounding phrases to collect round him a circle of adherents, for at the present moment these would appear to be a veritable hunger for 'Mesiahs'.

What men need more than anything else is an integrative philosophy which will take account of all varieties of human experience and synthesize them into a harmonious whole.

Unless men can reach a certain measure of agreement as to the value and meaning of human existence, no peace can ever be more than a breathing space between wars.

ज्यांच्या निष्ठेला अनुभूतीचा आधार आहे. "moments of vivid living when peace enfolded us and slowly an unaccustomed quietness began to spread through our whole being. The unending procession of trivial thoughts and images across the mind no longer held our attention and, freed of this destruction, and in an unaccustomed silence, we sensed the presence of an all-pervading mystery and holiness. All things had changed and we with them. We... looked upon a new world through half-closed eyes. Time, for a while had ceased to count its minutes....a sense of joyous liberation from the limitations of individual existence and from the tyranny of personality,.... the intellect, as it is its habit, groped for words, but discovering that it was useless, it became silent.

Kenneth Walker.

या अवस्थेचा प्रत्यय ज्यांच्या शब्दांत उमटतो त्यांच्या मंत्र-संकेता-करिता जग उत्कंठित आहे. दादर-गिरगांवला आज अमृतवृष्टीची गरज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. सृष्टीच्या आरंभीं जो 'द द द' म्हणून गंभीर रवानें गर्जला, तोच मनूला बोलवीत आहे !

मुरारपुर. गया

७.३.'५६

मॉर्गनचें 'Search for Purpose' संपविलें. मोठें विचारप्रवर्तक पुस्तक आहे. 'Transformation of Man', 'Compass for civilization' इत्यादि पुस्तकांच्या वर्गातील पुस्तक आहे. विज्ञान आणि अध्यात्म, बुद्धि आणि भावना, विचार स्वातंत्र्य आणि आप्तप्रामाण्य, स्पर्धा आणि सहकार्य, अभ्युदय आणि निःश्रेयस्, जिजीविषा आणि जीवनसमर्पण इत्यादि परस्पर विरोधी भासणाऱ्या जीवनमूल्यांचा सार्वत्रिक जीवननिष्ठेच्या दृष्टीने कसा समन्वय करता येईल याचें विवेचन मोठ्या विचारप्रवर्तक पद्धतीने केलें आहे. मुख्य भूमिका निराग्रही जिज्ञासेची व तटस्थ चिकित्सेची आहे.

नवेगांव.

१६.३.'५८

'Search for Purpose' नंतर Walter Lippmann चें 'Essays in the public philosophy' वाचलें. हा लेखक एकंदरीत बर्क, मिल्ल, वगैरेंच्याच वर्गातला. त्याला 'क्रांति' नको आहे. पण समाजनीति व नागरिकनीतीचीं काही मूलभूत तत्त्वें आहेत, त्या तत्त्वांविषयीं प्रामाणिक निष्ठा समाजधुरीणांमध्ये असल्यावांचून समाजधारणा व लोकोन्नति होणें शक्य नाही हें त्याचें म्हणणें मान्य करावें लागेल. लोकराज्याकरिता लोकव्यवहाराचें अधिष्ठानभूत तत्त्वज्ञानहि पाहिजे, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. या दृष्टीने पुस्तक विचारप्रवर्तक वाटलें. भाषाहि ओघवती व चटकदार आहे.

नवेगांव.

१८.३.'५८.

आर्थर मॉर्गनचें 'The future of the community & the community of the future' काल सुरू केलें. माणसांची वसाहत निराळी,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांचें 'घर' निराळें. 'शिबिर' किंवा 'छावणी' निराळी आणि 'घर' निराळें. त्याचें 'घर' हें जगातील अद्वितीय स्थान ! "There is no place like Home!" लोखंडी गज व दगडी भिंताडे मिळून ज्याप्रमाणे तुरुंग निर्माण करू शकत नाहीत, त्याचप्रमाणे विटा-मातींच्या भिंती 'घर' निर्माण करू शकत नाहीत. घरात कौटुंबिक संबंधाचा परिमल, वातावरणाचें सौंदर्य, व्यवस्थेचा आराम, सुखसोयी, व्यवसाय इत्यादि अनंत घटक असतात. ही गोष्ट community ला कशी लागू आहे याचें विवेचन मॉर्गनने केलें आहे. 'सर्वानुमतें निर्णय', 'निष्पक्ष व्यवस्था,' इत्यादि प्रकरणें विशेष विचार प्रवर्तक आहेत.

या सगळ्यांचा आद्य गुरु सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ नगररचना कोविद् पॅट्रिक गिडीस हाच वाटतो. त्याच्या नगररचना तंत्रात मानवीय दर्शन, सौंदर्याभिरुचि, सुखसोयी, स्वच्छता, आरोग्य व निसर्ग रमणीयता यांचा समावेश होता. लुई ममफर्डच्या विवेचनात तीं वैशिष्टचें दिसतात. फक्त स्थापत्य, वस्तुकला व नगररचना यांचें शास्त्र जाणणारांच्या ग्रंथात तीं दिसून येत नाहीत. Development (विकास) योजना निराळी आणि 'कौटुंबिक ग्राम' (community) योजना निराळी नाही ?

इटारसी.
७.४.'५८.

काल 'सिद्धार्थ' सुरू केलें. आणि कालच संपविलें. जितकें सुबोध, तितकेंच हृदयग्राही आणि कलात्मक ! किती तरी ठिकाणीं कृष्णमूर्तींची आठवण होते ! Don't Compare ! पण ती होते त्याला काय उपाय ? किती तरी वाक्यें अगदी ठसठशीत व खुसखुशीत भाषेत मांडलीं आहेत ! काही काही वाक्यांत तर अगदी नृत्याप्रमाणे ताल आणि लय आहे ! वस्तूशीं प्रत्यक्ष परिचय व संपर्क स्थापून तटस्थतेचा दिव्य व नित्य जागरूक आनंद अनुभवायचा, काही सोपें काम नाही. उपदेश, शिकवणुक, बोध, विचार यांच्या मर्यादेचें विवेचन सूचक व समर्पक आहे. तत्त्वनिरूपण अशा मधुर, सुबोध व सोपपत्तिक पद्धतीने केलें आहे कीं वाचतांना शीण येत नाहीं,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ताण पडत नाही. 'स्वत: मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाही,' प्रत्यक्ष अनुभवाचा प्रत्ययच खरा, हें त्याचें सार दिसतें.

अच्युतजींकडून Liberties of the Mind हें Charles Morgan चें पुस्तक आणलें खरें पण अद्याप तें वाचू शकलो नाही. पुस्तक मोठें विद्वत्ताप्रचुर आणि रोचक आहे. पण, वाचायला जरा मनोयोग पाहिजे. आजच्या जगात 'मनोनियंत्रणा'चे व 'मानसिक बलात्काराचे' किती निरनिराळे प्रकार आहेत याचें मोठें उद्‌बोधक विवेचन आहे. एवढें माझ्या ध्यानात आलें. 'Influences, traditions, pressures' कृष्णजींच्या काही शब्दांचें स्मरण होतें.

नागपुर.
२.३.'५९.

येथील मुक्कामात 'आहुति' वाचलें. परीक्षणाकरिता वाचलें नाही. रसपिपासेच्या भूमिकेवरूनहि वाचलें नाही. मन:पूर्वक वाचलें. तत्त्वज्ञानाच्या प्रतिपादनाचे भाग बरेच आवेशयुक्त वाटले. मतपरिवर्तनानंतरच्या नवीन आवेशाचा आभास झाला. पण, आवेशाच्या मानाने ओज नाही. ओघाच्या प्रमाणात प्रसन्नता नाही. प्रतिभेची चमक ठिकठिकाणीं आहे. पण हृदयाला उजळणारा आलोक कमी. भाषेत दिमाख जितका आहे त्या मानाने सहज सुरेखपणा व पकड नाही. नादमाधुर्य तर फार कमी. काही प्रसंग अतिशय हृदयंगम आहेत. संजीवनीची कहाणी, ताराबाईंच्या आयुष्यातील काही घटना, सदानंदाचे पात्र, हृदयाला चटका लावतात. कांही परिच्छेद, काही वर्णनें, सरळ अंत:करणाचा ठाव घेतात. एका परिवर्तनशील जीविताचे जिवंत पडसाद उमटलेले आहेत. प्रत्यय उमटत नाही. पण पडसाद वाचकाच्या हृदयावर उमटतात. 'आध्यात्मिक स्पर्श', अलमोड्या नजीकची पर्णकुटी, विश्वेश्वराच्या सान्निध्यातील विवाह, पंढरपुरची वाट, वेदविद्येचा प्रसार इत्यादि अनेक गोष्टी ध्यानात येण्यासारख्या नाहीत. पण सुसंगति, तर्कशुद्धता, रेखीव योजना, टीपबंद पद्धति, दर्शनानुसारी आदर्श यांचा जीवनाशी अविभाज्य संबंध नाहीच. त्यामुळे अध्यात्माच्या स्पर्शाचा जितका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व जेवढा प्रत्यय असेल आणि त्यांतील जेवढा वाग्गोचर असेल तेवढा आहुतीत उमटला असावा.

शंकररावांनीहि 'आहुति' माझ्या जवळून मागून घेऊन वाचली आहे. त्यांना त्यात निश्चित असें काही आढळलें नाही. मी त्यानंतर वाचली. मला पुस्तक बरेंच 'वेगवान' वाटलें. 'डिस्कवरी ऑफ इंडिया' चें हें व्यक्तिनिष्ठ असें संस्करण आहे. त्यात लेखकाला लागलेल्या 'शोधा'चा 'आविष्कारा'चा ठसा उमटला आहे. एकंदरीत छान आहे 'आहुति.'

७-२-६०

●

बा. मो. पुरंदरे यांचें 'राजा शिवछत्रपति' वाचायला घेतलें आहे. बेबी-बवनांनी सगळे भाग विकत घेतले आहेत. पुरंदऱ्यांची शिवचरित्रावर येथे सुश्राव्य व्याख्यानें झालीं म्हणतात. कथेकऱ्याची रसाळ निरूपण शैली, कुशल नटाचा अभिनय, शाहिराची कमावलेली आवाजी, आणि साहित्यिकाची नखरेबाज भाषा, असा थाट असल्यामुळे श्रोते चार-चार तास स्तब्ध बसून ऐकण्यात गुंग होऊन जात असत, असें वर्णन बेबी करीत होती. माझ्या संस्कारांमध्ये महाराष्ट्रीय परंपरेची व ऐतिहासिक वाण्याची उणीव आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाचें ज्ञानहि अगदी लाज वाटण्याइतकें तोकडें आहे. महाराष्ट्रातील थोर पुरुषांची थोरवी व विभूतिमत्त्व मला कळतें. त्याच्याविषयीं विलक्षण आत्मीयता व निःसीम भक्तिभाव माझ्या मनात आहे. पण, माझ्या वृत्तीला कुठल्याच परंपरेचें वळण नाही. म्हणून पुरंदऱ्यांचें हें शिवचरित्र वाचतांना मला पुष्कळ शिकायला मिळतें. शिवाजीमहाराजांविषयीं फार आदर वाटतो. पण ज्या वृत्तीचा परिपोष चरित्रलेखक अट्टाहासाने करू इच्छितो ती मात्र कोतीच वाटते. वीरवृत्ति व क्षात्रतेज यांचा संकुचितपणाशी काय संबंध आहे ?

जबलपुर

२७.२.'६०.

●

बा. मा. पुरंदऱ्यांच्या 'राजा शिवछत्रपति'चें दहाहि भाग वाचले. महाराजांच्या चरित्राविषयीं मराठी पुस्तक किती तरी वर्षांनी वाचलें. यापूर्वी केळूसकरांचें एक पुस्तक वाचल्याचें मात्र आठवतें. जदुनाथ सरकार,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रॉलिनसन, किनकेड, एल्फिन्स्टन, ग्रॅनडफ इत्यादींचीं पुस्तकें वाचलीं होतीं. त्यामानाने हें पुस्तक पुष्कळच चटकदार व स्फूर्तिदायक वाटलें. त्यात जिव्हाळा आहे आणि निवेदनाची उत्सुकताहि आहे. पण, एवढ्या भव्य विभूतीलाहि संकुचित भावनात्मक क्षेत्रात कोंडण्याचा मोह लेखकाला आवरला नाही. भगवान् रामचंद्र व श्रीकृष्ण अयोध्या व मथुरा येथे झाले. भगवान् बुद्ध उत्तर भारतातच झाले. भगवान् शंकराचार्य दक्षिणेत झाले. रामकृष्ण-विवेकानंद पूर्वेकडे झाले. पण गंगा-हिमालयाप्रमाणे ते सगळ्या भारताचे आहेत. सम्राट् चंद्रगुप्त, विक्रमादित्य, भोज, यांच्या भाषेचा किंवा प्रांताचा विचारदेखील आपल्या मनाला शिवत नाही. तसेंच भव्य विभूतिमत्त्व शिवाजी महाराजांचें आहे. भारतीय विभूतींच्या परंपरेला शोभण्यासारखें त्यांचें व्यक्तिमत्त्व उदात्त व उदार आहे. पण, त्यांना महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठीमन, यांच्या सरोवरात कोंडून ठेवण्याचा प्रयत्न आहे. शिवाजीचें 'स्वराज्य' भौगोलिक दृष्टयाहि 'मराठी' नव्हतें. तें कानडी, तेलंगी व तमिळ-देखील होतें. पण भौगोलिक सीमांपेक्षा त्यांच्या राज्याच्या भावनात्मक सीमाचाच विचार अधिक करणें श्रेयस्कर आहे. त्या सीमा अनंत आहेत.

जबलपुर.
३.३.'६०.

या प्रवासात Devis De Rongemont चें 'Man's Western Quest' आणि 'Democracy in the New states' (Rhodes Seminar Papers) हीं पुस्तकें वाचलीं. 'Man's Western Quest' मोठें विचार-प्रवर्तक व नाविन्यपूर्ण पुस्तक वाटलें. पूर्व आणि पश्चिम यांच्या सांस्कृतिक वैशिष्टयांचें व ऐतिहासिक आणि सामाजिक परंपरेचें पृथक्करण आणि विवेचन अतिशय भारदस्त व चिकित्सक पद्धतीने केलें आहे. शैलीहि विवेचनाला अनुरूप अशीच आहे. 'Democracy in the New States' मधील निबंधात नवोदित लोकशाही राज्यातील लोकशाहीच्या जिवंत समस्यांचा विचार विधायक व व्यावहारिक दृष्टीने केलेला आहे. याखेरीज Thorstein Veblen चें The Theory of the Leisure Class' हि थोडेंसें वाचलें. मोठें मार्मिक व वैशिष्टयपूर्ण विवेचन आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

leisure चे, 'Conspicuous Consumption,' 'Conspicuous Leisure' इत्यादि नवीन शब्दप्रयोग मोठे अन्वर्थक वाटतात. शरद्बाबूंचा 'नारी का मूल्य' निबंधहि सहज वाचला. त्यांचें वाङ्मय न वाचण्यात आपण केवढी चूक केली हें माझ्या लक्षात आलें. मला जे विचार पटतात व रुचतात आणि क्वचित् सुचतातहि ते विचार शरद्बाबूंनी किती तरी परिणामकारक, ओजस्वी, हृदयस्पर्शी व कलात्मक शैलीत मांडलेले दिसतात. अगोदर त्यांचें वाङ्मय वाचलें असतें तर त्यांच्या थोर नांवावर खिरापत उधळून कृतकृत्य झालो असतो !

जबलपुर.
९.३'६०.

जवाहरलाल भक्त नाही, संत नाही, कवि नाही. पण परवां इतिहासासारख्या रूक्ष विषयावर लिहितांना त्यांच्या हृदयाचें सौंदर्य प्रकट झालें –

The old temple spires, the mosque with its slender minarals, the Gothic cathedral – all of them pointing upward with an amazing intensity of devotion as if offering a prayer in stone or marble, to the sky above – thrill us even now, though we may be lacking in that faith of old of which they are the embodiments. But the days of that faith are gone and gone with them is that magic touch of stone.

Our age is a different one, it is an age of disillusion, of doubt and uncertainty and questioning.. As in the days of Socrates, we live in an age of questioning, but the questioning is not confined to a city like Alhens; it is world-wide.

History teaches us of growth and progress and of the possibility of an infinite advance for man. Life is rich and varied and though it has many swamps and marshes and muddy places, it has also the great sea and the mountains and snow and glaciers and wonderful star-lit nights and the love of family and friends and the comradeship of workers

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

in a common cause; and music and books and the empire of ideas..

हे बोल मोलाचे आहेत. हा माणूस राज्यकारणात गुंतलेला आहे. तरी पण विज्ञानपरिषदांना जातो; इतिहासपरिषदेला संदेश पाठवितो, समाजसेवापरिषदेंत भाषण करतो. आणि सगळ्या ठिकाणीं शहाण्या नागरिकाच्या समंजस व उदात्त दृष्टीने नवीन काही तरी सांगतो. तो संत नाही. एक गृहस्थ आहे. त्याच्या शब्दांत आकाशाचें दिव्य तत्त्वज्ञान नाही. पण संजीवनाचें विज्ञान आहे. इतिहासाची मीमांसा करतांना तो जीवनाचें लालित्यपूर्ण स्तोत्र सांगतो. त्यात स्फटिकासारखा प्रांजळ भाव आहे. संगीताचें माधुर्य आहे. पण विशेष म्हणजे वस्तुनिष्ठेचा कणखर प्रत्यय आहे.

हें विज्ञान स्वर्गीय नाही. पार्थिवहि नाही. क्षितिजांचें आहे.

१९६०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझी निष्ठा निर्भेळ व निरपेक्ष स्नेहावर जितकी आहे, तितकी इतर कुठल्याहि तत्त्वावर नाही. त्यामुळेच मी स्वतःला कधी कुणाचा शिक्षक अगर वाटाड्या मानलें नाही. स्नेहामध्ये अद्‌भुत दृष्टि व दर्शन असतें. स्नेह जसा स्वतःच्या डोळ्यांत प्रकट होतो, तसा तो इतरांच्या डोळ्यांत प्रकाशहि पाडतो. न देता, न कळत, शिक्षण दिलें जातें आणि घेतलें जातें. मी तर्कनिष्ठ व बुद्धिवादी आहे. पण तर्क व बुद्धि यांच्यावर अंतिम प्रमाणें म्हणून माझी निष्ठा असली तरी खरी भिस्त स्नेहाने प्राप्त होणाऱ्या अंतर्दृष्टी चे आहे.

—— दादा

मूल्य – सात रुपये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi